# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दिनांक २०-१२-२००१ ते १८-४-२००२

**रजिष्टर क्र. ५**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद
## सर्वसाधारण सभा

| अनुक्रमांक | सर्वसाधारण सभेचा दिनांक | विषय क्र. व ठराव | प्रश्न क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | २०-१२-२००१ | ५४१-१ ते ५६१/१० चर्चा | १२ ते १५ |
| २. | १८-०१-२००२ | चर्चा | -- |
| ३. | १८-०२-२००२ | ५६२/१ ते ५७०/४ (स. ११.३० वा.) | १६ ते ३७ |
| ४. | १८-०२-२००२ | ५७१/१ (दु. २.३० वा.) | |
| ५. | २८-०२-२००२ | ५७२/२ ते ५७९/२ | |
| ६. | ०७-०३-२००२ | ५८० | |
| ७. | ३०-०३-२००२ | ५८१ अर्थसंकल्पीय बैठक | |
| ८. | ०१-०४-२००२ | चर्चा | |
| ९. | ०२-०४-२००२ | ५८१ चा ठराव | |
| १०. | १८-०४-२००२ | ५८२/१ | |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक २० डिसेंबर २००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**गुरुवार दिनांक २०-१२-२००१ रोजी मा. महापौर श्री विकास जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री शिंदे राजू रामराव | स. सभासद |
| २) | स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष | -//- |
| ३) | स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ४) | स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५) | स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ६) | स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) | स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ८) | स. स. श्री शे. ईलीयास किश्मानी शेख उमर | -//- |
| ९) | स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| १०) | स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ११) | स. स. श्री कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| १२) | स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १३) | स. स. सौ. पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १४) | स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १५) | स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १६) | स. स. सौ. शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १७) | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १८) | स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १९) | स. स. श्री शे. शकील पटेल शे. बुढण पटेल | -//- |
| २०) | स. स. श्री डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २१) | स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| २२) | स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २३) | स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २४) | स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २५) | स. स. सौ सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २६) | स. स. श्री जाबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २७) | स. स. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २८) | स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २९) | स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ३०) | स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| ३१) | स. स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| ३२) | स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान | -//- |
| ३३) | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |

| | | |
|---|---|---|
| ३४) | स. स. श्री स. मुमताज अली मुअब्जम अली | -//- |
| ३५) | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | -//- |
| ३६) | स. स. श्री. थोरात दत्तात्रय रामराव | -//- |
| ३७) | स. स. श्री. सोनवणे सुदाम रामदास | -//- |
| ३८) | स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत | -//- |
| ३९) | स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुंडलीक | -//- |
| ४०) | स. स. सौ. नुसरत बानो फिरोजखान | -//- |
| ४१) | स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| ४२) | स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव | -//- |
| ४३) | स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | -//- |
| ४४) | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| ४५) | स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय | -//- |
| ४६) | स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग | -//- |
| ४७) | स. स. श्री अब्दुल कदिर मौलाना सय्यद | -//- |
| ४८) | स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | -//- |
| ४९) | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | -//- |
| ५०) | स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ५१) | स. स. श्री नासीर खान अ. रहेमान खान | -//- |
| ५२) | स. स. श्रीमती शाहीन जफर महमुद जफर | -//- |
| ५३) | स. स. श्री जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण | -//- |
| ५४) | स. स. सौ दाणे चंद्रभागाबाई भागीरथ | -//- |
| ५५) | स. स. श्री ओक जयवंत केशवराव | -//- |
| ५६) | स. स. श्री स. सलीम स. युसूफ | -//- |
| ५७) | स. स. श्री तकीहसन खान कासीम हसन खान | -//- |
| ५८) | स. स. श्री मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ५९) | स. स. श्रीमती नफिसुन्नीसा बेगम हबीब खॉ | -//- |
| ६०) | स. स. श्री अफसर खॉ यासीन खॉ | -//- |
| ६१) | स. स. श्री लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६२) | स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन | -//- |
| ६३) | स. स. श्री सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ६४) | स. स. श्री कैसर यान बद्रोद्यीन खान | -//- |
| ६५) | स. स. श्री जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | -//- |
| ६६) | स. स. स. अली सलामी स. मीरा सलामी | -//- |
| ६७) | स. स. श्री तनवाणी किशनचंद लेखराज | -//- |
| ६८) | स. स. सौ निखत परविन ईजाज अली | -//- |

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री सुभाष लक्ष्मीनारायण वच्छवाह
२) स. स. श्री घडामोडे भगवान देवीदास
३) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
४) स. स. श्री धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

५) स. स. सौ. सलमा बानो मीर मो. अली

**संवाद :**

श्री अफसर खान : संसदेवर झालेल्या हल्याचा निषेधाच ठराव पास करावा तसेच जे जवान शहीद झाले त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

सौ. दाणे चंद्रभागाबाई : स. सदस्य श्री सावंत यांचे सासरे बुध्दवासी झालेले असून, त्यांना सुध्दा सभागृहातर्फे ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री जयवंत ओक, श्री घोडेले नंदकुमार : स. सदस्य श्री तुळशीबागवाले किशोर यांचे वडील स्व. बाबुलाल तुळशीबागवाले यांचे दु:खद निधन झाले. त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे. सर्वांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी ०२ मिनिटे उभे राहावे. याचवेळी सभागृहातर्फे नुकताच संसदेवरील हल्लयात शहीद झालेले जवान तसेच स. सदस्य श्री सावंत यांचे सासरे व स. सदस्य श्री तुळशीबागवाले यांचे वडील स्व. बाबुलाल तुळशीबागवाले यांचे दु:खद निधन झाल्याबद्दल ०२ मिनिटे सर्वांनी स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री प्रकाश निकाळजे : संसदेवरील हल्लयाचा निषेध करुन तसा ठराव पास करावा व शासनाकडे सभागृहाच्या भावना कळवाव्यात.

श्री दानवे अंबादास : संसदेवर झालेल्या हल्लयाच्या संदर्भात शहरातील जनतेच्या भावना लक्षात घेऊन तसा निषेधाचा ठराव पास करावा.

श्री काशीनाथ कोकाटे : ठराव पास करावा यास माझे अनुमोदन आहे. ठराव पास करुन राज्य शासनाकडे पाठवावा. तसेच केंद्र शासनाकडे सुध्दा ठरावाची प्रत पाठवून या सभागृहाच्या भावना कळवाव्यात.

मा. महापौर : संसदेवर झालेल्या हल्लयाचा सभागृहातर्फे निषेध करण्यात येतो. सभागृहाच्या भावना शासनाकडे कळविण्यात याव्या.

श्री आनंद तांदुळवाडीकर : या शहरातील क्रिकेट खेळाडू श्री. एकबाल सिद्यीकी तसेच श्री. संजय बांगर यांचा भारतीय क्रिकेट संघात समावेश करण्यात आलेला असून, या सभागृहातर्फे अभिनंदनाचा ठराव पास करावा. तसेच महानगरपालिकेतर्फे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात यावा.

श्री प्रशांत देसरडा : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : दोन्ही खेळाडूचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते. आता प्रश्नोत्तरे आपण घेणार आहोत.

## *प्रश्नोत्तरे*

प्रश्न समुह क्रमांक -१

मा. श्री. चंद्रशेखर जैस्वाल (दि. ५-१२-२००१)

**प्रश्न क्रमांक -१२ :** महानगपालिका हद्दीत खासदार व आमदार निधीमधून कोणकोणत्या प्रभागात व वसाहतीत व्यायामशाळा, मंगल कार्यालये, सांस्कृतिक सभागृह, समाज मंदिर उभारणेचे प्रस्तावास मंजूरी मिळालेली आहे. त्यापैकी एकूण किती व कोणकोणत्या व्यायाम शाळा, मंगल कार्यालय, सांस्कृतिक सभागृह व समाज मंदिर बांधून पूर्ण झालेली आहेत. मंजूरी मिळालेली अशा एकूण किती व कोणकोणत्या ईमारती उभारणेचे काम कोणकोणत्या भागात प्रगती पथावर आहेत. मंजूरी मिळालेल्या प्रस्तावानुसार एकूण किती व कोणकोणत्या

ईमारती उभारणेचे काम भविष्यात हाती घेणार आहात. अशा सर्वही मंजूरी मिळालेल्या ईमारतीचे बांधकामाची प्रत्येकी अंदाज पत्रकीय रक्कम किती?

उभारण्यात आलेल्या काही ईमारती खाजगी संस्थाना भाडयाने चालविण्यात देण्यात आलेल्या आहेत काय? असल्यास त्यापासून एकत्रित वार्षिक भाडे किती मिळते. अशा सार्वजनिक वापरासाठी उभारलेल्या एकूण किती व कोणकोणत्या ईमारती सध्या बंद पडून आहेत. त्या बंद पडून असण्याची कारणे काय? अशा व्यायामशाळा, मंगल कार्यालय, सांस्कृतिक सभागृह व समाज मंदिराच्या ईमारती महापालिकेमार्फत अथवा खाजगी संस्था मार्फत जनतेच्या सोयीसाठी केव्हा सुरु करणार आहात? याबाबत विहित आकडे वारीसह सविस्तर अहवाल सभागृहात सादर करण्यात यावा.

**उत्तर - १२ : शहर अभियंता**

| अ. क्र. | इमारतीचे नांव | अ. प. रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मुकूंदवाडी प्रा. आरोग्य केंद्राच्या बाजुला सार्वजनिक सभागृह बांधणे | २,५८,५००/- | काम पूर्ण |
| २. | सौभाग्य मंगलकार्यालयासमोर सा. सभागृह बांधणे. | २,५८,५००/- | काम पूर्ण |
| ३ | सहकारनगर येथे सा. सभागृह बांधणे | ५,००,०००/- | काम पूर्ण |
| ४ | सुराणानगर येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | ५,००,०००/- | काम पूर्ण |
| ५ | किराडपूरा शाळा क्र. १ समोर सा. सभागृह बांधणे | ५,००,०००/- | काम पूर्ण |
| ६ | पन्नालालनगर येथे सा. सभागृह बांधणे | ५,००,०००/- | काम पूर्ण |
| ७ | जिन्सी येथे व्यायाम शाळा बांधणे | ५,००,०००/- | काम पूर्ण |
| ८ | छावणी येथे व्यायाम शाळा बांधणे | ५,००,०००/- | काम पूर्ण |
| ९ | मिटमिटा येथे व्यायाम शाळा बांधणे | ४,४२,०००/- | काम पूर्ण |
| १० | संजयनगर मुकूंदवाडी येथे अभ्यासिका बांधणे | १,४७,५००/- | काम पूर्ण |
| ११ | समर्थनगर येथे व्यायाम शाळा बांधणे | ३,००,०००/- | काम पूर्ण |
| १२ | टाऊन हॉल येथे व्यायाम शाळा बांधणे | ६,७२,०००/- | काम पूर्ण |
| १३ | खाराकुंवा येथे व्यायाम शाळा बांधणे | ५,००,०००/- | काम पूर्ण |
| १४ | नक्षत्रवाडी येथे सा. सभागृह बांधणे | २,५८,५००/- | काम पूर्ण |
| १५ | गारखेडा येथे व्यायाम शाळा बांधणे (स. न. १५३१०) | ४,५०,०००/- | काम पूर्ण |
| १६ | माजी सैनिक कॉलनी येथे सभागृह बांधणे | २,५५,०००/- | काम पूर्ण |
| १७ | दिपनगर येथे व्यायाम शाळा बांधणे | ५,००,०००/- | काम पूर्ण |
| १८ | राजनगर उद्यान येथे व्यायाम शाळा बांधणे | १,६३,६१७/- | काम पूर्ण |
| १९ | म्हाडा कॉ. एन-६ येथे सभागृह बांधणे | ६,७४,०००/- | काम पूर्ण |
| २० | शहानुरमियाँ दर्गा येथे सभागृह बांधणे | ४,७७,०००/- | काम पूर्ण |
| २१ | बसैस्येनगर येथे व्यायाम शाळा बांधणे | ४,००,०००/- | काम पूर्ण |
| २२ | बसैय्येनगर येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | ८,००,०००/- | काम पूर्ण |
| २३ | स. भु संस्थेजवळील बौध्दवस्तीत सभागृह बांधणे | २,२०,०००/- | काम पूर्ण |
| २४ | आंबेडकरनगर येथे समाज मंदिर बांधणे | ६,०५,०००/- | काम पूर्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | प्रियदर्शनी इंदिरानगर येथे या सभागृह बांधणे | २,५८,०००/- | काम पूर्ण |
| २६ | मोतीकारंजा येथे व्यायामशाळा बांधणे | ५,००,०००/- | काम प्रगतीपथावर |
| २७ | रमानगर वाचनालय परिसरात व्यायामशाळा बांधणे | २,५५,०००/- | निविदा कार्यवाही |
| २८ | स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | ५,२२,०००/- | काम पूर्णत्वाकडे |
| २९ | नारेगांव येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | २,८५,०००/- | काम पूर्ण |
| ३० | ब्रिजवाडी येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | २,८५,०००/- | काम पूर्ण |
| ३१ | विठ्ठलनगर येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | २,५८,५००/- | काम पूर्ण |
| ३२ | मित्रनगर येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | ५,०१,०००/- | काम पूर्ण |
| ३३ | छत्रपतीनगर येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | ५,०१,०००/- | काम पूर्ण |
| ३४ | भावसिंगपुरा पेठेनगर सांस्कृतिक सभागृह बांधणे | ३,००,०००/- | काम पूर्ण |
| ३५ | हर्सुल येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | २,५२,५००/- | जागे अभावी काम रद्द |
| ३६ | पडेगाव येथे सांस्कृतिक सभागृह बांधणे | २,५०,०००/- | काम पूर्ण |
| ३७ | शहाबाजार येथे व्यायाम शाळा बांधणे | २,५०,०००/- | काम पूर्ण |
| ३८ | भाईवाडा येथे नेहरु पॅलेस व्यायाम शाळा बांधणे | ५,००,०००/- | प्रगती पथावर |
| ३९ | राहुलनगर बनेवाडी व्यायाम शाळा बांधणे | २,५०,०००/- | काम पूर्ण |
| ४० | बेगमपुरा पहाडसिंगपूरा व्यायाम शाळा बांधणे | ५,००,०००/- | काम पूर्ण |
| ४१ | बेगमपुरा व्यायाम शाळा बांधणे | ३,००,०००/- | प्रगती पथावरे |

**उत्तर १२ : प्रकल्प संचालक**

## *समाज मंदिराची यादी व वापर*

| अ. क्र. | विभाग क्र. | वस्तीचे नांव | सध्याचा वापर |
|---|---|---|---|
| १. | १ | भावसिंगपूरा | कामगार कल्याण केंद्रास भाडे तत्वावर दिले आहे. |
| २ | १ | -//- | रिक्त |
| ३ | १ | बेगमपूरा | शिक्षण विभाग वाचनालय |
| ४ | १ | काझीवाडा | अभ्यासिका-बांधकाम सुरु आहे. |
| ५ | १ | हर्षनगर | दवाखाना-आरोग्य विभाग |
| ६ | १ | जयभिमनगर (घाटी) | रिक्त |
| ७ | १ | किलेअर्क | रिक्त |
| ८ | १ | शांतीपूरा | रिक्त |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | १ | रशिद मामू कॉलनी | अभ्यासिका-बांधकाम सुरु आहे. |
| १० | ३ | शहाबाजार | रिक्त |
| ११ | ३ | -//- | कामगार कल्याण केंद्र भाडे तत्वावर दिले आहे. |
| १२ | ३ | नागसेन कॉलनी | रिक्त |
| १३ | ३ | मोतीवाला हॉल | मनपा प्राथमिक शाळा |
| १४ | ३ | रोजेबाग | प्रकल्प-बालवाडी / शिवणकेंद्र |
| १५ | ३ | हर्सुल | रिक्त |
| १६ | ३ | रोषण फंक्शन हॉल | प्रकल्प बालवाडी भाडयाने दिले जाते |
| १७ | ३ | गांधीनगर | प्रकल्प - बालवाडी |
| १८ | ३ | सिध्दार्थनगर | प्रकल्प - बालवाडी |
| १९ | ४ | भिमपूरा | रिक्त |
| २० | ४ | रमानगर | रिक्त |
| २१ | ४ | अजबनगर | अभ्यासिका, बांधकाम सुरु आहे. |
| २२ | ५ | आंबेडकरनगर | बालवाडी - शिक्षण विभाग |
| २३ | ५ | चिकलठाणा | रिक्त |
| २४ | ५ | -//- | अभ्यासिका - बांधकाम सुरु आहे. |
| २५ | ५ | संजयनगर (म.) | प्रकल्प - बालवाडी |
| २६ | ५ | नारेगाव | अभ्यासिका - बांधकाम सुरु आहे |
| २७ | ६ | कदीरनगर | रिक्त |
| २८ | ६ | घाडगेनगर | रिक्त |
| २९ | ६ | नागसेननगर | प्रकल्प - बालवाडी |
| ३० | ६ | मिलिंदनगर | रिक्त |
| ३१ | ६ | क्रांतिनगर | रिक्त |
| ३२ | ६ | फुलेनगर (उस्मानपुरा) | प्रकल्प - अभ्यासिका कार्यरत |
| ३३ | ६ | स्टे. हमालवाडी | कामगार कल्याण केंद्रात भाडेतत्वावर |
| ३४ | ६ | कांचनवाडी | रिक्त |
| ३५ | ६ | इटखेडा | अभ्यासिका - बांधकाम सुरु आहे. |

**उत्तर -१२ : मालमत्ता अधिकारी** व्यायाम शाळा, मंगल कार्यालय, समाज मंदिर, सांस्कृतिक सभागृह बाबत तपशिल.

| अ.क्र | मोहल्ला | सांस्कृतिक सभागृह | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मंजूरपुरा हर्षनगर | बहुउद्देशीय हॉल व (०३ दुकान) | २१०.९५ चौ. मी. |
| २ | बेगमपुरा | हुत्तमा अनंत कान्हेर सभागृह | १६६.३४ चौ. मी. |
| ३ | हर्षनगर | मंगर कार्यालय | ११.३२ चौ. मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बुढीलैन | वाचनालय | **वाचनालय विभाग क्र. १** |
| २ | बेगमपुरा | वाचनालय | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | भावसिंगपुरा | -- | भावसिंगपुरा समाजमंदिर | **समाजमंदिर** |
| २. | भावसिंगपुरा | -- | भावसिंगपुरा बालवाडी केंद्र | **विभाग क्र.१** |
| ३. | बेगमपुरा | -- | बेगमपुरा समाजमंदिर | |
| ४. | जयसिंगपुरा (घाटी) | -- | जयसिंगपुरा समाजमंदिर | |
| ५. | बुढीलैन | -- | बुढीलैन (वाचनालय) | |
| ६ | किलेअर्क | -- | किलेअर्क समाजमंदिर | |
| ७ | हर्षनगर | -- | हर्षनगर समाजमंदिर | |
| ८. | शांतीपुरा | -- | शांतीपुरा समाजमंदिर | |
| ९. | लेबर कॉलनी | -- | लेबर कॉलनी (मंदिरा जवळ) | |
| १०. | मिटमिटा | -- | मिटमिटा गांव (विहीरी जवळ) | |

## *सांस्कृतिक सभागृह*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | **विभाग क्र. २** |
| १ | कोहीनुर कॉलनी | -- | फंक्शन हॉल | -- | २२५३.४६ चौ. मी. |
| २ | मोतीकारंजा | -- | बहुउद्देशीय सभागृह | -- | १७.१० चौ. मी. |
| ३ | गरमपाणी | -- | संस्कार केंद्र / बौध्द विहार | -- | ९७८.०५ चौ. मी. |

## *व्यायाम शाळा विभाग क्र. २*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोलेश्वर | -- | व्यायाम शाळा भोलेश्वर मंदिराचे पश्चिम भागात | -- | ६८.३४ चौ. मी. |
| २ | खारा कुआ | -- | व्यायाम शाळा | -- | १६७.१३ चौ. मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **वाचनालय विभाग क्र. २** |
| १ | खडकेश्वर | -- | वाचनालय |
| २ | वसंत भवन | -- | वाचनालय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **सांस्कृतिक सभागृह विभाग क्र. ४** | | |
| १ | मित्रनगर आकाशवाणी | -- | सांस्कृतिक सभागृह | -- | १०५.८२ चौ. मी. |
| २ | सहाकार नगर | -- | सांस्कृतिक सभागृह | -- | १६५.९६ चौ. मी. |
| ३ | पन्नालालनगर | -- | सांस्कृतिक सभागृह | -- | १२१.९७ चौ. मी. |
| ४ | शिवराजनगर | -- | सांस्कृतिक सभागृह | -- | ८३.५० चौ. मी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | **वाचनालय विभाग क्र. ४** |
| १ | जवाहर कॉलनी | -- | वाचनालय | |
| २ | उस्मानपुरा | -- | वाचनालय | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | **समाजमंदिर विभाग क्र. ४** |
| १ | गांधीनगर | -- | समाजमंदिर (बालवाडी) | |
| २ | रमानगर | -- | समाजमंदिर | |
| ३ | भिमपुरा | -- | समाजमंदिर | |
| ४ | क्रांतीनगर | -- | समाजमंदिर (प्रा. शाळा) | १२५.६० चौ. मी. |
| ५ | गारखेडा | -- | व्यायाम शाळा | |
| ६ | एकनाथ नगर | -- | समाजमंदिर | |
| ७ | झांबड स्टेट | -- | व्यायाम शाळा | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | **सांस्कृतिक सभागृह विभाग क्र. ५** |
| १ | चिकलठाणा हनुमान चौक | -- | सांस्कृतिक सभागृह | -- | ५१०.२१ चौ. मी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | **वाचनालय विभाग क्र. ५** |
| १ | चिकलठाणा | -- | वाचनालय | |
| २ | मुकूंदवाडी | -- | वाचनालय | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | **समाजमंदिर विभाग क्र. ५** |
| १ | आंबेडकरनगर | -- | समाजमंदिर | |
| २ | संजयनगर | -- | समाजमंदिर (शिवनकेंद्र) | |
| ३ | मुकूंदवाडी | -- | समाजमंदिर (बालवाडी) | |
| ४ | चिकलठाणा | -- | समाजमंदिर | |
| ५ | फुलेनगर | -- | समाजमंदिर (वाचनालय) | |
| ६ | शताब्दीनगर | -- | समाजमंदिर (हॉल) | ११९.०९ चौ. मी. |
| ७ | सिध्दार्थनगर | -- | समाजमंदिर | १३४.१० चौ. मी. |
| ८ | चिकलठाणा | -- | जुनी व्यायाम शाळा तोडून नविन इमारत बांधणे | ११०.६२ चौ. मी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | **सांस्कृतिक सभागृह विभाग क्र. ६** |
| १ | बन्सीलालनगर | -- | सांस्कृतिक सभागृह | -- | ११५० चौ. मी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | (वाचनालय) | | |
| २ | बनेवाडी राहुलनगर | -- | मंगल कार्यालय | -- | १४१.८ चौ. मी. |
| ३ | साधना लॉज रे. | -- | मंगल कार्यालय | -- | ५०६.८६ चौ. मी. |

**सांस्कृतिक सभागृह विभाग क्र. ६**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | हमालवाडा | -- | समाजमंदिर (कामगार कल्याण केंद्र) |
| २ | कांचनवाडी | -- | समाजमंदिर |
| ३ | मिलिंदनगर | -- | समाजमंदिर |
| ४ | नागसेननगर | -- | समाजमंदिर |
| ५ | गाडगेनगर | -- | समाजमंदिर (एम. आय. डी. सी.) रोड कॉर्नर |

**सांस्कृतिक सभागृह विभाग क्र. ७**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एन - ६ सिडको | -- | सांस्कृतिक सभागृह |

**सांस्कृतिक सभागृह विभाग क्र. ८**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जफरनगर जसवंतपुरा | -- | बहुद्देशीय सभागृह | -- | ४२.१२ चौ. मी. |
| २ | किराडपुरा दोन मजली इमारत | -- | सभागृह | -- | ३४५.८७ चौ. मी. |
| ३ | रोषनगेट | -- | रोषण फक्शन हॉल | -- | ३०५.३५ चौ. मी. |
| ४ | कटकटगेट | -- | सभागृह | -- | ५६४.३२ चौ. मी. |
| ५ | जसवंतपुरा (किराडपुरा) | -- | बहुउद्देशिय हॉल | -- | २९७.३७ चौ. मी. |

**वाचनालय विभाग क्र. ७**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शहागंज | -- | वाचनालय |
| २ | शहागंज | -- | वाचनालय |
| ३ | हर्सुल | -- | वाचनालय |

**सांस्कृतिक सभागृह विभाग क्र. ३**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | इंदिरानगर बायजीपुरा | -- | सांस्कृतिक सभागृह | -- | १०९.८७ चौ. मी. |

**सांस्कृतिक सभागृह विभाग क्र. ८**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शहाबाजार | -- | समाजमंदिर |
| २ | नागसेन कॉलनी | -- | (प्रकल्प विभाग) |
| ३ | किराडपुरा | -- | रोषणगेट हॉल |
| ४ | कटकटगेट | -- | प्राथमिक शाळा |
| ५ | रोझेबाग | -- | समाजमंदिर (प्रकल्प |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | विभाग) | | |
| ६ | हर्सुल | -- | समाजमंदिर | | |
| ७ | हर्सुल | -- | बस स्टॅण्ड पश्चिमकडे | | |
| ८ | रविंद्रनगर | -- | समाजमंदिर | | |
| ९ | शताब्दीनगर | -- | समाजमंदिर (नविन बांधण्यात आले) | | |
| १० | नागसेन नगरे | -- | समाजमंदिर | | |
| ११ | फुलेनगर (हर्सुल स्लम) | -- | फुलेनगर समाजमंदिर | -- | ५६.८१ चौ. मी. |
| १२ | एकनाथनगर | -- | एकनाथ नगर समाजमंदिर मंदिर बांधकाम | -- | ९८ चौ. मी. |
| १३ | बापुनगर | -- | बापुनगर येथे समाजमंदिर | -- | ९. ७५.५६ चौ.मी.<br>२. ७३.७८ चौ.मी. |
| १४ | हर्सुल | -- | हर्सुल समाजमंदिर | -- | १. १०३.५० चौ. मी.<br>२. १३४.५४ चौ. मी. |
| १५ | रोझेबग | -- | रोझेबाग समाजमंदिर | -- | ५०.९६ चौ. मी. |
| १६ | नागसेन कॉलनी | -- | नागसेन कॉ. समाजमंदिर | -- | ३१०.४८ चौ. मी. |
| १७ | शहाबाजार | -- | समाजमंदिर | -- | ११९.७० चौ. मी. |
| १८ | रविंद्रनगर | -- | समाजमंदिर | -- | ४७.१७ चौ. मी. |

**संवाद :**

श्री जैस्वाल चंद्रशेखर : प्रश्न विचारलेला होता त्याचे अर्धवट उत्त्तर मिळालेले आहे, प्रश्न असा होता की, महानगरपालिका हद्दीत खासदार व आमदार निधी मधुन किती सभागृह किती व्यायाम शाळा व किती मंगल कार्यालये आहे. त्याचे उत्त्र बरोबर मिळालेले नाही. बऱ्याच ठिकाणी व्यायाम शाळा, सभागृह अपुर्ण आहे. तेथील आजची परिस्थिती पाहिली तर त्या ठिकाणी जनावरे बसतात. खर्च झालेल्यावर विचार केला पाहिजे. दुसरा प्रश्न असा की, व्यायाम शाळा, वाचनालय खाजगी संस्थाना दिलेल्या आहेत काय? असल्यास एकत्रित वार्षिक भाडे किती मिळते. या दोन्ही प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही. दोन वेळा प्रश्न विचारुन उत्तर मागविले ते अर्धवट दिलेले आहे. तिसऱ्यांदा असे होऊ नये. अन्यथा प्रश्नासन त्यास जबाबदार राहिल, कृपया याची दखल घ्यावी.

मा. महापौर : मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी : व्यायाम शाळा, समाज मंदिर तसेच मंगल कार्यालय व सांस्कृतिक सभागृह किती आहे. याची माहिती स. सदस्यांना दिलेली असून, कोणती इमारत कितीने भाडयाने दिलेली आहे. याची माहिती देण्यासाठी १५ दिवसाचा अवधी मागविलेला आहे. त्यानुसार माहिती देण्यात येईल.

श्री अफसर खान : मी सुध्दा हाच प्रश्न मागच्या वेळी विचारलेला होता त्याचे उत्तर बरोबर मिळालेले नाही. महानगरपालिकेच्या मालकीच्या बऱ्याच इमारती रिकाम्या पडलेल्या असून, महानगरपालिकेस काही उत्पन्न मिळत नाही. खर्च करुन महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. किती इमारती भाडयाने दिलेल्या आहेत, किती रिकाम्या आहेत किती इमारती लिज पध्द्तीने दिलेल्या आहेत. याची माहिती मिळणे आवश्यक आहे. १५ दिवसाचा अवधी कशासाठी पाहिजे आहे. आताच खुलासा देण्यात यावा. जे नुकसान झाले आहे व होत आहे. त्यास जबाबदार कोण आहे.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांना ७ दिवसाची मुदत देण्यात येते. त्यांनी स. सदस्य यांचे प्रश्नाचे उत्तर ७ दिवसाच्या आत द्यावे.

श्री अफसरखान : ७ दिवसाच्या अवधी जास्त होतो. १ दिवसात अधिकारी उत्तर तयार करु शकतात.

श्री स. अली सलामी : लेबर कॉलनी येथे महानगरपालिकेने एक हॉल बांधलेला आहे. सध्या तेथे फटाके वाजवतात. जनावरे जाऊन बसतात. तेथे पत्याचा डाव चालतो. हा हॉल पासून महानगरपालिकेस काहीही उत्पन्न मिळत नाही. यास कोण जबाबदार आहे. त्याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : स. सदस्य यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार सदर इमारतीची देखरेख करण्यासाठी काही अडचण होत आहे काय?

मालमत्ता अधिकारी : सदर इमारतीची देखरेख करण्यासाठी संबंधित झोनमध्ये ही यादी पाठविण्यात आलेली आहे. सदर इमारतीचे भाडे काय येते. याची माहिती घेण्यास वेळ लागेल.

श्री कुमावत अविनाश : स्थानिक संस्थेस चालविण्यात द्यावे.

श्री देसरडा प्रशांत : खाजगी संस्थांनी किंवा इतर व्यावसायिक दारांनी महानगरपालिकेच्या इमारतीची भाडेपट्टयाने किंवा लिजवर मागणी केलेली आहे का? असल्याच किती लेकांनी मागणी केलेली आहे. मागणी असतांना जागा देण्यात येत नाही.

श्री जैस्वाल चंद्रशेखर : भाडेपट्टयाने जागा हॉल दिल्या जात नाही. भाडे वसुल होत नाही. रिकामी पडून असतात. यात महानगरपालिकेचे लाखो रुपायाचे नुकसान होत आहे . यास कोण जबाबदार आहे.

श्री अफसर खान : ज्या संस्थांना जागा लिजवर किंवा भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत. ज्या संस्थांची चौकशी व्हावी.

श्री जगताप मोतीलाल : माझ्या वार्डात महानगपालिकेच्या मालकीचा एक हॉल ५ वर्षापुर्वी बांधलेला आहे. सध्या त्या ठिकाणी पत्त्याचा डाव चालतो. यास जबाबदार कोण आहे. इमारतीचा दुरुपयोग होतो. यात महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. सदर हॉलची दुरुस्ती करुन भाडयाने देण्यात यावा.

सौ. खरात कुसूमताई : माझ्या वार्डात वाचनालय आहे, त्याचा लोकांकडून गैरवापर होत आहे.

श्री प्रकाश निकाळजे : स. सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले ते महानगरपालिकेच्या हिताचे आहे. यावर आवश्यक ती चर्चा होऊन निर्णय घेणे योग्य होईल. महानगरपालिकेच्या हिताचा प्रश्न उपस्थित केल्याबद्दल त्या स. सदस्यांचे अभिनंदन करतो. ज्या मोकळया जागा आहे. त्या गृहनिर्माण संस्था यांना देण्यात येते. पुन्हा घेतल्या जातात. तसेच बोल्ट पध्द्तीने टक्केवारीनुसार काही जागा विकास करण्यासाठी दिलेल्या आहेत. याबाबतचे रेकॉर्ड आजही महानगरपालिकेचे नांवे नाही. यापुर्वी सुध्दा अशा जागा बाबत सभागृहात चर्चा झालेली असून अनेक जागा लोकांनी गिळकृत केलेल्या आहेत. या जागा महानगरपालिकेच्या नांवावर करुन घ्याव्यात असा निर्णय दिलेला होता. ठराव सुध्दा पास केलेला आहे. अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाही प्रशासनाने केलेली नाही. मालमत्तेच्या प्रकरणात काही लोकांनी न्यायालयीन प्रकरण केले. वाद चालूच राहिल्यामुळे काही जागेच्या बाबतीत महानगरपालिकेची जागा म्हणून महानगरपालिकेने लिहून सुध्दा दिले त्यामुळे, न्यायालयाने एकतर्फी निकाल लावून संबंधितांच्या नावावर जागा झालेल्या आहेत. तसेच काही ठिकाणी बोल्ट पध्द्तीचा उद्देशाने जागा दिलेल्या आहेत. त्या ठिकाणी विकास न होता संबंधित बिल्डरांनी त्या जागा २० X ३० चे प्लॉट पाहून विक्री केलेली आहे. त्याचे सुध्दा रेकॉर्ड महानगपालिकेकडे नाही. अशी आजची परिस्थिती आहे. महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा महानगरपालिकेकडे घेण्यासाठी प्रशासनातर्फे ठोस पावले उचलली जावी. आज चर्चा झाली पुन्हा चर्चा होईल, कार्यवाही काहीच नाही. याचा फायदा जनता होत आहे. कायद्यानुसार संबंधितांवर कार्यवाही करावी. सर्व जागा महानगपालिकेच्या रेकॉर्डवर आणाव्या व तसा अहवाल सादर करावा.

श्री सुदाम सोनवणे : महानगरपालिका हद्दीत आमदार, खासदार निधीतून किती सभागृह, व्यायाम शाळा, तसेच मंगल कार्यालय बांधण्यात आलेली आहे. असा प्रश्न स. सदस्य यांचा होता. शहरामध्ये २० ते २५ इमारती खासदार, आमदार निधीतून बांधण्यात आलेल्या असतील. संबंधित विभागाकडे सर्व रेकॉर्ड असतांना २० ते २५ इमारतीची माहिती संबंधित विभागाचे अधिकारी देऊ शकेल नाही. ही दुर्देवाची बाब आहे. या प्रश्नानुसार एकूण किती मंगल कार्यालय, सभागृह, समाज मंदिर झालेली आहेत. असा प्रश्न निर्माण झाला. मा. आयुक्त चांगले काम करतात. वृत्तपत्रात तशा बातम्या येत आहे. आयुक्तांना अधिकाऱ्यांवर वचक आहे. असे दाखविण्यात येत आहे. परंतु आयुक्तांचा अधिकाऱ्यांना धाक असता तर, या प्रश्नाचे उत्तर बरोबर मिळाले असते. महानगरपालिका फंडातून किती इमारती झालेलया आहेत. याची माहिती ५ वर्षात सुध्दा मिळेल किंवा नाही, याची शंका आहे. या सर्व प्रकरणात मालमत्ता विभागच नव्हे तर, नगररचना तसेच बांधकाम विभाग सुध्दा जबाबदार आहे. बांधकाम पूर्ण झाले तरच इमारत मालमत्ता विभागाकडे हस्तांतर होऊ शकेल. मा. आयुक्तांनी याची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही करावी. वृत्तपत्रात बातम्या छापून येतात. महानगरपालिका तोटयात आले. विकास कामे थांबलेली आहे. यास कोण जबाबदार आहे. नगरसेवक जबाबदार नाही. आयुक्त तसेच संबंधित अधिकारी जबाबदार आहे. वसुलीवर भर द्यावा.

मा. आयुक्त : स. नगरसेवक यांनी आयुक्त व प्रशासनावर कठोर टिका केली. सर्वच प्रश्नाच्या बाबतीत आयुक्त जबाबदार आहे. पेपरबाजी करतात, माझी विनंती आहे. व्यक्तिगत आरोप करु नये. मालमत्तेच्या संदर्भात जी चर्चा होत आहे. त्यास आयुक्त जबाबदार आहे हे मला मान्य नाही. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. वैयक्तिक टिका सभागृहात करता येणार नाही. असे माझे मत आहे.

श्री सुदाम सोनवणे, श्री अविनाश कुमावत, श्री जबिंदा दलबिरसिंग : मा. आयुक्तांवर वैयक्तिक टिका केलेली नाही. आयुक्त काम चांगल्याप्रकारे करतात. या अगोदरच आम्ही प्रशंसा केलेली आहे. यात दुमत नाही. परंतु प्रश्न दिल्यानंतर त्या प्रश्नाचे उत्तर बरोबर व वेळेवर मिळत नसेल, दिशाभुल केली जात असेल तर, हे कितपत योग्य आहे. याचा खुलासा मा. आयुक्तांनी करावा.

मा. आयुक्त : दरवर्षी सभागृहाने आढावा घेतला तर, आज ही परिस्थिती उद्‌भवली नसती. आजची परिस्थिती अशी आहे की, महानगरपालिकांच्या खुल्या जागा भाडेपट्ट्याने दिलेल्या जागा, भाडे वसुली कडे दुर्लक्ष होत होते. या सर्व बाबींना सुधारण्याचा मी प्रयत्न करीत आहे. यापेक्षा जास्त चांगले काम करता येणार नाही.

आमदार, खासदार निधीतून समाजमंदिर बांधणे इ. प्रश्नांचे उत्तर दिले भाडे किती, प्रत्येक इमारतीप्रमाणे संकलन करण्यात वेळ लागणार आहे. वेळ मागण्यात आला असून, त्यानंतर उत्तर देण्यात येईल. लिजकरिता जमिनीच्या संदर्भात सर्वेक्षण झाले आहे. पूर्वी सर्वेक्षण झालेले नव्हते. मी आल्यानंतरच सर्वेक्षण करण्यात आले. खुल्या जागांचे अभिलेख मी आल्यानंतरच अद्यावत करण्यात आले. यासाठी ३ अधिकारी नेमण्यात आले होते. ही सर्व काम करतांना पत्रकार परिषद घेतली नाही. मी येथे आल्यापासून एकही पत्रकार परिषद घेतलेली नाही.

श्री अफसर खान : आताच स. सदस्य श्री. सोनवणे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार आयुक्तांवर वैयक्तिक टिका होते असल्याचे मत मा. आयुक्तांनी म्हटले. परंतु कोणत्याही विकास व आर्थिक बाबीच्या संदर्भात प्रश्न विचारल्यानंतर तो प्रश्न मा. आयुक्तांपर्यंत जातो. यात शंका नाही. जे की, प्रशासन त्यास जबाबदार राहील. लाखोंचे, कोटी रुपयांचे भूखंड संबंधात अनियमितता बाबत आपण कार्यवाही करत आहात. आपले याबद्दल अभिनंदन. आपण आयुक्त म्हणून या ठिकाणी काम करतात. वैयक्तिक टिका आपल्यावर केलेली नाही. महानगरपालिकेच्या हिताचे प्रश्न किंवा नुकसान झालेल्या बाबतचे प्रश्ना संदर्भात आपणाकडेच विचारणा होईल. आपण त्यास जबाबदार राहाल असे म्हणावे लागेल. या अगोदरही लिजवर दिलेल्या जागेच्या संदर्भात झालेल्या भ्रष्टाचार याबाबतीत तत्कालीन, आयुक्त श्री बलदेवसिंह यांनी सुध्दा कार्यवाही करुन सर्व रेकार्ड काढून अधिकाऱ्यांवर कार्यवाही केलेली आहे. त्यामुळेच त्यांची येऊन बदली झाली. महानगरपालिकेच्या लाखो रुपयांच्या जागांचे संरक्षण झाले. त्याच प्रमाणे आपण सुध्दा कार्यवाही करावी अशी अपेक्षा आहे. शहराची सर्व जबाबदारी आपल्यावर आहे. कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत तक्रार द्याव्याची झाल्यास जनता आपल्याकडेच येणार आहे. त्यानुसार अधिकारी काही चुकीची कामे

करीत असतील तर त्यांचेवर सुध्दा कार्यवाही करण्याचे काम आपले आहे. आपण चांगले काम करीत आहे. याबद्दल कोणाचे दुमत नाही. भूखंडाबाबतच्या सर्व प्रकरणे निकाली काढावी, चौकशी व्हावी. तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या ७५-२५, ७०-३०% याप्रमाणे जागा विकसित करण्यासाठी दिलेल्या आहे. संबंधितांनी महानगरपालिकेस ठरल्यानुसार अद्याप विकास झालेल्या जागा, दुकाने, इमारती हस्तांतर केलेल्या नाही. याची सुध्दा योग्य चौकशी होऊन दोषी अधिकारी, बिल्डर यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री सुदाम सोनवणे : या शहरासाठी मा. आयुक्त चांगले काम करीत आहे. त्याबद्दल आम्ही सर्वांनी अभिनंदन केलेले आहे. मा. आयुक्तांवर वैयक्तिक टिका केलेली नाही. परंतु जे अधिकारी व्यवस्थित कामे करीत नसतील तर, यास जबाबदार कोण? कोणत्याही विकास कामा संदर्भात किंवा इतर प्रश्नाच्या बाबतीत स. सदस्य मा. महापौर किंवा मा. आयुक्त यांचेकडे गाऱ्हाणे मांडणार प्रत्येक वेळेस विभाग प्रमुखांकडे तक्रार करणे योग्य होणार नाही व आयुक्तांचा सुध्दा त्यांचेवर दबाव राहणार नाही. या दृष्टीकोनातून मी प्रश्न उपस्थित केला व आयुक्तच यास जबाबदार आहेत. असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान होत असेल तर यास कोण जबाबदार आहे. प्रशासन यास जबाबदार आहे. पदाधिकारी, नगरसेवक यास जबाबदार होऊ शकत नाही. शहरामध्ये ५ ते ६ वर्षापासून व्यायाम शाळा तसेच मोठमोठे सभागृह बांधून झालेले असून काही इमारतींचे काम बांधकाम अर्धवट झालेले आहे. यात महानगरपालिकेचे लाखो रुपये खर्च झाले. या इमारतींची आजची परिस्थिती पाहिली तर या इमारतींना दरवाजे, खिडक्या राहिलेल्या नाही. लोकांनी काढून घेतलेल्या आहेत. जे नुकसान झाले यास कोण जबाबदार आहे. बोलण्याचा उद्देश असा होता की, ज्या व्यायाम शाळा, सभागृह बांधून पडलेले आहे. ते भाडेपट्टयाने सुध्दा दिले जात नाही. भाडे कमीटी भाडे निश्चित करीत आहे. यात फार मोठे नुकसान होत आहे. महानगरपालिकेचा पैसा गुंतलेला आहे. आताच काही सदस्यांनी मत मांडून काही ठिकाणी पत्याचा डाव चालतो. तर काही ठिकाणी जनावरे जाऊन बसतात. या सर्व बाबींना जबाबदार कोण? मा. आयुक्तांनी कृपया व्यक्तिगत घेवू नये.

श्री काशीनाथ कोकाटे : मा. आयुक्तांनी या महानगरपालिकेत आयुक्त पदाचा पदभार स्विकारला तेव्हापासून त्यांनी वेगवेगळया पध्दतीने चांगल्या प्रकारची शिस्त लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. विकास कामाच्या संदर्भात मा. आयुक्तांना या महानगरपालिकेचे पदाधिकारी तसेच स. सदस्य यांनी १००% काय जी मदत करायची ती केलेली आहे. आयुक्तांनी जे बंधन पाळाव्याबाबत नियम घालून त्याचे सुध्दा सर्व सदस्यांनी पालन केलेले आहे. शहरातील जनतेसमोर या लोकप्रतिनिधीची प्रतिमा उगाळण्याचा जो प्रयत्न होतो. तो होऊ नये म्हणून, लोकप्रतिनिधी त्यांचे पध्दतीने प्रयत्न करीत आहे. अधिकारी किंवा कर्मचारी यांचे बाबतीत सुध्दा हेतु पुरस्कार काहीही तक्रारी अद्याप कोणत्याही लोकप्रतिनिधीने दिलेल्या नाही. उलट प्रशासनाला सहकार्यच केलेले आहे. तसेच कोणत्याही कर्मचाऱ्यांची मानहानी होणान

नाही याची सुध्दा काळजी या सभागृहाने घेतलेली आहे. स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या माध्मातून जी माहिती विचारली ती विचारत असतांना वैयक्तिक मा. आयुक्तांवर टिका झाली. असे आयुक्तांनी समजून घेण्याचे काहीही कारण नाही. सदस्यांनी त्यांचेवर वैयक्तिक टिक केलेली नाही. खासदार, आमदार निधीतून जी जी कामे झाली ती २ कोटीच्या आसपास असतील. ही कामे झाल्यानंतर, त्या वास्तुचा ज्याप्रमाणे उपयोग करुन घ्यावयास पाहिजे होता. त्या पध्दतीने झालेला नाही. म्हणूनच सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा योग्य प्रकारे नाही. अशी शंका सदस्यांना आलेली आहे. जेथे वाचनालय करण्यात आले तेथे आवश्यक असलेली पुस्तके, फर्निचर इ. साहित्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे ते वेळेवर दिले नाही. म्हणून त्या इमारतीचा दुरुपयोग होत आहे. या सर्व बाबींकडे मा. आयुक्तांनी लक्ष देणे गरजेचे आहे. मा. आयुक्तांवर व्यक्तिशः टिका व्हावी. असा कोणाचाही उद्देश नाही. प्रशासनातील कामे चांगली व्हावीत हा दृष्टीकोन समोर ठेवून हे सभागृह मदत करीत आहे. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर वेळेवर मिळत नसेल तर, शंका निर्माण होते व सदस्य सभागृहात पोटतिडकिने प्रश्न उपस्थित करतात. या शहराच्या जनतेसाठी पाणी पुरवठा, स्वच्छता, लाईट या सुविधा मिळणे आवश्यक आहे. वसुलीच्या बाबतीत मालमत्ता, जकात इतर माध्यमातून जी वसुली येते. त्या बाबतीत सुध्दा या सभागृहाचे सहाकर्य राहील विकास कामे होण्यास मदत होईल. या दृष्टीने हे सभागृह प्रशासनाच्या बरोबर राहील. प्रशासनाला संपूर्ण सहाकार्य या सभागृहाचे आहे. त्याचप्रमाणे जनतेची विकास कामे करण्याबाबत प्रशासनाने आम्हाला सहाकार्य करावे. अशी अपेक्षा या सभागृहाला आहे.

श्री घडामोडे भगवान : स. सदस्य श्री. जैस्वाल यांनी दिनांक ५/१२/२००१ रोजी प्रश्न विचारलेला आहे. यास १५ दिवस झालेले असून माहिती घेण्यासाठी प्रश्नासनाने १५ दिवसाचा अवधी मागितलेला असून लोकप्रतिनिधी व प्रशासन या दोघांनी मिळून, संस्था चालवायची असेल तर, प्रशासनाने सुध्दा कार्यक्षम राहिले पाहिजे. सर्व रेकॉर्ड उपलब्ध असले पाहिजे. स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यानुसार कोणत्या मालमत्ता कुठे आहे. कुणाच्या ताब्यात आहे. याची माहिती घ्यायची व नंतरच उत्तर द्यायचे. यासारखे दुर्दैव नाही. कोणत्या मालमत्ता कुठे आहे. कोणाच्या ताब्यात आहे. महानगरपालिका फंडातून किंवा आमदार, खासदार निधीतून झालेल्या असतील. याचे रेकॉर्ड महानगरपालिकेकडे नसेल तर, संबंधित विभागाचे अधिकारी / कर्मचारी काय करतात. असा प्रश्न निर्माण होतो. एखादया वार्डात महानगरपालिकेच्या निधीतून किंवा खासदार, आमदार निधीतून सभागृह झालेले असेल व ते रिकामे पडलेले असेल तर, वार्डातील जनता तेथील नगरसेवकांना जाब विचारतात. त्यामुळे असे प्रश्न या सभागृहात उपस्थित होतात. मा. आयुक्तांचे काम चांगले आहे. कुणी आपल्या भावना दुखावण्याचा प्रयत्न केलेला नाही. वैयक्तिक मा. आयुक्तांवर कुणीही टिका करणार नाही. तशी भावना कुणाचीही नाही. प्रशासन म्हटल्यावर मा. आयुक्तांवर सर्व प्रश्नाची जबाबदारी येतेच यात शंका नाही. महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्या मालमत्ता आहेत. त्याची चौकशी करावी. जे प्रश्न प्रस्ताव स्थायी समितीसमोर यावयाचे ते स्थायी समिती

समोरच यावयास पाहिजे जे जनरल बॉडीचे आहे ते या सभागृहात सादर व्हावयास पाहिजे व प्रशासकीय प्रस्ताव यावयास पाहिजे महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्या इमारती, हॉल, व्यायाम शाळा, समाजमंदिर, सांस्कृतिक सभागृह आहे ते कुठे व कोणाच्या ताब्यात आहे याची चौकशी व ते सामाजिक संस्था याची मागणी असेल तर, भाडे पट्टयाने देण्याची कार्यवाही करावी. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल.

श्रीमती घायतिलक लिलावती : वार्ड क्र. १२ मध्ये ज्या समस्या आहेत. त्या वर्षाभरामध्ये सोडविल्या गेल्या नाही. २१-०६-२००१ रोजी मा. उपआयुक्त (म.) यांनी वार्डात भेट देऊन समस्या जाणून घेतल्या परंतु कार्यवाही काहीही केलेली नाही. पदाधिकारी यांनी सूचना करुन सुध्दा कार्यवाही केलेली नाही. विशेष म्हणजे रोहीदासनगर येथे नेहमी ड्रेनेजचा प्रश्न असतो. ड्रेनेजचे पाणी लोकांच्या घरांमध्ये जाते. या भागात अत्यंत गरीब वस्ती आहे. या संदर्भात मी वेळोवेळी प्रश्न उपस्थित केलेला आहे. लेखी निवेदन सुध्दा दिले. अद्याप कार्यवाही केलेली नाही. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयासाठी संरक्षित भिंत बांधलेली असून, अद्याप त्यावर ग्रिल वगैरे बसविलेले नसून, झ ाडे लावता येत नाही. एक वर्षापासून प्रश्न मांडत आलेले आहे कार्यवाही काहीच नाही. अधिकाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिलेली आहे. रोहीदासनगर येथील ड्रेनेज लाईनच्या बाबतीत त्वरीत निर्णय घ्यावा नसता, येथील जनता महानगरपालिका प्रशासनाकडे येणार असून त्यास मी जबाबदार राहणार नाही. याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

मा. महापौर : स. सदस्या श्रीमती घायतिलक यांनी जे जे प्रश्न सभागृहात उपस्थित केलेले आहे त्या संदर्भात संबंधित अधिकारी यांनी सर्व्हे करुन ७ दिवसाच्या आत कार्यवाही करावी व तसे लेखी स्वरुपात उत्तर स. सदस्या यांना देण्यात यावे.

श्री तकीहसन खान : महानगरपालिकेच्या माध्यमातून बऱ्याच वार्डात वाचनालय, समाजमंदिर तसेच व्यायाम शाळा, सभागृह करण्यात आलेल आहे. यास जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित झालेला असून, यास नुसते प्रशासनच जबाबदार नाही तर, सर्व वार्डाचे नगरसेवक सुध्दा तेवढेच जबाबदार आहे हे विसरुन चालता येणार नाही. ज्या वार्डात महानगरपालिकेची मालमत्ता आहे. त्या मालमत्तेवर जर कुणी कब्जा करीत असेल तर, तो कब्जा होऊ न देण्यासाठी त्या वार्डातील नगरसेवकांची जबाबदारी प्रशासनाच्या निर्दशनास आणून देण्याची आहे. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करु शकेल. यास नगरसेवक सुध्दा तितकेच जबाबदार आहे. जो उद्देश साधण्यासाठी इमारत तयार केली. उदा. वाचनालयासाठी इमारत तयार केली साहित्य, पुस्तके आर्थिक परिस्थितीमुळे महानगरपालिका देऊ शकले नाही. उशीर होऊ शकतो. माझ्या वार्डात वाचनालयाची इमारत झाली, बऱ्याच दिवसापासून रिकामी होती. पुस्तके उपलब्ध नव्हते. काही दिवसांनी ७.५० लाखाची पुस्तके उपलब्ध करण्यात आली. त्यासाठी ज्या ज्या वार्डात महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्ता आहे. त्यावर नगरसेवकांनी सुध्दा लक्ष ठेवणे गरजेचे आहे. अतिक्रमण किंवा अवैध धंदे होऊ देऊ नये. सर्व मालमत्ता उपयोगात आणाव्या महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे तसे प्रयत्न प्रशासनाने सुध्दा करावेत.

मा. महापौर : जे जे प्रश्न स. सदस्य लेखी देऊन माहिती मागावित असतील, त्या प्रश्नाच्या उत्तरासंबंधी सर्वच अधिकारी यांनी एक वेगळया प्रकारचे महत्व देऊन प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेच पाहिजे, याची अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी. प्रश्नाचे उत्तर देण्यास टाळाटाळ व चुकीची माहिती उपलब्ध करुन देत असतील तर, अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. स. सदस्य श्री. जैस्वाल यांनी जो प्रश्न विचारुन माहिती मागविली होती. त्यासाठी प्रशासनाने आणखी १५ दिवसाचा वेळ मागितलेला असून त्यास मान्यता देण्यात येते. आताच चर्चा झाल्यानुसार आमदार, खासदार निधीतून तसेच महानगरपालिका फंडातून बांधण्यात आलेले सभागृह, वाचनालय, सांस्कृतिक सभागृह व इतर इमारतीमध्ये काय व्यवसाय चालू आहे. कोणत्या इमारती बंद अवस्थेत आहे. येणारे उत्पन्न किती येते. याची प्रशासनाने चौकशी करणे आवश्यक आहे व उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून काय प्रयत्न करु शकतो. याचा विचार करुन एक नियमावली तयार करावी. जेणे करुन भाडे पट्टयाने लिजवर या इमारती देता येतील. जेथे जेथे या इमारती आहे. त्या त्या भागातील जे कुणी नियमानुसार भाडे भरुन किंवा लिजवर घेण्यास तयार असतील अशांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच ज्या ज्या वार्डात अशा इमारती आहेत. तेथे गैररित्या व्यवसाय होतात. त्याबाबतीत त्या त्या वार्डातील स. सदस्यांनी प्रशासनाच्या नजरेस आणून द्यावे. प्रशासनाने सुध्दा तात्काळ या बाबतीत कार्यवाही केली पाहिजे.

श्री दानवे अंबादास : महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारती भाडयाने किंवा लिजवर देतांना घेणाऱ्याकडे लाईट बिल देखभाल दुरुस्ती सर्व खर्चाची जबाबदारी ठेवावी जेणे करुन महानगरपालिकेचा खर्च होणार नाही व भाडेही मिळेल त्यासाठी एक नियमावली तयार करावी आणि ही नियमावली तयार करण्यासाठी वेळ ठरवून देण्यात यावी.

मा. महापौर : महानगरपालिकेचा जास्तीत जास्त फायदा होण्याच्या दृष्टीने कार्यवाही प्रशासन करेल.

प्रश्न समुह क्रमांक - २ :
मा. श्री. सय्यद अली सलामी सय्यद मिरा सलामी (दि. ०६-१२-२००१)

**प्रश्न क्र. - १३ :** २००१ व २००२ अर्थसंकल्पात अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्याकरीता अशा योजना राबविण्याचे निर्णय घेण्यात आले होते. तब्बल ९ महिने लोटले तरी यावर अंमलबजावणी का झाली नाही. याला जबाबदार कोण? व झालेल्या आर्थिक नुकसानीस आपण कोणास जबाबदार धरणार.

**उत्तर क्र. - १३ : मुख्यलेखाधिकारी**

**अभय योजना :** या योजनेसाठी अनाधिकृत नळ कनेक्शन सर्व्हेक्षणसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु निविदा धारकाने काम करण्यास नकार दिल्यामुळे पुन्हा सदरील सर्व्हेक्षणाचे निविदा मागविण्यात येत आहे.

**उत्तर क्र. - १३ : कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज. नि.)**

अनाधिकृत नळ अधिकृत कराण्याकरीता उपाय योजना राबविण्याबाबत महानगरपालिकेने २००१-२००२ अर्थसंकल्पात तरतुद केलेली होती. त्या अनुषंगाने या योजनेअंतर्गत विभागावर अशंतः कारवाई करण्यात आलेली आहे.

अभय योजने अंतर्गत व्यापक प्रमाणात ही योजना राबविण्याकरीता व परिपूर्ण होण्यासाठी इतर महानगरपालिकेकडून माहिती गोहा करुन सदरील योजना राबविण्याबाबत ठोस निर्णय येवून अनाधिकृत नळ अधिकृत करणेबाबत निश्चित कालावधी व नळांच्या व्यास निहाय एक वेळ भरावयाचा दंडासह पाणीपट्टी वसुली करणे तसेच अनाधिकृत मालमत्ता यांच्या बाबत धोरण ठरविण्याकरीता सविस्तर व्यास निहाय दरासहीतचा प्रस्ताव येणाऱ्या (जाने - २००२) च्या सर्वसाधारण सभेसमोर निर्णयाला सादर करण्यात येणार आहे.

**संवाद :**

श्री स. अली सलामी : शहरात पाण्याची गंभीर समस्या आहे. अर्थसंकल्पात सुध्दा जास्तीत जास्त खर्च पाण्यावर होतो, असे नमुद केले जाते. ज्या पध्दतीने पाणी प्रश्न सोडण्यास प्रयत्न व्हावयास पाहिजे तसे होत नाही. या संदर्भात सर्वसाधारण सभेत सुध्दा बऱ्याच वेळा ३-४ तास नेहमी चर्चा झाली. अनाधिकृत नळकनेक्शन संदर्भात सुध्दा चर्चा केलेली आहे व तसे प्रस्ताव पाण्याच्या बाबतीत या सभागृहाने मंजूर सुध्दा केलेले आहे. ज्या ज्या वेळी पाण्याचा प्रश्न निर्माण होतो, त्यावेळी पाणीपट्टीत वाढ करावी असे प्रस्ताव प्रशासन अर्थसंकल्पात मांडते, त्यावर सुध्दा चर्चा होऊन निर्णय घेतले जातात. ४ वर्षापूर्वी ५००/- रुपये पाणीपट्टीत लावण्यात येत असे त्यावर २२००/- रुपये खर्च होतो. असे प्रशासनाने आपले मत व्यक्त केलेले आहे. याचा अर्थ १७००/- रुपये सुट देण्यात येत आहे. ज्यावेळी १,०००/- रुपये पाणीपट्टी करण्यात आली. त्यावेळी ३३,००/- रुपये खर्च. याचा अर्थ २२,५०/- रुपये जनतेला सबसिडी देण्यात येते असा होतो. २००१-२००२ च्या अर्थसंकल्पात अनाधिकृत नळकनेक्शनच्या बाबतीत अभय योजना राबविण्याबाबत तरतुद करण्यात आलेली होती. त्या संदर्भात यापूर्वी सभागृहात चर्चा करण्यात आलेली आहे. तेव्हा समाधानकारक उत्तर दिले नाही. म्हणून पुन्हा प्रश्न देऊन माहिती विचारली असता समाधान कारक उत्तर दिलेले नसून जे की, त्या उत्तरानुसार या सभागृहात चर्चा होऊन निर्णय होऊ शकेल. त्या दृष्टीने उत्तर मिळालेले नाही. आता पुन्हा पुढील वर्षाच्या अर्थसंकल्प सादर होईल. पाण्याचा खर्च जादा होत आहे म्हणून, १८००/- पाणीपट्टी करावी. असा प्रस्ताव प्रशासनातर्फे मांडला जाईल सर्वसाधारण सभेत पाणीपट्टी १५००/- रुपये करण्यात येईल. याचा अर्थ ३००/- रुपये पुन्हा वाढ होईल. नागरिकांनी वार्डातील सदस्यांना निवडून दिले त्यांची सेवा चांगल्या प्रकारे व्हावी. या दृष्टीने या सभागृहात प्रश्न मांडले जातात. पाणीपट्टी असो किंवा मालमत्ता कर असो तो कमीत कमी आकारण्यात यावा. जेणे करुन जनता खुशीने (स्वतः हून) कर भरेल. पाणीपट्टी वसुली बघितली तर, २५% च वसुली होते आहे. याचा अर्थ ७५% जनता पाणीपट्टी देत नाही. प्रत्येक वर्षी पाणीपट्टी वाढवण्यात येते. दुसऱ्या उपाययोजना बाबत सभागृहात चर्चा होते. निर्णय घेतले जातात. परंतु अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे पाण्यावर येणारा खर्च हा जास्त वाढते व पुन्हा अर्थसंकल्पात पाणीपट्टी वाढवावी. म्हणून तसा प्रस्ताव सादर केला जाईल. अभय योजनेची अंमलबजावणी का झाली नाही. एका बाजूने महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, असे दाखविले जाते. प्रश्नाचे उत्तर बरोबर नाही, म्हणूनच चर्चा करीत आहे. प्रश्नाचे उत्तर लक्षात घेता, प्रश्नाचे व उत्तराचे

कुठल्याही प्रकारचे साम्य नाही. अभययोजनेची अंमलबजावणी झाली नाही. अर्थसंकल्पात मंजूर करुन घेतले. महानगरपालिकेचे लाखो रुपयाचे नुकसान झाले असुन, जनतेच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होत नाही. यास कोणास जबाबदार ठरवावे. मी जो प्रश्न विचारला त्याचा योग्य खुलासा आता देण्यात यावा. अंमलबजावणी का करण्यात आली नाही. जे नुकसान झाले त्यास जबाबदार करणे व केव्हापासून अंमलबजावणी करणार याचा सविस्तर खुलासा द्यावा. एम. एस. ई. बी. ला लाईट बिलापोटी १२५/- कोटी रुपये द्यायचे असून, नेहमी त्यावर चर्चा होते. ज्या उपाययोजना राबवायच्या त्या राबविल्या जात नाही. अशा परिस्थितीत महानगरपालिका तोटयात येईल व कोणती ही विकास कामे होणार नाही. नुसते प्रस्ताव मंजूर करायचे अंमलबजावणी नाही हे काही बरोबर नाही. पाणी प्रश्नाच्या संदर्भात दुर्लक्ष होता कामा नये. अभय योजना का राबविली नाही. जे नुकसान झाले त्यास जे अधिकारी / कर्मचारी दोषी असतील त्यांचेवर कडक कार्यवाही व्हावी अशी माझी मागणी आहे.

श्री प्रशांत देसरडा : अभय योजनेच्या संदर्भात टेंडर काढण्यात आले होते. कुठपर्यंत कार्यवाही झाली याची माहिती वेळोवेळी मी प्रश्न करुन विचारली. खुलासा झालेला नाही. लोकसत्ता वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली नागपूर महानगरपालिकेने अभय योजना राबविण्याचे ठरले. चालु आर्थिक वर्षात १० कोटीचा फायदा त्या महानगरपालिकेस होणार आहे. जे टेंडर आपण काढले त्याबाबत काय झाले, या नुकसानीस जबाबदार कोण? नागपूर महानगरपालिकेच्या धरतीवर अभय योजना राबविली तर ५०% अनाधिकृत नळ कनेक्शन सापडतील. अशी माझी खात्री आहे.

श्री स. सलीम स. युसूफ : एकाच विषयावर एक सदस्यास ०५ मिनिटाच्या वर चर्चा करु देऊ नये, कारण काही सदस्य खूप वेळापर्यंत बोलतात. प्रश्न काय आहे हे अधिकाऱ्यांच्या लक्षात येत नाही. त्यासाठी एका सदस्यास ०५ मिनिटाचा अवधी चर्चेसाठी द्यावा. जी चर्चा होते ती स्पष्ट ऐकावयास येत नाही. माईकची दुरुस्ती करण्यात यावी.

सौ. निखत अली : माझ्या वार्डात ड्रेनेजचा प्रश्न आहे. माजी महापौर श्री. डॉ. कराड यांनी वार्डात भेट दिली. वार्डातील समस्याबाबत दोन दिवसात कार्यवाहीचे आदेश दिले कार्यवाही होत नाही. एक निवेदन मा. आयुक्त यांचेकडे सुध्दा मी दिलेले असून काहीही कार्यवाही झालेली नाही. ड्रेनेजचा वारंवार प्रश्न उपस्थित होतो. तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

श्री प्रकाश निकाळजे : अनाधिकृत नळकनेक्शन सर्व्हे करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद केलेली असून १९९५ च्या बॉडी समोर सुध्दा हा प्रस्ताव आलेला होता. वार्डातील जनतेबरोबर लोकप्रतिनिधी यांचे हित संबंध असतात. त्यामुळे वार्डात कर्मचारी अनाधिकृत नळ कनेक्शन तोडण्यास गेल्यास त्यास विरोध होतो. अडचण निर्माण होते. नियमाने कार्यवाही होत असेल तर, त्यास विरोध करणे बरोबर होणार नाही. परवाच माझ्या वार्डातील हॉटेलचे नळकनेक्शन कट केले. हॉटेल मालक माझ्याकडे आला. त्यावेळी बील भरणा केले का? अशी विचारणा केली. त्यावेळी हॉटेल मालकाने बील भरले नाही असा खुलासा केला. अनाधिकृत नळ कनेक्शन होऊ देऊ नये ही

जबाबदारी त्या त्या वार्डातील सदस्यांची सुध्दा आहे. याचा विचार लोकाप्रतिनिधी यांनी करावा. यास नगरसेवक यांचे सहाकार्य गरजेचे आहे.

श्री अफसर खान : अभय योजनेनुसार ज्या नागरिकांनी अनाधिकृत कनेक्शन घेतले आहेत. ते कनेक्श्न नियमित करण्यात यावेत. शहरात व्यावसायिक कनेक्शन मोठया प्रमाणात आहेत. पण प्रत्यक्षात महानगरपालिका रेकॉर्डप्रमाणे व्यावसायिक कनेक्शनची संख्या मात्र अत्यंत कमी आहे. याबाबत स्पेशल मिटिंग घेण्यात यावी.

श्री स. अली सलामी : अभय योजना ही अनाधिकृत नळकनेक्शन अधिकृत करण्याची आहे. नळ कापण्याची योजना नाही. स. सदस्य हे मी उपस्थित केलेल्या प्रश्नाची दिशाभूल करणारा दुसरा प्रश्न विचारीत आहे. आर्थिक नुकसान होते. यास जबाबदार कोण?

श्री प्रकाश निकाळजे : स. सदस्यांचा प्रश्न मला समजलेला असून अंमलबजावणी का झाली नाही. प्रश्नाला वेगळी दिशा देण्याचा मी प्रयत्न केलेला नाही. अनाधिकृत नळ कनेक्शनचा शोध घ्यावा. माझ्याकडे काही लोक आले व नळकनेक्शन कट करीत आहे म्हणून तक्रार केली. नळाचे पैसे भरावे नळ अधिकृत करावे. अशी सूचना मी त्या नळधारकांना केली अशा पध्दतीने प्रत्येक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करावा. जनतेचीच बाजू घेऊन अनाधिकृतपणे होणाऱ्या कामास मदत करु नये.

श्री अफसर खान : प्रश्नावर अर्ध्या तासाच्या वर चर्चा करणे योग्य होणार नाही. अभय योजनेची अंमलबजावणी करावी महानगरपालिकेची उत्पन्न वाढेल. शहरात बरेच हॉस्पीटल, हॉटेल, इतर व्यवसाय चालतात. त्या सर्वांनी नळकनेक्शन घेतलेले आहे का? याची चौकशी करावी व संबंधितांवर दोषी असेल तर, नियमाने कार्यवाही व्हावी. महानगरपालिकेच्या मालकीचे हॉल, व्यायाम शाळा, समाज मंदिर, मंगल कार्यालये आहे. कुणाला भाडयाने दिली किती भाडे येते याची माहिती संबंधित विभाग, स. सदस्यांना देऊ शकले नाही. याची प्रशासनामार्फत चौकशी व्हावी. सर्व मालमत्ता महानगरपालिकेने ताब्यात घेऊन कार्यवाही करावी.

प्र. कार्यकारी अभियंता (पा. पु.) : अनाधिकृत नळाचा सर्व्हे (अभय योजने) संदर्भात स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संक्षिप्त खुलासा दिलेला आहे. ३ ते ४ वर्षामध्ये १७,०००/- अनाधिकृत नळकनेक्शन अधिकृत करण्यात आले. नळांची संख्या ७० ते ७२ हजार होते. आता ही ८६ हजार इतकी आहे. २००१-२००२ च्या अर्थसंकल्पात अभय योजना राबविल्या बाबत प्रस्ताव होता. त्यानुसार टेंडर काढले होते. संबंधित ठेकेदाराने काम करण्यास नकार दिल्याने नळ सर्व्हेक्षणाचे काम झालेले नाही व संबंधित ठेकेदाराने काम करण्यास नकार दिल्याने काळया यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. ही कार्यवाही चालू असतांना स्थानिक लोकांचा सहभाग व्हावा. यासाठी सविस्तर माहिती संकलन करुन पुढील बैठकीत पुन्हा हा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे काटेकोरपणे व जलदगतीने अंमलबजावणी होईल.

श्री स. अली सलामी : इतर महानगरपालिकेमध्ये अभय योजना कशी राबविली जाते. याची माहिती घेतली जात असून, १० महिन्याचा कालावधी गेला. आज त्याचे उत्तर देण्यात येते. अर्थसंकल्प सादर करतांनाच माहिती का घेतली जात

नाही. आज माहिती देण्यात येते. कसलीही माहिती घ्यायची नाही, टाळाटाळ होते, दोषी अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही झाली पाहिजे. अभय योजना राबविली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

श्री कदीर मौलाना : अर्थसंकल्प मंजूर होऊन १० महिने झाले अद्याप अभय योजनेची कार्यवाही झालेली नाही. फार मोठी शरमेची बाब आहे. विकास कामाच्या संदर्भात विचार केल्यास कोणतेही विकास काम होत नसून, आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या बाबतीत किंवा इतर काही महत्वाच्या विषयावर चर्चा होत असतांना पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात येईल असे अधिकाऱ्यांकडून उत्तर दिले जाते. परंतु जे अधिकारी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने काम करीत नसतील तर, त्यांचेवर आवश्यक ती नियमाने तात्काळ कडक कार्यवाही होणे आवश्यक आहे. जोपर्यंत अधिकाऱ्यांवर कार्यवाही होणार नाही तो पर्यंत विकास कामांना तसेच महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यास गती येणार नाही. यासाठी मा. आयुक्तांनी ठोस पावले उचलावी या सभागृहात नुसती चर्चा होते. कामे काहीच नाही. जनतेची कामे होत असेल तरच या सभागृहात चर्चा करुन सभा कामकाज चालवण्याचा हक्क पोहचतो असे माझे मत आहे.

मा. महापौर : नळकनेक्शन सर्व्हेक्षण बाबतीत अभय योजना आतापर्यंत का राबविण्यात आली नाही. याबाबत मा. आयुक्त यांनी चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी व येणाऱ्या सर्वसाधारण सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

श्री जबिंदा दलबिरसिंग : टेंडर काढले संबंधित ठेकेदाराने नकार दिला, यास कोण जबाबदार? चौकशी कशी करणार याचा खुलासा व्हावा.

श्री स. अली सलामी : एकदा टेंडर काढले त्यास ठेकेदारने नकार दिल्यानंतर पुन्हा टेंडर का काढले नाही. टेंडर काढण्यास उशीर का झाला? याचा खुलासा देण्यात यावा.

मा. महापौर : अनाधिकृत नळ कनेक्शन शोध मोहीम राबविण्यात यावा. यासाठी नागरिकांनी स्वतःहून अनाधिकृत नळ अधिकृत करण्या संदर्भात सहकार्य केले पाहिजे. त्यानुसार कार्यवाही होईल. यानंतरही नागरिकांनी स्वतःहून नळ कनेक्शन विहित मुदतीत अधिकृत केले नाही तर, प्रशासन नियामने कार्यवाही करेल. नळ कनेक्शन कापण्यात येतील. त्यानुसार नळ सर्व्हेक्षणाचा तसा प्रस्ताव पुढील बैठकीत प्रशासनामार्फत ठेवण्यात यावा.

श्री काशीनाथ कोकाटे : नळकनेक्श्न वर विद्यूत मोटारी लावण्याचे आढळून आल्यास त्यांचेवर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव या बैठकीत ऐनवेळी सादर केलेला आहे. त्यावर चर्चा होईलच या विषयावर चर्चा करुन निर्णय घ्यावा.

मा. आयुक्त : मागिल अर्थसंकल्पात अभय योजना प्रस्तावित केले होते. त्यास अनाधिकृत नळ जोडणीचे अधिकृत करण्याची योजना होती. अनाधिकृत नळ शोधणेची जबाबदारी महानगरपालिकेने आपल्यावर घेतली होती. यासाठी एजन्सी निश्चित करण्यात आली. एक महिन्याचा कालावधी देण्यात आला. एजन्सीने काम सुरु केले नाही. म्हणून त्यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात आली. ही योजना सफल व्हावयास पाहिजे होती. परंतु झाली नाही. या फेराफार करुन योजना सभागृहासमोर आणण्यात येत आहे. अनाधिकृत नळ धारकांना स्वतः झोनमध्ये जाऊन प्रीमीयम भरावे. ही रक्कम ठराविक कालाबाधित भरावे नसता, प्रीमीयममध्ये वाढ करण्यात येईल. वेळ

देण्यात येईल. त्या मुदतीत जर केले नाही. तर पाणी चोरीचा गुन्हा नोंदविण्यात येईल. मालक बरोबर चर्चा करुन घेता येईल व शेवटचा पर्याय म्हणून जेव्हा पासून इमारत तेव्हा पासून वसुल करावे लागेल. वेळ दिल्यानंतर लोक पुढे येतील.

श्री स. अली सलामी : आपण केलेला खुलासा या संबंधीची कार्यवाही यानंतर होणार आहे. योजना तात्काळ राबविली नाही. महानगरपालिकेचे नुकसान झाले यास कोण जबाबदा आहे. कुणावर कार्यवाही करणार.

मा. आयुक्त : योजना राबवण्याच्या दृष्टीने कार्यवाही केलेली आहे. काही भागाच्या सर्व्हे करुन ५०० अनाधिकृत नळकनेक्श्न आपण कायम करीत आहे. पुढील बैठकीत प्रस्ताव येईल त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**प्रश्न क्र. - १४ :** दरवर्षी अर्थसंकल्पात ठळक वैशिष्टे म्हणून घेण्यात आलेले निर्णय यावर अंमलबजावणी होत नाही. याला जबाबदार कोण? उदा. १९९७ - ९८ साली अर्थसंकल्पात जिनिंग मिल रोशनगेट येथे मिनी स्टेडियम (खेळाचे मैदान) बांधण्याकरीता जमिन संपादन करण्यासाठी आर्थिक तरतुद करण्यात आली होती. त्याची आजपर्यंत अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

तसेच पैठणगेट सौंदर्येकरण करीता, १९९८ - ९९ आर्थिक तरतुद करण्यात आली होती. ज्यामध्ये हायमास्ट लाईट बसविण्याचे ठरविण्यात आले होते. अपुर्ण काम करुन आजपर्यंत पैठणगेट अंधारात आहे.

**उत्तर क्र. - १४ : अतिरिक्त शहर अभियंता :** सन १९९८ -९९ या आर्थिक वर्षात पैठणगेट येथील सौंदर्येकरण करण्यासाठी र. रु. ३,२९,१००.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यामध्ये फक्त स्थापत्य (सिव्हील) कामाचा समावेश करण्यात आला होता व सदरील कामाकरीता सिध्दार्थ उद्यान येथील संगित करण्यांचे कामाच्या बचतीमधून प्रस्तावित करण्यात आले होते. यामध्ये पैठणगेट येथे हायमास्ट दिवा बसविण्याकरीता कुठलाही तरतुद ठेवण्यात आलेली नव्हती.

**उत्तर क्र. - १४ : सहाय्यक संचालक (नगर रचना)** सर्वसाधारण सभेचा ठराव क्र - १४ दि. १६-९-९५ नुसार सदरील जमीन संपादन करणे बाबत नॉन डी. पी. प्रस्ताव मंजूर झाला होता. त्यानुसार प्रकरणात भूसंपादन कार्यवाही सुरु करण्यात आली. परंतु सदर मिळकत न. भू. क्र. १२०९१ च्या मालकी हक्काबाबत न्यायालयात दि. दा. क्र. १०७७/९० चेअरमन औरंगाबाद कॉटन जिनिंग ॲण्ड प्रेसींग संस्था व श्री केशव भाऊराव तेली यांचे वाद असल्याचे विधी सल्लागार यांनी दिलेल्या अभिप्रायावरुन समजले.

दरम्यान सदर मिळकत प्रारुप विकास योजनेमध्ये "स्टेडीयम" साठी राखीव असल्याने रितसर भूसंपादन कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी, यांचे मार्फत करण्यासाठी प्रकरणात मा. आयुक्तांची मंजूरी घेऊन प्रकरण सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आले असता, मा. महापौर यांनी टि. पी. विभागाने चर्चा करावी. असे संचिकेत नमुद केले आहे.

मा. महापौर यांचेशी चर्चा करुन प्रकरणात सर्वसाधारण सभेने मंजूरी दिल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**उत्तर क्र. - १४ : प्रकल्प संचालक :**

**१) अनाधिकृत वसाहतीचे सर्व्हेक्षण :** महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र. १३ दिनांक ३० एप्रिल २००१ नुसार व महानगरपालिका सर्वसाधारण सभेतील मंजूर ठराव क्र. ४४४/१ दिनांक ६-७-२००१ ठराव झाल्यावर या विभागाचे पत्र क्र. मनपा/दामिक/७३२/०१ दिनांक

२१/९/२००१ नुसार शासनाकडे मंजूरीस्तव सादर करण्यात आला आहे. सदर पत्राच्या प्रति मा. महापौर व पदाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

सदर प्रकरणी सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार पुढील सर्व कार्यवाही सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी करावे अपेक्षित आहे.

२) **महिला बाल कल्याण :** या शिर्षखाली रु. ४० लक्ष ची तरतुद करण्यात आली आहे. महिला बाल कल्याण समितीच्या बैठकामधून व सर्वसाधारण सभेने पुढील प्रस्तावांना मान्यता प्रदान केली आहे. (१) महिला व मुलीसाठी रोगनिदान शिबीरे आयोजित करणे (२) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण (३) माता बाल संगोपन प्रशिक्षण (४) नगरसेविका प्रशिक्षण (५) महिलांना व्यायाम प्रशिक्षण (६) बालकामगार कल्याण योजना (७) गरीब गरजु व प्रशिक्षित महिलांना शिवणयंत्र वाटप (८) दत्तक बालकास अर्थसहाय्य (९) गरीब विद्यार्थीनीसाठी सायकल वाटप.

सदर योजनावर अंमलबजावणीस्तव कार्यवाही सुरु आहे.

३) **संगणकीकरण :** वर्ष २००१ - २००२ या आर्थिक वर्षमध्ये महानगरपालिकेतर्फे अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टयापैकी महानगरपालिका महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण करणे यासाठी प्रस्तावित करण्यात आले होते.

महानगरपालिकेने मालमत्ता कर पाणी पुरवठा कर, लेखा विभाग, जकात विभाग, जमा खर्चाचे वर्गीकरण पे रील, इ. चे संगणकीकरण यापूर्वीच केलेले आहे. इतर विभागाचे संगणकीकरण तसेच एक खिडकी योजना कार्यान्वीत करण्याकरीता प्रस्तावित करण्यात आले असून, हार्डवेअर व सॉप्टवेअर खरेदी करण्यासाठी शासनासने तयार केलेले मार्गदर्शक तत्वे विचारात घेणे आवश्यक असल्यामुळे शासनाकडून वेळोवेळा प्राप्त होणाऱ्या टर्न कि सोलूशन प्रोव्हर्डरची यादी व त्यांचा पुरवठा करण्याचा कालावधी याबाबत महाराष्ट्र शासनाकडे पत्र पाठवून योग्य ते मार्गदर्शन घेण्यात येत आहे.

संगणीकरण करणे ही प्रक्रिया या काळात दरात होणारे सतत बदल / तांत्रिक बाबी मध्ये होणारे बदल विचारात घेणे तसेच दराबाबत निश्चित माहिती मिळविणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे शासनाकडून सदर बाबीबाबत मार्गदर्शक घेण्यात येत आहे.

महानगरपालिकेतर्फे मालमत्ता व पाणीपुरवठा देयकाचे काम नियमित सुरु असून महानगरपालिकेतर्फे स्वत:ची वेबसाईट सुरु करण्याकरीता निविदा प्रकाशित करुन संबंधित एजन्सीला आदेश देण्यात आता असून लवकरच महानगरपालिकेची विविध माहिती दर्शविणारी वेबसाईट अंतिम करण्यात येईल.

श्री स. अली सलामी : प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पात ठळक वैशिष्टये दिली जातात. परंतु कार्यवाही होत नाही. सन ९८ - ९९ मध्ये अर्थसंकल्पात पैठण गेट येथे सौदंर्यीकरणसाठी तरतुद केलेली होती. अतिरिक्त शहर अभियंता यांनी गोलमोल उत्तर दिले आहे. अंदाजपत्रक टेक्नीकल कर्मचारी बनवितात, आयुक्त नाही. कार्यकारी अभियंता यांचे देखरेखी खालील कर्मचारी इस्टिमेंट बनवितात. सौदंर्यीकरणासाठी जी तरतुद केली होती. त्यातील काहीही खर्च करण्यात आलेला नसून सिध्दार्थ उदयान येथील संगित कारंज्याचे कामाच्या बचतीमधून ३ लक्ष २९ हजाराचे इस्टिमेंट तयार केले. जी तरतुद केली होती, ती रक्कत तशीच आहे. सन ९८ - ९९ मध्ये अर्थसंकल्प मंजूर करतांना स्थायी समिती सभा व सर्वसाधारण सभेने पैठणगेटचे सौदंर्यीकरण करुन एक हायमस्ट-दिवा बसविण्याचा निर्णय झालेला होता. त्यानुसार कार्यवाही का केली नाही. पैठणगेट जवळील रस्ता हा जुना असून या ठिकाणी अंधार असतो. हा रस्ता वर्दळीचा असतांना हायमस्ट लाईट लावण्यात आलेला नाही. काही ठिकाणी आवश्यकता नसतांना हायमस्ट

लावण्याची कार्यवाही केली. पैठणगेट येथे लोकमान्य टिळकांचा पुतळा असून या रस्त्यावर नागरिकांची वर्दळ असते. अर्थसंकल्पात तरतुद केलेली असतांना कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही. उलट तेथील बोर्ड काढून टाकण्यात आलेला आहे. सौदर्यीकरण केलेले नाही. तेव्हा पासून काम का झाले नाही. अशी विचारणा केली असता, बजेट नाही असे सांगितले जाते. त्यानंतर मी स्वत: माझ्या स्वेच्छा निधीतून २ लक्ष रुपये खर्च करावे म्हणून, पत्र दिले यामध्ये उर्वरित रक्कम टाकून हायमास्ट दिवा बसविण्याची सुध्दा कार्यवाही होत नाही. शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ गुलमंडी, तसेच रेल्वेस्टेशन व उस्मानपुरा येथे हायमस्ट लावण्यात आलेले आहे. या ठिकाणी सुध्दा लोकमान्य टिळकांचा पूतळा आहे. हायमस्टची गरज आहे. रात्री १०.३० वाजता प्रत्यक्ष आपण व मा. आयुक्तांनी येऊन बघावे. परिस्थिती समजेल. आपण ज्येष्ठ सदस्य आहात. परिस्थिती समजून घ्यावी व निर्णय घ्यावा यासंबंधी अगोदर खुलासा व्हावा. त्याच प्रमाणे ९७ - ९८ च्या अर्थसंकल्पात रोशनगेट येथील जिनिंग मिल येथे मिनी स्टेडियम (खेळाचे मैदान) बांधण्याकरीता जमीन भूसंपादन करीता ९० लाखाची तरतुद केली. तसा प्रस्ताव १९९७ ला या सभागृहाने मंजूर सुध्दा केला असून, जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. माहिती घेतली असता, गोलमोल उत्तर देऊन दोघामध्ये वाद निर्माण झालेला आहे. असे उत्तर देण्यात येते हे योग्य नाही, काम सुरु करावे नसता, या जागेवर अतिक्रमण होईल, यात महापालिकेचे नुकसान होईल. संबंधित मालक, न्यायालयात जाईल कोर्टात काय जे व्हायचे ते होईल तो भाग वेगळा आहे काम सुरु करावे. ज्याप्रमाणे आमखास मैदान येथील जागा संपादन करुन काम सुरु केले. त्याप्रमाणे हे करावे माझ्या दोन्ही प्रश्नाचा खुलासा गोलमोल दिलेला असून योग्य खुलासा देण्यात यावा.

श्री जगदिश सिध्द : अर्थसंकल्पात प्रमुख उद्दिष्ट या सदराखाली तरतुद केली जाते. त्याप्रमाणे कार्यवाही सुध्दा व्हावयास पाहिजे. आताच मा. आयुक्तांनी व अनाधिकृत नळकनेक्शन बाबत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात यावे. असा खुलासा करतांना स्पष्ट केले. परंतु १ तास पाणी येण्याऐवजी फक्त ३० मिनिटे पाणी देण्यात येते. नागरिकांनी सुध्दा महापालिकेवर का गुन्हे दाखल करु नये. असा प्रश्न निर्माण होतो. अर्थसंकल्पात तरतुद केली. त्यानुसार कार्यवाही का होत नाही. चालू आर्थिक वर्षात महात्मा गांधी पुतळयाजवळ एक हायमस्ट बसविण्या संदर्भात तरतुद केली अदयाप कार्यवाही नाही. आता विदयुत विभागाचे सर्व बजेट संपलेले आहे या विभागावर गुन्हा का दाखल करु नये. नागरिक चुका करतात. त्याप्रमाणे महानगरपालिका कडून सुध्दा चुका होतात. हे विसरुन चालणार नाही. आयुक्तांनी हा पवित्रा का उचलला नाही. आता तरी, हायमस्ट लावण्याची तात्काळ कार्यवाही व्हावी.

श्री प्रशांत देसरडा : शहरातील हायमस्ट तांत्रिक दृष्टया बरोबर आहे का? याची चौकशी व्हावी ज्या ठिकाणी हायमस्टीची आवश्यकता नाही. तो हायमस्ट पैठणगेट येथे लावण्यात यावा.

श्री नासिरखान अ. रहेमानखान : वीर सावरकर चौकात बऱ्याच दिवसापासून लाईट नाही. १५ महिन्यापासून बंद आहे. या बाबतीत काय कार्यवाही करणार? याचा खुलासा अगोदर व्हावा.

श्री काशीनाथ कोकाटे : शहरात हायमस्ट बसविण्याबाबत या सभागृहानेच निर्णय घेतलेला आहे. विदयुत बिलाची काटकसर करुन बिलापोटी महापालिकेवर जास्त भार पडू नये, या दृष्टीने या सभागृहाने निर्णय घेतलेला असतांना म्हणावी. तशी काटकसर केलेली नाही. यासाठी शहरात सर्व्हे करुन कोणत्या ठिकाणी कोणता लाईट बसविण्याची आवश्यकता आहे. याचा शोध घेऊन निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे. एका बाजून सभागृह हायमस्ट बसवायचे नाही असा निर्णय होते. दुसऱ्या बाजूने पून्हा हायमस्ट बसण्यावर चर्चा होते, हे योग्य आहे का? जर घेतलेला निर्णय बदलावयाचा असेल तर पून्हा तसा ठराव म्हणून त्यावर एक कमीटी स्थापन करुन आवश्यकतेनुसार त्या त्या चौकात हायमस्ट बसवावे.

श्री जगदीश सिध्द : महात्मा गांधी पुतळा येथे बसविण्याचा ठराव सर्वसाधारण सभेने पास केला हा हायमस्ट शेवटचा म्हणून ठराव पारीत केलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. नंतर इतर हायमस्ट बाबत चर्चा करावी. चुकीच्या मार्गाने कोठे हायमस्ट बसविण्यात आले, त्याचा सुध्दा खुलासा व्हावा.

श्रीमती निखत परवीन अली : सिटीचौक येथे ही हायमास्ट लाईट बसविण्यास मंजूरी मिळाली आहे, त्या प्रमाणे हायमास्ट लाईट बसविण्यात यावा.

श्री घोडेले नंदकुमार : हायमास्ट बसविण्याबाबत खूपच मागणी होत आहे. मागणी विचारात घेता, सर्व वार्डात कोठे हायमास्ट बसवायचा याची यादी मागवावी. तशी अर्थसंकल्पात तरतुद करावी. जर शहरात चुकून हायमस्ट लागत असेल तर, यापेक्षा दुर्दैव नाही.

डॉ. बिनवडे आशा : गजानन महाराज मंदिराजवळील चौकात बीड बायपास रोडकडे जाणाऱ्या रस्त्यावर वर्दळ असते. तसेच हेडगेवार रुग्णालयाकडून येणाऱ्या वाहनाची वर्दळ पाहता या चौकात बसविण्याबाबत या सभागृहात निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार कार्यवाही झाली नसून, यासाठी आर्थिक तरतुद नसून प्रशासन याचे लाईट बील भरु शकत नाही. असे उत्तर मिळाले, जेथे आवश्यकता नसतांना हायमास्ट बसविण्याची कार्यवाही होते तर आवश्यकता असतांना का बसवू शकत नाही. याचा खुलासा देण्यात यावा.

मा. आयुक्त : विजेचे देयक आपण कोठून देणार एका हायमास्ट देयक कोठून देणार कृपया याबरोबरच हाही निर्णय घ्यावा. जे हायमास्ट बसविण्याचे प्रस्ताव झ ाले, त्यावर चर्चा करुन योगय तो निर्णय घ्यावा लागेल. वर्षाला जवळपास १८ कोटी रुपये लाईट बील येथे जे हायमास्ट बसविण्यात आले ते बरोबर आहे काय? याचा सुध्दा विचार करुन या सभागृहाला योग्य निर्णय घ्यावा लागेल. १८ कोटी बिल देत नाही. चालू बिले देखील देवू शकत नाही. अभ्यास करुन निर्णय घ्यावा. निर्णय आयुक्त येणार नाही, सभागृहाने घ्यावा.

श्री नासिरखॉन अ. रहेमानखॉन : मा. आयुक्तांनी हायमास्ट बाबत खुलासा केला. वीर सावरकर १५ महिन्या पासून लाईट बंद आहे. त्याबाबत केव्हा कार्यवाही करणार या चौकात अंधार असतो. अपघात होण्याची भिती असते. मागच्या वेळी आयुक्तांशी चर्चा केली. दोन दिवसात लाईट चालू करण्यात येईल.

असे उत्तर मिळाले एक आठवडा गेला. अदयाप कार्यवाही नाही, किती दिवसात बसविणार याचा सुध्दा खुलासा करण्यात यावा.

मा. महापौर : स. सदस्य श्री. नासीरखॉन यांचे मागणी नुसार वीर सावरकर चौकात ३ दिवसाच्या आत स्ट्रीट लाईन चालू करुन कार्यवाही करावी. अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

अति शहर अभियंता : वीर सावरकर चौक ते सिल्लेखान या मार्गावरील लाईन एम. एस. ई. बी च्या दोषामुळे बंद आहे. त्यामध्ये एक एम्पायर गेलेला असून मटेरियल मुळे ते काम थांबलेले नाही. वार्डातील सर्व लाईटचे काम सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे करुन दिलेले आहे. आताच महापौरांनी आदेश केल्याप्रमाणे ३ दिवसाच्या आत एम. एस. ई. बी. कडे हे काम होण्याबाबत प्रयत्न केले जातील व लाईन चालू करण्यात येईल. मुख्य रस्त्यावरील कामे एम. एस. ई. बी. च्या दोषामुळे राहिले. मा. महापौरांचे आदेश झाल्यास फिडर जम्पर व्यवस्थित करण्यासाठी एम. एस. ई. बी. येथे जाऊन प्रयत्न करतो.

श्री स. अली सलामी : या विषयाला वेगळी दिशा मिळत असून, विषयांवर होत आहे. माझा प्रश्न असा होता की, अर्थसंकल्पात पैठणगेट येथे सौंदर्यीकरण करण्याबाबत ९८ - ९९ च्या बजेटमध्ये तरतुद केल्यानुसार अंमलबजावणी का झाली नाही. हायमास्ट बसविल्यानंतर ज्या तांत्रिक अडचणी येतात. त्याबाबतीत प्रशासनाने कार्यवाही करावी. पैठणगेट येथे लोक मान्य टिळकांचा पूतळा असून आजूबाजूला सोडीयम व्हेपर दिवे लावण्यात येतात. त्या दिव्यांना येणार बिल व या ठिकाणी लावण्यात येणाऱ्या हायमास्टचे बिल याची तुलना करावी. माझ्या मते २५% खर्च हायमास्ट लावल्यानंतर बील येईल व जे सोडीयम व्हेपर दिले आहेत ते बंद करता येतील नसता मी प्रशासनावर आरोप करेन की, या ठिकाणी लोकमान्य टिळकांना पूतळा असल्याने मुद्दामहून कार्यवाही होत. अर्थसंकल्पात तरतुद केल्यानुसार कार्यवाही का झ ााली नाही. तसेच काही प्रमाणात आर्थिक मदत होण्याच्या दृष्टीने २ लक्ष रुपये स्वेच्छानिधीतून घ्यावे म्हणून, पत्र दिले तसेच दुसरा प्रश्न रोषणगेटच्या बाबतीत होता. त्याचा सुध्दा योग्य खुलासा मला देण्यात यावा.

श्री स. अली स. युसूफ : रस्त्यावरील दिव्यामध्ये २५० सोडियम व्हेवरच्या दिव्याची संख्या वाढलेली आहे. ते कमी करुन त्याच्या ऐवजी १२५ वॅटचे दिवे लावण्यात यावेत.

मा. महापौर : हायमास्ट बसविण्याचा प्रश्नावर सभागृहात चर्चा होत आहे. येणारे बील आपण भरु शकती नाही, असा आयुक्तांनी आताच खुलासा केला शहरात आवश्यकता नसतांना जे जास्त वॅटचे लाईट लावण्यात आले ते कमी करुन कमी वॅटचे लाईट लावण्याची गरज आहे. असा मुद्दा उपस्थित झाला आहे. त्यानुसार शहरातील जे हायमास्ट लावण्यात आलेले आहे. त्याची आवश्यकता आहे का? यासाठी चौकशी समिती गठीत करण्यात येते. या कमीटीत स. सदस्य श्री स. अली सलामी तसेच स्थायी समिती सभापती, सभागृहनेता, विरोधी पक्षनेता आणि प्रशासनातर्फे शहर अभियंता श्री सी. एस. सोनी यांचा समावेश राहील. या कमीटीने ३ दिवसाच्या आत आपला अहवाल सादर करावा.

मा. आयुक्त : शहरातील ४० फुट रुंदीच्या रोडवर सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्यात यावेत. असा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे. मात्र प्रत्यक्षात ४० फुटा पेक्षा कमी रुंदी असलेल्या रोडवर असे दिवे लावण्यात आलेले आहेत. त्या ठिकाणी टयुबलाईट लावण्यात आल्या असत्या तरी चालले असते. ४० फुटावरील रस्त्यावर सोडीयम व्हेपर दिवे वापरावे व ४० फुटापेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यावर टयुब लावायचे. याबाबतीत सुध्दा कमीटीने विचार करुन निर्णय दयावा.

श्री जबींदा दलबिरसिंग : हे शहर ऐतिहासीक शहर आहे. विदयूत दिवे कमी करुन शहराचे नांव मिटेल, अशी कार्यवाही होता कामा नये. कोणतेही दिवे काढण्यात येऊ नये. यापुढे किती वॅटचे दिवे किती फुटाच्या गल्ल्यामध्ये लावायचे याचा विचार व्हावा तसा निर्णय सभागृहाने घ्यावा.

श्री घोडेले नंदकुमार : या अगोदर जे दिवे बसविले ते बसविले ते काढू नये. यानंतर विचार पूर्वक कार्यवाही व्हावी. असे माझे मत आहे.

मा. महापौर : स. सदस्य तसेच मा. आयुक्त यांनी केलेल्या सूचने प्रमाणे कमीटीने योग्य निर्णय घेऊन ३ दिवसाच्या आत अहवाल सादर करावा. स. सदस्य श्री. सलामी यांचा दुसरा जो प्रश्न आहे. त्याचे उत्तर नगररचना अधिकारी यांनी दयावे. कुणीही मोठमोठयाने बोलू नये. शांतता पाळावी. ज्या मुद्दयावर प्रश्न विचारावयाचा तो सभेच्या ७ दिवस अगोदर विचारला गेला पाहिजे जर, उत्तर समाधानकारक नसेल तर, सभागृहाने त्या संबंधीचीच चर्चा व्हावयास पाहिजे. प्रश्न सोडून इतर विषयावर चर्चा करु नये. याची नोंद सर्व सदस्यांनी घ्यावी. माईकच्या बाबतीत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

सहा. संचालक नगररचना : जिनींग मील रोषणगेट येथील जागा ९७-९८ च्या अर्थसंकल्पात भूसंपादीत करण्याबाबत आर्थिक तरतुद करण्यात आलेली होती. दि. १६-९-९५ च्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १४ अन्वये भूसंपादनाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला होता. सदर जागा ही मुळ विकास योजनेमध्ये आरक्षीत नव्हीती. त्यानंतर सदर जागा संपादीत करण्याबाबत खाजगी वाटाघाटी करण्यात आलेली होती ही कार्यवाही चालू असतांना सदर जागेच्या मालकीमध्ये वाद निर्माण झाला. श्री केशव भाऊराव तेली व चेअरमन औरंगाबाद कॉटन जिनींग फॅक्टरी यांचा न्यायालयात वाद चालू झाला. सदर केसचा क्रमांक १०७०/९० असा आहे. यांनतरच औरंगाबाद शहराची सुधारीत विकास योजना करण्यात आली. सुधारीत विकास योजनेमध्ये स्टेडीयम (खेळाचे मैदान) यासाठी जागा आरक्षीत करण्यात आली असून, शासनाने मा. जिल्हाधिकारी यांचे कडून भूसंपादन कायदया अंतर्गत भूसंपादर करण्यासाठी तसा प्रस्ताव प्रशासनामार्फत आणला जाईल. या प्रस्तावाला मा. आयुक्त यांची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर मा. महापौरांकडे प्रस्ताव सादर केलेला होता, यावर चर्चा करावी असे लिहिले. त्यामुळे प्रस्ताव प्रलंबीत आहे. पुढील बैठकीत मा. महापौर यांची मान्यता घेऊन प्रस्ताव सादर करण्यात येईल.

श्री जगदीश सिध्द : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पुतळयाजवळ हायमास्ट उभा करण्याचे काम बजेटमध्ये मंजूर झालेले आहे. मग बजेटमधील तरतुद कशी संपली. हायमास्ट बाबत जी कमीटी स्थापन झाली. ती आजच्या सभेत झाली आहे.

तेव्हा म. गांधी यांचे पुतळयाजवळ हायमास्ट उभारण्याचे काम प्रथम का? स्थापन करण्यात आलेली कमीटी प्रथम? हा राष्ट्रपिता म. गांधी यांचा अवमान आहे.

( याचवेळी सभागृहात मा. महापौर यांचे डायस समोर स. सदस्य श्री. जगदीश सिध्द येऊन बसतात.)

मा. महापौर : स. सदस्य यांनी डायस समोर बसू नये. त्यांनी त्यांचा प्रश्न त्यांचे जागेवर जाऊन मांडावा योग्य निर्णय घेतला जाईल. मुख्यलेखाधिकारी यांनी हायमास्ट बाबत बजेटमध्ये काम तरतुद आहे. याबाबत खुलासा करावा.

श्री जयवंत ओक : स. सदस्य यांच्या प्रश्नाचा अगोदर खुलासा व्हावा ते त्याचे प्रश्नाचा खुलासा होत नाही. म्हणून डायस समोर बसलेले आहे.

मुख्यलेखाधिकारी : शहागंज येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पुतळयाजवळ सन २००१-२००२ या अर्थसंकल्पामध्ये एक हायमास्ट बसविण्यात यांचा अशी तरतुद केली आहे. अर्थसंकल्पाच्या या प्रस्तावास स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने सुध्दा मान्यता एकाच हायमास्टसाठी आपण चालू आर्थिक वर्षात तरतुद केलेली आहे.

मा. महापौर : चालू आर्थिक वर्षात गांधी पुतळया जवळ एक हायमास्ट बसविण्याबाबत अर्थसंकल्पात आपण तरतुद केलेली आहे. प्रशासनाला सूचना देण्यात येत आहे की, तात्काळ या ठिकाणी हायमास्ट बसविण्याची कार्यवाही व्हावी.

( याच वेळी स. सदस्य श्री. जगदीश सिध्द हे महापौर डायस समोरुन उठतात व त्यांचे जागेवर जाऊन बसतात. )

उर्वरीत प्रश्न पूढील बैठकीत सादर करावे. आजची सभा २० मिमिटासाठी तहकुब करण्यात येते.

( वेळ दुपारी २.०० वाजता पुन्हा सभेला सुरुवात २.४५ वाजता. )

**प्रश्न क्र. - १५ :** अ) मार्च २००१ शेवटी मेगासिटी प्रकल्प अंतर्गत ज्या बांधकाम परवानगी दिल्या त्यात गंभीर स्वरुपाच्या चुका झालेल्या असल्याचे प्राथमिक चौकशीत नजरेस आले आहे हे बरोबर आहे का?

ब) बांधकाम परवानगीसाठी अमानत रक्कम भरण्यासाठी बँक गॅरेंटी घेण्याबाबत नियमात तरतुद नाही. सर्वसाधारण सभेने धोरण ठरविलेले नाही आणि ठराव घेवून धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही हे बरोबर आहे का? नसल्यास त्याचा तपशील देण्यात यावा. त्यात कलाम व ठराव नंबर टाकण्यात यावा.

क) चौकशी करण्यापूर्वी दोषी कर्मचारी / अधिकारी यांना निलंबीत केले जाते व किंवा दुसऱ्या डीपार्टमेंटला बदली केली जाते. अशी कार्यवाही करणे योग्य ठरते का? मेगासिटी प्रकरणातील दोषी कर्मचाऱ्यांची बदली केली नाही किंवा निलंबन केले नाही. हे खरे आहे का? खरे असल्यास त्याची काय करणे आहेत. त्यामुळे पुरावे नष्ठ करण्याची संधी मिळू शकते हे बरोबर आहे का?

ड) अशा बांधकाम परवानगीमुळे महानगरपालिकेचे काही आर्थिक नुकसान झाले आहे का? अनामत रक्कम महानगरपालिकेस रोख मिळाली नसल्याने बिनव्याजी रक्कम उपलब्ध झाली नसल्यामुळे इतर कोणते व किती आर्थिक नुकसान झाले.

ड) बिल्डर लोकांनी नंतर अनामत रक्कम म्हणून काही रक्कम भरली आहे हे खरे आहे का? असल्यास किती व केव्हा भरली. वरीलप्रमाणे येत्या सर्वसाधारण सभामध्ये लेखी स्वरुपात देण्यात यावे.

**उत्तर क्र. - १५ : कख प्रमुख (तांत्रिक कक्ष)**

अ) मार्च २००१ शेवटी मेगासिटी प्रकल्प अंतर्गत दिलेल्या बांधकाम प्रकल्प अंतर्गत दिलेल्या बांधकाम परवानग्या पैकी एकूण १४ बांधकाम प्रकरणांची तपासणी केली. त्यात काही प्रकरणात अनियमितता झाली असल्याचे, प्राथमिक चौकशीत प्रथम दर्शनी दिसून येते.

ब) होय, असा ठराव महानगरपालिकेने पारित केलेला नाही.

क) सदरच्या बाबतीत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. तसेच तात्कालीन उप - संचालक नगररचना यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यास महाराष्ट्र शासनास कळविण्यात आले आहे.

ड) सदर बाबतीत प्रकरण चौकशी अंतर्गत आहे. प्रथम दर्शनी चौकशीत आर्थिक नुकसान झाले असल्याचे दिसून येते.

इ) बिल्डर लोकांनी नंतर अनामत रक्कम म्हणून कोणतीही रक्कम भरलेला नाही परंतु, जमिन विकास शुल्क पोटी पूर्वी कमी भरण्यात आलेली रक्कम रुपये ३,९५,४०३/- बिल्डर लोकांना नोव्हेबर मध्ये भरलेली आहे.

**विषय क्र. ५४१/१ :** दिनांक २०-११-२००१ आणि २७-११-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा. महापौर : आता विषय क्र. १ चर्चा करावी. प्रश्नावर खूप चर्चा झालेली आहे. इतिवृत्तावर चर्चा करावी.

श्रीमती जयश्री किवळेकर : मागील बैठकीत सिडको - हडको पाणी पुरवठा यासंबंधी चर्चा झाली. यानंतर आपण महापौर दालनात बैठक बोलावून पाणीपुरवठा वाढविण्यासंबंधी अधिकाऱ्यांना सूचना केल्या. त्यावेळी सिडको भागास नियमित पाणीपुरवठा केला जाईल. असे सांगितले परंतु, ८ दिवसाचा कालावधी निघून गेला. कोणत्याही प्रकारे पाणीपुरवठयात वाढ झालेली दिसून येत नाही. आपण व मा. आयुक्त यांनी प्रत्यक्ष वार्डात भेटी द्याव्यात. परिस्थिती समजून येईल. एक दिवसाआड पाणी येते. ते पुरेपुर नसून हा प्रकार असाच चालू राहिल्यास पुढील वर्षात जेव्हढे पाणी येते. तेवढीच पाणीपट्टी या भागातील नागरिक भरणारा वेळोवेळी आपल्या निर्दशनास आणून दिलेले आहे. २/३ दिवसात प्रशासनाने कार्यवाही केली नाही तर, यापुढे कोणत्याही सभेसे सिडको - हडकोतील नगरसेवक उपस्थित राहणार नाहीत. शहर आणि सिडको भागातील पाणीपुरवठयासाठी कोणत्याही प्रकारचे नियोजन केले जात नाही. पाण्यात वाढ होत नाही. याबाबत आताच खुलासा प्रशासनाने करावा. नंतर पुढील चर्चेला सुरुवात करावी.

मा. महापौर : सिडको - हडको भागातील पाणी प्रश्नासंबंधी नेहमीच या सभागृहात चर्चा झालेली असून, माझ्या दालनात झालेल्या बैठकीतल्या निर्णयानुसार एकस्प्रेस लाईन टाकण्याचा ठोस निर्णय घेतलेला आहे. ती एक वर्षाच्या काळात लवकरात लवकर कशी सुरु करता येईल. यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे. त्यासाठी लागणाऱ्या खर्चाबाबतीत सर्व पदाधिकारी व ज्येष्ठ सदस्य यांच्या समवेत आपण सर्वांनी चर्चा केलेली आहे. सध्याच्या परिस्थितीत कितीही प्रयत्न केला तरी, १७ ते १८ (एमएलडी) पाणी पुरवठा आपण करु शकत नाही.

श्रीमती जयश्री किवळेकर : दररोज पाणीपुरवठा करण्याबाबत नियोजन करण्यात येईल. असे आश्वासान आपण दिलेले होते. ३० मिनिटे ४५ मिनिटे का होईना दररोज पाणीपुरवठा व्हावयास पाहिजे. तेथील जनतेच्या भावनेचा विचार व्हावा. जर १००% पाणीपट्टी देण्यास तेथील जनता तयार असतांना एक दिवसाआड पाणी देण्याचा विचार का होतो. तेथील नागरिकांवर अन्याय का होत आहे. काही तरी नियोजन करावे. तात्काळ कार्यवाही व्हावी. एक्सप्रेस लाईन होण्यास वेळ लागेल. तोपर्यंत हा प्रश्न असा राहील काय? नसता, मा. महापौरांनी एक जाहीर निवेदन करावे. जोपर्यंत ६७ कोटींची एक्सप्रेस लाईन होत नाही. तोपर्यंत तेथील जनतेनी पाणीपट्टी भरु नये.

श्री भाऊसाहेब ताठे : सिडको - हडकोतील पाणी प्रश्न जो पर्यंत सुटत नाही. तोपर्यंत सभा घेऊ नये, असे माझे मत आहे. पाण्याचा प्रश्न सोडवू शकत नाही तर, सभा घेऊन उपयोग नाही.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतात की, सिडको - हडको भागात एक दिवसाआड पाणी देण्याऐवजी दररोज पाणी देण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री अविनाश कुमावत : जास्तीचे पाणी कोठून देणार आहे. हा प्रश्न निर्माण होतो. एक्स्प्रेस पाईप लाईनचे काम सुरु करावे.

श्री स. अली सलामी : ज्या प्रश्नावर चर्चा चालू होती. त्यावर आपले रुलींग झालेले नाही. तसेच मेगासिटी प्रकल्पांवर सुध्दा चर्चा करायची आहे.

मा. महापौर : आपला विषय संपलेला आहे. आपण खाली बसावे, जागा भूसंपादनासाठी मनपाकडे पैसा नाही. मनापाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. आपण विषय क्र. १ वर चर्चा करावी. हायमास्टचा आपला विषय मागच्या बजेट मधला असून यावर्षी कार्यवाही करता येणार नाही. मेगासिटी प्रोजेक्टबाबत विषय क्र. १ मध्ये दिलेले त्यानुसार आपल्याला चर्चा करता येईल.

( याचेवेळी स. सदस्य श्री. स. अली सलामी हे या महापौर यांच्या डायस जवळ जाऊन मोठमोठयाने बोलतात. मेगासिटी प्रोजेक्टमध्ये भ्रष्टाचार झाला असे मोठमोठयाने बोलतात.)

श्री संजय शिरसाठ : स. सदस्य श्री. सलामी सभेच्या कामकाजात अडथळा आणत आहोत. त्यांचे सभासदत्व एक दिवसासाठी रद्द करावे.

मा. महापौर : स. सदस्य श्री सलामी यांनी त्यांचे जागेवर बसावे. डायससमोर बसू नये. त्यांनी त्यांचा प्रश्न जागेवर जाऊन मांडावा. खुलासा करण्यात येईल.

( मा. महापौर यांनी सूचना करुन सुध्दा स. सदस्य डायससमोर बसलेली असतात. भ्रष्टाचार संदर्भात मोठमोठयाने बोलतात. काहीही स्पष्ट ऐकावयास येत नाही. )

मा. महापौर : स. सदस्य श्री. सलामी यांचे सभासदत्व एक दिवसासाठी रद्द करण्यात येते. त्यांनी सभागृहाबाहेर जावे. नसता, सुरक्षारक्षक यांनी त्यांना सभागृहाबाहेर काढावे.

( याचवेळी स. सदस्य यांना सुरक्षारक्षक सभागृहाबाहेर घेऊन जातात. )

श्री प्रशांत देसरडा : सभागृहात आताच पाणी प्रश्नावर चर्चा झाली. केंद्रीय नागरी विकास राज्यमंत्री मा. श्री. आनंदकुमार यांचे या शहरात आगमन होत असून, ६७ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेबाबत हडकोकडील कर्जाबाबत शिष्टामंडळा

मार्फत मा. मंत्रीमहोदय यांची भेट घेऊन हडको कर्जाबाबत सविस्तर निवेदन देण्यात यावे.

मा. महापौर : आताच स. सदस्यांनी सूचना केल्यानुसार नागरी विकास मंत्री मा. श्री आनंदकुमार हे उदया या शहरात येत असून, ६७ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेबाबत हडको कडील कर्ज प्रकरणाच्या बाबतीत एक निवेदन देऊन कार्यवाही करण्यासंदर्भात त्यांनी भेट घेऊन मागणी करण्यात येईल.

श्री अविनाश कुमावत : पान क्र. ८८ दि. २०/११/२००१ च्या इतिवृत्तात तीन कनिष्ठ अभियंता यांना कामावर घेण्याबाबतच्या प्रस्तावास स्थगीती दिलेली असतांना सुध्दा मा. आयुक्तांनी आदेश काढले. हे नियमात येते का?

श्री पांडूरंग तायडे : वार्डात ८-१० दिवसापासून पाण्याची खूपच टंचाई आहे. पाणी येत नाही. बरेच नागरिक विद्युत मोटारीने पाणी घेतात. त्यामुळे ज्यांचेकडे मोटारी नाही. त्यांना पाणी मिळत नाही.

श्री जयवंत ओक : नागरिकांनी पाणी द्यावे. विद्युत मोटारी बसविणार नाही. प्रशासनाने याबाबतीत ठोस निर्णय घ्यावा. नसता, जनता पाणीपट्टी भरणार नाही. त्यांनी मोटारी लावल्या त्यांच्या जप्त करण्यात येतील. असे वृत्तपत्रात सुध्दा आलेले आहे. पाणी भरपूर दिले तर कुणीही मोटारी लावणार नाही. भरपूर पाणी देऊन अशी ठाम भूमिका प्रशासनाने घ्यावी. असे माझे मत आहे. तरच मोटारी वगैरे जप्त करण्याची कार्यवाही करावी. मा. आयुक्त यांनी स्वतः स. सदस्य सौ. जेजूरकर यांच्या वार्डात भेट दिली. नळाला मोटार लावलेली होती. मोटार काढल्यानंतर किती पाणी येते याची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यावेळी आपण सुध्दा बरोबर होतात. पाणीच होत नव्हते. पाणी येत होते तर, का मोटारी जप्त केल्या नाही, असाही प्रश्न माझा आपल्यासमोर आहे. पाणी भरपूर येत नसेल तर, लोक मोटारी लावणार आहे.

मा. महापौर : अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. जे लोक मोटारीने पाणी घेतात. त्यांचेवर कार्यवाही करण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर झालेला असून प्रस्ताव समोर आल्यानंतर त्यावर चर्चा करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री पांडूरंग तायडे : पाणी भरपूर द्यावे. जेणेकरुन लोक मोटारी लावणार नाही. आपल्या चेंबरला (दालनात) सुध्दा पाण्याची टंचाई आहे. आपल्या माहितीसाठी सांगतो तर, इतर लोकांचे काय हाल असतील याचा विचार व्हावयास पाहिजे.

श्री अविनाश कुमावत : दि. २०-११-२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. ८८ तीन कनीष्ठ अभियंत्यांना सभागृहाने मान्यता दिलेली नसतांना नियुक्त्या करण्यात आलेल्या असून, त्यांचे वेतनावरील खर्च मनपा देणार की, शासन याचा खुलासा करावा.

मुख्य लेखा परिक्षक : या प्रकरणाची संपूर्ण संचिका तपासली असता ७ पदाची मंजूरी घेण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला होता. भरतीही पदोन्नतीने व ५०% नियमानुसार ५०% नामनिर्देशनाद्वारे करावी लागते. तसे पत्र मनपाकडून शासनाकडे पाठविले. त्यानुसार शासनाने त्यांचेकडील पत्र दि. २९-९-२००१ नुसार प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ठराविक तील लोकांना सेवेत सामावून घेण्याबाबत कळविले. त्यानुसार २०-१०-२००१ च्या सर्वसाधारण सभेत तसा

प्रस्ताव ठेवण्यात आला. सभागृहाने या प्रस्तावास स्थगिती दिल्यानंतर दि. २४-१०-२००१ ला पुन्हा शासनाकडे तसे कळविण्यात आले व त्यानुसार शासनाने असे कळविले की, सदर कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्र द्यावे व तसा प्रस्ताव सभेत ठेवावा. त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांना १२-११-२००१ नुसार नियुक्ती पत्र देऊन तसा प्रस्ताव दि. २०-११-२००१ च्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात आलेला होता. तो नामंजूर करण्यात आला. प्रस्ताव नामंजूर करण्यात आला. ही परिस्थिती शासनास कळविली. शासनाने मार्गदर्शन मागविलेले असून, शासन मंजूरीनुसार सदर कर्मचारी सध्या कामावर असून, त्यांना एक महिन्याचे वेतन सुध्दा देण्यात आलेले आहे.

श्री अवनिाश कुमावत : सभागृहाने प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता. शासनाचे मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता नव्हती. तसेच शासनाचे मार्गदर्शन घेतल्यानंतर व सभागृहाची मंजूरी नसतांना नियुक्त्या करणे योग्य आहे काय? त्यांच्या नियुक्त्या केलेल्या हया नियमात बसत नाही.

श्री संजय शिरसाठ : शासनाचे निर्देशानुसार प्रथम प्रस्ताव मंजूरीसाठी आलेला होता. स्थगिती देण्यात आलेली होती. शासनाचे कोणतेही आदेश या सभागृहाला बंधनकारक नाही. स्थगित प्रस्ताव केव्हाही मंजूर करता येतो. स्थगित ठेवण्यात आला म्हणून, शासनाकडे, मार्गदर्शन मागविले हे नियमाने चुकीचे ठरेल. नियम क्र. ४५१ मध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे की, ४५१ (३) नुसार एखादया ठरावास आक्षेप असेल तर, ते प्रकरण शासनाकडे पाठवावे लागते व शासन आदेश करील. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते. प्रस्ताव स्थगित ठेवला असतांना, शासनाचे मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता नव्हती असे माझे मत आहे. सभागृहाची मान्यता नाही. शासन आदेश करुन त्याप्रमाणे नियुक्त्या होत असेल तर, योग्य नाही. या सभागृहाला काही अर्थ राहिलेला नाही असे सिध्द होते.

मुख्य लेखा परिक्षक : सभागृहाने प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता. त्यासंबंधी शासनाकडे मार्गदर्शन मागविले. शासनाने सदर कर्मचाऱ्यांनी नियुक्ती करावी व तसा प्रस्ताव सभागृहापुढे मंजूरीसाठी ठेवावा असे कळविले. त्यानुसार प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. शासन आदेशानुसार नियुक्ती केलेली आहे. नियुक्ती केल्यानंतर त्यांचा पगार द्यावा लागेल.

श्री संजय शिरसाठ : सभागृहाने मान्यता दिली नसतांना, नियुक्ती कशी केली. आता सभागृहाने मान्यता दिली नाही. शासनाचे मार्गदर्शन मागविले. शासन १० वर्ष अहवाल पाठविणार नाही. तोपर्यंत त्यांचा पगार मनपाचे देणार काय?

श्री तकी हसन खान : शासनाकडे नामंजूर प्रस्ताव पाठविला त्यास शासन मंजूरी देऊ शकेल का? असे नियमात येते का?

श्री काशीनाथे कोकाटे : या मनपाची आजची आर्थिक परिस्थिती पाहता वेळोवेळी शासनाच्या मदतीची आवश्यकता पडते. शासनाचे आदेश हे मनपा प्रशासनास बंधनकारक आहे. त्यानुसार शासनाकडून तीन अभियंत्यांची नियुक्ती करुन तसा प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवण्यास सांगितल्यानुसार मा. आयुक्तांनी प्रस्ताव सादर केलेला होता. तो नामंजूर केला. शासनाचे महामंडळामध्ये तसे राज्यातील महानगरपालिकामध्ये भूकंपग्रस्त भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची पत्र पाठविलेले आहे. नियमानुसार ५०%

नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीचा निकर्ष लावून ७ पदाऐवजी ३ पदावरच नियमाने तीन लोकांची नांवे देऊन नियुक्तीचे निर्देश दिले. त्यांना घ्यायचे की नाही, हा सभागृहाचा अधिकार आहे. परंतु मनपावर आजच्या स्थितीत विद्युत मंडळाचे १०४ कोटी रुपये थकीत असून, इतर कर्ज मिळून २२५ कोटी रुपये कर्ज आहे. यासाठी शासनाच्या मदतीची आपल्या मनपास आवश्यकता पडणार आहे. शासनाकडून या मनपास मदत होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने तीन अभियंत्यांना सामावून घेण्याच्या निर्णयास प्रतिष्ठेचा मुद्दा न करता, या सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री अविनाश कुमावत : शासनाने मनपावर असलेले विद्युत बील थकीत रक्कम माफ करावे. तीन कर्मचाऱ्यांऐवजी आणखी काही लोकांचा समोवश करु. परंतु ही प्रथा पाडू नये. असे माझे मत आहे.

श्री सुदाम सोनवणे : नियम क्र. ४५१ प्रमाणे शासनाने केलेले आदेश बंधनकारक आहे. जो ठराव मंजूरीसाठी आला. त्यास विरोध नाही. तो मान्य करायचा किंवा नाही तो आपला अधिकार आहे. शासनाने जे तीन ठराविकच कर्मचाऱ्यांचे नांवनिशी प्रस्ताव दिला. त्यास विरोध केलेला आहे. कर्मचारी भ्रष्टाचारी किंवा विविध गुणांनी बरबटलेले असू शकतात.

श्री कदीर मौलाना : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार स. सदस्य श्री सलामी यांनी प्रश्न दिलेला होता. नियमाने प्रश्नावर अगोदर चर्चा करावी लागते. त्यानंतर इतर विषय घेता येतात. त्यांनी नियमाने प्रश्नाचा खुलासा मागविलेला होता. प्रश्नावरील चर्चा सोडून विषय क्र. १ वर चर्चा सुरु केली. त्यामुळे त्यांनी प्रश्नाचा खुलाशाची मागणी केली म्हणून, त्यांना निलंबीत करणे योग्य होणार नाही व नियमात सुध्दा बसत नाही. त्यांचे निलंबन मागे घ्यावे व त्यांना सभागृहात बोलवायाची परवानगी द्यावी.

श्री अफसरखान: मेगासिटीचा प्रश्न समोर येत आहे. म्हणून आपण प्रश्नावरील चर्चा बंद करुन विषय क्र. १ वर चर्चा सुरु करण्यास परवानगी दिली. यावरुन मेगासिटी प्रकरणामध्ये मोठा भ्रष्टाचार झाल असे दिसून येते. स. सदस्य श्री. सलामी यांचे सभासदत्व रद्द केले. ते मागे घेण्यात यावे व त्यांना सभागृहात बोलविण्याची परवानगी द्यावी.

मा. महापौर : स. सदस्य यांनी जो प्रकार केला तो बरोबर नव्हता. त्यामुळे त्यांचे सदस्यत्व रद्द केले. सभेला सुरुवात झाली तेव्हा स. सदस्य सभागृहात नव्हते म्हणून त्या प्रश्नावर चर्चा न होता, विषय क्र. १ घेण्यात आलेला आहे.

श्री. कादीर मौलाना, श्री कैसरखान : स. सदस्य श्री. सलामी यांचे सभासदत्व रद्द केले. ते मागे घेण्यात यावे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. सलामी यांचे सभासदत्व रद्द केलेले होते. रद्द करण्याबाबतचा घेतलेला निर्णय मागे घेण्यात येतो. त्यांनी सभागृहात येऊन बसावे. ( याच वेळी स. सदस्य श्री सलामी हे सभागृहात येऊन बसतात. )

श्री सुदाम सोनवणे : तीन कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती संदर्भात चर्चा चालू होती. ४५१ प्रमाणे शासनाने आदेशाचे पालन करणे बंधनकारक नाही. शासनाचे आदेशाचे पालन सभागृह करीत आहे. परंतु नावनिशी देऊन याचा कर्मचाऱ्यांना सामावून घ्यावे. यास विरोध केलेला आहे. भूकंपग्रस्ताचे उमेदवार प्रमाणकानुसार मुलाखतीसाठी बोलवावे. त्यातून जे गुणवत्तेनुसार नियुक्त

होतील. त्यांना नियुक्ती पत्रे देऊन कार्यवाही करावी. शासन मनपास आर्थिक मदत करते. शासनाचे ते कर्तव्य आहे. यास आम्ही सहमत आहोत. परंतु नियम सोडून कार्यवाही होऊ नये. शासनाने १८४ लोकांची नावें देऊन नियुक्ती करावी म्हणून आदेश काढलेले आहे. यात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. नाशिक, पुणे, नागपूर या मनपाकडे पाठविलेले उमेदवार भरती करुन घेतलेले नाही. आपल्या मनपाकडे ३ भूकंपग्रस्त कर्मचाऱ्यांना घ्यावे. अशा आदेशास आमच्या विरोध राहणार नाही. परंतु ठराविक लोकांची नावें देऊन त्यांच्या नियुक्त्या कराव्या यास आमाचा विरोध आहे. म्हणून तो प्रस्ताव रद्द केलेला आहे. मागील बैठकीत आयुक्तांनी खुलासा केला होता की, शासनाने कोणतेही आदेश केल्यानंतर ते या सभागृहाला व प्रशासनाला बंधनकारक आहे. शासनाने सिडको मनापाकडे हस्तांतरण करण्यासंदर्भात मनपाने पाठविलेल्या प्रस्तावानुसार फेब्रुवारी २००१ ला शासनाने आदेश दिले. अद्यापपर्यंत प्रशासनाने का हस्तांतरणाची कार्यवाही सुरु केली नाही. का डोळेझाकपणा केला. त्यावेळी शासनाने नियम लागू पडत नव्हते का? खुलासा देण्यात यावा.

मा. महापौर : शासनाने तीन कनीष्ठ अभियंता पदावर ठराविकच लोकांची नांवे देऊन नियुक्त्या करणेचे आदेश केले. त्यानुसार प्रस्ताव सभागृहात सादर केल्यानंतर स्थगित ठेवण्यात आला. प्रस्ताव स्थगित ठेवला असतांना नियुक्त्या केल्या. हे नियमाप्रमाणे बरोबर आहे काय? खुलासा द्यावा.

मुख्यलेखा परिक्षक : कलम ५४ प्रमाणे कोणत्याही पदावर नियुक्ती करतांना निवड समितीद्वारे होते. यात शासनाने नावासहित उल्लेख केलेला असल्याने कलम ५३ (३) प्रमाणे मा. आयुक्तांना नियुक्ती करण्याचे अधिकार आहे. कलम ५३ (१) नुसार सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी प्रस्ताव ठेवला होता. तो स्थगित ठेवल्यामुळे शासनास कळविले. शासनाने नियुक्ती करण्याचे आदेश देऊन तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी ठेवावा, असे आदेश केल्याने मा. आयुक्तांनी ५३ (३) चा वापर करुन नियुक्ती आदेश काढले. आता सर्वसाधारण सभेने तो प्रस्ताव रद्द केला. पुन्हा शासनाने मार्गदर्शन मागविले आहे. जोपर्यंत नियुक्ती रद्द होत नाही. तोपर्यंत सदर कर्मचाऱ्यांना पगार द्यावा लागेल.

श्री भगवान घडामोडे : या मनपाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही व या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेऊ शकत नाही असे प्रशासनाने शासनास का कळविले नाही.

आता शासन केव्हा मार्गदर्शन देणार. तोपर्यंत या कर्मचाऱ्यांचे पगार फंडातून जाणार, यास कोण जबाबदार आहे.

श्री नंदकुमार घोडेले : शासनाचे मार्गदर्शन येण्यास उशीर होइल. तोपर्यंत या कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा पगार शासनाकडून वसुल करणार काय? विकास कामे करण्यासाठी मनपाकडे पैसा नाही. नोकर भरती का करीत आहेत, रद्द केलेला ठराव कायम करावा. शासनाने वेगवेगळे किती प्रकरणात अंमलबजावणीसाठी निर्देश दिलेले आहे. त्याचा पण खुलासा द्यावा.

श्री जयवंत ओक : ५३ (१) नुसार सभागृहाची मान्यता मिळाली नाही. म्हणून ५३ (३) वापर करुन मा. आयुक्तांनी आदेश काढले. शासनाने दिलेले निर्देश त्या संदर्भात या सभागृहाने निर्णय घ्यावा किंवा कसे याबाबतीत मा. आयुक्तांनी खुलासा

करावा. आयुक्तांना यात वेठीस धरण्यात येत आहे. सभागृहाने सुध्दा योग्य तो निर्णय घ्यायचा आहे. मागील काही प्रकरणाचा विचार केल्यास या सभागृहाने पुष्कळ ठराव मंजूर केले. अद्याप प्रशासन अंमलबजावणी करीत नाही. शासन नोकरभरती बंद करते. दुसऱ्या बाजून नावनिशी आदेश देते हे योग्य नाही. नगरसेवक म्हणून निवडणूक येऊन १७ महिने झाले. अद्याप वार्डात कुठेलेही विकास काम झालेले नाही. शासन आदेश देते.सभागृह मान्यता देत नाही. यातून योग्य तो मार्ग काढावा.

श्री तकी हसन खान : मुंबई, पुणे, नाशिक, नांदेड मनपाकडे अशा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे निर्देश शासनाने केले. त्या सर्व मनपामध्ये या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेतलेले आहे. एकूण ५२ लोक रुजू झाले. फक्त या मनपाकडे ३ कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याबाबत निर्देश दिलेले आहे. त्यांना सेवेत सामावून घ्यावे. इतर मनपाचा विचार करुन रुजू करुन घ्यावे. या तीन लोकांवर का अन्याय होतो.

श्री जयवंत ओक : या ठिकाणी तीनच कर्मचाऱ्यंचा प्रश्न नाही. १७ कर्मचाऱ्यांचा प्रश्न आहे. ज्यांच्यात हिमंत आहे. तेच वाटेल त्या खुर्चीवर जाऊन बसलेले आहे. क्लार्क असलेले कर्मचारी आज मोठया पोस्टवर गेले. कसे गेले, कुणी नेऊन बसविले हे सांगण्याची आवश्यकता नाही. १४ महिन्यात १३ आयुक्त येऊन गेले. आयुक्तांना काहीही माहित नसते. आयुक्तांच्या नेहमीच बदल्या होत राहतील. या सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यायचा असतो. तो घ्यावा. आयुक्तांना कोंडीत धरु नये. एका बाजून शासन आदेश एका बाजूने सभागृह यामुळे प्रशासन कोडींत येत आहे. योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

मा. आयुक्त : मा. महापौरांबरोबर आयुक्तांनी राजकारण केले असे बोलण्यात आले. मी राजकारण केले नाही. आताच एका स. सदस्यांनी सांगितल्यानुसार एका बाजूने शासन व एका बाजूने सभागृह अशी परिस्थिती आहे. शासनाकडे ७ पदांची मंजूरी घेण्यासाठी प्रस्ताव पाठविलेला होता. या पदांना ताबडतोब मंजूरी द्यावी. म्हणून सन १९९३ मध्ये शासनाकडे पत्र दिले. त्यानुसार शासनाने नियुमानुसार ५०% नामनिर्देशनाद्वारे भरती करण्याचा निकष लावून तीन लोकांची नांवासहीत त्यां पदांना मंजूर दिली व तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवावा. असे निर्देश दिले. प्रस्ताव ठेवला असता, त्यास स्थगिती मिळाली. त्यानंतर शासनास कळविले. पुन्हा शासनाने निर्देश दिले की, सदर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. तसा प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवावा. नियुक्ती देण्यात येऊन प्रस्ताव सादर केला असता, तो रद्द करण्यात आला. आता पुन्हा शासनाकडे मार्गदर्शन मागविले आहे. आज बैठक संपन्न झाल्यानंतर पुन्हा शासनास कळविण्यात येईल की, नियुक्ती देण्याबाबतचा रद्द केलेला ठराव कायम करण्यात आला. यावर स्पष्ट आदेश द्यावे. शासन जो निर्णय देईल. त्यानुसार प्रशासन पुन्हा कार्यवाही करेल.

श्री संजय शिरसाठ : नांवनिशी शासनाला आदेश करता येतात का? येत असतील तर कोणत्या नियमानुसार जे आदेश शासनाने काढले. त्यात पोट कलमाचा उल्लेख केलेला नाही.

श्री सुदाम सोनवणे : तीन कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आपण केलेला खुलासा बरोबर आहेत. परंतु नावनिशी प्रस्ताव दिला त्यास आमचा विरोध केलेला आहे. म्हणून,

प्रस्ताव रद्द केला. शासनाच्या आदेशाचे पालन प्रशासन करीत असेल तर शासनाने हस्तांतरण करण्यासंदर्भात आदेश केले. का अंमलबजावणी केली नाही.

मा. आयुक्त : शासनाच्या आदेशानुसार प्रशासनाने सिडको हस्तांतरणाची कार्यवाही केलेली आहे. हस्तांतरणाची कार्यवाही चालू असतांनाच स्थायी समितीचे सभापती यांनी सर्व सदस्यांना विश्वासात घेऊनच कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी ४ महिन्याची मुदत मागितली होती. सभागृहाने निर्णय घ्यावा. अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री सुदाम सोनवणे : सिडको-हडकोतील अतिक्रमण काढण्याची जी मोहीम चालू आहे. त्यात नगरसेवकांची बदनामी होत आहे. महापालिका यात हस्तक्षेप करीत आहे. अशी भावना लोकांच्या मनात झालेली आहे.

मा. आयुक्त : सिडको-हडको भागातील अतिक्रमण काढण्याबाबत प्रकरण न्यायालयात चालू होते. न्यायालयाचे आदेशानुसार अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होत आहे. महापालिका प्रशासनाचा यात काहीही हस्तक्षेप नाही.

श्री सुदाम सोनवणे : वेळ गेलेली नाही. सिडको-हडकोची आम जनता महानगरपालिकेला दोषी ठरवित आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही होत आहे. तसा मा. आयुक्तांनी जाहीर खुलासा करावा.

मा. महापौर : तीन क. अभियंता पदावर नियुक्ती रद्द केल्याबाबतच्या ठरावास कायम करण्यात येते.

श्री प्रकाश निकाळजे : दि. २०-११-२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. ७७ वर मा. आयुक्तांनी खुलासा केला की, मेगासिटी प्रोजेक्टमध्ये बँक गॅरंटी घेतली त्यामुळे, आणखी ८०-९० लाख रुपये मिळाले असते. नियमात नसतांना बँक गॅरंटी घेतली. आयुक्तांनी स्पष्ट दिले. अधिकारी भ्रष्टाचार करतात. वृत्तपत्रात बातम्या येतात. त्यामुळे महापालिकेची बदनाही होते. याचा सुध्दा विचार व्हावयास पाहिजे. परंतु तसे होत नाही. बँक गॅरंटी घेतली म्हणून ८० लाख रुपयाचे उत्पन्न महापालिकेचे बुडीत झाले यास अधिकारीच जबाबदार होऊ शकतात. नगरसेवक नाही, या प्रकल्पाची विभागीय चौकशी व्हावी. अशा बातम्या वृत्तपत्राद्वारे झळकत आहे. या प्रकल्पात ८० लाखाचा भूर्दंड महापालिकेस बसलेला आहे. आयुक्तांना धन्यवाद देतो. त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट मांडली. या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. चालू वर्षासाठी १३५ कोटीचा अर्थसंकल्प मंजूर केला आहे. त्यानुसार ८० ते ९० कोटी रुपये वसुल होतील. अशा अपेक्षा आहे, एकाच प्रकरणामध्ये जर ८० लाख रुपये कमी येत असतील तर महानगरपालिकेकडे असलेले २२५ कोटी रुपये कर्ज कसे परतफेड करणार असा प्रश्न निर्माण होतो. सभागृहातर्फे विनंती करण्यात येते की, या आयुक्तांनी बिल्डरवर कार्यवाही करावी. ज्यांनी भ्रष्टाचारास खतपाणी घातले, अशी त्यावेळा कार्यारत असलेले अधिकारी यांचेवर सुध्दा कार्यवाही झाली पाहिजे. आता सध्या ते येथे नाही. त्यांचे पगारातून वसुल करावी. महानगरपालिकेवर सध्या आर्थिक परिस्थितीचे संकट कोसळलेले असून त्या संकटातून वाचविण्याचा प्रयत्न या सभागृहाने तसेच प्रशासनाने करावा.

श्री कदीर मौलाना : औरंगाबाद हे शहर ऐतिहासिक शहर आहे. विकास कामे व्हावीत अशी सभागृहाची भावना आहे. परंतु विकास कामे म्हणावी तशी होत नाही. एका बाजून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. असे म्हटले जाते तर, महानगरपालिका तोटयात आणण्याचे काम महानगरपालिकेचे अधिकारी करीत आहे, हे दिसून येत आहे. स. सदस्य श्री सलामी यांनी मेगासिटी प्रोजेक्ट संदर्भात काही प्रश्न विचारलेले होते. त्यातील पहिला प्रश्न असा की... ( प्रश्न वाचून दाखविण्यात येतो. ) त्याचे उत्तर सुध्दा कसे गोलमोल दिले. ( सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखविण्यात येते. )

प्रश्न पाहिला मार्च २००१ शेवटी मेगासिटी प्रकल्प अंतर्गत ज्या बांधकाम परवानग्या दिल्या त्या गंभीर स्वरुपाच्या चुका झालेल्या असल्याचे प्राथमिक दृष्टया नजरेस आले आहे हे बरोबर आहे का? त्याचे उत्तर असे की, मेगासिटी प्रकल्प अंतर्गत दिलेल्या बांधकाम परवानग्या दिल्या त्यात गंभीर स्वरुपाच्या चुका झालेल्या असल्याचे प्राथमिक दृष्टया नजरेस आले आहे हे बरोबर आहे का? त्याचे उत्तर असे की, मेगासिटी प्रकल्प अंतर्गत दिलेल्या बांधकाम परवानग्यापैकी एकूण १४ बांधकाम प्रकरणांची तपासणी केली त्यात काही प्रकरणात अनियिमितता झाली असल्याचे प्राथमिक चौकशीत प्रथम दर्शनी दिसून येते. जे उत्तर दिले ते गोलमोल दिलेले असून प्राथमिक चौकशीत काम चुकीचे होत आहे. असे दिसून आले तर पुढील चालू असलेले काम काम थांबविण्यात आले नाही. असा माझा प्रश्न आहे. जे दोषी होते त्यांचेवर कार्यवाही का केलेली नाही. दुरुस्त प्रश्ना असा होता की, बांधकाम परवानगीसाठी अनामत रक्कम भरण्यासाठी बँक गॅरंटी घेण्याबाबत नियमात तरतुद नाही. सर्वसाधारण सभेने धोरण ठरविले नाही. असा ठराव घेऊन धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही. हे बरोबर आहे का? याचे उत्तर होय आलेले असून नसल्यास त्यांचा तपशील देण्यात यावा. त्यात कलम व ठराव नंबर टाकण्यात यावा. यावर असा ठराव महानगरपालिकेने पारित केलेला नाही. असे उत्तर आलेले आहे. बँक गँरंटी घेण्याबाबत नियमात तरतुद नाही. तर बँक गॅरंटी कुणाच्या अधिकारानुसार घेतली त्याचा खुलासा व्हावयास पाहिजे. तिसरा प्रश्न असा की, चौकशी करण्यापुर्वी दोषी कर्मचारी / अधिकारी यांना निलंबीत केले जाते किंवा दुसऱ्या डिपार्टमेंटला बदली केले जाते. अशी कार्यवाही करणे योग्य ठरते का? मेगासिटी प्रकरणातील दोषी कर्मचाऱ्यांची बदली केली नाही किंवा निलंबन केले नाही. हे खरे आहे का? खरे असल्यास त्याची काय कारणे आहेत. ज्यामुळे पुरावे नष्ट करण्याची संधी मिळू शकते हे बरोबर आहे का? या सर्व प्रश्नाचे उत्तर असे दिले की, सदस्या बाबतीत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यां विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. तसेच तत्कालीन उप-संचालक नगररचना यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यास महाराष्ट्र शासनास कळविण्यात आले आहे. चौकशी होत राहील. परंतु आज महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. यास जबाबदार कोण होऊ शकते. कोणतीही विकास कामे होत नाही. बजेट संपलेले आहे. असे सांगण्यात येते. तसेच चौथा प्रश्न असा होता की, अशा बांधकाम परवानगीमुळे महानगरपालिकेचे काही आर्थिक नुकसान झाले आहे का? अनामत रक्कम महानगरपालिकेस रोख मिळाली नसल्याने व्याजाची रक्कम

उपलब्ध झाली नसल्यामुळे इतर कोणते व किती आर्थिक नुकसान झाले. या प्रश्नाचे उत्तर असे की, सदर बाबतीत प्रकरण चौकशी अंतर्गत आहे. प्रथमदर्शनी चौकशीत आर्थिक नुकसान झाले असल्याचे दिसून येते. असे गोलमोल उत्तर दिलेले आहे. पाचवा प्रश्न असा की, बिल्डर लोकांनी नंतर अनामत रक्कम म्हणून काही रक्कम भरली आहे. हे खरे आहे का? असल्यास किती व केव्हा भरली. त्यावर असे उत्तर देण्यात आले की, बिल्डर लोकांनी नंतर अनामत रक्कम म्हणून कोणतीही रक्कम भरलेली नाही. परंतु जमीन विकास शुल्क पोटी पूर्वी कमी भरण्यात आलेली रक्कम रुपये ३,९५,४०३/- बिल्डर लोकांनी नोव्हेंबर मध्ये भरलेली आहे. या सर्व प्रश्नाच्या उत्तरावरुन असे दिसून येते की, महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करण्यात आले मोठा भ्रष्टाचार यामध्ये झालेला असून दोषांवर कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. एकीकडे भ्रष्टाचार होता. महानगरपालिकेचे उत्पन्न कमी करण्याचा प्रयत्न होतो तर, आतचा प्रश्न उपस्थित केल्यानुसार हायमास्ट लावल्यानंतर त्याचे बील भरण्यासाठी महानगरपालिकेकडे पैसा नाही, असे बोलले जाते. विकास कामे करण्यासाठी पैसा नाही, असे म्हटले जाते तर अधिकाऱ्यांच्या गलथन कारभारांमुळे महानगरपालिकेची फार मोठी आर्थिक हानी होत आहे. ही आर्थिक हानी टाळण्यासाठी मा. आयुक्तांनी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर कार्यवाही करणे गरजेचे आहे. जेणेकरुन भ्रष्टाचार होणार नाही व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल व विकास कामे करता येतील. अशा भ्रष्टाचाराच्या माध्यमाद्वारे महानगरपालिकेची बदनामी होत आहे व कोणतेही विकास कामे होत नाही असे जनतेला कळलेले आहे. प्रशासनाकडून भ्रष्टाचार थांबविणे व उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत नसेल तर या सभागृहाला सुध्दा या ठिकाणी नुसती चर्चा करणे नियमाप्रमाणे योग्य होणार नाही.

श्री स. अली सलामी : मी केलेल्या मेगासिटी प्रकल्पाच्या संदर्भात जे उत्तर देण्यात आले ते गोलमोल असून, त्या उत्तरावरून असे दिसून येते की, या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावयाचे असेल तर, जो भ्रष्टाचार होतो तो थांबविण्याचे काम प्रशासनाचे आहे. जो पर्यंत भ्रष्टाचार थांबत नाही, तोपर्यंत महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही व विकास कामे होणार नाही. आजही बरीच विकास कामे आर्थिक परिस्थितीमुळे थांबून आहे प्रश्न क्र. ३ नुसार ज्या अधिकाऱ्यांची चौकशी करायची ते अधिकारी त्यांचे पदावर कार्यरत असतात का? या प्रश्नाचे उत्तर बरोबर दिलेले नाही. दिशाभुल करणारे आहे. सदरच्या बाबतीत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. ज्या अधिकाऱ्यांची चौकशी चालू आहे. त्यांची दुसऱ्या विभागात बदली झाली तर, योग्य रितीने चौकशी होईल का? असा माझा प्रश्न होता. नियमाने ज्या अधिकारी / कर्मचारी यांची चौकशी चालू आहे. त्यांना त्या विभगातून काढून टाकले पाहिजे किंवा त्यांचे दुसऱ्या विभागात पाठविले पाहिजे तेव्हाचा खऱ्या अर्थाने चौकशी करता येईल. परंतु जे उत्तर आले ते बरोबर नसुन विभागीय चौकशी चालू आहे, असे उत्तर दिले. तत्कालीन आयुक्त तसेच उपसंचालक नगररचना यांचे चौकशीसाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रकरण पाठविण्यात

आले. नियम बाजूला ठेवून जे दोषी अधिकारी / कर्मचारी आहे. त्यांना वाचविण्याचा प्रयत्न होत आहे. चौकशी केव्हा होणार आहे वे दोषीवर कार्यवाही किती दिवसात होणार आहे.

मा. आयुक्त : चौकशी न होता, अमुक अधिकारी / कर्मचारी यांचेवर भ्रष्टाचार केला असा आरोप लावणे, बरोबर होणार नाही. भ्रष्टाचार झाला असेल व तशी शंका आली तर चौकशी अधिकारी नेमले जातात. जोपर्यंत चौकशी अधिकारी आरोप सिध्द करीत नाही. तो पर्यंत भ्रष्टाचार झाला असे म्हणता येणार नाही. जेव्हा प्रकरण लक्षात आले तेव्हा मा. महापौर यांनी चौकशी समिती नेमली त्या संबंधित अधिकाऱ्यांनी चौकशी सुध्दा केली. मागील सभेत त्यांचा अहवाल ठेवणार होतो. परंतु प्रशासन ठेवु शकले नाही. भ्रष्टाचार होणे ही एक बाब आहे तो जोपर्यंत भ्रष्टाचार सिध्द होत नाही. तोपर्यंत आरोप लावणे बरोबर होणार नाही. या प्रकरणात नियमाचे उल्लंघन करण्यात आले व काही प्रकरणामध्ये रक्कम कमी वसुल करण्यात आली हे आपल्याला प्राथमिक चौकशीमध्ये दिसून आलेले आहे. ही बाब लक्षात घेऊन वाणिज्य वापरासाठी ५% प्रमाणे जमीन विकास शुल्क वसुल करण्यात आलेला आहे. या प्रकरणात अधिकारी / कर्मचारी यांना आरोपपत्र ( चार्ज शीट ) बजाविण्यात आलेले आहे. या प्रकरणांची चौकशी फार मोठया प्रमाणात करावी लागणार हा उद्देश समोर ठेवून तसा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविलेला आहे. येणाऱ्या स्थायी समितीसमोर तसा प्रस्ताव येईल. त्यावर सभागृह निर्णय होईल. प्रशासनाने चौकशी अधिकारी नेमलेले आहे ते या प्रकरणाची कसून चौकशी करत आहेत. जे दोषी असतील, त्यांचेवर नियमाने पुढील कार्यवाही करण्यात येईल. नगररचना विभागामध्ये काही बाबतीत चुकीच्या पध्दतीने काम केले जाते. बेटरमेंट चार्जच्या बाबतीत स्वतः बिल्डरांनी जागेचा विकास करणे किंवा महानगरपालिकेने विकास करणे हे उत्पन्न नाही. यात दोन बाबी आहेत. विकास करण्यासाठी पैसा वापरावा लागेल. त्यातून डेव्हलपमेंट चार्ज महानगरपालिकेला मिळालाच पाहिजे. मेगासिटी प्रकरणांत जी बँक गॅरंटी घेतली ती घ्यावायास नको होती तेथे महानगरपालिकेनेच विकास करावयास पाहिजे होता. ज्या बिल्डरांनी विकास करण्याबाबत हमी घेतली त्याप्रमाणे विकास होतो किंवा नाही हे पाहण गरजेचे आहे. यामध्ये असलेले नगररचनाका यांचेवर कार्यवाही करण्याचे अधिकार आपल्याला नाही. योग्य चौकशी करण्यासाठी शासनाकडे कळविलेले आहे. महानगरपालिकाचे अधिकारी / कर्मचारी सुध्दा या प्रकरणामध्ये ---- आहे. जेव्हा कर्मचाऱ्यांना अशा प्रकरणाच्या बाबतीत निलंबीत करण्यता येते किंवा बदली होते. त्यामध्ये शंका निर्माण करण्याची आवश्यकता नाही. जो अहवाल आलेला आहे. त्यांची संचिका माझ्याकडे आहे. त्या अहवालामध्ये काही बदल होणार नाही. जी परवानगी दिली त्याचे जे कागदपत्र आहे ते आपल्याकडे आहे. त्यात काही बदल होण्याची शंका निर्माण होते असे काहीही नाही. काही अधिकारी येथून बदलून गेलेले आहे. अधिकारी बदलून गेले असले तरी चौकशी अंती दोषी ठरविल्यानंतर त्यांना शिक्षा होईल. यात शंका नाही, कार्यवाही बाबतचा अहवाल? आठवडयात सादर करतील.

श्री सुदाम सोनवणे : मेगासिटी प्रोजेक्ट बाबत तत्परता बाळगली असती तर, ८० ते ९० लाख रुपये आले असते. असे आयुक्तांनी खुलासा केलेला आहे. आता चौकशी चालू केले अहवाल मागविला, अहवाल येईल, बदल्या होतील, परंतु यात आमचे समाधान नाही. तत्कालीन आयुक्त तसेच तत्कालीन उपसंचालक नगररचना यांनी संबंधित बिल्डारांकडून मोठया रकमा घेतलेल्या आहे. आयुक्तांना मी. स्वतः आकडेवारी सुध्दा दाखविलेली आहे. या अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावी असे आमचे मत आहे. चौकशी अधिकारी म्हणून श्री सोनी यांची नियुक्ती केली खुद्द त्यांचेवरच चौकशी चालू असतांना त्यांची दुसऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासाठी नेमणूक करणे, बरोबर नाही. उपसंचालक नगररचना हे श्री. सोनी यांचेपेक्षा ज्येष्ठ अधिकारी आहे. त्यामुळे खालच्या दर्जाचे व कनिष्ठ अधिकारी यांनी वरिष्ठ अधिकारी यांची चौकशी करणे योग्य होणार नाही. त्यासाठी दुसरी चौकशी नेमावी. त्यामध्ये मा. महापौर, मा. आयुक्त सुध्दा असावे. तसेच आताच काही प्रकारणाच्या बाबतीत निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी करणार आहे. असे मा. महापौरांनी म्हटले आहे. त्याप्रमाणे याही प्रकरणांत निवृत्त न्यायाधिश किंवा वरीष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासाठी नियुक्ती करावी. वरीष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी न करता मा. आयुक्त यांनी खालचे अधिकारी क. अभियंता यांचेवार कार्यवाही करण्याची पावले उचलली आहे. ते आम्हाला मान्य नाही. केलेली कार्यवाही मागे घ्यावी व यामध्ये जे वरीष्ठ दर्जाचे अधिकारी आहे त्यांचेवर कार्यवाही व्हावी. वरीष्ठ अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाल्यास कनिष्ठ दर्जाचे अधिकाऱ्यांना धाक निर्माण होईल.

श्री अंबादास दानवे : कनिष्ठ अभियंत्यावर कार्यवाही करणे योग्य होणार नाही. वरीष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी. अशी आमची मागणी आहे.

मा. आयुक्त : या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार झाला किंवा नाही हे चौकशी अंती दिसून येईल. या प्रकल्पाला जेव्हा मंजूरी दिली. त्यावेळेचे नगररचना अधिकारी यांचे बाबतीत चौकशी करण्याबाबतचा रिपोर्ट शासनाकडे पाठविलेला आहे. त्याबद्दल आताच मी खुलासा केला. तसेच आयुक्तांवर कार्यवाही करण्याबाबतचा सुध्दा अहवाल शासनाकडे पाठविलेला असून काय निर्णय घेते. त्यावर अवलंबून आहे. दुसरा प्रश्न असा उपस्थित झाला की, या प्रकरणाचे चौकशीसाठी निवृत्त न्यायधीश यांची नेमणुक करण्यात यावी. त्या बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला आहे. त्यास मंजूरी मिळाल्यानंतर अति. शहर अभियंता श्री. सोनी यांचे कडून चौकशीचे अधिकार काढून घेण्यात येतील.

श्री प्रशांत देसरडा : प्रत्येक व्यक्ती ज्या ज्या आयुक्तांचे नांव येतात. तत्कालीन आयुक्त श्री. डुघरेकर यांनी सुध्दा एका प्रकरणात योग्य कार्यवाही केली नव्हती म्हणून, त्यांचेवर सुध्दा कार्यवाही करण्याचे स्थायी समितीने सुचविले आहे. अहवाल पाठविला की नाही, माहित नाही. यापुर्वी जे आयुक्त होते. त्यांचेवर मेगासिटी प्रॉजेक्टमध्ये भ्रष्टाचार केल्याचे आरोप होत आहे. हे सत्य की, असत्य हे चौकशी अंती समजेल परंतु आयुक्तांची बदली झाली त्यावेळी त्यांचा येथे सत्कार करण्यात आला. त्यांनी एक शेर केला होता, या प्रकरणामध्ये त्यांनी केलेला शेर असफल ठरतो. भ्रष्टाचाराला खतपाणी घातले असेच म्हणावे लागेल.

श्री स. अली सलामी : भ्रष्टाचारा संबंधीच्या काही बाबी लपविण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांच्या अंतर्गत बदल्या कराव्यात. चौकशीचा अहवाल स्थायी समिती ऐवजी सर्वसाधारण सभेत सादर करावा. त्यावर सभागृह निर्णय घेईल. चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीश यांची नियुक्ती करावी. तसा निर्णय या सभागृहाने आताच घ्यावा.

मा. महापौर : मेगासिटी प्रकरणाबाबत बऱ्याच दिवसापासून वर्तमानपत्रात बातम्या झ ाळकत आहे व हा विषय चर्चेला घेत नाही. अशा बातम्यचा सुध्दा आलेल्या आहेत. हेतुपुरस्कार चर्चा होऊ देत नाही. अशी शंका निर्माण झाली होती. परंतु आज चर्चा झालेली आहे. त्यानुसार काय कार्यवाही करायची या संबंधीची माहिती सुध्दा आयुक्तांनी सभागृहाला दिलेली आहे. ८ दिवसात अहवाल स्थायी समिती समोर सादर होऊन सभागृहाच्या निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही प्रशासन करेल.

श्री प्रशांत देसरडा : विभागीय आयुक्तांनी त्यांचे कडील केसेसची चौकशी करण्यासाठी उप जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकाऱ्यांची नियुक्ती केली त्या धरतीवर या महानगरपालिकेच्या केसेसची चौकशी करण्यासाठी निवृत्त उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करता येत असतील तर, तशी कार्यवाही व्हावी.

मा. आयुक्त : मेगासिटी प्रकल्पाच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायाधीशाची नियुक्ती करण्याकरीता प्रस्ताव नव्हता महानगरपालिकेच्या इतर केससेवेची चौकशी करण्यासाठी नियुक्ती करायची असून, आपल्याच अधिकाऱ्यांकडे चौकशी करण्याची जबाबदारी सोपविल्यास वेळ लागतो. कामाचा व्याप बघता चौकशी करण्यास वेळ लागत असल्याने, बाहेरील व्यक्तींची नेमणूक करायची आहे. निवृत्त न्यायाधीश किंवा उपजिल्हाधिकारी यापैकी कोणाची नियुक्ती केली तर त्याचे मानधन महानगरपालिकेस द्यावे लागेल.

मा. महापौर : सभागृह चर्चा होते, चर्चेच्या ओघात स. सदस्य बोलत असतांना अपमानास्पद शब्द बोलतात. त्याबाबत कोणीही मनात राग धरु नये. आपण सर्वांनीच या शहराच्या ठिकाणीसाठी प्रयत्न केले पाहिजे. मेगासिटी प्रोजेक्ट बाबतीत चर्चा होऊ देत नाही. अशी शंका होती सभागृहाची ती शंका दूर झ ाालेली आहे. सविस्तर चौकशी अहवाल सभागृहापुढे लवकरात लवकर सादर करावा.

श्री गणेश तांबे : दिनांक २०-११-२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. ८४ ठराव क्र. ५३२/२ च्या अनुषंगाने चर्चा करीत आहे. पडेगांव ते भावसिंगपुरा, पेठेनगर येथे मंजूर ले- आऊट मध्ये ४५ मीटर रस्त्याचा मोबदला न देता, काम करण्याची परवानगी देऊन या रस्त्यावर ५.५ लाख रुपयाचे खडीकरणाची काम केले. ४५ ऐवजी १५ मीटर रस्ता करावा. म्हणून प्रस्ताव आला, उद्या ४५ मीटर ऐवजी ३० मीटरचा रस्ता करावा असा प्रस्ताव येईल. रस्त्याच्या रुंदीत नेहमीच बदल करणार काय?

दिनांक २०-०६-२००१ च्या सभेत एकदा प्रस्ताव मंजूर केला त्याप्रमाणे त्या रस्त्याचे काम झाले. जी जागा रस्त्यासाठी बांधीता होते. तीचा मोबदला देण्यात आलेला नाही. तो देण्यात यावा आहे. तो रस्ता तसाच ठेवून एक वेळ ठराव पास झाल्यानंतर पुन्हा प्रस्ताव ठेवून त्यात बदल करणे बरोबर होणार नाही. दिनांक २०-११-२००१ च्या सभेतील प्रस्ताव रद्द करावा.

मा. महापौर : प्रशासनाने दिनांक २०-०६-२००१ रोजी मंजूर झालेला ठराव व मागील बैठकीत मंजूर झालेला ठराव या दोन्ही ठरावाची छाननी करुन योग्य ती कार्यवाही करावी.

श्री सुदाम सोनवणे : महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील १४ कर्मचारी खोटे प्रमाणपत्र सादर करुन फायदा घेत आहे. मागील बैठकीत याबाबतीत मी प्रश्न केला होता, आतापर्यंत प्रशासनाने काय कार्यवाही केली.

मा. महापौर : आपल्या प्रश्नाचे बाबतीत सविस्तर निवेदन मा. आयुक्त यांना द्यावे.

श्रीमती जयश्री किवळेकर : मागील बैठकीत महिला बाल कल्याण समितीच्या सदस्यांचा अभ्यास दौऱ्यांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. एका व्यक्तीला टी. ए. डी. ए. रुपये २२५/- मिळतो. प्रत्यक्ष खर्च आणि यात फार तफावत असते. त्यासाठी यात वाढ करुन चहा पाणी, जेवण, निवास यासाठी जोही खर्च होईल त्यास मंजूरी देण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी : दौऱ्यासाठी स. सदस्य, अधिकारी तसेच मा. महापौर यांचेसह सर्वांना एकाच दराने टी. ए. डी. ए. दिला जातो. सर्वांना सारखाच आहे. याव्यतिरिक्त जास्त टी. ए. डी. ए. देता येणार नाही. वर्ग-१ चे अधिकारी यांना सुध्दा हाच दर लागू आहे.

मा. महापौर : इतर महानगरपालिकेकडून माहिती घेऊन नियमाप्रमाणे खर्च देण्याची कार्यवाही व्हावी.

श्री भगवान रगडे : मागील बैठकीत सत्यम फर्टीलायझर प्रकल्पावर चर्चा झालेली होती, शहरातील जवळपास ३५० टन कचरा या प्रकल्पात जातो. हा प्रकल्प माझ्या वार्डात असून, प्रकल्प बरोबर चालत नाही. म्हणून एक कमीटी स्थापन केली. कमीटीने जो अहवाल सादर केला, त्यात स्पष्ट दिले आहे. हा प्रकल्प बंद आहे. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लगत नाही. यामुळे माझ्या वार्डात दुर्गंधी सुटते. या बाबतीत मागील बैठकीत चर्चा झाली. चौकशी करुन कार्यवाही होईल. असे आपण प्रशासनाला सुचविले होते. आता पर्यंत काय कार्यवाही केली.

मा. महापौर : २५,०००/- हजार टन कचरा उचलण्याच्या बाबतीत आपण निविदा केलेली आहे. समितीचा अहवाल प्रशासनाकडे सादर केलेला आहे. नियमाप्रमाणे कार्यवाहीचे आदेश प्रशासनाला दिलेले आहे. त्यावर प्रशासन नियमाप्रमाणे कार्यवाही करेल.

श्री भगवान रगडे : दिनांक २५-५-२००१ ला समितीने अहवाल दिला, तेव्हां पासून कचऱ्याची विल्हेवाट लागत नाही. त्यापूर्वी सुध्दा हिच परिस्थिती होती. उलट महाराष्ट्र डिस्टलरीजचे घाण पाणी आणून त्यात सोडले. त्या कंपनी मालकावर कार्यवाही केला का? प्रत्यक्षात ५ एकर करार केला परंतु संबंधित व्यक्तीच्या ताब्यात सध्या ४५ एकर जमीन आहे.

मा. महापौर : समितीने चौकशी अहवाल दिला तो प्रशासनाकडे सोपविला आहे. संबंधित मालकावर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. असा निर्णय सभागृहाने घेतला आहे. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल.

श्री रगडे भगवान : केव्हा निर्णय घेणार असा माझा प्रश्न आहे. वार्डातील जनतेला रोगराई पासून वाचवावे. या दृष्टीने कार्यवाही व्ही. कचऱ्याची योग्य विल्हेवाट न लावता, त्या कचऱ्यामध्ये पाणी आणून सोडले आहे.

मा. महापौर : प्रशासनाने लवकरात लवकर कार्यवाही करावी. विषय क्र. १ सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. :**

दिनांक २०-११-२००१ व दिनांक २७-११-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूर देण्यात येते.

**विषय क्र. ५४२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संलेको-१९९५-/२६९/मा.२/कोषा-१, दिनांक २० जानेवारी २००१ च्या शासन निर्णयानुसार, श्री म. न. सोनार यांची औरंगाबाद महानगरपालिकेत मुख्य लेखा परिक्षक या पदावर एक वर्षाकरीता, प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांना दिनांक २४-०१-२००१ रोजी मध्यान्ह पूर्व मुख्य लेखा परिक्षक या पदावर रुजू करुन घेण्यात आलेले आहे. सदर प्रतिनियुक्तीची मुदत दिनांक २३-०१-२००२ पर्यंत आहे.

श्री म. न. सोनार यांनी त्यांचे दिनांक १२-११-२००१ च्या निवेदनानुसार पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ मिळाल्यास या पदावर काम करण्याची समंती दिलेली आहे. मुदतवाढीसाठी त्यांनी त्यांचे निवेदनात मुलांचे शिक्षण त्यांची स्वतःची पदोन्नती व सन २००१-२००२ चा लेख परिक्षण अहवाल जून २००२ अखेर सादर करणे इत्यादी बाबी नमुद केल्या आहेत.

करीता, उक्त सर्व परिस्थिती विचारात घेता, श्री म. न. सोनार यांना औरंगाबाद महानगरपालिकेत मुख्य लेखा परिक्षक या पदावर दिनांक २४-०१-२००२ पासून पुढील सहा महिन्यासाठी प्रतिनियुक्तीचा कालवधी वाढवून देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद**

श्री अंबादास दानवे : श्री म. न. सोनार यांना मुख्य लेखा परिक्षक या पदावर ठेवण्यासाठी सहा महिन्याचे मुदतवाढीसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यांची मुदत २३-१-२००२ पर्यंत आहे. सहा महिन्याची मुदतवाढ प्रस्तावित आहे. या पदावर श्री म. न. सोनार यांची मुदत संपल्यानंतर त्वरीत दुसरा अधिकारी उपलब्ध होण्यासाठी आतापासूनच पाठपूरावा करण्यात यावा. सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात हरकत नाही.

मा. महापौर : स. सदस्य श्री. दानवे यांनी सूचना केल्याप्रमाणे नोंद घेण्यात यावी. हा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री म. न. सोनार यांना औरंगाबाद महानगरपालिकेत मुख्यलेखा परिक्षक या पदावर दिनांक २४-०१-२००२ पासून पुढील सहा महिन्यासाठी प्रतिनयुक्तीचा कालावधी वाढवून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मुख्यलेखा परिक्षक या पदावर श्री म. न. सोनार यांचे वाढीव मुदत संपल्यानंतर त्वरीत अधिकारी उपलब्ध होण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच पाठपुरावा करावा असे सर्वानुमते ठरले. या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४३/३ :**

सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२०/५ दिनांक १९-९-९८ नुसार शासकीय वस्तीगृहात प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांना १ किंवा २ टक्के कमी गुण मिळाल्यामुळे प्रवेश नाकारण्यात येतो. अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी. या उदात्त हेतुने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय विद्यीर्थी वस्तीगृह चालविण्यांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

वस्तीगृह चालविण्यावर दरवर्षी रु. ५.५० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर वस्तीगृह विभागीय समाज कल्याण अधिकारी यांनी भाडे तत्वावर चालविण्यासाठी मागणी केली आहे. समाज कल्याण खात्यातर्फे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

सार्वजनिक बांधकाम खाते ज्या दराने भाडे ठरविल, त्या भाडे तत्वावर समाज कल्याण खात्याने भाडे देण्याची संमती दर्शविलेली आहे. सदरील भाडेपट्टा ११ (अकारा) महिन्यासाठी राहील व पुढे वेळोवेळी नियमाप्रमाणे त्यात नुतनीकरण करण्यात येईल. भाडे पट्टयावर देण्याच्या अटी व शर्ती स्वतंत्र तयार करण्यात येतील. सबब प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री पंडागळे रतनकुमार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वप्न पुर्तीसाठी अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह चालविण्याच्या निर्णय आपण घेतलेला आहे. या शहरातील आम नागरिकांच्या पाल्याच्या फायद्यासाठी महानगरपालिकेचा जो उद्देश होता. तो साध्य होण्यासाठी हे वस्तीगृह केलेले आहे. मी विनंती करेन की, हा प्रस्ताव रद्द करुन प्रशासनाच्या माध्यमातून वस्तीगृह चालवावे. त्यातून या वस्तीगृहासाठी खर्च करावा. नियमावली प्रमाणे कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : प्रकल्प संचालक यांनी खुलासा करावा.

प्रकल्प संचालक : मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह करण्याबाबत दिनांक १९-९-१९९९ ला प्रस्ताव पारीत करुन वस्तीगृह केले. या वस्तीगृहात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो व प्रवेश देतांना गुणवत्तेचा विचार करुन प्रवेश दिला जावा असा निर्णय झाल्यानुसार कार्यवाही होते. आता इमारत तयार केलेली असून दरम्यानच्या काळात समाज कल्याण अधिकारी यांचेकडून महानगरपालिकेकडे एक प्रस्ताव सादर करण्यात आला की, गुणवत्तेनुसारच या वस्तीगृहात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल व समाजकल्याण खात्याकडे हे वस्तीगृह दिल्यास नियमाप्रमाणे महानगरपालिकेस भाडे सुध्दा देण्यात येईल, असे म्हटले. हे वस्तीगृह चालविण्यासाठी महानगरपालिकेस दरवर्षी साधारणतः ५.५० लाख रुपये खर्च येणार आहे. हा खर्च येऊ नये. या उद्देशाने हा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

श्री पंडागळे रतनकुमार : ज्या उद्देशासाठी हे वस्तीगृह उभारण्यात आले तो दृष्टीकोन समोर ठेवून ठराव पास केला, त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. वस्तीगृहा संबंधीची जी नियमावली तयार केली. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. हा प्रस्ताव रद्द करावा महानगरपालिके मार्फत हे वस्तीगृह चालवावे असे माझे मत आहे. इमारत पूर्ण झाली तर विद्यार्थ्यांचे अर्ज का मागविले नाही. आपला उद्देश साध्य करावा.

श्री नंदकुमार घोडेले : वस्तीगृह चालविण्याचा उद्देश काय होता. तो उद्देश आणि नियमावली याप्रमाणे कार्यवाही व्हावी. समाज कल्याण खाते व महानगरपालिकेच्या नियमावलीत तफावत आहे. वस्तीगृह देण्यात येऊ नये.

प्रकल्प संचालक : विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी जाहीरात देऊन अर्ज मागविले आहेत. मुलाखती सुध्दा घेतलेल्या आहेत. या वस्तीगृहासाठी येणारा वार्षिक खर्च ५.५० लाख होणार त्या शिवाय कर्मचारी नियुक्त करावे लागतील. त्यांचेवरील खर्च हा वेगळा येईल.

मा. महापौर : मोठा प्रोजेक्ट आपण आमंलात आणला चालविण्यात काय अडचण आहे, किती वर्ष झाले, हे वस्तीगृह चालू का केले नाही.

प्रकल्प संचालक : मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा, या उद्देशासाठी महानगरपालिकेने हे वस्तीगृह बांधले आहे. तोच उद्देश समाज कल्याण खात्याचा राहील हे वस्तीगृह बांधून दोन वर्ष पूर्ण झाली. दरम्यानच्या काळाता वीज / पाणी यांची व्यवस्था नव्हती. यावर्षी विजेची व पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानुसार जाहीरात देऊन विद्यार्थ्यांचे अर्ज मागविले. मुलाखती सुध्दा झालेल्या आहेत.

श्री अविनाश कुमावत : महानगरपालिकेने तयार केलेल्या नियमाप्रमाणे वस्तीगृह चालवावे.

मा. महापौर : सदर वस्तीगृह हे महानगरपालिकेच्या माध्यमातून चालविण्यात यावे. यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह समाज कल्याण विभागास भाडेपट्टयावर देण्याऐवजी वस्तीगृहाच्या नियमाप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेमार्फतच चालविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४४/४ :**

मा. आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दलित वस्ती सुधारण योजना समाज कल्याण विभागाकडून राबविण्यात येत असून, या योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजेन मधून तरतुद उपलब्ध होणार आहे. सदरील योजना १००% टक्के शासन अनुदानीत आहे.

या योजने अंतर्गत रस्ते, पोच रस्ते, नाली बांधकाम, विहिरी दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची वितरण व्यवस्था, रस्त्यावरील विजेचे दिवे, बालवाडी, बगीचे समाज मंदिर, वाचानालय, दवाखाने सांस्कृतिक केंद्र, दुकाने सार्वजनिक पाणी पुरवठा, सार्वजनिक सेप्टीक टँक, नाल्याची शिस्तीकरण करणे अशी कामे हाती घेता येतील.

अंदाजपत्रके (प्रस्ताव) नगररचना विभागाची संमती घेवून शासनास पाठवावयाचे आहेत. सदरील कामे ज्या जमिनीवर घ्यावयाची आहे ती जमीन नगरपालिकेच्या ताब्यत असलेल्या जागेवर हाती घेण्यास येतील. या योजने अंतर्गत निधी हा उप-संचालक नगररचना यांचेकडे शासनामार्फत संपूर्ण करण्यात येईल व निधी महानगरपालिकेच्या खात्यास जमा करण्यात येवून होणाऱ्या खर्चाप्रमाणे शासनाचे विहित पध्दतीप्रमाणे खर्च करण्यात येईल.

वरील प्रस्ताव शासनास पाठविण्यासाठी सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक असून, सर्वसाधारण सभेच्या मंजूरी नंतर प्रस्ताव शासनास पाठविण्यात येईल. सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे काम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. करीता, रु. १०९,९७ लाखाचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**दलित वस्ती योजना २००१ - २००२ अंतर्गत प्रस्तावित कामाची यादी**

| अ. क्र. | कामाचे नांव | अ. प. रक्कम रु. लाखात |
|---|---|---|
| १ | मसनतपुर (स्लम) येथे दगडी गटारीवरव स्लॅब टाकणे | ५.०० |
| २ | रोजेबाग (स्लम) येथे मुख्य दगडी गटार बांधणे | २.०० |
| ३ | आंबेडकर नगर (स्लम) येथे मुख्य दगडी गटार बांधणे | २५.०० |
| ४ | नारेगांव (स्लम) येथे नाला संरक्षित भिंत बांधणे | १०.०० |
| ५ | भिमनगर भावसिंगपुरा (स्लम) येथे पुल बांधणे व खडी रस्ते तयार करणे. | ८.०० |
| ६ | हर्षनगर (स्लम) येथे कॉँक्रीट रस्ते तयार करणे | ७.०० |
| ७ | हर्षनगर (स्लम) येथे सार्वजनिक विहिरीवरुन पाणी वितरण व्यवस्था तयार करणे. | १५.०० |
| ८ | भिमनगर भावसिंगपुरा (स्लम) येथील फुलाचे रुंदीकरण करणे. | २०.०० |
| ९ | हर्षनगर (स्लम) येथे सुलभ शौचालय तयार करावे. | ७.०० |
| १० | फुलेनगर उस्मानपुरा (स्लम) येथे अर्धागोलाकार गटार बांधणे. | २.०० |
| ११ | स्टेशन हमालवाडा (स्लम) येथे सार्वजनिक शौचालय बांधणे. | २.०० |
| १२ | चौसर नगर येथे गटार बांधणे | १.१० |
| १३ | पडेगांव (स्लम) येथे आर. सी. सी. पुल तयार करणे. | ५.०० |
| १४ | मो. गांधीनगर (स्लम) येथे उर्वरित भागात कॉक्रींट तयार करणे. | ०.८७ |
| | **एकूण रुपये** | **१०९.९७ लाख** |

**संवाद :**

श्री रतनकुमार पंडागळे : दलित वस्त्यामध्ये विकास कामे होण्या संदर्भात हा प्रस्ताव आहे, माझ्या माहितीप्रमाणे ज्या ठिकाणी दलीत वस्ती नसतांना त्या भागात ३१.८० लाख रुपये खर्च झालेला आहे. हा इतर कोण कोणत्या वस्त्यामध्ये खर्च केला. जेथे दलीत वस्ती नाही, तेथे खर्च केला. यास जबाबदार कोण चौकशी करावी.

श्रीमती लीलावती घायातिलक : संजयनगर भाग वगळून मागील वर्षी या योजनेतून काम केले आहे.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : दलित वस्ती सुधारणा समाज कल्याण खात्याकडून राबविल्या जाते. या योजनेचा विचार करता माझ्या वार्डात दलित वस्ती जास्त असून ४ हजार रुपयापर्यंतचे खर्चाचे मुरुम टाकण्याची कार्यवाही होत नाही. वार्डात लाईटची कार्यवाही सुध्दा होत नाही.

प्र. कार्यकारी अभियंता (स्लम) : दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत या अगोदर सर्व विकास कामे दलित वस्त्यामध्ये करण्यात आलेली आहे. यामध्ये राहुलनगर, मसनतपुर, रेगटीपूरा, शताब्दीनगर, क्रांतीनगर, फुलेनगर, भीमनगर घाटी, या भागात विकास कामे करण्यात आलेली आहे.

श्री जयवंत ओक : आताच ज्या वसाहतींचे नांवे सभागृहात सांगण्यात आली त्या सर्व वस्त्या स्लम घोषीत आहेत का? दलित वस्ती म्हणतात, स्लम ही म्हणतात.

प्र. कार्यकारी अभियंता (स्लम) : ज्या ठिकाणी ५०% पेक्षा जास्त दलित राहतात. व जे वार्ड राखीव आहे, अशाच वार्डात योजनेतून कामे होत आहे.

श्री कावडे साहेबराव : चिकलठाणा वार्ड क्र. ९ मध्ये १००% दलित वस्ती या भागात कामे करण्याबाबत प्रस्तावात नोंद झालेली नाही.

श्री जयवंत ओक : माझा वार्ड तसेच मुकूंदवाडी, पंचशीलनगर, उपमहापौर यांच्या वार्डाचा समावेश करावा.

श्री पंडागळे रतनकुमार : बऱ्याच वार्डात ५०% दलित वस्ती आहे. त्या वाडाचा सुध्दा या योजनेत समावेश करावा.

मा. आयुक्त : प्रस्तावात जी नांवे दिली त्यास शासनाने मंजूर दिली आहे, शासनाचे पत्र आपल्याकडे आहे. ज्या वसाहती सुटल्या असतील त्याचा सर्व्हे करुन कार्यवाही होईल.

मा. महापौर : नियमानुसार जे वार्ड या योजनेतून सुटले असतील, त्या वार्डात सुध्दा विकास काम करण्याबाबत अदांजपत्रक करावे व येणाऱ्या सभेत ठेवावे. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत औरंगाबाद शहरातील महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या जागेवर प्रस्तावातील अ. क्र. १ ते १४ पर्यंतची कामे हाती घेण्यासाठी रक्कम रु. १०९.९७ लाखाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

याशिवाय प्रस्तावातील कामा व्यतिरिक्त नियमप्रमाणे ज्या वार्डात या योजनेनुसार कामे हाती घेता येऊ शकतील, अशा वार्डातील विकास कामे हाती घेण्याबाबतचा सर्व्हे करुन त्या बाबतचे अंदाजपत्रक पुढील सभेत ठेवण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४५/५ :**

मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे पत्र क्रमांक १३६१ दिनांक २९-११-२००१ अन्वये कळविले आहे की,

१) रेल्वे स्टेशन ते दिल्ली गेट रस्ता सुधारणा करणे.

२) चेलीपुरा-चंपा, मस्जीद-जळगांव रोड रस्ता सुधारणा करणे.

या दोन्ही कामासाठी निविदा मागविल्या असून सदरील रस्ते हे महानगरपालिकेच्या अखत्यारील असल्याने सदरील रस्त्याची सुधारणा करण्यासाठी महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र ( नो ऑब्जेक्शन सर्टफिकेट्स ) देण्यात यावे.

वरील दोन्ही कामा व्यतिरिक्त आणखी खालील दर्शविलेली कामे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ त्यांच्या मार्फत करण्यात येणार आहेत.

१) वरद गणेश मंदिर ते लक्ष्मण चावडी रस्ता सुधारणा करणे.
२) हॉटेल अमरप्रित ते बीड बायपास रस्ता सुधारणा करणे.
३) नागेश्वरवाडी येथे सारस्वत बँक समोरील नाल्यावर पुल बांधणे व टी पॉईंटची सुधारण करणे.
४) महावीर चौक येथे उड्डाण पुल बांधणे.
५) महानगरपालिका कार्यालयासमोर मौलाना आझाद विद्यालयाच्या मागील रस्त्यावर सबवे बांधणे.
६) मुख्य बसस्थानाकासमोर सबवे बांधणे.
७) संग्रामनगर चौकाजवळ रेल्वे ओलांडणी पुल बांधणे.
८) क्रांतीचौक येथे उड्डाण पुल बांधणे.

मुख्य अभियंता यांनी वरील संदर्भिय पत्रान्वये फक्त वरील दर्शविलेल्या दोनच कामाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देणे बाबतची मागणी केलेली आहे.

तरी त्याऐवजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना महापालिका हद्दीत जी वरील दर्शविल्याप्रमाणे कामे करावयाची आहेत. त्या सर्व कामाकरीता, ना हरकत प्रमाणपत्र ( नो ऑब्जेक्शन सर्टीफिकेट ) देणे करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री नंदकुमार घोडेले : सार्वजनिक बांधकाम खात्याने महापालिकेकडे वारंवार पत्रव्यवहार करुन ही रेल्वेस्टेशन येथील उड्डाण पुलाचे हस्तांतर महापालिकेकडे केले नाही. पुलावर रस्त्याचा दोन्ही बाजूला खड्डे पडलेली आहे. लाईट बंद आहे. दुरुस्त करता येत नाही. प्रक्रिया कुठपर्यंत आहे.

अति. शहर अभियंता : या पुलाचे मजबुतीकरण करण्यात आले. विदयुतीकरणाचे काम महापालिकेने केले. अदयाप हस्तांतरण केले नाही. आता जोपर्यंत हस्तांतर होणार नाही. तोपर्यंत लाईट व इतर दुरुस्तीचे काम महापालिका करणार नाही. असे संबंधित विभागाला कळविण्यात आलेले आहे.

मा. महापौर : रेल्वेस्टेशन उड्डाण पुलांचे लवकरात लवकर हस्तांतर करुन घेण्यात यावे. या पुलाचे देखभाल दुरुस्तीचे काम महापालिका करु शकते.

श्री प्रशांत देसरडा : रस्ते विकास महामंडळ शहरात काही योजना राबवितात मागे सुध्दा एक प्रस्ताव ना हरकत प्रमाणपत्रासाठी सादर झालेला होता. सिडको विभागाने जागा विकल्या, जागेवर विकास केला, नंतर विकास योजनेसाठी ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव आला. आता सुध्दा रस्ते विकास महामंडाळा मार्फत होणाऱ्या कामाचे टेंडर निघाले आणि नाहरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर केला, रस्ते विकास महामंडाळाने त्यावेळी महापालिकेस जी वागणूक दिली ती अपमानास्पद आहे. त्यावेळेचे महापौर यांना कार्यक्रमात बोलू दिले नव्हते. यासाठी या विभागाला ताकीत देऊन कळविण्यात यावे का? कार्यक्रम होतील त्यामध्ये या महापालिकेचे महापौर आयुक्त यांना सन्मानाची वागणूक दयावी नसता, या विभागाला ना हरकत प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही.

मा. महापौर : रस्ते विकास महामंडळ विभागामार्फत होणाऱ्या कामोच खर्चात महापालिकेचपा सहभाग आहे. शहरात जी जी कामे होतील त्या त्यावेळी कार्यक्रमामध्ये महापौर स्थायी समिती सभापती, पदाधिकारी यांना सन्मानाची वागणुक मिळेल. प्रशासनाने तशी कार्यवाही करावी. कोणत्या ही

पदाधिकाऱ्यांचा अपमान होणार नाही. याची काळजी घ्यावी. विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडाळाकडील पत्र क्र. १३६१ दिनांक २९-११-२००१ मध्ये नमुद केलेल्या प्रस्तावातील अ. क्र. १ ते २ आणि या व्यतिरिक्त रस्ते विकास महामंडळामार्फत महापालिका हद्दीत करावयाच्या अ. क्र. १ ते ८ कामासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४६/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पासूस/२०००/प्र.क्र. २३/का. १४७४ (२) मंत्रालय मुंबई दिनांक २३-२-२००१ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेने प्रत्येक वर्षी १.५० कोटी प्रमाणे तीन (३) वर्षात रु. ४.५० कोटी रस्ते विकास महामंडळास उपलब्ध करुन देणे संदर्भात निर्णय घेतलेला असून, सदरचा शासन निर्णयानुसार महानगरपालिकेने सन २००१-२००२ या आर्थिक वर्षापासून रु. १.५० कोटी प्रती वर्ष देण्यास्तव प्रस्ताव ४९७/३ दि. २०-१०-२००१ च्या अन्वये मा. सर्वसाधारण सभेने पारीत केलेला आहे.

तथापि औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन २००१-२००२ च्या अर्थसंकल्पात रस्ते विकास महामंडाळास रु. १.५० कोटी देणे बाबत तरतुद उपलब्ध नाही. करीता, सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात स. नगरसेवक यांच्या स्वेच्छ निधीतून प्रत्येकी रु. १.०० लाख रस्ते विकास महामंडळास देणे करीता, वळती करण्याबाबत तसेच ज्या स. नगरसेवकांच्या खाती स्वेच्छा निधी उपलब्ध नाही. अशा स. नगरसेवकांच्या पुढील वर्षाचा स्वेच्छा निधीतून रक्कम रुपये १.०० लाख कपात करण्याबाबत विषय विचारार्थ व मान्यतेस्तव.

**संवाद :**

श्री अविनाश कुमावत : नगरसेवक स्वेच्छा निधी देण्यात आमचा विरोध आहे.

श्री लिलावती घायतिलक : वार्डात सुशोभिकरण होईपर्यंत आम्ही आमचा स्वेच्छानिधी देणार नाही.

श्री नंदकुमार घोडेले : प्रस्ताव रद्द करावा. ज्यांची इच्छा आहे. त्यांचा घेण्यात यावा.

सौ. रुख्मणी शिंदे : अनाधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे करण्याचा प्रस्ताव मंजूर करणार होते. अदयाप कार्यवाही नाही. मी सुध्दा माझ्या स्वेच्छा निधी देणार नाही.

मुख्यलेखाधिकारी : मागील सर्वसाधारण सभेत रस्ते विकास महामंडळास महापालिकेने प्रति वर्षी १.५० कोटी असे ४.५० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याबाबत ठराव पारित केला. या संबंधीची कोणतीही तरतुद अर्थसंकल्पात केलेली नाही. तसेच महापालिर्केच्या आर्थिक परिस्थिती बाबत प्रशासनाने तसा प्रस्ताव सभागृहाच्या माहितीस्तव ठेवलेला होता. चालू आर्थिक वर्षात ३० ते ३५ कोटी रुपये तुट निर्माण होणार आहे. रस्ते विकास मंडळाने २ पत्र देऊन मार्च २००२ पर्यंत निधी पाठविण्याबाबत कळविले आहे. त्या विभागाने कामाचे नियोजन करुन कामाची सुरुवात केलेली असून, पैशाची आवश्यकता आहे. इतर लेखा शिर्षामध्ये रक्कम शिल्लक नाही. म्हणून नगरसेवकाचा निधी उपलब्ध करुन देण्यास्तव प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री अविनाश कुमावत : वार्डात कामे करता येत नाही, कामे होत नाही. आम्ही आमचा निधी देणार नाही.

श्री गणेश तांबे, श्री नंदकुमार घोडेले, श्री प्रकाश निकाळजे : १ लक्ष ऐवजी प्रत्येकी ५० हजार चालू वर्षाच्या निधीतून देण्यात यावे.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : प्रत्येकाच्या निधीतून २५,०००/- हजार रुपये देण्यात यावे.

श्री भगवान रगडे : प्रत्येकाच्या निधीतून ५०,०००/- हजार देण्यात यावे.

मा. महापौर : प्रत्येक स. सदस्यांच्या या वर्षाच्या स्वेच्छा निधीतून रु. ५०,०००/- हजार व ज्या स. सदस्यांचा निधी शिल्लक नसेल, त्या सन्माननीय सदस्यांच्या पुढील वर्षाच्या स्वेच्दा निधीतून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

श्री जयवंत ओक : महानगरपालिकेकडे पैसा नाही, सन्माननीय सदस्यांच्या निधी देण्यात येत आहे. खेदाची बाब आहे. जे सदस्य ५०,०००/- निधी देतील व या निधीतून जेथे काम होईल तेथे एक बोर्ड तयार करुन त्या बोर्डवर त्या सन्माननीय सदस्यांची नांवे दयावी. जेणे करुन जनतेला सुध्दा समजेल.

**ठराव :**

प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दि. २३-२-२००१ च्या शासन निर्णयाप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेने रस्ते विकास महामंडाळास प्रत्येक वर्षी १.५० कोटी याप्रमाणे तीन वर्षात ४.५० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याच्या निर्णया अन्वये सन २००१-२००२ या आर्थिक वर्षातील १.५० ची रक्कम रस्ते विकास महामंडळाकडे जमा करण्यासाठी प्रत्येक स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून रु. ५०,०००/- याप्रमाणे आणि ज्या स. नगरसेवकांचा स्वेच्छा निधी शिल्लक नसेल, अशा सन्माननीय नगरसेवकांचे पुढील वर्षाचे स्वेच्छा निधीतून रक्कम वळती करुन घेण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र. ५४७/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संजयनगर मुकूंदवाडी वार्ड क्र. १२ येथील नविनच बांधण्यात आलेल्या उद्यानस डॉ. बाबासाहेब आंबेडकर बाल उद्यान महानगरपालिका औरंगाबाद असे नांव देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ. लीलावती बाळासाहेब घायातिलक
अनुमोदक : श्रीमती जयश्री किवळेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर मुकूंदवाडी वार्ड क्र.१२ येथील नविनच बांधण्यात आलेल्या उद्यानास डॉ. बाबासाहेब आंबेडकर बाल उद्यान महानगरपालिका औरंगाबाद असे नांव देण्यास सर्वानुंमते देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४८/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पदमश्री लायन डॉ. शरदकुमार दिक्षित हे एक अत्यंत कुशल व प्रसिध्द असे प्लास्टीक सर्जन आहेत. त्यांनी संपूर्ण भारत देशातील मुलांना आपली सेवा देवून त्यांच्या मधील शारीरीक व्यंग दुर करण्याची कामगिरी केलेली आहे. आपल्या या शहरात त्यांनी एकूण पंचविस (२५) शिबिर घेवून जवळपास चौदा पंधरा हजार

बालकांचे ऑपरेशद्वारे शारीरीक व्यंग दुर केले आहे. अशा या थोर सामाजिक कार्यकर्त्याने या शहरातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील बालकांची सेवा करुन जे योगदान दिले आहे. त्यांचे काही अशी उतराई होण्यासाठी व त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल ऋण व्यक्त करण्यासाठी त्रिमुर्ती चौक जवाहर कॉलनी ते आकाशवाणी चौक रस्त्याचे पद्मश्री लॉयन डॉ. शरदकुार दिक्षित मार्ग असे नामकरण करण्यात यावे. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सूचक : १) श्रीमती डॉ. आशा बिनवडे,
२) श्री. डॉ. भागवत कराड,
३) श्री. प्रशांत देसरडा
अनुमोदक : श्री. राजु रामराव शिंदे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे त्रिमुर्ती चौक जवाहर कॉलनी ते आकाशवाणी चौक रस्त्याचे पद्मश्री, लॉयन डॉ. शरदकुमार दिक्षित मार्ग असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४९/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शास्त्रीनगर येथील नागरिकांच्या अग्रहास्तव व जुन्या मागणीनुसार कै. मेहरसिंग नाईक चौक, डॉ. हेडगेवार रुग्णालयाजवळ ते डिव्ही आयआयटी चौक या शास्त्रीनगरमधून जाणाऱ्या मार्गाचे "स्व. लालबहादूर शास्त्री" मार्ग असे नामकरण करण्यात यावे. करीता, प्रस्ताव सर्वानुमते मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्रीमती डॉ. आशा बिनवडे
अनुमोदक : १) सौ. जयश्री कुलकर्णी
२) श्रीमती जयश्री किवळेकर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कै. मेहरसिंग नाईक चौक, डॉ, हेडगेवार रुग्णालयाजवळ ते डिव्ही आयआयटी चौक, या शास्त्रीनगरमधून जाणाऱ्या रस्त्याचे "स्व. लालबहादूर शास्त्री" मार्ग असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूर देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५०/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. तुकाराम नानाभऊ वैध (बंडू वैद्य) हे एक सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचे अपघातामुळे आकस्मिक निधन झाले. त्यांची आठवण म्हणून क्रांतीचौक पोलिक स्टेशन समोरिल चौकास बंडू वैद्य असे नांवे द्यावे. करीता, प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक : अ) श्री. डॉ. भागवत कराड,
ब) श्री भाऊसाहेब ताठे,
क) श्री. भगवान घडामोडे.
अनुमोदक : इ) श्री. प्रशांत देसरडा, ड) श्री. राजु शिंदे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक पोलीस स्टेशन समोरील चौकास स्व. तुकाराम नानाभाऊ वैद्य (बंडू वैद्य) असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५०/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी सेवा भरती नियमानुसार महानगरपालिका अस्थापनेवरील मुख्य लेखा परिक्षक हे पद भरणे बाबत विहीत पध्दती नमुद केलेली आहे.

महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून, महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नतीच्या कमी संधी उपलब्ध आहेत. तसेच वर्ग-१ संवर्गातील बऱ्याचशा पदांना पदोन्नती करीता कनिष्ठ पदाच्या किमान तीन वर्ष अनुभव नमुद केला आहे. तथापि, मुख्य लेखा परिक्षक या पदास पदोन्नती करीता, ७ वर्षाचा अनुभव प्रस्तावित केलेला आहे. या ऐवजी इतर पदाप्रमाणे मुख्य लेखा परिक्षक या पदास अनुभवाची अट नमुद करणे आवश्यक आहे. यापूर्वी उपआयुक्त, कार्यकारी अभियंता अर्हतेमध्ये या सभागृहाने बदल मंजूर केलेला आहे. त्याच धर्तीवर मुख्य लेखा परिक्षक या पदास सात ऐवजी कनिष्ठ पदाचा ५ वर्षाचा अनुभव असाव. अशी दुरुस्ती सेवाभरती नियमात करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सूचक : श्री संजय शिरसाठ
अनुमोदक : श्री किशोर तुलसीबागवाले.

**संवाद :**

श्री प्रशांत देसरडा : या प्रस्तावा संबंधी प्रशासनाचे मत घ्यावे. नियमावलीत बदल करता येतो का?

डॉ. आशा बिनवडे : ७ वर्षावरुन ५ वर्षाची अनुभवाची अट ठेवावी. असा प्रस्ताव आहे. २ वर्षा कशासाठी कमी करीत आहे. माझ्या माहितीप्रमाणे एका विशिष्ट व्यक्तीसाठी ही कार्यवाही होत आहे असे वाटते. उलट अनुभव जास्त असावयास पाहिजे.

श्री संजय शिरसाठ : यापूर्वीही अनुभवाची १० वर्ष ऐवजी ७ वर्ष अट शिथिल करण्यात येऊन पदोन्नती देण्यात आलेल्या आहे. आपले कर्मचारी सतत एकाच ठिकाणी काम करतात. पदोन्नतीची संधी मिळावयास पाहिजे. त्यामुळे अंकुश राहील. प्रस्ताव मंजूर करावा.

श्री प्रशांत देसरडा, डॉ. आशा बिनवडे : या प्रस्तावास माझा विरोध आहे. मंजूर करु नये.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. मा. आयुक्तांनी शासनाकडे पाठविण्याची नियमाने कार्यवाही करावी. या प्रस्तावास याच सभेत स्विकृतीसह मंजूर देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी सेवा भरती नियमानुसार महानगरपालिका आस्थापनेवरील मुख्य लेखा परिक्षक हे पद पदोन्नतीने भरण्याकरीता विहित करण्यात आलेल्या अनुभवाच्या अटीमध्ये "मुख्य लेखा परिक्षक या पदास सात वर्षा ऐवजी कनिष्ठ पदाचा पाच वर्षाचा अनुभव असावा." अशी दुरुस्ती सेवा भरती नियमामध्ये करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. नियमानुसार पुढील कार्यवाही

करुन शासनास प्रस्ताव पाठविण्यात अधिकारी आयुक्तांना देण्यात येतात. या प्रस्तावास याच सभेत स्विकृत्ती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ५५२/१ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सरण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बहुतांशी नागरिक पाणी पुरवठयाच्या वेळेस नळांना विद्युत मोटारी लावतात. त्यामुळे पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असून, बऱ्याच नागरिकांना पाणी पुरवठा कमी प्रमाणात होत आहे. हयासाठी शहरातील दैनिक वर्तमान पत्रात जाहिर प्रगटन प्रसिध्दीस देण्यात येवून जे नागरिक नळांना विद्युत मोटारी लावतात. त्या मोटारी दिनांक १८-१२-२००१ पर्यंत काढून टाकाव्यात असे. नागरिकांना आव्हान करण्यात आलेला आहे. त्यानंतर दिनांक २०-१२-२००१ पासून प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे / तपासणी साठीचे काम हाती घेण्यात येणार आहे. सर्वेक्षणाच्या वेळी ज्या नागरिकांनी नळांना विद्युत मोटारी लावलेल्या आढळतील अशा नागरिकांना त्याच क्षणी रु. ५,०००/- ( रुपये पाच हजार फक्त ) दंड आकारण्यात येईल. तसेच मोटारी जप्ती करण्यात येईल. त्यास मान्यता मिळाण्यात यावी. करीता, प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री काशीनाथ कोकाटे : नियमाने अशी कार्यवाही करता येते का, याचा विचार व्हावा. पाणी येत नाही असे जनता सुध्दा मत मांडेल.

श्री फुलारी नंदकुमार : पाणी प्रश्न सोडवावा भरपूर पाणी दिल्यास नागरिकांना विदयुत मोटार लावण्याचा गरज पडणार नाही. त्यासाठी पाणी जास्त प्रमाणात दयावे. त्यानंतर कुणी मोटारी लावत असतील तर, २००/- दंड आकारावा.

श्री काशीनाथ कोकाटे : हा प्रस्ताव सभागृहाचा होऊ शकत नाही. पाण्याचे नियोजन करुन पाणी पुरवठा सुरळीत करावा. त्यानंतर असा प्रस्ताव ठेवणे योग्य होईल.

श्री प्रशांत देसरडा : विद्युत मोटार लावल्यानंतर ज्याच्यांकडे मोटार नाही. त्यांना पाणी जात नाही, म्हणून जे मोटारी लावतील त्यांचेवर ५००/- दंड आकारणी करावी. जेणे करुन मोटार लावण्याचे प्रमाणे कमी होईल.

श्री साहेबराव कावडे : ठराव मंजूर करावा. मोटारी लावण्याचे प्रमाण कमी होईल. सर्वांना पाणी मिळेल. पाणी पुरवठयात कशी वाढ करता येईल. त्या संबंधीची प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री जयवंत ओक : प्रस्तावास विरोध नाही. अंमलबजावणी केव्हा करणार आहे. परंतु, त्या अगोदर जनतेला ४५ मिनिटे किंवा १ तास पाणी देण्यात कार्यवाही व्हावी. त्यानंतर वार्डात सर्व्हे करावा व या प्रस्तावा नुसार कार्यवाही करावा.

श्री प्रशांत निकाळजे : पाणी कमी प्रमाणात मिळते म्हणून, सर्वांनी मोटारी लावून पाणी घेणे बरोबर होणार नाही. कारण सर्वसामान्य गरीब जनतेला मोटारी लावल्यामुळे पाणी मिळत नाही. त्याचा सुध्दा विचार व्हावा. पाणी पुरवठा वाढवावा. दंडाची आकारणी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे होऊ नये, कमी करण्यात यावे, जनतेला जाहीर आव्हान करुन, या संबंधीची माहिती करवावी. ५०००/- रु. ऐवजी २०००/- रु. करावे. असे माझे मत आहे किंवा सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन ५००/- करावे.

श्री नंदकुमार फुलारी : अगोदर मुबलक पाणी दयावे.

डॉ. आशा बिनवडे : सभागृहाला ऐनवेळी प्रस्ताव सादर केला. सर्वसामान्य नागरिकांना भिती निर्माण झाली. ज्या दाबाने पाणी दयावे. त्या दाबाने पाणी येत नाही. तसेच किती वेळ पाणी देणार याचा सुध्दा खुलासा व्हावी. पाणी कमी येते, म्हणून लोक मोटारी लावून पाणी घेतात. पाणी मुबलक घ्यावे. मोटारी लावण्याची गरज पडणार नाही. यानंतर प्रस्तावाची अंमलबजावणी व्हावी.

श्री किशोर तुळशीबागवाले : १ तारखेपासून दंड आकारणी करावी.

मा. महापौर : जे नागरिक विद्युत मोटारी लावून पाणी घेतील, त्यांना ५००/- दंडाची आकारणी येत्या १ तारखेपासून करण्यात यावी.

**ठराव क्र. ५५२/१ :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पाणी पुरवठयाच्या वेळी बहुतांश नागरिक नळांना विद्युत मोटार लाऊन पाणी घेत असल्याने वितरण व्यवस्थेवर होणारा विपरीत परिणाम टाळण्यासाठी यांच्या १ तारखेपासून नागरिकांनी नळाला विद्युत मोटार लावल्याचे निर्दशनास आल्या. त्याच क्षणी रु. ५०००/- ऐवजी रु. ५००/- या प्रमाणे दंड आकारण्यास व मोटार जप्त करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५३/२ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, वेदांतनगर ते पदमपुरा पर्यंत ३०० मी. मी. व्यासाची ए. सी. व बन्सीलालनगर पद्मपुरा भागात १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २०००-२००१ च्या दरसूची नुसार रक्कम रु. २८,२५,५०० = ०० एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा सन २००१-२००२ मध्ये प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदानातून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. २८,२५,५०० = ०० चे विचारार्थ व निर्णयास्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री. नंदकुमार फुलारी : माझ्या वार्डात डॉ. कराड महापौर असतांना एक पाण्याची लाईन टाकण्यास मंजूरी दिली. अदयाप कार्यवाही केली नाही. जेथे पाण्याची आवश्यकता आहे. तेथे कार्यवाही होत नाही. अधिकारी जाणूनबुजून असे करतात का?

श्री जगदीश सिध्द : गांधी चौक ते श्रीमंत गल्ली पर्यंत पाण्याची पाईप लाईन टाकण्याचा संचिकेस नामंजूर केले. पाणी कोठून आणायचे असे शेरे येतात. या प्रस्तावास आमचा विरोध नाही. परंतु आमच्या वार्डातील प्रस्तावास बाबत वेगवेगळया अडचणी दाखविल्या जातात. आपल्या वार्डाचा प्रस्ताव आहे. म्हणून मंजूर होती आहे का? येथे ठाराविक वार्डात कामे होत आहे. असे वाटते, अधिकारी सदस्यांमध्ये भांडणे लावण्याचे काम करतात. त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे, माझ्या वार्डातील काम का बंद ठेवले खुलासा करावा.

श्री स. अली सलामी : ६ लाखाचे काम होते. बजेट नाही, म्हणून पडून आहे. एकदम २८ लाखाचा प्रस्ताव मंजूरीसाठी आणला पैसा कोठून आणणार खुलासा दयावा.

मा. महापौर : हा प्रस्ताव स. सदस्या सौ. कांबळेताई यांचे वार्डात पाणी नेण्याबाबत हा प्रस्ताव आहे. माझ्या वार्डातील जनतेला या प्रस्तावानुसार काही फायदा नाही, हा विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ५५३/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांतनगर ते पदमपुरा पर्यंत ३०० व्यासाची एसी व बन्सीलालनगर, पद्मपुरा भागात १५० मी. मी. व्यासाची एसी जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. २८,२५,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च २००१-२००२ मध्ये प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदानातून करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५४/३ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, सर्व साधारण सभा दि. २०-११-२००१ रोजी ऐनवेळेचा ठराव क्र. ५३४/२ यामध्ये खालील सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या असून, त्या मंजूरीस्तव सादर.

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ६६ (४२) ६८, ३१९, ४६८ आणि २९३ अन्वये.

२) पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ भारत सरकार पर्यावरण आणि वन मंत्रालय यांच्या अधिसूचना दिनांक २० जुलै, १९९८ व सुधारण दि. २ जुन २००० साली बायो मेडिकल वेस्ट (जैविक कचरा) नियम (व्यवस्थापन व हाताळणी) १९९८ प्रमाणे.

३) महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई दि. २० एप्रिल, २००० अन्वये.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी स्वंयसेवी / धर्मादय संस्था किंवा व्यक्ति ज्या जैविक कचरा (बायोमेडीकल वेस्ट) निर्माण करतात. अशा सर्व संस्था म्हणजे सर्व प्रकारचे वैद्यकीय व्यवसायिक, रुग्णालय, दवाखाने, रक्तपेढया, पॅथालॉजी प्रयोगशाळा, विज्ञान, वैद्यकीय, पशु विद्यालय व महाविद्यालय, संशोधन संस्था, कत्तलखाने, पशु वैद्यकीय रुग्णालय, दवाखाना, गोठे, तबेले, कुकूटपालन केंद्रे, दुग्ध व्यवसाय केंद्रे इत्यादी सर्व धारकांना म्हणजेच नियमानुसार "ॲक्युपायर" असे संबोधण्यात आलेले सर्व ॲक्युपायर यांची जैविक कचऱ्याची विहित शास्त्रीय पध्द्तीने व वरील कायदयानुसार विल्हेवाट लावण्याची जबाबदारी व बंधनकारक आहे.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांच्या आरोग्य दृष्टया अनेक दुर्धर रोगांचा प्रार्दुभाव टाकण्यासाठी जैविक कचरा विल्हेवाट योग्य पध्दतीने करण्यासाठी महानगरपालिका जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्प (इन्सीनेटर) खाजगी तत्वावर (बोल्ट-बील्ड, ऑपरेट, लिज ॲण्ड ट्रन्स्फर) या पध्द्तीने कार्यान्वीत करीत आहे. यासाठी कायदयातील तरतुदीनुसार सर्व ॲक्युपायर करीता, सदरील प्रकल्पासाठी लागणारी आवश्यक जागा मनपाने राखीव केली आहे.

सर्व ॲक्युपायर यांनी सदर प्रकल्पाचे आजीवन सभासदत्व शुल्क खालील प्रमाणे मनापाचे कार्यालयात भरुन सभासद होणे बंधनकारक राहील.

## सुधारित आजीवन सभासद शुल्क

| | | |
|---|---|---|
| १) | १ ते ५० खाटास | रुपये १०००/- |
| २) | ५१ ते २०० खाटास | रुपये ३०००/- |
| ३) | २०० खाटा पासून पुढे | रुपये ५०००/- |

जे ॲक्युपायर सभासद होणार नाही, त्यांचे जैविक कचऱ्याची विल्हेवाट कायदयातील तरतुदीनुसार व्यक्तिगत रित्या त्यांच्या मालकीच्या जागेत करावी लागेल व कायदयानुसार सर्व ॲक्युपायर हे शिक्षेस व दंडास पात्र राहतील. साठवून ठेवलेली जैविक कचरा, ॲक्युपायरकडून नियमितपणे स्विकारुन त्यांचे परिवहन व विल्हेवाट लावण्यासाठी सदरचे सेवा सुधारित शुल्क खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | १ ते ५० खाटा असलेले सर्व रुग्णालये (५ खाटा पर्यंत कमीत कमी दरमहा रु. ५५०/-) | दररोज दर खाटास रुपये ४.०० |
| २) | ५१ ते २०० खाटा पर्यंत | दररोज दर खाटास रुपये ३.५० |
| ३) | २०१ ते ५०० खाटा पर्यंत | दररोज दर खाटास रुपये ३.०० |
| ४) | ५०१ ते अधिक | दररोज दर खाटास रुपये २.५० |

(वरील शुल्क रुग्णालयातील उपलब्ध खाटांच्या संख्येवर ठरविले जाईल, रुग्ण भरतीवर अवलंबून नाही.)

| | | |
|---|---|---|
| ५) | सल्लाकक्ष | दरमहा रुपये २५०.०० |
| ६) | दवाखान (सर्व चिकित्सा पध्दतीने) | दरमहा रुपये ३५०.०० |
| ७) | दंत शल्य चिकित्सक | दरमहा रुपये ५५०.०० |
| ८) | पॅथॉलॉजी प्रयोगशाळा नेत्रपेढी / रक्तपेढी/ दुग्धपेढी / अवयव प्रत्यारोपन केंद्र | दरमहा रुपये ५५०.०० |
| ९) | गुरांचे दवाखाने, रुग्णालय, कृत्रिमरेतन केंद्रे, कत्तलखाने, कुकूटपालन केंद्र, दुग्ध व्यवसायिक (डेअरी) | दरमहा रुपये ५५०.०० |
| १०) | सर्व विज्ञान महाविदलय संशोधन केंद्र ज्या ठिकाणी जनावरांची उपयोग करण्यात येतो. | दरमहा रुपये २५०.०० |
| ११) | इतर सर्व ॲक्युपायर | दरमहा रुपये २५०.०० |

जे ॲक्युपायर सभासदत्व होणार नाही, त्यांच्या संस्थेतील जैविक कचरा गोळा, करण्याची जबाबदारी मनपावर राहणार नाही. शिवाय कायदयातील नियमानुसार शिक्षेस व दंडास पात्र असतील. या व्यतिरिक्त नियमानुसार प्रत्येक ॲक्युपायरने त्यांचे ॲथॉराईजेशन महाराष्ट्र प्रदुषण मंडळ औरंगाबाद कडून घेणे आवश्यक राहील.

**अटी व शर्ती :**

या प्रकल्पाच्या अटी व शर्ती मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करत सुधारित प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) बोल्ट पध्द्तीने प्रकल्प चालविण्यांच्या कराराची मुदत ११ वर्षा ऐवजी २० वर्ष करणे बाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

२) बायो केमिकल वेस्ट मॅनेजमेंट प्रोजेक्ट रिपोर्ट मधील अटी व शर्ती यातील अट क्र. ९ (७ ते १५ दिवस) वगळून त्याची मुदत १ महिन्याची करण्यात यावी.

३) ॲक्युपायरला आकारलेले दर संबंधितांनी विहित वेळेस न दिल्यास मनपा प्रशासन ॲक्युपायरकडून १८% व्याज आकारुन रक्कम वसुल केली जाईल. तसेच ॲक्युपायरला तीन महिन्याचे आकारलेले दर मनपाला आगावु भरावे लागेल व न

भरल्यास दंड रुपये ५०००/- प्रतिमहा आकारला जावा व कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

४) ५००० किलो जैविक कचरा निघणार असून, त्यामधून ३००० किलो जैविक कचरा प्रतिदिन इनीसीनेटर द्वारे नष्ट करण्यात येईल व राहिलेला जैविक कचऱ्यावर रासायनिक प्रक्रिया करुन लॅण्ड फिलींग केले जाईल.

५) स्लॉटर हाऊस मधून निघणार जैविक कचरा या प्रकल्पातून वगळण्यात येईल.

६) या प्रकल्पासाठी मनपातर्फे २ एकर जमीन नाम पात्र भाडे रुपये १/- प्रति स्के. मिटर प्रति वर्ष या प्रमाणे आकारुन संबंधित एजन्सीला उपलब्ध करुन दिले जाणार आहे व यासाठी आवश्यक विज, पाणी, रस्ते इत्यादी मनपातर्फे उपलब्ध करुन दिले जाणार आहे. परंतु विज, पाणी यांचे चार्जेस संबंधित कंपनीला (एजन्सीला) भरावे लागतील.

७) अर्नेष्ट मनी डिपॉझीट रुपये २,००,०००/- हीच रक्कम कायम ठेवण्यात येते

८) या प्रकल्पासाठी लागणारा ॲटोक्लीव्ह व स्क्रॅबींगचे युनिट संबंधित एजन्सीमध्ये बसविणे बंधनकारक आहे.

दिनांक १७-११-२००१ रोजीचे सादर केलेले ऐनवेळेचे प्रस्तावामध्ये सुधारणा करुन सुधारित प्रस्तावित दराचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ. आशा बिनवडे : प्रस्तावात अटी शर्ती दिल्या ऐनवेळी तसा प्रस्ताव ठेवणे बरोबर नाही. सुधारणा करायच्या होत्या, तर मुळ विषय पत्रिकेवर हा प्रस्ताव यावयास पाहिजे होता. ठेकेदारांचे हित लक्षता घेऊन घाई गडबडाने प्रस्ताव मांडून मंजूर घेऊन कार्यवाही करण्याची शंका येत आहे, हा विषय मंजूर करु नये.

श्री नंदकुमार फुलारी : प्रस्तावात सविस्तर माहिती दिली नाही. या शहरात दवाखाने किती व्यावसायिक रुग्णालय तसेच गोठे, तबेले किती जे प्रस्तावात नावे दिली, त्याची संख्या किती प्रस्तावात तसे नमुद करावे सुधारित प्रस्ताव आणावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : मा. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार ३१ डिसेंबर २००१ पर्यंत या प्रस्तावावर निर्णय होऊन पुन्हा कार्यवाही करावयाची आहे. यापूर्वीच्या बैठकीत प्रस्ताव आलेला होता. जे दर प्रस्तावित केले ते कमी होते. सर्व्हीस चार्जेस १० समावेश करुन सुधारित प्रस्ताव ठेवलेला आहे. बोल्ट पध्द्तीने करण्याबाबतचा प्रस्ताव आहे.

डॉ. आशा बिनवडे : ३१ डिसेंबर पर्यंत मंजूरी घ्यावी होती. तर या अगोदरच्या बैठकीतच प्रस्ताव का दिला नाही. प्रस्तावात अटी शर्ती दिल्या आहे. ऐनवेळी प्रस्ताव ठेवणे नियमाने बरोबर नाही व ऐनवेळी असे प्रस्ताव सादर करुन महापालिकेच्या फायदयाचे होणार नाही. ११ वर्षाचे ६ वर्ष का नाही २० वर्षे का?

श्री तकीहसन खान : १०% सर्व्हीस चार्ज वाढविले असल्याने सुधारित प्रस्ताव आहे. मंजूर केला नाही तर, महानगरपालिकेस सर्वोच्च न्यायालयासमोर सामोरे जावे लागेल व कोर्टाच्या आदेशाप्रमाणे लवकर कार्यवाही केली नाही म्हणून, दंड भरावा लागेल, यात महानगरपालिकेचेच नुकसान होईल. त्यासाठी प्रस्ताव मंजूर करुन तात्काळ कार्यवाही व्हावी.

डॉ. आशा बिनवडे : बोल्ट पध्दतीने प्रकल्प चालविण्याच्या दराची मुदत ११ वर्ष ऐवजी २० वर्ष ठेवण्याची गरज नाही. कमी करा.

मा. महापौर : न्यायालयाच्या आदेशानुसार ३१ डिसेंबरच्या आत कार्यवाही करायची आहे. सभागृहाने एकमत करावे व योग्य ती निर्णय घेतला जाईल. या प्रस्तावाच्या माध्यमातून महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल.

मुख्यलेखाधिकारी : मागील बैठकीचे इतिवृत्तातील पान क्र. ८ वर हा प्रस्ताव ठेवून मंजूरी मिळालेली होती. ३१-१२-२००१ पर्यंत न्यायालयाची मुदत आहे बोल्ट पध्दतीने निविदा मागविल्या जाईल. अटी शर्ती बाबत ज्याची तक्रार राहील. त्या संदर्भात मा. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चर्चा झाली. त्या बैठकीत घाटीचे डिन, प्रदुषण नियंत्रक मंडळ अभियंता तसेच संबंधित विभागाचे अधिकारी होते. या प्रस्तावास कायम करुन सुधारित मंजूरी दयावी. जेणे करुन पुढील कार्यवाही करता येईल.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे. आता ऐनवेळेचे काही प्रस्ताव आलेले आहे. त्या सर्व प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र. ५५४/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जैविक कचरा निर्माण करणाऱ्या म्हणजे सर्व प्रकारचे वैद्यकीय व्यावसायिक, व्यावसायिक रुग्णालय, दवाखाने, रक्तपेढया, पॅथालॉजी, प्रयोगशाळा, विज्ञान, वैद्यकीय पशुविद्यालय व महाविद्यालय, संशोधन संस्था, कत्तलखाने, पशु वैद्यकीय रुग्णालय, दवाखाना, गोठे, तबेले, कुकूटपालन केंद्रे, दुग्ध व्यवसाय केंद्रे इ. धारकांकडून "ॲक्युपायर" म्हणजेच जैविक कचऱ्याची विहित शास्त्रीय पध्द्तीने व प्रस्तावातील अ. क्र. १ ते ३ प्रमाणे विल्हेवाट लावणे बंधनकारक व जबाबदारी असल्याने औरंगाबाद महानगरपालिकेतील वरील सर्व धारकांकडून साठवून ठेवलेला जैविक कचरा, ॲक्यूपायर कडून नियमीतपणे स्विकारुन खाजगी तत्वावर (बोल्ट बील्ड, ऑपरेट, लिज ॲण्ड ट्रन्स्फर) या पध्दतीने कार्यान्वीत करण्यास खालील अटी व शर्तीसह सुधारित सेवाशुल्क आकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

सर्व ॲक्युपायर यांनी सदर प्रकल्पाचे आजीवन सभासदत्व शुल्क खालीलप्रमाणे महापालिकेचे कार्यालयात भरुन सभासद होणे बंधनकारक राहील.

## *सुधारित आजीवन सभासद शुल्क*

| | | |
|---|---|---|
| १) | १ ते ५० खाटास | रुपये १०००/- |
| २) | ५१ ते २०० खाटास | रुपये ३०००/- |
| ३) | २०० खाद्य पासून पुढे | रुपये ५०००/- |

जे ॲक्युपायर सभासद होणार नाही, त्यांचे जैविक कचऱ्याची विल्हेवाट कायदयातील तरतुदीनुसार व्यक्तिगतरित्या त्यांच्या मालकीच्या जागेत करावी लागेल व कायदयानुसार सर्व ॲक्युपायर हे शिक्षेस व दंडास पात्र राहतील. साठवून ठेवलेली जैविक कचरा, ॲक्युपायरकडून नियमितपणे स्विकारुन त्यांचे परिवहन व विल्हेवाट लावण्यासाठी सदरचे सेवा सुधारित शुल्क खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | १ ते ५० खाटा असलेले सर्व रुग्णालये (५ खाटा पर्यंत कमीत कमी दरमहा रु. ५५०/-) | दररोज दर खाटास रुपये ४.०० |
| २) | ५१ ते २०० खाटा पर्यंत | दररोज दर खाटास रुपये ३.५० |
| ३) | २०१ ते ५०० खाटा पर्यंत | दररोज दर खाटास रुपये ३.०० |
| ४) | ५०१ ते अधिक | दररोज दर खाटास रुपये २.५० |

(वरील शुल्क रुग्णालयातील उपलब्ध खाटांच्या संख्येवर ठरविले जाईल, रुग्ण भरतीवर अवलंबून नाही.)

| | | |
|---|---|---|
| ५) | सल्लाकक्ष | दरमहा रुपये २५०.०० |
| ६) | दवाखान (सर्व चिकित्सा पध्दतीने) | दरमहा रुपये ३५०.०० |
| ७) | दंत शल्य चिकित्सक | दरमहा रुपये ५५०.०० |
| ८) | पॅथॉलॉजी प्रयोगशाळा नेत्रपेढी / रक्तपेढी/ दुग्धपेढी / अवयव प्रत्यारोपन केंद्र | दरमहा रुपये ५५०.०० |
| ९) | गुरांचे दवाखाने, रुग्णालय, कृत्रिमरेतन केंद्रे, कत्तलखाने, कुकूटपालन केंद्र, दुग्ध व्यवसायिक (डेअरी) | दरमहा रुपये ५५०.०० |
| १०) | सर्व विज्ञान महाविदयाल संशोधन केंद्र ज्या ठिकाणी जनावरांची उपयोग करण्यात येतो. | दरमहा रुपये २५०.०० |
| ११) | इतर सर्व ॲक्युपायर | दरमहा रुपये २५०.०० |

**अटी व शर्ती :**

या प्रकल्पाच्या अटी व शर्ती मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करुन सुधारित अटी व शर्ती यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१) बोल्ट पध्द्तीने प्रकल्प चालविण्यांच्या कराराची मुदत ११ वर्षा ऐवजी २० वर्ष करणे बाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

२) बायो मेडीकल वेस्ट मॅनेजमेंट प्रोजेक्ट रिपोर्ट मधील अटी व शर्ती यातील अट क्र. ९ (७ ते १५ दिवस) वगळून त्याची मुदत १ महिन्याची करण्यात यावी.

३) ॲक्युपायरला आकारलेले दर संबंधितांनी विहित वेळेस न दिल्यास महापालिका प्रशासन ॲक्युपायरकडून १८% व्याज आकारुन रक्कम वसुल केली जाईल. तसेच ॲक्युपायरला तीन महिन्याचे आकारलेले दर मनपाला आगाऊ भरावे लागेल व न भरल्यास दंड रुपये ५०००/- प्रतिमहा आकारला जावा व कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

४) ५००० किलो जैविक कचरा निघणार असून, त्यामधून ३००० किलो जैविक कचरा प्रतिदिन इनीसीनेटर द्वारे नष्ट करण्यात येईल व राहिलेला जैविक कचऱ्यावर रासायनिक प्रक्रिया करुन लॅण्ड फिलींग केले जाईल.

५) स्लॉटर हाऊस मधून निघणारा जैविक कचरा या प्रकल्पातून वगळण्यात येईल.

६) या प्रकल्पासाठी महापालिकेतर्फे २ एकर जमीन नाम पात्र भाडे रुपये १/- प्रति स्क्वे. मिटर प्रति वर्ष या प्रमाणे आकारुन संबंधित एजन्सीला उपलब्ध करुन दिले जाणार आहे व यासाठी आवश्यक विज, पाणी, रस्ते इत्यादी मनपातर्फे उपलब्ध करुन दिले जाणार आहे. परंतु विज, पाणी यांचे चार्जेस संबंधित कंपनीला (एजन्सीला) भरावे लागतील.

७) अर्नष्ट मनी डिपॉझीट रुपये २,००,०००/- हीच रक्कम कायम ठेवण्यात येते

८) या प्रकल्पासाठी लागणारा ॲटोक्लीव्ह व स्क्रॅबींगचे युनिट संबंधित एजन्सीमध्ये बसविणे बंधनकारक आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५५/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लॉयन्स क्लब ऑफ औरंगाबाद मिडटाऊन यांनी खिवंसरा पार्क गारखेडा परिसरातील वाहतुक बेट विकसित करण्याकरीता, त्यांच्या पत्राद्वारे कळविलेले आहे. सदरील खर्च लॉयन्स क्लब ऑफ औरंगाबाद करणार आहेत. तरी सदरील वाहतुक बेट विकसित करण्याकरीता महानगरपालिकेच्या अटी व नियमांना अधिन राहून सदरील बेट विकसीत करणार आहेत.

करीता, सदरील बेट विकसित करण्याकरीता व चौकाचे सुशोभिकरण करण्याच्या मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सूचक : सौ. साधना गणेश सुरडकर
अनुमोदक : श्री प्रशांत देसरडा, श्री संजय शिरसाठ,
श्री अंबादास दानवे.

**ठराव क्र. ५५५/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अटी व नियमांना अधिन राहून लॉयन्स क्लब ऑफ औरंगाबाद मिडटाऊन यांनी खिंवसरा पार्क गारखेडा येथील वाहतुक बेट विकसित करण्यास व चौकाचे सुशोभिकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५६/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्व. प्रल्हादजी अभ्यंकर मार्गावर असलेल्या स्वामी विवेकानंद यांचा पुतळा उभारण्यात यावा, करीता, प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

सूचक : सौ. साधना गणेश सुरडकर
अनुमोदक : सौ विजया किशोर रहाटकर, श्री संजय शिरसाठ,
श्री प्रशांत देसरडा, श्री अंबादास दानवे.

**ठराव क्र. ५५६/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्व. प्रल्हादजी अभ्यंकर मार्गावर असलेल्या स्वामी विवेकानंद यांचा पुतळा उभारण्यात यांचा पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खिवंसरा पार्क येथील सिध्दी विनायक गणपती मंदिराच्या चौकाला सिध्दी विनायक चौक असे नांव देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

सूचक : सौ. साधना गणेश सुरडकर
अनुमोदक : श्री प्रशांत देसरडा, श्री संजय शिरसाठ,
श्री अंबादास दानवे.

**ठराव क्र. ५५७/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खिवंसरा पार्क येथील सिध्दी विनायक गणपती मंदिरासमोरील चौकास सिध्दी विनायक गणपती मंदिर चौक असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५८/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, धोबीघाट सिध्दार्थ उद्यान व काझीवाडा येथील महानगरपालिकेचे येथील दगड, पाणी भाडे त्याचा दर रु. १२०/- प्रतिमहा असा ठरविण्यात यावा. हा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करुन घेवून दरवाढ करु नये.

सूचक : श्री संजय शिरसाठ
अनुमोदक : श्री अंबादास दानवे, श्री नंदकुमार घोडेले.

**ठराव क्र. ५५८/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान व काझीवाडा येथील महानगरपालिकेचे येथील दगड, पाणी भाडे रु. १२०/- प्रतिमहा मंजूर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५९/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १२ डिसेंबर २००१ रोजी शहराला पाणी पुरवठा करणारी १४०० मि. मि. मुख्य जलवाहिनी कांचनवाडी गावालगत अचानकपणे फुटल्याने अति उच्च दाब व पाण्याच्या प्रवाहाने सदरील जलवाहिनी लगतच्या परिसरातील सर्व गोरगरीब नागरिकांचे अतोनात नुकसान झाले असून, हया नुकसानी बाबतची कल्पना मा. महापौर साहेब मा. आयुक्त साहेब व महानगरपालिकेचे सर्व अधिकारी यांना हया पुर्वी माहिती दिलेली आहे. सदरील आपदग्रस्ताचे जवळपास ४ लक्ष रुपयांचे नुकसान झाले असून, याबाबत रितसर पंचनामा सुध्दा झालेला आहे. सदरील नागरिकांना नुकसान भरपाई देणे तसेच जख्मी नागरिकांना आवश्यक ती मदत देणे हे कर्तव्य असून नैतिक जबाबदारी सुध्दा महानगरपालिकेची आहे.

मा. महोदय महानगरपालिकेच्या आर्थिक संकल्पात शहरात कुठल्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती होऊन उदा. पुर अथवा इतर अशा प्रकारचे नैसर्गिक आपत्ती आल्यास नागरिकांना अर्थसहाय्य देण्यास अर्थसंकल्पात तरतुद असते. अशा अर्थसंकल्पात विशेष बाब म्हणून कांचनवाडी हया प्रभागातील महानगरपालिकेच्या जलवाहिनीमुळे नुकसान झालेल्या नागरिकांना व जख्मींना नुकसान भरपाई व आर्थिक मदत सोबत सोडलेल्या नुकसानीच्या यादीप्रमाणे देण्याबाबत प्रस्ताव तात्काळ सर्वानुमते मंजूर करावा.

सूचक : श्री नंदकुमार घोडेले.
अनुमोदक : श्री प्रशांत देसरडा, श्री संजय शिरसाठ,
श्री प्रकाश निकाळजे, श्री राजु शिंदे,
श्री स. अली सलामी,
श्री दलबीरसिंग जंबिदा,
श्री सुदाम सोनवणे.

***नुकसान झालेल्या लोकांची यादी खालीलप्रमाणे***

| | | |
|---|---|---|
| १) | योगेश्वर प्रोव्हीजन्स किराणा दुकान | ९५,०००/- |
| २) | रतन मुळेकर, घर पडले | २०,०००/- |
| ३) | मियॉभाई बांगडी दुकान | २,०००/- |
| ४) | हरीभाऊ शेटे कापड दुकान | ३०,०००/- |
| ५) | जब्बारभाई कापड दुकान | ३०,०००/- |
| ६) | वसंत क्षिरसागर घरात पाणी घुसले | २७,०००/- |
| ७) | पांडू मोटे गॅरेज | १५,०००/- |
| ८) | संजच मुर्ळकर घर पडले | १५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ९) | अशोक जाधव घर पडले व शेणखत वाहून गेले. | २०,०००/- |
| १०) | प्रविण शर्मा हिरो होंडा गाडी | ४०,०००/- |
| ११) | अनिल रुपचंद मुळेकर घर पडले | २०,०००/- |
| १२) | श्रीकृष्ण टेंडर्स सिमेंट दुकान | ७,०००/- |
| १३) | बाबा टेलर कापड भिजले | ५,०००/- |
| १४) | जय मल्हार पान सेंटर पाणी घुसले | २,०००/- |
| १५) | गणेश गॅरेज | ५,०००/- |
| १६) | अब्दुल गणी गॅरेज | १,५००/- |
| १७) | शाम टेलर पाणी घुसले | २,०००/- |
| १८) | अविनाश फुटवेअर पाणी घुसले | ५००/- |
| १९) | संजय मुळेकर (अवाचनीय) | ५,०००/- |
| २०) | सुखदेव क्षिरसागर, घर पडले (अवाचनीय) | २०,०००/- |
| २१) | दगडू गायकवाड (अवाचनीय) | ३०,०००/- |

**ठराव क्र. ५५९/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १२-१२-२००१ रोजी कांचनावाडी गावा लगत शहराला पाणी पुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे या जलवाहिनी लगतच्या परिसरातील गोरगरीबांचे नुकसान झाले असल्यामुळे वरीलप्रमाणे आपदग्रस्तांना व जखमींना नुकसान भरपाई देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६०/९ :**

नगरसेवक स्वेच्छा निधीतून छोटया गल्लयामधील नावफलक व गल्ली नंबर याची माहिती व्हावी. यासाठी नगरसेवक निधीतून फलक लावण्यात यावी. प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री किशोर तुळशीबागवाले
अनुमोदक : श्री स. अली सलामी

**ठराव क्र. ५६०/९ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगरसेवक स्वेच्छा निधीतून छोटया गल्ल्यामधील नामफलक गल्ली नंबर देण्याबाबतच्या परवानगीस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६१/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रास "संत शिरोमणी गुरु रविदास" असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री संजय शिरसाठ
अनुमोदक : श्री चंद्रशेखर जैस्वाल

**ठराव क्र. ५६१/१० :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रास "संत शिरोमणी गुरु रविदास" असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जण गन मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक १८-०१-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**गुरुवार दिनांक १८-०१-२००२ रोजी मा. महापौर श्री विकास जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात दुपारी ३.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री शिंदे राजू रामराव | स. सभासद |
| २) | स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष | -//- |
| ३) | स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ४) | स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५) | स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ६) | स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) | स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ८) | स. स. श्री शे. ईलीयास किश्मानी शेख उमर | -//- |
| ९) | स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| १०) | स. स. श्री कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| ११) | स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १२) | स. स. सौ. पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १३) | स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १४) | स. स. सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिशन | -//- |
| १५) | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १६) | स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १७) | स. स. श्री शे. शकील पटेल शे. बुढण पटेल | -//- |
| १८) | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १९) | स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| २०) | स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २१) | स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २२) | स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २३) | स. स. सौ सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २४) | स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २५) | स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २६) | स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २७) | स. स. श्री अ. रशिद अ. सत्तार | -//- |
| २८) | स. स. श्री डॉ. कराड भागवत किसनराव | -//- |
| २९) | स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| ३०) | स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| ३१) | स. स. श्री स. मुमताज अली मुज्जम अली | -//- |
| ३२) | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | -//- |
| ३३) | स. स. श्री. सोनवणे सुदाम रामदास | -//- |

३४) स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत -//-
३५) स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुंडलीक -//-
३६) स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव -//-
३७) स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव -//-
३८) स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ -//-
३९) स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४०) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
४१) स. स. श्री सुरगोणिवार नारायण चंद्रय्या -//-
४२) स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
४३) स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर -//-
४४) स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला -//-
४५) स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-
४६) स. स. श्री संगिता बाळू मैंद -//-
४७) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे -//-
४८) स. स. श्रीमती शाहीन जफर महमुद जफर -//-
४९) स. स. श्री जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण -//-
५०) स. स. सौ दाणे चंद्रभागाबाई भागीरथ -//-
५१) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
५२) स. स. श्री स. सलीम स. युसूफ -//-
५३) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसन खान -//-
५४) स. स. श्री मीर हिदायत अली मीर बसालत अली -//-
५५) स. स. श्रीमती नफिसुन्नीसा बेगम हबीब खान -//-
५६) स. स. श्री अफसर खान यासीन खान -//-
५७) स. स. श्री लकडे भरत श्रीपती -//-
५८) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-
५९) स. स. श्री सलीम पटेल समशेर पटेल -//-
६०) स. स. श्री कैसर यान बद्रोद्यीन खान -//-
६१) स. स. श्री जगदीश कन्हैय्यालाल सिध्द -//-
६२) स. स. स. अली सलामी स. मीरा सलामी -//-
६३) स. स. सौ निखत परविन ईजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री सुभाष लक्ष्मीनारायण वच्छवाह
२) स. स. श्री घडामोडे भगवान देवीदास
३) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
४) स. स. श्री धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली

**संवाद :**

श्री जयवंत ओक : या शहरातील हिंदू बांधवाच्या प्रत्येक सणाच्या दिवशीच पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन का फुटते. शहरामध्ये तसेच सिडको हडकोमध्ये

संक्रांतीच्या दिवशी पाणी पुरवठा झालेला नाही. कोण जबाबदार आहे. याचा योग्य तो सविस्तर खुलासा व्हावा. नसता मी. मा. महापौर यांचे डायस समोर बसत आहे.

( याचवेळी स. सदस्य श्री. जयवंत ओक यांचेसह सिडको-हडकोतील व इतर ही काही सदस्य मा. महापौर यांचे डायस समोर बसतात व संक्रातीच्या दिवशी पाणी पुरवठा का झाला नाही. याचा खुलासा लागतात व पाणी द्या, पाणी द्या अशा घोषणा करतात. )

मा. महापौर : जे सदस्य डायससमोर बसलेले आहे त्यांनी, आपआपल्या जागेवर जाऊन बसावे. योग्य तो खुलासा करण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील.

श्री काशीनाथ कोकाटे : संक्रांतीच्या दिवशी सिडको-हडको भागात पाणी पुरवठा झाला नाही. या मताशी मी सहमत आहे. यावर सविस्तर चर्चा करावी व योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री भाऊसाहेब ताठे : बऱ्याच वेळ पाणी पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी सभागृहात चर्चा होऊन निर्णय घेतले, त्यानुसार अद्याप कार्यवाही झालेली नाही. चर्चा करुन उपयोग नाही. पाणी द्यावे. अशी आमची मागणी आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : महानगरपालिका नागरिकांना पाणीपुरवठा करु शकत नाही तर, विकास कामे दुरच आहे. नागरिकांनी आम्हाला कशासाठी निवडूण दिले, याचा विचार प्रशासनाने करावा.

श्री काशीनाथ कोकाटे : सिडको-हडकोचा पाणीपुरवठा सुरळीत करण्या संदर्भात आपल्या अध्यक्षतेखाली झोन कार्यालय ७ येथे बैठक आयोजित केली. त्या बैठकीत चर्चा करुन एक दिवसा आड पाणी पुरवठा देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पुन्हा मागील बैठकीत या सभागृहात चर्चा होऊन सिडको-हडको भागात दररोज पाणी पुरवठा देण्या बाबत मागणी झाली व त्यानुसार दररोज पाणी देण्याचा निर्णय आपण घेतला. परंतु एक महिना भरामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसत नाही. बऱ्याच भागात पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. जो निर्णय या सभागृहाने घेतला. त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. तरच या सभेला महत्व राहील. सविस्तर चर्चा करुनही, ज्या पध्द्तीने कार्यवाही व्हावयास पाहिजे ती होत नाही. तोपर्यंत ही सभा तहकुब करावी.

( याचवेळी डायस समोर बसलेले स. सदस्य पाणी द्या, पाणी द्या, अशा मोठमोठयाने घोषणा देतात. )

श्री नंदकुमार फुलारी : आम्हास चर्चा ऐकावयाची नाही, निर्णय घ्यावा.

श्री भगवान घडामोडे : पाण्याचा प्रश्न नेहमीच सभागृहात उद्‌भवतो. योग्य निर्णय होईपर्यंत सभा सुध्दा घेऊ नये. सभागृहात चर्चा करुन निर्णय घेतला, एक दिवसाआड सिडको-हडको भागात भरपूर पाणी दिले जाईल. परंतु, त्यानुसार कार्यवाही होत नाही. पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. नियमीत येणारे पाणी सुध्दा बंद झाले. संक्रांतीचा सण हा हिंदू बांधवांचा सण आहे. त्या दिवशी सिडको-हडको भागात पाणी पुरवठा केला नाही. महिलांना वनवन फिरावे लागते. हिंदूच्या सणाच्या दिवशीच नेहमी पाण्याची पाईप लाईन का फुटते. असा माझा प्रश्न आहे. विस्कळीत झालेला पाणीपुरवठया संबंधी चर्चा करावी व मागील बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सिडको-हडकोसाठी एक्सप्रेस लाईन टाकणार आहे. त्या संबंधीची कार्यवाही कुठपर्यंत आली. त्याचा सुध्दा

खुलासा करण्यात आला. अंमलबजावणी होत नसेल तर, सभा सुध्दा घेण्याचा अधिकार नाही.

( याचवेळी मा. महापौर यांचे डायस समोर बसलेले काही स. सदस्य उभे राहून मोठमोठयाने बोलतात. काहीही ऐकावयास येत नाही. )

श्री किशोर तुळशीबागवाले : जे सदस्य डायस समोर बसलेले आहे. त्यांना त्यांचे जागेवर बसण्याची सूचना करावी व संबंधित अधिकारी यांचेकडून खुलासा घेण्यात यावा.

श्री अंबादास दानवे : दिवाळीच्या वेळेस सुध्दा पाणी मिळालेले नव्हते. संक्रातीच्या सणाच्या वेळेस सुध्दा तोच प्रकार झाला. यासाठी योग्य तो निर्णय घेऊन पुढील कार्यवाही होणे गरजेचे आहे.

( सिडको-हडकोतील पाणी पुरवठा झालाच पाहिजे. शहराला पाणी पुरवठा झालाच पाहिजे, अशा घोषणा काही सदस्य सभागृहात देतात.)

श्री प्रकाश निकाळजे : सर्व सदस्यांना आपआपल्या जागेवर बसण्यास सांगावे. पाणी प्रश्नावर सभागृहात सविस्तर चर्चा करुन, निर्णय घेण्यात यावा. स. सदस्यांच्या भावनेशी आम्ही सर्व सदस्य सहमत आहोत. पाण्याचा प्रश्न जिव्हाळयाचा असून, पाणी द्यावेच लागेल.

मा. महापौर : एका वेळेस एकास सदस्यांनी बोलावे. इतिवृत्तात नोंद घेण्यास अडचण येते. सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. संबंधित अधिकारी या संबंधीचा खुलासा करणार आहे. संबंधित अधिकारी यांना खुलासा करावा.

( स. सदस्य डायस समोर मोठमोठयाने घोषणा देतात. काहीही ऐकू येत नाही. )

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : दिनांक जानेवारी २००२ रोजी रात्री १.०० वाजता नक्षत्रवाडी व औरंगाबाद या रस्त्यावरील मुख्य जल वाहिनी सिल्कमील कॉलनी जवळ अचानकपणे, नैसर्गिकरित्या फुटली. १२ तारखेलाचा रात्री काम सुरु करुन १३ तारखेला काम संपवून १४ तारखेला संक्रांतीच्या दिवशी पुर्ववत शहराला पाणी पुरवठा केलेला आहे. १२ ते १३ ला विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे सिडको-हडकोला बऱ्याच भागात पाणीपुरवठा होऊ शकला नाही.

श्रीमती जयश्री किवळेकर : जलवाहिनी फुटण्याच्या अगोदर २ दिवसापुर्वी सिडको-हडकोला पाणी पुरवठा होऊ शकत नाही. त्याचे कारण काय?

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : सिडकोला पुर्णतः पाणीपुरवठा करावयाचा असेल तर, ३० दसलक्ष लिटर्स पाण्याची आवश्यकता आहे. परंतु आपल्याकडे जी यंत्रणा आहे. त्या यंत्रणेची क्षमता २० दसलक्ष लिटर्स क्षमतेच्या वर नाही. याची सर्व कल्पना या सभागृहाला आहे. तसा खुलासा मागील बैठकीत करण्यात आलेला होता. यामुळे जवळपास ५०% ची तुट यामध्ये पडते आहे. ती कशी भरुन काढायची या संदर्भात मागील बैठकीत चर्चा झालेली आहे.

मा. महापौर : एक्सप्रेस लाईन बाबत आतापर्यंत काय कार्यवाही केली. त्याचा खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : एक्सप्रेस लाईन टाकण्याचा निर्णय सभागृहाने घेतल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संबंधित अधिकारी यांचे समवेत बैठका घेतलेल्या आहे. तशा सूचना त्या विभागाला दिलेल्या होत्या. त्यानुसार ४ ते ५ दिवसापूर्वी एक्सप्रेस लाईन बाबतचे प्रपोजल त्यांनी महानगरपालिकेकडे पाठविले. त्यांची तपासणी मध्ये २ दिवस गेले. परवाच्या दिवशी या

प्रपोजलमध्ये ज्या तृटी होत्या. त्या संबंधी मुख्य अभियंता तसेच अधिक्षक अभियंता यांना दखल घेण्याकरीता, सांगण्यात आले व सुधारिक प्रपोजल त्यांना द्यावयास सांगण्यात आले होते. त्यांनी जे प्रपोजल सादर केले होते. त्यामध्ये ठेकेदाराचेच २.५० कोटीचे बील नमुद केलेले होते. ठेकेदारचे बील कमी करुन ५.५० कोटीचे प्रपोजल सादर करावे. या संबंधी संबंधित विभागाचे अधिकारी यांना दोन दिवसापूर्वी अगोदर सांगण्यात आलेले होते. मा. आयुक्तांनी तशा सूचना केलेल्या होत्या.

मा. महापौर : प्रशासनाकडून केलेल्या खुलाशामध्ये कही तथ्य नाही. या कामात दिरंगाई झाल्याचे दिसून येत आहे.

श्री प्रकाश निकाळजे : जे स. सदस्य खाली डायससमोर बसलेले आहे. त्यांना कोणत्या प्रश्नाचा खुलासा अपेक्षित आहे. यामध्ये दोन प्रश्न निर्माण होत आहे. पहिला सिडको-हडको भागात पाणीपुरवठा झालेला नाही. दुसरा हिंदूच्या सणाच्याच दिवशी का पाण्याची पाईप लाईन फुटते.

श्री जयवंत ओक : पहिला प्रश्न असा की, हिंदुच्या सणाच्या दिवशीच का पाईप लाईन फुटते. मागील रेकॉर्ड काढावे. या सभागृहाने दिड महिन्यापुर्वी सिडको-हडको भागात पाणी पुरवठा सुरळीतपणे होण्यासाठी एक्सप्रेस लाईन टाकण्याबाबतचा निर्णय घेतला अद्याप काहीही कार्यवाही का झालेली नाही. या ठिकाणी खुलासा नको आहे, पाणी द्यावे. अशी आमची मागणी आहे. प्रत्येक वेळेस सभागृहात चचौ होते. अधिकारी कार्यवाही करीत नाही. पाईपलाईन का फुटते यास अधिकारी जबाबदार नाही का? ७००, १४०० एम. एम. व्यासाच्या पाईपलाईन १ वर्षात तीन वेळेस फुटलेल्या आहे. गेल्या दिवाळीच्या सणाच्या दिवशी सुध्दा हिच परिस्थिती होती. सिडको-हडको भागात संक्रांतीच्या दिवशी पाणी मिळाले नाही. महिलांना पाण्यासाठी फिरावे लागले. नगरसेवकांच्या निधीतून विकास कामे करण्याचे बंद केले. सिडको-हडकोचे सदस्यांचा निधी वापरण्यात येत नाही. किमान त्या भागात नागरिकांना महानगरपालिका पाणी सुध्दा पुरवू शकत नाही. फार दुर्दैवाची बाब आहे. सणाच्याच दिवशी का पाईपलाईन फुटते यावा. योग्य खुलासा करण्यात यावा. जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. यापुढे पाण्याची पाईप लाईन फुटता कामा नये. नसता, या सभागृहाचा निषेध करुन सभात्याग केला जाईल. या सभागृहात स. सदस्य जे बोलतात. निर्णय होता. त्यांचा प्रशासनाने मान ठेवावा. तो खुलासा केला तो समाधानकारक नाही.

श्रीमती जयश्री किवळेकर : अधिकाऱ्यांनी जे उत्तर दिले, ते समाधानकारक नाही. ४ महिन्यापासून हेच उत्तर येते. नागरिक आम्हाला जाब विचारतात. नुसती चर्चा होते, निर्णयाची अंमलबजावणी होत नाही.

श्री सुदाम सोनवणे : स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित करुन आपल्या समोर धरण धरले. हा एक सभागृहाचा अपमानच आहे. परंतु त्या सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या सभागृहाने योग्य तो निर्णय घेतला पाहिजे. गेल्या दिवाळीच्या दिवशी पाणी पुरवठा होत नव्हता म्हणून, आपण स्वत: पाण्याच्या टाकीवर जाऊन कार्यवाही करण्यास सांगितले. तीच परिस्थिती संक्रांतीच्या दिवशी झाली. मागील बैठकीत चर्चा झाली. दिवाळीच्या दिवशी सिडको-हडकोला पाणीपुरवठा झाल नाही. त्यावेळी जे अधिकारी कार्यरत होते त्यांचेवर

कार्यवाही करण्याची सूचना केली होती. कार्यवाही करण्याबाबत आपले रुलींग सुध्दा झालेले आहे. कार्यवाही झालेली नाही. म्हणून अधिकाऱ्यांवर कार्यवाही होत नाही म्हणून, अधिकारी कामात हलगर्जीपणा करतात व कार्यवाही होत नाही. अशी भावना अधिकाऱ्यांच्या मनात झालेली आहे. म्हणून दिवाळीच्या दिवशी पाणी आले नाही. तीच परिस्थिती संक्रांतीच्या दिवशी झालेली नाही. आताच अधिकाऱ्यांना खुलासा केला की, पाईपलाईन फुटली व सिडको-हडकोला पाणीपुरवठा करु शकलो नाही. या सभागृहात सर्व सदस्य जात पात विसरुन कामे करतात. मुस्लीम सणाच्या दिवशी हिंदुच्या भागात पाणी आले नाही. तर आम्ही समजु शकतो, परंतु हिंदुच्याच सणाच्या दिवशी हिंदुच्या वार्डात (भागात) पाणी देत नसतील तर, अधिकारी हे जातीवाद करतात. असा, मी आरोप करेन. अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही केली पाहिजे. सिडको-हडकोसाठी एक्सप्रेस लाईन टाकण्याचा आपण निर्णय घेतला. त्या संबंधीचे उत्तर सुध्दा अद्याप मिळालेले नाही. म्हणून सभागृहातर्फे मी विनंती करेन की, जो पर्यंत एक्सप्रस लाइ्रनचे टेंडरचा प्रस्ताव सभागृहासमोर येत नाही. तोपर्यंत ही सभा तहकुब करावी. जोपर्यंत सिडको-हडकोचा पाणीप्रश्न सुटत नाही. तोपर्यंत सिडको-हडकोचे सदस्य या सभागृहात उपस्थित राहणार नाही.

मा. महापौर : शहराची आणि सिडको-हडको भागातील पाण्याची परिस्थिती बघून सिडको-हडकोसाठी एक्सप्रेस लाईन टाकण्याचा बैठकीत आपण निर्णय घेतल्यानुसार कार्यवाही होणार होती व प्रशासनातर्फे सुध्दा सांगण्यात आले होते की, येणाऱ्या सर्वसाधारण सभेत तसा प्रस्ताव सादर करण्यात येईल. परंतु तसा काही प्रस्ताव सादर झालेला नाही. म्हणून आजची सभा तहकुब करण्यात येते.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १८-०२-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**सोमवार दिनांक १८-०२-२००२ ( दिनांक १८-०१-२००२ रोजी तहकुब केलेली ) रोजी मा. महापौर श्री विकास जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री शिंदे राजू रामराव | स. सभासद |
| २) | स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष | -//- |
| ३) | स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ४) | स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५) | स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ६) | स. स. सौ. बेगम विखार अहेमद | -//- |
| ७) | स. स. श्री औताडे रावसाहेब ममतु | -//- |
| ८) | स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ९) | स. स. श्री कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| १०) | स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| ११) | स. स. सौ. पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १२) | स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १३) | स. स. सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिशन | -//- |
| १४) | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १५) | स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १६) | स. स. श्री शे. शकील पटेल शे. बुढण पटेल | -//- |
| १७) | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १८) | स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| १९) | स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २०) | स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २१) | स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २२) | स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २३) | स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २४) | स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २५) | स. स. श्री अ. रशिद अ. सत्तार | -//- |
| २६) | स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| २७) | स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| २८) | स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| २९) | स. स. श्री स. मुमताज अली मोज्जम अली | -//- |
| ३०) | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | -//- |
| ३१) | स. स. श्री थोरात दत्तात्रय रामराव | -//- |
| ३२) | स. स. श्री. सोनवणे सुदाम रामदास | -//- |

| | | |
|---|---|---|
| ३३) | स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत | -//- |
| ३४) | स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुंडलीक | -//- |
| ३५) | स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव | -//- |
| ३६) | स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | -//- |
| ३७) | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| ३८) | स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय | -//- |
| ३९) | स. स. श्री सुरगोणिवार नारायण चंद्रय्या | -//- |
| ४०) | स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग | -//- |
| ४१) | स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | -//- |
| ४२) | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | -//- |
| ४३) | स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम | -//- |
| ४४) | स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ४५) | स. स. श्री नासीर खान अ. रहेमान खान | -//- |
| ४६) | स. स. श्रीमती शाहीन जफर महमुद जफर | -//- |
| ४७) | स. स. श्री जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण | -//- |
| ४८) | स. स. सौ दाणे चंद्रभागाबाई भागीरथ | -//- |
| ४९) | स. स. श्री तकीहसन खान कासीम हसन खान | -//- |
| ५०) | स. स. श्री मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ५१) | स. स. श्री अफसर खान यासीन खान | -//- |
| ५२) | स. स. सौ. सुलताना बेगम चांदखॉ | -//- |
| ५३) | स. स. श्री लकडे भरत श्रीपती | -//- |
| ५४) | स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन | -//- |
| ५५) | स. स. श्री सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ५६) | स. स. श्री जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | -//- |
| ५७) | स. स. सौ. कागडा बबीता सुभाष | -//- |
| ५८) | स. स. श्री स. अली सलामी स. मीरा सलामी | -//- |
| ५९) | स. स. श्री तनवाणी किशनचंद लेखराज | -//- |
| ६०) | स. स. सौ निखत परविन ईजाज अली | -//- |

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री घडामोडे भगवान देवीदास
२) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
३) स. स. श्री धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स. स. सौ. सलमा बानो मिर मो. अली

सभागृहतर्फे स्व. माजी नगराध्यक्ष बाबुलाल पराती यांचे दुःखद निधन झाल्या बद्दल ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. ५६२/१ :**

दिनांक २०-१२-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा. महापौर : दिनांक २०-१२-२००१ च्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. ५६२/१ :**

दिनांक २०-१२-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

मा. महापौर : प्रश्नाबाबत नगरसचिव यांनी थोडक्यात माहिती द्यावी.

नगरसचिव : मागील बैठकीतील शिल्लक प्रश्न व या बैठकीसाठी प्राप्त झालेले प्रश्न असे प्रश्न क्र. १६ ते ३७ प्रश्न आहेत. प्रश्नोउत्तरासाठी नियमानुसार १/२ तास अनुज्ञेय आहे. स. सदस्यांकडून आलेले सर्व ज्या त्या विभागात उत्तरे घेण्यासाठी वितरीत केलेले आहे. प्रश्नाची लेखी उत्तरे प्राप्त झालेली आहे. ज्या प्रश्नाची अंतरिम उत्तरे आली आहे. त्यांची सविस्तर उत्तर नंतर देण्यात येणार आहेत.

श्री अंबादास दानवे : मागील बैठकीचे प्रश्न पुढील बैठकीत घेण्यात येऊ नये.

नगरसचिव : मागील बैठकीत जे प्रश्न निकाली काढले व प्रश्न पुकारल्यावर स. सदस्य सभागृहात उपस्थित नसतील, असे प्रश्न पुन्हा चर्चेला घेता येणार नाही. जे प्रश्न निकाली काढण्यात आले नाही. ते प्रश्न पुढील सभेत घ्यावे लागतील.

श्री अंबादास दानवे : मागील बैठकीत जे प्रश्न होते. त्यावर ३० मिनिटे चर्चा झाली. वेळ झाला म्हणून या बैठकीत ते प्रश्न आलेले आहे. आता ३० मिनिटे चर्चा झाल्यानंतर प्रश्न बाकीत राहील्यास असे प्रश्न पुढील बैठकीत पुन्हा चर्चेसाठी घेण्याची आवश्यकता नाही. यामुळे खूप प्रश्न प्रलंबित राहतील व चर्चेमध्ये जास्त वेळ जाईल.

श्री सुरजितसिंग खुंगर : अगोदर प्रस्ताव मंजूर करावे. नंतर प्रश्नावर चर्चा करावी जितका वेळ देय आहे, तितका वेळ चर्चा करावी. नियमात तसे दिले आहे.

मा. महापौर : ठिक आहे, अगोदर विषय पत्रिकेवर चर्चा करावी. नंतर प्रश्नावर चर्चा करण्यात येईल.

**विषय क्र. ५६३/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००१-२००२ च्या अर्थसंकल्पात ठळक वैशिष्टये यामध्ये अभय योजनेचा समावेश करण्याला आला होता. त्यामध्ये नागरिकांना आव्हान करुन, ज्यांनी अनाधिकृतपणे नळ कनेक्शन घेतलेले आहेत. त्यांनी विहीत कालावधीमध्ये विहित रक्कम भरणा करुन नळ कायदेशीर करावी अशी तरतुद होती. परंतु अनाधिकृत नळ शोध मोहीम करीता, निविदा मागविण्यात आल्या परंतु, कमी दर असलेल्या संस्थेने नंतर करारनामे करणे व आदेश घेणे याकरीता, प्रतिसाद दिला नाही व त्यामुळे त्या संस्थेस काळया यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.

अभय योजना पुर्ण करण्याकरीता या विभागामार्फत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. कृपया मान्यता व्हावी.

१) सदरील योजना ही १९९५ पुर्वीच्या वस्तीस तसेच लाभधारकांचे नांव १९९५ च्या मतदार यादीत असेल त्यांनाच लागू होईल किंवा ज्या प्रभागात गुंठेवारी प्रमाणे विकास केला जाईल अशा वस्तीत लाभ मिळेल.

२) ज्या नागरिकांनी अनाधिकृत नळ कनेक्शन घेतले वा अनाधिकृत वापर करीत आहे, त्यांनी घेतेलेल्या नळांच्या व्यासानुसारचा एक वेळ भरावयाचा हप्ता (वन टाईम

प्रिमीयम) ही योजना जाहिर झाल्यापासून ६० दिवसाच्या आत अर्जासह त्यांचे नजीकच्या विभागीय कार्यालयात भरणा करावा.

३) जर त्यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही केली नाही तर, त्यांना दोन पट रक्कम आकारणी करण्यात येईल व यासाठीच वाढीव मुदत ३० दिवसापर्यंत देण्यात येईल.

४) त्यानंतर ही जर नागरिकांनी हया वरील मुदतीमध्ये अर्ज करुन नळ कनेक्शन अधिकृत करुन घेतले नाही तर :

अ) त्यांचेवर पोलीस कायदा व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम २०० नुसार पाणी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

ब) त्यांचेकडून जेव्हापासून इमारत अस्तित्वात आहे. तेव्हा पासून थकबाकी म्हणून रक्कमेची वसुली करण्यात येईल.

नागरिकांनी एक वेळा भरणा करावयाच्या व्यास निहाय हप्त्याची रक्कम खालील प्रमाणे आहे.

| **व्यास** | **६० दिवसामध्ये भरणा केल्यास** | **६० ते ९० दिवसामध्ये भरणा केल्यास रु.** |
|---|---|---|
| **घरगुती वापरासाठीचे दर** | | |
| १/२" (१५ मी.मी.) मीटर रहित | ३,०००/- | ६,०००/- |
| ३/४" (२० मी.मी.) मीटर रहित | ४,८७५/- | ९,७५०/- |
| १" (२५ मी.मी.) मीटर रहित | ११,३७५/- | २२,७५०/- |
| **घोषित झोपडपट्टी करीता दर** | | |
| १/२" (१५ मी.मी.) मीटर रहित | २,०००/- | ४,०००/- |
| ३/४" (२० मी.मी.) मीटर रहित | ३,२५०/- | ६,५००/- |
| १" (२५ मी.मी.) मीटर रहित | ७,५८५/- | १५,१७०/- |
| **व्यावसायिक उदयोगासाठीचे दर** | | |
| १/२" (१५ मी.मी.) मीटर रहित | १५,९००/- | ३१,८००/- |
| ३/४" (२० मी.मी.) मीटर रहित | १९,०५०/- | ३८,१००/- |
| १" (२५ मी.मी.) मीटर रहित | ४२,४५०/- | ८४,९००/- |

विचारार्थ व निर्णया करीता सादर.

**संवाद :**

श्री किशोर तुळशीबागवाले : मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात ठळक वैशिष्टयामध्ये "अभय योजना" राबवण्यिाबाबत प्रस्तावित केलेले होते. त्याप्रमाणे एक वर्षानंतर आजच्या बैठकीत ही योजना राबविण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर झाला. यास एक वर्ष लागेल. एवढा उशीर होण्याचे कारण काय खुलासा द्यावा. एका वैशिष्टयास अंमलबजावणीसाठी १ वर्ष लागल्यास येणाऱ्या अर्थसंकल्पात ठळक वैशिष्टये येणार की नाही?

प्र. कार्यकारी अभियंता (पा. पु.) : अभय योजना राबविण्या संदर्भात प्रस्ताव सादर केलेला असून, अनाधिकृत नळ कनेक्शन शोधून किंवा नागरिक प्रस्ताव देतील. अशी नळ धारकांना एकाचवेळी (वन टाईम) दंडासह पाणीपट्टी भरुन घ्यावयाची व पुढील वर्षी नळपट्टी नियमितरित्या वसुल करायची यासह नळ अधिकृत करण्याची ही योजना आहे. यामुळे पुढील वर्षापासून महानगरपालिकेस नियमित पाणीपट्टी मिळेल व महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. ज्यांनी नळ कनेक्शन घेतले त्यांचेकडून व्याज निहाय दंड वसुल करण्यात येईल.

श्री किशोर तुळशीबागवाले : प्रस्ताव येण्यास उशीर का झाला. याचा खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर अनाधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिम करीता, निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतु कमी दर असलेल्या संस्थेने कार्यवाही करण्यास प्रतिसाद दिला नाही व त्यामुळे हा प्रस्ताव आणण्यात आलेला आहे.

श्री प्रशांत देसरडा : आज प्रस्ताव आला तो ही अंपूर्ण आहे. मागील अर्थसंकल्पात ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला. १ वर्ष प्रस्ताव आणण्यास वेळ गेला. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीने काहीच काम करावयाचे नाही, असे दिसून येते. मागील दंडात्मक कार्यवाही करुन नळ कनेक्श्न देणार असे दिले. परंतु यामुळे कुणीही रक्कम भरण्यास पुढे येणार खऱ्या अर्थाने उत्पन्न वाढवायचे असेल तर, मागील दंडात्मक व पाणीपट्टी म्हणून रक्कम न घेता, नळ अधिकृत केले तरी, महानगरपालिका प्रशासनास फायदा आहे.

श्री नारायण सुरगोणीकर : एक वर्षापासून या प्रस्तावाची कार्यवाही चालू असून, आतापर्यात किती प्रकरणे उघडकीस आलेले आहे. २ महिन्यापूर्वी मी तक्रार केली. मुख्य जलवाहिनीवरुन पाणी घेतलेले होते. पाणी भरल्यानंतर रस्त्यावर सोडले जाते. तक्रारीचे निवारण केले नाही. किती प्रकरणे पकडली त्याचा खुलासा द्यावा.

श्री प्रकाश निकाळजे : अभय योजना राबविण्याबाबत ठळक वैशिष्टयामध्ये दिले होते. ही योजना काही ठराविक वस्त्यामध्ये राबविलेली आहे. महानगरपालिकेचा पाण्यावर जास्त खर्च होत आहे. एमएसईबीचे महानगरपालिकेला प्रत्येक महिन्याला जवळपास १ कोटी रुपये भरावे लागते. कमी वसूली होते व तुट भरुन निघत नाही. शोध मोहीमसाठी निविदा काढल्या त्या नाकारण्यात आल्या. प्रशासनाला कार्यवाही केली. परंतु माझी सुचना की, प्रकल्प विभागाच्या अंतर्गत शहरातील दारिद्रय रेषेखाली सर्व्हे करण्यात झाला. तसेच अनाधिकृत वस्त्याचा सर्व्हे केलेला आहे. ज्यांनी सर्व्हे केला. त्यांना महानगरपालिके मार्फत मानधन दिले. त्याप्रमाणे टेंडर न काढता, प्रशासकीय विभागा अंतर्गत टिम तयार करुन नळाची शोध मोहीम हाती घेता येईल पोलीस ही आहे व ताबडतोब जागेवरच नळ कनेक्शन अधिकृत करण्याची कार्यवाही केल्यास योग्य होईल. आपल्याकडे पोलीस फोर्स आहे. ७-८ टिन तयार केल्यास २-३ महिन्यात योजना पूर्ण होईल. प्रस्तावानुसार कार्यवाही करणार असेल तर, आता पुन्हा टेंडर निघेल त्यास वेळ लागेल व ही योजना सफल होणार नाही व कुणीही स्वतःहून पैसे भरण्यास येणार नाही व जे टेंडर घेतील तेच नागरिकांकडून पैसे घेतील. टेंडर करण्यास ३

महिने ओपन करण्यात दोन महिने असे मिळून १ वर्ष होते. प्रशासनामार्फत करावे.

श्री किशोर तुळशीबागवाले : बऱ्याचदा सभागृहात योजना राबविण्याबाबत निर्णय घेतले जातात. अर्थसंकल्पात सुध्दा तरतुद होते. परंतु प्रशासनाच्या वतीने वेळीच त्याची अंमलबजावणी होत नाही. नुसती चर्चा करुन उपयोग नाही. जे नियम घातले ते शिथिल करावे. नळ कनेक्श्न अधिकृत होत असेल तर, सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : महानगरपालिका हद्दीत जे अनाधिकृत नळ कनेक्शन आहे. ते अधिकृत करण्यासाठीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर नागरिकांकडून (वन टाईम प्रिमीयम) किती प्रमाणात प्रिमीयम घेण्यात यावे. हा निर्णय घ्यावयाचा आहे. कसे व किती प्रिमीयम लागू करावे. याबाबत आपल्याला निर्णय घ्यावयाचा आहे. टेंडर न काढता, वृत्तपत्रात तसेच जाहीर प्रगटन देऊन कार्यवाही करणे योग्य होईल. कारण मागच्या वेळेस टेंडरचा अनुभव आलेला आहे.

श्री प्रशांत देसरडा : ज्यांच्याकडे १९९५ पासून नळकनेक्शन आहे. त्यांना तेव्हा पासून दंड आकारणी करणार काय?

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : प्रस्ताव आज मंजूर झाला. संबंधितांनी रु. ३,०००/- आज भरले तर, नळ अधिकृत करण्याची कार्यवाही होईल. नळ अधिकृत करुन घेण्यासाठी झोनमध्ये आपले कर्मचारी राहतील. वन टाईम मध्ये रु. ३,०००/- घेणार आहोत.

मा. महापौर : ६० दिवसाची मुदत देणार त्यांनतर ६,०००/- घेऊन कार्यवाही करणार? ३,०००/- कोणता निकष लाऊन लावण्यात आले. त्याचा खुलासा द्यावा.

श्री प्रकाश निकाळजे : नागरिक स्वतः हून आणून देणार नाहीत. थर्ड पार्टी पाहिजे. नेहमीच काम करतात. असे विद्यार्थी आहेत. त्यांचेसह कर्मचाही देऊन टिम तयार करावी. नळाची संख्या व नळ कनेक्शन अनाधिकृत कुठे जास्त प्रमाणात असतील व सर्व ठिकाणे आपल्या कर्मचाऱ्यांना माहीत आहे. एक टिम तयार करुन कार्यवाही करावी. लवकर योजना राबविली जाईल. जाहीर टेंडर करुन योजना राबऊ नये. यास खर्च येईल व योजना सुध्दा सफल होणार नाही.

प्र. कार्यकारी अभियंता (पा. पु.) : वृत्तपत्रात आवाहान करावे लागणार त्यानुसार विहित मुदतीत न भरल्यास पुढील कार्यवाही करणार आहोत.

श्री प्रकाश निकाळजे : मालमत्ता कर भरण्याबाबत वृत्तपत्रात दिले. किती वसुली झाली याचा खुलासा करावा. कुणी कर भरावयास आले नाही. त्याप्रमाणे या योजनेचे सुध्दा होईल जाहीर प्रगटन देऊन कुणी ही नळ कनेक्शन अधिकृत करुन घेण्याबाबत पुढे येणार नाही. १९९५ च्या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले. कुणी कर भरला नाही. म्हणून आपले कर्मचारी पावती बुक घेऊन पाठवावे.

मा. महापौर : सभागृहात दर निश्चित करण्यावर चर्चा करावी. कार्यवाही कशी करायची तो निर्णय नंतर घेण्यात येईल. प्रस्तावात १/२ इंच नळ कनेक्शनसाठी रु. ३,०००/- ठेवले. कोणता निकष लाऊन ठेवेले. याचा खुलासा द्यावा.

प्र. कार्यकारी अभियंता (पा. पु.) : दोन वर्षाची पाणीपट्टी व दंड म्हणून वसुली विचारात घेऊन १/२ इंच नळासाठी रु. ३,०००/- करण्यात आलेले आहे.

श्री भगवान घडामोडे : पाणी प्रश्नाबाबत नेहमीच विषय चर्चेसाठी सभागृहात येतो. बऱ्याच वेळेस सर्व्हेचे काम केले. प्रस्तावानुसार कार्यवाही होईल का? फक्त ३०

दिवसांची मुदत द्यावी. कुठलाच दंड आकारु नये. मुदतीत रक्कम भरणा करुन नळ अधिकृत केले नाही. तर पुन्हा दंड आकारणी शिवाय कायम करण्यात येऊ नये.

प्र. कार्यकारी अभियंता (पा. पु.) : एखादयाने ४ वर्षापासून नळ कनेक्शन घेतले. अशा कडून किमार २ वर्षाची पाणीपट्टी तरी वसुल व्हावी.

श्री काशीनाथ कोकाटे : अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. प्रस्तावावर चर्चा चालू असतांना स. सदस्यांनी चांगल्याप्रमाणे प्रश्न उपस्थित केले. गेल्या अर्थसंकल्पामधील ठळक वैशिष्टयामध्ये नमुद केल्याप्रमाणे ही योजना राबविण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव सादर झाला. एक वर्षानंतर का होईना. प्रस्ताव सादर झाला. शहरात प्रत्येक भागातील पाहणी करावी. त्यासाठी झोन अधिकारी / कर्मचारी कामाला लावावे. ज्या ज्या झोन अधिकाऱ्यांकडून नळ धारकांची यादी ठराविक मुदतीत मागवावी व पाहणी करुन जे अनाधिकृत नळ कनेक्शन असतील ते अधिकृत करण्याबाबत कार्यवाही व्हावी. नळाची शोध मोहीम कर्मचाऱ्यांनी बरोबर राबविली आहे. का यासाठी मा. आयुक्तांनी प्रशासकीय समिती नियुक्त करावी. दोन वर्षाची पाणीपट्टी व दंड म्हणून १,२००/- सहित ३,०००/- रु. ठेवण्यात आले. यात बदल करुन किमान १ वर्षाचा पाणीपट्टी व दंड आकारणी सह रक्कम आकारावी. सर्वसामान्य नागरिकावर जास्त बोजा पडणार नाही. याची दखल घेण्यात यावी. पाणी प्रश्न हा नागरिकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. १ ते २ महिन्याची मुदत द्यावी व येणाऱ्या अर्थसंकल्पापूर्वी किती अनाधिकृत नळ कनेक्श्न शोधण्याची कार्यवाही होते. त्याची माहिती सादर व्हावयास पाहिजे.

श्री प्रकाश निकाळजे : नळ शोध मोहीम राबविण्यासाठी महानगरपालिकेचे कर्मचारी द्यावे. झोनवाईज द्यावे. तरच तात्काळ ही योजना राबविली जाईल. कुठे अनाधिकृत नळ कनेक्शन आहे. हे समजुन येईल. एका झोनमध्ये ५० कर्मचारी द्यावे. शहरात मालमत्ता किती, किती लोकांनी कर भरला, किती खोल्या भाडयाने आहे. याची सुध्दा माहिती मिळेल. विद्यार्थ्यांना सोबत घ्या. कर्मचाऱ्या बरोबर पावती बुक सुध्दा देण्यात यावे. यावर सविस्तर चर्चा करुन निर्णय व्हावा.

श्री राधाकृष्ण गायकवाड : नळ शोध मोहीम राबवितांना काही भागात आपले कर्मचारी / अधिकारी जाऊ शकत नाही. काही घरातील नळ तपासणी करता येणार नाही. अशी परिस्थिती आहे. नळ कनेक्शन अधिकृत करण्याबाबत वृत्तपत्रात प्रसिध्द करणार. मुदतीत नळ कनेक्शन अधिकृत न केल्यास प्रशासना मार्फत काय कार्यवाही होणार आहे. पाण्यावर खर्च होतो. उत्पन्न वाढत नाही. चर्चा होते. अंमलबजावणी नाही. ज्याचे नळ कनेक्शन काढले. त्यानंतर ते लोक पुन्हा नळ कनेक्शन अनाधिकृतपणे चालू करणार यात शंका नाही.

श्री अंबादास दानवे : ठळक वैशिष्टया नुसार प्रस्ताव का येत नाही. म्हणून बऱ्याचवेळा चर्चा झाली. त्यानुसार उशीरा का होईना, प्रशासनाने प्रस्ताव सादर केला. त्याबद्दल प्रशासनाचे या सभागृहातर्फे अभिनंदन केले पाहिजे. प्रस्तावात क्र. १ मध्ये दिले. सदरील योजना ही १९९५ पुर्वीच्या वस्तीस तसेच लाभ धारकांचे नांव १९९५ च्या मतदार यादीत असेल. त्यांनाच लागू होईल किंवा त्या वस्तीत गुंठेवारी प्रमाणे विकास केला जाईल. अशा वस्तीस लाभ मिळेल

असे दिले. नियम काय आहे हे आयुक्त बघतील. परंतु, काही दुरुस्त्या सुचवित आहे. शासनाचे गुंठेवारी विकास योजनेचा दिनांक २०-४-२००१ अध्यादेश नुसार १ जानेवारी २००१ पासून गुंठेवारी लावण्याची परवानगी दिलेली आहे. त्याआधारे नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठीचे काम सुरु पाहत आहोत. १९९५ पूर्वीच्या ऐवजी १ जानेवारी २००१ पुर्वीच्या वस्तीस लागू होईल. अशी दुरुस्ती करण्यात यावी. वसुलीचे तसेच कचरा उचलण्याचे टारगेट ठरवून दिले. त्याप्रमाणे ज्या त्या झोन वाईज टारगेट ठरवून द्यावे. तरच ही योजना सफल होईल. इमारत निरिक्षक यांना किमान १० नळांचे टारगेट ठरवून देऊन नळ शोध मोहीम हाती घ्यावी. १००% कोणतीच योजना सफल होत नाही. परंतु जेव्हढे प्रयत्न होतील. तेव्हढे करावे. या पध्दतीने कार्यवाही केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. प्रस्ताव जशाच्या तसा मंजूर करण्यास हरकत नाही.

मा. आयुक्त : मागील बजेट मध्ये अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्याचा निर्णय झाला होता. अभय योजना राबवितांना ज्या त्रूटी निर्माण झाल्या त्या संदर्भात मागील नोव्हेंबरच्या सभेत चर्चा सुध्दा झाली होती. प्रशासकीय कार्यवाही केलेली आहे. अनाधिकृत नळ कनेक्शन शोधण्याची जबाबदारी महानगरपालिकेने घेतलेली होती. रु. १,२००/- दंड लावण्यात आलेला होता. त्यानंतर असा प्रश्न निर्माण झाला की, लहान नळ कनेक्शन आणि मोठे नळ कनेक्शन यांचेसाठी किती दंड आकारणी करायची व्यावसायिकासाठी किती करायची व केव्हा पासून करायची असा प्रश्न निर्माण झाला तरी, सुध्दा रु. १,२००/- घेऊन काहींना नळ कनेक्शन अधिकृत करुन दिलेले आहे. जो प्रतिसाद मिळावयास पाहिजे होता तो मिळालेला नाही. आता ही योजना राबविण्यासाठी इतर महानगरपालिकेकडून माहिती घेऊन वन टाईम प्रिमीयम घेऊन ही कार्यवाही करणार आहेत. याला दंड म्हणून म्हणू शकत नाही. कारण काहींना १०, ७, ५, ३ वर्षापासून नळ कनेक्शन घेतलेले असेल. त्याची निश्चित माहिती प्रशासनाकडे नाही. वन टाईम प्रिमीयम घेणार आहे. त्यानंतर दरवर्षी पाणीपट्टी लाऊन वसुली करणार आहे अनाधिकृत इमारत आहे. नळ कनेक्शन देणार पैसे घेणार बिल्डींग डिमालीश झाल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करणार आहोत. यामध्ये आपण ३ कॅटेगरी ठेवलेल्या आहे. स्लमसाठी कमी लावलेले, निवासी वापरासाठी त्यापेक्षा जास्त असून, व्यावसायिकासाठी आणखी जास्त लावलेला आहे. तसेच, पाण्याचे कनेक्शनची जी साईज आहे. त्यामध्ये आपण वेगवेगळे दर लावलेले आहे. एकच ठेवले असते तर, अन्यायकारक होऊ शकले. हे वन टाईम प्रिमीयम आहे. त्यानंतर त्यांना फक्त पाणीपट्टी भरावी लागेल ते केव्हा पासून नळ वापरतात. याची सुध्दा आपण विचारणा करणार नाही. पहिल्यांदा आपण भेट देणार आहे. त्यानंतर वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देणार, लाऊड स्पीकर लाऊन सुध्दा जाहीर करणार आहेत. स्वत: पैसे भरुन नळ कनेक्श्न घ्यावे. अशी मागणी करणार आहेत. त्यानंतर निश्चित वेळ देणार आहेत. त्यानंतर नळ अधिकृत केले नाही व तसे आढळून आल्यास प्रस्तावात क्र. ४ मध्ये सुचविलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ही योजना राबवितांना टीम तयार करुन कार्यवाही करणार आहेत. जास्तीचे प्रिमीयम लावलेले

नाही. १,२००/- रु. लावलेले आहे. दोन वर्षाचे असे मिळून ३,०००/- रु. लावलेले आहे. यात काहींना १०, ५, २ वर्षे झाले असतील, दुसऱ्या क्रमांकात ३/४" (२० मी. मी.) साठी ४,८७५/- आकारणी करणार आहेत. दरवर्षी १,९००/- पाणीपट्टी ऑलरेडी घेत आहेत. दोन वर्षाचे ३,८००/-रुपये होतात. १,०००/- ते १,१००/- जास्तीचे सुचविले आह. जे व्यावसायिक आहेत, त्यांच्यासाठी जास्त लावलेले आहेत. ते लावणे साहजीकच आहे. कारण, पाण्याचा वापर सुध्दा तेवढाच होतो. याला दंड म्हणू शकत नाही. वन टाईम प्रिमीयम घेऊन नळ कनेक्शन देणार आहेत. या प्रस्तावास मान्यता द्यावी व आपण सुचविल्यानुसार झोन वाईज कर्मचारी देऊन ही कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर कलम २०० अन्वेये गुन्हा नोदंवणे, नळ कट करणे हे शेवटचे उपाय आहेत.

श्री प्रकाश निकाळजे : नागरिकांवर गुन्हा दाखल करणे योग्य होणार नाही. प्रत्यक्ष नळ कनेक्शन तपासणीसाठी एक टीम तयार करुन, कमीत कमी ५० लोक तपासणीसाठी द्यावेत. मालमत्ता कर, पाणीपट्टी भरलेली आहे किंवा काय याची सुध्दा तपासणी या बरोबर होईल.

श्री प्रशांत देसरडा : रु. ३,०००/- कोणीही लोक भरणार नाही. दोन वर्षाचे प्रिमीयम ठेवले यात बदल करुन एकाच वर्षाचे प्रिमीयम आकारावे.

श्री स. अली सलामी : जनता महानगरपालिकेकडे नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी आली पाहिजे. अशा पध्दतीने कार्यवाही व्हावी. आपले कर्मचारी जातील कार्यवाही करतील. परंतु, जास्त रक्कम ठेवल्यास कुणीही पुढे येणार नाही. नळ काढल्यानंतर पुन्हा जोडतील. नळ अधिकृत करण्यासाठी दोन वर्षाचे न लावता, १ वर्षाचे प्रिमीयम लावावे. १००/-, १५०/-, रु. दंड ठेवावा. २,०००/- ३,०००/- ठेवल्यास कुणीही येणार नाही. थकीत पाणीपट्टी वसुल करावी. ३,०००/- रेट जास्त होतात. मागील कित्येक वर्षाची पाणीपट्टी थकीत आहे. आपल्याकडे सर्व रेकॉर्ड आहे ती वसुली न करता, नळ कनेक्शन घेणाऱ्यावर ३,०००/-चार्ज लाऊन एवढी जास्त रक्कम ठेवून कार्यवाही करणे बरोबर होणार नाही. कमीत कमी ठेवावे. जेणे करून ९०% लोक स्वतःहून नळ कनेक्शन अधिकृत करण्यास येतील. गुन्हा वगैरे दाखल करुन योजना राबविली जाणार नाही. महानगरपालिके विरुध्द न्यायालयात केस दाखल करतील. जे घेण्यास तयार आहे. अशांना या रक्कमेत सवलीती द्याव्यात.

श्री संजय शिरसाठ : एक वर्षाचे प्रिमीयम ठेवावे. १,२००/- ते १,४००/- रु. घेण्यात यावे.

मा. महापौर : दोन वर्षाचे प्रिमीयम लाऊन कार्यवाही करावी. असे दिले आहे.

श्री तकीहसन खान : नविन कनेक्शन साठी १,२००/-, १,४००/- रु. भरावे लागतात. तेव्हढी रक्कमच आकारावी. असे मत मांडले फिस जेव्हढी लागते तेव्हढी आकारणी होत आहे. ज्यांचे अनाधिकृत आहे. त्यांच्यासाठी तेव्हढेच व ज्यांना नविन घ्यायचे त्यांच्यासाठी तेव्हढेच हे बरोबर आहे काय? कर भरलेला असेल तरच त्यांना नविन नळ कनेक्शन देता येईल.

मा. महापौर : दोन्हीसाठी सारखेच फिस भरावी लागेल.

श्री संजय शिरसाठ : कार्यवाही काय करणार आहे बंद ठेवणार की, नळ कनेक्शन देणार आहे.

मा. आयुक्त : नळ कनेक्शन देतांना मालमत्ता कर भरलेला आहे का? तो लागु करण्यात आला. याचा विचार करावाच लागणार आहे. सिडको-हडको भागात प्रॉपर्टी महानगरपालिकेने लावलेले नाही. परंतु शहरामध्ये प्रॉपर्टी टॅक्स महानगरपालिकेने लावलेला आहे. ज्यांच्या घरांना टॅक्स लावलेला नाही व नळ कनेक्शन घ्यायचे. असा नळ धारकांनी तशी माहिती प्रशासनाकडे कळवावी. त्यामुळे त्यांना नळ कनेक्शन दिले जाईल व प्रॉपर्टी टॅक्स साठी ते प्रकरण संबंधित विभागाकडे पाठविले जाईल.

श्री संजय शिरसाठ : काही लोक नळ कनेक्शन घेण्यास तयार आहे. परंतु आपले अधिकारी / कर्मचारी रजिष्ट्री पी. आर कार्ड दाखवा असे सांगतात. त्यामुळे येणारे लोक पुढे येत नाही.

मा. आयुक्त : कर लावला असेल तर, ठिक आहे. परंतु लावला नसेल तर, तशी नोंद केली जाईल व नळ कनेक्शन देण्याची त्यासोबतच मालमत्ता कर लावण्याची काय्रवाही केली जाईल.

श्री काशीनाथ कोकाटे : ज्याप्रमाणे सिडकोला मालमत्ता कर बंधनकारक नाही. शहरात अनेक अनाधिकृत वसाहती आहे. तेथे मालमत्ता कर लावलेला नाही. अशा ठिकाणी काम करणार.

मा. आयुक्त : महानगरपालिका हद्दीत असलेल्या मिळकतींना मालमत्ता कर लावण्याचा तो लिगल, इनलिगल असण्याशी संबंध नाही. इमारत पाडली तर कर संपला जसे अकृषी वापर असेल तर, अकृषी धारा घेण्यात येतो. वापर नसेल तर नाही. एल. ए. लागतो. तेथे आपण प्रॉपर्टी टॅक्स घेतो.

श्री काशीनाथ कोकाटे : महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये ज्या मालमत्ता आहे. त्याला कर लावण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे असे आयुक्तांच्या उत्तरातून मिळते. महानगरपालिका हद्दीच्या सीमीत प्रॉपटी टॅक्स लावावयस पाहिजे. यानंतर गुंठेवारीचा प्रस्ताव चर्चेला येणार आहे. काही वसाहतीमध्ये गुंठेवारी पध्दत लागू करण्याच्या अगोदर त्या भागात विकास केलेला आहे. पाणी दिलेले आहे. या बाबतीत प्रशासनाचे मत मागविलेले आहे. विकास कामे करण्यासाठी घर कर आकारणी होते व त्यानुसार त्या भागात विकास कामे केली जातात. अनाधिकृत वस्त्यामध्ये कर लावणार असाल तर, तेथे सुविधा सुध्दा देणार आहेत का? याचा सुध्दा खुलासा करावा.

प्र. कार्यकारी अभियंता (पा. पु.) : एका वर्षाचे विचार केल्यास मागील एक वर्षाचे १,२००/- रु. व चालू पाणीपट्टी १,२००/- असे २,४००/- रु. भरावे लागतील. आपण १,२००/- रु. पुर्व वर्षाचे ॲडव्हॉन्स घेत आहोत.

मा. महापौर : घरगुती वापरासाठी १ वर्षाचे प्रिमीयम आकरणी करुन नळ कनेक्शन देण्यात यावे. तसेच व्यावसायिकांसाठी जे दर दिले आहे. त्यास जशाच्या तशी मान्यता देण्यात येते. ही योजना लागू केल्यापासून १ महिन्याच्या आत पूर्ण करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन २००१-२००२ या अर्थसंकल्पात ठळक वैशिष्टये यामध्ये समाविष्ट असलेली "अभय योजना" या योजने अंतर्गत प्रस्तावात नमुद केलेले अ.क्र. १ ते ४ या बाबीस अधिन राहून खालील दराप्रमाणे अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्याचे काम ही योजना लागू केल्यापासून एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**घरगुती वापरासाठीचे दर**

| | |
|---|---|
| १/२" (१५ मी.मी.) मीटर रहित | एक वर्षाची पाणीपट्टी म्हणजे |
| ३/४" (२० मी.मी.) मीटर रहित | वन टाईम प्रिमीयम (नजराणा) अधिक नियमाप्रमाणे वसुल करावयाची रक्कम. |
| १" (२५ मी.मी.) मीटर रहित | |

याशिवाय व्यावसायिक उपयोगासाठी असलेले अनाधिकृत नळ कनेक्श्न अधिकृत करतांना प्रस्तावित दरानुसार आकारणी करुन, नळ कनेक्श्न अधिकृत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६४/३ :**

प्रस्तावित करण्यात येते की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर आरोग्य वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ या संवर्गात पद अस्तित्वात आहे. या पदाची वेतन श्रेणी रुपये १०,०००-३२५-१५,२०० अशी आहे. या पदावर सध्या डॉ. डी. एस देशपांडे हे कार्यरत आहेत. नगरविकास विभाग यांचे दिनांक १२-१०-२००० नुसार डॉ. देशपांडे यांना रुपये १२,०००-३७५-१६,५०० ही वेतन श्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे. डॉ. देशपांडे हे नियत वयोमानानुसार आहे. जुलै २००२ मध्ये सेवानिवृत्त होत आहे.

सन २००१ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद शहराची लोकसंख्या ८,७२,००० एवढी आहे. या लोकसंख्येच्या तुलनेने शहरातील नागरिकांना आरोग्य विषयक सोयी उपलब्ध करुन देण्याच्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाच्या जबाबदारीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे आरोग्य विषयक कामाचा व्याप लक्षता घेता. डॉ. देशपांडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा निवृत्ती नंतर आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद राज्य शासनाच्या आरोग्य खात्यातील उप-संचालक या संवर्गातील अधिकाऱ्यांमधून औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रतिनुयक्तीने भरण्यात यावे. असे प्रस्तावित करण्यात येते. सदर पदाची वेतन श्रेणी रुपये १२,०००-३७५-१६,५०० अशी आहे. प्रस्ताव मान्य झाल्यास पुढील कार्यवाहीसाठी शासनास कळविण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ. आशा बिनवडे : महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सद्यस्थितीत आरोग्य वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ चे पद अस्तित्वात आहे. या पदावर डॉ. देशपांडे हे कार्यरत असून या पदाची वेतनश्रेणी १०,०००-३२५-१५,२०० अशी आहे. कार्यरत असलेले डॉ. देशपांडे हे दिनांक १२-१०-२००० चे शासन निर्णय रु. १२,००० ते १६,५००/- या वेतनश्रेणीत आहेत व नियम वयोमानानुसार माहे जुलै २००२ मध्ये ते सेवानिवृत्त होत आहे. सन २००१ नुसार या शहराची लोकसंख्या १० लाखापर्यंत गेली. शहरातील नागरिकांना आरोग्य विषयक सोयी उपलब्ध करुन देणाऱ्या आरोगय वैद्यकीय अधिकारी या पदाच्या जबाबदारीमुळे दिवसेदिवस वाढ झालेली आहे. त्यामुळे आरोग्य विषयक कामाचा व्याप लक्षात घेता, डॉ. देशपांडे यांचे निवृत्ती नंतर आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद राज्य शासनाच्या आरोग्य खात्यातील उप-संचालक या संवर्गातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे. असे प्रस्तावित

करण्यात आले. हा प्रस्ताव जशाच्या तसा मंजूर करावा. शासनाचेच अधिकारी असावेत असे माझी सूचना आहे. याच बरोबर पुणे, ठाणे, नाशिक महानगरपालिकेत असिस्टंट मेडीकल ऑफिसरच्या पोस्ट आहेत. त्याप्रमाणे येथे असावित याचा विचार व्हावा.

मा. महापौर : हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. प्रशासनाने पुढील कार्यवाही नियमाने करावी. या प्रस्तावाबाबत सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रशासनास सुचविले होते. त्याबद्दल अभिनंदन करतो. तसेच स. सदस्या डॉ. बिनवडे यांनी सूचना केल्यानुसार प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराच्या लोकसंख्येच्या तुलनेत शहरातील नागरिकांना आरोग्य विषयक सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ या संवर्गातील पद राज्य शासनाच्या आरोग्य खात्यातील उप-संचालक या संवर्गातील रु. १२,०००-३७५-१६,५०० या वेतनश्रेणीच्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीवर भरण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६५/४ :**

मा. सर्वसाधारण सभेमध्ये प्रशासनातर्फे विविध विषयासंबंधाने वेळोवेळी प्रशासकीय प्रस्ताव ठेवण्यात येतात. त्याशिवाय स. सदस्यांचे अशासकीय प्रस्ताव सुध्दा सर्वसाधारण सभे समोर येत असतात. असे प्रस्ताव पारीत झालेले ठरावे अंमलबजावणीच्या वेळी काही ठराव नियमात बसत नसल्यामुळे तसचे काही वेळा आर्थिक तरतुद नसल्यामुळे सदर ठरावावी. अंमलबजावणी करण्यास प्रशासनासमोर अनेक अडचणी येतात. तसेच काही प्रकरणामध्ये ठरावाची अजिबात अंमलबजावणी करता येत नाही. असे सुध्दा प्रस्ताव मंजूर होतात. त्यामुळे सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव पारीत होऊनही प्रशासन कार्यवाही करीत नाही. अशा प्रकारची भावना स. सदस्य आणि शहरातील नागरिकांमध्ये निर्माण होते. त्यामुळे प्रशासनाबाब नागरिकात गैरसमज आणि असंतोष होतो.

अशा प्रकारच्या अशासकीय प्रस्तावाबाबत काही महानगरपालिकेमध्ये ऐनवेळी प्राप्त झालेले प्रस्ताव दाखल करुन तील महिन्यात सदर प्रस्तावाची रितसर प्रशासनामार्फत छाननी करुन सर्वासाधारण सभेसमोर ठेवले जातात आणि त्यावर चर्चा करुन निर्णय घेताला जातो.

वरील विवेचना करुन प्रस्तावित करण्यात येते की, यापुढे होणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये ऐनवेळेचे असलेले अशासकीय प्रस्ताव दाखल झाल्यानंतर ते प्रशासनाकडे पाठवावे. या प्रस्तावांची प्रशासनातर्फत रितसर छाननी करुन पुढील तीन महिन्यांचे आत सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यात येईल. त्यावर सर्वसाधारण सभेत चर्चा करुन निर्णय घेण्याची कार्यवाही करणे योग्य राहील.

प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

नगरसचिव : (प्रस्ताव वाचून दाखवितात.)

श्री प्रशांत देसरडा : येणाऱ्या अर्थसंकल्पानुसार असे विषय कमी होणार आहेत. बजेट येणार आहे ते वर्क वाईज येणार आहे. त्यामुळे जो प्रशासनाचा संशय आहे तो निघून जाईल. हया प्रस्तावावर विचार होऊन योग्य निर्णय व्हावा.

श्री काशीनाथ कोकाटे : यापूर्वीच्या अनुभव पाहता स. सदस्य प्रस्ताव ठेवतात. तो प्रस्ताव फायदेशीर असो किंवा नसो पास करुन घेतात. त्यामुळे नियमात बसत नसेल तर, प्रशासनास काम करण्यास अडचण निर्माण होते व प्रस्ताव पास झाल्याचे फक्त समाधान सदस्यांना होते. त्यासाठी प्रशासनाने अशा प्रस्तावावर निर्बंध घालण्याच्या दृष्टीने प्रस्ताव ठेवलेला आहे. तो योग्य आहे असे वाटते. जे प्रस्ताव ठेवायचे ते प्रशासनाच्या वतीने ठेवण्यात यावे. परंतु यामध्ये तीन महिन्याचा जो कालावधी दिला तो? महिन्याचा करावा कारण एखादे काम एक वर्षात करावयाचे झाल्यास व तीन महिन्यानंतर प्रस्ताव प्रशासन आणणार ते अशी कामे होणार नाही. प्रस्तावा संबंधी जी पुर्तता करायची ती करण्यात यावी व तसा प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर व्हावेत.

मा. महापौर : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण २ आणि शासनाने जादा मंजूर केलेले सभा कामकाज नियमावलीत " अशासकीय प्रस्ताव " असा कोठेही उल्लेख नाही. नियम १ (ज) प्रमाणे सदस्यांना सभेच्या तीन दिवस अगोदर नगरसचिव यांचेकडे प्रस्ताव पाठविता येतो व नगरसचिव यांनी सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावाचा पुरक घोषणा सभेपूर्वी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दीला देणे बंधनकारक आहे. प्रशासनाकडून आलेले काम / प्रस्ताव व सदस्यांकडून आलेली कामे ही सभेमध्ये सन्माननीय सदस्यच एकमताने / बहुमताने मंजूर करतात. कायदयाच्या चौकटीत प्रशासनाचे किंवा सदस्यांनी ठेवलेले प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर दोन्ही ठरवाला तेवढेच महत्व प्राप्त होते. हा निर्णय सभागृहाचा आहे. अशासकीय प्रस्ताव म्हणण्या ऐवजी सन्माननीय सदस्यांचे प्रस्ताव म्हणजे योग्य हेते.

सभागृहात प्रशासनातर्फे मा. आयुक्त व सर्व विभाग प्रमुख असतात. मा. आयुक्तांना सदस्यांप्रमाणेच प्रस्तावावर हरकतीचा मुद्दा उपस्थित करतो येतो. कलम ४३ (२) अन्वये अधिकारी प्राप्त आहेत व प्रशासनाने आपली बाजू मांडण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास या सभागृहाने केव्हांही रोकथांब केलेली नाही. सन्माननीय सदस्यांचे प्रस्ताव प्रशासनाकडे पाठवावयाची तरतुद नियमात नाही.

सभा कामकाज नियमावीलचे नियम क्र. १ (र) प्रमाणे तीन महिन्यानंतर ठरावात फेरबदल करता येतो किंवा ठरावाद्वारे रद्द करता येतो. ही कार्यवाही प्रशासनाला हा प्रस्ताव न ठेवताही करता आला असता. जे जे सदस्यांनी ठेवलेले प्रस्ताव मंजूर होतील त्या ठरावांची छानणी प्रशासनाने करावी व ज्या ठरावांची अंमलबजावणी करता येत नाही. त्यांचे कारणासह प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर तीन महिन्यानंतरच्या पहिल्यांच सभेत प्रशासनाने सभागृहापुढे प्रस्तावाच्या स्वरुपात आपले म्हणणे मांडावे व असे झाले नाही तर, त्या प्रस्तावाचे अंमलबजावणीस अडचण नाही. असा सभागृह निर्णय घेत आहे. यानंतर मात्र प्रशासानाने अंमलबजावणीत अडथळे निर्माण करु नयेत.

श्री काशीनाथ कोकाटे : काही प्रस्ताव मंजूर होऊन ३ महिन्यावर कालावधी झाला. त्यावर अंमलबजावणी झाली किंवा काय हे प्रशासनाने नियमाने ३ महिन्याच्या आत सभागृहास कळविलेले नाही. याचा अर्थ असे प्रस्तावावर अंमलबजावणी व्हावयास पाहिजे असे नियमात आहे. परंतु, तशी कार्यवाही झाल्याचे दिसून

येत नाही. यामुळे सभागृह व प्रशासन यांचेत दुरावा निर्माण होत आहे. यासाठी प्रशासन व संबंधित नगरसेवक यांचे एकमत असले पाहिजे. वार्डात काम झाले पाहिजे. समजोत्याची भूमिका घेऊन निर्णय घ्यावा. कारण प्रशासनाने प्रस्ताव दिला असला तरी, आपल्या सही नुसारच विषयपत्रिकेवर आलेला आहे, म्हणून जर हा प्रस्ताव लोकहिताच्या दृष्टीकोनातून घ्यावयाचा असेल तर, अशा प्रस्तावास आपल्या सहीने संबंधित विभागाकडे असे प्रस्ताव पाठवावेत. समजा एखादया वार्डात मंगल कार्यालय करायचे असे प्रस्तावावर संबंधित विभागात मार्क करुन कार्यवाही करावी व १ महिन्यांच्या आत प्रशासनाचा अहवाल मागवावा. कार्यवाही प्रस्ताव सादर झाल्यास तो सभेस पास होणारच व काम सुध्दा होणार, शंका निर्माण होणार नाही. आपण नुसते ठराव पास करणार कामास अडचणी येणार त्यास स. सदस्य काही करु शकत नाही. ही परिस्थित आहे. वस्तुस्थितीला धरुन निर्णय घ्यावा.

मा. महापौर : या प्रस्तावानुसार कार्यवाही करावी. अशी नियमास तरतुद नाही म्हणून, असा प्रस्ताव आणण्याची मुळात गरजच नव्हती. स. सदस्यांचे प्रस्ताव चर्चेला येतात. त्यावेळी मा. आयुक्त तसेच संबंधित अधिकारी, विभाग प्रमुख सभागृहात असतात. त्यावेळी ते योग्य तो खुलासा करु शकतात. आपली बाजू मांडू शकतात.

श्री काशीनाथ कोकाटे : नियमात प्रस्ताव बसत नाही. हे १००% बरोबर आहे. परंतु, हा प्रस्ताव आपल्या सहीनेच सादर झाला. त्यावेळीच का घेण्यात आला. असे माझे मत आहे. काम होण्याच्या दृष्टीने चांगला निर्णय घेण्यात यावा.

श्री प्रकाश निकाळजे : प्रस्ताव ठेवणे अगर न ठेवणे हे महापौरांचे अधिकार आहे. परंतु प्रस्ताव नियमात आहे किंवा काय या संबंधी मत नोंदवून घेणे प्रशासनाचे काम आहे. म्हणून असा ठराव आणण्याची आवश्यकता नव्हती. कारण प्रत्येक सभेला आयुक्त उपस्थित असतात, विभाग प्रमुख असतात, त्यांनी त्यांचे मत मांडावे. उदया नगरसेवक व नागरिकांमध्ये वेगळया भावना निर्माण होतील. जे प्रस्ताव मांडावयाचे ते मांडता येणार नाही. प्रश्नाबाबत आपण नवीन पध्दत सुरु केली. त्या बद्दलचा खुलासा दिला जातो. त्याप्रमाणे ठराव मंजूर झाल्यानंतर काम करता येईल किंवा काय याबाबत खुलासा देण्यात यावा.

**ठराव** :

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव रद्द करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र. ५६६/५ :**

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमीतीकरण श्रेणी वाढ करणे व नियंत्रण अधिनियम २००१.

महाराष्ट्र शासनाने दिनांक २०-०४-२००१ रोजी महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ अन्वये विवक्षित गुंठेवारी विकासाचे नियमाधीकरण व श्रेणीवाढ करणे, यासाठी गुंठेवारी विकासाचे नियंत्रण करणे आणि त्यांच्याशी संबंधित व तदनुषंगीक बाबीसाठी तरतुद करण्याकरीता अध्यादेश काढला आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिका औरंगाबादसाठी प्रकल्प विभागातर्फे प्रस्ताव ठेवण्यात आला होता. या विषयासाठी दिनांक ६-७-२००१ रोजी

महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा होऊन त्यात विषय क्र. ४४४/१ अन्वये ठराव पारित करण्यात आला.

या ठरावात महानगरपालिकेच्या वतीने प्रस्तावित अध्यादेशाच्या अंमलबजावणीसाठी निर्णय, नोटीस देणे व इतर दस्तऐवज अधिप्रमाणित करण्याचे अधिकार उप संचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यात आले होते. आता हे पद रद्द झाले असून, महानगरपालिका औरंगाबादसाठी सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद हे पद आहे. करीता, वरील ठरावात उप-संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबादच्या ऐवजी सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांना हे अधिकार देण्यात येतात. असा बदल करावा लागेल.

तसेच, या ठरावास शासनाचे मान्यतेस्तव पत्र क्र. मनपा/प्रकल्प/८२४/२००१ दिनांक २४-१०-२००१ रोजी या पत्रान्वये पाठविण्यात आले असून, याची अद्याप मान्यता आलेली नाही. या ठरावात एकूण ३ मुद्याबाबत शासनाकडे मार्गदर्शन अपेक्षिलेले आहे. पैकी शेवटच्या ३ क्रमांकाबाबत सर्वसाधारण सभेने विकास शुल्क (विकास आकार) या संबंधित नगररचना विभाग व प्रकल्प संचालक व सन्माननीय सदस्य श्री. सय्यद अली सलामी श्री. भगवान रगडे, श्री राजु शिंदे, सौ साधना सुरडकर व सौ निखत परविन ईजाज अली यांची समिती नेमण्यास व या समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन विकास शुल्क (विकास आकार) व प्रशमन शुल्क किती आकारवयाचा ही बाबत माहिती १५ दिवसात सभागृहास देण्यास मान्यता दिली होती. परंतु आता या विकास शुल्क (विकास आकार) व प्रशमन शुल्काबाबत शासनाने आदेश क्रमांक अनवां/१०२०/४८०/प्र.क्र. ७९/भाग-२ नवि-२० दिनांक १८-०५-२००१ रोजी आदेश काढून सदर गुंठेवारी विकासासाठी कमाल मर्यादित विकास आकार व प्रशमन शुल्क निर्धारित करुन दिलेले आहे. त्यामुळे आता सदर समिती तर्फे कार्यवाही होण्याची आवश्यकता नसल्याने सदर समिती बरखास्त करणे आवश्यक आहे. तसेच विकास आकार व प्रशमन शुल्काचे ४ कमाल दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रशमन शुल्क (रु./चौ. मी.) | महानगरपालिका क्षेत्र |
| | अ) अनाधिकृत भूखंड | रु. २५/- |
| | ब) अनुज्ञेय च. क्षे. नि. पेक्षा अधिक | रु. १००/- |
| | केलेले बांधकाम (तळघर, पोटमाळा, बाल्कनी व बंद केलेली बालकनी यांच्या वाढीव बांधकामासह) | रु. १००/- |
| | क) तळमजल्या वरील अनुज्ञेय असलेल्या बांधकामापेक्षा वाढीव बांधकाम (आवश्यक त्या सामासिक जागेत केलेले बांधकाम व प्रोजेक्शनसह) | रु. ५०/- |
| | ड) प्रवेशद्वारा जवळील छपराचे विहित मर्यादेपेक्षा अधिक केलेले बांधकाम | रु. १०/- |
| २. | विकास आकार (रु./चौ. मी.) | |
| | अ) निवासी | रु. २४०/- |
| | ब) औद्यीगिक | रु. ३६०/- |
| | क) वाणिज्यिक | रु. ४८०/- |

वरील दर हे काही महानगरपालिकांनी विचारात घेवून त्याप्रमाणे कार्यवाही चालू केलेली आहे. सबब, औरंगाबाद शहरकरिता शासनाने मान्यता दिलेले वरील प्रशमन शुल्क व विकास आकार चे दर विचारात घेवून कार्यवाही चालू करण्यात येईल.

तसेच वरील ठरावात नमुद दिनांक ३०-०४-२००१ च्या अध्यादेशेचे दिनांक १ जानेवारी १९९५ रोजी अस्तित्वात असलेले सर्व गुंठेवारी विकास हे भूखंडधारकांनी कलम ४ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे नियोजन प्राधिकरणाकडे याबाबत अर्ज केल्यावर नियमाधीन करण्यासाठी विचारात घेण्यास पात्र असतील असे म्हटले आहे. त्याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक १३ ऑगस्ट २००१ रोजी सदर अध्यादेशचे रुपांतर कायद्यात करुन शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहे.

दिनांक १३-०८-२००१ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमीतीकरण व श्रेणी वाढ करणे आणि नियंत्रण) अधिनियम २००१ नुसार १ जानेवारी २००१ पूर्वीचे अस्तित्वात असलेले सर्व गुंठेवारी विकास हे भूखंड धारकांनी कलम ४ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे नियोजन प्राधिकरणाकडे याबाबत अर्ज केल्यावर नियमाधिन करण्यासाठी विचार घेण्यास पात्र असतील असे म्हटले आहे. करीता, वरील ठरवात दिनांक १-१-१९९५ ऐवजी १-१-२००१ असा बदल करावा लागेल.

करीता, वरील बाबतची माहिती सभागृहासमोर आणणे आवश्यक आहे व दिनांक ०६-०७-२००१ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या ठराव क्रमांक ४४४/१ मध्ये वरील प्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. करीता, वरील माहिती मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**संवाद :**

नगरसचिव : (प्रस्ताव वाचून दाखवितात.)

श्री दत्तात्रय थोरात : मागील वेळेस आम्ही नागरिकांसह मोर्चा काढला होता त्यावेळी, प्र. आयुक्त मा. श्री. व्ही. रमणी साहेब यांनी सांगितले की, अनाधिकृत वस्त्यामध्ये सुविधा दिल्या त्या बंद कराव्या असे कुठे जी. आर. मध्ये दिलेले आहे का? याबाबत संबंधित अधिकारी खुलासा देणार होते. त्याचा आज खुलासा करावा. त्यानंतरच या विषयावर चर्चा करावी.

श्री भगवान घडामोडे : गुंठेवारीचा ठराव पास करुन शासनाकडे पाठविलेला आहे. आज दर निश्चितीसाठी प्रस्ताव आला. गुंठेवारीचा सुधारित प्रस्ताव पास करुन शासनाकडे पाठविला. त्याबाबत काय झाले त्याचा सुध्दा खुलासा देण्यात यावा. त्यानंतरच दर निश्चित करणे योग्य होईल. या प्रस्तावामध्ये २०X३० चा प्लॉटसाठी किती खर्च येणार आहे. ते सुध्दा नमुद करावयास पाहिजे होते. त्याचा सुध्दा खुलासा करावा.

प्र. सहाय्यक संचालक (नगररचना) : महाराष्ट्र शासनाने गुंठेवारीसाठी एक जी. आर. काढला, मागच्या सभेत चर्चा झाली व ज्या दुरुस्ती सूचना केल्या त्यानुसार प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. त्याचे उत्तर अद्याप आलेले नाही. विकास कर, विकास शुल्क किती लागेल यासाठी एक समिती गठीत केली व अहवाल १५ दिवसात द्यावा असे ठरले होते. दरम्यान पुन्हा शासनाकडून अध्यादेश आलेले असून, दर निश्चित केलेले आहे जे दर ठेवण्यात आले ते आताच वाचुन दाखविण्यात आलेले आहेत. गुंठेवारीच्या प्रस्तावात महानगरपालिकेने प्रतिचौरस प्रमाणे किंवा चौरस फुटाप्रमाणे दर लावावे. हे सुध्दा नमुद केलेले होते. आता २०X३० च्या प्लॉटचे कमाल दराप्रमाणे सुमारे २० ते २५ हजार होतील. कॅलक्युलेशन केले तर, कमी जास्त होण्याची शक्यता आहे. गुंठेवारीचा विकास करतांना स्वतंत्र्य नियोजन करुन विकास आराखडा तयार करुन शासनाकडून मान्य करुन घ्यावे लागणार आहे. जो

पैसा जमा होईल. त्यातील १५% प्रशासकीय खर्च वगळता जेव्हढा पैसा शिल्लक राहील. त्यातूनच विकास कामे त्या त्या भागात करावे लागेल.

श्री भगवान घडामोडे : अनुज्ञेच बांधकाम उदा. तळघर, पोटमाळ, बाल्कनी किती गृहीत धरणार आहेत. अनाधिकृत वस्तीमध्ये हे काम करणे शक्य शक्य होणार आहे का?

प्र. सहाय्यक संचालक (नगररचना) : आर-२ झोनमध्ये असेल तर, एकच एफ. एस. आय. अनुज्ञेय आहे. नियमाप्रमाणे जागा सोडावी लागणार आहे. त्या संबंधीचा यात समावेश करणार आहेतच. अनाधिकृत व रस्त्याचा सर्व्हे करावा लागेल. तसेच जी. आर. मध्ये अंतर्गत केल्या नुसार जे की, रस्ते किती ओपन स्पेस किती पाहिजे. यासाठी सध्या ५ वस्त्यांचे सर्व्हेचे काम करुन संभाव्य खर्च किती येईल, याची पडताळणी करण्यात येत आहे.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : दिनांक २४-१०-२००१ रोजी दुरुस्तीचा प्रस्ताव पाठविला होता. असे नमुद केले. प्रस्तावात शासनाचे पत्र १८-५-२००१ ला आले. असे दिले. ते पत्र केव्हा मिळाले हा प्रश्न आहे. कारण प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे आता कमीटी गठीत करण्याची आवश्यकता नाही. असे दिले. शासनाचे पत्र केव्हा मिळाले. कारण गुंठेवारी संदर्भात दि. ६-७-२००१ रोजी बैठक झाली. दिनांक १८-५-२००१ ला पत्र आले ते दिनांक ६-७-२००१ च्या बैठकीत का सादर केले नाही. जे समिती स्थापन करण्याची आवश्यकता पडली नसती.

प्र. सहाय्यक संचालक (न.र.) : नगररचना श्री. गोस्वामी यांनी हे पत्र १ ते १ १/२ महिन्यापुर्वी आणलेले आहे.

श्रीमती डॉ.आशा बिनवडे : दिनांक ६-७-२००१ ला बैठक झाली. त्या बैठकीच्या वेळी हे पत्र नव्हते का? कारण जी समिती गठीत केली ती करण्याची गरज नव्हती त्याच बैठकीत दर निश्चित करता आले असते.

प्र. सहाय्यक संचालक (न. र.) : कदाचित हे पत्र तेव्हा आलेले नसावे, म्हणूनच तसे प्रस्तावात नमुद केलेले आहे.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : दिनांक ६-७-२००१ च्या बैठकीच्या अगोदर पत्र आलेले आहे. अधिकारी बरोबर खुलासा करीत नाही. मागील दिनांक ६-७-२००१ च्या बैठकीत सादर करावयास पाहिजे होते. एवढया गोष्टी घडल्या नसत्या कमीटी स्थापन करण्याची गरज पडली नसती. सदर पत्र दि. १८-५-२००१ ला आले असे नमुद केले. त्यानंतर दोन महिन्यांनी सभा झाली.

प्र. सहाय्यक संचालक (न. र.) : पत्र कुठे होते, याची माहिती घेऊन खुलासा करण्यात येईल.

श्री दत्तात्रय थोरात : अनाधिकृत वसाहतीत कामे करुन नये. असा जी. आर. आहे का? तो वाचुन दाखविण्यात यावा आपले अधिकारी यांना जी. आर. बद्दल सर्व माहिती आहे का? या सभेत खुलासा देणार होते. इतर महानगरपालिकेत अगोदर जर अनाधिकृत वस्त्यामध्ये सुविधा दिल्या गेल्या तर पुन्हा त्या भागात सुविधा दिल्या जातात. याच महानगरपालिकेत का दिल्या जात नाही. शासनाचे नियम सर्व महानगरपालिकेस सारखेच आहे. ड्रेनेज चोकअप झाला तेथे दुरुस्त केले जात नाही, रस्ते बंद केले, पाणी येत नाही. हे सर्व प्रश्न जनतेचे मुलभूत आहे. दिलेल्या सुविधा बंद कराव्या असे कुठेच

उल्लेख नाही. जेथे सुविधा दिल्या तेथे बंद करु नये. जेथे डांबरीकरण केले तेथे पुर्नडांबरीकरण करण्यात यावे. नविन रस्ते करु नये. जे काम केलेले आहे. त्यावर दुरुस्ती खर्च करावा. अशी माझी मागणी आहे.

श्री देसरडा प्रशांत : शासनाकडे आपण प्रस्ताव पाठविणार, शासन मंजूरी येण्यास वेळ लागेल. तोपर्यंत अनाधिकृत वस्त्यामध्ये सुविधा देण्याची कार्यवाही व्हावी. जी. आर मध्ये कुठेही उल्लेख केलेले नसतांना सुविधा का बंद केल्या.

श्री गायकवाड राधाकृष्ण : या प्रस्तावावर सविस्तर अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा. पुढील बैठकीत हा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

श्री काशीनाथ कोकाटे : या प्रस्तावात जे काही दर लावलेले आहे ते जास्त आहेत. या शहरात अनाधिकृत वसाहतीमध्ये अत्यंत दुर्बल घडकातील लोक राहतात. म्हणून जे दर दिले त्यात दुरुस्ती करुन प्रस्ताव मंजूर करावा. या अगोदर जी दुरुस्ती रस्ते व राखीव जागाच्या बाबत केले. कोणत्या भागात किती रस्ते व राखीव जागा आहेत. यासाठी २ ते ५ वसाहतीचा तुर्त सर्व्हे करण्यास प्रशासनास आदेशित करावे. त्यामध्ये महानगरपालिकेचा काय फायदा होतो. हे बघुन या प्रस्तावात दुरुस्ती करुन कार्यवाही करावी आणि हा प्रस्ताव मंजूर करावा. तुर्त शासनाकडे पाठवून कार्यवाही करावी.

श्री प्रकाश निकाळजे : शासनाने दर ठरवून दिले. दर ठरविण्याचा अधिकार शासनास नसून, या सभागृहाला आहे. आताच खुलासा केला की, २०X३० च्या प्लॉटसाठी किमान २० ते २५ हजार रुपये भरावे लागतील. गरीब जनता एवढे पैसे भरणार नाही. जो खर्च येतो. तो कमी करावा. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ) साठी २५ दिले ते १०/- करावे, ब) साठी १०० दिले, ते २५/- करावे. क) साठी ५०/- दिले. ते २०/- रु. करावे. तसेच ड) साठी जे १०/- रुपये दिले ते जशाच्या तसे ठेवावे. दोनमध्ये विकास आकार मध्ये निवासीसाठी दर कमी करावे. यातील ब व क जशाच्या तसे मंजूर करुन प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : अनाधिकृत वस्त्याच्या नावाखाली रस्त्याची दुरुस्ती सुध्दा करण्याचे बंद केले आहे. होत नसेल तर तसेच आयुक्तांनी लेखी द्यावे व कामे करण्यास आदेशित करावे. लोक पडत आहेत. यामुळे जनता आम्हाला त्रास देते.

श्री दत्तात्रय थोरात : प्रस्तावास आमचा विरोध नाही. परंतु ज्या भागात अगोदर सुविधा दिल्या तेथे दुरुस्ती करण्यासाठी खर्च करण्यात यावे. नसता तसे प्रशासनाने लेखी द्यावे. त्यानुसार न्यायालयात दाद मागु. नुसते आश्वासन देण्यात येते. मोर्चा काढला तेव्हा येणाऱ्या सर्वसाधारण सभेत खुलासा देण्यात येईल. असे आश्वासन दिले. शासनाच्या जी. आर. आला. त्यात दुरुस्ती करुन ८ दिवसात शासनाकडे पाठवून मंजूरी घेऊ परंतु २ वर्षे झाले. अद्याप शासनाकडेच प्रस्ताव पडून आहे. जनता कर भरते आम्हाला तोंड द्यावे लागते. देखभाल दुरुस्तीचे कामे होत नसतील तर, तसे लेखी स्वरुपात देण्यात यावे. कोणत्या जी. आर. च्या आधारे करता येत नाही ते सुध्दा नमुद करावे.

मा. महापौर : प्रशासनाकडून स. सदस्य श्री. थोरात यांना या संदर्भात लेखी उत्तर देण्यात येईल.

श्री साहेबराव कावडे : ड्रेनेज व पाणी पुरवठयाची अगोदर जी अनाधिकृत वसाहतीमध्ये कामे केली. त्याची देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात यावी. शासनाकडून या प्रस्तावास मंजूरी येईल तेव्हा येईल.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

प्र. सहाय्यक संचालक (न.र.) : गुंठेवारीच्या या प्रस्तावानुसार जो पैसा जमा होणार आहे. तो खर्च कसा करणार या बाबतीत थोडक्यात माहिती देण्यात येत आहे. नियमाधिन केलेल्या गुंठेवारी विकासाची श्रेणीवाढ तर प्रशमन शुल्कामुळे नियोजन प्राधिकरणार उपर्जित होणाऱ्या रक्कमा नियोजन प्राधिकरणाकडून रेखांक निहाय स्वतंत्र लेखा शिर्षखाली जमा करण्यात येतील. रेखाकंनातील जागेच्या वीज पुरवठया व्यतिरिक्त अन्य पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी त्या वापरण्यात येईल. जो पैसा भूखंड धारकांकडून वसुल करण्यात येईल. तो पैसा त्या त्या रेखांकनातील भागामध्ये खर्च करण्यात येईल. या जमा झालेल्या रक्कमेतून १५% खर्च प्रशासकीय खर्च राहील. उर्वरित रक्कम त्या त्या भागात खर्च केली जाईल. जे दर दर्शविलेले आहे. त्यात कमी केल्यास जास्त पैसा जमा होणार नाही व आवश्यक सुविधा देता येणार नाही.

मा. महापौर : नगरपालिकेपेक्षा प्रस्तावातील जे दूर लावले ते कमीच आहे. शासनाने सुध्दा दर मंजूर केले पाहिजे. विकास कामे करता आली पाहिजे. तेव्हढा निधी जमा झाला पाहिजे. या दृष्टीने ५०% आकारणी करावी. प्रस्ताव त्यानुसार मंजूर करण्यात येत आहे. शासनाकडे पाठपुरावा करु.

श्री थोरात दत्तात्रय : प्रस्ताव शासनाकडे पाठविल्या नंतर प्रशासनाकडे कोण कार्यवाही करणार आहे.

मा. महापौर : मा. आयुक्त हा प्रस्ताव शासनाकडे पाठवितील. सभागृहातर्फे कोणास पाठवावयाचे या बाबत निर्णय घेतला जाईल. पदाधिकारी सुध्दा पाठपुरावा करतील.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वार्डात ओपन स्पेस नाही, कोठून जागा सोडणार आहे.

मा. महापौर : गुंठेवारीचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. सर्व्हेचे काम होईल व आपल्या वार्डात ओपन स्पेस नाही. म्हणून, तशी नोंद होईल. असे सर्व प्रस्ताव सर्वसाधारण सभेत समोर येतील. त्यावेळी योग्य निर्णय घेवून शासनाकडे पाठविता येईल.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमीतीकरण, श्रेणी वाढ करणे व नियंत्रण) अधिनियम २००१ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील खाजगी जमीनीची पोट विभागणी वरुन तयार करण्यात आलेल्या (भूखंड) वसाहतीचा विकास करण्यासाठी शासन आदेश क्र. अनवा/१०२०/४८०/प्र.क्र. ७९/भाग-२/नवि-२० दिनांक १८-५-२००१ अन्वये कमाल मर्यादेतील गुंठेवारी विकासासाठी आकारण्यात येणाऱ्या विकास आकार व प्रश्मन शुल्क यामध्ये महानगरपालिका क्षेत्राकरीता, प्रस्तावित दराचे ५०% दराने आकारण करुन विकास करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

याशिवाय गुंठेवारी विकास योजने अंतर्गत सभागृहाने मंजूर केलेल्या सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४४४/१ दिनांक ६-७-२००१ मध्ये.....

गुंठेवारी विकास योजनेनुसार प्रस्तावित अध्यादेशाचे अंमलबजावणीसाठी निर्णय, नोटीस देणे व इतर दस्ताऐवज अधिप्रमाणित करण्याचे अधिकार उपसंचालक नगररचना

महानगरपालिका, औरंगाबाद यांचे ऐवजी सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यात येतात आणि

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमीतीकरण व श्रेणी वाढ करणे आणि नियंत्रण) अधिनियम २००१ नुसार १ जानेवारी २००१ पुर्वीचे अस्तित्वात असलेले सर्व गुंठेवारी विकास हे भूखंड धारकांनी कलम ४ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे नियोजन प्राधिकरणाकडे याबाबत अर्ज केल्यानुसार नियमाधिन करण्यासाठी विचारात घेण्यात पात्र असतील असे नमुद केलेले, असल्याने दिनांक १-१-१९९५ ऐवजी दिनांक १-१-२००१

असा बदल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

तसेच शासनाने विकास आकार व प्रशमन शुल्काचे कमाल दर ठरविल्यामुळे यासाठी नेमण्यात आलेली समिती विसर्जीत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *पुरवणी विषय*

**विषय क्र. ५६७/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतर्फे नागरिकांना पिठाची गिरणीसाठी ११ महिन्या साठीची एन. ओ. सी. देण्यात येते. परंतु सदरील एन. ओ. सी., एम. एस. ई. बी. स्विकारीत नाहीत. त्यामुळे नागरिकांना खुप त्रास सहन करावा लागतो. तरी या बाबत महानगरपालिकेतर्फे एन. ओ. सी. देतांना ११ महिन्या ऐवजी दोन वर्षाची एन. ओ. सी. देण्यात यावी. करीता, प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री मोतीलाल जगताप
अनुमोदक : श्री राजु शिंदे
दि. ११-०१-२००२

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे पिठाची गिरणीसाठी देण्यात येणारी ११ महिन्याची एन. ओ. सी. ऐवजी आता दोन वर्षासाठी देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६८/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार औंरगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना पर्यावरणाचा समतोल साधण्याच्या दृष्टीने राज्य पातळीवर सामाजिक वनीकरण कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन आणि तत्संबंधीची जनजागृती या क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हा संवर्गातील द्वितीय क्रमांकाचा महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे. तरी उद्यान विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांचे अभिनंदन करण्याच्या मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री प्रशांत देसरडा
अनुमोदक : श्रीमती पार्वतीबाई मानकापे,
श्री बाळासाहेब थोरात, श्री किशोर शिंदे,
श्री भगवान घडामोडे, श्री संजय शिरसाठ,

श्री राजु शिंदे, श्री किशोर तुळशीबागवाले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उद्यान विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना राज्य शासनाच्या वतीने मिळालेल्या महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कारा बद्दल अभिनंदन करण्यात आले.

**विषय क्र. ५६९/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३(१६) अन्वये उपद्रवांचे उपशमन करणे व कलम ६४ अन्वये पिसाळलेल्या कुत्र्याच्या दंशावर उपचारासाठी उपाययोजना करण्याची तरतुद आहे. तसेच उपद्रवी नसलेले व निरोगी कुत्र्यांचा वध (मारणे) करणे ही प्रिव्हेशन ऑफ क्युएलटी टू ॲनिमल्स ॲक्ट १९६० अन्वये बेकायदेशीर ठरते. या संदर्भात मुंबई, दिल्ली इ. ठिकाणचे तीन मा. उच्च न्यायालयाचे निर्णयही झालेले आहेत.

भारत सरकारचे भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड चेन्नई व सामाजिक न्याय अधिकारीता, विभाग यांचेकडून या संदर्भात पत्र पाठवून लक्षही वेधण्यात आलेले आहे. महानगरपालिकेकडून जी निरोगी व मोकाट कुत्रे पकडण्यात येतात. त्यांना इ. ०३ दिवस सांभाळ करुन कोणी हक्कम नोंदविला नाही. तर अशा कुत्र्यांचा वध (मारुन टाकणे) करण्यात येते. साधारणतः ५ हजार कुत्रे दरवर्षी मारल्या जातात. तरी मोकाट कुत्र्याचे प्रमाणात घट झालेली नाही. यावर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवता यावे आणि शास्त्रोक्त पध्दतीने प्रतिबंध घालता यावा व त्यांचा जनतेला उपद्रव टाळता यावा. म्हणून प्रजननावर नियंत्रण ठेवणे व रेबीज रोगाचे उच्चाटन करणे यासाठी अशासकीय सेवाभावी संस्थेकडून (एन. जी. ओ.) मोफत असा उपक्रम राबविणे महानगरपालिकेच्या हिताचे आहे. यासाठी आपल्या शहरात " पिपल्स फॉर ॲनिमल्स, औरंगाबाद " ही सेवाभावी संस्था असून, ही संस्था महानगरपालिकेने अशा कामासाठी जागा, पाणी व विदयुत व्यवस्था करणे, कुत्रे पकडून आणून देणे, महापालिकेचे या कामासाठी जी स्टाफ आहे. त्यांची मदत करणे, शहरातील मृत जनावरांच्या अंत्यविधीची व्यवस्था करणे व ऑपरेशन झाल्यानंतर दहा दिवसांनी कुत्र्यांना पुन्हा पकडलेल्या ठिकाणी सोडून देणे इत्यादी केले तरा ही सेवाभावी संस्था मोफत ऑपरेशनसाठी सर्व व्यवस्था, अवजारे, कुत्र्याचे शस्त्रक्रियेचा संपूर्ण खर्च, शस्त्रक्रीयेनंतर औषधापचार (एका पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची देखभालीसाठी नियुक्ती करणे, कुत्र्यांची खाण्यापिण्याची सोय, सर्व ऑपरेशन्सची नोंद ठेवणे व रेबीज (अर्ल्क) प्रतिबंधक लस टोचणे इत्यादी कामे मोफत करण्यास तयार आहे. तशी योजना त्यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे सादर केलेली आहे.

तरी वरील प्रमाणे प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री प्रशांत देसरडा.
अनुमोदक : श्री संजय शिरसाठ, श्री किशोर तुळशीबागवाले,
श्री राजु रामराव शिंदे.

दिनांक : ११-०१-२००१.

**संवाद :**

श्री प्रशांत देसरडा : केंद्र शासनाच्या नियमानुसार याबाबत नारमूस ठरलेले आहे. मोकाट कुत्रे पकडून त्यांचा वध केला जातो. पिपरी, चिचंवड व पुणे महानगरपालिकेने स्वतः हे कार्य हाती घेतलेले आहे. तसेच ठाणे

महानगरपालिकेत ही योजना १० वर्षापासून कार्यरत आहे. पिपल्स फॉर ॲनिमल्स औरंगाबाद ही सेवा भावी संस्था विनाशुल्क हे कार्य करण्यास तयार असून फक्त जागेची मागणी करीत आहे. म्हणून हा प्रस्ताव मंजूर करावा. अशी विनंती आहे.

सौ. डॉ. आशा बिनवडे : यात असे स्टेंटमेंट केले की, साधारणतः ५ हजार कुत्रे दरवर्षी मारले जातात. तरी घट झालेली नाही. नसबंदी केल्यानंतर सुध्दा ५ हजार कुत्रे कमी होणार नसून, तेव्हढेच राहणार आहे. हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. परंतु, प्रायोगिक तत्वावर एखादया झोनमध्ये राबवून किती प्रमाणात आपण यशस्वी होते हे पाहिले पाहिजे.

श्री प्रशात देसरडा : जी. आर. नुसार पूर्ण योजना राबविली तर, काही बाधा येणार की नाही, याचा सुध्दा प्रशासनाने खुलासा करावा. महानगरपालिकेने राबविले नाही तर, एफ. आय. आर वगैरे दाखल तर होणार नाहीत.

मा. महापौर : एक झोन मध्ये ट्रायल बेसीस वर या प्रस्तावानुसार कार्यवाही करावी. या संदर्भात मा. आयुक्त, पदाधिकारी याचे समवेत चर्चा करुन योग्य तो निर्णय देण्यात घेण्यात येईल.

श्री काशनाथ कोकाटे : या संस्थेतील काही डॉक्टरांनी मागच्या वेळेस पदाधिकाऱ्यांवर आरोप प्रत्यारोप केलेले होते. ते पुन्हा होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

मा. महापौर : याबाबत प्रशासनाने दखल घ्यावी. प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. एका झोनमध्ये प्रायोगिक तत्वावर घेण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसा "पिपल्स फॉर ॲनिमल्स औरंगाबाद ही सेवाभावी संस्था औरंगाबाद शहरातील मोकाट कुत्र्यांचे, मोफत ऑपरेशनसाठी सर्व व्यवस्था, अवाजारे, कुत्र्यांचे शस्त्रक्रियेचा संपूर्ण खर्च, शस्त्रकियेनंतर औषधोपचार एका पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची देखभाली साठी नियुक्ती करणे, कुत्र्यांची खाण्यापिण्याची सोय, सर्व ऑपरेशनची नोंद ठेवणे व रेबीज (अलर्क) प्रतिबंधक लस टोचणे इत्यादी कामे मोफत करण्यास तयार आहे.

करीता, महानगरपालिकेने अशा कामासाठी जागा, पाणी व विद्युत व्यवस्था करणे, कुत्रे पकडून आणून देणे, महानगरपालिकेचा या कामासाठी जो स्टाफ आहे, त्यांची मदत करणे, शहरातील मृत जनावरांच्या अंत्यविधीची व्यवस्था करणे व ऑपरेशन झाल्यानंतर दहा दिवसांनी कुत्र्यांना पुन्हा पकडलेल्या ठिकाणी सोडून देणे. ही कामे करुन एका झोन मध्ये प्रायोगिक तत्वावर या संस्थेमार्फत ही योजना राबविण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७०/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इमाम अहमद रझा यांची १५० वी जयंती निमित्त शहाबाजार येथील चंपामस्जीत ते पंचायत समिती पर्यंत या रोडला इमाम अहमद रझा रोड हे नांव देण्यात यावे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री मीर हिदायत अली.

अनुमोदक : श्री किशोर तुळशीबागवाले, श्री तकीहसन खान.

मा. महापौर **:** सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इमाम अहमद रझा यांची १५० वी जयंती निमित्त शहराबाजार येथील चंपा मस्जीद ते पंचायत समिती पर्यंत रोडला इमाम अहमद रझा नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जण गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका,
औरंगाबाद.

## *प्रश्नोत्तरे*

**प्रश्न समुह क्र. १ : मा. श्री. अंबादास दानवे नगरसेवक (प्राप्त दि. ११-१२-२००१)**

**दिनांक २० डिसेंबर, २००१ च्या सर्वसाधारण सभेतील शिल्लक प्रश्न**

**प्रश्न क्र. - १६ :**

**अ)** औरंगाबाद महानगरपालिकेअंतर्गत रस्ते बांधकामाच्या गुणवत्तेबाबत इंडियन स्टॅंडर्ड व इंडियन रोड कॉंग्रेस यांचे निकष लावण्यात येतात काय येत असल्यास कोणते निकष लावण्यास येतात? नसल्यास सद्यस्थितीत कोणत्या निकषानुसार रस्ते निर्माण केले जातात?

**ब)** रस्ते बांधकाम निकषाबाबत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी) आपणाकडून नेमण्यात आली आहे काय? असल्यास त्यांनी नांवे? नसल्यास भविष्यात सदर संकल्पना आपण पूर्ण करणार आहात काय?

**क)** मनपा क्षेत्रात एकूण किती किलो मीटर डांबरी रस्ते आहे? १९९५-९६, ९६-९७, ९७,९८, ९८,९९, ९९-२०००, २००० ते २००१ या काळात किती किलो मीटर रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले? नविन डांबरीकरण व पुर्नडांबरीकरण यांची स्वतंत्र आकडेवारी दयावी, नविन रस्त्याच्या कामाची किती काळाची गॅरंटी मनपातर्फे गृहित धरण्यात येते? या गॅरंटी नुसारच शहरातील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्यात येते काय? सविस्तर खुलासा सादर करण्यात यावा.

**उत्तर क्र. - १६ :** (अतिरिक्त शहर अभियंता)

**ब)** औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत रस्ते बांधकाम गुणवत्तेबाबत इंडीयन स्टॅंडर्ड व इंडियन रोड कॉंग्रेस यांचे निकष लावण्यात येतात. प्रत्येक बाबीचे वेगवेगळे असून आवश्यकतेनुसार वापरण्यात येतात. सदरील निकष सार्वजनिक बांधकाम खात्याकडून दरसूची तयार करतांना त्यातच निकषांचा उल्लेख केले असतो.

**ब)** रस्ते बांधकाम निकषाबाबत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी) नेमण्यात आलेली नाही. भविष्यात सदर संकल्पना पूर्ण करण्याचा विचार करण्यात येईल.

**ड)** मनपा क्षेत्रात एकूण ५०२ कि. मी. अंदाजे डांबरी रस्ते आहेत. एन १९९५-९६ ते २०००-२००१ या काळात अंदाजे पुर्नडांबरीकरण २६५ कि. मी. व नविन डांबरीकरण ९४ कि. मी. रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे व डांबरीकरण पुर्नडांबरीकरण यांची आकडेवारी सोबत जोडली आहे.

नविन कामाची महानगरपालिकेतर्फे तीन वर्षाची गॅरंटी सहित धरण्यात येते व या गॅरंटीनुसारच शहरातील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्यात येते.

**महानगरपालिकेतर्फे विविध वर्षात डांबरीकरण केलेल्या रस्त्याची लांबी**

| | **केलेले डांबरीकरण** | |
|---|---|---|
| **आर्थिक वर्ष** | **नविन डांबरीकरण** | **पुर्न-डांबरीकरण** |
| १९९५-९६ | १६.८० कि. मी. | ५०.७० कि. मी. |
| १९९६-९७ | १४.६० कि. मी. | ५०.७० कि. मी. |
| १९९७-९८ | ०७.०० कि. मी. | २०.९६ कि. मी. |
| १९९८-९९ | ०७.६० कि. मी. | २२.८८ कि. मी. |
| १९९९-२००० | १९.०० कि. मी. | ५७.२८ कि. मी. |
| २०००-२००१ | ११.२० कि. मी. | ३४.४६ कि. मी. |
| २००१-२००२ | ०७.५० कि. मी. | २७.८० कि. मी. |
| एकूण | ९३.७० कि. मी. | २६५.२० कि. मी. |

**प्रश्न क्र. - १७ : (प्राप्त दि. १२-१२-२००१)**

**अ)** १ एप्रिल २००१ पासून आज पर्यंत अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण याबाबत झोन निहाय किती तक्रारी नगरसेवक व जनतेकडून आपणास स्वतंत्रपणे प्राप्त झाल्या आहेत? अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण यांची स्वतंत्रपणे संख्या देण्यात यावी.

**ब)** अतिक्रमणाची किती तक्रारींची आपण दखल घेवून कार्यवाही केली आहे, यातील किती प्रकरणे न्यायालयात गेले आहेत? कार्यवाहीचे स्वरुप स्पष्ट करावे.

**क)** न्यायालयाचा अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम याबाबत मनपाच्या बाजून किती निकाल लागले आहेत? या सर्व निकालांची कार्यवाही आपण केली आहे काय?

**ड)** महानगरपालिकेच्याच खुली जागा व तत्सम मालकीच्या जागेवर अतिक्रमण किंवा अनाधिकृत बांधकामाच्या तक्रारी आपणास प्राप्त झाल्या आहेत काय? असल्यास किती व कोणत्या जागी? सविस्तर खुलसा करण्यात यावा.

**उत्तर क्र. - १७ : (प्रशासकीय अधिकारी)**

| | | |
|---|---|---|
| **१)** | एप्रिल २००१ पासून आज पर्यंत अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण याबाबत झोन निहाय किती तक्रारी नगरसेवक व जनतेकडून आपणास स्वतंत्रपणे प्राप्त झाल्या आहेत? अनाधिकृत बांधकात व अतिक्रमण याची स्वतंत्रपणे संख्या देण्यात यावी. | **: नगरसेवकाकडून पत्र** एकूण २९, निकाली २०, ०३ मध्ये गुन्हा दाखल, ०६ कार्यवाही अंतर्गत. जनतेकडून पत्र एकूण ६७ ४७ प्रकरणे निकाली, २० |

| | |
|---|---|
| | कार्यवाही अंतर्गत. |
| **२)** अतिक्रमाणाच्या किती तक्रारींची आपण दखल घेवून कार्यवाही केली आहे. यातील किती प्रकरणे न्यायालयात गेली आहेत? कार्यवाहीचे स्वरुप स्पष्ट करावे. | : एकूण न्यायालयीन प्रकरणे २७ |
| **३)** न्यायालयाचा अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम याबाबत मनपाच्या बाजूने किती निकाल लागले आहेत? या सर्व निकालांची कार्यवाही आपण केली आहे काय? | : अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामाबाबत मनपाच्या बाजून एकूण ०७ प्रकरणे निकाली लागलेले आहे. |
| **४)** महानगरपालिकेच्याच खुली जागा व तत्सम मालकीच्या जागेवर अतिक्रमण किंवा अनाधिकृत बांधकामाच्या तक्रारी आपणास प्राप्त झाल्या आहेत काय? असल्यास किती? सविस्तर खुलासा करण्यात यावा. | : मनपाच्या खुली जागावर तत्सम जागा तत्सम मालकीच्या जागेवर अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम तक्रारी एकूण १० प्राप्त झाले. |

**उत्तर क्र. - १७ : (मालमत्ता अधिकारी)**

महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागेवर अतिक्रमण किंवा अनाधिकृत बांधकामाच्या तक्रारी या विभागात तुरळक प्रमाणे प्राप्त होतात.

खुल्या जागेवर अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामाबाबत तक्रारी बहुतांश प्रशासकीय विभागात प्राप्त होतात. त्यानुसार प्रशासकीय विभागातर्फे संबंधितांवर कार्यवाही केली जाते.

नगररचना विभाग व मालमत्ता विभागातून दोन पथका मार्फत खुल्या जागेचे सर्व्हेक्षणोच काम हाती घेण्यात आले असून, सर्व्हेक्षण पूर्ण होताच. खुल्या जागा अतिक्रमीत आहे किंवा नाही. याबाबतचा अहवाल पथकाकडून प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्रशासकीय व मालमत्ता विभागामार्फत येईल.

**उत्तर क्र. - १७ : (विधी सल्लागार)**

**अ)** अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमाणासंबंधी एप्रिल २००१ ते आज तगायत एकूण ७१ प्रकरणे न्यायालयात दाखला झालेली आहे.

**ब)** अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामासंबंधी मा. न्यायालयाकडून महानगरपालिकेच्या बाजून निर्णय प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय विभागास व संबंधित विभागास याबाबतची माहिती कळविण्यात येते.

**प्रश्न समुह क्र. २ : मा. श्री. सुभाष कच्छवाह,** **दिनांक २० डिसेंबर, २००१ च्या सर्वसाधारण सभेतील शिल्लक प्रश्न**

**स्विकृत सदस्य**
**नगरसेवक**
**(प्राप्त दि. १२-१२-२००१)**

**प्रश्न क्र. - १८ :**

महानगरपालिकेमार्फत महापालिका हद्दीत एकूण किती ठिकाणी व्यापारी संकुल बांधण्यात आली? व्यापारी संकुल कोणकोणत्या ठिकाणी उभारण्यात आली? प्रत्येक व्यापारी

संकुलात एकूण किती गाळे (दुकाने) खाजगी व्यक्ती, संस्थांना भाडयाने देण्यात आले. भाडयाने देण्यात आलेल्या गाळयांचे महानगरपालिकेस एकूण किती वार्षिक उत्पन्न मिळते.

विविध व्यापारी संकुलामधील एकूण किती गाळे (दुकाने) सध्या रिकामी आहेत. सदरील, गाळे केव्हा पासून रिकामी आहेत. व्यापारी संकुलामधील गाळे (दुकाने) रिकामी ठेवण्यामागे प्रशासनाचा हेतू काय? सध्या रिकामे असलेले गाळे (दुकाने) भाडयाने केव्हा देणार आहात? रिकामे असलेले दुकाने (गाळे) भाडयाने देण्यासाठी प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात आली आहे काय? असल्यास कोणती कार्यवाही करण्यात आली. सर्वही व्यापारी संकुलातील रिकाम्या असलेल्या गाळयापोटी महापालिकेचे एकूण किती उत्पन्न बुडाले. विविध व्यापारी संकुलातील रिकाम्या गाळया बाबत तसेच भाडयाने देण्यात आलेल्या गाळे (दुकाने) बाबत विहित आकडेवारीसह सविस्तर अहवाल सभागृहात सादर करण्यात यावा.

**उत्तर क्र. - १८ : (शहर अभियंता)**

**व्यापारी संकुलानाबाबतची माहिती खालील प्रमाणे :**

१. भोलेश्वर मार्केट (गुलमंडी)
२. नाथ सुपर मार्केट (औरंगपुरा)
३. औरंगपुरा माजी मंड्डी जवळील ३१ दुकाने व समोरील दुकाने
४. शहागंज मच्छी मार्केट
५. सादीया सिनेमा पाठीमागील मार्केट
६. रेल्वे स्टेशन साधना लॉज व्यापारी संकुल व मंगल कार्यालय
७. क्रांती चौक व्यापारी संकुल व आरोग्य केंद्र.
८. चिकलठाणा व्यापारी संकुल व पोलीस चौकी.
९. हर्षनगर बहुउद्देशिय हॉल व दुकाने
१०. वेदांत हॉटेल ते एकनाथ नगर रोड मिनी शॉपिंग सेंटर.
११. चिकलठाणा व्यापारी संकुल
१२. साईनगर एन-६ म्हाडा कॉलनी व्यापारी संकुल
१३. निप्पामुद्दीत दर्ग्या समोरील व्यापार संकुल
१४. शहागंज भाजी मंडी.

तरी दुकाने (गाळे) खाजकी / संस्थांना भाडे तत्वावर देण्याची कार्यवाही मालमत्ता विभागाकडून होते. सध्या किती गाळे रिकामे आहेत किंवा त्यापासून किती उत्पन्न मिळते. या सर्व बाबींची कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत होते.

**उत्तर क्र. - १८ : (मालमत्ता अधिकारी)**

**महानगरपालिकेच्या मालकीच्या व्यापारी संकुलाची माहिती**

१. मनपातर्फे किती व्यापारी संकुले बांधण्यात आली : व्यापारी संकुले एकूण १६
२. व्यापारी संकुल निहाय गाळयांची संख्या
३. रिक्त गाळयांची व्यापारी संकुल निहाय संख्या.

| अ.क्र. | व्यापारी संकुलाचे नांव | एकूण दुकाने | रिक्त दुकाने |
|---|---|---|---|
| १ | शहागंज | १५८ | -- |
| २ | औरंगपुरा | ३४ | -- |
| ३ | नियामोद्दीन दर्गा | १७ | -- |
| ४ | सब्जी मंडी | ३७ | ०१ |
| ५ | रेल्वेस्टेशन | ३४ | -- |
| ६ | जाफरगेट | २३ | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | पीरबाजार | ११ | -- |
| ८ | नाथ सुपर मार्केट | ३१ | ०१ |
| ९ | क्रांती चौक | ०७ | -- |
| १० | साधना लॉज | ४४ | -- |
| ११ | सादिया मागील | ५० | ०८ |
| १२ | चिकलठाणा | ०६ | -- |
| १३ | भालेश्वर मार्केट | २७ | -- |
| १४ | साई नगर | २२ | -- |
| १५ | औरंगपुरा (पिया मार्केट) | ३१ | ०६ |
| १६ | जवाहर नगर (ओटे) | १८ | -- |
| **एकूण** | | **५५० पैकी** | **१६** |

०३. किती गाळे भाडयाने देण्यात आले : एकूण गाळे खाजगी व्यक्ती संस्था रिक्त

५४० ५०७ १७

०४. व्यापारी गाळेयापासून वार्षिक उत्पन्न : २२,०२,७७९/- प्रति वर्ष

०७. गाळे केव्हापासून रिक्त आहेत : अनामत न भरणा केल्यामुळे गाळे जप्त करण्यास आलेले आहे.

०८. गाळे रिकामे ठेवण्यामागचा उद्देश : वरील प्रमाणे गाळे भाडयाने देण्याबाबत संचिका कार्यवाही अंतर्गत.

०९. रिकामे गाळे भाडयाने केव्हा देणार : जाहीर लिलाव संचिका कार्यवाही अंतर्गत आहे.

१०. रिक्त गाळे भाडयाने देण्यासाठी प्रशासनाने केलेली कार्यवाही :

११. रिकाम्या गाळयामुळे होणारे नुकसान : भाडयाने न गेल्यामुळे रिक्त आहे.

**टिप** : रिक्त गाळे १६ व नेहरु भवन १० दुकाने, औरंगपुरा भाजी मंडी (दुसरा मजला) ३१ दुकाने, लोटाकारंजा १७ दुकाने, कंबाडीपुरा, दुकाने ०६, जाफरगेट ११ दुकाने, संजयनगर भाजी मंडी ०६ दुकाने (भाडे निश्चिती), एकनाथ नगर (भाडे निशिती), संजय नगर भाजी मंडी व एकनाथ नगर (भाडे निश्चिती) व वरील सर्व व्यापारी संकुल लिलाव व निविदा पध्दतीने देण्याबाबत कार्यवाही अंतर्गत आहे.

**महानगरपालिकेच्या मालकीच्या व्यापारी संकुलाची माहिती**

१. मनपातर्फे किती व्यापारी संकुल बांधण्यात आली. : व्यापारी संकुल एकूण -- १५

२ व्यापारी संकुलनिहाय गाळयांची संख्या : एकूण गाळे -- ५३२

: एकूण रिक्त गाळे -- १६

३ किती गाळे भाडयाने देण्यात आले : खाजगी व्यक्ती संख्या एकूण

४९८ १८ ५१६

४ व्यापारी गाळयापासून वार्षिक उत्पन्न : २२,०२,७७९/- प्रतिवर्ष

| | | |
|---|---|---|
| ५ | रिक्त गाळयाची व्यापारी संकुल निहाय | : एकूण १६ |
| ६ | गाळे केव्हापासून रिक्त आहेत. | : दुकाने सादिया टॉकीजजवळील भाडयाने दिली होती, त्यांनी रक्कम जमा केली नाही, म्हणून अनामत रक्कम जप्त केली पुन्हा भाडयाने देणेबाबत कार्यवाही अंतर्गत चालू आहे. |
| ७ | गाळे रिकामे ठेवण्यामागचा उद्देश | : वरील प्रमाणे गाळे भाडयाने देणे बाबत संचिका कार्यवाही अंतर्गत आहे. |
| ८ | रिकामे गाळे भाडयाने केव्हा देणार | : जाहीर लिलाव संचिका कार्यवाही अंतर्गत आहे. |
| ९ | रिक्त गाळे भाडयाने देण्यासाठी प्रशासनाने केलेली कार्यवाही | : वरील प्रमाणे |
| १० | रिकाम्या गाळयामुळे होणारे नुकसान | : ----- |

**प्रश्न समुह क्र. ३ : मा. श्री. सुरजिसिंग खुंगर,** **दिनांक २० डिसेंबर, २००१ च्या सर्वसाधारण सभेतील शिल्लक प्रश्न**

**स्विकृत सदस्य**
**नगरसेवक**
**(प्राप्त दि. १२-१२-२००१)**

**प्रश्न क्र. १९ :**

मागील वर्षी सर्वसाधारण सभमध्ये मनपाने संपादीत व मनपाच्या मालकीच्या मिळकती व मोकळया जागांचे मनपाच्या नांवे पी. आर. कार्ड तयार करण्यात येईल. असा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे. आता पर्यंत किती मिळकती व मोकळया जागेचे पी. आर. कार्ड मनपाचे नांवे तयार करण्यात आले. किती मिळकतीचे शिल्लक आहेत. किती जागेवर नामफलक लावण्यात आले, किती जागेवर नामफलक लावण्यात आले नाही. न लावण्याचे कारण काय? व नामांतर न होण्याची कारणे काय? याबाबत सविस्तर माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी.

**उत्तर क्र. १९ : ( सहाय्यक संचालक नगर रचना )**

नगर रचना विभागामार्फत संपादीत केलेल्या व रेखांकन मंजूर करते वेळी ताब्यात घेतलेल्या खुल्या जागा व अंतर्गत रस्ते याबाबतच्या कागदपत्राच्या झेरॉक्स महानगरपालिकेच्या नांवे करण्या संदर्भात मालमत्ता विभाग यांना पुरविण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेचे नांवे करण्याची कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत करण्यात येते. त्यामुळे किती मिळकती महानगरपालिकेच्या नांवे झाल्यात याचा खुलासा मालमत्ता विभागामार्फत घेणे योग्य. तसेच खुल्या जागेस नामफलक लावण्याची कार्यवाही उदयान बांधकाम विभागामार्फत केली जाते.

**उत्तर क्र. १९ : ( मालमत्ता अधिकारी )**

मनपाने संपादीत केलेल्या व मंजूर रेखांकनातील मोकळया जागेचे पी. आर. कार्ड तयार करण्यासाठी मा. अधिक्षक भूमी अभिलेख व नगर भूमापन अधिकारी, नगरभूमापन

कार्यालय, यांचेकडे वारंवार पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे, तसेच प्रत्यक्ष नगरभूमापन कार्यालयाशी संपर्क करण्यात आलेला आहे. खुल्या जागेवर मनपाचे नांव पी. आर. कार्ड वर नोंदविण्यासाठी सदर कार्यालयाने नोंदणीकृत दस्तऐवजाची मागणी केली आहे. मा. आयुक्त (महसुल) यांनी कर्मचाऱ्यांचे पथकांची मनपा मिळकती संबंधाने निर्मिती केलेली आहे. त्यानुसार पथकामार्फत मोकळया जागेचे सर्व्हेक्षणाचे काम चालू आहे.

पथकामार्फत खुल्या जागेचे सर्व्हेक्षण पुर्ण होताच त्यानुसार खुल्या जागेबाबतचे दस्ताऐवजासह पुन्हा नगरभूमापन कार्यालयास माहिती सादर करण्यात येईल. मनपा मालकीच्या मोकळया जागेवर मनपाचे नांव नोंदविण्यासाठी नगरभूमापन कार्यालयास वारंवार तगादा लावण्यात येईल.

मनपाच्या खुल्या जागेवर बहुतेक ठिकाणी नामफलक लावण्यात आलेले आहे. काही ठिकाणी नामफलक नसल्यास सर्व्हेक्षणाचा अहवाल प्राप्त होताच. उर्वरित मोकळया जागेवर नामफलक लावण्यात येईल.

मनपाने संपादीत केलेल्या व मंजूर रेखांकनातील मोकळया जागेचे पी. आर. कार्ड तयार करणे करीता, मा. अधिक्षक, भूमी अभिलेख व नगरभूमापन अधिकारी यांचेकडे एकंदर ४१८ प्रकरणे नामांतर साठी पाठविण्यात आलेले आहेत. त्यापैकी २०६ प्रकरणांत मनपाचे नांवे करण्याचे काम झाले आहे. बाकी २१२ प्रकरणांमध्ये नोंदणीकृत दस्तऐवजाची मागणी केली आहे. त्याप्रमाणे नगररचना विभागांनी जागेचे नोंदणीकृत दस्तऐवज व यादी मालमत्ता विभागास पाठविले आहेत. ते सर्व कागदपत्र वरील कार्यालयास पाठवून नामांतराची कार्यवाहीचे काम चालू आहे. तसेच दोन पथकामार्फत खुल्या जागेचे सर्व्हेक्षणाचे काम चालू आहे, त्यांचे कडून माहिती प्राप्त होताच पुन्हा नगरभूमापन कार्यालयास नोंदणीसाठी तगादा करण्यात येईल.

**प्रश्न क्र. - २० :**

महानगरपालिकेमध्ये चिनी मातीचे पाईप कोणत्या एजन्सीकडून खरेदी करण्यात आले आहेत? किती रक्कमेचे पाईप खरेदी करण्यात आले आहेत? सदरील पाईप खरेदी करण्यात आलेल्या एजन्सीला आय. एस. आय. मार्क प्रमाण पत्र लावण्यात आले आहे काय? सदरील पाईप कोणकोणत्या ठिकाणी लावण्यात आले. याबाबत सविस्तर माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी.

**उत्तर क्र. - २० : (कार्यकारी अभियंता पा. पु. जलनिःसारण )**

अ) महानगरपालिकेने चिनी मातीचे पाईप कोणत्याही एजन्सीकडून खरेदी केलेले नाही.

ब) खरेदी करण्यात आलेली नाही.

क) पाईप खरेदी न केल्यामुळे लागू होत नाही.

ड) महानगरपालिकेने कामाची निविदा मागवितांना त्यात पाईप पुरवठयाचा समावेश करण्यात आलेला आहे व खालील कामात चिनी मातीच्या पाईपचा वापर केलेला आहे.

**१)** आशिया बेगम बंगला गणेश कॉ. येथे १५० मी मी व्यासाची चिनीमातीची लाईत टाकणे. २) पेठेनगर अंतर्गत १५० मी मी व २२५ मी मी व्यासाची चिनीमातीची लाईन टाकणे. ३) चौशहा येथे २२५ मी मी व्यासाची एस. डब्ल्यू. जी. लाईन टाकणे. ४) पानदरीबा येथे कैलास भेटल ते आप्पा हलवाई पर्यंत २२५ मी मी व्यासाची लाईन टाकणे ५) मोतीकारंजा येथे प्राथमिक शाळेपासून चौराहा पर्यंत २२५ मी मी व्यासाची चिनीमातीची लाईन टकाणे. ६) राहुलनगर येथे २५० मी मी व्यासाची चिनीमातीची जलनिःसारण वाहिनी टाकणे ७) अमान कॉ. सादात नगर येथे २०० मी मी व्यासाची

चिनीमातीची ड्रेनेज लाईन टाकणे. ८) ईटखेडा येथे गट क्र. ५२, ५३ मंजूर रेखाकंनामध्ये २२५ मी मी व्यासाची चिनीमातीची लाईन टाकणे.

**प्रश्न समुह क्र. ४ : मा. श्री. प्रशांत देसरडा,**
**सभापती (स्थायी**
**समिती),**
**(प्राप्त दि. २६-१२-२००१)**

**प्रश्न क्र. - २१ :**

औरंगाबाद महानगरपालिकेची विद्युत मिटर किती आहेत? यापैकी किती मिटरसाठी ॲव्हरेज बिल येते. तसेच किती मिटरचे प्रत्यक्ष विज वापरावर रेग्युलर बिल येते? वरील प्रमाणे ॲव्हरेज प्रमाणे प्रतिमाहा येणाऱ्या बिलाची रक्कम किती व प्रत्यक्ष वीज वापरावर रेग्युलर येणाऱ्या बिलाची प्रतिमहा रक्कम किती?

**उत्तर क्र. - २१ : ( कार्यकारी अभियंता, विद्युत )**

१) महानगरपालिकेचे एकूण ८४० मिटर आहेत.
२) एकूण ३३० मिटरचे ॲव्हरेज बील येते.
३) एकूण ५१० मिटरचे बिल रेग्युलर येते.
४) एकूण ॲव्हरेज प्रमाणे प्रतिमहा येणाऱ्या बिलाची रक्कम रु. १९,८७,८२४/- येते व प्रत्यक्ष वीज वापरावर रेग्युलर येणाऱ्या बिलाची प्रतिमहा रक्कम रु. ३०,७२,०९१/- येते.

**प्रश्न क्र. - २२ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीतील प्रिया मार्केट, औरंगपुरा भाजी मंडी येथे एकूण किती दुकाना आहेत व किती दुकान भाडे पट्यावर देण्यात आलेल्या आहे किंवा विकल्या आहेत? व किती दुकाना सध्या परिस्थितीत खाली आहेत? व सदरील दुकानाचे भाडे वर्षाला लागू केलेले आहे किंवा महिन्याला व सदरील दुकानाचे भाडे किती?

**उत्तर क्र. - २२ : ( उप आयुक्त म. )**

औरंगपुरा भाजी मंडी येथील (प्रिया मार्केट) तळमजला ३१ दुकाने व पहिला मजला ३१ दुकाने बांधून तयार आहत, त्यापैकी तळमपला दुकानापैकी २५ दुकाने रंगारगल्लीतील रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्या लोकांना सन ०१-१२-१९९७ साली ताब्यात देण्यात आलेली आहेत. तळमजल्यावरील ०६ दुकाने रिक्त असून, पहिल्या मजल्याचे ३१ दुकाने रिक्त आहेत, त्यांचे पुन्हा फेर लिलाव करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**उत्तर क्र. - २२ : ( मालमत्ता अधिकारी )**

औरंगपुरा भाजी मंडी येथील ( पिया मार्केट ) ३१ दुकाने तळमजला व ३१ दुकाने पहिला मजल्यावर तयार आहे. त्यापैकी २७ दुकाने रंगारगल्लीत रस्ता रुंदीकरणातील लोकांना देण्यात आली आहे व बाकी ३५ दुकानापैकी ४ दुकाने भोलेश्वर मार्केटच्या कमी बांधलेल्या लोकांना देण्याचा प्रस्ताव आहे. उरलेले ३१ दुकानाचे हयापुर्वी लिलाव झाला. त्यात फक्त ०५ दुकानाचा लिलाव झाला आहे. करीता, पुन्हा फेर लिलावासाठी संचिका कार्यान्वीत आहे.

**प्रश्न क्र. - २३ :**

दिनांक २०-०९-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. ४९३/४ अन्वये स्वेच्छा निधीमधून विविध प्रभागामधून रस्त्यांचे व वसाहतींचे नामफलक लावण्यास व या कामाचा स्वेच्छा निधी नियमावलीत समावेश करण्यात मंजूरी मिळालेली आहे. या ठरवाचे

अनुषंगाने प्रशासनाने काय कार्यवाही केली? शासनाकडे मान्यतेसाठी ठराव पाठविण्यात आला आहे काय?

**उत्तर क्र. - २३ : अतिरिक्त शहर अभियंता**

दिनांक २०-०९-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर झालेल्या ठराव क्र. ४९३/४ नुसार प्रकरणात कार्यवाही चालू आहे.

**प्रश्न समुह क्र. ५ : मा. सौ. जयश्री कुलकर्णी,**
**नगरसेविका,**
**(प्राप्त दि. ०३-०१-२००२)**

**प्रश्न क्र. - २४ :**

१) सिडको भागामध्ये नाटय गृह बांधण्याकरीता अर्थसंकल्पामध्ये १ कोटी रुपयांची तरतुद दर्शविण्यात आलेली होती व ठळक वैशिष्टयामध्ये या कामचा समावेश होता. सदरील, तरतुद रक्कम खर्च करण्यात आलेली आहे काय?

२) सिडको भागातील नाटयगृहाचे उद्‌घाटनाची तारीख ठरविण्यात आली आहे काय? असल्यास तारीख कोणती?

३) नाटयगृहाचे बांधकामाकरीता आर्किटेक्ट नियुक्तीकरीता टेंडर मागविले होते ते अंतिम करण्यात आलेले आहेत काय? अंतिम करण्यात आलेले आहेत काय? अंतिम करण्यात आलेले असल्यास आर्कीटेक्टचे नांव काय?

४) नाटयगृहाची जागा बदलण्याचा मनपाचा प्रस्ताव आहे का?

५) असल्यास पर्यायी जागा कोणती?

**उत्तर क्र. - २४ : ( अतिरिक्त शहर अभियंता )**

१) सिडको भागात नाटयगृह बांधकामावर अदयाप खर्च झाला नाही.

२) सिडको भागातील नाटयगृहाचे उद्‌घाटनांची तारीख ठरविण्यात आली नाही.

३) नाटयगृह बांधकामाकरीता आर्किटेक्ट कडून स्पर्धात्मक नकाशे मागविण्यात आलेले आहे. परंतु नकाशा अदयाप झालेल्या नाही.

४) नाटयगृहाची जागा बदलने विचाराधीन आहे.

५) बदलण्याचे जागा आता पर्यंत निश्चित झाली नाही. मा. महापौर सोबत पाहणी करण्याचे ठरले आहे.

**प्रश्न क्र. - २४ : ( मुख्यलेखाधिकारी )**

१) सिडकोचे हस्तांतरण लक्षता घेता, सिडको भागामध्ये नाटयगृह बांधणे करीता, रक्कम रु. १.०० कोटीची तरतुद अर्थ संकल्पात करण्यात आलेली होती व ठळक वैशिष्टयामध्ये या कामाचा समावेश होता. तथापी सिडकोचे हस्तांतरण अदयाप पर्यंत महानगरपालिकेकडे न झाल्याने अर्थ संकल्पात तरतुद करण्यात आलेली रक्कम खर्च करण्यात आलेली नाही.

२) उद्‌घाटनाची तारीख ठरविण्यात आलेली आहे.

३) टेंडर मागविलेले होते तथापी हस्तांतरण न झाल्यामुळे अंतिम करण्यात आलेले नाही.

४) याबाबत सर्वसाधारण सभा निर्णय घेते.

५) याबाबत सर्वसाधारण सभा निर्णय घेते.

**प्रश्न समुह क्र. ६ : मा. श्री. सुदाम पाटील सोनवणे,**
**नगरसेवक,**

**(प्राप्त दि. ०३-०१-२००२)**

**प्रश्न क्र. - २५ :**

महानगरपालिकेच्या वतीने गारखेडा ते सुतगिरणी या रोडचे काम सुमारे १.०० कोटी रुपयाचे खर्च करुन बांधण्यात आलेले आहे. परंतु सदरील. रोडचे काम निष्कृष्ट दर्जाचे झालेले आहे. या संदर्भाने मा. विभागीय आयुक्त यांनी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करणे बाबत सुचविले आहे. तथीप, प्रशासनाने या प्रकरण काय कार्यवाही केली? याबाबतचे माहिती दयावी.

**उत्तर क्र. - २५ : (उप - आयुक्त, महसुल )**

महानगरपालिकेतर्फे शहानुरमियॉ दर्गा ते सुतगिरणी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात आलेल्या कामच्या संदर्भाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी चौकशी अहवाल दिलेला आहे. त्यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत सुचविलेले नाही. तथापी, सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यासंबंधाने कारणे दाखवा. नोटीस दिलेल्या आहेत. सदर नोटीसचे उत्तर प्राप्त झाली असून, प्राप्त खुलासे छाननी अंतर्गत आहेत. छाननी नंतर आवश्यकतेनुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

**प्रश्न क्र. - २६ :**

महानगरपालिका सेवेत कार्यरत असणारे चौदा (१४) सर्व्हेअर यांनी कनिष्ठ अभियंता पदासाठी आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्र नाशिक येथून आणलेले आहे. सदरचे प्रमाणपत्र पुर्णतः बनावट असल्याचे समजते. याबाबत प्रशासनास काही माहिती आहे काय? असल्यास प्रशासनाने संबंधितांवर काय कार्यवाही केली?

**उत्तर क्र. - २६ : ( उप - आयुक्त, महसुल )**

१९९६ मध्ये महापालिका अस्थापनेवरील ज्या दुय्यम आवेक्षकांनी कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परिक्षा दिली होती. त्यांच्यापैकी सहा दुय्यम आवेक्षकांची अशा स्वरुपाची तक्रार या कार्यालयांस २६-०९-२००१ रोजी प्राप्त झाल्यानुसार मुख्य अभियंता व प्राचार्या, अभियांत्रिकी अधिकारी महाविदयालय, नाशिक यांच्याकडून दि. १५-१२-२००१ च्या पत्रान्वये माहिती मागविण्यात आली असता, मुख्य अभियंता व प्राचार्या अभियांत्रिकी अधिकारी महाविदयालय यांनी त्यांच्या दि. ०२-०१-२००२ च्या पत्रान्वये कळविले आहे की, दिनांक १२-०१-१९९९ च्या पत्रान्वये महानगरपालिकेकडे सादर केलेल्या सहा दुय्यम आवेक्षकांच्या गुणपत्रिका बनावट आहेत.

तद्अनुषंगाने प्रकरणात पुढील कार्यवाही प्रशासकीय स्तरावर चालू आहे.

**प्रश्न क्र. - २७ :**

शहरात एटी ॲण्ड टी व बी पी एल या दोन कंपन्यांचे किती मोबाईल धारक आहेत? संबंधित मोबाईल धारकांकडून जकात वसुल केली आहे काय? किंवा किती जकात वसुली केली? तसेच शहरात वरील दोन्ही कंपन्यांचे किती टॉवर्स आहेत? टॉवर असलेल्या इमारतींवर व्यवसाय कर आकारलेला आहे काय? महानगरपालिकेस वरील मोबाईल कंपन्याकडून किती महसुली उत्पन्न मिळाले याची माहिती द्यावी.

**उत्तर क्र. - २७ : ( उप - आयुक्त, महसुल )**

औरंगाबाद शहरातील बी. पी. एल मोबाईल कंपनीकडून दिनांक ०१-४-२००१ ते १९-१०-२००१ या कालावधीत रु. १,५५,९४९/- तर ए. टी ॲण्ड टी. कंपनीकडून रु. ५१,९४९/- इतकी जकात वसुल केली आहे. बी. पी. एल कंपनीकडून उक्त कालावधीतील

अभिलेख तपासणी अंती निघालेली फरकाची रक्कम रु. २,११,८००/- भरण्याबाबत संबंधित कंपनीस नोटीस देण्यात आली होती. कंपनीने रु. ५१,९४९/- इतकी रक्कम भरली असून, उर्वरित रक्कम भरण्याबाबत कंपनीसा नोटीस देण्यात आलेली आहे.

शहरातील मोबाईल टॉवर्स असलेल्या इमारतींवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली आहे. शहरात एकूण ८ टॉवर असून, या इमारतींवरील मालमत्ता करापोटी रु. ७,९५,४१३/- चे उत्पन्न महापालिकेस झालेले आहे.

**प्रश्न क्र. - २८ :**

शहरात किती स्थायी मालमत्ता आहेत. पैकी किती मालमत्ता व्यावसायिक आहेत. त्याच्यांकडून कशाप्रकारच्या मालमत्ता कर वसुल केला जातो व किती केला जातो. याबाबतची तपशिलवार माहिती द्यावी.

**उत्तर क्र. - २८ : (उप - आयुक्त, महसुल )**

शहरात एकूण १,१०,०९० स्थायी मालमत्ता असून, त्यापैकी ६,४७५ मालमत्ता निव्वळ व्यावसायीक कारणासाठी उत्पन्नाचा वापरल्या जातात. व्यावसायीक मालमत्तांना निवासेत्तर दराने व भाडेकरुच्या वापरात असलेल्या मिळकतींना प्रत्यक्ष मिळकतीच्या उत्पन्नाच्या आधारावर मालमत्ता कराची आकारणी करुन वसुली केली जाते. ज्या मालमत्ता व्यावसायीक व निवासी कारणसाठी वापरल्या जातात. त्यांना प्रत्यक्ष वापराच्या अनुषंगाने व्यावसायीक व निवासी दराची एकत्रित कर आकरणी केली जाते. अशा वापरांचे वर्गीकरण करणे शक्य नाही. निव्वळ व्यावसायीक मालमत्ता कराची विभाग निहाय वर्गवारी करण्यात येवून झालेल्या मालमत्ता करांच्या वसुलीची माहिती आगामी सर्वसाधारण सभेत देण्यात येईल.

**प्रश्न क्र. - २९ :**

जकात विभागामार्फत वसुल केल्या जाणाऱ्या ऑक्टोंबर महिन्याच्या जकात वसुलीच्या तुलनेत नोव्हेंबर २००१ मध्ये जकात वसुली अतिशय कमी प्रमाणात झाल्याचे निदर्शनास येते. कमी वसुलीचे कारण काय आहे? याबाबतची माहिती दयावी.

**उत्तर क्र. - २९ : (उप - आयुक्त, महसुल )**

प्रत्यक्षात वसुलीचे प्रमाण खालील प्रमाणे आहे. माहे. ऑक्टोंबरची वसुली ४,७१,८४,०८६/- असून, दैनिक सरासरी १५.२२ लाख होती आहे. नोव्हेंबरची वसुली ४,५८,२२,३०९/- असून दैनिक सरासरी १५.२७ लाख होती. म्हणजेच वरील प्रमाणे दोन्ही महिन्याची तुलना केल्यास ऑक्टोंबर महिन्याचे तुलनेत नोव्हेंबर महिन्याची वसुली कमी झालेली नाही. कारण ऑक्टोंबर मध्ये एकूण (३१) दिवस असतात व नोव्हेंबर मध्ये एकूण (३०) दिवस असतात. त्यामुळे वसुलीत फरक दिसतो.

**प्रश्न समुह क्र. ७ : मा. श्री. मीर हिदायत अली, नगरसेवक,**
**(प्राप्त दि. ०८-०१-२००२)**

**प्रश्न क्र. - ३० :**

मनपा औरंगाबाद आस्थापना-२ अंतर्गत मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वर्ग-४ मध्ये दैनिक वेतनावर काम करणाऱ्या कामगारांची ज्येष्ठता यादी तयार करण्यात आलेली आहे. या यादी व्यतिरिक्त वर्ग-४ मध्ये किती कामगांराना दैनिक वेतन कामावर घेण्याचे नेमणून केल्याचे आदेश देण्यात आले. यादी व्यतिरिक्त सर्व दैनिक वेतन कामगारांची यादी

पुरवविण्यात येऊन याबाबत सविस्तर खुलासा माहे, जानेवारी, २००२ मध्ये होणारी सर्वसाधारण सभेत खुलासा करण्यात यावे.

**उत्तर क्र. - ३० : ( उप - आयुक्त, प्रशासन )**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापने अंतर्गत वर्ग - ४ संवर्गातील दैनिक वेतनावरील कामगारांची मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये विभाग निहाय ज्येष्ठता यादी तयार करण्यात आलेली आहे. उक्त ज्येष्ठता यादी मधून निरनिराळया विभागात आवश्यकतेनुसार ८९० कामगारांना दैनिक वेतनावर नेमणूक देण्यात आलेली आहे.

तसेच काही विभाग नव्याने निर्माण झाले आहे. जसे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र छत्रपती शिवाजी महारात पुराण वस्तु संग्राहालय, गरवारे क्रिडा संकुल, नव्याने निर्माण झालेल्या शाळा, ज्योती नगर येथील भारतामाता मंदिर या विभागाच्या दैनिक वेतनावरील कामगारांच्या ज्येष्ठता यादया नव्हत्या. त्यामुळे सदरील विभागासाठी यादी व्यतिरिक्त कामगार दैनिक वेतनावर नियुक्त करावे लागले. तसेच साफ सफाई साठी व कचरा उचलण्यासाठी दुपारच्या सत्रात चालविण्यात येणाऱ्या ट्रकवर साफसफाई विभागाची यादी संपल्यामुळे यादी व्यतिरिक्त कर्मचारी नियुक्त करावे लागेल. असे एकूण ४५६- कामगार यादी व्यतिरिक्त लावण्यात आलेले आहे. उक्त कर्मचाऱ्यांची यादी आस्थापना शाखेत पाहावयास ठेचवण्यात आले आहे. करीता, आपल्या माहितीस्तव कळविण्यात यावे.

**प्रश्न समुह क्र. ८ : मा. श्री. साहेबराव कावडे, नगरसेवक,**
**(प्राप्त दि. ०९-०१-२००२)**

**प्रश्न क्र. - ३१ :**

महाराष्ट्र शासनाने शहरामधील अनाधिकृत वसाहतींना नागरी सुविधा पुरविण्याकरीता १९९५ पुर्वीच्या अनाधिकृत वसाहतींना निकष लावून सुविधा पुरविण्यासंबंधी शासन निर्णय ( जी. आर. ) केलेला असून, या निर्णयानुसार आतापर्यंत महानगरपालिकेच्या हद्दीतील किती वसाहतीमध्ये सुविध पुरविण्यात आलेल्या आहेत? चिकलठाणा वार्ड क्र. ९ शासन निर्णयानुसार सुविधा पुरविलेल्या नाहीत. त्या का पुरविण्यात आल्या नाहीत?

**उत्तर क्र. - ३१ : ( प्रकल्प संचालक )**

अनाधिकृत वसाहतींचे सर्व्हेक्षणाचे काम पुर्ण झाले आहे व मा. प्रधान सचिव, नगर विकास विभागा यांचेकडे जा. क्र./मनपा/प्रकल्प/७३२/०१ दि. २१-०९-२००१ रोजी शासनाच्या मंजूरीस्तव ठराव पाठविण्यात आला आहे. अद्याप मंजूरी अप्राप्त आहे. चिकलठाणा व बोध्दवाडा या १९८४ च्या राजपत्रात घोषित झोपडपट्टया आहेत.

**प्रश्न क्र. - ३२ :**

गुंठेवारी पध्दतीने काम करण्यासंबंधी शासन निर्णय झालेला असून, या पध्दतीने चिकलठाणा वार्ड क्र. ९ चे सर्व्हेक्षण झालेले आहे काय? असल्यास त्या संबंधीचा अहवाल शासनास पाठविला आहे काय?

**उत्तर क्र. - ३२ : ( प्रकल्प संचालक )**

वार्ड क्र. ९ अंतर्गत १९९५ च्या अनाधिकृत वसाहतीचे सर्व्हेक्षण करण्यास आलेले आहे. वार्ड क्र. मधील अनाधिकृत वसाहतीचे सर्व्हेक्षण झाले असून, शासनास प्रस्ताव मंजूरीस्तव पाठविण्यात आला.

**प्रश्न समुह क्र. ९ : मा. श्री. अंबादास दानवे, नगरसेवक,**
**(प्राप्त दि. १०-०१-२००२)**

**प्रश्न क्र. - ३३ :**

अ) महानगरपालिका हद्दीत इ. स. १९९६-९७, ९७-९८, ९९-२०००, २०००-२००१ च्या आर्थिक या आर्थिक वर्षात प्रतिवर्षी जलनि:सारण विभागावर प्रत्येकी किती रक्कम खर्च करण्यात आली?

ब) प्रतिवर्षी यातील किती रक्कम नविन जलनि:सारण वाहिन्या टाकण्यावर खर्च करण्यात आली? प्रतिवर्षी जलनि:सारण वाहिन्या दुरुस्तीवर किती खर्च करण्यात आला?

क) नविन जलनि:सारण वाहिन्या यात वरील उल्लेखित आर्थिक वर्षात टकाल्यानंतर त्याच जलनि:सारण वाहिन्या दुरुस्तीवर खर्च करण्यात आलेला आहे काय? असल्यास किती? टकाण्यात आलेल्या जलनि:सारण वाहिन्यांची संख्या किती? त्यापैकी किती दुरुस्ती करण्यात आलेल्या जलनि:सारण वाहिन्या किती?

ड) जलनि:सारण वाहिन्या बदलल्यानंतर जुन्या जलनि:सारण काढून भांडार विभागात स्टॉक रजिस्टरमध्ये नोंद करुन जमा करण्यात आलेल्या आहेत काय?

इ) जलनि:सारण वाहिन्या टाकतांना स्पेसिफिकेशन प्रमाणे व जलनि:सारण वाहिन्याचा उतार, खाली व्यास, मेनहोल यांची जलनि:सारण विभगामार्फत तपासणी करण्यात येते काय? या स्पेसिफिकशेप्रमाणे काम न केल्याबद्दल आपणाकडे किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत? या तक्रारीची आपण शहानिशा केलेली आहे काय?

**उत्तर क्र. - ३३ : ( कार्यकारी अभियंता, ड्रेनेज व विद्युत )**

अ) महापालिका हद्दीत खालील आर्थिक वर्षात जलनि:सारण विभागातील कामावर खालीलप्रमाणे रक्कम खर्च करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| सन १९९६-९७ | -- रु. ४२८.७४ लक्ष |
| सन १९९७-९८ | -- रु. ४५०.७३ लक्ष |
| सन १९९८-९९ | -- रु. ३०१.६८ लक्ष |
| सन १९९९-२००० | -- रु. २१७.७९ लक्ष |
| सन २०००-२००१ | -- रु. १९५.८३ लक्ष |

ब) वरील आर्थिक वर्षात झालेल्या एकूण वर्षापैकी नविन जलनि:सारण वाहिनी टकाण्यावर खालील प्रमाणे खर्च झाला आहे.

| | |
|---|---|
| सन १९९६-९७ | -- रु. १२१.६४ लक्ष |
| सन १९९७-९८ | -- रु. १३७.८७ लक्ष |
| सन १९९८-९९ | -- रु. १६२.३६ लक्ष |
| सन १९९९-२००० | -- रु. ११५.६७ लक्ष |
| सन २०००-२००१ | -- रु. ४९.२९ लक्ष |

जलनि:सारण वाहिनी दुरुस्ती / देखभाल करीता, झालेला खर्च खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| सन १९९६-९७ | -- रु. ८७.०७ लक्ष |
| सन १९९७-९८ | -- रु. ०८९.९५ लक्ष |
| सन १९९८-९९ | -- रु. ०५१.९५ लक्ष |
| सन १९९९-२००० | -- रु. ०५१.२६ लक्ष |
| सन २०००-२००१ | -- रु. ६७.०२ लक्ष |

क) नविन जलनि:सारण वाहिनी टाकल्यानंतर त्याच आर्थिक वर्षात हया जलनि:सारण वाहिनीची दुरुस्ती करण्याची शक्यता उद्‌भवत नाही. मात्र अशा स्वरुपाच्या नेमक्या कामाबाबत विचारणा केल्यास त्या अनुषंगाने माहिती घेता येईल. अपेक्षित माहिती

गेल्या पाच वर्षाचे कालावधीतील असून, हया वर्षातील कामाचे अभिलेख लक्षता जमा केलेले असून, अभिलेख माहितीस्तव उपलब्ध आहेत.

ड) जलनि:सारण वाहिन्या बदलल्यानंतर जुन्या जलनि:सारण वाहिन्या पैकी बहुतांश पाईप हे काढतांना व याआधीचे दुरुस्ती / देखभालीचे कामा अंतर्गत चोकअप काढतांना फुटलेले असल्याने त्यांचा पुर्न:वापर करणे शक्य नसते. तसेच हया पाईपांची स्क्रॅप व्हॅल्यू ही शुन्य असल्याने असे पाईप भांडारात जमा करुन ठेवण्यात येत नाही. असे पाईप भांडारात जमा करुन ठेवणे, त्यांची विल्हेवाट लावणे. यात महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होईल.

इ) जलनि:सारण वाहिन्या टाकतांना स्पेसिफिकेशनप्रमाणे या जलनि:सारण वाहिन्याचा उतार, खोली, व्यास, मेनहोल इत्यादी बाबत जलनि:सारण विभागामार्फत तपासणी करण्यात येते. या संदर्भात काही तक्रार प्राप्त झाल्यास त्याचवेळी तक्रारीची शहानिशा करण्यात येते व त्या कामाबाबत सुधारण करण्यात येते.

**प्रश्न समुह क्र. १०: मा. सौ. शाहीन जफर महेमुद जफर, नगरसेवक,**
**(प्राप्त दि. १०-०१-२००२)**

**प्रश्न क्र. - ३४ :**

औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये जात प्रमाणपत्र आधारे किती कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सन. १९८० पासून सदरील कर्मचाऱ्यांची यादीसह माहिती येणाऱ्या सर्वसाधारण सभेत पुरविण्यात यावी.

**उत्तर क्र. - ३४ :**

औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना विविध संवर्गात सन १९८० पासून सरळ सेवेने देण्यात आलेल्या नियुक्त कर्मचाऱ्यांची वर्षानिहाय माहिती खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| वर्ष | अ.क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव | जातीचा संवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | **वैद्यकीय अधिकारी (सरळ सेवेने)** | | |
| १९८७ | १ | डॉ. श्रीमती सी. आर गायकवाड | अनु. जाती | |
| १९९२ | २ | डॉ. श्रीमती वंदना तिखे | -//- | |
| | | **कनिष्ठ अभियंता संवर्ग (सरळ सेवेने)** | | |
| १९८२ | १ | आर. एस. बनकर | अनु. जाती | |
| १९८३ | २ | एच. ए. कोल्हे | इ मा व | |
| | ३ | एस. डी. रामटेके | अनु. जाती | |
| | ४ | एम. डी. सोनवणे | अनु. जाती | |
| | ५ | एस. डी. पानझडे | -//- | |
| | ६ | एम. वाय शेख | इ मा व | |
| १९८४ | ७ | एस. डी. काकडे | विजा भज | |
| | ८ | पी. आर. बनसोडे | अनु. जाती | |
| | ९ | एस. व्ही. कांबळे | -//- | |
| १९८५ | १० | बी. जी. बोईनवाड | अनु. जमाती | |
| | ११ | पी. जी. पवार | इ मा व | |
| | १२ | एस. एम. जाधव | अनु. जाती | |

| | | | |
|---|---|---|---|
| | १३ | काझी मोहियोद्यीन | इ मा व |
| १९९० | १४ | अतिकुद्यीन कादरी | अनु. जमाती |
| | १५ | दिगंबर निकम | -//- |
| | १६ | बी. के. परदेशी | विजाभज |
| १९९१ | १७ | शौकतअली | -//- |
| १९९२ | १८ | वसंत रामदास भोये | अनु. जमाती |
| | १९ | बी. डी. फड | इ मा व |
| | २० | विजय उमाजी गोरे | अनु. जाती |
| १९९४ | २१ | सय्यद इखलास अहेमद जामील अहेमद | अनु. जाती |
| १९९८ | २२ | तनपुरे अनिल अण्णासाहेब | इ मा व |
| १९९९ | २३ | नाना झिपरु पाटील | -//- |
| | २४ | कारभारी पुंडलीक घुगे | विजाभज |

**कनिष्ठ लिपीक संवर्ग (सरळ सेवेने)**

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८२ | १ | व्ही. जी. सोनकांबळे | अनु. जाती |
| | २ | हबीबखान | इ मा व |
| | ३ | नामदेव तायडे | अनु. जाती |
| | ४ | श्रीमती ए. ए. पवार | -//- |
| | ५ | दिनकर वारे | -//- |
| | ६ | बी. वाय. पंडीत | -//- |
| | ७ | डी. एन. साळवे | -//- |
| | ८ | प्रेमनाथ कांबळे | -//- |
| | ९ | उत्तम पंडागळे | -//- |
| | १० | व्ही. यु. सोनवणे | -//- |
| | ११ | श्रीमती सुमती बोडखे | इ मा व (अपंग) |
| | १२ | बी. आर. पठारे | अनु. जाती |
| | १३ | एम. बी. खरे | -//- |
| | १४ | उत्तम हिवराळे | -//- |
| | १५ | संजय पवार | -//- |
| | १६ | श्रीमती ताराबाई जोगदंड | -//- |
| | १७ | किशोर सोनवणे | -//- |
| | १८ | श्रीमती के. एस तांबोळा | -//- |
| | १९ | मकसुद अहेमद | इ मा व |
| | २० | अशोक वाकेकर | अनु. जाती |
| १९८३ | २१ | एस. सी. शिर्के | विजाभज |
| | २२ | सी. एम. अभंग | -//- |
| | २३ | स. बशीर स. मुर्तूझा | -//- |
| | २४ | एस. के. जोशी | -//- |
| | २५ | पटेल शे. जफर | इ मा व |
| | २६ | पी. एन. कोमटवार | विजाभज |
| | २७ | व्ही. एस. नाटकर | अनु. जाती |

| | | | |
|---|---|---|---|
| | २८ | आर. पी. निकम | अनु. जमाती |
| | २९ | मो. खान सरदारखान | -//- |
| | ३० | के. बी. परदेशी | इ मा व |
| | ३१ | वी. बी. साळवे | अनु. जाती |
| | ३२ | ए. ई. लाड | विजाभज |
| | ३३ | डी. बी. लोखंडे | अनु. जाती |
| | ३४ | एस. पी. सोनवणे | इ मा व |
| | ३५ | एम. एस. राठोड | विजाभज |
| | ३६ | यु. ए. वाघ | अनु. जाती |
| | ३७ | वामन जोगदंडे | -//- |
| | ३८ | श्रीमती एस. बी. गुळवे | इ मा व |
| | ३९ | डी. आर. लाहोटी | अनु. जाती |
| | ४० | जे.एम. घुबळे | -//- |
| | | **कनिष्ठ लिपिक संवर्ग (सरळ सेवेने)** | |
| | | **सर्वश्री** | |
| १९८४ | ४१ | एस. एस. हिवाळे | अनु. जाती |
| | ४२ | एम. एस. गंगावणे | -//- |
| | ४३ | आर. बी. गुळवे | इ मा व |
| १९८५ | ४४ | पी. जी. जाधव | अनु. जाती |
| | ४५ | श्रीमती मिराबाई चव्हाण | अनु. जमाती |
| | ४६ | गणेश जाधव | इ मा व |
| | ४७ | ताज महंमदखान | अनु. जमाती |
| | ४८ | विजय देशपांडे | अनु. जाती |
| | ४९ | श्रीमती नलिनी महितोले | इ मा व |
| | ५० | विजय सुर्यवंशी | अनु. जाती |
| | ५१ | एन. एल. चव्हाण | विजाभज |
| | ५२ | एम. एन. बावस्कर | अनु. जाती |
| | ५३ | देविदास पिल्लेवान | -//- |
| | ५४ | मो. उमर बागवान | इ मा व |
| | ५५ | ओ. सी. शिरसाठ | अनु. जाती |
| | ५६ | विजय इंगळे | -//- |
| | ५७ | एन. के. मेहरे | -//- |
| १९८६ | ५८ | एस. आर म्हात्रे | -//- |
| | ५९ | डी. बी. अधिकार | इ मा व |
| १९९० | ६० | श्रीमती सुनिता गावित | अनु. जमाती |
| | ६१ | सविता सोनवणे | -//- |
| | ६२ | संजय जक्कल | -//- |
| | ६३ | कैलास जाधव | विजाभज |
| | ६४ | अफजलबेग | इ मा व |
| | ६५ | भिमराव तुकाराम फोले | अनु. जमाती |
| | ६६ | भारत बिऱ्हारे | -//- |

| | | | |
|---|---|---|---|
| | ६७ | भगवान अंभोरे | अनु. जाती |
| | ६८ | खान अखिल अहेमदखान | अनु. जमाती |
| | ६९ | श्रीधर टारपे | -//- |
| | ७० | शंकर नामदेव मराठे | -//- |
| | ७१ | भारत जाधव | अनु.जाती |
| | ७२ | विजारत खान | इ मा व |
| | ७३ | हेमराम सरजारे | अनु. जाती |
| | ७४ | पी. एम. राठोड | विजाभज |
| | ७५ | गिरी हरीगिरी विठ्ठलगिरी | -//- |
| | ७६ | ब्रिजलाल मथुरादास मामोडै | -//- |
| | ७७ | लालचंद कोंडीराम सुलाने | -//- |
| | ७८ | श्रीमती सुरैय्या शाहिन | अनु. जमाती |
| | ७९ | प्रकाश खंदारे | अनु. जाती |
| १९९१ | ८० | श्रीमती चंद्रकला जोंधळे | -//- |
| १९९२ | ८१ | अशोक रामराव गिरी | विजाभज |
| | ८२ | गणेश रंगनाथ जाधव | अनु. जाती |
| १९९४ | ८३ | बी. बी. बांडे | अनु. जमाती |

**कनिष्ठ लिपिक संवर्ग (सरळ सेवेने)**

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९९४ | ८४ | अमरसिंग ठाकूर | अनु. जमाती |
| | ८५ | संतोष थट्टेकर | इ मा व |
| | ८६ | श्रीमती लता भांडवले | -//- |
| १९९५ | ८७ | सतीष शेजवळ | अनु. जाती |
| १९९७ | ८८ | फारुकी सिरज अहेमद | विजाभज |
| १९९८ | ८९ | अविनाश यल्लया मद्यी | -//- |
| | ९० | रमेश केरुबा मोरे | अनु. जाती |
| | ९१ | शैलेश भास्करराव ईवरकर | इ मा व |
| | ९२ | सुभाष छबुराव खंडागळे | अनु. जाती |
| | ९३ | अंबट शैलेश अशोक | वि मा प्र |
| | ९४ | हिस्वणकर प्रशांत जगदिश | इ मा व |
| | ९५ | संजय शंकरराव कोलते | इ मा व |
| | ९६ | दत्तात्रय पांडु सुर्यवंशी | अनु.जाती |
| | ९७ | दत्तात्रय विनायक शिंदे | अनु. जमाती |
| | ९८ | ललीत राजाराम सुर्यवंशी | इ मा व |
| | ९९ | संजय विठ्ठलराव सुरडकर | अनु. जाती |
| | १०० | अन्सारी म. मसीउद्यीन | इ मा व |
| | १०१ | कामकेर ईश्वरचंद्र चुन्नीलाल | विजाभज |
| | १०२ | सोहेल अहेमदखान फैज महंमद खान | अनु. जमाती |
| | १०३ | गोवींद रंगनाथ पेरकर | इ मा व |

**दुय्यम आवेक्षक संवर्ग (सरळसेवा)**
**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८० | १ | डी. जे. दाभाडे | अनु. जाती |
| १९८३ | २ | एस. सी. गारोडी | इ मा व |
| | ३ | आर. एस. रावतवार | अनु. जमाती |
| | ४ | ए. एस. मोरे | अनु. जाती |
| | ५ | आर. डी. खंडाळे | -//- |
| | ६ | एल . एस. पवार | अनु. जमाती |
| | ७ | के. के. बावस्कर | अनु. जाती |
| | ८ | एन. पी. गिरी | विताभज |
| | ९ | बी. के. अभंग | अनु. जाती |
| १९८४ | १० | एस. बी. संगेवार | अनु. जमाती |
| | ११ | के. पी. पवार | विजाभज |
| १९८६ | १२ | एस. एल. पवार | अनु. जाती |
| | १३ | एस. बी. राठोड | विजाभज |
| | १४ | अशोक पदमे | अनु. जाती |
| | १५ | एल. ए. माले | अनु. जमाती |
| | १६ | डी. एस. क्षिरसागर | इ मा व |
| | १७ | डब्ल्यु. आर. कांबळे | अनु. जाती |
| | १८ | बी. के. गायकवाड | विजाभज |
| | १९ | जी. व्ही. भांगे | इ मा व |
| | २० | अन्वरखान | अनु. जमाती |
| १९९२ | २१ | आर. एन. संधा | -//- |
| | २२ | अविनाश जयवळ | इ मा व |
| | २३ | संजय मोरे | अनु. जाती |
| | २४ | बी. एम. काकनाटे | -//- |
| १९९४ | २५ | एच. के. बावस्कर | -//- |
| १९९७ | २६ | बी. डी. घुले | विजाभज |
| १९९८ | २७ | डी. पी. गायकवाड | इ मा व |
| १९९९ | २८ | एस. एस. गायकवाड | भज |
| | २९ | सारंगधर विधाते | इ मा व |
| | ३० | चौधरी मधुकर विठ्ठलराव | -//- |
| | | वाहन चालक संवर्ग (सरळ सेवेने) | |
| | | सर्वश्री | |
| १९८३ | १ | चंद्रगिरी गिरी | विजाभज |
| | २ | देविदास मगरे | अनु. जाती |
| १९८४ | ३ | रत्नाकर दांडगे | -//- |
| | ४ | गोपाल अहिरे | इ मा व |
| | ५ | एल. सी. भंडारे | अनु. जमाती |
| | ६ | एच. जी. ठाकूर | -//- |

| | | | |
|---|---|---|---|
| १९८५ | ७ | बी. एन. खिल्लारे | -//- |
| | ८ | रामदास बोरसे | -//- |
| १९८९ | ९ | तुकाराम बकले | इ मा व |
| | १० | प्रकाश दाभाडे | अनु. जाती |
| | ११ | बबन रामराव राठोड | विजाभज |
| | १२ | वसंत बंकट कांबळे | अनु. जमाती |
| | १३ | शहा रहेमान शहा | इ मा व |
| | १४ | एस. ए. पोटे | अनु. जाती |
| | १५ | आर. डी. साठे | -//- |
| | १६ | भगवान रोकडे | -//- |
| | १७ | इकबालखान महेमदखान | अनु. जमाती |
| | १८ | सोमनाथ पांडूरंग बळी | इ मा व |
| | १९ | संजय प्रकाश लाहोट | अनु. जाती |
| | २० | अशोक निवृत्ती धुमाळ | विजाभज |
| | २१ | भागुजी डी. पाथ्रे | इ मा व |
| | २२ | अशोक मोहन खोतकर | अनु. जाती |
| | २३ | कैलास दगडू हिवराळे | -//- |
| | २४ | सुभाष सांडू दुधे | विजाभज |
| १९९७ | २५ | तुळशीराम अंबुजी ढंगारे | इ मा व |
| | २६ | कैलास भावराव जाधव | अनु. जाती |
| | २७ | ईश्वर बबन पवार | विजाभज |

**विधी सहाय्यक (सरळ सेवेने)**
**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९९५ | १ | ओ. सी. शिरसाठ | अनु. जाती |

**सुरक्षा अधिकारी (सरळ सेवेने)**

| | | | |
|---|---|---|---|
| १९९९ | १ | आर. एन. राऊत | विजाभज |

**पशुधन पर्यवेक्षक (सरळ सेवेचे)**

| | | | |
|---|---|---|---|
| १९९७ | १ | अनंत जयवंतराव जाधव | अनु. जाती |

**स्वच्छता निरिक्षक संवर्ग (सरळ सेवेने)**

| | | | |
|---|---|---|---|
| १९७५ | १ | पी. यु. तुर्कमाने | अनु. जाती |
| १९८३ | २ | व्ही. डी. राठोड | विजाभज |
| | ३ | एस. बी. शहाणे | इ मा व |
| | ४ | बी. ई. भारसाखळे | अनु. जाती |
| | ५ | एल. टी. कोल्टे | इ मा व |
| | ६ | एम. डी. सितापुरे | अनु. जाती |
| १९८७ | ७ | पी. एस. आठवले | -//- |
| १९९० | ८ | असबुल्लाखान | -//- |
| | ९ | पी. बी. चव्हाण | विजाभज |
| १९९४ | १० | अशोक पांडूरंग सुरडकर | अनु. जाती |

### अग्निशमन संवर्ग (सरळ सेवेने)

| | | | |
|---|---|---|---|
| १९८७ | १ | विठ्ठल म्हस्के | अनु. जाती |
| १९८८ | २ | राजू काशीनाथ सुरे | विजाभज |
| | ३ | डी. डी. साळुंके | अनु. जमाती |
| | ४ | लालचंद गायकवाड | अनु. जाती |
| १९९४ | ५ | हरिभाऊ यशवंत घुगे | इ मा व |
| | ६ | शरद जगन्नाथ घाटेशाही | अनु. जाती |
| | ७ | मोहन लक्ष्मण मुंगसे | विजाभज |
| | ८ | भगवान सोमाजी चौथमल | अनु.जाती |
| | ९ | अनिल तुकाराम नागरे | इ मा व |

### मिश्रक संवर्ग (सरळ सेवेने)

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८८ | १ | एल. एम. जोंधळे | |
| १९९० | २ | श्रीमती ज्योती वैष्णव | |
| १९९२ | ३ | अ. समी अ. रशिद | अनु. जमाती |
| | ४ | शैलेश लोहाडे | इ मा व |
| | ५ | विष्णु रगडे | अनु. जाती |

### लसटोचक संवर्ग (सरळ सेवेने)

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८५ | १ | श्रीमती आशा पाटील | अनु. जाती |
| | २ | अशोक कांबळे | -//- |

### बहुउद्देशीय कर्मचारी संवर्ग (सरळ सेवेने)

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८५ | १ | डी. एस. अंभोरे | अनु. जाती |
| | २ | आर. एन. खिल्लारे | अनु. जमाती |
| | ३ | एस. पी. पवार | विजाभज |
| | ४ | बी. बी. वाघमारे | इ मा व |
| | ५ | जे. बी. खरे | अनु. जाती |
| | ६ | ए. के. देवगिरीकर | इ मा व |
| | ७ | विष्णू कांबळे | अनु. जमाती |
| | ८ | डी. जे. कुबडे | अनु. जाती |
| | ९ | नदिम आश्फाक | इ मा व |
| | १० | आर. बी. चव्हाण | अनु. जाती |

### वरीष्ठ क्षेत्र कर्मचारी संवर्ग (सरळ सेवेने)

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९७८ | १ | रमेश मोरे | अनु. जाती |
| | २ | पांडूरंग दौड | इ मा व |
| | ३ | तुळजाराम अहिरे | -//- |

| | | | |
|---|---|---|---|
| १९९१ | ४ | विलास बघडणे | अनु. जाती |
| | ५ | कल्याण भावराम मोरे | अनु. जमाती |

**सार्वजनिक आरोग्य परिचारिका (सरळ सेवेने)**

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८५ | १ | श्रीमती जी. आर. दुधाडे | अनु. जाती |
| १९९१ | २ | मिनाक्षी म्हस्के | -//- |

**लघुलेखक उच्चश्रेणी (सरळ सेवेने)**

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८९ | १ | पी. के. खोब्रागडे | अनु. जाती |

**लघुटंकलेखक (सरळ सेवेने)**

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९९० | १ | सुनिल ढेकळे | इ मा व |

**समुदाय संघटक (सरळ सेवेने)**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८३ | १ | श्रीमती जिजाबाई मोरे | अनु. जाती |

**दुरध्वनी चालक संवर्ग (सरळ सेवेने)**

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८३ | १ | सुरेंद्र खापर्डे | अनु. जाती. |
| १९८४ | २ | व्ही. बी. जाधव | -//- |
| १९९४ | ३ | श्रीमती ज्योती अनतराव सोनवणे | अनु. जमाती |
| १९९७ | ४ | दिगंबर खामगांवकर | इ मा व (अंध) |
| | ५ | जगन पंडागळे | अनु. जाती (अंध) |

**कृषी सहाय्यक (सरळ सेवेने)**

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८३ | १ | सुधाकर साळवे | अनु. जाती |

**मेकॅनिक संवर्ग (सरळ सेवेन)**

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८६ | १ | दिनकर पोतकर | अनु. जाती |
| १९९२ | २ | गवळी अशोक सिताराम | अनु. जमाती |

**शिवणकला शिक्षिका (सरळ सेवेने)**

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८५ | १ | श्रीमती लता काकडे | अनु. जाती |
| १९९२ | २ | खमर शाईने अ. सहमदखान | अनु. जमाती |

## शारिरीक शिक्षक संवर्ग (सरळ सेवेने)

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८३ | १ | श्रीमती केसर वानखेडे | अनु. जाती |
| | २ | डी. पी. जाधव | विजाभज |
| | ३ | सी. एल. करागीर | इ मा व |
| १९८६ | ४ | श्रीमती शारदा मोरे | अनु. जाती |
| १९९० | ५ | आनंद रामन्ना बंकेश्वर | अनु. जमाती |
| १९९४ | ६ | दिपक रामचंद्रराव पारधे | अनु. जाती |

## अनुरेखक संवर्ग (सरळसेवा)

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८३ | १ | अजमद अलीखान | इ.मा.व |
| | २ | बी. पी. घाटे | अनु. जाती |
| १९८६ | ३ | डी. पी. शहापुरवाड | अनु. जमाती |
| | ४ | एच. के. बावस्कर | अनु. जाती |
| | ५ | एस. एस. गायकवाड | वि. जा. भ. ज. |
| | ६ | आर. एन. संधा | अनु. जमाती |
| | ७ | बी. एम. काकनाटे | अनु. जाती |
| १९९३ | ८ | संजय कपाळे | इ.मा.व |
| १९९४ | ९ | दुधाटे सारंगधर सिताराम | -//- |
| १९९७ | १० | नंदकुमार विसपुते | -//- |
| १९९९ | ११ | सुनिल वामनराम मगरे | अनु. जाती |
| | १२ | स. जमशीद स. अजमेर मेहमुब | भ.ज |
| | १३ | डोईफाडे देविदास वामनराव | -//- |
| | १४ | गवळी पंडीत बाबुराव | अनु. जाती |

## ए. एन. एम. संवर्ग (सरळ सेवेने)

**सर्वश्री**

| | | | |
|---|---|---|---|
| १९८२ | १ | श्रीमती जी. एस. साठेलकर | |
| १९८३ | २ | उषा साबळे | अनु. जाती |
| | ३ | मिनाक्षी म्हस्के | -//- |
| १९८५ | ४ | शशीकला कुचेकर | इ. मा. व. |
| १९९१ | ५ | मिरा चुडामन बगले | अनु. जाती |
| | ६ | संगिता शिवाजी कांबळे | -//- |
| | ७ | शारदा माधवराव खंडागळे | -//- |
| | ८ | बेबी वैजनाथ कळांके | इ. मा. व. |
| १९९२ | ९ | मंदाकिनी सुर्यभान | अनु. जाती |
| १९९६ | १० | वंदना मधुकर सातपुते | विजाभज |
| १९९८ | ११ | ज्योती किसन काळे | भज |
| | १२ | ज्योती गोरखनाथ अमोलिक | अनु. जाती |
| १९९९ | १३ | सुनित नामदेव बुनगे | -//- |

**प्रश्न क्र. - ३५ :**

सन १९८० पासून आज पावेतो जाती प्रमाणपत्रा अनुसार कर्मचाऱ्यामधून अधिकारी म्हणून किती लोकांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. नावांसह यादी व सध्या ते अधिकारी कोणकोणत्या विभागात कामाला आहे, येणाऱ्या सर्वसाधारण सभेत पुरविण्यात यावे.

**उत्तर क्र. - ३५ : ( उप - आयुक्त, महसुल )**

औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना विविध संवर्गात सन १९८० पासून पदोन्नतीने देण्यात आलेल्या नियुक्त कर्मचाऱ्यांची वर्षनिहाय माहिती खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| वर्ष | अ. क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव | जातीचा संवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | **विभागीय अधिकारी संवर्ग (पदोन्नतीने)** | | |
| १९८५ | १. | वाय. आर. अभंग | वि. जा. भ. ज. | विभाग क्र. ६ |
| १९९१ | २. | एस. आर जरारे | अनु. जमाती | प्रशासकीय विभाग |
| | ३. | पी. यु. तुर्कमाने | अनु. जाती | विभाग क्र. ३ |
| १९९४ | ४. | मोहमंद खान सरदार खान | अनु. जमाती | आस्थापना-२ |
| | ५. | डी. ए. गिरी | विजाभज | मालमत्ता विभाग |
| १९९६ | ६. | संजय पवार | अनु. जाती | लेखाधिकारी |
| १९९९ | ७. | आर. पी. निकम | अनु. जमाती | आस्थापना-१ |
| | | **उप अभियंता (पदोन्नतीने)** | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १९८८ | १. | एम. डी. सोनवणे | अनु. जाती | पाणी पुरवठा - २ |
| १९९० | २. | एस. डी. पानझडे | अनु. जाती | ड्रेनेज - २ विभाग |
| १९९१ | ३. | पी. आर. बनझोडे | -//- | विद्युत - १ विभाग |
| | ४. | शेख खमर | विजाभज | बांधकाम -१ विभाग |
| १९९३ | ५. | एस. डी. रामटेके | अनु. जाती | कर आकारणी - १ |
| | ६. | एस. डी. काकडे | विजाभज | शहर अभियंता वि. |

**कार्यालयीन अधिक्षक संवर्ग (पदोन्नतीने)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९८५ | १. | डी. ए. गिरी | विजाभज | वि. अ. संवर्गात पदोन्नती |
| १९८६ | २. | मोहमंदखान | अनु. जमाती | -//- |
| १९९३ | ३. | संजय पवार | अनु. जाती | ले. अ. म्हणून पदोन्नती |
| १९९५ | ४. | आर. पी. निकम | अनु. जमाती | वि. अ. संवर्गात पदोन्नती |
| १९९९ | ५. | एल. टी. कोल्हे | विजाभज | लेखा परिक्षण वि. |
| | ६. | बी. ए. वाहुळ | अनु. जाती | विभाग क्र. ४ |
| | ७. | टी. जी. जाधव | विजाभज | विभाग क्र. १ |
| २००० | ८. | अय्युबखान | अनु. जमाती | जकात विभाग |

**ज्येष्ठ स्वच्छता निरिक्षक (पदोन्नतीने)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९८४ | १. | पी. यु. तुर्कमाने | अनु. जाती | वि. अ. संवर्गात पदोन्नतीने |
| १९८५ | २. | व्ही. डी. राठोड | विजाभज | विभाग क्र. २ |
| १९९२ | ३. | रोहीदास ठाकरे | अनु. जमाती | आरोग्य विभाग |
| | ४. | बी. ई. भारसाखळे | अनु. जाती | विभाग क्र. ३ |
| १९९७ | ५. | एम. डी. सितापुरे | अनु. जाती | विभाग क्र. ४ |

**कनिष्ठ अभियंता संवर्ग (पदोन्नतीने)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९८२ | १. | टी. डी. राजपुत | विजाभज | पाणीपुरवठा - १ वि. |
| १९८९ | २. | एस. एल. पवार | अनु. जाती | नगररचना विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३. | बी. के. गायकवाड | विजाभज | ड्रेनेज विभाग |
| १९९० | ४. | के. के. बावस्कर | अनु. जाती | कर आकारणी विभाग |
| | ५. | के. एल. काटकर | -//- | ड्रेनेज विभाग |
| १९९४ | ६. | डी. जे. दाभाडे | -//- | कर आकारणी विभाग |
| १९९८ | ७. | बी. के. अभंग | -//- | ड्रेनेज विभाग |
| | ८. | एन. पी. गिरी | विजाभज | पाणीपुरवठा - २ वि. |

**ज्येष्ठ वाहन चालक संवर्ग (पदोन्नतीने)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९९२ | १. | लिंबाजी संतराम मगरे | अनु. जाती | यांत्रिकी विभाग |
| | २. | प्रकाश नेकीराम लाहोटे | -//- | -//- |
| १९९९ | ३. | बी. एस. खरात | -//- | -//- |
| | ४. | गंगागिरी गिरी | विजाभज | -//- |
| | ५. | तात्यासाहेब खंडू वाघमारे | अनु. जाती | -//- |
| | ६. | भाऊराव देवराव मोरे | -//- | -//- |
| | ७. | देविदास मगरे | -//- | -//- |
| | ८. | कचरु वाघमारे | -//- | -//- |
| | ९. | रत्नाकर दांडगे | -//- | -//- |
| | १०. | ईश्वर पोचन्ना | -//- | -//- |

**उप अग्निशमन अधिकारी (पदोन्नतीने)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९९० | १. | के. पी. राऊत | अनु. जाती | अग्निशमन विभाग |
| | २. | डी. जी. कोथमिरे | -//- | -//- |

**प्रमुख अग्निशामक (पदोन्नतीने)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९८१ | १. | के. पी. राऊत | अनु. जाती | अ. अ. म्हणून पदोन्नती |
| | २. | डी. जी. कोथमिर | -//- | -//- |
| १९९३ | ३. | रखमाजी थोरात | अनु. जाती | |
| | ४. | राजु सुरे | विजाभज | -//- |

## वरिष्ठ लिपिक संवर्ग (पदोन्नतीने)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९८३ | १. | डी. ए. गिरी | विजाभज | वि. अ. संवर्गात पदोन्नती |
| | २. | व्ही. एस. नवगिरे | अनु. जाती | |
| १९८४ | ३. | एन. एफ पगारे | -//- | |
| | ४. | बी. ए. वाहुळ | -//- | का. अ. संवर्गात पदोन्नती |
| | ५. | मोहमंदखान | अनु. जमाती | वि. अ. संवर्गात पदोन्नती |
| १९८५ | ६. | बी. के. रगडे | अनु. जाती | |
| | ७. | आर. पी. निकम | अनु. जमाती | वि. अ. संवर्गात पदोन्नती |
| | ८. | बी. डी. महिरे | अनु. जाती | |
| | ९. | आर. एस. खिल्लारे | -//- | |
| | १०. | यासीन अलीखान | विजाभज | |
| १९८७ | ११. | टी. जी. जाधव | -//- | का. अ. संवर्गात पदोन्नती |
| १९९० | १२. | अय्युबखान नुरखान | अनु. जमाती | -//- |
| | १३. | डी. डी. सुर्यवंशी | -//- | |
| | १४. | एस. आर. जरारे | -//- | वि. अ. संवर्गात पदोन्नती |
| | १५. | अजमतखान | -//- | |
| १९९२ | १६. | व्ही. जी. सोनकांबळे | अनु. जाती | |
| | १७. | ए. ई. लाड | विजाभज | |
| १९८४ | १८. | आर. एस. तायडे | अनु. जाती | |
| | १९. | श्रीमती मिराबाई चव्हाण | अनु.जमाती | |
| १९९६ | २०. | एस. एम. काळे | अनु. जाती | |
| | २१. | सी. एफ. अभंग | विजाभज | |
| १९९८ | २२. | एस. सी. शिर्के | -//- | |
| | २३. | सय्यद बशीर | -//- | पदावनत |
| | २४. | एस. के. जोशी | -//- | |
| | २५. | संजय जक्कल | अनु. जमाती | |
| | २६. | मनोहर सुरे | विजाभज | |
| १९९९ | २७. | एस. आर. म्हात्रे | अनु. जाती | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २८. | डी. एल. साळवे | -//- | |
| | २९. | पी. एम. कोमटवार | विजाभज | |
| | ३०. | श्रीमती सुनिता गावित | अनु. जमाती | |

**कनिष्ठ लिपिक - वर्ग- ४ मधून (पदोन्नतीने)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९८० | १. | बी. एल. साळवे | अनु. जाती | व लि. म्हणून पदोन्नती |
| १९८४ | २. | यादव धनाजी पगारे | -//- | |
| १९८५ | ३. | व्ही. बी. थोरात | -//- | |
| १९८६ | ४. | गोकूळ सातदिवे | -//- | |
| | ५. | रमेश दाभाडे | -//- | |
| १९९१ | ६. | लक्ष्मण निकाळजे | -//- | |
| | ७. | रामपाल तोसामा | -//- | |
| | ८. | अशोक जाधव | -//- | |
| १९९२ | ९. | मनोहर सुरे | विजाभज | व लि. म्हणून पदोन्नती |

**वाहन चालक संवर्ग (पदोन्नतीने)**

| | | | |
|---|---|---|---|
| १९७८ | १. | बी. एस. खरात | अनु. जाती |
| | २. | वसंत कांबळे | अनु. जमाती |
| | ३. | अंबादास गायकवाड | विजाभज |
| १९८० | ४. | बी. के. साळवे | अनु. जाती |
| १९८३ | ५. | ईश्वर पोवन्ना | -//- |
| १९८५ | ६. | कौतिक मोरे | -//- |
| | ७. | रमेश भुईगड | -//- |
| | ८. | बिहारीलाल सुबलाल | -//- |
| | ९. | आनंदसिंग मधुकर राजपुत | विजाभज |
| | १०. | अशोक केरुबा गवळी | अनु. जाती |
| | ११. | एकनाथ काशिनाथ साबळे | -//- |

**प्रश्न समुह क्र. - ११ : मा. श्री. मोतीलाल जगताप, नगर सेवक,**
**(प्राप्त दिनांक ११-०१-२००२).**

**प्रश्न क्र. - ३६ :**

प्रकल्प विभागाने मागील वर्षी शासनाचे जी. आर. प्रमाणे १९९५ च्या आधीच्या वसाहतीमध्ये सर्व्हे केला आहे व त्यामध्ये ५०% पेक्षा जास्त दलित वस्ती जेथे आहे, त्या वस्तीत दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास कामे करण्यात यावी. असे मागील बैठकीत ठरले आहे. तेव्हा या वस्त्यात विकास कामे सुरु केली आहे का? नसेल तर, केव्हा सुरु करणार?

**उत्तर - ३६ : ( कार्यकारी अभियंता - स्लम )**

शासन परिपत्रक दिनांक ०५-०२-१९९८ नुसार त्या वस्त्यामध्ये ५०% पेक्षा अधिक दलित लोकसंख्या आहे. अशा वस्त्यामध्ये कामे सुरु करण्यात आली असून, सदरील कामे प्रगती पथावर आहेत.

**प्रश्न क्र. - ३७ :**

महानगरपालिका शाळेतील बालवाडी शिक्षकास ७००/- रु. वेतन मिळते ते वाढवून १५००/- मध्ये करण्याचा ठराव बऱ्याच दिवसापूर्वी झालेला असतांना अद्याप पर्यंत कार्यवाही झाली नाही. तो केव्हा करणार?

**उत्तर - ३७ : ( प्रकल्प संचालक )**

महापालिका शाळारंमधील बालवाडी शिक्षकांना मानधनात वाढ करण्याचा अप्रशासकीय प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला होता. परंतु, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ठिक नसल्यामुळे अंमलबजावणी करणे शक्य झालेले नाही.

**उत्तर - ३७ : ( उप - आयुक्त, महसुल )**

सर्वसाधारण सभा विषय क्र. २०२/१३ दिनांक ०४-०२-२००० अन्वये मंजूर झालेला ठराव हा अशासकीय असून, सध्या महानगरपालिकाची आर्थिक स्थिती बालवाडी, शिक्षकेची मानधनात कोणतीही वाढ देणे योग्य नसल्यामुळे प्रकरणांत तुर्त स्थगिती देण्यात आली आहे.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## *दिनांक १८-०२-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**सोमवार दिनांक १८-०२-२००२ रोजी मा. महापौर श्री विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची माहे फेब्रुवारी २००२ ची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह " येथे दुपारी ०२.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेला मा. आयुक्त तसेच संबंधित अधिकारी वर्ग यांचेसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. शिंदे राजू रामराव | स. सभासद |
| २) | स. स. श्री. देसरडा प्रशांत सुभाष | -//- |
| ३) | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ४) | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५) | स. स. श्री. तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ६) | स. स. सौ. साजेद बेगम विखार अहेमद | -//- |
| ७) | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु | -//- |
| ८) | स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ९) | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| १०) | स. स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| ११) | स. स. सौ. पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १२) | स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १३) | स. स. सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिशन | -//- |
| १४) | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १५) | स. स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १६) | स. स. श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल | -//- |
| १७) | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १८) | स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| १९) | स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २०) | स. स. सौ. साधना गणेश सुरडकर | -//- |
| २१) | स. स. सौ. विजया किशोर रहाटकर | -//- |
| २२) | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २३) | स. स. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २४) | स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २५) | स. स. श्री. अ. रशिद अ. सत्तार | -//- |
| २६) | स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| २७) | स. स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| २८) | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| २९) | स. स. श्री. स. मुमताज अली मोज्जम अली | -//- |
| ३०) | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | -//- |
| ३१) | स. स. श्री. थोरात दत्तात्रय रामराव | -//- |
| ३२) | स. स. श्री. सोनवणे सुदाम रामदास | -//- |

३३) स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत -//-
३४) स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक -//-
३५) स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव -//-
३६) स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ -//-
३७) स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव -//-
३८) स. स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय -//-
३९) स. स. श्री सुरगोणिवार नारायण चंद्रय्या -//-
४०) स. स. सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
४१) स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर -//-
४२) स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला -//-
४३) स. स. श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-
४४) स. स. श्री. अंबादास एकनाथराव दानवे -//-
४५) स. स. श्री. नासीर खान अ. रहेमान खान -//-
४६) स. स. श्रीमती शाहीन जफर महमुद जफर -//-
४७) स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण -//-
४८) स. स. सौ. दाणे चंद्रभागाबाई भागीरथ -//-
४९) स. स. श्री. तकीहसन खान कासीम हसन खान -//-
५०) स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली -//-
५१) स. स. श्री. अफसर खान यासीन खान -//-
५२) स. स. सौ. सुलताना बेगम चांदखॉ -//-
५३) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती -//-
५४) स. स. श्री. शेख मुनाफ शेख यासीन -//-
५५) स. स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल -//-
५६) स. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द -//-
५७) स. स. सौ. कागडा बबीता सुभाष -//-
५८) स. स. श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी -//-
५९) स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज -//-
६०) स. स. सौ. निखत परविन ईजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री. घडामोडे भगवान देवीदास
२) स. स. श्री. खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
३) स. स. श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स. स. सौ. सलमा बानो मिर मो. अली

**संवाद :**

श्री. सुदाम सोनवणे : सदस्यांनी मांडलेल्या प्रश्नावर चर्चा न होता, सभा समाप्त करण्यात आली परंतु, या विषय पत्रिकेवर असलेल्या प्रश्नावर तरी चर्चा होणे आवश्यकत आहे. विषय पत्रिकेवर महत्वाचे प्रस्ताव असून, त्याचा अभ्यास करण्यासाठी आजची सभा तहकुब करावी. ४ ते ५ दिवसानंतर पुन्हा सभा आयोजित करावी.

श्री. प्रकाश निकाळजे : दोन महिन्यांनतर सभा होत आहे. अगोदरच्या सभेत काहीही जनरल चर्चा न होता, सभा समाप्त झाली. या सभेत जनरल चर्चा करुन विषय पत्रिका मंजूर करावी.

श्री. सुदाम सोनवणे : विषय पत्रिकेवर सिडको हस्तांतरणाच्या संदर्भात महत्वाचा विषय आलेला आहे. त्यावर सविस्तर चर्चा व्हावयास पाहिजे. त्याचा अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा. आजची सभा तहकुब करून, नंतर आयोजित करावी.

मा. महापौर : ठिक आहे. विषय पत्रिकेवर मालमत्ता कर संबंधीचा एक महत्वाचा प्रस्ताव सादर झालेला आहे. २० फेब्रुवारी पुर्वी कर निश्चित करुन, मंजूर करणे आवश्यक असल्याने, या विषयावर चर्चा करावी.

**विषय क्र. ५७१/१ :**

दिनांक ३०/१/२००२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा ठराव क्र. ७०/५ अन्वये सन २००२-२००३ या वित्तीय वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराचे दर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-९ मधील कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने दिनांक २०-२-२००२ किंवा त्या पुर्वी निश्चित करणे व मंजूर करणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे सन २००२-२००३ या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर हे कर योग्य मुल्यावर आकरणी करण्यास मंजूर देऊन, सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००१-२००२ चे प्रचलित दर | | सन २००२-२००३ साठी प्रस्तावित दर | | स्थायी समितीने मंजूर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **करयोग्य मुल्य रु.** | **दर** | **करयोग्य मुल्य रु.** | **दर** | **दर** |
| १. | सामान्य कर | १ ते १,००० | २३% | १ ते १,००० | २३% | २३% |
| | | १,००१ ते १०,००० | २४% | १,००१ ते १०,००० | २४% | २४% |
| | | १०,००१ ते २०,००० | २५% | १०,००१ ते २०,००० | २५% | २५% |
| | | २०,००१ ते ५०,००० | ३०% | २०,००१ ते ५०,००० | ३०% | ३०% |
| | | ५०,००१ ते १,००,००० | ३३% | ५०,००१ ते १,००,००० | ३४% | ३३% |
| | | १,००,००० च्या पुढे | ३५% | १,००,००० च्या पुढे | ३६% | ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | | |
| | | अ) निवासी | ३% | अ) निवासी | ३% | ३% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वापर<br>ब)निवासेत्तर वापर<br>१) १ ते ५०,००० | ८% | वापर<br>ब)निवासेत्तर वापर<br>१) १ ते ५०,००० | ८% | ८% |
| | | २) ५०,००१ ते पुढे | ८% | २) ५०,००१ ते पुढे | १०% | ९% |
| ३. | वृक्ष कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | १.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | २% | १.५% |
| ४. | अग्नि-शमन कर | -//- | १.५% | -//- | १.५% | १.५% |
| ५. | मनपा शिक्षणकर | -//- | १.५% | -//- | २% | २% |
| ६. | पथकर | -//- | २% | -//- | २% | २% |
| ७. | जल लाभ कर | -//- | १.५% | -//- | १.५% | १.५% |
| ८. | जलनिः-सारण लाभ कर | -//- | १.५% | -//- | १.५% | १.५% |

९. मोकळया जागेवर कर करयोग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने.

१०. राज्य शिक्षणकर, रोजगार हमी कर, मोठया निवासी क्षेत्रावरील कर, शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. नंदकुमार घोडेले : स्थायी समितीने जे दर मंजूर केले तेच मंजूर करण्यात यावे.

श्री. प्रकाश निकाळजे : नागरिकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. आपण पाणीपट्टीत वाढ करणार, गुंठेवारीमध्ये वसुल करणार, मालमत्ता कर जास्तीचा वसुल करणार असे असेल तर योग्य नसून, सर्वसामान्य नागरिकांवर जास्त कराचा बोजा पडणार नाही. याची काळजी घ्यावी. यात कोणतीही वाढ करु नये.

श्री. किशोर तुळशीबागवाले : सन २००१ या वर्षामध्ये करात वाढ केलेली आहे. त्यामुळे स्थायी समितीने मंजूर केलेल्या दरामध्ये कुठलीही आता वाढ करण्यात येऊ नये. जशाचा तसा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री अंबादास दानवे : स्थायी समितीने प्रस्तावातील अ. क्र. २ मधील ब) तील क्र. २ मध्ये ८% ऐवजी ९% म्हणजेच १% नी वाढ केलेली आहे. इतरत्र सामान्य कर व इतर करामध्ये फारशी वाढ केलेली नाही. म्हणून या विषयावर चर्चा करण्यासारखे काहीही नाही. जशाचा तसा प्रस्ताव मंजूर करावा.

मा. महापौर : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समितीने मंजूर केलेल्या प्रस्तावास जशाच्या तशी मंजूरी देण्यात येते. आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ५७१/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००२ ते २००३ या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर हे करयोग्य मुल्यावर आकारणी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

| अ. क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य | सन २००२-२००३ साठी मंजूर केलेले दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | सामान्य कर | १ ते १,००० | २३% |
| | | १,००१ ते १०,००० | २४% |
| | | १०,००१ ते २०,००० | २५% |
| | | २०,००१ ते ५०,००० | ३०% |
| | | ५०,००१ ते १,००,००० | ३३% |
| | | १,००,००० च्या पुढे | ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | |
| | | अ) निवासी वापर | ३% |
| | | ब) निवासेत्तर वापर | |
| | | १) १ ते ५०,००० | ८% |
| | | २) ५०,००१ ते पुढे | ९% |
| ३. | वृक्ष कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | -//- | १.५% |
| ५. | मनपा शिक्षण कर | -//- | २% |
| ६. | पथकर | -//- | २% |
| ७. | जल लाभ कर | -//- | १.५% |
| ८. | जलनि:सारण लाभ कर | -//- | १.५% |

९. मोकळया जागेवर कर करयोग्य मुल्यावर सामान्य कराच्या दराने.

१०. राज्य शिक्षणकर, रोजगार हमी कर, मोठया निवासी क्षेत्रावरील कर, शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच " जण गण मन " या राष्ट्रगिताने आजचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## *दिनांक २८-०२-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**गुरुवार दिनांक २८-०२-२००२ ( दिनांक १८-०२-२००२ रोजी तहकुब केलेली ) रोजी मा. महापौर श्री. विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त यांचेसह संबंधित अधिकारी वर्ग तसेच खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. देसरडा प्रशांत सुभाष | स. सभासद |
| २) | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ३) | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ४) | स. स. श्री. तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ५) | स. स. सौ. साजेद बेगम विखार अहेमद | -//- |
| ६) | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु | -//- |
| ७) | स. स. श्री. रगडे दगडूजी | -//- |
| ८) | स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| ९) | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १०) | स. स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| ११) | स. स. श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल | -//- |
| १२) | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १३) | स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| १४) | स. स. सौ. साधना गणेश सुरडकर | -//- |
| १५) | स. स. सौ. विजया किशोर रहाटकर | -//- |
| १६) | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| १७) | स. स. श्री. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| १८) | स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| १९) | स. स. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २०) | स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २१) | स. स. श्री. अ. रशिद अ. सत्तार | -//- |
| २२) | स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| २३) | स. स. श्री. डॉ. कराड भागवत किसनराव | -//- |
| २४) | स. स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| २५) | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| २६) | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | -//- |
| २७) | स. स. श्री. थोरात दत्तात्रय रामराव | -//- |
| २८) | स. स. श्री. सोनवणे सुदाम रामदास | -//- |
| २९) | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | -//- |
| ३०) | स. स. श्री. तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| ३१) | स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव | -//- |
| ३२) | स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | -//- |

३३) स. स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय -//-
३४) स. स. श्री सुरगोणिवार नारायण चंद्रय्या -//-
३५) स. स. सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
३६) स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर -//-
३७) स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला -//-
३८) स. स. श्री. अंबादास एकनाथराव दानवे -//-
३९) स. स. श्रीमती शाहीन जफर महमुद जफर -//-
४०) स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण -//-
४१) स. स. सौ. दाणे चंद्रभागाबाई भागीरथ -//-
४२) स. स. श्री. जयवंत केशवराव ओक -//-
४३) स. स. श्री. तकीहसन खान कासीम हसन खान -//-
४४) स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली -//-
४५) स. स. श्री. अफसर खान यासीन खान -//-
४६) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती -//-
४७) स. स. श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान -//-
४८) स. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द -//-
४९) स. स. सौ. कागडा बबीता सुभाष -//-
५०) स. स. श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी -//-
५१) स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज -//-
५२) स. स. सौ. निखत परविन ईजाज अली -//-
५३) स. स. श्री. नासेर खान सरदार खान -//-
५४) स. स. श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब -//-
५५) स. स. श्रीमती रशिदा बेगम गफ्फर यारखान -//-
५६) स. स. सौ. नुसरत बानो फिरोज खान -//-
५७) स. स. श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री. घडामोडे भगवान देवीदास
२) स. स. श्री. खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
३) स. स. श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स. स. सौ. सलमा बानो मिर मो. अली

सभागृहातर्फे गुजरातमधील गोधरा येथे कारसेवकांच्या रेल्वेला समाजकंटकांनी आग लावली त्यात ६० लोक मृत्युमूखी पडले. त्या सर्वांना ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आले.

**संवाद :**

श्री. अंबादास दानवे : नुसती श्रध्दांजली अर्पण करुन चालणार नाही तर, या घटनेचा निषेध म्हणून, तसा ठराव सुध्दा पास करावा.

श्री. डॉ. भागवत कराड : यास माझे अनुमोदन आहे.

श्री. स. अली सलामी : जे लोक मृत्युमूखी पडले. त्यात कारसेवकच नव्हते तर, इतर लोक होते. त्यामुळे सर्वच मृत्युमूखी पडलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करुन, ज्या समाज कंटकांनी ही घटना कडून आणली. त्यांचा निषेध व्हावयास पाहिजे.

मा. महापौर : जे लोक मृत्युमूखी पडले. त्या सर्वांना आपण श्रध्दांजली अर्पण केलेली आहे. या घटनेचा निषेध करण्यात येत आहे.

श्री. जयवंत ओक : गेल्या वेळेस गुंठेवारीचा प्रस्ताव आपण मंजूर केला. या प्रस्तावाच्या अनुषंगाने स. उपमहापौर हे सध्या मा. विभागीय आयुक्त यांचे कार्यालयासमोर उपोषणास बसलेले आहे. ती वेळ का आली, याचा विचार व्हावा. सदर सभेला बऱ्याच स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेले होते. गुंठेवारीच्या प्रस्तावावर निर्णय घेतांना प्रशासनाकडून योग्य खुलासा घेण्याची गरज होती व जी उत्तरे देण्यात आली ती अधिकारी यांनी उडवाउडवीची उत्तरे दिलेली आहे. जो मोर्चा काढण्यात आला होता. त्या जनतेच्या भावना या प्रशासनाने जाणून घ्यावयास पाहिजे होत्या. दिनांक २४-१२-२००१ मध्ये पहिल्यांदा मी पत्र दिलेले होते. त्यानंतर ८-१-२००२ ला तर तिसरे पत्र दि. २५-१-२००२ ला दिले व चौथे पत्र शेवटी दिनांक ८-२-२००२ ला मोर्चा काढला त्यावेळी देण्यात आलेले होते. मोर्चा काढला त्यादिवशी मा. आयुक्त नव्हते. प्र. आयुक्त म्हणून मा. विभागीय आयुक्त यांचेकडे पात्र सादर करण्यात आलेले आहे. गुंठेवारीचा प्रस्ताव मंजूरीस आला. त्या दिवशी प्रशासनामार्फत योग्य खुलासा दिलेला नसुन, अनाधिकृत वस्त्यामध्ये रस्ते, लाईट, पाणी, ड्रेनेज ई. सुविधा व रस्ते किती मिटरचे आहे. यासंबंधी शासनाकडे तसे काही कळविण्यात आलेले होते किंवा काय याबाबतचा खुलासा पाहिजे आहे. गुंठेवारी या शहरास लागु होते का, माझ्या माहितीप्रमाणे लागु होत नाही. आपण ५०% रक्कम आकारायाचा निर्णय घेतला तो योगय नाही. गरिब नागरिकांवर ही रक्कम आकारण्यात येऊ नये. मुंबई, पुर्ण, सांगली, कोल्हापून ही शहरे वेगळी आहे. या शहराचे प्रश्न वेगळे आहे. या ठिकाणी वक्फ बोर्डाच्या जमिनी आहे. सालारजंगच्या जमिनी आहे. अनाधिकृत आहे, स्लम झोपडपट्टी आहेत. तसेच इतर भरपूर प्रमाणात खाजगी जमिनी असून, यानुसार हे शहर झालेले आहे.

मा. महापौर : प्रशासनाचा खुलासा घेण्यात येईल.

श्री. काशीनाथ कोकाटे : गुंठेवारीचा मागील बैठकीत ठराव होता. त्यावर सविस्तर चर्चा करुन, ज्या सुधारणा करावयाच्या होत्या. त्यानुसार पारीत केलेले आहे. अशा वसाहतीतील जनतेच्या भावना जाणून घेण्याच्या दृष्टीने त्या जनतेच्या हिताच्या दृष्टीने त्या ठरावावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेतला व आता पुन्हा त्या विषयावर चर्चा करणे कितपत संयुक्तीक वाटते. त्या नागरिकांना सुविधा मिळू नये, त्यांचे समस्या तात्काळ सुटू नये म्हणून, राजकीय हेतूने पुन्हा पुन्हा उपस्थित करुन, भांडवल करणे योग्य होणार नाही. यामध्ये तेथील जनतेला याचा त्रास होतो. याची दक्षता कोण घेणार आहे. प्रस्ताव मंजूर केलेला आहे. पुन्हा चर्चा करण्याची आवश्यकता नाही. सुविधा कशा पुरविता येईल हे पाहणे गरजेचे आहे व चर्चा करायची असेल तर, पुन्हा तो प्रस्ताव तीन महिन्यानंतर सभेपुढे मंजूरीसाठी सादर करावा.

श्री. जयवंत ओक : प्रशासनाने अद्यापपर्यंत काय कार्यवाही केलेली आहे. त्याचा खुलासा करावा.

श्री. भगवान घडामोडे : मा. उप-महापौर हे उपोषणास बसलेले आहे. स. सदस्य जयवंत ओक यांनी जो प्रश्न मांडला यात कोणतेही राजकीय भांडवल नाही. जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. शासनाने जे गुंठेवारीचे दर ठरवून दिलेले आहे. ते महानगरपालिकेस लागु होत नाही. कारण, या शहरामध्ये गोरगरीब जनता राहते. शासन असे जी. आर. काढून गरीबांच्या घरावर नांगर फिरावयास निघाले का, असा प्रश्न निर्माण होतो. असा जी. आर. काढून हे शहर उध्वस्त करायचे का?

श्री. काशीनाथ कोकाटे : मागील बैठकीत उपमहापौर हे आपल्या शेजारी सभागृहात बसलेले आहे, त्यावेळी त्यांनी आपले मत का मांडले नाही.

श्री. भगवान घडामोडे : येथे आम्ही राजकारण करायला आलेलो नाही. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आलेलो आहोत. या सभागृहाला कुणीही राजकारणाची भाषा बोलू नये.

श्री. प्रकाश निकाळजे : ही सभा तहकुब आहे, गुंठेवारीचा प्रस्ताव अगोदरच्या सभेत होता. तो सविस्तर चर्चा करुन, मंजूर केलेला आहे. आता ज्यावर चर्चा करणे योग्य होणार नाही. विषय पत्रिकेला सुरुवात करावी. सभागृहाचा वेळ वाया घालवू नये.

श्री. भगवान घडामोडे : गुंठेवारीचा सुधारित प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला. त्याची दखल घेण्यात आली नाही. म्हणून, उपमहापौर हे उपोषणास बसलेले आहे.

श्री. काशीनाथ कोकाटे : सभा नियमाने चालवावी. आपण सर्वांच्या संमतीने ठराव पास केलेला आहे. तहकुब सभेत तो प्रस्ताव नव्हता. सकाळी ११.३० वाजता जी सभा होती, त्या सभेत तो प्रस्ताव होता दुपारच्या सभेतील नाही.

श्री. स. अली सलामी : गुंठेवारी बाबत तिसऱ्यांदा प्रस्ताव सादर झालेला होता. जे गुंठेवारीचे दर शासनाने जी. आर. काढून लागू केले, त्यानुसार सदर दर मुंबई, नागपूर, पुणे अशा शहरासाठी लागु करणे बरोबर होऊ शकते. या शहराची परिस्थिती आरखडा पाहता, गुंठेवारी पध्दत लागू करणे बरोबर होणार नाही. या प्रस्तावावर या अगोदर जुलै महिन्यात बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीत कमीटी स्थापन करुन, त्या कमीटीत सदस्य म्हणून, माझा समावेश होता. सदर कमीटीचे काय झाले. खुलासा देण्यात यावा. ज्या ठिकाणी ९०%, ५०% सुविधा दिल्या नळ कनेक्शन दिले. अशा अनाधिकृत रस्त्यामध्ये उर्वरित सुविधा देण्यात यावे. गुंठेवारी विकास कर आकारणी निश्चित करणेसाठी कमीटी स्थापन केली त्याबाबत कार्य निर्णय घेतला. कमीटीने या सभागृहाच्या निर्णयाला अर्थच राहिला नाही. गुंठेवारी लागु केलयास यात गरीब लोकांचे हाल होतील. स. सदस्य श्री. ओक यांनी जे मत मांडले ते बरोबर आहे. कुणावर अन्याय होणार नाही. याची दखल घेणे आवश्यक आहे.

प्र. सहा. संचालक (न. र.) : अनाधिकृत रस्त्यामध्ये सुविधा देण्याबाबत सतत मागणी होत होती. परंतु सुविधा देऊ शकत नव्हतो. याबाबत सतत शासनाकडे पाठपुरावा करीत आलेलो आहोत व शासनाने दिनांक ३०-१-२००२ रोजी गुंठेवारी विकास करण्याकरीता एक अध्यादेश काढून दर निश्चित केले व मागील बैठकीत तसा प्रस्ताव सुध्दा आपण मंजूर केलेले आहे. गुंठेवारी

कायदा लागू करु? त्यावस्तीमध्ये कामे करता येईल असा तो अध्यादेश आहे आणि त्या अध्यादेशाला अनुसरुन त्यामध्ये काय गोष्टी अंतर्भुत आहे, मागील बैठकीत सविस्तर चर्चा झालेली आहे, रस्ते, ओपनस्पेस किती पाहिजे, यावर चर्चा झाली. या सभागृहाने दर ठरविण्यासाठी एक कमीटी स्थापन केली होती. ही कार्यवाही चालू असतांनाच शासनाचे दर वाढीव निश्चितीचा एक आदेश काढून तो मागील बैठकीत ठेऊन त्या प्रस्तावानुसार शासनाने निश्चित केलेल्या दराच्या ५०% दर लावावे. असा ठराव पारीत सुध्दा केलेला आहे. या गुंठेवारीच्या आदेशानुसार प्रशासनाच्या वतीने ५ टीम तयार करुन ५ अनाधिकृत वस्त्याचा एक आठवडयात सर्व्हे करणार आहे. यात घराची आखणी वगैरे हे सर्व बाबी येणार आहे व गुंठेवारीमध्ये निगडीत होतात की नाही होत नसेल तर, त्यासाठी काय करावे लागणार याची सविस्तर तपासणी करणार आहे. गुंठेवारीसाठी काय काय करावे लागणार याचा अहवाल एक आठवडयात सादर आहोत व ज्या अनाधिकृत वसाहतीमध्ये खासदार, आमदार, महानगरपालिका फंडातून सुविधा पुरविल्या गेल्या. त्या सध्या बंद असून, तेथे कामे करण्यासाठी परवानगी होण्यासाठी तसे शासनाकडे कळविण्यात सुध्दा आलेले आहे.

श्री. जयवंत ओक : १९९५ च्या पुर्वीच्या वस्त्यामध्ये सोयी सुविधा दिल्या त्या बंद करण्यात येऊन पुन्हा आता शासनाची परवानगी घेणार अगोदर का सुविधा दिल्या मी चार पत्र दिले. त्यांचे उत्तर मला दिले नाही. मा. आयुक्तांनी यावर खुलासा करावा. उपमहापौर उपोषणास बसलेले आहे. एक जबाबदार पदधिकारी आहे. स. सदस्यांना बोलण्याची वेळ प्रशासन का आणते.

मा. आयुक्त : गुंठेवारी प्रस्तावाची अंमलबजावणी करायची याबाबतचा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे. गुंठेवारीच्या प्रस्तावात ज्या दुरुस्त्या सुचविल्या त्या शासनाकडे कळविलेल्या आहे. शासनाने दुसरे जी. आर. काढून प्रशमन शुल्कांचे दर निश्चित केले आहे व तसा प्रस्ताव मागील बैठकीत मंजूर सुध्दा झालेला आहे. दर निश्चित करण्यासाठी कमीटी स्थापन केली होती व आता दर शासनाने निश्चित केल्याने या कमीटीची आवश्यकता राहीली नाही. मध्यंतरी शासनाने अनाधिकृत वस्त्यांना सुविधा पुरविण्याबाबतचा जी. आर. काढलेला आहे. प्रश्न असा की, जी कामे अगोदर केलेली आहे. त्यावर देखभाल दुरुस्तीचे कामे व्हावी. अशी मागणी होत आहे. ही बाब विचारात घेऊन शासनास कळविलेले आहे. शासनस्तरावर याबाबतीत चर्चा सुध्दा झ ालेली आहे. तसेच पत्र शासनाकडे पाठविण्यात आलेले आहे. मला खात्री आहे की, लवकरच त्यास मंजूरी येईल. स. सदस्यांनी जे पत्र शासनाकडे दिले. त्या संदर्भात शासनास कळविण्यात आलेले आहे, याची जाणीव स. सदस्यांना आहे. तिसरा प्रश्न असा की, गुंठेवारी लागू होते की, नाही लागू होतो. परंतु आपण करुन शकतो की, नाही. त्यासाठी ४-५ वसाहतीमध्ये सर्व्हे चालू आहे, सर्व्हे केल्यानंतर मा. महापौर, सर्व पदाधिकारी यांचे विचारा विनीमय करुन शासन स्तरावर योग्य तो पाठपुरावा केला जाईल. ही सर्व कार्यवाही १५ दिवसामध्ये होईल. अशी अपेक्षा आहे.

श्री. जयवंत ओक : हाच खुलासा १८ तारखेला झाला असता तर उप-महापौर उपोषणास बसले नसते.

श्री. सुदाम सोनवणे : आता विषयपत्रिकेवर चर्चा करावी. तत्पुर्वी विनंती की, मागील बैठकीतील काही प्रश्न होते, त्यावर चर्चा करता येत नाही. असे समजले खुलासा द्यावा. चर्चा करता येईल का?

श्री. दत्तात्रय थोरात : गुंठेवारीचा जो जी. आर आहे. त्या अनाधिकृत वस्त्यात काम करु नये. असे दिलेले आहे का? का कामे बंद करण्यात आली. प्रकल्प विभागामार्फत जो सर्व्हे करण्यात आला. त्याचा खुलासा द्यावा. किती दिवस सर्व्हेचे काम करत राहणार १ वर्षापासून सर्व्हेच चालू आहे. आता पुन्हा पाच वस्त्याचा सर्व्हे कशासाठी करीत आहात. या अगोदर माझ्या वार्डात बांधकाम परवानगी दिली. महानगरपालिकेने फिस वसुल केली. त्या वसाहतीमध्ये विकास कामे सुध्दा करण्यात आली. आज पुन्हा अनाधिकृत वस्ती आहे, असे सांगण्यात येते तर बांधकाम परवानगी कशी दिली. हा प्रश्न निर्माण होतो. जेथे परवानगी दिली. तेथे देखभाल दुरुस्तीची कामे झाली पाहिजे, नसता होत नाही, कामे करता येत नाही तर, तसा शासनाचा जी. आर. वाचून दाखवावा. मागील बॉडीत मध्येतंरी या वार्डाचे नगरसेवक यांचा मृत्यू झाला. त्यामुळे या वार्डात महानगरपालिकेचे दुर्लक्ष झाले. मी जेव्हा निवडूण आलो. तेव्हा पासून अनाधिकृत वस्ती आहे म्हणून, कामे केली नाहीत.

श्री. मोतीलाल जगताप : गुंठेवारीवर मागील बैठकीत चर्चा होऊन ठराव सुध्दा पास झालेला आहे. अनाधिकृत वस्त्यांचा सर्व्हे सुध्दा झाला असून, या वस्त्यांमध्ये जेथे ५०% दलित लोक राहतात. अशा वस्त्यात कोणत्या पध्दतीने सुविधा देण्याबाबत निकष लावण्यात येणार आहे. खुलासा द्यावा.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : ठराव क्र. ४४४/१ अन्वये प्रस्ताव पारीत झालेला आहे. विषयावर या बैठकीत चर्चा करीत असतांना पॅनल्टी किती, बेटरमेंट चार्जेस किती आकारावे. यासंबंधी चर्चा झाली. कमीटी स्थापन केली, आता प्रश्नसन सांगते की, शासनाने पत्र आले व सदर बैठकीत स्थापन केलेल्या कमीटीला अर्थ नाही. शासनाचे पत्र दिनांक १८-५-२००१ रोजी आले तसे यात नमुद केले. बैठक ६-७-२००१ रोजी झाली. मध्यतंरी ०२ महिन्याचा कालावधी गेला, सदर पत्र कुठे होते. याचा खुलासा द्यावा. हे पत्र बैठकीत सादर केले असते तर कमीटी वगैरे स्थापन करण्याची आवश्यकता नव्हती. या सभागृहाने घेतलेल्या निर्णयाला काही महत्व देण्यात येत नाही. असे सिध्द होते, आता दर निश्चित बाबत शासनाने पत्र दिले. त्यानुसार जो ५ वस्त्याचा सर्व्हे होत आहे. त्यात लोक प्रतिनिधीचा समावेश करण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : ज्या वस्त्यात १०-१५ वर्षापासून कामे गेली. २ वर्षापासून शासनाने ती बंद केली म्हणून, आता कामे करता येत नाही, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. यापुर्वीही सर्व्हे करण्यासाठी ५-६ महिने गेले. नुसता सर्व्हे करुन, अर्थ नाही. काम करायचे झाल्यास करता येते. There is a will, There is a way. There is survey. There is no way. त्या भागात कामे झाली पाहिजे. जेथे ५-६ वस्त्याचा सर्व्हे करणार त्याचा सर्व्हे यापूर्वीच झालेला आहे. तेथे कामे सुरु करावी. मोर्चे येतात, उपोषणास बसतात. यात कुणाचेही राजकारण नसून, कामे होत नाही. म्हणून ही परिस्थिती निर्माण होते.

श्री. स. अली सलामी : गुंठेवारीच्या प्रस्तावावर चर्चा होत असतांना कमीटी स्थापन करण्यात आली. कमीटी सर्व्हे करुन, दर निश्चित करणार होते. परंतु

त्यातच शासनाचा जी. आर. आला. शासनाच्या जी.आर नुसार दर निश्चितीचा प्रस्ताव सादर झाला व या सभागृहाने घेतलेला कमीटी स्थापनेचा निर्णयाला आता आवश्यकता नाही. असे प्रशासनाचे म्हणणे असून, परस्पर गुंठेवारीच्या दराचा प्रस्ताव सभागृहासमोर सादर करुन, मंजूरी घेतली. कमीटी रद्द करण्यासंदर्भात प्रशासनाने सभागृहाची मंजूरी का घेतली नाही. मा. महापौर यांचे आदेश रद्द करण्याचा अधिकार प्रशासनाला आहे का?

प्र. सहा. संचालक (न. र.) : शासनाने गुंठेवारीच्या संदर्भात अध्यादेश काढला. याचा अर्थ असा होतो की, त्या भागात विकास कामे करता येणार नाही जी. आर. मध्ये कामे करावी किंवा करु नये. या दोन्ही गोष्टी अंतर्भुत नाही. अनाधिकृत वस्त्यात लवकरात लवकर कामे करता येतील. या दृष्टीनेच हा अध्यादेश आहे.

श्री. दत्तात्रय थोरात : अध्यादेशात कुठे दिलेले नाही की, कामे करु नये. तरी का बंद करण्यात आहेत.

श्री. अफसरखान, श्री. दत्तात्रय थोरात : अधिकारी हे गोलमोल उत्तर देत आहे. सभागृहाचा वेळ वाया घालवित आहे, काम करता येणार आहे की नाही, हा खुलासा करावा.

डॉ. भागवत कराड : ज्या ज्या अनाधिकृत वस्त्यात अगोदर कामे झाली. त्या कामावर देखभाल दुरुस्तीसाठी खर्च करण्यास हरकत नसावी. प्रशासनाने यावर गांभीर्याने विचार करावा. तसेच जी वस्ती जुनी आहे, अशा वस्त्यात कामे सुरु करावी.

प्र. सहाय्यक संचालक (न. र.) : अध्यादेशात काम करावे, काम करु नये, असे नसेलही, परंतु शासन गुंठेवारी अध्यादेश काढतो. याचाच अर्थ काम करता येत नाही.

मा. महापौर : प्र. सहाय्यक संचालक, नगररचना यांनी खुलासा केला आहे. सर्व सदस्यांनी ठरवावे. अनाधिकृत वस्त्यात या अगोदर विकास कामे केलेली आहे. त्यावर देखभाल दुरुस्तीची कामे करावी किंवा नाही.

श्री. सुदाम सोनवणे : मागील १०-१२ वर्षापासून कामे करीत आलेले आहोत. २ वर्षापासून बंद केले का? बंद केले त्याचा खुलासा द्यावा. शासन परिपत्रकात कोठेच उल्लेख नाही. गेल्या २ वर्षापासून कामे कोणाच्या अधिकारात बंद केले. शासनाचे अभिप्राय का मागविले नाही.

श्री. भगवान रगडे : मागील बैठकीत गुंठेवारीचा प्रस्ताव मंजूर केला. बऱ्याच स. सदस्यांनी आपआपले प्रश्न उपस्थित केले. गुंठेवारीची पध्दत या शहरासाठी लागू करण्यात येऊ नये. रु. ७-८ हजार लागणार आहे. हा आदेश लागू होऊ नये. हा प्रश्न मांडला होता. मिसारवाडी ही दलिताची वस्ती आहे. येथील एवढी मोठी रक्कम भरु शकत नाही. त्याचप्रमाणे भावसिंगपुरा, वसुंधरा कॉलनी येथे दलित वस्ती मोठया प्रमाणात आहे. अशा वस्त्यात कशा प्रकारे सुविधा देणार याचा निर्णय घेतलेला नाही. जी समिती नियुक्त केली, १ ते १ १/२ वर्षापासून सर्व्हेचे काम चालू आहे, किती दिवस सर्व्हेचे काम चालणार. सर्व वेळ सर्व्हे मध्येच घालणार आहात काय. हे योग्य नसून, ज्या ५ वसाहतीचा सर्व्हे करणार त्याची नावे सभागृहात नमुद करावी.

मा. महापौर : ज्या अनाधिकृत वस्त्यात पुर्वी कामे केली. तेथे देखभाल दुरुस्तीचे कामे करण्यात यावी. प्रशासनास सूचना देण्यात येते.

श्री. स. अली सलामी : या सभागृहात कमीटी स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यात मालही सदस्य करण्यात आले होते. त्यावर कार्यवाही न होता. शासनाने काढलेल्या अध्यादेशानुसार कार्यवाही होत आहे. कमीटी स्थापन करण्याचा या सभागृहाने घेतलेला निर्णयास काही महत्वच राहिले नाही.

प्र. सहाय्यक संचालक (न. र.) : स. सदस्या डॉ. बिनवडे यांनी दिनांक १८-५-२००१ च्या परिपत्रकाच्या संदर्भात खुलासा करु इच्छितो की, या तारखेचे पत्र महानगरपालिकेस शासनाकडून पोहचलेले नव्हते. ते यापुर्वीच जे सहाय्यक सुचालक, नगररचना यांनी त्याची प्रत १ ते १ १/२ महिन्यापुर्वी हस्तगत करुन घेतलेले आहे. म्हणून तसे प्रस्तावात नमुद केलेले आहे.

श्री. जयवंत ओक : गुंठेवारीच्या प्रस्तावानुसार येणाऱ्या अर्थसंकल्पात तशी खर्चाची तरतुद करावी.

मा. महापौर : आपण स्थायी समितीचे सदस्य आहात. अर्थसंकल्पाच्या वेळी सभागृहात तसा प्रश्न उपस्थित करावा. ज्या ५ वस्त्याचा सर्व्हे करणार त्याचा खुलासा करावा.

प्र. सहाय्यक संचालक (न. र.) : ज्या अनाधिकृत वस्त्याचा सर्व्हे करण्यात येणार आहे, त्यात प्रगती कॉलनी, दादा कॉलनी, श्रीकृष्ण कॉलनी, भोईवाडा, भिमपुरा आणि अबरार कॉलनी अशा ६ वसाहतींचा सर्व्हे चाचणीसाठी घेत आहोत.

मा. महापौर : आता विषय क्र. २ वर चर्चा करावी.

**विषय क्र. ५७२/२ :** कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद वाढीव पाणी पुरवठा योजना रक्कम रुपये ६७.३० कोटी या योजनेस महाराष्ट्र शासनाची मंजूरी प्राप्त असून, या योजने अंतर्गत असलेली कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे सुरु करण्यात आलेली होती. या योजनेचा आर्थिक आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शासकीय अनुदान २३.३३% | : | १५७०.१० लाख |
| २. | आयुर्विमा महामंडळाकडून कर्ज | : | ४४९.०० लाख |
| ३. | खुल्या बाजारातील कर्ज (हडकोकडून) | : | ४७११.३४ लाख |

वरील आकृती बंधानुसार महानगरपालिकेने हडकोकडून रुपये ४७.११ कोटीचे कर्ज मिळविण्याकरीता, सन १९९८ मध्ये ठराव पारित करुन, हडकोकडे कर्ज मागणी प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु अद्यापही या कर्जास हडको कडून कर्ज मंजूरीचा प्रतिसाद प्राप्त होत नाही. त्यामुळे पुरेशी निधी उपलब्ध होत नसल्यामुळे सुरु झालेली कामे बंद झालेली आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाशी प्रत्यक्ष चर्चेत असे मत प्रदर्शित करण्यात आले महानगरपालिकेकडे पाणीपट्टी देयकापोटी असलेल्या थकबाकीतून रुपये २.०० कोटी सन २००१-२००२ मध्ये टप्प्या-टप्प्याने वळती करावे, यानुसार महानगरपालिकेने अद्यापपर्यंत रुपये १.०० कोटी अदा केली असून, उर्वरित रक्कम मार्च २००३ पर्यंत अदा करण्यात येईल. थकबाकी पोटी अदाई करण्यात येत असलेली रक्कम महामंडळाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण औरंगाबाद यांच्याकडे वर्ग न करण्यात आल्यामुळे त्यांनी रक्कम रुपये ६७.३० कोटी मधील सुरु करण्यात आलेली पण सध्या बंद स्थितीतील कामे पुर्ण करण्याकरीता एकूण रु. ८०० लाख रुपयांचा प्रस्ताव

महानगरपालिकेकडे सादर केला होता. यामध्ये रुपये २४० लाख रुपये देयकापोटी मागणी केलेली होती. महानगरपालिका प्रशासनास हे मान्य नसल्यामुळे सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण औरंगाबाद यांना ही रक्कम कमी करुन, प्रस्ताव सादर करण्याबाबत सुचविले व त्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी फेर प्रस्ताव महानगरपालिकेस सादर केलेला आहे.

सध्या शहरास पाणी टंचाई भासत असून, विशेषतः सिडको परिसरात आवश्यक तितका पाणी पुरवठा होऊ शकत नाही. त्यामुळे सिडको भागातील नागरिकांमध्ये असंतोश पसरलेला आहे. या परिस्थितीचा विचार करुन, प्रशासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांच्याशी विचार विनिमय करुन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने असे सुचविले आहे की, अर्धवट स्थितीतील कामे उदा. १११८ मी. मी. व ९१४ मी. मी. व्यासाच्या गुरुत्व वाहिनीचे कामे तसेच जायकवाडी येथे अतिरिक्त पंप बसविणे, ही कामे पुर्ण केल्यास सिडको परिसरात २५ दशलक्ष लिटर्स पाणी पुरवठा होऊ शकेल व या कामाकरीता एकूण खर्च रुपये ५१०.०० लाख अपेक्षीत आहे.

सिडको परिसराची पाणी टंचाई लक्षात घेता, रुपये ५१०.०० लक्ष महानगरपालिका निधीमधून खर्च करण्यात येईल व हडकोकडे सादर केलेल्या मुळ प्रस्तावामधून वरील रक्कम रुपये ५१०.०० लाख कमी करण्यात येईल. तरी प्रस्ताव रुपये ५१०.०० लाख महानगरपालिका निधीमधून खर्च करण्याकरीता, सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद** :

श्री. सुदाम सोनवणे : सिडके हडकोच्या वतीने अभिनंदन सिडके हडको भागातील नागरिकांचा जिव्हाळयाचा प्रश्न सुटणार आहे. शिवशाहीचे शासन असतांना हा प्रस्ताव मंजूर झालेला होता व या कामासाठी कर्जाची हमी घेण्यास या सरकारने नकार दिला होता. परंतु या सभागृहात बऱ्याच वेळा चर्चा झाली व सिडको हडको नागरिकांच्या वतीने हा प्रश्न मार्गी लावला. त्या बद्दल मंत्री महोदय श्री. आर. आर. पाटील तसेच मंत्रालयात ज्यांनी बैठक घडवून आणली असे या जिल्हयाचे खासदार मा. श्री. खैरे यांचा नागरिकांचय वतीने आभार व्यक्त करुन, या प्रस्तावानुसार तात्काळ कार्यवाही व्हावी. अशी अपेक्षा करतो.

श्री. भाऊसाहेब ताठे : या प्रस्तावानुसार सिडको हडकोभागातील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यात आला. त्याबद्दल मा. खासदार तसेच आपले अभिनंदन करतो व इतर ज्यांनी प्रयत्न केले, त्या सर्वाचे जनतेच्या वतीने आभार व्यक्त करतो.

श्री. जयवंत ओक : पाणी प्रश्नाबाबत मागील वेळेस वेगवेगळी चर्चा घडवून आली. त्याची दखल घेत आपण व पदाधिकारी तसेच या जिल्हयाचे खासदार मा. श्री. खैरे साहेब व मंत्री महोदय मा. श्री. आर. आर. पाटील यांचे समवेत बैठक घेऊन, हा प्रश्न मार्गी लावला. त्याबद्दले सर्वांचे मी अभिनंदन करतो. तसेच प्रशासनाचा सुध्दा चांगला प्रतिसाद मिळाला. त्याबद्दल प्रशासनाचे सुध्दा अभिनंदन करतो व ही योजना तात्काळ राबवावी. असे मत व्यक्त करतो.

मा. महापौर : गेल्या ६ महिन्यापासून जवळपास प्रत्येक बैठकीत सिडको हडको भागातील पाणी प्रश्नाबाबत चर्चा होत गेली. युती शासनाच्या काळापासून ही योजना मंजूर होऊन पडलेली होती. प्रशासनामार्फत सुध्दा वेळोवेळी प्रयत्न झाले परंतु, ही योजना राबविण्यासाठी कर्ज उपलब्ध होत नव्हते. म्हणून ही योजना थांबून होती. या भागातील नागरिकांची नेहमीच पाणी येत नाही. अशी तक्रार असत व त्यामुळे आपण सर्वांनी एक दिवसा आड पाणी द्यायचे ठरविले ते करुन ही आवश्कयतेनुसार आजही त्या भागातील नागरिकांना पाणी मिळत नाही. ही वस्तुस्थिती आहे. ही योजना तात्काळ कार्यान्वित करण्यास सर्व पदाधिकारी व प्रशासन यांचे सुध्दा योगदान आहे. त्या बद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो व हा ठराव मंजूर करण्यात येत आहे. सर्वांच्या सम्मतीने ही योजना राबविण्याचे प्रयत्न झाले म्हणून, प्रस्ताव सभागृहात सादर झाला. यात सर्वांचे सहकार्य मिळाले. तसेच मा. खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे यांनी मा. मंत्री महोदय ना. श्री. आर. आर. पाटील यांचेकडे सभा आयोजित केली. तसेच संबंधित खात्याचे मंत्री मा. ना. आर. आर. पाटील यांनी बैठकीचे आयोजन करुन, प्रश्न निकाली काढल्याबद्दल त्यांचे या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते. तसेच हडकोचे सभापती यांनी या एक्सपेस लाईनसाठी ४७ कोटी रुपये देण्याचे मान्य केले. त्यांचे देखील या सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते. तसा ठराव मंजूर करण्यात येत आहे.

श्री. भगवान घडामोडे : मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी खासदार यांचेसह या शहराचे प्रतिनिधीत्व करणारे मंत्री महोदय होते का? बैठकीत कोण उपस्थित होते. जे कुणी होते. त्यांचे सर्वांचे अभिनंदन करावे.

मा. महापौर : या बैठकीला माझ्यासह मा. उपमहापौर राजु शिंदे, सभागृह नेते श्री. संजय शिरसाठ तसेच स. स. श्री. सुरजीतसिंग खुंगर व स. स. श्री. आनंद तांदुळवाडीकर व मा. आयुक्त हे प्रशासनाच्या वतीने उपस्थित होते. तसेच एल. आय. सी. व हडकोचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

श्री. स. अली सलामी : पुर्वीचे जे सदस्य होते. त्यांचा सुध्दा सहभाग होात. त्यांचे सुध्दा अभिनंदन करावे.

श्री. भगवान घडामोडे : या शहराचे प्रतिनिधीत्व करणारे मंत्री महोदय बैठकीला उपस्थित होते का?

मा. महापौर : मी अगोदरच खुलासा केला मा. खासदार श्री. खैरे यांनी ही बैठक घडवून आणली व या बैठकीस मंत्री महोदय श्री. आर. आर. पाटील उपस्थित होते. त्याबद्दल या दोन्ही नेत्यांचे अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात येत आहे. बैठकीस कोण होते. याचा खुलासा केला आहे. हा विषय सर्वांच्या सम्मतीने मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ५७२/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर आणि विशेषत: सिडको, हडको भागातील पाणी पुरवठा परिस्थिती याबाबत औरंगाबाद वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाशी झालेल्या विचार विनिमयानुसार ६७.३० कोटीच्या औरंगाबाद वाढीव पाणी पुरवठा योजनेत अर्धवट स्थितीत असलेली १९१८ मी. मी. व ९१४ मी. मी. व्यासाची गुरुत्व वाहिनी तसेच जायकवाडी येथे अतिरिक्त पंप बसविणे ही कामे पुर्ण करुन, सिडको परिसरात २५ दशलक्ष लिटर्स पाणी पुरवठा करण्याकरीता हडकोकडे सादर केलेल्या मुळ

प्रस्तावातून या कामासाठी खर्च होणारी रक्कम कमी करण्याच्या अटीवर महापालिका निधीतून रुपये ५१०.०० लक्ष खर्च करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहर आणि विशेषतः सिडको हडको भागातील पाणी पुरवठयांच्या परिस्थितीचा विचार करुन एक्स्प्रेस लाईनचे काम कार्यान्वित करण्यासाठी औरंगाबाद जिल्हयाचे खासदार मा. श्री. चंद्रकांतजी खैरे यांनी मंत्री महोदय मा. ना. श्री. आर. आर. पाटील यांचे दालनात बैठक आयोजित करुन, या सर्वांनी एक्सप्रेस लाईनचा प्रश्न निकाली काढण्यास मदत केल्यामुळे मंत्री महोदय मा. ना. श्री. आर. आर. पाटील, मा. खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे, हडकोचे सभापती आणि महापालिका पदाधिकारी व प्रशासन यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७३/३ :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे. सन १९७५ च्या औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार रेल्वेस्टेशन ते मिलकॉर्नर मार्गे मध्यवर्ती बसस्थानक १०० फुट (३० मी.) रुंद रस्ता आहे.

उपरोक्त रस्त्यांची रुंदी १९९५ साली प्रारुप (सुधारीत) विकास योजनेनुसार ३५.०० मी. (११५ फुट) करण्यात आली. हयावर हरकती, सूचना व सुनावणी होऊन हया रस्त्याची रुंदी पुन्हा ३० मी. (१०० फुट) करण्यात येऊन तसा विकास योजना प्रस्ताव शासन मान्यतेस्तव म. प्रा. व न. र. चे अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये पाठविण्यात आला. ही प्रारुप विकास योजना मान्य करतांना शासनाने हयात विकास योजनेस भागशः मान्यता दिली. हया मान्यतेचे वेळी विकास योजेनच्या काही प्रस्तावांना पुन्हा १९९५ च्या प्रसिध्द केलेल्या प्रस्तावानुसार ठेवण्यात (रेंट साईट) आले. त्यात शहराची गरज पाहून हया रस्त्याची रुंदी शासनाने (ई. पी./१३) वगळलेला भाग-१३ म्हणून दाखवून ३५.०० मी. केली आहे. हया विकास योजनेच्या वगळलेल्या भागासाठी शासनाने अधिकारी नेमूर पुन्हा हरकती सूचना घेतल्या आहेत. त्याचा अहवाल अद्याप शासनास संबंधित अधिकाऱ्यांनी पाठविलेला नाही.

शासनाने पुन्हा रस्त्याची रुंदी ३५ मी. करण्याचे प्रस्तावित केल्याने व दरम्यान मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार उपरोक्त रस्त्याचे भूसंपादन ३५ मी. (११५ फुट) रुंदी प्रमाणे करुन रस्ता विकसित करण्याचे आदेश दिल्याचे सदर रस्त्याच्या विकासासाठी भूसंपादन करणे आवश्यक आहे. तसेच वाढत्या शहराच्या वाहतुकीची सोय होण्यास्तवही हा रस्ता विकसित करणे आवश्यक आहे.

हया ३५ मी. रुंद रस्त्यामध्ये एकूण ७२ मिळकती बाधित होतात. त्यांचे क्षेत्र सुमारे १४,८७१.०० चौ. मी. असून, भूसंपादनासाठी सुमारे ५ ते ६ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. सबब उपरोक्त रस्त्याचे भूसंपादन मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व शासनाने प्रस्तावित केलेल्या ३५ मी. रुंदी प्रमाणे भूसंपादन करण्यास लागणाऱ्या खर्चासह प्रस्ताव मंजूरीस्तव सादर. प्रस्ताव मान्यते नंतर मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव पाठवून कायदयान्वये भूसंपादन करण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. प्रकाश निकाळजे : सदर भूसंपादनासाठी रु. ५-६ कोटी खर्च येणार आहे.

श्री. सुदाम सोनवणे : मी. महापौर असतांना या रस्त्याचे डांबरीकरण हाती घेण्यात आले होते. प्रत्यक्षात ३०'/३०' हा रस्ता होता आणखी २० फुट प्रत्येकी दोन्ही

बाजून म्हणजेच १०० फुट एकूण दोन्ही बाजूने डांबरीकरण होणार होते. त्यावेळी छावणी बोर्डने काम करण्यांत अडथळा आणला होता. आता प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. परंतु छावणी बोर्डची यास मान्यता मिळेल का? सध्या बाबा पेट्रोल पंप ते रेल्वेस्टेशन हा सुध्दा १०० फुट नाही. आणखी १५ फुट वाढवायचे यात अडचण निर्माण होईल असे वाटते. प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

मा. महापौर : ११५ फुट रस्ता कसा करणार याचा खुलासा करावा.

प्र. सहाय्यक संचालक (न. र.) : छावणी बोर्डकडील भाग वगळून पदमपुऱ्याकडील भाग घेण्यात येऊन कार्यवाही करणार आहोत. विकास योजनेनुसारच रस्ता रुंदीकरण करण्यात येणार आहे.

श्री. सुदाम सोनवणे : एकाच बाजून रुंद करुन पदमपुऱ्यामध्ये स्थायी मालमत्ता असून, महानगरपालिकेस रक्कम मोजावी लागेल. तसेच लोकांना बेघर करण्यापेक्षा छावणी बोर्डशी संपर्क साधून कार्यवाही करावी. सध्या १००' रस्ता सुध्दा त्या ठिकाणी नाही.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांना सूचना करण्यात येते की, या रस्त्याच्या संदर्भात पुन्हा साईटवर जाऊन प्रत्यक्ष तपासणी करुन, पुढील बैठकीत हा प्रस्ताव सविस्तर सादर करावा. नियमाप्रमाणे किती रुंदीकरण करता येते, सध्या किती फुट आहे, मालमत्ता किती येतात. ते सुध्दा नमुद करावे.

डॉ. भागवत कराड : हा प्रस्ताव मंजूर करुन केंद्र शासनाची परवानगी घ्यावी व त्यानुसार छावणी बोर्डाचा भागाचा समावेश करुन, दोन्ही बाजून रस्ता रुंदीकरण व्हावे.

**ठराव क्र. ५७३/३ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या प्रस्तावाच्या बाबतीत प्रत्यक्ष साईडवर जाऊन सविस्तर माहितीसह प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ५७४/४ :**

उपआयुक्त (प्र.) प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री. पंडीत विठ्ठलराव उदावंत यांची दिनांक २४-६-६३ रोजी नाका शिपाई म्हणून तत्कालीन वेतनश्रेणी रुपये ३० १/२ ३५ मध्ये नेमणूक करण्यात आली होती. सदरील कर्मचारी सेवेत असतांना नेहमी गैरहजर राहत असे तसेच आजारी कारणास्तव रजेची मागणी करुन गैरहजर राहत असे त्यांच्या दिनांक २४-६-६३ ते १-४-७७ पर्यंत सेवेच्या काळात त्यांची आजारी कारणास्तव ३४७ दिवसांची रजा मंजूर केलेली आहे.

सदरील कर्मचारी कामावर सतत गैरहजर राहत असल्यामुळे त्यांना दिनांक १४-४-७८ रोजी आरोप पत्र देण्यात येवून त्यांचा खुलासा तीन दिवसांत मागविण्यात आला होता. परंतु सदर कर्मचाऱ्याने मुदतीत खुलासा सादर केलेला नसून, कार्यालयाशी कसल्याही बाबतीत संपर्क साधला नाही. त्यामुळे त्यांना दिनांक २-४-७७ पासून विना परवानगी गैरहजर असल्यामुळे दिनांक १७-६-७८ चे आदेशान्वये दिनांक २-४-७७ पासून निलंबित करण्यात आले.

त्यानंतर संबंधितांने दिनांक ९-८-८७ पर्यंत तब्बल १० वर्षापर्यंत कार्यालयाशी कसल्याही प्रकारचा संपर्क साधला नाही किंवा काही लेखी खुलासा देखील केलेला नाही. त्यानंतर त्यांनी दिनांक १०-८-८७ रोजी अर्ज दिला की, ते १९७८ पासून क्षय रोगाने (टी.

बी.) आजारी असल्यामुळे कामावर हजर झाले नाही व प्रकृती बरी नाही. त्यामुळे त्यांच्या जागेवर त्यांचा मुलगा शाम पंडीतराव उदावंत यांना नोकरी द्यावी. म्हणून अर्ज सादर केला.

सदरील अर्जावर प्रशासनाने दिनांक २९-११-८७ रोजी निर्णय घेतला की, संबंधिताने कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार केला नाही किंवा आजारी असल्याबाबत रजेचा अर्ज सुध्दा दिला नाही. सदरील कर्मचाऱ्यांचा गैरहजेरीचा कालावधी पाच वर्षापेक्षा जास्त होत असल्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे प्रकरण तीन मधील कलम १६ अन्वये अपवादात्मक परिस्थिती विचारात घेवून शासनाने अन्यथा निर्णय दिला असल्याखेरीज कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांना सतत पाच वर्षाला अधिक कालावधी करीता, कोणत्याही प्रकारची रजा मंजूर केली जाणार नाही. म्हणून त्यांना दिनांक २३-११-८७ रोजी महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले व ते सतत पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी कामावर गैरहजर राहिल्याने त्यांना आपली सेवा समाप्त झाल्यामुळे आपणांस निवृत्ती वेतन देता येत नाही. असे कार्यालयीन पत्र जा. क्र. मनपा/आस्था-२/५३९२/८९ दिनांक ५-१०-८९ नुसार कळविण्यात आलेले आहे.

नंतर मा. उपलोक आयुक्त यांचे दिनांक २६-२-९९ च्या आदेशानुसार संबंधित कर्मचाऱ्यास कामावरुन कमी करणे. बेकायदेशीर ठरविले असल्याने श्री. पंडीत उदावंत हे दिनांक २४-६-६३ ते ११-१०-९४ पर्यंत (मृत्यू पर्यंत) नियमित सेवा समजण्यात यावी. म्हणून त्यांच्या पत्नीला कुटूंब निवृत्ती वेतनाचे फायदे देण्यात यावे असे आदेशित केले.

त्यानुसार कार्यालयातर्फे संबंधितास दिनांक २८-५-९९ च्या आदेशान्वये दि. २४-६-६३ पासून सेवेत कार्योत्तर कायम करण्यात येऊन त्यांची दिनांक २-४-७७ ते ११-१०-९४ (६३९८) दिवस (मृत्युपर्यंतचा कालावधी) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे कलम १६ अन्वये कार्यालयीन पत्र जा. क्र./मनपा/आस्था-२/२२९३/९९ दिनांक २८-५-९९ नुसार त्यांची असाधारण रजा मंजूर करण्यात आली व पेन्शन बाबतची सर्व कार्यवाही करुन प्रकरण पेन्शन विभागामार्फत कार्यालयीन पत्र क्र. पेन्शन/११६३/२००१ दिनांक १०-४-२००१ अन्वये जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास पाठविण्यात आले व त्यानंतर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र./९९/सा.शा./पेन्शन/फा.नं.४१/९९ का. वि-१७८ दिनांक २०-६-२००१ अन्वये या प्रकरणाचे आवश्यक कागदपत्रांच्या छायाकिंत प्रती व मुळ सेवापट महालेखाकार (द्वितीय) नागपूर यांना पाठविण्यात आले व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यालयीन पत्र जा. क्र./मनपा/आस्था-२/२३५८/२००१ दिनांक ७/८/२००१ अन्वये कक्ष अधिकारी व उपलोक आयुक्त कार्यालय नविन प्रशासन भवन-१ला मजला मादाम कामा रोड मुंबई-३२ यांना पाठविलेला आहे.

त्यांनतर महलेखाकार, नागपूर-२ यांनी श्री. पंडीत उदावंत माजी शिपाई यांचा गैरहजेरीचा काळ दिनांक २-४-७७ ते १०-१०-९४ हा काळ (Quilfing Service) मंजूर केल्यानंतरच त्यांना पेन्शनचे आर्थिक फायदे देता येईल. असे कळविले आहे.

त्यानुसार सदरील प्रकरणावर कार्यवाही होण्यासाठी कार्यालयाचे पत्र जा. क्र./मनपा/आस्था-२/२००१/२७६८ दिनांक ८-१०-२००१ अन्वये मा. प्रधान सचिव-२ नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांना व दुसरे पत्र क्र. मनपा/आस्था-२/२७७६/२००१ दिनांक ८-१०-२००१ हे मा. गो. ला. गोसावी कक्ष अधिकारी लोक आयुक्तांचे कार्यालय उप नवीन प्रशासन भवन १ ला मजला मादाम कामा रोड, मुंबई-३२ यांना पाठविण्यात आलेले आहे. शासनाकडून गैरहजेरीचा काळ (Quilfing Service) मंजूर झाल्यानंतर सदरील प्रकरण हे मा. महालेखाकार नागपूर-२ यांचेकडे पाठविण्यात येईल. म्हणून महाराष्ट्र शासनाने कार्यासन अधिकारी, नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना कळविण्यात आलेले होते.

परंतु उलट टपाली महाराष्ट्र शासनाचे उप सचिव प्र. मा. माळावदकर यांनी त्यांचे पत्र क्र. एएमसी-१४९८/२९३५/प्र.क्र. २६९/९८/नवि-२४ नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई-४०००३२ दिनांक ९ जानेवारी २००२ अन्वये खुलासा केला आहे की, सदरील प्रकरणी नेमणुक प्राधिकरण (Appointing Authority) औरंगाबाद महापालिका आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी अन्वये महानगरपालिका तिच्या कर्मचाऱ्यासाठी सेवा नियम करु शकते. महानगरपालिकेने शासनाचे सेवा नियम महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत ठराव केलेला आहे. (ठराव क्र. ३६८ दिनांक २४-३-९४) तथापी त्यास शासनाची मान्यता नाही. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, याबाबतीत निर्णय घेण्यास महानगरपालिका सक्षम आहे. कै. पंडीत उदावंत यांची दिनांक २-४-७७ ते ११-१०-९७ या काळातील अनाधिकृत गैरहजेरी नियमित करणे बाबतीत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करुन महालेखाकार कार्यालयास कळवावे. म्हणून पत्राद्वारे कळविलेले आहे.

करीता, उपरोक्त बाबींचा विचार करता सदरील कर्मचाऱ्यांची दिनांक २-४-७७ ते ११-१०-९४ (६३९८) दिवसांची विशेष रजेसह (कॉलीफाईंग सर्व्हीस) मंजूर होणे करीता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) अन्वये प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद** :

श्री. सुदाम सोनवणे : या प्रस्तावानुसार पंडीत उदावंत हे कर्मचारी सतत १० वर्षापासून कामावर नाही. त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधला नाही. असे असतांना त्यांचे मुलाला नोकरीवर घेण्यासाठीचा प्रस्ताव येतो कसा. सदर कर्मचारी सतत कार्यालयात आजारी कारणास्तव अनुपस्थित राहून, मुलाला नोकरीवर घ्यावे. अशी मागणी करुन, अर्ज देतात. हे कितपत बरोबर आहे.

मा. महापौर : प्रस्ताव निवृत्ती वेतनाचा आहे. नोकरीवर घेण्याचा नाही.

श्री. सुदाम सोनवणे : मुलाला नोकरी दया. असा सुध्दा प्रस्तावात नमुद केलेले आहे.

मा. महापौर : सहय्यक आयुक्त-२ खुलासा करावा.

सहाय्यक आयुक्त-२ : मुलाला नोकरी देण्याचा प्रस्ताव नाही. त्यांना पेन्शन लागू करण्या संदर्भात प्रस्ताव सादर केला. श्री. उदावंत यांना बडतर्फ करण्यात आले होते. सन १९९४ मध्ये त्यांचे निधन झाले. तत्पुर्वी त्यांना बडतर्फ करण्यात आले होते व त्यांची उपलोक आयुक्त यांचेकडे पेन्शन लागू व्हावे म्हणून, तक्रार होती. उपलोक आयुक्तांच्या आदेशान्वये प्रशासनाने पूर्ण कार्यवाही करुन प्रकरण महालेखाकार नागपूर-२ यांचेकडे पाठविण्यात आलेले होते.

श्री. प्रकाश निकाळजे, श्री संजय शिरसाठ : सन १९६३ ते १९७७ पर्यंत ते सतत गैरहजर राहत होते. त्यांची एकूण किती दिवस नौकरी केली. त्याचा खुलासा द्यावा. नियमाने पेन्शन लागू करता येते का?

श्री. सुदाम सोनवणे : प्रस्ताव मुलाला नौकरी देण्याचा आहे की, पेन्शन लागु करण्यासाठी ठेवला. याचा स्पष्ट उल्लेख नाही. जो कर्मचारी १४ वर्षाच्या काळात सतत नौकरीत गैरहजर राहतात. त्यांचे मुलाला नोकरीसाठी अर्ज देण्याचा त्यांना अधिकार पोहचतो का? सेवानिवृत्ती नियमाने लागु करता येत असेल तर, प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

मा. आयुक्त : श्री. उदावंत नावाचे कर्मचारी सन ७७ पासून १९९४ पर्यंत कामावर नव्हते. टी. बी. होऊन मरण पावले. ६३ ते ७७ पर्यंत त्यांनी

महानगरपालिकेची सेवा केलेली आहे. दिनांक ११-१०-९४ ला त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचे कुटूंबीयातील लोकांनी पेन्शन लागू करण्याबाबत मागणी केली व ही कार्यवाही लवकर होत नाही व मुलाला सुध्दा नोकरीवर घेत नाही म्हणून, त्यांनी उपलोक आयुक्त यांचेकडे प्रकरण सादर केले. उपलोक आयुक्तांचा आदेशानुसार प्रशासनाने तसा अहवाल उपलोक आयुक्त यांचेकडे सादर केल्या नंतर उपलोक आयुक्त यांनी या प्रकरणात शासनाची मंजूरी घ्यावी असे निर्देश दिले. प्रकरण शासनाकडे मंजूरीसाठी पाठविल्या नंतर शासनाने असे निर्देश दिले कि, कर्मचारी महानगरपालिकेचे आहे. त्यामुळे याबाबतीत सर्वसाधारण सभेने निर्णय घ्यावा. त्यानुसार तसा प्रस्ताव सादर केलेला आहे. यात त्यांचे मुलांच्या नोकरीचा प्रश्न येत नाही. नोकरी म्हणजे दरमहा देण्यात येणारा पगार या प्रस्तावानुसार त्यांना पगार द्यायचा नसून, फक्त १९७७ ते १९९४ पर्यंत त्यांची पेन्शनसाठी कॉलीफाईंग सर्व्हीस धरायची की, नाही हा प्रश्न आहे. १९७७ पासून १९९४ पर्यंत कॉलीफाईंग सर्व्हीस धरल्यास त्यांचे कुटूंबीयींना पेन्शनचा फायदा होईल.

श्री. स. अली सलामी : १९६३ ते १९७७ पर्यंत त्यांनी किती दिवस सेवा केली व ते संपूर्ण दिवस धरल्यास पेन्शन लागू होते का?

मा. आयुक्त : त्यांनी महानगरपालिकेची सन १९६३ ते १९७७ पर्यंत सेवा केली. तेव्हढया सेवेचेच पेन्शन लागू होऊ शकते. १९७७ पासून ते १९९४ पर्यंतची सेवा मंजूर केल्यास त्यांचे कुटूंबीयांना पेन्शनचा फायदा देता येईल. विशेष बाब म्हणून शासन अशा प्रकरणात मंजूरी देतात. परंतु कर्मचारी महानगरपालिकेचे असल्याने या बाबतीत निर्णय या सभागृहालाच घ्यावा लागेल.

श्री. जयवंत ओक : शासन अशा प्रकरणात विशेष बाब म्हणून, परवानगी देते. असा खुलासा आयुक्तांनी केला. त्याप्रमाणे या सभागृहाने सुध्दा कॉलीफाईंग सर्व्हीस लागू करण्याचा निर्णय घ्यावा. संबंधित व्यक्तींच्या कुटूंबीयांना फायदे मिळतील. गरीबांवर अन्याय होणार नाही. या दृष्टीने योग्य निर्णय घेण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : सदर कर्मचारी यांनी सन ७७ पासून ते १९९४ पर्यंत सेवा केलेली नाही व आशा प्रकारचा कालावधी विना पगारी सेवा शासन विशेष बाब म्हणून मंजूर करीत असेल तर, आता सदर कर्मचारी हे महानगरपालिकेचे आहे म्हणून, आपल्या सर्वांवर हा निर्णय सोपविला त्यानुसार त्यांची बिनपगारी सेवा गृहीत धरुन पेन्शनसाठी (Quilfing Service) कॉलीफाईंग सर्व्हीस मंजूर करावी.

श्री. काशीनाथ कोकाटे : महानगरपालिकेकडे सर्व सेवा शर्ती नियम आलेले आहे. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

श्री. सुदाम सोनवणे : सदर कर्मचाऱ्यांच्या कुटूंबीयांना पेन्शन लागू करावे. परंतु त्यांचे मुलाला नोकरीवर घेण्यात येऊ नये.

मा. आयुक्त : मुलाला नोकरीत घेण्याचा प्रश्न हा स्वतंत्र आहे. अनुकंपा धरतीवर घेण्याबाबत कार्यवाही हा वेगळा भाग होतो. प्रस्ताव त्यांचे पत्नीला हयात असे पर्यंत पेन्शन लागू करायचे की नाही, हा प्रश्न आहे.

मा. महापौर : हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे, सदर कर्मचारी हे १९७७ पासून ते १९९४ पर्यंत गैरहजर होते. परंतु त्यांचे कुटूंबीयांना पेन्शनचे फायदे मिळावे. या दृष्टीने त्यांची कॉलीफाईंग सर्व्हीस मंजूर करण्यात येते व या बाबतीत प्रशासनाने नियमाने कार्यवाही करुन निवृत्ती वेतन लागू करावे.

**ठराव क्र. ५७४/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कै. पंडीत उदावंत माजी शिपाई यांना सेवा निवृत्तीच्या अनुज्ञेय सवलती मिळण्यासाठी त्यांची दिनांक ०२-०४-१९७७ ते २१-१०-१९९४ या काळातील अनाधिकृत गैरहजेरी नियमित करण्यास आणि या कालावधीची ६३९८ दिवसांची विशेष रजेसह अर्हता कार्यसेवा (कॉलीफाईंग सर्व्हीस) मान्य करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७५/५ :**

कार्यकारी अभियंता, (पा.पु. विभाग) प्रस्ताव सादर करत आहे की, गणेश कॉलनी येथे स. नगरसेवक श्री. बाळासाहेब थोरात यांचे स्वेच्छा निधीतून महापालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या पाणपोईस श्री. बाळासाहेब थोरात स. नगरसेवक वार्ड क्र. ४२ (गणेश कॉलनी) यांनी पत्र देऊन नविन पाणपोईस " कै. म्हाळसाबाई बाबुराव थोरात यांचे स्मरणार्थ पाणपोई " असे नांव देण्याची विनंती केली आहे. त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

करीता, प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. प्रशांत देसरडा : ५० ते ६० एकूण शहरात पाणीपोई बांधलेल्या आहे. ज्या काही स्वयंसेवी संस्था पाणी पोई चालविण्यास तयार असतील व तसा ठराव घेऊन हया पाणीपोई संस्था चालाकांना देता येईल का? याबाबत निर्णय व्हावा.

मा. महापौर : या शहरात सेवाभावी संस्था आहेत. पाणपोई घेण्यास तयार असतील तर, त्यासाठी शहरात एकूण महानगरपालिकेच्या मालकीच्या किती पाणपोई आहेत. सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत तसा प्रस्ताव ठेवावा. पाणपोईची यादी प्रस्तावा सोबत पुढील बैठकीत द्यावी. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

श्री. किशोर तुळशीबागवाले : असे प्रस्ताव स. सदस्यांनी ठेवायचे असते. प्रशासनामार्फत असे नावानिशी प्रस्ताव येणे बरोबर नाही. ८७ सदस्य आहे. सदस्यांमार्फत ठेवावे.

मा. महापौर : स. सदस्य यांनी प्रशासनाकडे विनंती केली. त्यानुसार प्रशासनामार्फत प्रस्ताव आलेला आहे. स. सदस्य किंवा प्रशासनाने ठेवलेला प्रस्ताव या दोन्ही प्रस्तावास सारखेच महत्व आहे. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ५७५/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ४२ (गणेश कॉलनी) येथे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या पाणपोईस " कै. म्हाळसाबाई बाबुराव थोरात यांचे स्मरणार्थ पाणपोई " असे नांव देण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७६/६ :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद समोर रिट याचिका क्र. ४२१/१९८६ (किसन हिवाळे विरुध्द सिडके प्राधिकरण) ची सुनावणी सुरु आहे. दिनांक ३१-१२-२००१ रोजी मा. उच्च न्यायालयासमोर सुनावणी झाली. मा. उच्च न्यायालयाने असे आदेशित केले की,

सिडकोने त्यांच्याकडे असलेल्या मोकळी जागा (भूखंड) विविध खाजगी संस्थाना भाडे पट्टयाने, अल्प मुदतीच्या करारनाम्याद्वारे दिले आहेत. सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर या विविध संस्था दिलेल्या भूखंडा बाबत महानगरपालिकेची भूमिका काय असणार आहे. सदरच्या करारनाम्यातील कालावधीसाठी वाढ देऊन सदरच्या जागा आहे. त्याच संस्थाना भाडे पट्टयाने महानगरपालिका देणार किंवा सदरचे भाडे पट्टयाने करारनामे रद्द करुन हया मोकळया जागांचा विकास महानगरपालिका स्वतः करणार किंवा कसे याबाबत महानगरपालिकेने सिडको हस्तांतरणानंतरचे धोरण काय असेल, याबाबत आगामी सुनावणीच्या तारखेला मा. उच्च न्यायालयासमोर महानगरपालिकेच्या वतीने म्हणणे सादर करावे लागणार आहे. त्यास्तव ज्या विविध संस्थाना सिडको प्राधिकरणाने भाडेपट्टयावर दिल्या आहेत. त्या संस्थाची यादी व जागांचा तपशील दर्शविणारे स्वातंत्र्य परिशिष्ट या प्रस्तावा सोबत सुलभ संदर्भाकरीता जोडले आहे.

करीता, याबाबत धोरणात्मक निर्णय होण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

## सिडकोने लिव्ह आणि लायसनवर (भाडे तत्वावर) देण्यात आलेल्या इमारतीचा तपशिल (परिशिष्ट)

| अ. क्र. | संस्थचे नांव | वापरातील क्षेत्र वर्ग मिटरमध्ये | उद्देश | करारनामा दिनांक | काला -वधी | करारनामा संपल्याची शेवटची दिनांक | सिडको संचालक मंडळाचा ठराव क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | विनायकराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ एन-९ | ४८०० | खेळाचे मैदान | १०-४-१९९० | १० वर्षे | १०-४-२००० | -- |
| २. | नवलभाऊ प्रतिष्ठान एन-२ | ११०१.५० | खेळाचे मैदान | २४-८-१९९४ | १० वर्षे | २४-८-२००४ | -- |
| ३. | उन्नति शिक्षण प्रसारक मंडळ एन-२ | ६६६८.०० | खेळाचे मैदान | १०-४-१९९० | १० वर्षे | १०-४-२००० | -- |
| ४. | मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ एन-३ | ४२००.०० | खेळाचे मैदान | १२-१-१९९० | १० वर्षे | १२-१-२००० | ४७३६ |
| ५. | गामोद्यीक शिक्षण प्रसारक मंडळ एन-४/डी-३७ | ४३७२.५० | खेळाचे मैदान | १-११-१९८९ | १० वर्षे | २-११-१९९९ | -- |
| ६. | औरंगाबाद डिस्ट्रीक हॉकी असोसिएशन (एन-१२ हॉकी ग्राऊंड) | १४९७६.०० | खेळाचे मैदान | १९-१०-९९५ | १० वर्षे | १९-१०-२००५ | -- |
| ७. | महात्मा गांधी मिशन टाऊन सेंटर | ७ हेक्टर | टाऊन पार्क | १५-१-१९८६ | १० वर्षे | १५-१-१९९६ | ३५६९/दि. २७-१२-८५ |
| ८. | मौलाना आझाद प्ले ग्राऊंड | १.६८ हेक्टर | खेळाचे मैदान | ६-९-१९९५ | १० वर्षे | ६-९-२००५ | -- |
| ९. | कनिफनाथ शिक्षण प्रसारक मंडळ | १०२०.४६४ | खेळाचे मैदान | ५-१-१९९९ | ११ महिने | ५-१-२००० | ७७७४ |
| १०. | कनिफनाथ शिक्षण प्रसारक मंडळ एन-९ | २८६.४० | वृक्षसंवर्धन | २-२-२००० | ११ महिने | २-२-२००१ | ७७७४ |
| ११. | भकित ट्रस्ट एन-१ | १७००.०० | वृक्षसंवर्धन | २४-६-१९८८ | १० वर्षे | २४-६-१९९८ | ४३३२/८. ४.८८ |
| १२. | किसान शिक्षण मंडळ एन-१२ | ४ हेक्टर | वृक्षसंवर्धन | ६-३-१९९२ | ५ वर्षे | ५-३-१९९७ | ४६७६ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिवचैतन्य शिक्षण प्रसारक मंडळ एन-९ | १२६५.२५ | -- | १-२-२००१ | ११ महिने | ३१-१२-२००१ | -- |
| २. | आयकॉन स्पोर्टस क्लब एन-२ | १८९१.०० | -- | १-२-२००१ | ११ महिने | ३१-१२-२००१ | -- |
| ३. | शिल्पकार ट्रस्ट एन-६ | १२९४.८९ | -- | १-३-२००१ | ११ महिने | २-१-२००२ | -- |
| ४. | प्रियदर्शनी ॲकॅडमी स्पोर्टस कॉम्प्लेक्स टाऊन सेक्टर | ३५००.०० | -- | १-६-१९९८ | ११ महिने | ३०-४-१९९८ | दि. ३१-५-२००१ पर्यंत मुदतवाढ देणे बाबत प्रकरण राज्य सरकारकडे प्रलंबित |

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : या प्रस्तावानुसार न्यायालयाने महानगरपालिकेस अशी विचारणा केली की, सिडकोत जे काही भूखंड संस्थेला दिलेले आहे, या संदर्भात हस्तांतरण झाल्यानंतर महानगरपालिका या भूखंड संस्थेकडेच ठेवणार की, आणखी काही योजना राबविणार आहेत. प्रस्तावात १६ भूखंड दिलेले असून, वेगवेगळया संस्थेस वापरण्यासाठी दिलेले आहे. जे भूखंड आहे ते ज्यावेळी सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण होईल. तेव्हा महानगरपालिकेने ताब्यात घ्यावे व टेंडर पध्दतीने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, कोणत्या संस्थेला द्यावेत. याबाबत निर्णय घ्यावा व जास्तीत जास्त महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढेल. याबाबतीत प्रयत्न व्हावेत. सदर भूखंड महानगरपालिका ताब्यात घेणार आहे. अशी माहिती न्यायालयात सादर करावी.

श्री. प्रकाश निकाळजे : सिडकोने काही लोकांना / संस्थाना भूखंड दिले व आता महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर हे भूखंड महानगरपालिका ताब्यात घेणार म्हणून काही लोक न्यायालयात गेले व न्यायालयाकडून या भूखंडावर महानगरपालिका काम करणार याबाबतीत महानगरपालिकेस विचारणा केलेली आहे. हे भूखंड, ओपनस्पेसच्या जागा सिडकोने नागरिकांच्या सोयी सुविधासाठी सोडलेले आहे. अशा जागावर ज्या संस्थाला ज्या लोकांना भूखंड / जागा दिल्या त्यावर त्यांनी कायमस्वरुपी बांधकाम करु नये. कारण महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर त्या जागेचे नियमाने काय करायचे. याचा निर्णय महानगरपालिका नंतर घेणार आहे. यात एकूण १६ भूखंड आहे. यात खेळाचे मैदान सुध्दा आहे. ३ मैदाने वृक्ष संवर्धनासाठी असून, खेळाच्या मैदानावर या संस्थेने विकसित करुन महानगरपालिकेस द्यावे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : प्रस्तावात नमुद केलेले भूखंडापैकी दोन भूखंड वगळता इतर सर्व भूखंडाची करारनाम्याची मुदत संपलेली आहे. न्यायालयात रिपोर्ट देण्यापुर्वी त्या जागा आता सध्या रिकाम्या आहे की, नाही याची पाहणी करावी. त्या जागा प्रत्यक्षात खाली आहे किंवा नाही याची चौकशी व्हावी. तेव्हा रिपोर्ट न्यायालयात सादर करावा. नसता, महानगरपालिकेस अडचण येईल. अशा

जागेवर महानगरपालिके मार्फत चांगल्या प्रकारे विकास करुन महानगरपालिकेचे उत्पन्न जास्तीत जास्त कसे वाढविता येईल. त्यासाठी प्रयत्न करावे. हया जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन स्वतः निर्णय घ्यावा.

श्री. तकीहसन खान : प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे क्र. १, ३, ४, ९, १०, ११ चे करारनामा समाप्त झालेला आहे. करारनामा समाप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार, जबाबदारी सिडकोची होती. काही करारनामे दोन वर्षापुर्वीच समाप्त झाले. दोन वर्षात करारनामा केलेला नसेल तर, त्या जागा संबंधित संस्थेच्या ताब्यात नाही. असे सिध्द होते. ज्यांना पुन्हा करारनामा करुन दिला असेल ते ठिक आहे. परंतु ज्यांना मुदत संपल्यानंतर करारनामा केला नसेल, त्या जागेच्या बाबतीत चर्चा करुन योग्य निर्णय घ्यावा.

श्री. सुदाम सोनवणे : सिडकोने विविध संस्थेला जागा दिल्या. जो प्रस्ताव सादर केला तो योग्य नाही. कारण ज्यावेळी सिडको हस्तांतरणाचा ठराव पारित केला. त्यामध्येच असे नमुद केले की, सिडकोने ज्या जागा संस्थेला / लोकांना करारपध्दतीने दिलेल्या आहे. अशा जागा सिडकोने करारनामा रद्द करुन महानगरपालिकेकडे त्या जागा द्याव्यात. असा निर्णय झालेला असतांना ठराव आणण्याची आवश्यकता नव्हती. ठराव पास झाल्याप्रमाणे सिडकोने त्या जागा करारनामा रद्द करुन महानगरपालिकेकडे जागा द्याव्यात व नियमाप्रमाणे त्या जागा कशासाठी राखीव आहे. त्याप्रमाणे विकास करावा.

श्री. अंबादास दानवे : २० जानेवारी २००० रोजी झालेली सभा त्या सभेत हस्तांतरणाचा ठराव झाला होता. त्यामध्ये क्रमांक सात मध्ये खुल्या जागेबाबत स्पष्ट दिलेले आहे की, सिडको क्षेत्रातील जागांचे हस्तांतरणापुर्वी जागेची संयुक्त पाहणी करुन अशा जागा हस्तांतरण करण्यास उभयपक्षी ठरले आहे. ज्या जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याचा आपण ठराव घेतलेला आहे. त्याप्रमाणे सिडकोने विविध सामाजिक वापराकरीता आरक्षीत असलेले भूखंड संस्थाना लिजवर दिलेले आहे. ज्या भूखंडावर संस्थेने विकास केलेला असे भूखंडाचे लिज करारनामा रद्द करुन महानगरपालिकेस देण्यात यावे. असे यापुर्वीच्याच ठरावात निर्णय घेतला. त्यामुळे हा प्रस्ताव आणण्याची आवश्यकता नव्हती.

श्री. काशीनाथ कोकाटे : प्रस्ताव क्र. ६ हा ७ च्या निगडीत आहे. प्रस्ताव ७ हा सिडको हस्तांतरण करण्याबाबतचा करारनामा आहे. सिडकोने कोणते अधिकार महानगरपालिकेस द्यावे. त्यानुसार महानगरपालिका सिडकोस कोणत्या सवलती देणार आहे. या संदर्भात यापुर्वी दोन वेळेस चर्चा होऊन ठरावाद्वारे निर्णय घेतलेला आहे. तसेच डॉ. भागवत कराड हे महापौर असतांना त्यांचे दालनात सर्व पदाधिकारी तसेच मा. आयुक्त यांचेसह बैठका सुध्दा झाल्या. वेळोवेळी चर्चा केली हस्तांतरण होईल. त्यावेळी सिडकोच्या ज्याही जागा असतील त्या महानगरपालिकेच्या ताब्यात द्याव्यात. असा ठराव पास झाला. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. या प्रस्तावा बरोबरच ७ क्रमांकाच्या प्रस्तावावर सुध्दा चर्चा करुन दोन्ही प्रस्तावावर योग्य तो निर्णय घ्यावा. हया जागा महानगरपालिकेच्या मालकीच्या होतील व त्या नागरिकांना सोयी सुविधा

व्यवस्थित देण्यासाठी महानगरपालिकेकडे घ्याव्यात व जनतेसाठी या जागेवर सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. त्याचा वापर तोच ठेवावा.

प्र. सहाय्यक संचालक (न. र.) : सिडकोच्या जागे संदर्भात उच्च न्यायालयात प्रकरण चालू आहे. त्यामध्ये उच्च न्यायालयोन महानगरपालिकेस अशी विचारणा केली की, सिडकोचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे झाल्यावर ज्या जागा (भूखंड) सिडकोकडे आहे. त्याबाबतीत महानगरपालिकेची भूमिका काय राहणार आहे. असे महानगरपालिकेस विचारणा केलेली आहे. ज्या ओपनस्पेस, गार्डन खेळाचे मैदान अशा ज्या जागा सिडकोत आहे. त्याचे महानगरपालिका काय करणार याबद्दल माहिती उच्च न्यायालयासमोर सादर करायची आहे. एकूण १६ जागा लिज पध्दतीने सिडकोने दिलेल्या आहे.

श्री. काशीनाथ कोकाटे : सिडकोच्या लिजवर व इतर दिलेल्या जागे संदर्भात कोर्टात केस चालू आहे. जी भूमिका सुरुवातील या सभागृहाची होती तीच भूमिका शेवट पर्यंत राहणार आहे. ज्यावेळेसे सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण होईल, त्यावेळी ज्या खुल्या जागा नागरिकांच्या सोयीसाठी सोडलेल्या आहे व लिजवर दिलेल्या अशा सर्व प्रॉपर्टीज सिडकोने महानगरपालिकेकडे द्याव्यात. असा आपण ठरावच घेतलेल्या आहे. हे १००% निश्चित आहे. यास नकार देता येणार नाही. न्यायालयातील केसेसचा व महानगरपालिकेचा काही संबंध नाही. हा प्रस्ताव येथे मांडण्याची आवश्यकता नव्हती. न्यायालयाने डायरेक्शन मागितलेले आहे. तसेच सदर जागा ज्या विकास कामासाठी ठेवलेल्या आहे. त्या जागेत तोच विकास या जागेत होईल. असा वापरात बदल करु नये.

श्री. भगवान घडामोडे : बऱ्याच वेळा हस्तांतरणावर बैठक होऊन चर्चा झाली. जशाच्या तशा संपूर्ण जागा सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण होईल. त्यावेळी महानगरपालिकेकडे द्याव्या. असा निर्णय झाला. हस्तांतरणाच्या वेळेस सिडकोने ज्याही जागा कुणाला दिल्या असतील, अतिक्रमण असेल त्या सर्व जागा जेवढे क्षेत्रफळ आहे. तेवढे रिकाम्या करुन द्याव्यात. अशी ओळ सिडको हस्तांतरणाच्या ठरावात नोंद करावी. त्यानुसारच कार्यवाही व्हावी.

श्री. सुरजीतसिंग खुंगर : न्यायालयात या जागे संदर्भात केस चालु आहे. अद्याप सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले नाही. सिडकोने लिजवर दिलेल्या जागेला मुदत वाढ देण्याच्या दृष्टीने कोर्टाने माहिती मागितली. महानगरपालिकेने योग्य रितीने बाजू न्यायालायात मांडावी. जेव्हा महानगरपालिकेकडे सिडकोचे हस्तांतरण होईल तेव्हा सर्वच्या सर्व जागा सिडकोने महानगरपालिकेस खाली करुन द्याव्यात. असा निर्णय मांडावा. त्या जागेवर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने भविष्यात विकास करावा.

मा. आयुक्त : आपणा सर्वांना माहित आहे. मा. न्यायालयाने जेव्हा यापुर्वी आदेश पास केला सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण होणार आहे. याबाबत न्यायालयात निर्देश देईल व सिडको मधील विविध जागा लिजवर दिलेल्या आहे. तसेच काही ओपनस्पेस, गार्डन खेळाचे मैदान आहे. अशा जागेच्या संदर्भात न्यायालयात प्रकरण चालु आहे व महानगरपालिकेकडे सिडकोचे हस्तांतरण होईल. त्यावेळी या जागेवर महानगरपालिकेची काय भूमिका राहणार याबाबत न्यायालयातील महानगरपालिकेचे वकील यांना कोर्टाने

माहिती मागविली आहे. न्यायालयात माहिती सादर करायची त्यादृष्टीने हा प्रस्ताव सादर झालेला आहे. तसेच ज्या जागा लिजवर दिल्या त्या जागा सिडकोच्या नियोजनामध्ये कोणत्या कामासाठी राखीव होत्या. लिजवर देण्याबाबत नियमावली आहे. त्या बद्दल कोटीचे काही म्हणणे नाही. ज्या कामासाठी त्या जागा राखीव आहे, तेच विकास कामे करणार काय याबाबत माहिती द्यायची आहे आणि ज्या कामासाठी जागा राखीव त्याच कामाकरीता विकास व्हावयास पाहिजे, दुसरा मुद्दा असा की, या जागेवर विकास महानगरपालिका स्वतः करणार की, खाजगी पार्टीकडून करुन घेणार जेव्हा हस्तांतरण होईल तेव्हा या जागेवर विकास कसा करायचा हा सुध्दा निर्णय महानगरपालिकेस घ्यावा लागणार आहे. तिसरी बाब अशी की, सिडको हस्तांतरणाच्या संदर्भात जो करारनामा करायचा तो आपल्या समोर ठेवला. त्यात काही बाबींमध्ये प्रशासनाने बदल केलेला त्या बदलाची प्रत सुध्दा मंजूरीसाठी ठेवलेली आहे. यावर सुध्दा आपणाला योग्य तो निर्णय घ्यावा लागेल. पुढील कार्यवाहीसाठी अडचण घेऊ नये म्हणून, करारनामा आपल्या समोर ठेवलेला आहे. यास कुणाचे दुमत राहणार नाही असे वाटते.

श्री. सुदाम सोनवणे : प्रस्तावासोबत जी जागेची आकडेवारी दिली ती कमी आहे. सिडको हडको मध्ये जे समाज मंदिर आहे. त्यासाठी व इतर मंदिरासाठी किती जागा आहेत. याचा समावेश सोबत दिलेल्या यादीत नाही. एन-१२ येथे समाज मंदिर आहे. एन-७ मध्ये समाज मंदिर आहे. अशा सर्व जागेची माहिती द्यावयास पाहिजे. लिज रद्द करुन आपणाकडे अतिक्रमण रहित देण्यात यावे.

मा. महापौर : सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरणबाबतचा ठराव यापूर्वीच आपण सर्वांच्या सहमताने पास केलेला आहे. त्यामध्ये सिडकोतील जागा सिडकोचे हस्तांतरण करते वेळेस महानगरपालिकेकडे द्याव्यात अस स्पष्ट आहे. महानगरपालिकेकडे सिडकोचे हस्तांतरण होईल व सिडकोने ज्या जागा लिजवर दिल्या किंवा इतर जागा यावर असलेले अतिक्रमण काढून व लिजवरच्या जागा हया महानगरपालिकेकडे हस्तांतरणाच्या वेळी सिडकोने रिकाम्या करुन द्याव्यात. जेव्हा हस्तांतरण होईल अशी महानगरपालिकेची भूमिका राहिल व अशा जागा ज्यांना लिजवर द्यावयाचे त्याचा महानगरपालिका प्रशासन विचार करेल. ज्या जागा ज्या विकास कामासाठी ठेवल्या त्याच विकास कामासाठी वापरण्यात येईल. अशी भूमिका महानगरपालिकेची असून, तसा निर्णय घेण्यात येत आहे.

**ठराव क्र. ५७६/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरणाच्या वेळी परिशिष्टा मध्ये दर्शविलेल्या खेळाचे मैदान, टाऊन पार्क, वृक्षसंवर्धनाची जागा, कम्युनिटी सेंटर ई. १६ जागांचा करारनामा / भाडेपट्टा रद्द करुन संपूर्ण क्षेत्र अतिक्रमण रहित महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात यावे. विविध संस्थांना दिलेले भूखंडाचा करारनामा सिडकोनेच रद्द करावे. हस्तांतरणानंतर महानगरपालिका स्वतंत्ररित्या योग्य ती कार्यवाही करेल. ज्या प्रयोजनासाठी जागा ठेवल्या आहेत, त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होईल. वरील प्रमाणे न्यायालयात म्हणणे सादर करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७७/७ :**

शहर अभियंता महानगरपालिका, औरंगाबादर हे प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको भागाचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे लवकरच होऊ घातले आहे. त्यास्तव महानगरपालिकाच सिडको प्राधिकरण या दोन संस्थामध्ये हस्तांतरणासंबंधी करावयाच्या करारनाम्याचा मसुदा इंग्रजी भाषेत सिडको प्रशासनाने तयार केला असून, सदरच्या मुळ इंग्रजी मसुद्याचे मराठी भाषेत भाषांतर तयार करण्यात आले आहे. सुलभ संदर्भाकरीता मुळ इंग्रजी भाषेतील करारनाम्याचा मसुदा व त्याचे मराठी भाषांतर या प्रस्तावासोबत अवलोकनार्थ जोडले आहे.

या प्रस्तावित करारनाम्यातील कलमा बाबत महानगरपालिका सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन त्यात सर्वसाधारण सभेची मान्यता होणे आवश्यक आहे. या मान्यतेनंतर सिडको प्रशासनाशी हस्तांतरणासंबंधी करारनामा करण्यात येईल.

करीता, प्रस्ताव विचारार्थ व योग्य त्या निर्णयास्तव सादर.

**इंग्रजी करारनाम्याचा मराठी अनुवादीत गोषवारा**

हा करारनामा औरंगाबाद येथे ------------- रोजी करण्यात येत आहे. सिडको ही कंपनी १९५६ च्या कंपनी कायदयान्वये नोंदणी झालेली आहे. (१.१९५६) व त्याचे मुख्य कार्यालय निर्मल, दुसरा मजला नरिमन पॉईंट मुंबई येथे आहे. त्या पुढे सिडकोचा अर्थ सिडको व त्यानंतर त्याचे येणारे वारसदाराचा समोवश राहिल. करार लिहून देणार व औरंगाबाद महानगरपालिका याचे ऑफिस टाऊन हॉल एरिया येथे आहे. ( यानंतर याचा उल्लेख मनपा असा होईल तेव्हा त्याचा आर्थ मनपाचे आयुक्त, त्याच्यांतर्फे येणार अधिकारी व मनपाचे वारसदार असा गृहीत धरण्यात येईल व यास करार लिहून घेणार असे संबोधण्यात येईल.

ज्या अर्थी,

सिडको ही १०-११-९६ हेक्टर या क्षेत्रासाठी नांवे शहरे औरंगाबादसाठी महाराष्ट्र शासनाचा जाहीरनामा क्र. यु. डी. पी. एच. आणि ११ डी.-टीपीएस-३०७२/६८४०/५३७७ डब्लू-२ दिनांक ३ जुलै १९७३ ( त्या उपरांत यास कायदा म्हणण्यात येईल. ) साठी विशेष नियोजन प्राधिकरण संस्था म्हणून नेमण्यात आली.

सिडकोने नियमान्वये व सूचना देऊन नविन शहर बसविण्यासाठी ही जमिन ताब्यात घेऊन त्याचे नियोजन केले.

सिडकोला विशेष नियोजन संस्था म्हणून नेमणूक केल्यानंतर नविन औरंगाबादसाठी नेमलेली जबाबदारी पूर्ण केली व मनपा ही नियोजन संस्था व स्वायत्त संस्था मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ नागरी सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी व त्याचा रख रखाव करण्यासाठी व त्यांना कर लावण्याचा अधिकार असल्यामुळे व नविन शहरे त्यांच्या अखत्यारीत येत असल्यामुळे सिडको व मनपाच्या पूर्ण चर्चेअंती महानगरपालिकेने हा भाग (नविन औरंगाबाद) ताब्यात घेण्याबाबत व सिडकोने देण्याबाबत ठरविले आहे व त्यांच्या शर्ती व अटी खाली नमुद केल्याप्रमाणे राहतील. सोबत विशेष करुन सुचित व्हावे. म्हणून नविन औरंगाबादचा नकाशा परिशिष्ट-१ मध्ये म्हणून जोडत आहोत.

हा करार खालील प्रमाणे शर्ती व अटीसह राहिल.

१) हया सोबत जोडलेले सर्व परिशिष्ट व विवरण पत्र हे करारनाम्याचा हिस्सा म्हणून बंधनकारक आहे.

२) सिडकोची पाणी पुरवठयासाठी बांधलेले जमिनीवर (E. S. R) व जमिनीच्या खाली (G.S.R.) व त्यासाठी बांधलेले पंपगृह त्यासाठी लागणारी मशिनरी विद्युतीकरण व

त्याचे भाग व ती चालू करण्यासाठी लागणारी सर्व यंत्रणा पूर्ण नियोजनासहित व नकाशा सहित हस्तांरण करण्याचे कबुल केले. ज्यांची माहिती परिशिष्ट III अ. प्रमाणे आहे.

३) सिडको महानगरपालिकेला जलनिःसारण योजना, जलनिःसारण पंप घर सहित व नकाशा सहित परिशिष्ट II मध्ये दाखविल्याप्रमाणे हस्तांतर करीत आहे व मनपा मी स्वीकार करीत आहे.

४) सिडको, रस्ते, खेळण्याची मैदाने मोकळी जागा, बगीचे झाडे जमीन अंतर्गत जलनिःसारण योजना विद्युत वाहिनी, पथदिवे व विद्युत उपग्रहे, सार्वजनिक स्वच्छता गृहे जेथे आहे. त्या आधाराव हस्तांतरण करीत आहे व मनपाने ते स्विकारण्याचे कबुल केले आहे. त्याचे सविस्तर माहिती परिशिष्ट III, VII, VI, VI-A, II-V मध्ये आहे. ज्यावर योग्य त्या संबधित अधिकाऱ्यांच्या सहया करुन ते यासोबत जोडलेले आहे.

५) लिहून देणार व लिहून घेणार दोन्ही याबाबतीत सहमत आहे की, हे हस्तांतर परवाना उपयुक्त ( लिव्ह आणि लायसन्स बेसीस ) आधारावर ९९ वर्षाच्या करारन्वये हस्तांतर करीत आहे व कुठल्याही जागेचा वापर जागेचा अथवा योजनेचा उपयोग उल्लेखित केल्या प्रमाणेच केला जाईल व जेव्हा त्याचा वापर करारा व्यतिरिक्त जमिनीच्या वापरात जर काही बदल करावयाचा झाल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चा कायदा तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कायदयातील तरतुदीस अधिन राहून मनपास असे बदल करता येतील व त्या व्यतिरिक्त इतर बदल केल्यास सिडको उपयुक्त परवाना रद्द करुन त्या जागेचा ताबा कसलाही मोबदला मनपाला न देता परत घेऊ शकण्याचा अधिकार अबाधित ठेवत आहेत.

६) महानगरपालिका उपयुक्त योजना ( Infrastructure facilities and Services ) व त्यासाठी लागणारे सर्व प्रकारच्या इमारती, जलनिःसारण पाणीपुरवठा योजना, पथदिवे इ. हया हस्तांतरानंतर स्वखर्चाने वापर करु शकेल व त्याचा रखरखा व देखरेखी साठी अथवा दर्जा उंचावण्यासाठी जो काही खर्च करावयाचा असेल तो त्यांनी स्वतः करावा व त्यापोटी कसलीही भरपाई सिडकोतर्फे केली जाणार नाही.

७) सिडकोने सध्या काही सेवा सुधारण्यासाठी कामे ( Development work ) हाती घेतलेली आहे. जो काही भाग मनपाला हस्तांतर होणार आहे. सिडको अशी हाती घेतलेली कामे हस्तांतर झाल्यानंतर सुध्दा पूर्ण करील व काही कामे पुढे भविष्यात हाती घेईल. (जमिनी लिजवर देतांना अटी पूर्ण करण्यासाठी काही हाती घेईल. ) जसे जलनिःसारण, रस्ते, पाणीपुरवठा इत्यादी व ही कामे ते मनपाच्या सल्याने पूर्ण करतील.

८) सिडको उपयुक्त सेवेसाठी असलेल्या जमिनीचे ९९ वर्षाच्या परवाना पध्दतीने हस्तांतर करीत आहे. त्याचे वर्णन व वापर खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **सेवा** | **क्षेत्रफळ** | **सर्व सेवेसाठी लायसन फ्री टोकन म्हणून दरसाल. नाममात्र रुपये १ प्रति पार्सल** |
|---|---|---|---|
| १. | रस्ते परिशिष्ट-III प्रमाणे | १४०७२३६ चौ. मीटर | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | बगीचे परिशिष्ट- VI, VI-A, प्रमाणे | १५६३१९ चौ. मीटर | रु. १ प्रति पार्सल रु. २५.०६ |
| ३. | खुली जागा व मैदाने परिशिष्ट- VIII प्रमाणे | ५००२००.२८ चौ. मीटर | रु. १ प्रति पार्सल रु. ३५९.०० |
| ४. | पाणीपुरवठा वाहिन्या, साठा पंपींग स्टेशन्स सातारा | १९०५.०० चौ. मीटर | निरंक |
| ५. | एस. टी. पी. आणि दोन पंपिंग स्टेशन्स, सिक्रेज पंपहाऊस आणि त्या संबंधिच्या मशिनरी, सार्वजनिक मुताऱ्या / स्वच्छतागृहे परिशिष्ट-II प्रमाणे | २९२०६.०० चौ. मीटर | रू. १ प्रती पार्सल रु. ३.०० |
| ६. | भूमिगत जलनिःसारण योजना परिशिष्ट-II प्रमाणे | ५६६५८.०० चौ. मीटर | निरंक |
| ७. | विद्युत वाहिन्या, पथदिवे आणि विद्युत सबस्टेशन परिशिष्ट- V प्रमाणे | ५९११ नग व त्यावरील फीटींग सहीत | रु. १ प्रती पार्सल रु. ६.०० |
| | | | **एकूण रु. ३९३.००** |

९) मनपा दरवर्षी परवाना फी म्हणून रु. ३९३.०० १ जानेवारी ते ३१ डिसंबर किंवा त्याच्या हिस्यांसाठी म्हणून देण्याचे कबूल करीत आहे. परवाना फी दरवर्षी १० जानेवारीच्या अगोदर व वर्षाच्या सुरुवातीलाच देईल व अशी फी जोपर्यंत परवाना रद्द करीत नाही. तो पर्यंत देत राहील.

१०) वरील निर्देशित जमिनी व्यतिरिक्त त्यावर उभारलेली मशिनरी मनपा ताब्यात घेत आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे
सेवा प्रकार व त्याचे ढोबळ मानाने त्याचे वर्णन

१) एस. टी. पी. मशिनरी, फिक्चर्स आणि अवजारे
२) पाणी पुरवठा पंपींग स्टेशन्स आणि इक्युपमेंट
३) सिवरेज पंप हाऊस एन-१ एफ-६ मधील
४) पथ दिवे परिशिष्ट V प्रमाणे

११) सध्या सिडकोने सर्व्हे नंबर ३० मुर्तिजापूर ( विमानतळाजवळ ) जलनिःसारण प्रक्रिया प्लॅन्ट बांधलेला आहे व तो सर्व मशिनरी सहीत त्या जमिनीसहीत, मनपाने घेण्याचे कबुल केले आहे व ते देण्याचे सिडको कबुल करीत आहे. ज्यांचे संपूर्ण परिशिष्ट-II मध्ये जोडण्यात आले आहे

१२)

१३) औरंगाबाद महापालिका, निर्देशित जमिनीचा वापर करण्यासाठीचे हस्तांतर करतांना मान्य करीत आहे व भविष्यात निर्देशित जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास मनपा ती जागा व त्या जागेचा ताबा सिडकोस देईल. मनपा त्या जागेवर कुठल्याही तिसऱ्या व्यक्तीला अथवा संस्थेला तात्पुरता अथवा कायमचा हक्क देणार नाही व मनपा त्या जागेवर कसलेही अतिक्रमण होणार नाही हे पाहिल व हस्तांतरण करणाऱ्या शर्तीची बारकाव्याने पालन करील.

१४) सिडकोने प्रक्रिया प्लॅन्ट, पंप हाऊस, बगीचा, झाडलोट व साफसफाई इत्यादी कामांची रखरखाव करण्यासाठी पुष्कळशा ठेकेदारांशी करार केलेला आहे. त्याचे सविस्तर करार परिशिष्ट-VI, II, VIIIA मध्ये जोडलेली आहे. मनपा त्या ठेकेदारांकडून चालू ठेक्यांचा अवधी पूर्ण होईपर्यंत काम करुन घेईल व त्याची अदायगी कराराप्रमाणे देत राहील व मनपाला जे योग्य वाटेल त्याप्रमाणे ठेक्यांचा कार्यकाल पूर्ण झाल्यांवर बदल करण्याचा अथवा नविन ठेका देण्याचा अधिकार पूर्णपणे मनपाकडे राहील.

१५) मनपाने नविन औरंगाबाद मधील पथ दिव्यांचा वापर व रखरखाव ताबडतोब सुरु करण्याची कबुल केले आहे.
( परिशिष्ट-V प्रमाणे )

१६) मनपा जमिनी खालील जलनिःसारण योजना, नविन औरंगाबादमधील वापर रखरखाव परिशिष्ट-II प्रमाणे ताबडतोब करण्याचे हाती घेण्याचे कबुल करीत आहे.

१७) मनपा नविन औरंगाबाद मधील बगीने परिशिष्ट-V प्रमाणे एन-१२ मधील रोपवाटीकाचा रखरखाव व वापर ताबडतोब हाती घेण्याचे कबुल करीत आहे.

१८) मनपा नविन औरंगाबाद मधील रस्ते, साफसफाई कचरा गोळा करण्याचे काय व रखरखाव ताबडतोब हाती घेण्याचे कबुल करीत आहे.

१९) मनपा पाणीपुरवठा योजना परिशिष्ट- IIIA प्रमाणे तारीख ------------ पासून वापर करण्याची हाती घेण्याचे कबुल करीत आहे. परंतु काही ठिकाणी सिडकोच्या पाणी पुरवठयाचे विस्तारीकरणाचे काम चालू आहे ते पूर्ण झाल्यावर ते देखील मनपा ताबडतोब ताब्यात घेईल.

२०)

२१) सर्वसेवा हस्तांतर केल्यानंतर मनपा नियोजन संस्था म्हणून नविन औरंगाबादसाठी राहील, सिडकोस अद्यापही वेगवेगळया सेवा उपलब्ध करण्यासाठीचे लिजधारकाकडून / खरेदीदाराकडून थकबाकी येणे आहे. म्हणून मनपा कबुल करते की, जोपर्यंत सिडको नविन औरंगाबाद मधील भूधारकांना नाहरकत प्रमाणपत्र फक्त आर्थिक बाबीबाबत देत नाही. तोपर्यंत मनपा त्यांना कुठल्याही परवानगी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना १९६६ नियमाखाली विकास करण्याची परवानगी देणार नाही. अथवा वापर करण्याची देखील परवानगी देणार नाही.

२२) मनपा व सिडको नविन औरंगाबादमधील ज्या जमिनी अद्याप सिडकोकडे विकसील करावयाच्या आहेत, तरी अशा जमिनी विकसीत करण्यासाठी व बांधकाम परवाना अथवा भोगवटा प्रमाणपत्र घेण्यासाठी एका भागात एकच नियोजन प्राधिकरण असावे. या उद्देशाने हे अधिकार महानगरपालिका औरंगाबादकडे राहतील.

२३) सिडकोच्या जमिनीचे अतिक्रमाणापासून व बेकायदेशीर विकास होण्यापासून अथवा बेकायदेशीर ताबा करण्यापासून त्याचे संरक्षण करता यावे म्हणून व अशे बेकायदेशीर ताबा हटविणे व बेकायदेशीर विकास थांबविणे तसेच, मोकळया जागेचे पथ रस्ते, रस्त्याच्या बाजुच्या मोकळया जागेचे संरक्षण करता यावे म्हणून, मनपास नियोजन प्राधिकरण संस्थेचे अधिकार राहतील. परंतु सिडकोच्या जमिनी अबाधित राहाण्यात म्हणून दोन्हीही पार्टी सिडकोला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२, ५३, ५४ खालील अधिकार बहाल करीत आहे. तसेच सिडकोला म. प्रा. व. न. र. अधिनियम १९६६ च्या कलम १३५, १३९ व १४२ खालील अधिकार बहाल करीत आहे. ज्यामुळे बेकायदेशील जमिनीवरील व पथ रस्त्यावरील व रस्त्याच्या बाजुवरील ताबा हटविता यावा.

२४) सिडको शासन निर्णय क्रमांक डीओसी-१०९५/७५९/प्रक्र/९६५/नवि-२०/मंत्रालय मुंबई-४०००३२ दिनांक १२ जुलै, २००१ प्रमाणे मनपाला खालील रक्कम देईल.

I) रक्कम रु. १७५ लाख पाणीपुरवठा व जलनि:सारणमधील जनतेचा भाग म्हणून

II) रक्कम रु. २७५ लाख रस्ते, जलनि:सारण योजना, जलप्रक्रिया प्लॅट, जलनि:सारण प्रक्रिया व जलनि:सारण पंप इत्यादी खर्चापोटी पूर्ण रक्कम म्हणून हस्तांतर करतांना देईल.

२५) नाटयगृह बांधण्यासाठी सिडकोला दिलेले २५ लक्ष रुपये सिडको मनपास या हस्तांतरासोबत परत करणार असून सिडकोने नाटयगृहाची जमिन विनामुल्य मनपास देण्याचे कबुल केले आहे.

२६) शासन निर्णय दिनांक १२ जुलै २००१ प्रमाणे सिडको तळमजला अधिक पहिला मजला, मजल्याचा इमारतीचा एक भाग नकाशात दाखविल्याप्रमाणे मनपास विनामोबदला वापरण्यास देण्याचे कबुल करीत आहे.

२७) मनपा सफाई ठेकेदारांची, सिडको भागासाठी केलेले ठेके, ठेक्यांच्या शर्ती व अटीनुसार ठेक्यांचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत चालू ठेवील अथवा पर्यायी व्यवस्था झाल्याबरोबर त्या ठेक्यांना कोणताही मोबदला न देता, बंद करु शकेल.

२८) मनपा ३९ सिडको आस्थापनावरील माळी कर्मचाऱ्यांचे हस्तांतर करुन घेण्याचे कबुल करीत आहे. त्यांच्या खाली असलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम (gratulty) इत्यादी रक्कम हे मनपाकडे सिडकोने हस्तांतरण करण्याचे कबुल केले आहे व अशा हस्तांतरणास त्या कर्मचाऱ्यांची मान्यता असेल व त्यांची सेवा व ज्येष्ठता ज्या दिवशी सिडको हस्तांतरीत करील त्या दिवसापासून धरण्यात येईल.

२९) सध्या सिडकोने अतिक्रमण व बेकायदेशीर भोगवटापासून भागाचे संरक्षण करता यावे. म्हणून, सुरक्षा एजन्सीला लावले आहेत. त्यांचे हस्तांतर करण्याबाबतीत सिडको व मनपा नंतर ठरवतील.

हा करार लिहून देणार व लिहून घेणार यांच्या सही व शिक्यानिशी वर लिहलेल्या दिवशी केला आहे. मुख्य प्रशासक नविन औरंगाबाद-------------- आयुक्त / उपआयुक्त

| | |
|---|---|
| समक्ष : | समक्ष : |
| १ | १ |
| २ | २ |

## *AGREEMENT*

2. This Agreement made at Aurangabad, the--------- day of------------- Two Thousand BETWEEN CITY and INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED, a Company incorporated under the Companies Act, 1956 (1 of 1956) and having its Registered office of Nirmal 2nd floor, Nariman Point, Mumbai-40021 ( hereinafter referred to as " The CIDCO " which expression shall where the context so admits be deemed to include its. Successors and assignees ) of the One Part AND AURANGABAD MUNICIPAL COROPORATION, having its office at Town Hall Area, Aurangabad - 431210 ( hereinafter referred to as " The A.M.C. " which expression shall where the contexst so admits be deemed to include their respective heirs, executors, administrators and representatives ) on the Other Part.

**WHEREAS**

I) The CIDCO is the Special Planning Authority for the area admeasuring 10-11-96 Ha. This was designated as a site for the New Town of Neq Aurangabad by the Government Maharashtra in exercise of its powers vide Notification No. VDPII and IID TPS-3072/76840-53577/W-2 dated 3-7-1973 ( hereinafter referred to as " the said Act " )

II) The CIDCO has acquired the lands with due process of law within the Notified Area of New Town for development and disposal and accordingly the CIDCO has made planned development within the Notified Area of New Aurangabad.

III) The CIDCO after its appointment as a Special Planning Authority has successfully completed its duly of notified New Aurangabad and for the mea of New Aurangabad, the A.M.C. is successor in interest. Being Planning Authority. The A.M.C. owes statutory duty in terms of Provisions of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 c to maintain and operat all the Civic amenities provided in the New Town and further empowered to levy Property Tax within the area of New Town.

IV) After due negotiations and discussion, the A.M.C. agreed to take over and the CIDCO agreed to hand over the area of New Aurangabad more particularly described and delineated on the man annexed herewith as ANNEXURE-I alongwith all basic infrastructures and Civil amenities Provided in New Aurangabad on the terms and conditions referred hereinafter.

**NOW THIS AGREEMENT WITHIN ESSTH AS FOLLOWS :**

1) All Annexures and Schedules attached to this Agreement shall Form part and participle of this Agreement.

2) The CIDCO agree to transfer water supply with E.S.R./G.S.R. alongwith Ground Storage Reservoir with Pump House. Elevated Storage Reservoir, pumping Machinery including all necessary electrical installations, the electrical, components and Machinery already commissioned more particularly described in ANNEXURE-IIIA. With all scheme details, plans duly signed by concerned authority.

3) The CIDCO agree to transfer A.M.C. and the A.M.C. agree to take over sewage. Treatment Plan, Sewage Pump house more particularly described in ANNEXURE-II with all scheme details, plans duly signed by concerned authority.

4) The CIDCO agree to handover and the A.M.C. agree to take over Roadl, Playgrounds and open Spaces, Gardens, Tree Plantation Underground Drainage System Power line Street Light and Electric Sub-Stations and Public Toilets on ' as is where is basis. ' The details are annexed herewith as ANNEXURE-III, VII, VI-A, V duly signed by concern authority.

5) It is further agreed by both the parties that, the lands below the infrastructures will be transferred a leave and license basis for period of 99 years and A.M.C. specifically agreed to use these for specified propose mentioned in the Agreement. In case A.M.C. desire to alter

modify the use of land for public purpose. It can do so, till it is done within the framework of M.R.T.P. Act 1960 and B.P.M.C. Act 1949 and in the event the A.M.C. alter or change the specified use of lands, other than notify the CIDCO reserves its right and authority to cancel the league and license and resume the land without any payment of compensation to the A.M.C.

6) The A.M.C. agree that. After transfer of infrastructural facilities and services, the A.M.C. shall be fully responsible and liable for operation maintenance, repairs and up gradation of these infrastructures and services at their own cost of expenses and shall not have any claim against the CIDCO.

7) The CIDCO is presently carrying out certain development works in the area which are to be handed over to the A.M.C. CIDCO agree to complete the on going works even after handing over the A.M.C. Besides, CIDCO shall also undertake such works for execution and completion when while ( Seeing the Land ) leusing out the land to various persons / Institutions, It has undertaken to develop certain infrastructure like drainage roads, water distribution pipelines, so on and so forth and will at plan at complete with constitution of A.M.C.

8) The CIDCO agree to transfer. The lands under infrastructures on leave and license basis for period of 99 years. Description of lands for specified use is given as follows.

| Type of Services | Area | Annual License fee as take Rs. 1/- per parcel |
|---|---|---|
| Roads ( ANNEXURE - III ) | 14,07,236.00 Sq.m. | NILL |
| Gardens ( ANNEXURE - VI, VI-A) | 1,56,319.00 Sq.m | Rs. 1.00/- per parcel (Rs. 25.00) |
| Playgrounds / Open Spaces ( ANNEXURE - VII ) | 5,00200.00 Sq.m | Rs. 1.00/- per parcel (Rs.359.00) |
| Water supply lines, Storage and Pumping Stations (Satara) | 1,905.00 Sq.m | NILL |
| S.T.P. and २ Pumping stations, Sewerage Pump House and allied Machinery | 21,206.00 Sq.m | Rs. 1.00/- per parcel (Rs. 3.00) |
| ( ANNEXURE - II ) Publis Toilet | | NILL |
| Underground Drainage system (peripheral) ( ANNEXURE - II ) | 56,658.00 Mts | NILL |
| Powerline / street lights and Electrical Sub-Stations ( ANNEXURE - X ) | 5,911 Nos of fittings | Rs. 1.00/- per parcel (Rs. 6.00) |

9) The A.M.C. Agree to pay Annual License fee of Rs. 39 for the period stating from 1st January to 31st December or Part Breaf of each year.

The said License fee will be paid. I advance on out any deduction was ever on or before the 10th day January of and every year and, such fee shall be paid till the cause and license is revoked

10) In addition to the above the machinery erectent the nation ebbing taken over, by A.M.C. as described below.

| Type of services | Board description of machinery (Separate schedules / Annexure word) |
|---|---|
| I. | Cost of S.T.P. and machine fixture equipments etc. |
| II. | Cost of water supply Equipment shipping station etc. |
| III. | sewerage Pump House at N-1 and N-6 |
| IV. | street Lights (Annexure-V) |

11) At present, CIDCO has constructed a Sewerage reatmen plant in S.NO. 30 Murtizapur near Airport. The A.M.C. grees to We over the said vitalities along with its allied equipments / machinery and CIDCO agreed to hand over the possession of he premises, land machinery Pump house and plants and sevrage system, the description of which is annexed hence aim as ANNEXURE-II

12) It is agreed that the, A.M.C. shall use the lanc exclusively for the purpose for which the CIDCO has handed over test. In case, the A.M.C. does not require the land for the designed use, the A.M.C. shall deliver possession of such lands to CIDCO. The A.M.C. agree that they will not create any third party interest way of transfer or alienation by any means, temporarily or permanently of these lands to any person or body. The A.M.C. shall protect these lands farm encroachments and also observe the terms and concerns of the transfer of the transfer scrupulously.

13) CIDCO has engaged various agencies for the maintenance and operation of treatment plants pump houses, development of gardens, sweeping, clearing and past control etc. on contract basis. The details of such contracts arm at ANNEXURES-VI, II, VII. The A.M.C. may continue to avail. The services of these agencies till exdity of the present contract on making payments as per the contract and shall have the right to make their arrangements as may round suitable on the expiry of each of the contract.

14) The A.M.C. agrees to take over the maintenance and operation of the street lighting of New Aurangabad Area with immediate effect as per ANNEXURE-V.

15) The A.M.C. agrees to take over the maintenance and operation of underground drainage system, S.T.P. and Sewerage Pump Houses of New Aurangabad with immediate effect as per ANNEXURE-II.

16) The A.M.C. agrees to take over the maintenance and operation of gardens as per ANNEXURE-VI with N-12 Nursery.

17) The A.M.C. agrees to take over the maintenance and operation of roads along with Sweeping, cleaning and garbage disposal of New Aurangbabad area with immediate effect.

18) The A.M.C. agrees to take over the balance water supply system from CIDCO on or from dated ----- as per ANNEXURE-IIIA. There are some pockets where CIDCO is going to develop water supply system. That system will also be handed over to A.M.C. immediately after completion of work. The A.M.C. agrees to this also.

19) On transfer of infrastructures, the powers of Planning Authority one to be exercised by the A.M.C. in respect of transferred area of New Aurangabad by CIDCO. However, to facilitate the recovery of huge arrears to CIDCO from its buyers and lessees, it has been agreed by the A.M.C. that they will not grant development permission under section-45 of the Maharashtra Regional and Town planning Act, 1966 without obtaining Objection Certificate from CIDCO to the extend of financial dues ( Arrears on A/C of various charges and premium ) similarly the A.M.C. shall not grant occupancy certificates without noc of CIDCO.

20) It is agreed between the A.M.C. and the CIDCO that, within the New Aurangabad, considerable portion of land is still to be developed and disposed by the CIDCO. However there can not be two development authorities in the same area. Hence CIDCO agrees to obtain B.P./development possession/occupancy Certificate for A.M.C. ever per the land not deport and disposed.

21) It is further agreed between the parties that for the purpose of protecting CIDCO'S lands free from encroachments, unauthorized occupation and unauthorized developments etc. It is imperative to remove the unauthorized occupation, developments taking place on CIDCO'S land and also necessary to protect open spaces like footpaths road sides, etc for which the A.M.C. shall exercise the powers of Planning Authority. However in the interest of protecting CIDCO'S lands CIDCO shall have a concurrent jurisdiction for exercising the powers under section-52, 53, 54 and 55 of the M.R.T.P. Act 1966 to enable the CIDCO to remove unauthorized encroachments as well as unauthorized developments as explained above also the CIDCO shall exercise powers under section-135, 139 and 142 of the M.R.T.P Act, 1966 for the purpose of removal of unauthorized occupation on CIDCO'S land.

22) It is agreed between A.M.C. and CIDCO that as per the Government decision vide letter NO DOC-1095/759/CR-165/VD-10/Dtd. 12-7-2001. following amount shall be paid by CIDCO.

   A) Rs. 175.00 lacks popular contribution towards water supply, sewerage system.

   B) Rs. 275.00 lacks towards repairs to the roads, drainage system, Sewage Treatment Plant, Sewage Pump House and other miscellaneous expenditure as full and final payment towards landing over of services to A.M.C.

23) It is agreed between A.M.C. and CIDCO that CIDCO should refund Rs. 25.00 Lacks to A.M.C. towards the land cost of the proposed Auditorium

plot at N-5 allot the plot free of cost to A.M.C. for development of Auditorium.

24) It is agreed between A.M.C. and CIDCO that as per the Government decision vide letter NO DOC-1095/759/CR-165/VD-10/Dtd. 12-7-2001 to handover one wing of G+1 structure of existing CIDCO office building to A.M.C. free of cost more specifically marked on plan placed as ANNEXURE-XI.

25) It is agreed to take over the existing contract of sweeping and cleaning of CIDCO area on the same terms and conditions of the contract and continue to operate till expiry of contract period or shall terminate immediately after making alternate arrangement without making any compensation.

26) It has been agreed by the A.M.C. that along with 39 Malies in the A.M.C. and CIDCO agreed to transfer their dues on account of C.P.F. Gratuity etc. payable to then. This is subject to the condition that, these employees shall give consent for transfer. The details are annexed herewith as ANNEXURE-X.

27) Presently, within CIDCO area, for protecting the lands from encroachments and unauthorized occupation, CIDCO has engaged security Agencies and after transfer of the services, the A.M.C. and the CIDCO will mutually decided regarding continuation of these agencies in due course of time.

IN WITNESS WHEREOF the Lesser and Lessee has/have hereunto set and subscribed his/their hands and seal the day and year first above written.

Signed and delivered for and
On behalf of the City and Industrial
Development Corporation of
Maharashtra Limited by the hand of

( )
It Managing Director/
Chief Administrator (New Towns)

In presence of
1.
2.

Signed and delivered by the within
Aurangabad Municipal
Corporation by the hand of

( )
Dy. Commissioner/A.M.C.

In presence of
1.
2.

# करारनाम्या संबंधित प्रशासनाचे अभिप्राय
## इंग्रजी करारनाम्याचा मराठी अनुवादित गोषवारा

| | सिडकोतर्फे प्रस्तावित केल्याप्रमाणे | मनपा प्रशासनातर्फे प्रस्तावित केल्याप्रमाणे |
|---|---|---|
| | हा करारनामा औरंगाबाद येथे ------ रोजी करण्यात येत आहे. सिडको ही कंपनी १९५६ च्या कंपनी कायदयान्वये नोंदणी झालेली आहे. (१.१९९६) व त्याचे मुख्य | बदल नाही. |

| | | |
|---|---|---|
| | कार्यालय निर्मल, दुसरा मजला नरिमन पॉईंट मुंबई येथे आहे. (यापुढे सिडकोचा अर्थ सिडको व त्यानंतर त्यांचे येणारे वारसदाराचा समोवश राहील.) करार लिहून देणार व औरंगाबाद महानगरपालिका यांचे ऑफिस टाऊन हॉल एरिया येथे आहे. (यानंतर याचा उल्लेख मनपा असा होईल तेव्हा त्यांचा अर्थ मनपाचे आयुक्त, त्याच्यांतर्फे येणारे अधिकारी व मनपाचे वारसदार असा गृहीत धरण्यात येईल) व यास करार लिहून घेणार असे संबोधण्यात येईल. | |
| | ज्या अर्थी,<br>सिडको ही १०११.९६ हेक्टर या क्षेत्रासाठी नवी शहरे औरंगाबादसाठी महाराष्ट्र शासनाचा जाहीरनामा क्र. यु. डी. पी. एच. आणि ११ डी-टीपीएस-३०७२/७६८४० डब्ल्यू-२ दिनांक ३ जुलै १९७३ ( या उपरांत यास कायदा म्हणण्यात येईल) साठी विशेष नियोजन प्राधिकरण संस्था म्हणून नेमण्यात आली. | बदल नाही. |
| | सिडकोने नियमान्वये व सूचना देऊन नविन शहर बसविण्यासाठी ही जमिन ताब्यात घेऊन त्यांचे नियोजन केले. | बदल नाही. |
| | सिडको विशेष नियोजन संस्था म्हणून नेमणूक केल्यानंतर नविन औरंगाबाद साठी नेमलेली जबाबदारी पूर्ण केली व मनपा ही नियोजन संस्था व स्वायत्त संस्था मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ ने नागरी सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी व त्याचा रखरखाव करण्यासाठी व त्यांना कर लादण्याचा अधिकार असल्यामुळे व नविन शहरे त्यांच्या अखत्यारित येत असल्यामुळे सिडको व मनपाच्या पूर्ण चर्चेअंती महानगरपालिकेने हा भाग (नवनि औरंगाबाद) ताब्यात घेण्याबाबत व सिडकोने देण्याबाबत ठरविले आहे व त्यांच्या शर्ती व अटी खाली नमुद केल्याप्रमाणे राहतील सोबत विशेष करुन सूचित व्हावे. म्हणून नविन औरंगाबादचा नकाशा-१ मध्ये म्हणून जोडत आहोत. | बदल नाही. |

| | | |
|---|---|---|
| | हा करार खालील प्रमाणे शर्ती व अटीसह राहिल | |
| १. | हया सोबत जोडलेले सर्व परिशिष्ट व विकास पत्र हे करारनाम्याचा हिस्सा म्हणून बंधनकारक आहे. | बदल नाही. |
| २. | सिडकोनीं पाणी पुरवठासाठी बांधलेले जमिनीवर (E.S.R.) व जमिनीच्या खाली (G.S.R.) व त्यासाठी बांधलेले पंपगृह त्यासाठी लागणारी मशिनरी विद्युतीकरण व त्याचे भाग व ती चालू करण्यासाठी सर्व यंत्रणा पूर्ण नियोजनसहित व नकाशासहित हस्तांतरण करण्याचे कबुल केले. ज्याची माहिती परिशिष्ट-III अ प्रमाणे आहे. | बदल नाही. |
| ३. | सिडको महानगरपालिकेला जलनि:सारण पंप घरासहित व नकाशा सहित परिशिष्ट II मध्ये दाखविल्याप्रमाणे हस्तांतर करीत आहे व मनपा ते स्विकार करीत आहे. | बदल नाही. |
| ४. | सिडको रस्ते, खेळण्याची मैदाने मोकळी जागा, बगीचे झाले जमिन अंतर्गत जलनि:सारण योजना विद्युत वाहिनी, पथदिवे व विद्युत उपगृहे, सार्वजनिक, स्वच्छतागृहे जेथे आहे त्या आधारावर हस्तांतरण करीत आहे व मनपाने ते स्विकारण्याचे कबुल केले आहे. ज्याचे सविस्तर माहिती परिशिष्ट -III, VII, VI, VI-A, II-A मध्ये आहे. ज्यावर योग्य त्या संबंधित अधिकाऱ्यांच्या सहया करुन ते यासोबत जोडलेले आहे. | सिडको, रस्ते, खेळण्याची मैदाने मोकळी जागा बगीचे झाडे जमिन अंतर्गत जलनि:सारण योजना विद्युत वाहिनी, पथदिवे व विद्युत उपगृहे, सार्वजनिक स्वच्छता गृहे जेथे आहे. त्या आधारावर (अतिक्रमणापासून मुक्त) हस्तांतरण करीत आहे व मनपाने ते स्विकारण्याचे कबुल केले आहे. ज्याचे सविस्तर माहिती परिशिष्ट-III, VII, VI, VI-A, II-A मध्ये आहे. ज्यावर योग्य त्या संबंधित अधिकाऱ्यांच्या सहया करून ते यासोबत जोडलेले आहे. |
| ५. | लिहून देणार व लिहून घेणार दोन्ही याबाबतीत सहमत आहे की, हे हस्तांतर परवाना उपयुक्त (लिव्ह आणि लायनस बेसीस) आधारावर ९९ वर्षाच्या करारान्वये हस्तांतर करीत आहे व कुठल्याही जागेचा वापर, जागेचा अथवा योजनेचा उपयोग उल्लेखित केल्याप्रमाणेच केला जाईल व जेव्हा त्या जमिनीचा अथवा योजनेच्या उपयोगामध्ये कसलाही बदल केल्यास सिडको उपयुक्त परवाना रद्द करुन त्या जागोचा ताबा कसलाही मोबदला मनपास न देता परत घेऊ शकण्याचा अधिकार | लिहून देणार व लिहून घेणार दोन्ही याबाबतीत सहमत आहे की, हस्तांतर परवाना उपयुक्त (लिव्ह आणि लायनस बेसीस) आधाराव ९९ वर्षाच्या करारन्वये हस्तांतर करीत आहे व कुठल्याही जागेचा वापर जागेचा अथवा योजनेचा उपयोग उल्लेखित केल्याप्रमाणेच केला जाईल व जेव्हा त्याचा वापर कराराव्यतिरिक्त जमिनीच्या वापरात काही बदल करावयाचा झाल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चा कायदा तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व |

| | | |
|---|---|---|
| | अबाधित ठेवत आहे. | नगररचना अधिनियम १९६६ च्या कायदयातील तरतुदीस अधिन राहून, मनपास असे बदल करता येतील व त्या व्यतिरिक्त इतर बदल केल्यास सिडको उपयुक्त परवाना रद्द करुन त्या जागेचा ताबा कसलाही मोबदला मनपास न देता परत घेऊ शकण्याचा अधिकार अबाधित ठेवत आहे. |
| ६. | महानगरपालिका उपयुक्त योजना (Infrastructure Facilities and Services) व त्यासाठी लागणारे सर्व प्रकारचा इमारती, जलनि:सारण पाणी पुरवठा योजना, पथदिवे इ. हया हस्तांतरणांनंतर स्वखर्चाने वापर करु शकेल व त्याचा रखरखाव देखरेखीसाठी अथवा दर्जा उंचावण्यासाठी जो काही खर्च करावयाचा असेल तो त्यांनी स्वत: करावा व त्यापोठी कसलीही भरपाई सिडको तर्फे केली जाणार नाही. | बदल नाही. |
| ७. | सिडको सध्या काही सेवा सुधारण्यासाठी कामे (Development work) हाती घेतलेली आहेत. जो काही भाग मनपाला हस्तांतर होणार आहे. सिडको अशी हाती घेतलेली कामे हस्तांतर झाल्यानंतर सुध्दा पुर्ण करील व काही कामे पुढील भविष्यात हाती घेईल (जमिनी लिजवर देतांना त्या अटी पुर्ण करण्यासाठी काही कामे हाती घेईल.) असे जलनि:सारण, रस्ते पाणीपुरवठा इ. | सिडको सध्या काही सेवा सुधारण्यासाठी कामे (Development work) हाती घेतलेली आहेत. जो काही भाग मनपाला हस्तांतर होणार आहे. सिडको अशी हाती घेतलेली कामे हस्तांतर झाल्यानंतर सुध्दा पुर्ण करील व काही कामे पुढील भविष्यात हाती घेईल (जमिनी लिजवर देतांना त्या अटी पुर्ण करण्यासाठी काही कामे हाती घेईल.) असे जलनि:सारण, रस्ते पाणीपुरवठा इ. व ही कामे ते मनपाच्या सल्याने पुर्ण करतील. |
| ८. | सिडको उपयुक्त सेवेसाठी असलेल्या जमिनीचे ९९ वर्षाचे परवाना पध्दतीने हस्तांतर करीत आहे. त्याचे वर्णन व वापर खालील प्रमाणे | |

| **अ. क्र.** | **सेवा** | **क्षेत्रफळ चौ. मीटर** | **सर्व सेवेसाठी लायसन फिटोकन म्हणून दरसाल रुपये १०० प्रति पार्सल** | **सर्व सेवेसाठी लायसन फि टोकन म्हणून दरसाल नाममात्र रुपये १.०० प्रति पार्सल.** |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | रस्ते परिशिष्ट III प्रमाणे | १४०७२६६ | निरंक | निरंक |
| २. | बगीचे परिशिष्ट VI, VIA प्रमाणे | १५६३१९ | रु. २५००/- | रु. २५००/- |
| ३. | खुली जागा व मैदाने परिशिष्ट VIII प्रमाणे | ५००२००.५८ | रु. ३५९००/- | रु. ३५९.०० |
| ४. | पाणी पुरवठा वाहिन्यासाठी पंपपिंग स्टेशन्स सातारा | १९०५.०० | निरंक | निरंक |
| ५. | एस. टी. पी. आणि दोन पंपींग स्टेशन्स सिवरेज पंप हाऊस आणि त्यासंबंधिच्या मशिनरी, सार्वजनिक मुतार्‍या / स्वच्छतागृहे परिशिष्ट II प्रमाणे | २९२०६.०० | रु. ३००/- | रु. ३०० |
| ६. | भूमिगत जलनिःसारण योजना परिशिष्ट II प्रमाणे | ५६६५८.०० | निरंक | निरंक |
| ७. | विद्युत वाहिन्या, पथदिवे आणि विद्युत सबस्टेशन परिशिष्ट-V प्रमाणे | ५९११ नग प त्यावरील फिटींग सहित | रु. ६००/- | रु. ६०० |
| | | **एकूण रु.** | **३९३००/-** | **एकूण रु. ३९३/-** |

| | | |
|---|---|---|
| ९. | मनपा दरवर्षी परवाना फि म्हणून रुपये ३९३००/- १ जाने ते ३१ डिसे किंवा त्यांच्या हिश्यासाठी म्हणून देण्याचे कबुल करीत आहे. परवाना फि दरवर्षी १० जानेवारीच्या अगोदर व वर्षाच्या सुरुवातीलाच देईल व अशी फि जोपर्यंत परवाना रद्द करीत नाही. तोपर्यंत देत राहील. | मनपा दरवर्षी परवाना फि म्हणून रुपये ३९३/- १ जानेवारी ते ३१ डिसेंबर किंवा त्यांच्या हिश्यासाठी म्हणून देण्याचे कबुल करीत आहे. परवाना फि दरवर्षी १० जानेवारीच्या अगोदर व वर्षाच्या सुरुवातीलाच देईल व अशी फि जोपर्यंत परवाना रद्द करीत नाही. तोपर्यंत देत राहील. |
| १०. | वरील निर्देशित जमिनी व्यतिरिक्त त्यावर उभारलेली मशिनरी मनपा ताब्यात घेत आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे | बदल नाही. |

| | | |
|---|---|---|
| | **सेवा प्रकार व त्याचे ढोबळ मानाने त्याचे वर्णन** | |
| | १. एस. टी. पी. मशिनरी, फिक्चर्स आणि अवजारे<br>२. पाणी पुरवठा पंपींग स्टेशन्स आणि इक्युपमेंट<br>३. सिवरेज पंप हाऊस एन-१ एन-६ मधील<br>४. पथदिवे परिशिष्ट-V प्रमाणे | |
| ११. | सध्या सिडकोने सर्व्हे नंबर ३० मुर्तीजापूर (विमानतळाजवळ) जलनिःसारण प्रक्रिया प्लॅन्ट बांधलेला आहे व तो सर्व मशिनरी सहित त्या जमिनीसहित, मनपाने घेण्याचे कबुल केले आहे व ते देण्याचे सिडाको कबुल करीत आहे. ज्यांचे संपूर्ण वर्णन परिशिष्ट-II मध्ये जोडण्यात आले आहे. | बदल नाही. |
| १२. | सिडको व मनपाच्या सहमतीने असे ठरले की, जी जमिन ज्या उद्देशसाठी (कामसाठी) हस्तांतरील करण्यात आली. तिचा वापर बदलण्याचा अधिकार सिडको राखून ठेवित आहे. परंतु ज्या कारणासाठी जमिनी हस्तांतरित केली त्या कारणासाठी (कामासाठी) दुसरी जमिन उपलब्ध करुन देईल अथवा त्या कामासाठी वापर करीत असतांना सुध्दा त्या जमिनीचा दुसऱ्या कामासाठी उपयोग सिडको करु शकेल. हे सर्व मनपाच्या सहमतीने केले जाईल व त्या वेळेस ज्या सेवा (उद्देश) त्या जमिनीवरुन उपलब्ध होतो. त्यावर कसलही परिणाम होणार नाही. हे पाहण्यात येईल. | हे कलम प्रशासनास मान्य नाही, कारण एकच काम जेव्हा एकाच भागात दोन संस्था करतात. तेव्हा नियमाची गल्लत होते व त्यातून सर्वसाधारण नागरिकांची गैरसोय निर्माण होते व कोर्ट कचऱ्याचे प्रमाण वाढते म्हणून हे कलम मनपा प्रशासनास मान्य नाही. |
| १३. | औरंगाबाद महापालिका निर्देशित जमिनीचा वापर करण्यासाठी हस्तांतर करतांना मान्य करीत आहे व भविष्यात निर्देशित उद्देशासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास मनपा ती जागा व जागेचा ताबा सिडकोस देईल. मनपा त्या जागेवर कुठल्याही तिसऱ्या व्यक्तिला अथवा संस्थेला तात्पुरता अथवा कायमचा हक्क देणार नाही व मनपा त्या जागेवर | औरंगाबाद महापालिका निर्देशित जमिनीचा वापर करण्यासाठी हस्तांतर करतांना मान्य करीत आहे व भविष्यात निर्देशित उद्देशासाठी जमिनाचा वापर करावयाचा नसल्यास मनपा ती जागा व जागेचा ताबा सिडकोस देईल. मनपा त्या जागेवर कुठल्याही तिसऱ्या व्यक्तिला अथवा संस्थेला तात्पुरता अथवा कायमचा हक्क देणार नाही व |

| | | |
|---|---|---|
| | कसलेही अतिक्रमण होणार नाही हे पाहिल व हस्तांतरण करणाऱ्या शर्तीची बारकाईने पालन करील जमिनीच्या वापरात कुठलाही बदल केल्यास सिडको त्या जमिनीचा ताबा घेण्याचे हक्क अबाधित ठेवित आहे व त्या जमिनीचे हस्तांतर करण्यासाठी मनपा कसलाही वाद घालणार नाही. | मनपा त्या जागेवर कसलेही अतिक्रमण होणार नाही हे पाहिल व हस्तांतरण करणाऱ्या शर्तीची बारकाईने पालन करील. |
| १४. | सिडकोने प्रक्रिया प्लॅन्ट, पंप हाऊस बगीचा, झाडलोट व साफसफाई इत्यादी कामांची रखरखाव करण्यासाठी पुष्कळशा ठेकेदारांशी करार केलेला आहे. त्याचे सविस्तर करार परिशिष्ट-VI, II, VIIA मध्ये जोडलेली आहे. मनपा त्या ठेकेदारांकडून चालू ठेक्याचा अवधी पुर्ण होईपर्यंत काम करुन होईल व त्याची अदायणी कराराप्रमाणे देत राहील व मनपाला जे योग्य वाटेल त्याप्रमाणे ठेक्यांचा कार्यकाल पुर्ण झाल्यावर बदल करण्याचा अथवा नविन ठेका देण्याचा अधिकार पुर्णपणे मनपाकडे राहील. | बदल नाही. |
| १५. | मनपाने नविन औरंगाबाद मधील पथ दिव्यांचा वापर व रखरखाव ताबडतोब सुरु करण्याचे कबुल केले आहे. (परिशिष्ट-V प्रमाणे) | बदल नाही. |
| १६. | मनपा जमिनीखालील जलनिःसारण योजना नविन औरंगाबाद मधील वापर व रखरखाव परिशिष्ट- II प्रमाणे ताबडतोब करण्याचे हाती घेण्याचे कबुल करीत आहे. | बदल नाही. |
| १७. | मनपा नविन औरंगाबाद मधील बगीचे परिशिष्ट IV प्रमाणे एन-१२ मधील रोपवाटीकाचा रखरखाव व वापर ताबडतोब हाती घेण्याचे कबुल करीत आहे. | बदल नाही. |
| १८. | मनपा नविन औरंगाबाद मधील रस्ते, साफसफाई कचरा गोळा करण्याचे काम व रखरखाव ताबडतोब हाती घेण्याचे कबुल करीत आहे. | बदल नाही. |
| १९. | मनपा पाणी पुरवठा योजना परिशिष्ट IIIA प्रमाणे तारीखपासून वापर करण्याचे | बदल नाही. |

| | | |
|---|---|---|
| | हाती घेण्याचे कबुल करीत आहे. परंतु काही ठिकाणी सिडकोच्या पाणी पुरवठयाचे विस्तारीकरणाचे काम चालू आहे ते पुर्ण झाल्यावर ते देखिल मनपा ताबडतोब ताब्यात घेईल. | |
| २०. | सिडकोने हया करारन्वये ज्या सेवा व सोई, इमारती व मशिनरी (Infrastructures) हस्तांतरीत केलेले आहे ते किंवा त्यांच्याशी संबंधित सेवा व सोयी (Infrastructures) स्वत:च्या विकास करण्यासाठी वापरण्याचा अधिकार राखुल ठेवित आहे. | हे कलम मनपा प्रशासनास मान्य नाही. कारण मनपास एकदा सोयी व सुविधा हस्तांतरित केल्यानंतर परत जर सिडाकोंनी त्या स्वत:च्या विकसाकरीता परत घेण्याचा अधिकार राखून ठेवल्यास अशा सोयी व सुविधावर मनपास विसवून राहता येणार नाही व पर्यायी सोई व सुविधा नागरिकांसाठी कराव्या लागतील व मधल्या काळात नागरिकांची गैरसोय होईल. असंतोश निर्माण होऊ शकतो. |
| २१. | सर्वसेवा हस्तांतर केल्यानंतर मनपा नियोजन संस्था म्हणून नविन औरंगाबादसाठी राहिल. सिडकोस अदयापही वेगवेगळया सेवा उपलब्ध करण्यासाठी लिज धारकांकडून/खरेदीराकडून थकबाकी येणे आहे. म्हणून मनपा कबुल करते की. जोपर्यंत सिडको नविन औरंगाबाद मधील भूधारकांना ना हरकत प्रमाणपत्र देत नाही. तो पर्यंत मनपा त्यांना कुठल्याही परवानगी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना १९६६ नियमाखाली विकास करण्याची परवानगी देणार नाही. | सर्वसेवा हस्तांर केल्यानंतर मनपा नियोजन संस्था म्हणून नविन औरंगाबादसाठी राहिल. सिडकोस अदयापही वेगवेगळया सेवा उपलब्ध करण्यासाठी -------- लिज धारकांकडून/खरेदीदारांकडून थकबाकी येणे आहे. म्हणून मनपा कबुल करते की, जोपर्यंत सिडको नविना औरंगाबाद मधील भूधारकांना ना हरकत प्रमाणपत्र फक्त आर्थिक बाबी बाबत देत नाही. तो पर्यंत मनपा त्यांना कुठल्याही परवानगी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना १९६६ नियमाखाली विकास करण्याची परवानगी देणार नाही अथवा वापस करण्याची देखील परवानगी देणार नाही. |
| २२. | मनपा व सिडको हया बाबतीत सहमत आहेत की, ज्या जमिनी अद्याप सिडकोकडे विकसित करावयाच्या आहेत व त्या विकसित करुन सिडकोने त्या विकावयाच्या आहेत व सिडकोस नियोजन व प्राधिकरण संस्था म्हणून काम करता यावे म्हणून सिडकोला असे काम करण्यासाठी मनपाकडून बांधकाम परवाना घेण्याची गरज नाही. | मनपा व सिडको हया बाबतीत सहमत आहेत की, ज्या जमिनी अद्याप सिडकोकडे विकसित करावयाच्या आहेत तरी अश्या जमिनी विकसित करण्यासाठी व बांधकाम परवाना अथवा भोगवटा प्रमाणपत्र घेण्यासाठी एका भागात एकच नियोजन प्राधिकरण असावे या उद्देशाने हे अधिकार मनपाकडे राहतील. |
| २३. | सिडकोच्या जमिनीचे अतिक्रमणपासून व बेकायदेशीर विकास होण्यापासून अथवा | बदल नाही. |

| | | |
|---|---|---|
| | बेकायदेशीर ताबा करण्यापासून त्यांचे संरक्षण करता यावे म्हणून व असे बेकायदेशीर ताबा हटविणे व बेकायदेशीर विकास थांबविणे तसेच मोकळया जागेचे पथ रस्ते, रस्त्याच्या बाजूच्या मोकळया जागेचे संरक्षण करता यावे म्हणून मनपास नियोजन प्राधिकरण संस्थेचे अधिकार राहतील. परंतू सिडकोच्या जमिनी अबाधित राहण्यात म्हणून दोन्हीही पार्टी सिडकोला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२, ५३, ५४ खालील अधिकार बहाल करीत आहे. तसेच सिडकोला म. प्र. व न. र. अधिनियम १९६६ च्या कलम १३५, १३९ व १४२ खालील अधिकार बहाल करीत आहे. ज्यामुळे बेकायदेशीर जमिनीवरील व पथ रस्त्यावरील व रस्त्याच्या बाजूवरील ताबा हटविता यावा. | |
| २४. | सिडको शासन निर्णय क्रमांक डीओसी-१०९५/७५९/प्र.क्र.९३५/नवि-२०, मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १२ जुलै २००१ प्रमाणे मनपाला खालील रक्कम देईल. | बदल नाही. |
| I | रक्कम रु. १.७५ लाख पाणी पुरवठा व जलनिःसारण जनतेचा भाग म्हणून | बदल नाही. |
| II | रक्कम रु. २७५ लाख रस्ते जलनिःसारण योजना, जलप्रक्रिया प्लॉट, जलनिःसारण प्रक्रिया व जलनिःसारण पंप इत्यादी खर्चापोटी पुर्ण रक्कम म्हणून हस्तांतर करतांना देईल. | बदल नाही. |
| २५. | नाटयग्रह बांधण्यासाठी सिडकोला दिलेले २५ लक्ष रुपये सिडको मनपास या हस्तांतरा सोबत परत करणार असून, सिडकोने नाटयग्रहाची जमिन विनामुल्य मनपास देण्याचे कबुल केले आहे. | बदल नाही. |
| २६. | शासन निर्णय दिनांक १२ जुलै २००१ प्रमाणे सिडको तळमजला अधिक पहिला मजला, मजल्याचा इमारतीचा एक भाग नकाशात दाखविल्याप्रमाणे मनपास विनामोबदला वापरण्यात देण्याचे कबुल करीत आहे. | बदल नाही. |

| | | |
|---|---|---|
| २७. | मनपा सफाई ठेकेदारांची, सिडको भागासाठी केलेले ठेके, ठेक्यांच्या शर्ती व अटीनुसार ठेक्यांचा कार्यकाल पूर्ण होईपर्यंत चालू ठेविल अथवा पर्यायी व्यवस्था झाल्याबरोबर त्या ठेक्यांना कोणताही मोबदल न देता, बंद करु शकेल | बदल नाही. |
| २८. | मनपा ३९ सिडको अस्थापनावरील माळी तसेच ३२ कायम स्वरुपी, कर्मचाऱ्यांचे (परिशिष्ट-x प्रमाणे) हस्तांतर करुन घेण्याचे कबुल करीत आहे. त्यांच्या खाली असलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम (Gratuity) इ. ही मनपाकडे सिडकोने हस्तांतर करण्याचे कबुल केले आहे व अशा हस्तांतरणास त्या कर्मचाऱ्यांची मान्यता असेल. | मनपा ३९ सिडको अस्थापनावरील माळी तसेच ३२ कायम स्वरुपी, कर्मचाऱ्यांचे (परिशिष्ट-x प्रमाणे) हस्तांतर करुन घेण्याचे कबुल करीत आहे. त्यांच्या खाली असलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम (Gratuity) इ. ही मनपाकडे सिडकोने हस्तांतरण करण्याचे कबुल केले आहे व अशा हस्तांतरणास त्या कर्मचाऱ्यांची मान्यता असेल व त्यांची सेवा व ज्येष्ठता ज्या दिवशी सिडको हस्तांतरील करील (वर्ग करील) त्या दिवसापासून धरण्यात येईल. |
| २९. | सध्या सिडकोने अतिक्रमण व बेकायदेशीर भागेवटा पासून सिडको भागाचे संरक्षण करता यावे म्हणून, सुरक्षा एजन्सीला लावले आहेत, त्यांचे हस्तांतरण करण्याबाबतीत सिडको व मनपा नंतर ठरवतील | बदल नाही. |

हा करार लिहून देणार व लिहून घेणार यांच्या सही व शिक्क्यानिशी वर लिहिलेल्या दिवशी केला आहे.

| | |
|---|---|
| मुख्य प्रशासक सिडको नविन औरंगाबाद | आयुक्त / उपायुक्त महानगरपालिका, औरंगाबाद |
| समक्ष | समक्ष |
| १. | १. |
| २. | २. |

# AGREEMENT

As proposed by CIDCO as proposed by A.M.C.

| | | |
|---|---|---|
| 1. | This agreement made at Aurangabad day of ----------- Two Thousand BETWEEN CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITIED, a company incorporated under the companies Act, 1956 (10 of 1936) and having its Registered Office at Normal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021 (hereinafter referred to as the " THE CIDCO " which expression shall where the context so admits be deemed to include its successors and assignees) of the one part AND AURANGABAD MUNICIPAL CORPORATION, having its offices at Town Hall area, Aurangabad 431210 (hereinafter referred to as " THE A.M.C. " which expression shall, where the contexts 50 admits be deemed to include their respective heirs executors, administrators and representatives on the part. | The -------- No Change. |
| | **WHEREAS** | |
| I. | The CIDCO is the Special Planning Authority for the area admeasuring 10-11-96 Ha. This was designated as a site for the New Town of New Aurangabad by the Government Maharashtra in exercise of its powers vide notification No. VDPII and IID TPS-3072/76840-5 3577/W-2 dated 3-7-1973 (hereinafter referred to as " the said Act ") | No Change. |
| II. | The CIDCO has acquired the lands with due process of law within the Notified Area of New Town for development and disposal and, accordingly, the CIDCO has made planned development within the | No change. |

| | | |
|---|---|---|
| | Notified Area of New Aurangabad. | |
| III. | The CIDCO after its appointment as a Special Planning Authority, has successfully completed its duty of creation of notified New Aurangabad and, for the mean for New Aurangabad, the A.M.C. is successor in interest Being Planning Authority the A.M.C. owes statutory duty in terms of provisions of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 to maintain and operate all the civic amenities provided in the New Town and further empowered to levy Property Tax within the area of New Town. | No change. |
| IV | After due negotiations and discussion, the A.M.C. agreed to takes over and the CIDCO agreed to handover the area of New Aurangabad more particularly described and delineated on the map annexed herewith as ANNEXURE-I along with all basic infrastructures and Civil amenities provided in New Aurangabad on the terms and conditions referred hereinafter. | No change. |
| | **NOW THIS AGREEMENT WITNESS THE AS FOLLOWS** | |
| 1. | All Annexure and Schedules attached to this Agreement shall form part and participle of this Agreement | No change. |
| 2. | The CIDCO agree to transfer water supply with E.S.R./G.S.R. along with Ground Storage Reservoir with Pump House Elevated Storage Reservoirs, Pumping machinery including all necessary electrical installations, the electrical components and machinery already commissioned more particularly described in ANNEXURE-III-A with all scheme details, plans duly signed by concerned authority. | No change. |

| | | |
|---|---|---|
| 3. | The CIDCO agree to transfer A.M.C. and the A.M.C. agree to take over Sewage Treatment Plan, Sewage Pump house more particularly described in ANNEXURE-II. With all scheme details, plans duly signed by concerned authority. | No change. |
| 4. | The CIDCO agree to handover and the A.M.C. agree to take over Roads, Playground and open spaces, Gardens, Tree Plantation Underground Drainage system, Power line, Street Light and Electric Sub-Stations and Public Toilets on ' as is where is basis. ' The details are annexed herewith as ANNEXURE III, VII, VI-A, II, V duly signed by concern authority. | The CIDCO agree to handover and the A.M.C. agree to take over Roads, Playground and open spaces, Gardens, Tree Plantation Underground Drainage system, Power line, Street Light and Electric Sub-Stations and Public Toilets on ' as is where is basis and all free from encroachments and liabilities. The details are annexed herewith as ANNEXURE III, VII, VI-A, II, V duly signed by concern authority. |
| 5. | It is further agreed by both parties that the, lands below the infrastructures will be transferred on leave and license basis for period of 99 years and A.M.C. Specifically agreed to use these for specified purpose mentioned in the Agreement. In the event the A.M.C. alter or change the specified use of lands, the CIDCO reserves its right and authority to cancel the leave and license and resume the land without any payment of compensation to the A.M.C. | It is further agreed by both the parties that the lands below the infrastructures will be transferred on leave and license basis for period of<br>99 years and A.M.C. specifically agreed to use these for specified purpose mentioned in the Agreement. In case A.M.C. desire to alter modify the use of land for public purpose, it can do so till it is done within the framework of M.R.T.P. Act 1966 and B.P.M.C. Act 1949 and in the event the A.M.C. alter or change the specified use of lands other than modify and alter the CIDCO reserves its right, and authority to cancel the leave and license and resume the land without any payment of compensation to the A.M.C. |
| 6. | The A.M.C. agree that, after transfer of infrastructural facilities and services, the A.M.C. shall be | No change. |

| | | |
|---|---|---|
| | fully responsible and liable for operation, Maintenance, repairs and up gradation of these infrastructures and services at their own cost of expenses and shall not have any claim against the CIDCO. | |
| 7. | The CIDCO is presently carrying-out certain development works in the area which are to be handed-over to the A.M.C. CIDCO agree the complete the on-going works eve after handing-over to the A.M.C. Besides, CIDCO shall also undertake such works for execution and completation where while (seeing the land) leasing out the land to various persons / Institutions, it has undertaken to develop certain infrastructure like drainage, roads, water, distribution, pipelines, so on and so forth | The CIDCO is presently carrying-out certain development works in the area which are to be handed-over to the A.M.C. CIDCO agree the complete the on-going works eve after handing-over to the A.M.C. Besides, CIDCO shall also undertake such works for execution and completation where while (seeing the land) leasing out the land to various persons / Institutions, it has undertaken to develop certain infrastructure like drainage, roads, water, distribution, pipelines, so on and so forth and will plan all complete with consultation of A.M.C. |
| 8. | The CIDCO agree to transfer the lands under infrastructures on leave and license basis for period of 99 years. Description of lands for specified use is given as follows : | |

| | Type of Services | Area sq. Mtr. | Annual License Fee @ 100/- per parcel (Rs) | Annual License fees (Rs) per parcel |
|---|---|---|---|---|
| | Road (Annexure-III) | 147236.00 | Nil | Nil |
| | Gardens (Annexure-VI, VI-A) | 156319.00 | 2,500.00 | Rs. 25.00 |
| | Playground / Open Spaces (Annexure-VII) | 500200.58 | 35900.00 | 359.00 |
| | Water supply lines, Storage and Pumping Stations (Satara) S.T.P. and २ Pumping Stations, | 1905.00 | Nil | Nil |
| | Sewerage Pump | 29206.00 | 300.00 | 3.00 |
| | House and allied Machinery (Annexure-II) | Nil | Nil | Nil |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Public Toilet. | | | |
| | Underground Drainage Syste (peripherals) Annexure-II Power line / street Lights and | 56658.00 | Nil | Nil |
| | Electrical Sub-Stations (Annexure-V) | Fittings | | |
| | | **Total Rs.** | **39300.00** | **393.00** |

| | | |
|---|---|---|
| 9. | The A.M.C. agree to pay Annual License Fees of Rs. 39,300. For the period stating from 1st January to 31st December or part thereof of each year. The said License Fee will be paid in advance without any deduction whatsoever on or before the 10th day of January of each and every year and such fee shall be paid till the leave and License is revoked. | The A.M.C. agree to pay Annual License Fees of Rs. 393.00. For the period stating from 1st January to 31st December or part thereof of each year. The said License Fee will be paid in advance without any deduction whatsoever on or before the 10th day of January of each and every year and such fee shall be paid till the leave and License is revoked. |
| 10. | In addition to the above, the machinery erected at the installation being taken over by A.M.C. described below :<br>Type of Broad description of machinery (Separate Service Schedules / Annexure enclosed.) | No change. |
| | I.Cost of S.T.P. and machinery, fixtures and equipment's etc.<br>II.Cost of water supply Equipment's / Pumping station etc.<br>III. Sewerage Pump House at N-land Ns-6<br>IV. Street Lights (Annexure-V) | No change.<br>No change.<br>No change.<br>No change. |
| 11. | At present CIDCO has constructed a Sewerage Treatment Plant in S.No. 30, Murtizapur near Airport. The A.M.C. agrees to take over the said utilities along with its allied equipment's / machinery and CIDCO agreed to hand-over the possession of the premises, hand machinery, pump house and plants and sewerage system, the description of which is annexed herewith as Annexure-II. | No change. |

| | | |
|---|---|---|
| 12. | It has also been mutually agreed by both the parties that for all the hands which have been transferred for the purpose more particularly specified in para-81 of this Agreement CIDCO reserves the right to simultaneously utilize the said land for any other purpose subject to condition that, CIDCO shall have made available alternate land for providing the same services for which the lands presently are used and subject to the concurrence of A.M.C. to such change of use. The CIDCO shall also have the right to simultaneously put the land to another use along with present use of land in such a way that the present services continue to be provided from the said land shall not be affected. However, this will be done in concurrence with A.M.C. | Administration not agreed with this clause hence proposed to delete subject to approval of General Body. |
| 13. | It is agreed that the A.M.C. shall use the land exclusively for the purpose for which the CIDCO has handed-over to it. In case the, A.M.C. does not require the land for the designated use, the A.M.C. shall deliver possession of such lands to CIDCO. The A.M.C. agree that they will not create any third party interest by way of transfer or alienation by any means temporarily or permanently of these lands to any person or body. The A.M.C. shall protect these lands from encroachments and also observe the terms and conditions of the transfer scrupulously any change in the land use shall entitle CIDCO to resume the lands and, A.M.C. shall not dispute for handing over the lands. | It is agreed that the A.M.C. shall use the land exclusively for the purpose for which the CIDCO has handed-over to it. In case the, A.M.C. does not require the land for the designated use, the A.M.C. shall deliver possession of such lands to CIDCO. The A.M.C. agree that they will not create any third party interest by way of transfer or alienation by any means temporarily or permanently of these lands to any person or body. The A.M.C. shall protect these lands from encroachments and also observe the terms and conditions of the transfer scrupulously. |

| | | |
|---|---|---|
| 14. | CIDCO has engaged various agencies for the maintenance and operation of the treatment plants, pump houses, development of gardens, sweeping, cleaning and paste control, etc. on contract basis. The details of such contracts are at Annexure-VI, II, VIII-A. The A.M.C. may continue to avail the services of these agencies till expire of the present contract on making payments us per the contract and shall have the right to make their arrangements as may be found suitable on the expire of each of the contract. | No change. |
| 15. | The A.M.C. agrees to take over the maintenance and operation of the street lighting of New Aurangabad Area with immediate effect as per Annexure-V. | No change. |
| 16. | The A.M.C. agrees to take over the maintenance and operation of the underground drainage system, S.T.P. and Sewerage Pump Houses of New Aurangabad with immediate effect as per Annexure-II. | No change. |
| 17. | The A.M.C. agrees to take over the maintenance and operation of gardens as per Annexure-VI with N-12 Nursery. | No change. |
| 18. | The A.M.C. agrees to take over the maintenance and operation of roads along with sweeping cleaning and garbage disposal of New Aurangabad area with immediate effect. | No change. |
| 19. | The A.M.C. agrees to take over the balance water supply system from CIDCO on or from dated --------- as per Annexure-IIIA. There are some pockets where CIDCO is going to develop water supply system. That system will also be handed over to A.M.C. immediately after completation of work. The | No change. |

| | | |
|---|---|---|
| | A.M.C. agrees to this also. | |
| 20. | CIDCO reserves its rights to use of all infrastructures transferred as a result of this Agreement for its related as well as its own developmental works. | Administration not agreed with this clause hence proposed to delete subject to Approval of General Body. |
| 21. | On transfer of infrastructures, the powers of Planning Authority are to be exercised by the A.M.C. in respect of transferred area of New Aurangabad by CIDCO. However, to facilitate the recovery of huge arrears to CIDCO from its buyers and lessees, it has been agreed by the A.M.C. that they will not grant development permission under section-45 of the Maharashtra Regional and Town Planning Act. 1966 without obtaining No Objection Certificate from CIDCO. Similarly the A.M.C. shall not grant occupancy certificater without Nocf CIDCO. | On transfer of infrastructures, the powers of Planning Authority are to be exercised by the A.M.C. in respect of transferred area of New Aurangabad by CIDCO. However, to facilitate the from recovery of huge arrears to CIDCO from its buyers and lessee, it has been agreed by the A.M.C. that they will not grant development permission under section-45 of the Maharashtra Regional and Town Planning Act 1966 without obtaining No Objection Certificate from CIDCO to the extend of financial dues (Arrears on A/C of various changes) similarly, the A.M.C. shall not grant occupancy certificates without Noc of CIDCO. |
| 22. | It is agreed between the A.M.C. and the CIDCO that with the New Aurangabad, considerable portion of land is still to be developed and disposed by the CIDCO. In order to enable CIDCO to discharge its function as a special Planning Authority, it shall not be necessary for CIDCO to approach A.M.C. for development permission in respect of areas/lands being developed by the CIDCO. | It is agreed between the A.M.C. and the CIDCO that with the New Aurangabad, considerable portion of land is still to be developed and disposed by the CIDCO. However there can not be two development authorities in the same area. Hence CIDCO agrees to obtain B.P. /development/permission/occupancy certificate for A.M.C. even for the land not development and disposed. |
| 23. | It is further agreed between the parties that, for the purpose of protecting CIDCO's land free from encroachment's unauthorized occupation and unauthorized development etc. It is imperative to remove the unauthorized occupation, developments taking place on CIDCO's land and also necessary to protect open spaces like footpaths, road sides, etc. for | No change |

| | | |
|---|---|---|
| | which the A.M.C. shall exercise the powers of Planning Authority. However, in the interest of protecting CIDCO's lands, CIDCO shall have a concurrent jurisdiction for exercising the powers under section 52, 53, 54 and 55 of the M.R.T.P. Act, 1966 to enable the CIDCO to remove unauthorized encroachment's as well as unauthorized developments as explained above. Also the CIDCO shall exercise powers under section 135, 139 and 142 of the M.R.T.P. Act. 1966 for the purpose of removal of unauthorized occupation on CIDCO's land on foot-paths and road sides. | |
| 24. | It is agreed between A.M.C. and CIDCO that as per the Government decision vide letter No. Doc-1095/759/CR-UD-10 dated. 12-7-2001 following amount shall be paid by CIDCO. | No change. |
| | a) Rs. 175.00 Lacks popular contribution towards water supply, sewerage system. | No change. |
| | b) Rs. 275.00 Lacks towards repairs to the road, drainage system, sewage Treatment plant sewage Pump House and other miscellaneous expenditure is full and final payment towards handing over of services to A.M.C. | No change. |
| 25. | It is agreed between A.M.C. and CIDCO that CIDCO should refund Rs. 25.00 Lacks to A.M.C. towards the land cost of the proposed Auditorium plot at N-5 and allot the plot free of cost to A.M.C. for development of Auditorium. | No change. |
| 26. | It is agreed between A.M.C. and CIDCO that as per the Government decision vide letter No. Doc-1095/756/CR-165/UD-10 dated. 12-7-2001 to hand over one wing of G+1 structure of existing CIDCO | No change. |

| | | |
|---|---|---|
| | office building to A.M.C. free of cost more specifically marked on plan placed as Annexure-XI | |
| 27. | The A.M.C. agreed to take over the existing contract of sweeping and cleaning of CIDCO area on the same terms and conditions of the contract and continue to operate till expiry of contract period or shall terminate immediately after making alternate arrangement without making any compensation. | No change. |
| 28. | It has been agreed by the A.M.C. that, along with 39 malies they will absorb 32 permanent employees of CIDCO in different cadres in the A.M.C. and CIDCO agreed to transfer their dues on account of G.P.F. Gratuity, etc. Payable to them, this is subject to the condition that, these employees shall give consent for transfer the details are annexed herewith as Annexure-X | It has been agreed by the A.M.C. that, along with 39 malies they will absorb 32 permanent employees of CIDCO in different cadres in the A.M.C. on Zero seniority basis and cidco agreed to transfer their dues on account of G.P.F. Gratuity etc. payable to them. This is subject to the condition that, these employees shall give consent for transfer. The details are annexed herewith as Annexure-x |
| 29. | Presently, within CIDCO area, for protecting the lands from encroachment and unauthorized occupation CIDCO has engaged security Agencies and after transfer of the services, the A.M.C. and the CIDCO will mutually decided regarding continuation of these agencies in due course of time | No change. |

**IN WITTNESS WHEREOF** The lessor and lassee has/have here into set and subscribed his/their hands and seal the day and year first above written.

Signed and delivered for and on behalf of the City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited by the hand of

( )
Jt. Managing Director,
Chief Administrator,
(New Towns)

Signed and delivered by within Aurangabad Municipal Corporation by the hand of

( )
Commissioner/Dy. Commissioner of A.M.C.

In presence of
1.
2.

In Presence of
1.
2.

**संवाद** :

श्री. सुदाम सोनवणे : सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्यापूर्वी विचार विनिमय होणे गरजेचे आहे. करारनामा मंजूर करण्याबाबत प्रस्ताव आहे. करारनामा मंजूर केल्यानंतर हस्तांतरण होते काय? या करारनाम्यानुसार ओपन स्पेसच्या जागा सुध्दा यामध्ये येतात काय? याचा खुलासा द्यावा. करारनामा हस्तातरणाचा आहे की, ज्या ओपन स्पेसच्या जागा आहे. या संदर्भात आहे.

प्र. सहाय्यक संचालक (न.र.) : सिडको हस्तांतरण करण्याबाबत जो करारनामा करावयाचा तो मंजूरीसाठी सभागृहात ठेवलेला आहे.

मा. महापौर : प्रशासनाला हा ठराव मान्य आहे का?

प्र. सहाय्यक संचालक (न.र.) : हस्तांतरणाच्या वेळीचा करारनामा सर्वसाधारण सभेपुढे चर्चेसाठी ठेवला. सिडको हस्तांतरण करण्याबाबत वाशी, नवि मुंबई महानगरपालिका व सिडकोमध्ये जो करार झाला होतो. त्या धरतीनुसारच हा करारनामा सिडकोने सादर केलेला आहे. याची एकप्रत या अगोदर महानगरपालिकेस मिळाली होती. त्यावर महानगरपालिकेचे वकील ॲड श्री. सोमन यांनी सुध्दा अभ्यास केला.जे सिडकोच्या बाबतीत केसेस चालवित आहे. यात काही दुरुस्ती / बदल करावयाचे, ते मान्य नाही ते पुढे लिहिले आहे. त्याबाबत निर्णय व्हावा, दुरुस्त्या असतील तर सुचविण्यात यावे.

श्री. सुदाम सोनवणे : सिडको हस्तातंरणा बाबतचा करारनामा मंजूर केला म्हणजे सिडको हस्तांतरण झाले असा अर्थ होतो. हस्तांतरण होण्यापुर्वी सिडको मध्ये खेळाचे मैदान, रस्ते दुरुस्ती व इतर विकास दुरुस्तीची कामे करावी लागणार असून, सिडको महानगरपालिकेस फक्त रु. ४.५० कोटी देणार आहे. सिडको हडको भागाची आजची परिस्थिती पाहिल्यास ४.५० कोटी रुपये विकास कामासाठी पुरेपुर होणार नाही. या भागात अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरु असून, रस्ते रुंदीकरणासाठी फार मोठा खर्च येणार आहे. रु. ७००-८०० कोटीचे नुकसान झाले आहे. सुख सुविधा, रस्ते, डांबरीकरण क्रिडांगण ई. खर्च कोण करणार, महानगरपालिका करणार असेल तर, येणाऱ्या अर्थसंकल्पात किमान सिडकोच्या विकासासाठी १५-१६ कोटी रुपयांची तरतुद करावी. महानगरपालिकेची आजची आर्थिक परिस्थिती बघता चालू वर्षाचे ११७ कोटीचे बजेट ठेवले. ८७ कोटी वैधानिक खर्च होणार व उर्वरित फक्त २० ते २५ कोटीच रु. विकास कामासाठी राहणार तेही उद्दीष्ट पुर्ण झाले तर, विकास कामासाठी एवढी कमी रक्कम ठेवणे बरोबर होणार नाही. म्हणून सिडकोच्या विकासासाठी लागणारा खर्च सिडको कडून वसुल करावा. नसता, तोपर्यंत हा करारनामा मंजूर करु नये.

मा. आयुक्त : करारनामा मंजूर केला म्हणजे हस्तांतरण झाले. असा त्याचा अर्थ होत नाही. हस्तांतरण करायेचे असल्यास हा करारनामा राहील. आपण जेव्हा ठरवाल तेव्हा होईल. आपण घ्यायचे ठरविल्यावरच पुढील कार्यवाही होईल.

श्री. सुदाम सोनवणे : जो मसुदा समोर मंजूरीसाठी ठेवला, सिडको भागात जो विकास करावा लगाणार आहे. त्या खर्चाचा सुध्दा उल्लेख या करारनाम्यात असावा नसता, यास लगेच मंजूरी देण्याची आवश्यकता नाही.

डॉ. भागवत कराड : ज्या नागरिकांची घरं ज्या विकास कामासाठी पाडलेली आहे तो विकास सिडकोने अगोदर करावा. रस्ते अरुंद आहे ते रुंदीकरण करुन द्यावे. त्यानंतरच हस्तांतरण करण्याबाबत विचार व्हावा.

श्री. काशीनाथ कोकाटे : हस्तांतरण करण्या बाबतच्या करारनाम्याच्या बाबतीत जो मसुदा आहे, त्यास मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव ठेवलेला आहे. जे महानगरपालिका प्रशासनाला घ्यायचे ते यात नमुद केले जे घ्यायचे नाही किंवा कोणत्या पध्दतीने घ्यायचे याबाबत दुरुस्ती सुचविलेली आहे. जो विकास खर्च म्हणून ४.५० कोटीचा उल्लेख केलेला तो निर्णय २ वर्षापूर्वी ज्यावेळी महानगरपालिकेचे व सिडकोचे अधिकारी यांनी सिडको भागात पाहणी केली होती, त्यावेळचा निर्णय आहे. महानगरपालिका व सिडको यांचेमध्ये विकास कामाच्या निधीच्या संदर्भात तडजोड झाल्यानंतर ६ महिन्यापूर्वी मा. न्यायालयाने एक आदेश देऊन अतिक्रमणातील रस्ता रुंदीकरण्यासाठी जनतेच्या इमारती पाडल्या, काही प्रमाणात टपऱ्या हटविण्यात आल्या तर काही ठिकाणच्या संरक्षित भिंत सुध्दा काढण्यात आल्या. या सर्व जागेवर विकास करण्यासाठी सिडको महानगरपालिकेस ४.५० कोटी रुपये देणार एवढया रक्कमेत विकास होऊ शकेल का? एवढया रक्कमेत विकास होणार नसेल तर, सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. महानगरपालिका जास्तीचा खर्च करु शकणार नाही. मागील वर्षाचा १३५ कोटीचा अर्थसंकल्प ९७ कोटी वर आलेला आहे आणि चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प हा ११७ कोटीचा ठेवला. प्रगती होण्याऐवजी अधोगती होत आहे. यातील ८७ कोटी रुपये पगार, दुरुस्ती ई. साठी खर्च होणार आहे. १०-१५ कोटी रुपये विकास कामासाठी राहणार असून, जर हस्तांतरण केले व विकास कामासाठी महानगरपालिकेस १५-१६ कोटी रुपये खर्च येणार असेल तर, बरोबर नाही. यापूर्वी सिडकोमध्ये एक नाटयगृह बांधण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी त्या नाटयगृहाला १.५० कोटी रुपये लागणार होते व बजेट मध्ये आर्थिक तरतुद केलेली असतंना सुध्दा महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघता महानगरपालिकेने सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्याशिवाय नाटयगृह करायचे नाही. असाच निर्णय घेतलेला दिसतो. सिडको हस्तांतरणाच्या नावाखाली अद्याप नाटयगृह झालेले नाही व या परिस्थितीत हस्तांतरण करुन घेतल्यास फार मोठी गैरसोय होणार आहे. बऱ्याच भागात आर्थिक परिस्थितीमुळे महानगरपालिका सुविधा देऊ शंकत नाही. कामे व्हावीत म्हणून उपोषण, मोर्चे निघतात व आपण पदाधिकारी असल्यामुहे जनतेपुढे या बाबतीत किती सामोरे जावे लागते. याची कल्पना आपणास आहेतच महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा व सिडको मध्ये करावयाची विकास कामे व त्यावर होणारा खर्च याचा विचार करुन हस्तांतरण व्हावे, केवळ ४.५० कोटी रुपयांमध्ये हस्तांतरण करणार काय?

करणार असेल, तेथील नागरिकांना सोयी सुविधा देणार असेल तर, तसा प्रस्ताव प्रशासनाने सादर करावे. ४.५० कोटी मध्ये महानगरपालिका प्रशासन हस्तांतरण करुन घेण्यास तयार आहे. असे स्पष्ट दिले परंतु ४.५० कोटीचा निर्णय मागील २ वर्षापुर्वीचा आहे. आजच्या परिस्थितीत ४.५० कोटीत सिडकोचा विकास होणार आहे का? होत असेल तर तसा खुलासा घेण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : सदर प्रस्ताव स्थगित ठेवावा.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हा प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात येतो व जेव्हा हस्तांतरण करायचे तेव्हा हा प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने सभागृहासमोर सादर करावा.

**ठराव क्र. ५७७/७ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात व जेव्हा सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करायचे तेव्हा तसा प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने सर्वसाधारण सभेत ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ५७८/८ :**

महापालिका हद्दीमध्ये व्यावसायिक संस्था नागरिक त्यांच्या व्यवसायाची, संस्थेची जाहिरात प्रदर्शित करतात किंवा इमारतीवर जमिनीवर आकाशचिन्हे प्रदर्शित करतात. सदर आकाश चिन्ह, जाहिरात या विना परवाना कोठेही उभारण्यात येत असल्यामुळे त्याचा वाहतुकीस अडथळा होतो.

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २४४, २४५, ३८६ आणि ३९२ अन्वये जाहिराती व आकाश चिन्ह इ. वर नियंत्रण करण्याची तरतुद आहे. या तरतुदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन महानगरपालिका हद्दीत प्रदर्शित केल्या जाणाऱ्या जाहिरातीवर नियंत्रण करण्याचे व त्यापासून महानगरपालिकेस उत्पन्न मिळविण्याचे प्रस्तावित केले आहे.

महानगरपालिका हद्दीतील दुकाने, व्यापारी, अस्थापना अन्य संस्था इ. नी प्रदर्शित केलेल्या जाहिरातीतील, दुकानाचे फलक, आकाश चिन्हे इत्यादीचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. तसेच, महानगरपालिका हद्दीतील विविध भागामध्ये होर्डींग, अन्य प्रकारचे जाहिरातींचे पोल उभारुन शहराच्या सौदंर्यात भर घालणे व त्यापासून महसुल मिळविण्यासाठी महानगरपालिकेचे प्रयत्न आहेत. जाहिरात माध्यामातून शहराच्या सौदंर्यात भर घालणे व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याकरीता या क्षेत्रात अनुभव असलेल्या तज्ञ संस्थेमार्फत संपूर्ण शहराचे सर्वेक्षण करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४, २४५, ३८६ नुसार जाहिरात परवाना फि आकारण्याचे महानगरपालिकेला अधिकार आहेत. महानगरपालिकेस जाहिरातीने माध्यमातून महसुल मिळण्यासाठी जाहिरातीचा प्रकार, जाहिरातीचा कालावधी इ. बाबी विचारात घेऊन खालील प्रमाणे जाहिरात फि ची आकारणी करण्यासाठी दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | जाहिरातीचा प्रकार | मोजमाप | जाहिरातीचे दर |
|---|---|---|---|
| १. | इमारतीवरील जाहिरात फलक | १० चौ. फुट पर्यंत<br>१० चौ. फुटापेक्षा जास्त | रु. २.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. १.५० प्रति चौ. फुट/प्रतिमाह |
| २. | कापडी फलक (बॅनर्स) | १० चौ. फुट पर्यंत<br>१० चौ. फुटापेक्षा जास्त | रु. ५.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. २.५० प्रति चौ. फुट/प्रतिमाह |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | कागदी फलक (पोस्टर्स)<br>अ) सिनेमा, व्यापारी | १० चौ. फुटापर्यंत<br>१० चौ. फुटापेक्षा जास्त परंतु २० चौ. फुटापेक्षा कमी | रु. २.५० प्रतिनग/प्रतिमाह<br>रु. ५.०० प्रतिनग/प्रतिमाह |
| | ब) इतर पोस्टर्स | १० चौ. फुटापर्यंत<br>१० चौ. फुटापेक्षा जास्त परंतु २० चौ. फुटापेक्षा कमी | रु. १.०० प्रतिनग/प्रतिमाह<br>रु. २.०० प्रतिनग/प्रतिमाह |
| ४. | आकाश चिन्हे होर्डींग्ज | १) २०० चौ. फुटापर्यंत<br>२) २०० ते ३०० चौ. फुटपर्यंत<br>३) ३०० चौ. फुटापेक्षा जास्त | रु. १.६६ प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. १.२५ प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. ०.८५ प्रति चौ. फुट/प्रतिमाह |
| ५. | दिव्यांचे खांबावरील फलक | १) २० x ३० इंच<br>२) ३० x ४० इंच<br>३) ४० x ६० इंच | रु. १०.०० सर्व बाजु प्रतिमाह<br>रु. २०.०० सर्व बाजु प्रतिमाह<br>रु. २५.०० सर्व बाजु प्रतिमाह |
| ६. | दुकानावरील नावाचे फलक | २० चौ. फुटापर्यंत फ्री<br>२० चौ. फुट व त्यापेक्षा जास्त | रु. १.०० प्र. चौ. फुट प्रतिमाह |
| ७. | दुकानावरील जाहिरातीचे फलक | १० चौ. फुटपर्यंत<br>११ ते २० चौ. फुटपर्यंत<br>२१ चौ. फुट व त्यापेक्षा जास्त | रु. १.५० प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. १.७५ प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. २.५० प्रति चौ. फुट/प्रतिमाह |
| ८. | व्हेदर शेड्स | | रु. १.०० प्रति चौ. फुट प्रथम दर्शनी बाहय आलेला भाग |
| ९. | शोकेस | | रु. १.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह प्रथम दर्शनी भाग |
| १०. | रोलींग शटर | | रु. १.०० प्रति रमिंग फुट रुंदी करीता/प्रतिमाह |
| ११. | भिंतीवरील जाहिराती | १० चौ. फुटपर्यंत<br>११ ते ३० चौ. फुटपर्यंत<br>३१ चौ. फुटापेक्षा जास्त | रु. ५.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. ५.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. २.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह |
| १२. | रोड शो | एका रोडवर १० ठिकाणी प्रात्यशिके<br>आकाशातील प्रदर्शन<br>एरियल बॅनर्स<br>रस्त्यावर हस्तपत्रक वितरीत करणे.<br>रस्त्यावरील लिखाण | रु. ५.०० प्रति दिन/प्रतिरोड<br>रु. ५०००.०० प्रति शो<br>रु. ५०००.०० प्रतिदिन प्रती बॅनर<br>रु. १२५.०० प्रति हजार हस्तपत्रकास<br>रु. २.०० प्र. चौ. फुट/प्रतिमाह |

१३. विदयुत शक्तीवर फिरती जाहिरातीसाठी (विविध प्रकारच्या) लायसन्स फि च्या ५% अतिरिक्त अधिभार आकारला जाईल.

१४. जर मुदतीत लायसन्स फि भरली नाही तर, लायसन्स फी/निविदा रक्कमेच्या १% प्रती दिन प्रती होर्डींग आकारला जाईल जर होर्डींग विना परवाना (अनाधिकृत) लावलेला असेल तर, प्रती होर्डींग प्रति दिन रु. २५०/- दंड आकारला जाईल.

१५. उपरोक्त सर्व दर हे सर्वसाधारण दर असून रस्त्याच्या वर्गीकरणानुसार व विद्युत रोषणाई नुसार खालील प्रमाणे दर आकारण्यात येतील.

विद्युत रोषणाईचे दर मुळ दराच्या २०% अधिक रस्त्याच्या वर्गवारी नुसार दर खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| अ | २००% मुळ दरापेक्षा अधिक |
| ब | १००% मुळ दरापेक्षा अधिक |
| क | मुळ दराप्रमाणे |

वरील प्रमाणे प्रस्तावित केलेले जाहिरात परवाना फि च्या दरांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४, २४५ व ३८६ नुसार महानगरपालिकेचे मंजूरी मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी प्रस्तावित केल्यानुसार जाहिरात परवाना फि च्या दरास व मान्य दरास अनुसरुन जाहिरात परवाना देण्यात तसेच होर्डींग्ज व जाहिराती संबंधी निविदा मागविण्यात आणि सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेस सादर करण्यात येत आहे. उपरोक्त जाहिरात पॉलिसी ही मा. उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्देशास अनुसरुन राबविण्यात येईल.

**संवाद** :

मुख्यलेखाधिकारी : या शहरातील होर्डींग जाहिराती करीता, जे वापरले जाते याबाबतचे निविदा काढून जाहिरात फलक देण्यात यावे. म्हणून यापुर्वीच ठरविण्यात आलेले आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न आहे. इतर महानगरपालिकेमध्ये या बाबतीत काय परिस्थिती आहे. याबाबत माहिती घेतली. ठाणे, मुंबई, कल्याण, डोंबविली व नागपुर महानगरपालिकेने एजन्सी मार्फत कमर्शियल सर्व्हेचे काम करुन घेतलेले आहे. होर्डींगला किती दर लाऊ शकतो. याबाबत माहिती घेतली व त्यानुसार या महानगरपालिकेत सुध्दा एक एजन्सी नियुक्त करुन सर्व्हेक्षणाचे काम करुन घेतलेले आहे व महसुली उत्पन्न किती प्राप्त होऊ शकते याचा अभ्यास केलेला आहे. सध्या शहरात सर्वांना जवळपास सारखेच दर आहे. आजच्या परिस्थितीत होर्डींगच्या माध्यमातून फक्त ३ लक्ष रुपये प्रात्प होतात हे दर मंजूर केले तर, ५० लक्ष रुपये उत्पन्न मिळणार असून, लोकल व सर्वसाधारण नागरिकांवर कोणताही जास्त बोजा पडणार नाही. जे व्यावसायिक आहे. त्यांचे कडून हे उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे. दर मान्य केल्यानंतर सर्वसाधारण एक निविदा काढून १ एप्रिल पासून हे दर लागु करणार आहोत. मा. उच्च न्यायालयाचे आदेश व जाहिरातीचे नियम हे सर्व सविस्तर तपासणी करुनच हे दर निश्चित केलेले आहे. यानंतर निविदा काढून कार्यवाही केली जाईल. आता सध्या २.५० ते ३ लक्ष रु. उत्पन्न मिळते. या प्रस्तावानुसार कार्यवाही केल्यास ५० लक्ष उत्पन्न होऊ शकेल. या प्रस्तावात सोबतच काही संबंधित एजन्सीजने काही बाबी निदर्शनास आणून दिलेल्या आहे. उदा. पानटपरी असेल त्या टपरीवर त्या दुकानाचे नांव असेल व त्यासोबतच सिगारेटचे चित्र असेल तर, त्यावर सुध्दा दर लावण्यात यावे व तसा सर्व्हे करण्यात आला तर, या माध्यमातून महानगरपालिकेस १ कोटी २० लक्ष आर्थिक उत्पन्न मिळणार आहे. कोणत्या रस्त्यासाठी किती दर असावे, सर्व विचार विनीमय करुनच दर प्रस्तावित केलेले आहे. हा प्रस्ताव मान्य करावा. अशी प्रशासनातर्फे विनंती करण्यात येते.

श्री. किशोर तुळशीबागवाले : दुकानावरील बोर्डला दर लावायचे किंवा काय? या बाबतीत विचार व्हावा कारण जे प्रत्येक दुकानास नावाचा बोर्ड आहे.

श्री. स. अली सलामी : ज्याची दुकान आहे. त्याचा व्यवसाय आहे. त्यांना दररोज उत्पन्न येते. बोर्डवर दर आकारावयास पाहिजे. प्रस्ताव जशाच्या तसा मंजूर करावा महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल.

मा. महापौर : महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने चांगला प्रस्ताव सादर झालेला आहे, स. सदस्य श्री. खुंगर यांनी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले व त्या संदर्भातीलच प्रस्ताव मंजूरीसाठी आलेला आहे. दरवर्षी जवळपास ५० लक्ष रु.उत्पन्न महानगरपालिकेस येणार आहे. यात नमुद केल्याप्रमाणे जे दुकान दराचे नावाचे फलक यावर दर आकारणी करु नये. असे सभागृहाच्या वतीने प्रशासनास सुचविण्यात येते.

सौ. विजया रहाटकर : प्रस्तावात क्र. २ मध्ये कापडी (बॅनर्स) व क्र. ३ मध्ये कापडी फलक (पोस्टर्स) असे दिले. बॅनर्स पोस्टर्स हे जेव्हा उदया कार्यक्रम नसतात. त्या अगोदर १ ते २ दिवस लावण्यात येतात, अनेक वेळा लोकांना यासाठी परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. कारण कार्यक्रम संपल्यानंतर त्यांचे तेच काढून घेतात. आता त्यावर दर आकारणी केल्यास परवानगी घेण्यासाठी महानगरपालिकेकडे तेवढा कर्मचारी स्टॉप आहे का? ही कार्यवाही प्रशासनाकडून होणार आहे का? पथक नियुक्त्या करणार का? यासाठी यंत्रणा आवश्यक आहे.

श्री. सुदाम सोनवणे : जनतेची विकास कामे झाली पाहिजे. त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा विचार केला जातो. त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सुध्दा विचार विनिमय होऊन या प्रस्तावावर योग्य तो निर्णय घेतला पाहिजे. टेंडर काढले तर ५० लक्ष दर वर्षाला मिळतील असे अधिकाऱ्यांनी आताच खुलासा केला. यापूर्वी महानगरपालिकेला होर्डीगच्या माध्यमातून किती उत्पन्न येत होते. दरवर्षीची तफावत किती येत होत व ५० लक्ष दर वर्षाला मिळणार आहे, या अगोदर यावर कार्यवाही का झाली नाही. याबाबतीत कोण जबाबदार आहे. याचा खुलासा व्हावा.

मुख्यलेखाधिकारी : चालू आर्थिक वर्षात २.५३ लक्ष रुपये उत्पन्न झालेले आहे. मागील वर्षी दर वाढविण्याबाबत कार्यवाही होती, त्यावेळी आपण त्यांना ३ पट दर वाढवून त्यांनाच जाहिरात फलक लावण्याची मुभा दिली. मागच्या वर्षी आपली मागणी ३.५५ लाख होती या आर्थिक वर्षात नुतणीकरण केले नाही. चालू वर्षी काहींना प्रस्तावात जे दर निश्चित केले. त्यामध्ये कमर्शियल सर्व्हे पूर्ण केलेला आहे. उदा. क्रांती चौक या भागात एखादया कंपनीकडून किती रक्कम मिळू शकेल. अ, ब, क वर्गवारी ठरविण्यात येईल व त्यानुसार त्यावर प्रीमीअरची आकरणी केली जाईल. अ मध्ये ठराविक रस्ते येतील. बी. वर्गवारी मध्ये काही रस्ते येतील तसेच सी. वर्गवारी ही पोटेंशिअलिटी प्रमाणे रस्त्याच्या वर्गवारी नुसार दर खालील प्रमाणे अ वर्गवारी २००% पेक्षा जास्त प्रीमीयम राहणार ब वर्गवारी रस्ता राहणार त्यासाठी १००% प्रिमीयम आणि क वर्गवारी मध्ये जे प्रस्तावित केले त्याप्रमाणे दर राहणार आहे. उदा. पदमपुरा भागाचा भाग आहे. मार्केट नाही. अशा ठिकाणी फक्त २/- रुपये रनिंग फुट आकारणी होणार, क्रांतीचौक, निराला बाजार अशा ठिकाणी ६/- रु. रनिंग फुट दर आकारणी होणार १०X१० फुटांच्या होर्डीगला आता

जवळपास महिन्याला ५ हजार दर आकरला जातो. महानगरपालिकेस सध्या २००/- मिळते.

श्री. सुदाम सोनवणे : किती मोठया प्रमाणात महानगरपालिकेस तोटा झाला यापूर्वी हा प्रस्ताव का आला नाही. उत्पन्नाचे साधन आहे. प्रस्ताव यावयास पाहिजे होता. यास अधिकारीच जबाबदार आहे.

मुख्यलेखाधिकारी : पॉलीसी दिली गेली नाही. त्यामुळे कार्यवाही झालेली नाही.

श्री. सुदाम सोनवणे : महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महत्वाचा प्रस्ताव आहे, यास मान्यता द्यावी व तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

मा. महापौर : व्हेदर शेड्सचा खुलासा द्यावा.

मुख्यलेखाधिकारी : व्हेदर शेडस म्हणजे दुकानासमोर जे शेड्स टाकण्यात येतात. निराला बाजार येथे फास्ट फुड सेंटर यांनी समोर शेड्स केलेले आहे. त्यावर जे जाहिरात करण्यात येतात, त्यावर दर आकारणी करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच रोडस म्हणजे एखादया कंपनीच्या मालाची ठराविक जाहिरात केली जाते. त्यावर टॅक्स आकारला जातो. रोलींग शटर म्हणजे दुाकनाचे शटर रात्री बंद केले जाते. त्यावर पेप्सी, कोका कोला याची जाहिरात असते. त्यावर टॅक्स आकारण्यात येईल. त्यादृष्टीने हे प्रस्तावात सर्व नमुद केलेले आहे.

सौ. विजया रहाटकर : क्र. १२ मध्ये रस्त्यावर हस्त पत्रक वितरीत त्यासाठी रुपये १२५.०० प्रति हजार हस्त पत्रकास असे म्हटले आहे. परंतु प्रत्यक्षात अशी वसुल करु शकणार नाही. कारण किती हस्त पत्रक वितरीत केले हे कशावरुन निकष काढाणार किती वेळात वाटप केले. हे सुध्दा बघणे अडचणीचे होणार त्यासाठी यातून रस्त्यावर हस्त पत्रक वितरीत करणे, कापडी पोस्टर्स, बॅनर्स हे वगळून टाकावे. कायदा केला, पैसे वसुल झाले नाही तर, लोकांना कोणताही धाक निर्माण होणार नाही. त्यासाठी वरीलप्रमाणे यातून वगळण्यात यावे. यावर सर्व कार्यवाही प्रशासनाने काय यंत्रणा राबविली आहे. याबाबत सुध्दा खुलासा द्यावा.

मा. महापौर : महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे तसेच शहर स्वच्छ व सुंदर राहिले पाहिजे. ही भूमिका यामागे आहे.

श्री. प्रशांत देसरडा : १ वर्षापासून या प्रस्तावाच्या संदर्भात सभागृहात चर्चा होती. ती कार्यवाही आज शेवटच्या टप्प्यात आहे. स. सदस्य श्री. खुंगर यांनी हा प्रस्ताव येण्याच्या दृष्टीने व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने फार प्रयत्न केले. त्यांचे या सभागृहाच्या वतीने अभिनंदन करावे.

श्री. सुदाम सोनवने : मी महापौर असतांना जकात खाजगी करणाच्या ठराव मंजूर केला होता. अद्याप त्याची कार्यवाही नाही. तसाच हा प्रस्ताव पडू नये.

श्री. अंबादास दानवे : या अगोदर या सभागृहात मुख्य रस्त्यावर १०० स्वागत कमानी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसा ठराव पास केला टेंडर सुध्दा काढण्यात आलेले होते, अंमलबजावणी झाली नाही. टेंडर झाले पुढील कार्यवाही काही नाही. या बाबतीत सुध्दा तात्काळ अंमलबजावणी व्हावी.

मुख्यलेखाधिकारी : मा. उच्च न्यायालयाने रस्त्यावर जाहिरात फलक, होर्डींग काढण्याबाबत जे निर्देश दिले. त्या अनुषंगानेच स्वागत कमानी सुध्दा रस्त्यावर येणार व वाहतुकीस अडसर ठरतील का. याबाबत न्यायालयाने निर्देश असल्याने

न्यायालयाचे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. न्यायालयाचे मार्गदर्शन प्राप्त होताच तात्काळ कार्यवाही करण्यात होईल.

मा. महापौर : स्वागत कमानी व रस्त्यावरील होर्डीगच्या बाबतीत महानगरपालिकेचे पॅनल वरील जे वकील असतील त्यांनी न्यायालयाच्या ही बाब निदर्शनास आणून द्यावी व मार्गदर्शन घेऊन कमानी बाबतचे ताबडतोब टेंडर काढण्याची कार्यवाही होऊ शकते. या प्रस्तावास स्वीकृतीसह मंजूरी देण्यात व एक (०१) एप्रिल पासून हे दर आकारण्यात यावे. यात फक्त जे दुकान दारांचे दुाकनाच्या नावाचा जो बोर्ड असतो. त्यावर टॅक्स आकारणी करु नये.

**ठराव क्र. ५७८/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४, २४५ आणि ३८६ अन्वये महानगरपालिका हद्दीतील दुकाने, व्यापरी, अस्थापना, अन्य संस्था यांनी प्रदर्शित केलेल्या जाहिराती, दुकानाचे फलक, आकाश चिन्हे, होर्डीग इत्यादीचा जाहिरात प्रकार, जाहिरातीचा कालावधी या बाबी विचारात घेऊन प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र. ६ वगळता खालीलप्रमाणे जाहिरात दर १ एप्रिल २००२ पासून लागू करण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजूर देण्यात येते.

| अ. क्र. | जाहिरातीचा प्रकार | मोजमाप | जाहिरातीचे दर |
|---|---|---|---|
| १. | इमारतीवरील जाहिरात फलक | १० चौ. फुट पर्यंत<br>१० चौ. फुटापेक्षा जास्त | रु. २.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. १.५० प्रति चौ. फुट/प्रतिमाह |
| २. | कापडी फलक (बॅनर्स) | १० चौ. फुट पर्यंत<br>१० चौ. फुटापेक्षा जास्त | रु. ५.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. २.५० प्रति चौ. फुट/प्रतिमाह |
| ३. | कागदी फलक (पोस्टर्स)<br>अ) सिनेमा, व्यापारी | १० चौ. फुटापर्यंत<br>१० चौ. फुटापेक्षा जास्त<br>परंतु २० चौ. फुटापेक्षा कमी | रु. २.५० प्रतिनग/प्रतिमाह<br>रु. ५.०० प्रतिनग/प्रतिमाह |
| | ब) इतर पोस्टर्स | १० चौ. फुटापर्यंत<br>१० चौ. फुटापेक्षा जास्त<br>परंतु २० चौ. फुटापेक्षा कमी | रु. १.०० प्रतिनग/प्रतिमाह<br>रु. २.०० प्रतिनग/प्रतिमाह |
| ४. | आकाश चिन्हे होर्डींग्ज | १) २०० चौ. फुटापर्यंत<br>२) २०० ते ३०० चौ. फुटपर्यंत<br>३) ३०० चौ. फुटापेक्षा जास्त | रु. १.६६ प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. १.२५ प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. ०.८५ प्रति चौ. फुट/प्रतिमाह |
| ५. | दिव्यांचे खांबावरील फलक | १) २० X ३० इंच<br>२) ३० X ४० इंच<br>३) ४० X ६० इंच | रु. १०.०० सर्व बाजु प्रतिमाह<br>रु. २०.०० सर्व बाजु प्रतिमाह<br>रु. २५.०० सर्व बाजु प्रतिमाह |
| ६. | दुकानावरील जाहिरातीचे फलक | १० चौ. फुटपर्यंत<br>११ ते २० चौ. फुटपर्यंत<br>२१ चौ. फुट व त्यापेक्षा जास्त | रु. १.५० प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. १.७५ प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. २.५० प्रति चौ. फुट/प्रतिमाह |
| ७. | व्हेदर शेड्स | | रु. १.०० प्रति चौ. फुट प्रथम दर्शनी बाहय आलेला भाग |
| ८. | शोकेस | | रु. १.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह प्रथम दर्शनी भाग |
| ९. | रोलींग शटर | | रु. १.०० प्रति रमिंग फुट रुंदी करीता/प्रतिमाह |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | भिंतीवरील जाहिराती | १० चौ. फुटपर्यंत<br>११ ते ३० चौ. फुटपर्यंत<br>३१ चौ. फुटापेक्षा जास्त | रु. ५.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. ५.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह<br>रु. २.०० प्रति चौ. फुट/प्रतिमाह |
| ११. | रोड शो | एका रोडवर १० ठिकाणी प्रात्यशिके<br>आकाशातील प्रदर्शन<br>एरियल बॅनर्स<br>रस्त्यावर हस्तपत्रक वितरीत करणे.<br>रस्त्यावरील लिखाण | रु. ५.०० प्रति दिन/प्रतिरोड<br><br>रु. ५०००.०० प्रति शो<br>रु. ५०००.०० प्रतिदिन प्रती बॅनर<br>रु. १२५.०० प्रति हजार हस्तपत्रकास<br>रु. २.०० प्र. चौ. फुट/प्रतिमाह |

१२. विदयुत शक्तीवर फिरती जाहिरातीसाठी (विविध प्रकारच्या) लायसन्स फि च्या ५% अतिरिक्त अधिभार आकारला जाईल.

१४. जर मुदतीत लायसन्स फि भरली नाही तर, लायसन्स फी/निविदा रक्कमेच्या १% प्रती दिन प्रती होर्डींग आकारला जाईल जर होर्डींग विना परवाना (अनाधिकृत) लावलेला असेल तर, प्रती होर्डींग प्रति दिन रु. २.५०/- दंड आकारला जाईल.

१५. उपरोक्त सर्व दर हे सर्वसाधारण दर असून रस्त्याच्या वर्गीकरणानुसार व विद्युत रोषणाई नुसार खालील प्रमाणे दर आकारण्यात येतील.

| | |
|---|---|
| अ | २००% मुळ दरापेक्षा अधिक |
| ब | १००% मुळ दरापेक्षा अधिक |
| क | मुळ दराप्रमाणे |

या शिवाय स्वागत कमानी या रस्त्यावरील होर्डींग या वाहतुकीस अडसर ठरतात का, याबाबत महानगरपालिका पॅनलवरील विधिज्ञ यांनी ही बाब मा. उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून द्यावी व मार्गदर्शन घेण्यात यावे. यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हवी.

**विषय क्र. ५७९/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इन्स्टीटयुट फॉर हाऊसींग अँड अर्बन डेव्हलपमेंट स्टडीज दिली. यांनी आतंरराष्ट्रीय स्थरावर नागरी व्यवस्थापनावर दिनांक २४-०३-२००२ ते ४-४-२००२ या कालवधीसाठी सिंगापूर येथे कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे. त्यासंबंधी त्यांनी दिनांक १०-१२-२००१ व १२-१२-२००२ (फॅक्स) द्वारे कळविले आहे.

आशिया खंडात औद्योगिककराणा सोबतच शहरीकरण वाढत आहे. त्यामुळे जनतेचे सर्वसामान्य व मुलभूत समस्यांचे निराकरण करणे व विकासाची कामे यात सुविधा उपलब्ध करुन देणे, लोकांचे राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न करणे, यासाठी नागरी व्यवस्थापनाची जबाबदारी वाढते. यातून योग्य निर्णय घेवून धोरण ठरविणेची कार्यवाही करावी लागते, त्यास चालना मिळेल शिवाय विकास कामात जनतेचा सहभाग, व विकास कामास वित्त उपलब्धी विशेषतः घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, स्वच्छता परवडणारी गृहनिर्माण योजना गरीबी निर्मुलन ई. बाबत नियोजन करणे व योग्य प्रकारे हाताळणे, प्रात्यक्षिके व महानगरपालिकांना भेटी देणे ई. चे कार्यशाळेत आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेत गृहनिर्माण मंडळ, नगर पुनः बांधणी प्राधिकरण, पर्यावरण मंत्रालय व ज्युरॉग टाऊन कार्पोरेशनचा सहभाग राहणार असून, या ठिकाणी आशिया खंडातील विविध

देशातील, महापौर, अधिकारी उपस्थित राहणार असून, या कार्यशाळेसाठी सुमारे ३.०० लक्ष प्रतिव्यक्ति खर्च अपेक्षित आहे व यामुळे शहराचा विकास करणे व समस्या सोडविण्यास मदत होईल.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे मा. महापौर व मा. आयुक्त यांना या कार्यशाळेत भाग घेण्यासाठी व त्यासाठी राज्यशासन, केंद्रशासन यांची परवानगी घेवून आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी खर्चाच्या मंजूरीसह प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**संवाद** :

मा. महापौर : या प्रस्तवामध्ये कार्यशाळेच्या तारखेस बदल झालेला आहे. त्याबद्दल सचिव यांनी माहिती द्यावी.

नगरसचिव : या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेच्या तारखेमध्ये बदल झालेला असून, दिनांक १८-०२-२००२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. आंतरराष्ट्रीय कार्यशाळा दिनांक २४-३-२००२ ते ४-४-२००२ या ऐवजी ६ एप्रिल ते १८ एप्रिल २००२ या कालावधीत होईल. प्रस्तावात अशी दुरुस्ती करावी लागेल.

श्री. भगवान घडामोडे : माजी महापौर डॉ. कराड यांना सुध्दा कार्यशाळेस घेऊन जावे अशी विनंती करण्यात येत आहे.

मा. महापौर : या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.

श्री. अफसरखान : कुणालाही सोबत नेऊ नये. ज्याला जायचे असेल. त्यांनी स्वखर्चाने जावे.

मा. महापौर : डॉ. कराड हे स्वखर्चाने येण्यास तयार आहे.

श्री. स. अली सलामी : मी या कार्यशाळेस स्वखर्चाने जाण्यास तयार आहे. माझ्या नावाचा समावेश करावा.

श्री. अफसरखान : जे सदस्य कार्यशाळेस स्वखर्चाने येण्यास तयार आहे, त्यांची नांवे घ्यावी. सर्वांना घेऊन जावे. तसा ठराव मंजूर करावा. नसता दोनच सदस्यांना घेऊन जाण्याचा ठराव पास करावा. स. सदस्य स. अली सलामी येण्यास तयार आहे.

श्री. प्रशांत देसरडा : दोन दिवसामध्ये नावाची यादी मागवावी. त्यांना त्यांचे स्वखर्चाने कार्यशाहेस घेऊन जावे.

श्री. काशीनाथ कोकाटे : दोन सदस्य किंवा इतर आणखी सदस्य जाण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागणार आहे. तसे प्रस्तावात नमुद करण्यात आलेले आहे. ज्यांना शासन जाण्यास परवानगी देईल. या अटीवर तसा ठराव पारीत करावा.

डॉ. भागवत कराड : कार्यशाळेस जाण्यासाठी आलेले पत्र माझ्याच नावाने आलेले होते. ते मी मा. महापौरांकडे दिले त्यामध्ये स्पष्ट दिलेल आहे की, कोणी लोकप्रतिनिधी कार्यशाहेस जाऊ शकतो. परंतु त्यासाठी सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे. माझ्या नावाची मंजूरी दिल्यास मी स्वखर्चाने जाण्यास तयार आहे. मा. महापौर, मा. आयुक्त सुध्दा बरोबर राहणार असून, मी सुध्दा एक लोकप्रतिनिधी असून, कार्यशाळेस या शहराच्या विकासासाठी माहिती घेऊ शकतो. इतर कुणी सदस्य स्वखर्चाने येण्यास तयार असतील तर ठराव पास करावा.

श्री. अफसरखान : स्वखर्चाने जे जाण्यास तयार असतील तर, त्यांनी जावे. महानगरपालिकेच्या तीने गेल्यास सर्वंच अधिकारी यांना घेऊन जावे.

मा. महापौर : या प्रस्तावास दुरुस्तीसह मंजूर देण्यात येते. स. सदस्य डॉ. कराड तसेच स. सदस्य श्री. स. अली सलामी इतर ज्यांना सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांना या कार्यशाळेत स्वखर्चाने जाण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र. ५७९/९ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार नागरी व्यवस्थापनाच्या जबाबदाऱ्यांना चालना मिळण्यासाठी विकास कामास जनतेचा सहभाग, विकास कामात वित्त उपलब्धी विशेषत: घन कचरा व्यवस्थापन, पाणी पुरवठा, स्वच्छता, परवडणारी गृह निर्माण योजना, गरीबी निर्मुलन इ. बाबत नियोजन करणे व योग्य प्रकारे हाताळणे त्याबाबतची प्रात्यक्षिके यासाठी इन्स्टीटयुट फॉर हाऊसींग अँड अर्बन डेव्हलपमेंट स्टडीज दिली या संस्थेने दिनांक ६ ते १८ एप्रिल २००२ या कालावधीत आंतरराष्ट्रीत स्तरावर सिंगापूर येथे आयोजित कार्यशाळेस महानगरपालिकेतर्फे मा. महापौर व मा. आयुक्त यांना भाग घेण्यास रु. ३ लक्ष प्रत्येकी प्रमाणे व अनुज्ञेय होणारे संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

याशिवाय औरंगाबाद महानगरपालिकेचे स. सदस्य डॉ. भागवत कराड (माजी महापौर) व श्री. स. अली सलामी व इच्छुक सदस्यांना स्वखर्चाने उक्त कार्यशाळेत भाग घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

संवाद :

सौ. सुवर्णा चंदात्रे, सौ. विजया रहाटकर : ज्यांना जायचे असेल त्यांनी स्वखर्चाने जावे. ज्या दोन लोकप्रतिनिधींची नावं सुचविली त्यांचा खर्च वाचवून शहर विकसासाठी वापरावा.

श्री. अंबादास दानवे : प्रश्नावर चर्चा झालेली नाही.

मा. महापौर : पुढील बैठकीत वेळी विषय पत्रिकेवर चर्चेसाठी प्रश्न सादर करावे.

श्री. अफसरखान : शहरातील विकासाची कामे थांबवून आहे चर्चा करु द्यावी. रस्त्याची कामे बंद आहे. याबाबत योग्य तो निर्णय व्हावा.

मा. महापौर : याबाबतीत येत्या दोन दिवसात सविस्तर चर्चा केली जाईल, प्रशासनाने रस्त्याच्या संदर्भात दोन दिवसात माहिती सादर करावी. पुरवणी विषय पत्रिकेवर स. सदस्यांचे प्रस्ताव आहे. सदर प्रस्ताव पुढील सभेत घेण्यात यावे.

याबरोबरच "जण गन मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## *दिनांक ७-३-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**गुरुवार दिनांक ७-३-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री शिंदे राजू रामराव | उप महापौर |
| २) | स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष | -//- |
| ३) | स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ४) | स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५) | स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ६) | स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) | स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ८) | स. स. श्री शे. ईलीयास किश्मानी शेख उमर | -//- |
| ९) | स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतु | -//- |
| १०) | स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ११) | स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| १२) | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक | -//- |
| १३) | स. स. श्री कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| १४) | स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १५) | स. स. सौ. पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १६) | स. स. सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १७) | स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १८) | स. स. सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिशन | -//- |
| १९) | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| २०) | स. स. सौ.कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| २१) | स. स. श्री शे. शकील पटेल शे. बुढण पटेल | -//- |
| २२) | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २३) | स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| २४) | स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २५) | स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २६) | स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २७) | स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २८) | स. स. ॲड. सौ सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २९) | स. स. श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| ३०) | स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| ३१) | स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| ३२) | स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ३३) | स. स. श्री अ. रशिद अ. सत्तार | -//- |

| | | |
|---|---|---|
| ३४) | स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| ३५) | स. स. श्री डॉ. कराड भागवत किसनराव | -//- |
| ३६) | स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| ३७) | स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान | -//- |
| ३८) | स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| ३९) | स. स. श्री स. मुमताज अली मुज्जम अली | -//- |
| ४०) | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | -//- |
| ४१) | स. स. श्री. नासेर खान सरदार खान | -//- |
| ४२) | स. स. श्री. थोरात दत्तात्रय रामराव | -//- |
| ४३) | स. स. श्री. सोनवणे सुदाम रामदास | -//- |
| ४४) | स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत | -//- |
| ४५) | स. स. सौ. नुसरत बानो फिरोजखान | -//- |
| ४६) | स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| ४७) | स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव | -//- |
| ४८) | स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | -//- |
| ४९) | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| ५०) | स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय | -//- |
| ५१) | स. स. श्री सुरगोणिवार नारायण चंद्रय्या | -//- |
| ५२) | स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग | -//- |
| ५३) | स. स. श्री. अब्दुल कदिर मौलाना सय्यद | -//- |
| ५४) | स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | -//- |
| ५५) | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | -//- |
| ५६) | स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम | -//- |
| ५७) | स. स. श्री संगिता बाळू मैंद | -//- |
| ५८) | स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ५९) | स. स. श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरैशी | -//- |
| ६०) | स. स. श्रीमती शाहीन जफर महमुद जफर | -//- |
| ६१) | स. स. सौ दाणे चंद्रभागाबाई भागीरथ | -//- |
| ६२) | स. स. श्री ओक जयवंत केशवराव | -//- |
| ६३) | स. स. श्री. चंद्रशेखर जैस्वाल | -//- |
| ६४) | स. स. श्री स. सलीम स. युसूफ | -//- |
| ६५) | स. स. श्री तकीहसन खान कासीम हसन खान | -//- |
| ६६) | स. स. श्री मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ६७) | स. स. श्री अफसर खान यासीन खान | -//- |
| ६८) | स. स. सौ. सुलताना बेगम चांदखॉ | -//- |
| ६९) | स. स. श्री लकडे भरत श्रीपती | -//- |
| ७०) | स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन | -//- |
| ७१) | स. स. श्री सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ७२) | स. स. श्री कैसर यान बद्रोद्दीन खान | -//- |
| ७३) | स. स. श्री जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | -//- |
| ७४) | स. स. सौ. बबीता सुभाष कागडा | -//- |
| ७५) | स. स. श्री. सय्यद अली सलामी स. मीरा सलामी | -//- |

७६) स. स. श्री. तनवाणी किसनचंद लेखराज -//-
७७) स. स. सौ निखत परविन ईजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री सुभाष लक्ष्मीनारायण वच्छवाह
२) स. स. श्री घडामोडे भगवान देवीदास
३) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
४) स. स. श्री धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली

लोकसभेचे सभापती जी. एम. सी. बालयोगी आणि गुजरात राज्यातील गोध्रा रेल्वेस्थानकावरील अग्नीकांडातील मृत व्यक्तींना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

**विषय क्र. ५८० :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) अन्वये स्थायी समिती सदस्य पदाकरीता नवीन आठ (८) सदस्यांची निवड करणे.

**संवाद :**

पिठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) अन्वये स्थायी समिती करीता नवीन (८) सदस्य पदासाठी निवड करण्याकरीता दिनांक ७-३-२००२ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५ व ४७, ५९ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक २१-२-२००२ ते २८-२-२००२ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून, दिनांक २८-२-२००२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थायी समिती करीता, नवीन ८ सदस्य पदासाठी खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावली नियम क्रमांक ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून, खालील सर्व उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहेत.

१) श्री. तकीहसन खान कासीन हसन खान
२) श्री. वाणी ठकूजी रामसिंग
३) श्री. शे. शकील पटेल शेख बुढण पटेल
४) श्री. अशरफ मोतीवाला
५) श्री. नासेरखान यासरखान
६) श्री. रगडे भगवान दगडूजी
७) सौ. निखत परवीन एजाज अली
८) श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
९) श्रीमती नुसरत बानो फिरोज खान
१०) श्री. साळवे माणिक लक्ष्मण
११) सौ. शाहीन जफर महमंद जफर
१२) सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे

१३) सौ. मानकापे पार्वती लहानु
१४) श्री. गणेश रामचंद्र तांबे
१५) श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
१६) श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
१७) श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
१८) सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर
१९) श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान

पिठासीन अधिकारी : वरीलपैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एखादा उपस्थित नसेल तर, इच्छुकाला या दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे. त्यांच्या संमतीने ३० मिनिटाच्या अबाधित म्हणजेच १२.१५ वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना स्थायी समिती करीता नवीन ८ सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव १२.१५ वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर स्थायी समितीच्या नवीन ८ सदस्य पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पिठासीन अधिकारी : आता १२.१५ वाजले असून, उमेदवारी अर्ज परत घेण्याची वेळ संपली आहे. स्थायी समितीकरीता नवीन ८ सदस्य पदासाठी उमेदवार पैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपले
उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

**अ.क्र उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे**

१) श्री. तकीहसन खान कासीन हसन खान
२) श्री. अशरफ मोतीवाला
३) श्री. नासेरखान यासरखान
४) श्री. रगडे भगवान दगडूजी
५) सौ. निखत परवीन एजाज अली
६) श्रीमती नुसरत बानो फिरोज खान
७) श्री. साळवे माणिक लक्ष्मण
८) श्री. गणेश रामचंद्र तांबे
९) श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले
१०) श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर

आता स्थायी समितीच्या ८ सदस्य निवडणुकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

**अ.क्र उमेदवारी नांवे**

१) श्री. ठकुजी रामसिंग वाणी
२) श्री. शे. शकील पटेल शेख बुढण पटेल.
३) श्री. रतनकुमार नारायणराव पंडागळे
४) सौ. शाहीन जफर महमंद जफ्फर
५) सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे

६) सौ. मानकापे पार्वती लहानु
७) श्री. चंद्रशेखर लक्ष्मीनारायण जैस्वाल
८) सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
९) श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान

पिठासीन अधिकारी : मतदानाबाबत गोपनियता पाळता यावी म्हणून, मतपत्रिकेच्या स्थळप्रतिवर अनुक्रमांक राहील. मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सर मिसळ करण्यात येईल. तसेच स्थळ प्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली. याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका १.०० तासात तयार होतील व मतदानाला सुमारे २.०० वाजता सुरुवात होईल तरी, मतपत्रिका तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांनी मतपत्रिका तयार करुन घ्यावी व त्यानंतर नगरसचिव यांनी सर्व स. सदस्यांच्या माहितीसाठी नमुना मतपत्रिका सभागृहात फलकावर लावण्याची व्यवस्था कारावी.

पिठासीन अधिकारी : मतपेटी जवळ नियुक्त केलेले मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवून द्यावे व मतपेटील कुलूप लावून तीची चावी माझेकडे आणून द्यावी व मतपेटी मोहोर बंद करुन घ्यावी. ( पिठासिन अधिकारी स्वतःच्या सहिने मतपेटी मोहोरबंद करुन घेतात.)

सभाकामकाज नियमावलीचे नियम क्र. ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर, त्यांनी मतमोजणी पाहण्याकरीता एखादया सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान करु होण्यापुर्वी म्हणजेच आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांनी कृपया गर्दी करु नये.

नगरसचिव यांनी कृपया मतदाना संबंधिच्या सूचना सभागृहाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

नगरसचिव : १. मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स. सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील.

२. महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.

३. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर, त्यांना मा. पिठासिन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.

४. नियम क्र. ६२ प्रमाणे जितक्या जागा भरावयाच्या असतील तितकी मते देण्यांचा प्रत्येक सभासदाला अधिकार आहे. आता स्थायी समिती ८ सदस्य पदासाठी निवडणूक होत असल्यामुळे प्रत्येक सदस्यांना (८) मते देण्याचा अधिकार आहे. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेच्या उजव्या बाजूला ज्या इच्छुकला मत द्यावयाची असतील त्यांच्या नांवा समोर (x) फुली करावी. तसेच सदरची मते एकाच उमेदवारास किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारास आपल्या इच्छेनुसार देता येतील. मात्र (८) पेक्षा जास्त मते देवू नयेत.

५. सभाकामकाज नियमावरलीच्या नियम क्र. ४५ (जे) मधील तरतुदी नुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैध समजली जाईल.

१. जन मत पत्रिकेवर सभासदाने आपली नांव किंवा शब्द लिहला असेल अथवा तो ओळखता येईल, अशा रीतीने तिच्यावर काही खुण केलेली असेल अथवा--------

२. जी छिद्रांकित (परफोरेटेड) नसेल अथवा ----------

३. जीच्यावर मत नोंदविले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरउपयोगी आहे.

६. महानगरपालिका सभा कामकाज नियमावली अद्यावत करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत असून, निवृत्त न्यायाधिशाची नेमणूक करुन नियमावली दुरुस्त करण्याची कार्यवाही विधी विभागाकडून करण्यात येत आहे. (नमुना मतपत्रिकेवरील उमेदवारांची नांवे नगरसचिव यांनी वाचून दाखविली.)

श्री. अविनाश कुमावत : निवडणुकीच्या प्रत्येक वेळेस मी विचारणा करतो की, महानगरपालिका नियमावली अद्यावत का केली नाही. आपण कोर्टाचा अवमान करीत आहात.

पिठासिन अधिकारी : नमुना मतपत्रिका फलकावर चिकटविण्यात आलेली आहे.

आता मतदानाला सुरुवात होत आहे. प्रभागनिहाय स. सभासदांची नांवे पुकारण्यात येतील. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी एका तासाचा कालावधी देण्यात येत असून, सभागृहातील घडयाळाप्रमाणे आता २.१५ वाजले असून, मतदान ३.१५ वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (जी) प्रमाणे मतदानाची वेळ झाल्यानंतर स्थायी समिती करीता नविन ८ सदस्य पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स. सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यास सहकार्य करावे. अशी सर्वांना विनंती आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्रमांक ४५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/नस/२००२/१३३ दिनांक २-३-२००२ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती कायम करण्यात येत असून, सदर आदेशाद्वारे ज्यांना जी कामे नेमून देण्यात आलेली आहेत. त्यांनी ती कामे जबाबदारीने पार पाडावीत.

जनसंपर्क अधिकारी : वार्ड क्र. ६०, ५८, ८२, ५०, १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० चे स. सभासदांनी मतदानात भाग घेतला. वार्ड क्र. ११ चे सभासद यांनी मदतनीससाठी लेखी मागणी केल्याने उपआयुक्त (प्र.) यांनी मदत करण्याबाबत मा. महापौर यांनी सुचित केले. त्यानुसार उपआयुक्त (प्र.) यांनी मतदानास सहकार्य केले. त्यानंतर वार्ड क्र. १२, १३ चे स. सभासद यांनी मतदान केले. यानंतर वार्ड क्र. १४ चे स. सभासद यांनी लेखी विनंती केल्यानुसार मा. महापौर यांनी श्री. खन्ना उपअभियंता ड्रेनेज यांना सहकार्य करणेस सांगितले त्यानुसार मतदान झाले. वार्ड क्र. १५ चे स. सभासद यांनी मतदानास भाग घेतला व वार्ड क्र. १६ चे स. सभासद यांच्या लेखी विनंती अर्जानुसार मा. महापौर यांनी सुचित केल्यावरुन प्रकल्प संचालक यांनी मतदानासाठी सहकार्य केले. त्यानंतर वार्ड क्र. १७ व १८ चे स. सभासदांनी मतदानात भाग घेतला. वॉ क्र. १९ चे स. सभासद यांनी लेखी

विनंती अर्ज दिल्यावरुन त्यांना मुख्य लेखाधिकारी यांनी मतदानासाठी सहकार्य करावे. असे मा. महापौर यांनी सुचित केल्यावरुन स. सभासदांना सहाकार्य केले. त्यानंतर वार्ड क्र. २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७ व २८ स. सभासदांनी मतदानात भाग घेतला व वार्ड क्र. ३०, ३२ च्या मतदनानंतर वार्ड क्र. ३१ चे स. सभासदांचे नांव पुकारण्यात आले. त्यांनी पिठासन अधिकारी पदावरुन उठून मा. उपमहापौर यांना पिठासन अधिकारी पदी बसविले व मतदानात भाग घेतला त्यानंतर वार्ड क्र. ३३, ३४, ३५, ३६, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५९, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६९, ७२ चे स. सभासदांनी मतदानात भाग घेतला. वार्ड क्र. ७३ चे सभासद यांनी लेखी मागणी केल्यावरुन लेखापाल श्री. दुरानी यांना मतदनास सहकार्य करण्याचे मा. महापौर यांनी सुचित केले. त्यानुसा मतदान झाले. वार्ड क्र. ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९ चे सभासद यांनी मतदान केले. वार्ड क्र. ८० चे स. सभासद चे लेखी विनंती अर्जानुसार श्री. मुळे यांनी सहकार्य करणेस मा. महापौर यांनी सुचित केले. त्यानुसार मतदान पार पडले. त्यानंतर वार्ड क्र. ८१ व ८३ चे मतदान संपन्न झाले. त्यानंतर मतदान करुन आल्यावर पिठासीन अधिकारी पदी महापौर श्री. विकास जैन यांनी आसन ग्रहन केले. वार्ड क्र. ६१ व ७० चे स. सभासदांचे दोनदा नांव पुकारण्यात आले ते दोघेही गैरहजर होते.

मा. महापौर : ज्या स. स. नी मतदानास भाग घेतला नाही. त्यांचे नांव पुन्हा पुकारण्यात यावे.

जनसंपर्क अधिकारी : यांनी वार्ड क्र. ६१ व ७० चे स. स. चे नांव पुकारणा केली. ते सभागृहात गैरहजर असल्याने मतदानात भाग घेतला नाही.

पिठसीन अधिकारी : आता ३.१५ वाजले असून, मतदान संपले आहे. असे मी घोषित करतो. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांनी किंवा ज्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करु नये व सभागृहात शांतता ठेवून निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यास सहकार्य करावे ही विनंती (यानंतर स. स. श्री. नासेरखान अ. रहेमान खान हे सभागृहात प्रवेश करतात.)

श्री. नासेरखान अ. रहेमानखान कुरैशी : माझे नातेवाईक वारले होते. मला यायला वेळ लागला व मला मतदान करण्याची परवानगी द्यावी.

पिठासीन अधिकारी : आता मतदान करता येईल का. सचिव यांनी माहिती द्यावी.

नगरसचिव : मा. पिठसीन अधिकारी यांनी मतदानाची वेळ संपली आहे. असे घोषित केलेले आहे व सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (एफ) प्रमाणे दिलेली वेळ संपलेली आहे. त्यामुळे नियमानुसार मतदानास परवानगी देता येणार नाही.

पिठासीन अधिकारी : मतदानाची वेळ संपलेली आहे. नियमाप्रमाणे आपणास मतदानाची परवानगी देता येत नाही.

पिठासीन अधिकारी : मतमोजणीचे काम पूर्ण झाले आहे.

| | | |
|---|---|---|
| एकूण मतदान | -- | ६१६ |
| अवैध मते | -- | -- |
| वैध मते | -- | ६१६ |

उमेदवारांना पडलेली मते खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **उमेदवारांचे नांवे** | **पडलेली मते** |
|---|---|---|
| १) | श्री. कैसरखान बद्रोद्यीन खान | ६४ |
| २) | श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण | ७२ |
| ३) | सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर | ७२ |
| ४) | श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | ७२ |
| ५) | सौ. मानकापे पार्वती लहानु | ७२ |
| ६) | श्री. वाणी ठकुजी रामसिंग | ७२ |
| ७) | सौ. शाहिन जफ्फर महमुद जफ्फर | ५६ |
| ८) | श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल | ६४ |
| ९) | सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | ७२ |

मतमोजणीच्या निकालावरुन मी असे घोषित करतो की, स्थायी समिती सदस्य पदासाठी खालील सदस्यांची निवड झाली असून, मी त्या सर्वांचे अभिनंदन करतो.

| **अ.क्र** | **विजयी उमेदवारांचे नांवे** |
|---|---|
| १. | श्री. कैसरखान बद्रोद्यीन खान |
| २. | श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण |
| ३. | सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर |
| ४. | श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव |
| ५. | सौ. मानकापे पार्वती लहानु |
| ६. | श्री. वाणी ठकूजी रामसिंग |
| ७. | श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल |
| ८. | सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे |

**ठराव क्र. ५८० :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(५) अन्वये स्थायी समितीच्या आठ सदस्य पदाकरीता सभागृहात झालेल्या मतदानानुसार स. सभासद सर्वश्री. १. श्री. कैसरखान बद्रोद्यीन २. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण ३. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर ४. श्री. रतनकुमार नारायण पंडागळे ५. श्रीमती पार्वती लहानु मानकापे ६. श्री. ठकुजी रामसिंग वाणी ७. श्री. शेख शकील पटेल शे. बुढण पटेल ८. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे यांची स्थायी समिती सदस्य म्हणून झालेल्या निवडीस सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

सर्व विजयी उमेदवारांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

याच बरोबर " जन गण मण " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर तथा पिठासिन अधिकारी यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## *दिनांक ३०-३-२००२ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**दिनांक २२-३-२००२ रोजी तहकुब झालेली व दिनांक ३०-३-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस मा. आयुक्त महानगरपालिकेतील अधिकारी तसेच स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री शिंदे राजू रामराव | उप महापौर |
| २) | स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष | स. सभासद |
| ३) | स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ४) | स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५) | स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ६) | स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) | स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ८) | स. स. श्री शे. ईलीयास किरमानी शेख उमर | -//- |
| ९) | स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| १०) | स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ११) | स. स. श्री कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| १२) | स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १३) | स. स. सौ. पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १४) | स. स. सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १५) | स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १६) | स. स. सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिशन | -//- |
| १७) | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १८) | स. स. सौ.कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १९) | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २०) | स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु | -//- |
| २१) | स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २२) | स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २३) | स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २४) | स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २५) | स. स. सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २६) | स. स. श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २७) | स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २८) | स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २९) | स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ३०) | स. स. श्री अ. रशिद अ. सत्तार | -//- |
| ३१) | स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |

३२) स. स. श्री डॉ. कराड भागवत किसनराव -//-
३३) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर -//-
३४) स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब -//-
३५) स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव -//-
३६) स. स. श्री. नासेर खान सरदार खान -//-
३७) स. स. श्री. थोरात दत्तात्रय रामराव -//-
३८) स. स. श्री. सोनवणे सुदाम रामदास -//-
३९) स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत -//-
४०) स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुडंलिक -//-
४१) स. स. सौ. नुसरत बानो फिरोजखान -//-
४२) स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव -//-
४३) स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव -//-
४४) स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ -//-
४५) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
४६) स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
४७) स. स. श्री. अब्दुल कदिर मौलाना सय्यद -//-
४८) स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला -//-
४९) स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-
५०) स. स. सौ. संगिता बाळू मैंद -//-
५१) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे -//-
५२) स. स. श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरैशी -//-
५३) स. स. श्रीमती शाहीन जफर महमुद जफर -//-
५४) स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण -//-
५५) स. स. सौ दाणे चंद्रभागाबाई भागीरथ -//-
५६) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
५७) स. स. श्री स. सलीम स. युसूफ -//-
५८) स. स. श्री मीर हिदायत अली मीर बसालत अली -//-
५९) स. स. श्री अफसर खान यासीन खान -//-
६०) स. स. श्री लकडे भरत श्रीपती -//-
६१) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-
६२) स. स. श्री सलीम पटेल समशेर पटेल -//-
६३) स. स. श्री कैसर यान बद्रोद्यीन खान -//-
६४) स. स. श्री जगदीश कन्हैय्यालाल सिध्द -//-
६५) स. स. सौ. बबीता सुभाष कागडा -//-
६६) स. स. श्री. सय्यद अली सलामी स. मीरा सलामी -//-
६७) स. स. सौ निखत परविन ईजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री. घडामोडे भगवान देवीदास
२) स. स. श्री. खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
३) स. स. सौ. सलमा बानो मिर महंमद अली

श्री. डॉ. भागवत कराड : शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व अभ्यासू वृत्तीचे व विवेकानंद महाविद्यालयामध्ये प्राचार्य असलेले गंगाधर पाथ्रीकर यांचे नुकतेच दु:ख निधन झाले, त्यांना सभागृतर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री. जयवंत ओक : स. सदस्या सौ. निखत परविन ईजाज अली यांचे आईचे दु:खद निधन झाले, त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री. रतनकुमार पंडागळे : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे, ०२ मिनिटे सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे राहावे.

याचवेळी सभागृहातर्फे स्व. गंगाधर पाथ्रीकर तसेच स. सदस्या सौ. निखत परविन ईजाज अली यांचे आईचे निधन झाल्याबद्दल ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण केली.

**विषय क्र. ५८१ :**

सन २००१-२००२ चे सुधारित व सन २००२-२००३ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

मुख्यलेखाधिकारी : सन २००१-२००२ चे सुधारित व २००२-२००३ चे मुळ अंदाजपत्रक मा. सभापती यांनी कलम ९६ नुसार तयार करुन, सर्वसाधारण सभेकडे सादर केलेले आहे. मा. स्थायी समिती हा अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेकडे सादर करीत आहे, करीता सभापती स्थायी समिती यांना विनंती की, त्यांनी मा. महापौर, पदाधिकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावे. (याचवेळी मा.सभापती हे मा. महापौर, उपमहापौर, पदाधिकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात. तसेच मा. आयुक्तांचे सुध्दा स्वागत करण्यात येते. प्रशासनातर्फे मा. उपआयुक्त (म.) हे सभापती यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात.)

मुख्यलेखाधिकारी : मा. सभापती यांना विनंती की, मा. महापौर यांचेकडे अर्थसंकल्प सादर करावा. (याचवेळी मा. सभापती हे मा. महापौर यांचेकडे अर्थसंकल्प सादर करतात.) सदरील अंदाजपत्रक हे कलम ९५ नुसार मा. आयुक्त यांनी उत्पन्न व खर्च बाजु विचारात घेऊन स्थायी समिती समोर अंदजपत्रक सादर केलेले असते. कलम ९६ नुसार हे अंदाजपत्रक स्थायी समिती तयार करुन सर्वसाधारण सभेत सादर करीत असते. अंदाजपत्रक तयार करण्याचे अधिकार लोकप्रतिनिधी म्हणून स्थायी समिती व सर्वसाधारण सभेला आहे. प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर स्थायी समितीने विचार विनिमय करुन व काही सुधारण सुचवून सदरील अंदाजपत्रकत हे सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ ठेवलेले आहे. मा. महापौर यांना विनंती करेन की, सादर केलेल्या अंदाजपत्रकावर विचार विनिमय करण्यास हरकत नाही. यानंतर मा. सभापती हे त्यांचे मनोगत सादर करतील.

मा. सभापती : औरंगाबाद महानगरपालिकेचे सन २००१-२००२ चे सुधारित व सन २००२-२००३ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी स्थायी समिती समोर सुधारित अर्थसंकल्प दिनांक ५-२-२००२ रोजी सादर केला होता ती सभा तहकुब होऊन दि. २०-२-२००२ रोजी संपन्न

झाली सदर प्रस्तावास या बैठकीत ठराव क्र. ७५/१ नुसार मान्यता देण्यात आली आहे. तसेच मुळ अंदाजपत्रक दि. २७-२-२००२ रोजी सादर केले होते. अंदाजपत्रकातील तरतुदीवर विचार विनिमय करण्यास्तव दि. ५-३-२००२ रोजी स्थायी समितीची सभा आयोजित करण्यात आली होती, तथापि काही अपपरिहार्य कारणास्तव ही सभा दि. ११-३-२००२ रोजी व दि. १३-३-२००२ रोजी घेण्यात येवून या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाव सर्वकष चर्चा करण्यात आली व त्यामध्ये काही फेरबदल सुचवून आयुक्तांनी सादर केलेले अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक ठराव क्र. ७६/१ दि. १३-२-२००२ अन्वये पारित करुन सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेची सन १९८२ साली स्थापना झाल्यानंतरचा हा विसावा अर्थसंकल्प असून, लोक नियुक्त पदाधिकारी यांचे कालावधीतील बारावा अर्थ संकल्प सादर करतेवेळी मला मनसी आनंद होत आहे. शहरातील नागरिकांना प्राथमिक स्वरुपाच्या सेवा सुविधा पुरविण्याकरीता प्रस्तावित अर्थ संकल्पात कामनिहाय कामाच्या समावेश करण्यात आलेला आहे. या वर्षापासून प्रथमच अर्थ संकल्पामध्ये आर्थिक वर्षामध्ये कोणती कामे घेण्यात येणार आहेत. त्यांचे विवरण दिलेले आहे. त्यामुळे नागरिकांना व सन्माननिय सदस्यांना या आर्थिक वर्षात कोणती कामे होणार आहे. याचे चित्र स्पष्ट होणार आहे. या पध्दतीमुळे पुढील आर्थिक वर्षात कोणती कामे घ्यावयाची याचे नियोजन सन्माननिय सदस्यांना करता येणार आहे. प्रशासनातर्फे पाणीपट्टी वाढीचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला होता, तथापि स्थायी समितीने यावर विचार न करता सर्वोच्च सभागृहात सर्व सन्माननिय सदस्यांच्या उपस्थितीत सर्वानुमते या प्रश्नावर निर्णय व्हावा म्हणून जसाचा तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर केलेला आहे, त्यावर सर्वसाधारण सभेत निर्णय व्हावा.

स्थायी समितीने महानगरपालिकेचे मुख्य उत्पन्नाचे साधन असलेले जकात, मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीचे उद्दीष्ट प्रशासनास वाढवून दिले आहे. जेणेकरुन थकीत रकमा वसुल होऊन नागरिकांच्या कामासाठी जास्तीचा निधी उपलब्ध होऊ शकेल. महानगरपालिकेची सद्याची आर्थिक परिस्थिती विचारात घेता, कर्मचाऱ्यांवरील प्रशासकीय खर्च कमी करण्याच्या दृष्टीने स्थायी समितीने पाचव्या वेतन आयोगची रु. १.५० कोटी थकबाकी या आर्थिक वर्षात न देणे बाबत निर्णय घेतला आहे. तसेच राज्य शासनाच्या धर्तीवर घर बांधणी कर्ज व वाहन खरेदी कर्ज तुर्त देऊ नये म्हणून, तरतुद कपात केली आहे. यास महासभेने मान्यता द्यावी.

महानगरपालिकेचे मुख्य कर्तव्य म्हणजे नागरिकांना मुलभूत गरजा जसे रस्ते, विज, पाणी, ड्रेनेज सुविधा तातडीने देणे या बाबीकरीता निधी कमी पडत असल्याने तातडीची नसलेली कामे जसे शाळा बांधणे, वाचनालय बांधणे, स्मशानभूमी भिंत बांधणे या कामाची कपात करुन याचा निधी इतर तातडीच्या कामावर वळविण्यात आलेला आहे.

नागरिकांना स्वयंफुर्तपणे महानगरपालिकेच्या कराचा भरणा सत्वर केल्यास नागरिकांना आकर्षक सुट देण्याचे स्थायी समितीने मान्य केले आहे. तसेच जे नागरिक महानगरपालिका कराचा भरणा करणार नाहीत, त्यांना १५% ऐवजी १०% व्याज दर आकारुन स्थायी समितीने नागरिकांनी

कर भरावे म्हणून त्यांना प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला आहे. स्थायी समितीने खालील नविन प्रस्ताव या आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित केलेले आहेत.

१) कराधान नियम २१ नुसार दर ४ वर्षांनी मालमत्ताचे सर्वेक्षण करण्यात यावे.

२) पाणीपट्टी वसुली ही खाजगी अभिकर्त्यांमार्फत प्रायोगिक तत्वावर करता येईल का? ही बाब तपासून २ ते ३ विभागामध्ये (झोनमध्ये) ही पध्दत अवलंबविण्यात यावी.

३) प्रायोगिक तत्वावर खाजगीकरणातून ५ वार्डाची साफसफाई करण्यात यावी.

४) एका विभागाची (झोन) विद्युत देखभाल व दुरुस्ती खाजगी तत्वावर करण्यात यावी.

५) कर्ण बधीरांना महानगरपालिकेतर्फे ९०% अनुदान व संबंधितांचा १०कर्ण बधीरांना महानगरपालिकेतर्फे १०% वाटा या तत्वावर श्रवण यंत्र पुरवठा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. या करीता रु. २.०० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

६) नाला सफाई / गाळ काढण्याकरीता अद्यावत मशिनरी इतरत्र उपलब्ध आहेत, त्यानुसार एक मशिन महानगरपालिकेमध्ये करण्यात यावी.

७) डिफर पेमेन्ट तत्वावर शहरात, सिंमेंट कॉंक्रीट रोड बांधण्याची प्रक्रिया सुरु करण्यात यावी.

८) महापौर चक्षक क्रिडा स्पर्धाअंतर्गत हॉकी / बुध्दीबळ व अपंगाचे राज्य स्तरीय स्पर्धेचा समावेश करण्यात यावा.

९) संगणक प्रशिक्षण हे वर्ग १ ते ३ संवर्गातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात यावे.

प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या इतर सर्व बाबींवर स्थायी समितीचे सर्व सदस्यांच्या अभ्यासपूर्ण चर्चेअंती काही फेरफार सुचवून स्थायी समितीने सन २००१-२००२ चे सुधारित अंदाजपत्रकास व सन २००२-२००३ चे मुळ अंदाजपत्रकास रु. १२१ कोटी ५७ लाख १५ हजार एकूण जमा व रु. १२१ कोटी २८ लाख ८५ हजारच्या खर्चास आणि रु. २८ लाख ३० हजार शिलकी अंदाजपत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार मान्यता देऊन मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करातांना मला अत्यंत आनंद होत आहे, यावर सर्वकष विचार होऊन त्यास मान्यता प्रदान करण्यात यावी.

मा. महापौर : सन २००१-२००२ चा सुधारित व २००२-२००३ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा करावी.

श्री. कुमावत अविनाश : स्थायी समितीने जो अर्थसंकल्प सादर केला. त्यात पाणीपट्टी वाढीचा प्रस्ताव होता त्यावर काही निर्णय न होता जशाचा तसा प्रस्ताव रु. २१००/- वर्षाची पाणीपट्टी आकारली जाईल. असा सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी दिला. स्थायी समितीने काहीतरी निर्णय घ्यावयास पाहिजे होता. रु. २१,००/- पाणीपट्टी मान्य नाही. त्यास आमचा विरोध आहे. (याचवेळी सभागृहाचा दरवाजा वाजतांना आवाज येतो.)

श्री. काशीनाथ कोकाटे : सभागृहाचा दरवाजा मोठमोठयाने वाजतो आहे. याबाबतचा खुलासा द्यावा. बाहेरील दबाव तंत्र वापरुन सभागृहाकडून अंदाजपत्रक मंजूर करणार काय?

मा. महापौर : कुणी सदस्य सभागृहात येऊ इच्छित असेल तर, येऊ द्यावे, माठ वगैरे आणत असेल तर, आणू देऊ नये. (याचवेळी बरेच स. सदस्य मा. महापौर डायस समोर उभे राहून मोठमोठयाने बोलतात. काहीही ऐकू येत नाही. वेळ १२.२५ वाजता.)

श्री. डॉ. भागवत कराड : स. सदस्या श्रीमती मानकापे या बाहेर आहे. त्यांना का आत येऊ देत नाही, सुरक्षा रक्षकांना आदेश करणे.

श्री. जयवंत ओक : सदस्यांचा पाणी पट्टीच्या संदर्भात विरोध दिसतो. परंतु तो विषय अद्याप सुरु झाला नाही. जेव्हा पाण्यावर चर्चा सुरु होईल. तेव्हा सदस्यांनी मत मांडावे.

(याचवेळी दोन सदस्य श्री. ताठे व श्रीमती मानकापे सभागृहात येतात.)

श्री. डॉ. भागवत कराड : दोन सदस्यांना सभागृहात का येऊ देत नव्हते, खुलासा द्यावा.

श्री. काशीनाथ कोकाटे : कशाचा वाद होता. खुलासा द्यावा.

मा. महापौर : मी सुरक्षा रक्षक यांना सूचना केली होती की, कुणी सदस्य असेल तर, त्यांना काही वस्तू सभागृहात न आणता येवू द्यावे. परंतू माहिती घेतली असता, सदस्यांजवळ पाण्याचा माठ होता. म्हणून येऊ देत नव्हते आणि सर्व सदस्यांना विनंती की, आजची सभा महत्वाच्या विषयावर होणार आहे. जनतेच्या वर्षभराच्या विकास कामा बाबतचा निर्णय घेण्यासाठी सभा बोलविली आहे. जनतेचे लक्ष आपल्याकडे लागलेले आहे.

श्री. अफसर खान, श्री. काशीनाथ कोकाटे : दरवाजाचा आवाज का व कशासाठी येत होता, सभेच्या कामकाजात व्यत्यय आलेला आहे, खुलासा द्यावा. स. सदस्य यांची मागणी काय होती, सभागृहाच्या निदर्शनास आणावी.

मा. महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. स. स. श्री. ताठे यांना काही सूचना करायची नाही, आता सुधारित अंदाजपत्रकावर चर्चा करावी.

श्री. अफसर खान : स. सदस्यांना आत येण्यास का मनाई केली. सुरक्षा रक्षकावर कार्यवाही व्हावी.

श्री. संजय शिरसाठ : सभागृहात मा. सभापती मनोगत व्यक्त करीत असतांना सभागृहाचा दरवाज्याचा मोठमोठयाने आवाज येत होता. ३ ते ४ सुरक्षा रक्षक दरवाजाला हात लाऊन होते. निश्चित काय झाले कळाले नाही, परंतु सदस्यांना आतमध्ये येऊ दिले नाही. असा आक्षेप करण्यात आला. या प्रकरणात एकतर नगरसेवकांचा दोष असेल किंवा सुरक्षा रक्षकाचा दोष असेल. स. सदस्यांचा अपमान होऊ नये व त्यास सर्वांची मान्यता आहे. याबाबतीत खुलासा द्यावा व स. सदस्यांचा सुध्दा खुलासा घ्यावा. त्यांचे मत जाणून घ्यावे. अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

श्री. भगवान घडामोडे : सभागृहात उपस्थित होतो, त्यानंतर पुन्हा बाहेर गेलो असता. सभागृहात येण्याची मागणी करीत होतो, परंतू सुरक्षा रक्षक येऊ देत नव्हते. याबाबतचा निश्चित खुलासा करावा. हा प्रकार कशामुळे पडला याचे कारण समजू शकले नाही.

मा. महापौर : सुरक्षा अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री. काशीनाथ कोकाटे : सुरक्षा अधिकारी यांना खुलासा करता येईल का? त्यांचे विभाग प्रमुख उपआयुक्त जे वरिष्ठ असतील त्यांनी खुलासा करावा.

मा. महापौर : कुणाचीही नाराजी नाही, सुधारित अर्थसंकल्पावर चर्चा करावी.

श्री. सुदाम सोनवणे : सन २००२-२००३ चा अर्थसंकल्प सादर झालेला आहे, जे उद्दीष्ट ठेवले, त्यावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे योग्य होईल. तत्पुर्वी मागील वर्षी जे अंदाजपत्रक १३४ कोटीचे ठेवले होते ते सुधारित मध्ये का कमी करण्यात आले, त्याची कारणे काय उद्दीष्टानुसार कोणते महसुली उत्पन्न कमी आले याचा सविस्तर खुलासा व्हावा. प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पात वाढ होते. उत्पन्न वाढते. मागील वर्षीच्या तुलनेत हा अर्थसंकल्प १५० कोटीचा असावयास पाहिजे होता, कशात महसुल उत्पन्न मिळाले नाही.

श्री. अंबादास दानवे : मागील वर्षाचा अर्थसंकल्प १३५ कोटी ५६ लक्ष ४० हजार रुपये होता. सुधारित मध्ये ९७ मध्ये कोटी ०१ लक्ष ३५ हजाराचा होता. याचा अर्थ २००१-२००२ च्याच अर्थसंकल्पात ३८ कोटी ५५ लक्षची तुट या वर्षात आहे. यावर्षाचे उत्पन्न अपेक्षित १२१ कोटी ४५ लक्ष ४५ हजार जे स्थायी समितीने सर्वसाधारण सभेकडे सादर केलेले आहे, स्थायी समितीने काही अभिनंदनीय निर्णय घेतलेले ते आताच सभापती यांनी त्यांचे मनोगत मध्ये बोलून दाखविले. उत्पन्न वाढवून महसुली खर्च कमी करण्याचा सुध्दा प्रयत्न स्थायी समितीने केलेला आहे. जी तूट निर्माण झाली त्यामुळे विकास कामे झाली नाही. असेच म्हणता येईल.

श्री. काशीनाथ कोकाटे : अभ्यासपूर्वक अर्थसंकल्प ठेवलेला आहे. गेल्यावर्षी १३५ कोटी ३५ लक्ष ५५ हजार रुपयांचा अर्थसंकल्प ठेवण्यात आलेला होता. परंतू आकडेवारी पाहिली असता त्यात ३८ कोटीची तुट होऊन सुधारित मध्ये ९७ कोटीचा करण्यात आलेला आहे. त्यामुळे जवळपास ५७% तुटीचा अर्थसंकल्प सादर केलेला होता. दरवर्षी २० ते २५% उत्पन्नात वाढ होत असते. त्यानुसार वाढीव बजेट सादर होत असते. असा नियम आहे. १७% घट निर्माण झाली, एवढा अर्थ संकल्प वाढवून ठेवण्याची गरज काय होती खुलासा द्यावा. कोणत्या हेड खाली घटलेला आहे. याचा शोध घेणे आवश्यक आहे. उत्पन्न कमी होते, म्हणून या शहरातील जनतेला वर्षभरात दररोज ४५ मिनिटे पाणी सुध्दा देऊ शकलो नाही. ही परिस्थिती निर्माण झालेली आहे, रस्ते, ड्रेनेज, लाईट च्या दैननयि अवस्था आहे. या सुविधा सुध्दा जनतेपर्यंत देता आल्या नाही. जे की, ३८ कोटीच्या तुटीमुळे अशी परिस्थिती निर्माण झाली. तुट का आली, त्याचा खुलासा द्यावा. प्रत्येक वर्षी तुट निर्माण झाल्यास जनतेच्या सुविधा देऊ शकणार नाही. अशी खात्री आता झालेली आहे. अर्थसंकल्प चुकीचा ठेवलेला होता का? सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो की, या शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. मुंबई, पुणे पेक्षा या शहरात मालमत्ता झपाटयाने वाढत आहे. त्या प्रमाणात मालमत्ता कर वाढावयास पाहिजे होते. त्याप्रमाणात वाढले नाही. बांधकाम परवानगीच्या माध्यमातून मालमत्तेचे उत्पन्न जास्त प्रमाणात मिळालेले नाही, म्हणून जी तुट निर्माण झाली ती या वर्षीच्या अर्थसंकल्पात भरुन निघेल अशी खात्री आहे. त्यासाठी मागील वर्षाची तुट का निर्माण झाली. त्यानुसार सविस्तर चर्चा या बजेटवर करता येईल.

श्री. खुंगर सुरजितसिंग : मागील वर्षी १३५.५६ कोटीचा अर्थसंकल्प ठेवलेला होता, कोणता निकष लाऊन तयार केले. गृहीत धरलेले निकष कशामुळे सफल झाले नाही. याची कारणे सभागृहाच्या निदर्शनास येणे आवश्यक आहे. जे १२१ कोटीचे बजेट सादर झाले ते सुध्दा पूर्ण करणार की नाही याची सुध्दा खात्री नाही. महानगरपालिकेस २१८.८९ कोटी रुपये कर्जच व थकीत रक्कम म्हणून देणे आहे. यात एम. एस. ई. बी. म्हाडा, रस्ते विकास महामंडळ, पोलीस दल, पाचवा वेतन आयोग याबाबत प्रशासनाने काय नियोजन केलेले आहे, गेल्या वेळेस हा विषय होता, एम. एस. ई. बी. ला ७५ लक्ष देण्याचे मान्य केले. १.२५ लक्ष थकीत ठेवले जाते, त्यावर व्याज वाढत आहे. यात महानगरपालिकेचा तोटा होतो आहे, या संदर्भात ही योगय निर्णय घेणे गरजेचे आहे.

श्री. डॉ. भागवत कराड : जो अर्थसंकल्प सभापती यांनी सादर केला त्यात वर्कवाईज कामे नमुद केलेली आहे. ही प्रथा प्रथमच सुरु होत आहे, त्याबद्दल मी मा. सभापती यांचे अभिनंदन करतो. वर्कवाईज बजेट मुळे कोणत्या वार्डात कोणती कामे करणार हे स्पष्ट होते. १३५ कोटीचे बजेट होते. ९७ कोटीवर आले त्यात प्रामुख्याने जकातीचे ६१ कोटीचे उद्दीष्ट हे पूर्ण न होता, जेम तेम ५०.५० कोटी वसुली होणार अशी सद्य:स्थिती आहे. तसेच मालमत्ता, पाणीपट्टी व इतर जे महसुली उत्पन्न महानगरपालिकेस यावयास पाहिजे ते प्रमाणकानुसार आलेले नाही. त्यामुळे सुधारीत केलेले आहे, असे स्पष्ट होते. यावर्षीचा बजेट ११७ कोटीचे सादर केलेले आहे, यात फक्त २८ कोटीचे विकास कामे होतील, संविधानिक खर्च हा ७० कोटी पर्यंत होणार आहेत. जी महसुली उत्पन्नाची वसुली आहे, ती योग्य प्रमाणात झाली पाहिजे व जनतेची कामे झाली पाहिजे.

श्री. स. अली सलामी : मागील वेळेस १३५ कोटीचे बजेट ९७ कोटीवर आणले. टारगेट पूर्ण का झाली नाही. यावर चर्चा करणे बरोबर आहे. महानगरपालिचे उत्पन्न कसे वाढविता येईल याकडे लक्ष देणे सर्वांचेचे कर्तव्य आहे. ५-६ वर्षाचा विचार केला तर, प्रत्येक वर्षी टारगेट नुसार वसुली होत नसून उद्दीष्ट पूर्ण होत नाही. सर्वच महसुली उत्पन्नात हीच परिस्थिती आहे. प्रत्येक वर्षी उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मालमत्ता कर, पाणीपट्टी वाढवतो. जकातीचे उद्दीष्ट वाढवून ठेवतो. परंतु वसुलीचे प्रमाण जो पर्यंत वाढत नाही. तो पर्यंत करात वाढ करणे सुध्दा योग्य नाही. किती टक्के वसुली होत आहे, यावर लक्ष देणे गरजेचे आहे. जकातीच्या बाबतीत पूर्वी पेक्षा यावेळेस चांगल्याप्रकारे वसुली झालेली आहे. तरी सुध्दा यापेक्षा आणखी वसुली येण्याच्या दृष्टीने प्रयत्न असावेत. जे टारगेट दिले, ते पूर्ण होत नाही. ते पूर्ण व्हावयास पाहिजे. अशी माझी मागणी आहे. १३५ कोटीचेच टारगेट जास्त झालेले होते. ३८ कोटीची तुट निर्माण झाली, यावेळेस किती तुट येणार शंका येत आहे. तसेच अर्थसंकल्पात जे निर्णय घेतले जातात. त्याची अंमलबजावणी वर्षभरात होत नाही. अभय योजना राबविण्याचा निर्णय घेतला होता. अद्याप कार्यवाही नाही, त्यामुळे उत्पन्न कमी होत गेले. तसेच जो भाग अनाधिकृत आहे, गुंठेवारी नुसार कार्यवाही का झाली नाही. त्यामुळे कराचे उत्पन्नात भर पडली असती, उत्पन्न वाढले असते. तसेच महापौर बंगल्या शेजारील व्यापार संकुलची योजना त्यापासून उत्पन्न वाढविण्याच्या

दृष्टीने चर्चा केलेली होती. बोल्ट पध्दतीने उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सुध्दा चर्चा झालेली होती. त्या संदर्भात निर्णय घेऊन ही कार्यवाही झालेली नाही. नुसती जकात व मालमत्ता कर यावर अवलंबून न राहता इतर माध्यमातून सुध्दा उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे तरच उद्दीष्ट पूर्ण करु शकतो. ही भावना सभागृहाने ठेवावी. शहरातील बऱ्याच अधिकृत असलेल्या टपऱ्या सुध्दा न्यायालयाच्या आदेशानुसार काढण्यात आल्या. या टपऱ्यापासून ६,६६,२४०/- रुपये दर महिन्याला उत्पन्न होते. वर्षाचे जवळपास १ कोटी रु. उत्पन्न महानगरपालिकेस येत. न्यायालयाने आदेश दिल्यानंतर ॲफिडेव्हिट करुन पुढील कार्यवाही करणे गरजेचे होते, परंतु ती कार्यवाही झालेली नाही. उत्पन्न कमी झाले व १ ते २ फुट रस्त्यावर येणाऱ्या टपऱ्या काढण्यात आल्या व याच वर्षात १ कोटी चे उत्पन्न घटले असे म्हणता येईल. पैठणगेट येथील ६४ दुकानापैकी ८ दुकाने बाकी आहे, बाकीच्या भाडयाने दिलेल्या आहे, सदर दुकानदार नियमाने वेळोवेळी भाडे भरतात का. हे मालमत्ता अधिकारी यांचे काम असून वेळोवेळी सभागृहाला माहिती दिली गेली पाहिजे. अशा शहरात बऱ्याच ठिकाणी दुकाने बांधून आहेत. काही दुकानाच्या बाबतीत लोकांनी ५ हजार रुपये डिपॉझिट भरले कोर्टात केस टकली सर्व प्रलंबीत आहे जे उत्पन्न येणार होते, ते बंद झाले. अशा केसेसच्या बाबतीत विधी विभाग कोणत्या पध्दतीने केसेस हाताळीत आहे हे सुध्दा बघणे गरजेचे आहे. म्हणून ज्या ज्या लहान माध्यमातून उत्पन्न मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावयास पाहिजे, तर उद्दीष्ट पूर्ण करु शकू नसता, नसती चर्चा करुन अर्थ नाही. जे प्रत्येक वर्षी अशाच प्रकारची चर्चा होऊन कार्यवाही काहीच नाही. अशी परिस्थिती होत राहील १२१ कोटीचे बजेट पूर्ण होते की नाही. अशी शंका आहे. तसेच वर्कवाईज बजेट तयार करुन देण्यात आले. त्याबद्दल सर्व स्थायी समिती व सभपती यांना धन्यवाद देतो, परंतु त्या बजेटमध्ये काही सदस्यांच्या वार्डातील कामाचा उल्लेख नाही. त्यासाठी प्रशासनाने अगोदर एक पत्र काढून कामाची यादी मागविली असतील व त्यात सर्वच जे आवश्यक काम आहे, त्यास प्राधान्य देऊन समावेश केला असता, तर काही सदस्यांची नाराजी झाली, ती झाली नसती. या अर्थसंकल्पात काही सदस्यांच्या वार्डाचा उल्लेखच नाही. अशा सदस्यांचे मत जाणून घेऊन त्यांच्या वार्डातील कामाला प्राधान्य देऊन कार्यवाही करावी.

सौ. साधना सुरडकर : वर्क वाईज बजेट केलेले असल्याने सभापती यांना धन्यवाद देते, यामुळे प्रशासनाला काम करण्यास सोपे होईल व काम करुन घेण्याबाबत नगरसेवकांना सुध्दा अडचणीचे होणार नाही. गेल्या वर्षीच १३५ कोटीचे बजेट होते, ९८ कोटी वर आले. जेव्हा बजेट मंजूर केले तेव्हा सर्व आकडेवारी समोर ठेवून मंजूर केले जे मुद्दे उत्पन्नाच्या दृष्टीने मंजूर केले. त्याची अंमलबजावणी करण्याबाबत काय कार्यवाही केली होती ते समोर आलेले नाही. त्यामुळे ३७ कोटीची तुट निर्माण झाली. म्हणून मागील वर्षी ज्या चुका केल्या त्या या बजेट मध्ये सामाविष्ट आहे किंवा काय? याची दक्षता घेतलेली आहे किंवा कसे, पुन्हा १२१ कोटीचा अर्थसंकल्प सादर करुन १०० कोटीच होणार असे चित्र समोर येत असेल तर, योग्य होणार नाही. याचा अर्थ नुसते कागदावरच बजेट करतो, प्रत्यक्षात वसुली काहीच

नाही. ज्यांनी वसुली केली नाही. अशा कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कार्यवाही केली, किंवा करणार आहे. नसता हे बजेट पुन्हा एकदा वाढवून दाखवून मंजूर करणार आहे. अशीच शंका येते व पुन्हा पुढील वर्षी अशाच प्रकारची चर्चा होईल, व तोच तो प्रश्न सभागृहात पुन्हा पुन्हा उपस्थित करुन चर्चा करणे बरोबर नाही जे, बजेट ठेवले तेव्हढी वसुली सुध्दा झाली पाहिजे उद्दीष्टे पुर्ण होणार नसेल तर, कार्यवाही करणार का?

श्री. प्रकाश निकाळजे : ३ मुद्दे उपस्थित करु इच्छितो? गेल्या वेळेस १३४ कोटीचे उद्दीष्ट पूर्ण का झाले नाही, २ महानगरपालिकेकडील २१५ कोटी रुपये देणे आहे, त्यात अंतर्भाव केला गेला का? ३ तसेच अर्थसंकल्पात जी स्पील ओव्हरची जी कामे ठेवलेली आहे, त्यात अंतर्भात केला का? खुलासा द्यावा.

श्री. अविनाश कुमावत : हा १३ वा अर्थसंकल्प असून, दरवर्षी अर्थसंकल्पात वाढ होत असते. परंतु हा अर्थसंकल्प कमी झालेला आहे. स्थायी समितीमध्ये कुठेही नमुद केले नाही की, हा अर्थसंकल्प कमी का झाली. जी स्पील ओव्हरची कामे दिली ती होणारच आहे, परंतु इतर जी कामे दिली ती कितपत योग्य आहे, ती कामे होईल का? ज्या झोनची वसुली जास्त त्या झोनमध्ये विकास कामे जास्त व्हावीत, जी कामे नमुद केली ती योग्य आहे का? खुलासा द्यावा.

श्रीमती. जयश्री किवळेकर : जनतेच्या हिताचे व कल्याणाचे निर्णय अर्थसंकल्पाच्या माध्यमातून आपण घेत असतो व घेत आलेलो आहोत व आज सुध्दा योग्य निर्णय घेण्यासासाठी येथे बसलेली आहोत व वर्कवाईज बजेट सादर होऊन जनतेच्या दैनंदिन जिवनातील कामांना प्राधान्य देण्यात आलेले असल्याने मी सभागृहाच्या वतीने मा. सभापती यांचे अभिनंदन करते. तसेच प्रशासन व स्थायी समिती सदस्य व पदाधिकाऱ्यांचे सुध्दा अभिनंदन करते. फक्त पाणीपट्टी वाढीला आमचा विरोध आहे.

श्री. अविनाश कुमावत : उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने गुंठेवारीचा प्रस्ताव मागील एका सभेत मंजूर केला. त्याची अंमलबजावणी अद्याप केलेली नाही.

मा. महापौर : मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री. अंबादास दानवे, श्री. संजय शिरसाठ : वसुलीच्या संदर्भात संबंधित विभाग प्रामुख्याने खुलासा करावा. मुख्यलेखाधिकारी यांचा संबंध येत नाही, बजेट का कमी झाले, त्याची आकडेवारी दिलेलीच आहे.

मुख्यलेखाधिकारी : वसुली का कमी झाली याबाबत त्या त्या विभागाने अधिकारी खुलासा करतील एक जनरल सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, बजेट का कमी झाले त्याची आकडेवारींची माहिती मत देत आहे.

मा. महापौर : बजेट कमी का झाले ही माहिती द्यावी.

मुख्यलेखाधिकारी : बजेट कमी का झाले त्याची माहिती देणार आहे. वसुलीच्या संदर्भात नाही. मागील वर्षी १४-२-२००१ च्या बैठकीनुसार स. सभापती स्थायी समिती श्री. अशरफ मोतीवाला यांनी १४१ कोटी ६६ लक्ष ५५ हजाराचे अंदाजपत्रक सादर केलेले होते. त्यानंतर १४-३-२००१ रोजी मा. महापौर श्री. डॉ. भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेने १३५ कोटी ६६ लक्ष ५५ हजारचे अंदाजपत्रक मंजूर केले. प्रशासनाने जे आराखडे तयार करुन दिले होते, त्यानुसारच स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने १३५ कोटीचे अंदाजपत्रक तयार केले. जानेवारी २००१ साली अंदाजपत्रक

तयार करण्याचे काम होत असतांनाच जकात खाजगीकरणाची प्रक्रिया सुरु करण्यास आलेली होती, हे खाजगीकरण करीत असतांना शासनाने काही निकष ठरवून दिले आहे. त्यानुसार जकातीची आधारभूत रक्कम निश्चिकत केली जाते. २०००-२००१ चे जकातीचे उत्पन्न ४८ कोटीच होते. त्यावर २०% वाढ व अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचा खर्च यानुसार ६१ कोटीचे जकातीचे उद्दीष्ट तयार केलेले होते व ३ वेळेस प्रयत्न करुन खाजगीकरण होऊ शकले नाही. जकात खाजगीकरण होईल व तेथील २०० कर्मचारी पाणीपट्टी व मालमत्ता कर वसुलीसाठी देऊन उत्पन्नात वाढ होईल या दृष्टीकोनातून पाणीपट्टी व मालमत्ता कराचे उद्दीष्ट सुध्दा जास्त ठेवण्यात आलेले होते. आजही ३६ कोटीची थकबाकी आहे. मागील वर्षाच्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र. २५ वर नमुद केलेले होते की, जी वसुली गृहीत धरली ती अतिरिक्त कर्मचाऱ्यामुळे प्राप्त होईल, असे निश्चित धरले होते. १३५ कोटीत जकात , ६१ कोटी, मालमत्ता २४ कोटी, पाणीपट्टी १५ कोटी आणि शासकिय अनुदान १० कोटी असे निश्चित केलेले होते. अशी ११० कोटीचे उद्दीष्ट या चार बाबींवर गृहीत धरलेले होते. खाजगीकरण न झाल्याने ही वस्तुस्थिती विचारात घेता, डिसेंबर अखेर या सर्व बाबींचा आढावा घेऊन सुधारीत मध्ये जकातीचे ५२.५० कोटी उद्दीष्ट निश्चित करण्यात आले. तसेच मालमत्ता कराचे ४८ कोटी वसुली न नैसर्गिक वाढ १०% प्रमाणे ५२.५० कोटीचे निश्चित करण्यात आले तसेच मालमत्ता कराचे २४ कोटीचे उद्दीष्ट होते. सिडकोच्या महानगरपालिकेकडे हस्तांतरण होईल व ४ कोटी कर मिळेल या अपेक्षेने ४ कोटी हे २४ कोटी मध्ये गृहीत धरले होते. पाणीपट्टीचे सुध्दा १५ कोटीचे उद्दीष्ट ठेवलेले होते. त्यात चालु मागणी १०.२२ कोटीची होती व उर्वरित रक्कम अतिरिक्त कर्मचारी मिळणार या अपेक्षेने उद्दीष्ट निश्चिती मध्ये गृहीत धरलेली होती. औरंगाबाद महानगरपालिकेस दरवर्षी १० कोटी निधी देण्यात शासनाने मंत्री मंडळाच्या बैठकीत मंजूर केलेले होते. तसेच शासनाने परस्पर दुरुस्ती आदेश काढून १० कोटीतून रस्ते विकास महामंडाळास ५ कोटी द्यावे. त्यांचे आदेश महानगरपालिकेस नव्हते. म्हणून बजेटमध्ये १० कोटीचा निधी मिळेल असे नमुद करुन बजेट ठेवलेले होते. जुलै मध्ये शासनाने आदेश केले व सुधारित मध्ये ३ कोटी रु. मिळतील म्हणून नमुद केलेले आहे. एकंदरीत या चार बाबीमुळे ३५ कोटीची तुट निर्माण झालेली आहे. जकातीत ८.५० कोटी, मालमत्तेमध्ये १३ कोटी, पाणीपट्टी वसुलीचे ७ कोटी, शासनाचे १० कोटी येणारे अनुदान ३ कोटी आल्याने ७ कोटीची अशा एकूण ३५.५० कोटी रुपयाची तुट निर्माण झालेली आहे. मालमत्तेचे १२.५९ कोटी चालू मागणी असतांना २४ कोटीचे बजेट ठेवले होते. कर्मचारी मिळेल या अपेक्षेने जास्तीचे टारगेट ठेवलेलो होते. कर्मचारी उपलब्ध न झाल्यामुळे टारगेट पूर्ण झालेले नाही व जेव्हा बजेट मंजूर झाले त्यामध्ये तसे नमुद केलेले होते, सुधारीत ९७ कोटी जे ठेवले होते. ते ३१ मार्च पर्यंत तेव्हढी वसुली निश्चित होईल अशी अपेक्षा आहे.

श्री. अविनाश कुमावत : खाजगीकरणाचे गेल्यावर्षी ५८ कोटीचे टेंडर भरुन आले होते, याचा अर्थ जकातीत ५८ कोटी खाजगी व्यक्ती वसुल करु शकतो. तर महानगरपालिकेने का केले नाही. ५८ ऐवजी ५० कोटी वसुल होते. आतापर्यंत ४९ कोटी वसुली झाली आहे. अशी माहिती आहे, ही जी तुट

आली, का झाली याचा सुध्दा खुलासा द्यावा. मालमत्ता करामध्ये १३ कोटीची तुट दाखविली, २० x ३० च्या प्लॉट धारकांकडून ६,०००/- रु. दोन तीन हप्त्यात घेऊन अधिकृत करण्याचा निर्णय घेऊन १ वर्ष होत आहे. लोक रकमा भरण्यास तयार असतांना कार्यवाही होत नाही. अनाधिकृत वस्त्यात ३ वर्षापासून कामे होत नाही. २०० कर्मचाऱ्यांचे निमित्त पुढे करुन वसुली केली जात नाही. झोन वाईज, वार्ड वाईज इतर कर्मचारी देऊन वसुली होऊ शकते. प्रशानाचे उत्तम गोलमोल आहे.

सौ. साधना सुरडकर : यावरुन असा निष्कर्ष निघतो की, जकातीचे खाजगीकरण होईल त्यानंतरच तेथील २०० कर्मचारी वसुलीला मिळतील तरच वसुली टारगेट नुसार होईल. असा अर्थ गृहीत धरायचा, याचा अर्थ यावर्षीही खाजगीकरण झाले नाही तर, मालमत्ता व पाणीपट्टीचे उद्दीष्ट पूर्ण होणार नाही. असेच म्हणावे लागेल ही सर्व कार्यवाही नुसती कागदोपत्रीच चालणार का?

श्री. डॉ. भागवत कराड : आताच खुलासा केला जकात खाजगीकरण झाले नाही म्हणून तेथील कर्मचारी वसुलीसाठी देऊ शकलो नाही म्हणून वसुली झाली नाही व ३५ कोटीची तुट दाखविली. परंतु काही उपाययोजना प्रशासनाने वसुलीच्या बाबतीत करावयास पाहिजे त्या केलेल्या नाहीत. गेल्या बजेटच्या बैठकीत जे निर्णय घेतले होते, त्यापैकी एकही निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाने केलेली नाही. बोल्ट पध्दतीने काही निर्णय घेतलेले होते, त्याची अंमलबजावणी केलेली नाही. तसेच १०० कमानी उभारण्यास परवानगी दिली. उत्पन्न मिळाले असते. ती सुध्दा कार्यवाही झालेली नाही. तसेच महानगरपालिकेच्या मालकीचे बरेच व्यापार संकुल आहे ते करार पध्दतीने दिले असते तर उत्पन्न प्राप्त झाले असते, ती सुध्दा कार्यवाही केलेली नाही. वर्कवाईज बजेट केल्यामुळे सभापती यांचे अभिनंदन केले. परंतु प्रशासनाने सुध्दा एकत्रीत येऊन विचार विनिमय करुन वर्कवाईज बजेट ठेवल्या बद्दल प्रशासनाने प्रतिनिधी म्हणून आयुक्त यांचे सुध्दा अभिनंदन करण्याची गरज आहे. वसुलीचे काम चांगल्या प्रकारे झाले तर, उद्दीष्ट पूर्ण होऊ शकेल. जकात विषयावर सविस्तर चर्चा करावी.

**१) जकात**

मा. महापौर : जकात विषयावर संबंधित अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा. ३१ मार्च पर्यंत किती टारगेट पुर्ण होऊ शकेल.

जकात अधिक्षक : गेल्यावर्षी जकातीचे ६१ कोटीचे टारगेट निश्चित करण्यात आलेले होते. २००१-२००२ मध्ये प्रत्यक्षात वसुली ४७.७५ कोटीची वसुली झालेली आहे. खाजगीकरणाचे टेंडर देतांना एकूण वसुली ५० कोटीची गृहीत धरलेली होती. याचा अर्थ २.२५ कोटी येथे वाढलेले आहे व ५० कोटीवर २०% वाढ व १ कोटी कर्मचाऱ्यांचा खर्च असे सामाविष्ट करुन ६१ कोटीचे टारगेट निश्चित केलेले होते. ३१ मार्च पर्यंत ५१ कोटी रुपये होईल अशी शाश्वती आहे. आजपर्यंत ४९.७९ कोटी वसुली झालेली आहे, आणखी दोन दिवस बाकी आहे. सन २०००-२००१ च्या वर्षात शेवटच्या काही दिवसात खाजगीकरण होणार म्हणून वसुली १३.०८ लक्ष पर्यंत होती. ३१ मार्च व त्यानंतर जी वसुली होईल ती १६.७० लक्ष प्रति दिवशी वसुली होईल असे गृहीत धरण्यात आले होते, जे ३.७० लक्ष प्रति दिवशी उत्पन्न वाढीचे लक्ष होते. ते साध्य झालेले नसल्याने तुट निर्माण झाली व ५१ कोटी पर्यंत वसुली

होईल अशी खात्री आहे. १५ ऑगस्ट २००१ रोजी मला या पदाचा पदाभार देण्यात आला. त्यावेळी फक्त २९ लक्षने पूढे होतो, त्यानंतर गेल्या ७ महिन्यामध्ये मी २ कोटी ९७ लक्ष रुपयांनी वाढ केलेली आहे आणि पुर्वीच्या ५ महिन्यात फक्त २९ लक्ष वाढ झालेली होती. मागील वर्षाचा आढावा घेतला तर, अमेरीकेवर झालेला हल्ला, तसेच मध्यतंरी रेतीची वाहतुक बंद होती. त्यामुळे इमारतीसाठी लागणारे सिमेंट, सळाई, प्लायवूड आयात झाले नाही. म्हणून जकात कमी होत गेली. मागील वर्षी सिमेंटचे दर १५०/- रु. होते. दिड महिन्यापासून सिमेंटचे दर ११०/- प्रति गोणी झालेली आहे, त्यामळे महानगरपालिकेस जकात पोटी २५ ते ३० हजार प्रतिदिन कमी येत आहे. तसेच गरवारे कंपनीचे दोन युनिट बंद झालेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेस १.०६ लक्ष रुपये कमी जकात येत आहे. ही परिस्थिती ३ महिने होती. त्याचप्रमाणे इंडियन हयुम पाईप, ही कंपनी सुध्दा बंद झालेली तसेच जागतिक मंदीमुळे वसुलीवर खूप परिणाम झालेला आहे. या संदर्भात सर्व पदाधिकारी, सदस्यांना सुध्दा माहिती दिलेली आहे. इतर महापालिकेचा विचार केला तर, नांदेड महानगरपालिका वगळता कोणत्याही महानगरपालिकेस जकातीच्या उत्पन्नात वाढ झालेली नाही. उलट घट झालेली आहे, फक्त नांदेड महानगरपालिकेस २०% वाढ मिळाली कारण त्यांनी १ एप्रिल पासनू दरवाढ केलेली आहे. पुणे, ठाणे, पिपंरी, चिचंवड या महानगरपालिका ४% वसुलीत मागे आहे. मागील आपण ७% मी पुढे आहोत.

मा. महापौर : मागील वर्षाचा तुलनेत आपण किती पुढे आहोत.

श्री. डॉ. भागवत कराड : आपण जकातीत मागे आहोत, सन ९८ मध्ये ४० कोटी, ९९-२००० मध्ये ४४ कोटी, २०००-२००१ मध्ये ४८ कोटी, २००१-२००२ मध्ये ५१ कोटी होणार आहे. प्रमाणकानुसार जे नैसर्गिक वाढी प्रमाणे वसुलीचे उद्दीष्ट पूर्ण झालेले नाही. प्रत्येक वर्षी ४ कोटीची वाढ होते, या वेळेस ३ कोटी होईल. केवळ रेती आली नाही व जकात कमी आलेली आहे. असे उत्तर देणे बरोबर नाही. मागील वर्षी सुध्दा ट्रान्सपोर्ट गाडया बंद होत्या. दरवर्षी काहीनां काही कारण असते. म्हणून इतर कारणे देऊन उत्तर देणे योग्य नाही.

श्री. सुरजितसिंग खुंगर : लाखो रुपयाचे केबल्स औरंगाबाद शहरात आलेले आहेत. बी. एस. एम. एल. चे सुध्दा केबल या शहरात घेतलेले आहे. रिलायन्सचे सुध्दा केबल आलेले आहे. किती केबलचे पैसे वसुल केले, संबंधित विभागाने ५ हजार टेलीफोन पुर्ण औरंगाबाद मध्ये दिलेले आहे. ५ हजार टेलीफोन इन्स्ट्रउमेंट (Instrument) रक्कम जमा झाली का? यामध्ये कोटयावधी रुपयाची तफावत आहे. जकातीमध्ये जातीने लक्ष देण्याची गजर आहे, उत्पन्न वाढवू शकते.

श्री. प्रकाश निकाळजे : मागील वर्षीच्या तुलनेत किती टक्के वाढ झाली.

जकात अधिक्षक : ७% वाढ झालेली आहे.

श्री. खुंगर सुरजितसिंग : नगर, कोल्हापूर मध्ये बी. एस. एम. एल. कंपनीच्या धारकांनी रक्कम भरलेली नाही. भारत संचार निगम हे पुर्वी शासनाचे होते, जेव्हा भारत सरकार निगम झाले तेव्हा पासून लोक भरीत नाही. महानगरपालिकेने पैसे वसुल केले का? ज्या कंपनीने त्यांचे पैसा वसुल

श्री. अंबादास दानवे : मागील वर्षाचे अर्थसंकल्पात ३१ मार्च पर्यंत ठरवून दिलेले टारगेट जे की, ५० कोटी पुर्ण केले नाही तर, उपआयुक्त व जकात अधिक्षक यांना निलंबित करणार असे तत्कालीन आयुक्तांनीच घोषित केले होते. वृत्तपत्रात तशा बातम्या आल्या परंतु पुढे काहीच कार्यवाही झाली नाही. २ महिन्यापुर्वी जकात चोरीच्या काही घटना घडल्या तसेच आताच स. स. श्री. खुंगर यांनी चोरीच्या संदर्भातच प्रश्न उपस्थित केला. त्या कंपनीचे नावच बंद केले तर, वसुल कसे करणार ही कार्यवाही जेव्हांच्या तेव्हाच व्यवयास पाहिजे. गेल्यावर्षी भूकंप झाला, ट्रान्सपोर्ट वाल्यांनी संप केला. यावर्षी मंदी झाली रेती आली नाही, सिमेंटचे भाव कमी झाले असे उत्तर देणे बरोबर नाही. जे सुधारित मध्ये ५२.५० कोटी निश्चित केले ते टारगेट पुर्ण झालेच पाहिजे नसता, संबंधित अधिकारी यांना जबाबदार धरावे.

श्री. सुदाम सोनवणे : सुधारित मध्ये ५२.५० कोटी उद्दीष्ट ठेवलेले आहे. आतापर्यंत ४९.७९ कोटी वसुल झाले. २ दिवसात पुर्ण होईल का? सिमेंटचे भाव कमी झाले त्यामुळे जकात कमी येते हे उत्तर संयुक्तीक नाही, कारण त्यापासून फारशे उत्पन्न येत नाही. तात्कालीन आयुक्त श्री. भोगे हे सन ९५ मध्ये येथे होते, तेव्हा १५-१६ लक्ष वसुली दररोजची येत असे. त्यांना जाऊन ७ ते ८ वर्ष झ ााले. तेव्हा पासून वसुलीत वाढ झाली नाही. एक खाजगी व्यक्ती ६१ कोटीची वसुली करुन देऊ शकतो, असे निकष लावले जाते. तर महानगरपालिकेच्या मार्फत का एवढे वसुल होत नाही. खाजगीकरण झाले नाही तर, विकास कामे होऊ शकली नाही, त्यासाठी खाजगीकरण करण्याचा प्रयत्न असावा. या उद्दीष्टानुसार वसुली करावी. आताच मोबाईलचा प्रश्न उपस्थित झाला. शहरामध्ये बीपीएल कंपीनचे मोबाईल आहे. त्यांचेकडून किती रक्कम महानगरपालिकेने वसुल केले. ज्या ज्या लहान माध्मातून उत्पन्न येण्यावर दुर्लक्ष केले जाते.

श्री. काशीनाथ कोकाटे : आताच खुलासा केला की, पदभार दिल्यापासून ३ ते ४ कोटीची वाढ झाली. गेल्या वेळेस ५० कोटीचे टारगेट होते, दरवर्षी वाळु सिमेंट व लोखंड यापासून उत्पन्न मिळते, त्याची वाढ तेव्हा दाखविली नाही. गेल्यावर्षी फक्त रेती आली नाही. म्हणून वसुली कमी झाली असे म्हणता येणार नाही. अधिकारी आपली बाजू सरस ठेवण्याचा विचार करतात. जी ३८ कोटीची तुट निर्माण झाली. त्यामुळे शहरातील जनतेला सुविधा देऊ शकलो नाही. जे सहकार्य प्रशासनाला लागेल ते लोकप्रतिनिधी यांचे मार्फत मिळेल परंतु जे टारगेट ठरऊन दिले ते पुर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न असावेत. जकात वसुलल्या संदर्भात चर्चा करतांना लेखाधिकाऱ्यांचा खुलासा घेणे योग्य नाही. या अर्थसंकल्पात मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसुलीचे खाजगीकरणा मार्फत वसुल करण्याचा सभागृहाने निर्णय दिला, परंतु जकातीचे खाजगीकरण करण्याबाबत स्थायी समितीने निर्णय का घेतला नाही. याचा खुलासा व्हावा. जी कार्यवाही योग्य रितीने प्रशासन हाताळू शकते, त्या बाबतीत स्थायी समितीने निर्णय घेतला व जकात खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला नाही. या सर्व बाबीवर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा.

जकात अधिक्षक : मागील वर्षीच्या तुलनेत ७% वाढ झालेली असून, ३.२३ कोटी रुपये जास्तीचे आलेले आहे.

मा. महापौर : या विभागात कर्मचारी अपुरा आहे का? शहरात किती कंपन्याचे मोबाईल आलेले आहेत.

जकात अधिक्षक : कर्मचारी आहे उलट ४ कर्मचारी या विभागातील काढून घेतले त्यांचे जागेवर कर्मचारी दिलेच नाही. ३ मोबाईल कंपनीकडून ३ लक्ष ३७ हजार वसुल केलेले आहे. बीपीएल कार्ड पासून ८८ हजार वसुल केले. हँडसेटवर १००% मिळाली.

मा. महापौर : जकात वाढविण्याच्या दृष्टीने मोबाईलच्या संदर्भात चौकशी करण्यासाठी मा. आयुक्त यांना सूचना दिल्या होत्या व एक पथक तयार करुन तपासणी करावी. परंतु कार्यवाही झालेली नाही.

श्री. जगदीश सिध्द : स्थायी समितीच्या बैठकीत जकात अधिक्षक यांनी कर्मचारी वर्ग कमी आहे, असे उत्तर दिले होते. जकात विभागास कर्मचारी कमी नाही. आता असे उत्तर देतात, असे का?

जकात अधिक्षक : त्यावेळी ३ निरक्षक कमी होते, गोंविदराव निलंबीत होते, स्थायी समितीच्या सभेनंतर मला १० कर्मचारी दिले आहे. त्यात जकात निरिक्षक, लिपीक ई. दिल्याने वाढ झाली आहे.

श्री. डॉ. भागवत कराड : प्रत्येक वर्षी ४ कोटीने वसुलीत वाढ झाली, यावर्षी ३ कोटी होत आहे. रेती येत नाही म्हणून, जकात कमी असे उत्तर देणे बरोबर नाही. गेल्या वेळेस भूकंप झाला प्रत्येक वर्षी काहींना काही घटना घडतात. परंतु नैसर्गिक जी वाढ सुचवितो. ती वसुली व्हावयास पाहिजे.

जकात अधिक्षक : रेती येत नाही म्हणून लोखंड, सिमेंटचा वापर होत नाही व बांधकाम होत नाही, म्हणून आपण कमी होते व त्याचा परिणाम रेती, सिमेंट, लोखंड याची आवक कमी येते व जकात उत्पन्न कमी होते. जवळपास ३ महिने रेती आणण्यात बंदी होती.

श्री. काशीनाथ कोकाटे : बऱ्याचदा मालाची वाढवी मागणी होते. एखादया वस्तू आयात झ ाली नाही. म्हणून जकात कमी आली. असे मानता येणार नाही.

मा. महापौर : आपण चार्ज घेतला २९ लाखाहून वाढ झाली. अय्युबखाननीं चार्ज घेतला १६ ऑगस्टला एप्रिल ते जुलै ५ महिने कमी का झाली. जकातीत मोठया प्रमाणात तुट निर्माण झालेली त्याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : मागील वर्षी उद्दीष्ट पुर्ण झाले नाही. महानगरपालिक प्रशासन उद्दीष्ट पुर्ण करु शकले नाही. ही वस्तूस्थिती आहे. मागील आयुक्तांनी बजेट ठेवले त्यावर टिका करणे योग्य नाही. तुट का निर्माण झाली असा प्रश्न उपस्थित झालेला आहे. परंतु कलम ९६ नुसार स्थायी समितीने अर्थसंकल्प सादर केला त्यास सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली. अर्थसंकल्पात ज्या त्रृटया होत्या त्याही सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेल्या होत्या. प्रत्येक वर्षी नैसर्गिक वाढ विचारात घेऊनच अर्थसंकल्प तयार केला जाते. त्यामुळे पुर्वीच्या आयुक्तांच्या काळात अमुक वसुली होत होती असे म्हणणे बरोबर होणार नाही. गेल्या जुलै मध्ये मी या महानगरपालिकेत रुजु झालो तेव्हा प्रथम जकात वसुलीच्या संदर्भात माहिती घेतली. जकात अधिक्षक यांनी जे मुद्दे मांडले ते बरोबर आहे. इतर महानगरपालिकेच्या तुलनेत आपल्या महानगरपालिकेची जकातीची वसुलीचे प्रमाणे वाढलेले आहेत. कमी झालेले नाही. त्यामुळे काही कर्मचारी / अधिकारी यांचा सत्कार सुध्दा केलेला आहे. जकातीचे खाजगीकरण होईल. या उद्देशाने ६१ कोटीचे उद्दीष्टे होते. मागील

वर्षीची वसुली व त्यावर १०% नैसर्गिक वाढ विचारात घेऊनच सुधारीत मध्ये ५२.५० कोटी केलेले आहे. एमबीसेस ठेवलेले आहे. तसेच नियमाने काही वस्तुचे जकातीचे दर वाढवावयास पाहिजे होते. ती कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सुध्दा जकातीची घट आहे. इतर महानगरपालिकेपेक्षा त्या वस्तूचे जकातीचे दर कमी आहे. नियमाने वाढ करावयास पाहिजे. तसेच दुसरा मुद्दा खाजगीकरणाचा आहे. एका वर्षासाठी खाजगीकरण करुन बघावे. याबाबत आपण गांभीर्यापुर्वक विचार करावा आणि अधिकारी / कर्मचारी यांवर टिका करणे बरोबर आहे. वाईटाला वाईट बोलले पाहिजे. ३.२५ कोटीची दरवर्षी वाढ होत आहे.

श्री. सुदाम सोनवणे : ज्या कर्मचाऱ्यांनी जकातीत वाढ केली त्यांचे तर अभिनंदन करणे योग्य आहे. मागील वर्षी ४८ कोटी वसुल झाले त्यानुसार यावर्षी ५२.५० कोटीचे टारगेट ठरवून दिले आतापर्यंत ४९.७९ कोटी वसुल झाले. ५२ कोटी पुर्ण होईल असे गृहीत धरले तरी वाढ झाली असे म्हणता येणार नाही. कारण जी नैसर्गिक वाढ १०% आहे ते मिळूनच ५२.५० कोटीचे टारगेट ठेवले आहे. ज्या अधिकारी यांनी चार्ज घेतला तेव्हा पासून जकातीत वाढ झ ाली त्या अगोदरचा अधिकाऱ्यांनी का वसुली केली नाही. गेल्या वर्षीचे टारगेट का पुर्ण झाले नाही. गेल्या वर्षी प्रमाणेच वसुली झाली नाही. म्हणून अधिकाऱ्यांवर कार्यवाही करायची किंवा नाही असा प्रश्न उपस्थित झाली. जे अधिकारी / कर्मचारी जकात विभागत आहे, त्यांचेवर कार्यवाही न करता जे जकात विभागाचे विभाग प्रमुख उपआयुक्त किंवा आयुक्त यांना जबाबदार धरावे. त्यांचेवर कार्यवाही व्हावी. अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो. भोगे साहेब आयुक्त होते. तेव्हा दररोज १५-१६ लक्ष उत्पन्न येत होते. आताच खुलासा केला कि १३ लक्ष रोजचे वसुल होतात. सन ९५-२००२ पर्यंत ७ वर्षात जकात वाढण्या ऐवजी उलट ३ लक्ष दररोजी घट झाली हे बरोबर नाही. उपआयुक्त यांचीही जबाबदारी आहे. त्यांनी लक्ष ठेवले पाहिजे. आताच वृत्तपत्रात बातमी होती, बिटको कंपीनाला आग, या बिटको कंपनीच्या गोडाऊनला आग लागल्यानंतर १५ कोटीचा माल होता व तो ३ दिवसाचा होता असे स्पष्टीकरण वृत्तपत्रात आले. तीन दिवसाचा माल १५ कोटीचा असून शकतो. तर या महानगरपालिकेच्या बाहेर पुष्कळ कंपन्या असून, त्यांच्या गोडवून मध्ये किती माल असेल व शहरात किती तरी येत असेल याची चौकशी करणे गरजेचे आहे. म्हणून आताच मा. आयुक्त यांनी सांगितल्यानुसार जकातीचे खाजगीकरण झाले पाहिजे. याबाबतीत सभागृहाने ठराव पास केलेला प्रशासनाने कार्यवाही करावी. प्रशासनाने निर्णय घ्यावा. ज्याचा विरोध असेल तो नोंदवावा. या शहरातील जनतेची कामे करु शकत नाही त्याचा रोष या सभागृहावर येईल. म्हणून प्रशासनाने खाजगीकरणाचा निर्णय घ्यावा व शहराच्या बाहेर किती गोडाऊन आहे हे समजू शकेल व कार्यवाही करतांना लहान अधिकाऱ्यांवर कार्यवाही होऊ नये, विभाग प्रमुखांवर कार्यवाही व्हावी असे माझे मत आहे.

सौ. चंद्रात्रे सुवर्णा : सभागृहाने खाजगीकरणाचा निर्णय घेतला. आयुक्त सुध्दा सांगतात, खाजगीकरण करावे हे स्पष्टीकरण कोणी घ्यायचे असा प्रश्न आहे. कार्यवाही होत का नाही.

मा. महापौर : गेल्यावर्षी ६१ कोटीचे उद्दीष्ट ठेवले सुधारित मध्यें ५२.५० कोटी केले. नैसर्गिक वाढ म्हणून ३ ते ४ कोटी रुपये उद्दीष्ट वाढत गेले. यावर्षी एकदम ६१ कोटी कोणता निकष लाऊन ठेवले पुन्हा कमी करणार आहे का? उद्दीष्ट पुर्ण केले नाही. तर पगार वगैरे कपात होणार नाही, परंतु विकास कामे करण्यास अडचणीचे होते. याची जाणीव प्रशासनाने ठेवावी. जे कर भरतात त्यांना सुविधा दिल्या जाणार नाही. असाच अर्थ घ्यावा लागेल. १० कोटी कमी वसुल झाले तर कोण जबाबदार आहे.

सौ.साधना सुरडकर : आताच मा. आयुक्तांनी खुलासा केला ॲबीशिअम ठेवलेले आहे. ते असावे, त्यासी दुमत नाही. परंतु त्यात १ ते २% पर्यंत तफावत असावी. नोर ॲबीशियस नसावे. त्यामुळे सर्व अंदाज चुकतात म्हणून विकास कामे होत नाही. नागरिक नगरसेवकांना जबाबदार धरतात, प्रशासनाला नाही. फक्त १८ कोटीची कामे करण्यासाठी ९० कोटी प्रशासनाच्या खर्च होणार आहे. ७५% खर्च होतो. पांढरा हत्ती पोसल्यासारखे होईल. म्हणून अल्प खर्च विकास कामासाठी न होता जनतेच्या पैसा जास्तीत जास्त विकास कामासाठी खर्च करावा, नसता जनता कर भरणार नाही व काही दिवसांनी महानगरपालिकेस कुलूप लावण्याची वेळ येऊ नये. जनतेचा पैसा प्रशासनावर जास्त खर्च होऊ नये व विकास कामे व्हावी. अशी अपेक्षा आहे.

श्री. डॉ. भागवत कराड : खऱ्या अर्थाने २०-२५ कोटीची कामे करणार आहोत. त्यामध्ये मागील राहीलेली कामे व अर्थसंकल्पात येणारी घट याचा विचार केल्यास साधारण १२ ते १५ कोटीची विकास कामे होणार आहे. गेल्यावेळेस ६१ कोटीचे टारगेट ठेवले होते, यावर्षी ६२ कोटी तेव्हा खाजगीकरणाची प्रक्रिया चालू होती. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने खाजगीकरणाचा निर्णय घेतला होता व निविदा सुध्दा काढलेल्या होत्या. जे टारगेट ठेवले त्याप्रमाणे प्रयत्न आता होणार आहे का? की खाजगीकरणा बाबत निर्णय घ्यायचा या संदर्भात प्रयत्न व्हावे असे मत आहे.

श्री. पांडूरंग तायडे : प्रत्येक वेळेस जकातीच्या वसुली संदर्भात चर्चा होते. जेव्हा पासून मी सदस्य झाले, तेव्हा पासून जकातीचे खाजगीकरण करायचे हा विषय चालू आहे. तत्कालीन महापौर डॉ. कराड यांनी ठराव पास केला. नंतर व्यापाऱ्यांच्या विरोधाला बळी पडून निर्णय झाला नाही. टेंडर काढून कार्यवाही केली गेली नाही. त्यासाठी तात्काळ निर्णय घ्यावा. याचा ठराव घ्यावा. व्यापाऱ्यांच्या विरोधाला बळी पडून निर्णय झाला नाही. टेंडर काढून कार्यवाही केली गेली नाही. त्यासाठी तात्काळ निर्णय घ्यावा. याचा ठराव घ्यावा व्यापाऱ्यांच्या विरोधाला बळी पडू नये.

मा. महापौर : मागील (महिन्यामध्ये ३ कोटी जकातीत वाढ झाली आहे ८ महिन्याच्या पुर्वी मागील ४-५ महिन्यात त्या मागील वर्षाच्या तुलनेत २९ लक्षने वाढ होती. त्यानंतर दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे चार्ज दिल्यानंतर जकात वाढ होते, त्यासाठी पुर्वीच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे. मालमत्ता तसेच पाणीपट्टी वसुलीवर चर्चा करायची आहे. सर्वांवर चर्चा करु एकदम रूलींग देण्यात येईल. प्रशासनाने वसुली संदर्भात दर तीन महिन्यांनी बैठक घ्यावी. अशी सूचना प्रशासनाला देण्यात येत आहे.

श्री. अंबादास दानवे : मा. आयुक्त यांनी खुलासा केला की, इतर महानगरपालिका व या महानगरपालिकेमध्ये जकात अधिकारी मध्ये तफावत आहे. तसेच रेती बंद

झाली म्हणून सिमेंट, लोखंडचा वापर झाला नाही. म्हणून माल आला नाही व जकात कमी कमी आली असे उत्तर ही जकात अधिक्षक यांनी दिले. त्याचा अनुषंगाने शहरात वाढणाऱ्या नविन एजन्सीज झालेल्या आह. कॉम्प्युटर, सॉप्टवेअर आणि हार्डवेअरच्या भरपूर सेल झालेल्या आहे. परंतु जो जकता आकरला जातो. तो अत्यंत कमी प्रमाणात आहे. ४% जकात आकरली होते आणि व्यापाऱ्यांना ५ ते ६% नफा आहे. हा जकात जास्तीत जास्त १%, २% वाढ करण्याची आवश्यकता जेणे करुन जकातीच्या प्रमाणात वाढ होईल. वस्तुवर जे जकात आकरणी होते, त्यांचे पुर्नरचना होण्याची आवश्यकता आहे. तसे आदेश प्रशासनाला द्यावे. फेरआढावा घेतल्यास निश्चितच जकातीमध्ये वाढ होईल. फॉर्म बी याला मान्यता मिळालेली आहे, कित्येक माल वाळुजहून चिकलठाणा कंपीनमध्ये येतो. प्रोजेस होऊन पुन्हा वाळुजला जातो. त्यासाठी फॉर्म बी ही पध्दत काढलेली त्यास शासनाचा जी. आर. सुध्दा आलेला असून मान्यता होऊन अद्याप कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे जकातीच्या प्रमाणात वाढ होऊ शकेल.

श्री. काशीनाथ कोकाटे : फॉर्म बीच्या संदर्भात या सभागृहाने निर्णय घेतलेला आहे, तसेच शासनाचा सुध्दा जी. आर. आलेला आहे. अंमलबजावणी करण्यास प्रशासनाला काय अडचण आहे, खुलासा घ्यावा.

मा. महापौर : आताच स. स. श्री. दानवे यांनी सुचविल्यानुसार वस्तुवर नविन जकातीचे दर कसे लावायचे याबाबत सर्व पदाधिकारी, मा. आयुक्त यांचे समवेत एक बैठक लवकरच आयोजित करण्यात येईल. सदर दर स्थायी समिती समोर जातील नंतर सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस येतील. १. एप्रिल पासून मोबाईल फोन असेल सीम कार्ड असेल याबाबतीत तपासणी करुन संबंधितांकडून जकात वसूल करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच महापौरांच्या अध्यक्षतेसाठी एक स्कॉड करावे, जे की, ज्या बातम्या माहित होतात जेणे करुन ताबडतोब रोड करुन जकात वसुल करु शकतो. तसेच जे उद्दीष्टांची दर तीन महिन्याला किती वसुली होते याचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करु व जकात प्रमाणाकानुसार येते, किंवा काय याबाबतीत चर्चा केली जाईल रिव्हयु घेण्यात येईल. जे अधिकारी / कर्मचारी उद्दीष्ट पुर्ण करण्यास कमी पडेल, त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल. सभा ३० मिनिटासाठी तहकुब करण्यात येत आहे. (वेळ दुपारी २.३० वाजता सभेला पुन्हा सुरुवात ३.३५ वाजता.)

उत्पन्न बाजू :

**२) मालमत्ता कर वसुली :**

श्री. जयवंत ओक : जकात वसुलीवर सविस्तर चर्चा झालेली असून, आता मालमत्ता कर वसुलीवर चर्चा करावी.

श्री. अंबादास दानवे : सन २००१-२००२ साठी मालमत्ता करचे उद्दीष्ट २४ कोटीचे ठेवण्यात आलेले होते. सुधारीत मध्ये ११ मध्ये करण्यात आलेले आहे. यावर्षी १५ कोटीचे उद्दीष्ट निश्चित करीत आहोत. म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेस १३ कोटी रुपये उद्दीष्ट कमी ठेवण्यात येत आहे. याचा अर्थ ११ कोटीचे उद्दीष्ट म्हणजेच ४४% वसुल झालेली आहे. जो टेबल पुस्तकामध्ये दिलेले आहे. त्यानुसार मागील वर्षापर्यंत थकबाकी ही ३६.३५ कोटी दिलेली आहे आणि चालू मागणी १२.८९ कोटीची आहे. या दोन्हीची बेरीज केली असता ४९.२४

कोटी ही चालू आर्थिक वर्षा पर्यंत मालमत्ता कराची मागणी होईल. यातून सिडको मालमत्तेचे १२.८५ कोटी कमी केले तर ३६.३९ कोटी रुपये एकूण मागणी आहे. थकबाकीसह एवढी मागणी असतांना उद्दीष्ट फक्त १५ कोटीचेच का ठेवण्यात येते. म्हणजेच एकूण मागणीच्या ४१.२२% उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे. मागील वसुली पाहता ४४% वसुलीच वसुली झालेली आहे. मागील वसुली का झालेली नाही. या संदर्भात जकात विभागावर आताच चर्चा झाली. तीच परिस्थिती मालमत्ता कराची असून, सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : एकूण १५ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले असून, थकबाकी आहे. त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. कारण बऱ्याच केसेस न्याय प्रविष्ठ आहेत. अशी प्रकरणे झोनवाईज निकाली काढून कार्यवाही करण्याची गरज आहे. महानगरपालिकेची वादातील प्रकरणे निकाली काढण्यासाठी खास न्यायालयाची स्थापना करण्याबाबतचा निर्णय घेतलेला असून, जी प्रकरणे प्रलंबित आहे. ती तात्काळ निकाली काढण्याच्या दृष्टीने न्यायालय सुरु करण्याची अत्यंत आवश्यकत आहे. या माध्यमातून मनपास मोठया प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल. तसेच शहरामध्ये जे नविन बांधकाम पुर्ण झाल्या नंतर लगेच मालमत्ता कर लावण्याची आवश्यकता आहे. जेणे करुन मनपाचे उत्पन्न वाढेल. जकात विभागातील २०० कर्मचारी येतील व अशी अपेक्षा धरुन वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण झालेले नसल्याचे प्रत्येक ठिकाणी प्रशासनाने बजेट मध्ये नमुद केलेले दिसते. परंतु सदर कर्मचारी येतीलच अशी खात्री नाही. त्यासाठी काही झोनची खाजगी तत्वार वसुली प्रायोगिक तत्वावर करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच ज्या ज्या भागात मोठमोठया इमारती झालेल्या असून, अशा इमारतींना चौकशी करुन कर लावण्याची गजर आहे. तसेच शहरामध्ये दुकाने किंवा व्यापार संकुले मोठया प्रमाणात बांधलेले असून, ते चालू करुन उत्पन्न वाढविता येईल. ज्या बिल्डरांना परवानगी देतांनाच १/४ वाटा मनपास देण्यासंबंधी इमारती बांधलेल्या आहे. त्या मनपाने ताब्यात घेऊन तात्काळ त्या दुकानाचा/इमारतीचा लिलाव करुन उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करावा. तसेच बोल्ट पध्दतीने व्यापार संकुल तयार करण्याचा निर्णय या सभागृहाने घेतलेला आहे. त्याची सुध्दा तात्काळ कार्यवाही होऊन मालमत्ता कराचे उत्पन्न वाढविण्यास मदत होईल.

मा. महापौर : मालमत्ता कराची वसुली का कमी झालेली आहे उद्दीष्ट पुर्ण झालेले नाही. प्रशासनाने खुलासा करावा.

मा. उप आयुक्त (महसुल) : सन २००१-२००२ या वर्षासाठी मालमत्ता कराचे २४ कोटी तसेच पाणी पट्टीचे १५ कोटीचे वसुलीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले होते. हे उद्दीष्ट ठेवत असतांना जकातीचे खाजगीकरण होईल व तेथील २०० कर्मचारी वर्ग मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसुलीसाठी येतील हे गृहीत धरुन उद्दीष्ट ठेवण्यात आलेले होते, तसेच सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण होईल व तेथील मालमत्ता कराचे २४ कोटीचे उद्दीष्टे ठेवण्यात आलेले होते. खाजगीकरण न झाल्यामुळे एकूण मालमत्ता १.१० लक्ष असून, नविन १३ हजार प्रॉपर्टीज झालेल्या आहेत. २-३ महिन्यात वसुली करण्यासाठी ८ झोन मध्ये विभागणी केली. कर निरिक्षक २-३ पेक्षा जास्त नाहीत. कर्मचारी संख्या कमी आहे. आज २२५ पदे रिक्त आहेत, भरती

करता येत नाही. त्याचा परिणाम वसुलीवर होतो. वसुलीसाठी इतर कर्मचाऱ्यांना प्रत्येकी २० मिळकती देवून पाठपुरावा करुन कर वसुलीसाठी उक्त करावे असे आदेश दिले. २ महिने झाले नंतर यशस्वी झाले नाही. प्रत्येक सोमवारी साप्ताहिक आढावा घेण्यात येवून पाठपुरावा केला व कर निरिक्षक निहाय आढावा घेण्यात आला. त्यामुळे सुधारित अर्थसंकल्पात मालमत्ता कराचे २४ कोटी वरुन ११ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले होते. तसेच पाणीपट्टीचे उद्दीष्टे ८ कोटी करण्यात आलेले असून त्याउलट म्हणजे जवळपास ९ कोटी पर्यंत पाणीपट्टी वसुली झालेली आहे. आता यापुढे वसुलीच्या संदर्भात प्रत्येक आठवडयास बैठक आयोजित करुन जे अधिकारी / कर्मचारी वसुली मध्ये कमी पडतील त्यांचेवर कार्यवाही सुध्दा करण्यात येईल तसे पत्र ही वसुली करणारे कर्मचारी यांना देण्यात आलेले आहे. पाणीपट्टीच्या बाबतीत जे पाणीपट्टी भरणार नाही. त्यांचे नळ कनेक्शन तोडण्याची कार्यवाही सुरु केलेली असून २५ हजार थकबाकीदार यांची यादी तयार करुन वसुलीचे काम सुरु केलेले आहे. वसुली करतांना बऱ्याच नागरिकांचा विरोध होत गेला, काही वेळा आपल्या कर्मचाऱ्यांना लोकांनी धक्काबुक्की केली. जवळपास ३०२३ नळ कनेक्शन कट करण्यात आलेले आहे व ८०४ जप्ती करण्यात आली, यामुळे वसुलीचे प्रमाण वाढत आहे. आता या अर्थसंकल्पात ज्यांचेकडे थकबाकीची रक्कम आहे. अशा कर धारकांचे थकीत रक्कमेवर व्याज आकारणीच्या प्रस्ताव ठेवलेला आहे. त्यामुळे लोक स्वत:हून कर भरणा करतील अशी अपेक्षा आहे. जोपर्यंत दंडात्मक कार्यवाही होत नाही. तो पर्यंत लोक थकीत रक्कम भरणार नाही असे चित्र सध्या आहे जे लोक वेळेवर कर भरतील त्यांचेसाठी सवलत देण्याचे सुध्दा नमुद केलेले आहे. ज्या केससेचा वाद आहे. अशा प्रकरणांच्या बाबतीत झोनवाईज लोक न्यायालय भरवून प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही करणार आहोत. एप्रिल, मे, जून, थकबाकीदारांची वसुली मोहिम चालू ठेवण्यात येईल. त्यात जंगम मालमत्ता जप्ती, स्थावर मालमत्ता जप्ती व पी. आर. कार्डवर मनपा चे नांवे लागेल.

श्री. अंबादास दानवे : झानेवाईज मालमत्ता कराची वसुली किती याचा खुलासा करावा.

मा. उप. आयुक्त (महसुल) : झानेवाईज वसुली खालील प्रमाणे झालेली आहे.

| झोन क्र. | निव्वळ मागणी (कोटीमध्ये) | उद्दीष्ट (कोटीमध्ये) | वसुली (कोटीमध्ये) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | ३.३८ | १.२० | ०.९८९ | ८२% |
| २. | ४.४८ | २.०० | १.५५ | ७८% |
| ३. | २.०१ | १.०० | ०.८४५ | ८५% |
| ४. | ९.३३ | ३.३० | ३.६० | १०९% |
| ५. | २.६९ | १.०० | १.२१६ | १३१% |
| ६. | ४.७९ | १.८० | १.४५७ | ८१% |
| ७. | सिडको | -- | -- | -- |
| ८. | १.४४ | ०.७० | ०.६२३ | ८९% |

मा. महापौर : सन १९८८ पासून मालमत्तांचे रिव्हीजनची कामे केलेले नाही. नियमानेदर ४ वर्षांनी करावे लागते. ते का केले नाही.

श्री. अंबादास दानवे : महानगरपालिकेने जसे घर तसा कर असे धोरण स्किारलेले आहे. मिळकती १,१०,००० पेक्षा प्रत्यक्षात जास्त आहे.

श्री. जयवंत ओक : शहरात मनपाच्या मालकीची बरीच व्यापारी संकुल आहेत. ते चालु करावे. तसेच ज्या जुन्या मालमत्ता आहे. त्याची सुधारणा करुन नविन दराने देण्यात यावे. महानगरपालिकेने बऱ्याच जागा ७५/२५/६०/८० या पध्दतीने विकास करण्यासाठी दिलेल्या आहे. त्यानुसार तेवढा हिस्सा मनपाने ताब्यात घेतलेला आहे का? अशा मिळकती ताब्यत घ्याव्यात त्या भाडयाने देऊन कार्यवाही करावी. शहरात ५२ झोपडपट्टया आहेत. एकूण ११४ अनाधिकृत वसाहती आहे. मालमत्ता कर लावावे. मनपास उत्पन्न मिळेल जनतेची सुध्दा कामे होतील तसेच मालमत्तेला क्रमांक द्यावे. संगणकीकरण करावे जेणे करुन जे कर भरणार नाही. ताबडतोब निदर्शनास येईल. एकूण १.१० लक्ष मालमत्ता दाखविण्यात येत आहे. माझ्या माहितीप्रमाणे खूप कमी संख्या मालमत्तेची दाखविण्यात आलेली आहे. यापेक्षा जास्त असू शकेल. १५ कोटी उद्दीष्ट निश्चित केले. अनाधिकृत वस्त्यांना अधिकृत करुन मालमत्ता कर लावल्यास आणि घरांना क्रमांक दिल्यास व सर्व कामकाज संगणीकरण केल्यास उत्पन्नात वाढ होऊन जवळपास २५ कोटी रुपये मालमत्ता कराचे वसुल होऊ शकतील तसेच न्यायालयात जी जी प्रकरणे प्रलंबित आहे ती निकाली काढण्याची तात्काळ कार्यवाही व्हावी. काही लोक कर भरण्यास तयार असतांना कार्यालयातील कर्मचारी / अधिकारी कर धारकांना प्रतिसाद देत नाही. असा प्रत्यक्ष अनुभव आलेला आहे. अशी परिस्थिती असेल तर, यात मनपाचे नुकसान होत आहे. वाटाघाटींचे जी प्रकरणे असतील ती सुध्दा ८ दिवसात निकाली काढावी.

मा. महापौर : स. सदस्यांना सुचनेचे स्वागत केले जाते.

श्री. लिलावती घायतिलक : मागील एका बैठकीत मालमत्ता वसुलीच्या संदर्भात मी सूचना केलेल्या होत्या की, माझ्या वार्डात बऱ्याच लोकांनी बाँडवर मालमत्ता विकत, ज्यांनी मालमत्ता विकत घेतली. त्यांचे नावांवर मालमत्ता कर नसल्याने लोक कर भरीत नाही. त्यामुळे मनपाचे नुकसान होते, या संदभ्रत कर वसुल करण्याची कार्यवाही व्हावी.

सौ. विजया रहाटकर : अनेक वर्षानंतर मालमत्ता कराची बरीच वसुली झाली त्या बद्दल अभिनंदन वृत्तपत्रता जाहिराती दिल्या, थकबाकी त्वरील भरावी. यासाठी बराच खर्च केला. ८०४ जप्त्या केल्या व वसुली केली, परंतु मोठया थकबाकीदारांकडे बघत नाही. त्यांचेसह तडजोड करुन १०-२० हजार भरुन घेवून परत केले. ज्यांच्याकडे ११ ते १२ लक्ष रुपये थकीत आहे. त्यांचे कडून घन स्वरुपात रक्कम न मिळाल्याने जवळपास २५ ते ५० लोकांच्या दोन चाकी वाहन जप्त करण्यात आले आहे. अशा लोकांना यामुळे उलट फायदा झालेला आहे. ज्यांच्याकडे लाखो रुपये थकित आहे व अशा लोकांच्या २०-२५ हजार किंमतीच्या गाडया घेऊन येणे याला काही अर्थ नाही. रोख स्वरुपात कर वसुल झाला पाहिजे व ज्या झोन मध्ये जास्तीत जास्त वसुली होते. अशा भागात तरी अशी कार्यवाही करणे योग्य नाही, तसेच ज्यांचेकडे नळपट्टी दोन वर्षाची थकीत होती त्यांचे नळ कनेक्शन

तोडण्यात आलेले आहे व ज्यांचेकडे कित्येक वर्षापासून नळपट्टी थकीत आहे. अशा लोकांना कोणता निकष लावून सुट देण्यात आलेली आहे.
माझ्या या माहिती प्रमाणे या वसुलीच्या संदर्भाने जी जाहिरात दिलेली होती. त्या जाहिरातीचा खर्च सुध्दा वसुलीच्या माध्यमातून जमा झालेला नसेल.

श्री. सुदाम सोनवणे : गेल्या वर्षी २४ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले होते. ३१-३-०२ पर्यंतची थकबाकी ३६.३५ कोटी दाखविण्यात आलेली असून, चालू मागणी १२.८९ आहे. एकूण ४८ कोटी होतात. १५ कोटीचे या वर्षाचे उद्दीष्ट ठेवण्यात आले. उर्वरित २८ कोटीची थकबाकी वसुल करणार नाही का? २४ कोटी वरुन १५ कोटीवर उद्दीष्ट का आपण्यात आले. प्रत्येक वेळी सभागृहात वसुलीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित होतात. कर्मचारी मिळाले नाही. म्हणून वसुली झाली नाही. असे नेहमीच उत्तर देण्यात यते. हे बरोबर नाही. वसुलीच्या संदर्भात वर्षाच्या सुरुवातीस कार्यवाही होत नाही व शेवटच्या दोन महिन्यामध्ये जनतेकडे पैसा नसतो. अडचणीत असतात. त्यामुळे वसुली म्हणावी तेवढी होत नाही. शहरात बऱ्याच लोकांना बांधकाम परवानगी दिलेली आहे. मोठमोठया इमारती उभ्या झालेल्या आहे. अशा इमारतींचे बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र त्या लोकांनी घेऊन गेलेले नसल्याने आजपर्यंत अशा ईमारतींना मालमत्ता कर लागलेला नाही, म्हणून फार मोठया प्रमाणात येणारे उत्पन्न मनपास येत नाही. बऱ्याच लोकांनी अनाधिकृतपणे घरे बांधलेली आहे. त्यांची नोंद मनपाकडे नाही. नोंद नसल्याने मालमत्ता कर लागलेला नाही. शहरात एकूण सिडको वगळता १.१० लक्ष मालमत्ता आहे. असा खुलासा केला. परंतु यापेक्षा जास्त मालमत्ता आहेत. नियमानुसार मा. आयुक्त हे अर्थसंकल्प स्थायी समिती समोर सादर करतात. त्यावर स्थायी समितीतील सर्व सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन एक मताने निर्णय घेऊन तो अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेकडे पाठवायचा असतो. आताच मालमत्तेच्या संदर्भात स. सदस्य, श्री. ओक यांनी चर्चा केली, ते स्थायी समिती मध्ये सदस्य आहे. त्यांनी त्याच वेळी चर्चा करणे आवश्यक होते. या सभागृहात चर्चा करणे योग्य नाही. असे माझे मत आहे. मालमत्ता कर वसुली संदर्भात या सभागृहात सविस्तर चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

सौ. साधना सुरडकर : गेल्या वेळेस २४ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले होते. या वर्षी फक्त १५ कोटीचे ठेवलेले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत एक वर्षात मालमत्तेची संख्या वाढलेली असेल असे असतांना सुध्दा कमी उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे. मागील वषी २४ कोटी कोणता निकष लावून उद्दीष्ट ठेवण्यात आलेले होते. सुधारित मध्ये ११ कोटी केले. एकूण वसुली फक्त ८ कोटी केलेली आहे. प्रत्येक वेळेस कर्मचारी वसुलीसाठी नाही. म्हणून कारण दाखवून विकासाच्या कामामध्ये खिळ घालतो आहे असे वाटते. जे कारण प्रशासन दाखविते या संदर्भात कायम स्वरुपी सबब ठेवून दर वेळेस आपण प्रशासनाची बाजू सावरण्याचा प्रयत्न होत असेल तर हे कारण कमी करावयास पाहिजे असे माझे मत आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : जे उद्दीष्ट मालमत्ता कराचे दिलेले होते ते साध्य झालेले नाही. पाणीपट्टी तसेच मालमत्ता कर वसुलीसाठी कर्मचारी कमी पडतो असे नमुद केलेले आहे. हे कारण पुढे करुन प्रत्येक बजेटच्या बैठकीत नुसती चर्चा होते. परंतु त्यानुसार अंमलबजावणी केली जात नाही. मला असे सुचवायचे

आहे की, ज्या झोनमध्ये अपेक्षेप्रमाणे वसुली झालेली असेल अशा झोन मधील कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करावे, परंतु ज्या झोनची वसुली ही उद्दीष्टापेक्षा कमी झालेली असेल अशा अधिकारी / कर्मचारी यांचेवर कार्य कार्यवाही करणार आहे. अशा कर्मचाऱ्यांचे / अधिकाऱ्यांचे एक वेतनवाढ थांबविली पाहिजे. असे माझे मत आहे. शहरात मोठमोठी बांधकामे होत असून, एकूण १.१६ लक्ष मालमत्तेची संख्या दाखविली आहे. ती अत्यंत कमी आहे. मालमत्ता वाढवायच्या असतील तर प्रायव्हेट एजन्सीजला सर्वेक्षणाचे काम दयावे. आणखी एवढयाचे मालमत्ता असू शकतात. त्याचप्रमाणे नळांची सुध्दा संख्या कमी दाखविण्यात आलेली आहे. प्रत्येक मालमत्तेला नंबर दयावे, जेणे करुन वसुली करण्यास सोपे होईल. नुसती चर्चा होते व अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे जनते मध्ये वेगवेगळया शंका निर्माण होतात.

डॉ. भागवत कराड : ज्या झोनने उद्दीष्ट पुर्ण केले अशा अधिकाऱ्यांचा सन्मान करुन एक वेतनवाढ देणे योग्य होईल, तसेच जे अधिकारी उद्दीष्ट पुर्ण करणार नाही. अशांचे एक वेतनवाढ बंद करावी. प्रत्येक वेळेस वसुली साठी कर्मचारी कमी पडतात असे दाखविले जाते, असे असेल तर काही झोनची वसुलीचे काम खाजगी अभिकर्त्या मार्फत प्रायोगिक तत्वावर पाणीपट्टी वसुली तसेच साफसफाईचे काम करता येईल का? तसा प्रस्ताव पान क्र. ८ वर स्थायी समितीने शिफारस करुन पाठविलेला आहे. त्यावर निर्णय घेण्यात यावा. खाजगी अभिकर्त्या मार्फत चांगल्या प्रकारे वसुलीचे कामे होईल तसेच घरांना सुध्दा नंबर वगैरे देऊन कार्यवाहीचे काम चांगल्या प्रकारे करता येईल. त्यासाठी एका झोनची प्रायोगिक तत्वावर साफसफाई तसेच पाणीपट्टी वसुलीसाठी कार्यवाही करावी. मी महापौर असतांना दिल्लीला गेलेलो होतो. तेथे खाजगी तत्वावर जीआयएस स्किम आहे. या स्किम मध्ये शहरातील ड्रेनेज लाईन कुठे आहे. पाण्याची लाईन कुठे आहे. शहरामध्ये कुठल्या ठिकाणी कोणती घरे आहे. याचा सर्व्हे या स्किमद्वारे केला जाता व तसा ठराव आपण पास करुन सेंट्रल गव्हरमेंटकडे पाठविल्यास कार्यवाही होऊ शकेल व देशातील इतर मनपा प्रमाणे या मनपाने सुध्दा जिआयएस स्कीम अंमलात आणली या मनपाचा सुध्दा यामध्ये समावेश होईल. शहरामध्ये अनाधिकृत बांधकामे बऱ्याच ठिकाणी चालू असून, आपल्याकडे स्वतंत्र विभाग असला तरी, संपुर्ण बांधकामे हा विभाग थांबवु शकत नाही. अनाधिकृत बांधकामे झाल्यानंतर अशा इमारतींना कर आकारणी केली जाते, असे न होता जे बांधकाम अधिकृत होते अशाच ठिकाणी कर आकरणे, नळ कनेक्शन देणे, लाईट मिटर देणे बाबतचा निर्णय या सभागृहाने घेणे आवश्यक आहे. तसे रुलिंग आपण घ्यावे. त्यामुळे अनाधिकृत बांधकामावर आळा घालता येईल व कामे शिस्तबध्द पध्दतीने होतील व वसुलीचे सुध्दा प्रमाण वाढण्यास फार मोठल मदत होईल यात शंका नाही.

श्री. काशीनाथ कोकाटे : मालमत्ता कराच्या संदर्भात सविस्तर चर्चा होत आहे. थकबाकीसह संपुर्ण उद्दीष्ट का ठेवण्यात आलेले नाही. असा सदस्यांचा प्रश्न होता, परंतु उप आयुक्त यांनी जो खुलासा केला तो वेगळा झालेला आहे. त्यांनी वसुंली का झाली नाही. याचा खुलासा दिलेला आहे. वसुलीचे उद्दीष्ट हे १००% पुर्ण होईल अशी अपेक्षा गृहीत धरुनच उद्दीष्ट ठेवलेले असते. २४ कोटी मधून

फक्त ८ कोटी मालमत्ता कराची वसुली झालेली असून, ३०% वसुली झालेली आहे. असे असेल तर निश्चित पुन्हा विचार करण्याची वेळ आलेली आहे. शहरात एकूण १.१० लक्ष मालमत्ता आहे. असे आताच प्रशासनातर्फे सांगण्यात आले परंतु लोकसंख्येचा विचार होता व त्यानुसार शहरातील मालमत्तेची संख्या जवळपास १.५० ते १.७५ लक्ष असु शकते जी संख्या दाखविली ती अत्यंत कमी आहे. ज्यांचेकडे अती मोठया प्रमाणात मालमत्ता आदेश ज्या की, रितसर नाही. अशांना कर आकरणी होत नाही परंतु जे लोक मध्यमवर्गीय व मालमत्ता व इतर कर भरणारे आहेत. अशांवर पुन्हा पुन्हा जास्तीचा कर लादण्याचा प्रयत्न होत आहे, तसेच खालच्या वर्गातील लोकांचया मालमत्तेला सुध्दा कर आकरणी होत नाही. या महापालिकेस जकातीच्या माध्मातून जवळपास ५१ कोटी रुपये मिळतात. शहरात येणारा माल हा सर्व सिडको हडकोतील व शहरातील नागरिक खरेदी करतात. त्यात सिडको हडको भागातील जवळपास २.५० लक्ष जनता यात सहभागी आहे. त्यामुळे जकातीच्या उत्पन्नात २५ ते ३०% सहभाग हा सिडको हडको भागातील जनतेच्या आहे असे म्हणावे लागेल. या संदर्भात सविस्तर चर्चा येत असतांना विषयांवर करुन सिडकोच्या पाण्यासंदर्भात चर्चा करण्याची कुजबुज चालू आहे. ज्यांना चर्चा करायची त्यांनी करावी, परंतु अगोदर मालमत्ता करावर चर्चा होऊ दयावी. तसेच प्रशासनाला सुध्दा सुचना करु इच्छितो की, ज्या ज्या भागात पाणी दिले जाते. त्या भागात पाणी किती दिले जाते व त्याच भागात वसुलीचे प्रमाण किती आहे. याची सुध्दा तपासणी करणे आवश्यक आहे. ज्या मालमत्ता दाखविण्यात आल्या त्या अत्यंत कमी आहे, त्यासाठी सर्व झोन अधिकारी यांना ज्या ज्या भागात मालमत्तांचे सर्व्हेक्षणाचे काम दयावे, त्यामुळे निश्चितच संख्या वाढेल व उद्दीष्टयाप्रमाणे वसुलीचे सुध्दा काम होईल. जया भागातून वसुली होते तेथे निश्चितपणे विकास कामे केली पाहिजे. अनाधिकृत वसाहतीच्या नावाखाली विकास कामे केली जात नाही, काही भागात कर आकारणी होते विकास कामे केली जात नाही. गुंठेवारीचा शासनाचा जी. आर. आला त्यावर या सभागृहात चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला. परंतु अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. म्हणून जनते बरोबर मोर्चे काढण्याची वेळ सुध्दा सदस्यांवर आलेली आहे व जे मध्यमवर्गीक लोक आहे. त्यांचे वरच वाढीव कर आकारणी होऊन वसुली करण्यात येत आहे. म्हणून ज्या अनाधिकृत वस्त्या आहेत. अशा ठिकाणच्या मालमत्तेला सुध्दा १००% मालमत्ता कर आकरणी व्हावी जनता कर भरण्यास तयार आहे व तसार ठराव पारित करुन शासनाकडे पाठवावा. अशा मालमत्तेला कर लावल्या नंतर तेथे सोयी सुविधा देण्यास महानगरपालिकेने सुध्दा वचनबध्द असावे. अशी विनंती करण्यात येते.

डॉ. आशा बिनवडे : सन ९९-२००० ला १५ कोटीचे उद्दीष्ट मालमत्तेचे होते. सन २०००-२००१ करीता सुध्दा उद्दीष्ट १५ कोटी होते. सन २००१-२००२ साठी २४ कोटीचे ठेवून सुधारीत मध्ये ११ कोटी करण्यात आले आणि या वर्षी म्हणजेच २००२-२००३ साठी पुन्हा १५ कोटीचे निश्चित करण्यात आले. एकूण ४ वर्षापासून उद्दीष्ट तेवढेच का ठेवण्यात आले. मालमत्तांची संख्या

ठराविकच होती का. १४ वर्ष सारखेच उद्दीष्ट का ठेवण्यात आले खुलासा करावा.

मा. उपआयुक्त : एकूण महानगरपालिकेच्या रेकॉर्डवर असलेल्या व कर आकारणी करण्यात आलेल्या १.१० लक्ष मालमत्ता आहेत. यापेक्षा जास्त मालमत्ता असून शकतात. त्यासाठी सर्वेक्षणाची आवश्यकता आहे. त्यासाठी कर आकारणी विभागातील १२ दुय्यचम आवेक्षक आहेत. प्रत्येक दुय्यम आवेक्षकास १० मालमत्तेची नोंद करण्याचे दररोजचे टारगेट देण्यात आलेले होते. घरांचा शोध घेऊन कर आकरणी करायची यामुळे एकूण १३ हजार मालमत्तांचा शोध घेण्यात आला. या संदर्भात स्थायी समितीमध्ये सुध्दा मुद्दा उपस्थित झालेल्या होता. बऱ्याच सदस्यांनी स्थायी समिती मध्ये सूचना केलेल्या आहे. त्यातील एक सूचना मांडू इच्छितो की, सिडको वगळता शहरातील कोणतीही मालमत्ता असो त्यास कर आकरणी करणे योग्य आहे. ती अनाधिकृत आहे की, अधिकृत आहे ती मालमत्ता करापात्र असतेच याचा सर्वे करण्यासाठी टेंडरची कार्यवाही सुरु केलेली आहे. २ ते ४ दिवसात टेंडर निघेल व सर्वेक्षणाचे काम एका प्रायव्हेट एजन्सी मार्फत करण्यात येऊन सर्व मालमत्तेला नंबर सुध्दा देण्याची कार्यवाही होईल. १.१० लक्ष प्रॉपर्टीजमध्ये ४ वर्षा पासून फार मोठया प्रमाणात वाढ झालेली नाही. वसुलीचे प्रमाणे बघीतले तर, ९८-९९ मध्ये ८ कोटी ४७ लक्षची वसुली झाली. ९९-२००० मध्ये ७ कोटी ६९ लक्षची वसुली झाली तर २००० ते २००१ मध्ये ८.८५ कोटी झालेली आहे. या वसुलीचा विचार करता नैसर्गिक वाढ म्हणून १० कोटी ठेवावयास पाहिजे होती ती ११ कोटी ठेवण्यात आलेली आहे. उलट जास्त ठेवण्यास आलेले आहे. या वर्षी १५ कोटींचे उद्दीष्ट असून जे कि मोठमोठया मालमत्तेचा यात समोवशे होऊन कराच्या माध्मातून तेवढे उद्दीष्ट पूर्ण होणार आहे. तसेच स. सदस्य, श्रीमती घायतिलक लिलावती यांचे प्रश्नाच्या अनुषंगाने खुलासा करु इच्छितो की, आयजीए रजिष्टर यांचे कडून म्हणजे शासनाकडून अशा सूचना आलेल्या आहे की, कुठलेही रजिष्टर कागदपत्र असल्या शिवाय नामांतर करता येत नाही. या सभागृहाने असा निर्णय घेतलेला आहे की, मालक कुणीही असो जे की, ती जागा ज्यांच्या मालकी हक्कात आहे. त्यांना भोगवटाधारक म्हणून त्याचे नांवाने मालमत्ता कर आकारणी होईल. नव्याने कर आकरणी होईल. तेव्हा सुध्दा भोगवटा धारक म्हणून कर आकारणी होईल त्यात त्या संबंधित व्यक्तीने काहीही नुकसान होणार नाही.

श्री. प्रकाश निकाळजे : न्यायालयामध्ये एकूण प्रकरणे किती आहे. याचा खुलासा द्यावा.

उप आयुक्त (म.) : एकूण न्यायालयामध्ये १४६३ केसेस होत्या. त्यापैकी १०७२ प्रकरणांचा निकाल लागलेला असून, ६३१ महापालिकेच्या बाजुने निकाली लागलेली आहे तर, ४४१ प्रकरणे मनपाच्या विरोधात निकाली लागलेली आहे. मालमत्तेच्या संदर्भात सध्या ३९१ प्रकरणे आहे.

श्री. किशोर तुळशीबागवाले : महानगरपालिकेचे स्वतंत्र न्यायालय स्थापन करणार होते. संपूर्ण कार्यवाही झालेली आहे. का सुरु करण्यात आलेले नाही.

मा. उप आयुक्त : शेवटच्या रिपोर्ट महापालिकेतर्फे दिलेला आहे. लवकरच न्यायालय उघडण्याबाबत कार्यवाही होणार आहे.

मा. महापौर : महानगरपालिके तर्फे संपूर्ण प्रयत्न करण्यात आलेले आहे. आदरनिय न्यायमुर्ती यांनी जागा सुध्दा बघितलेली असून, त्यानुसार बजेट मध्ये तरतुद सुध्दा करण्यात आलेली आहे.

श्री. स. अली मिरा सलामी : न्यायालयातील प्रकरणामध्ये बऱ्याच केसेस महानगरपालिकेच्या विरोधात गेलेल्या असून, महानगरपालिकेच्या विरोधात गेलेल्या असून, महानगरपालिकेचे पॅनल वरील वकील बदलावे अशी माझी विनंती आहे. जी प्रकरणे विरोधात गेली. त्यांीच कारणे काय होती. तसेच जशी मालमत्ता तसा कर लागल्या गेला पाहिजे. नसता प्रकरणे न्याय प्रविष्ठ होतात. यात मनपाचे मोठया प्रमाणात नुकसान होते, तसेच मालमत्तेचे सर्वेक्षण का करण्यात आलेले नाही. याचा खुलासा घ्यावा.

मा. महापौर : स. सदस्य, डॉ. बिनवडे यांनी प्रश्न उपस्थित केल्या नुसार ४ वर्षा पासून सारखेच उद्दीष्ट का ठेवण्यात आले. रिव्हीजन झाले नाही. असे प्रशासनाचे म्हणणे असेल तर का झाले नाही. यात कोण जबाबदार आहे. आपल्याकडे सक्षम अधिकारी असतांना का कुणी ही बाब सुचविली नाही व दर चार वर्षाला सर्वेक्षणाचे काम केले नाही. यावर्षी आयुक्तांनी जातीने लक्ष दिल्याने १३ हजार मालमत्तेची वाढ होत आहे. असे प्रत्येक वर्षी होत गेले असते. तर मनपाचा फार मोठा फायदा झाला असता.

करमुल्य निर्धारण अधिकारी : मागील ५ वर्षात ज्या मालमत्तेचे असिसमेंट झाले. त्याचे आकडेवारी देत आहोत. सन ९७-९८ ला ६१४०, ९८-९९ ला ३९१३, ९९-२००० ला ५८५३, सन २०००-२००१ मध्ये ७६६३ तर या चालू वर्षात १३३०१ मालमत्तेला असिसमेंट करण्यात आलेले आहे. दर वर्षाच्या तुलनेस यावर्षी दुप्पट असिसमेंटचे काम झालेले आहे. ४ वर्ष म्हणावी तेवढी असिसमेंट मध्ये वाढ झालेली नव्हती.

मा. महापौर : चालु वर्षाचे उद्दीष्ट सोडून थकबाकी किती आहे.

मा. उप आयुक्त (म.) : एकूण ३६ कोटींची थकबाकी आहे.

मा. महापौर : एकूण थकबाकी ३६ कोटींची आहे. वसुली होत नाही. दर वर्षी १५ कोटीचे उद्दीष्ट ठेवले जाते. उद्दीष्ट पूर्ण होत नाही, थकबाकी वाढत आहे, वसुली का होत नाही. त्याची कारणे काय आहे. ती सुध्दा सभागृहाच्या निदर्शनास आणून दयावी. प्रायोगिक तत्वावर मालमत्तेची वसुली करु शकतो का?

उप आयुक्त (म.) : मालमत्तेची खाजगीकरणा मार्फत वसुली संदर्भात गॅरंटी नाही, परंतु पाणी पट्टी वसुली खाजगी अभिकर्त्यां मार्फत करु शकतो जे इतर महापालिकेमध्ये होत आहे. त्या प्रमाणे

श्री. अंबादास दानवे : काही प्रकरणे अशी आहेत की, दोन घरे सारख्याच पध्दतीची आहे. एका घराला १०००/- रुपये कर आकरणी झालेली असेल तर, त्या घराच्या बाजुलाच दुसऱ्या घरास २०००/- रु. कर आकारला जातो. त्यामुळे ज्यांना जास्त कर आकरला जातो. असे करधारक तक्रार करतात मनपा कार्यालयास भेट देतात. परंतु त्यांच्या तक्रारींची दखल आपले कर्मचारी घेत नाही. त्यामुळे जी रक्कम थकीत राहते ती थकीतच राहते. याचा अर्थ ज्याची कर भरण्याची इच्छा असतांना कर भरता येत नाही. त्यात मनपाचे उत्पन्न घटते तसेच काही घरांचे असिसमेंटच झालेले नाही. अशी सुध्दा बरीच घरे आहे.

मा. उपआयुक्त (महसुल) : अशा प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी दर मंगळवारी एक-एक झोनला बैठक ठरवून प्रकरणे वाटाघाटी करुन निकाली काढली जातील. तसा प्रस्ताव सभेत ठेवलेला आहे. दर मंगळवारी एका झोन मध्ये बैठक घेण्यात येईल. तेथे प्रत्येक झोन अंतर्गत असलेले करधारक सामिल होऊ शकतील.

श्री. अंबादास दानवे : अशी कार्यवाही प्रशासन करीत असेल तर, ताबडतोब तसे आदेश काढणे गरजेचे आहे. तसे रुलिंग देण्यात यावे.

श्रीमती मानकापे पार्वती : ज्या भागात इमारत निरिक्षक अतिक्रमण होऊ देत असेल तर, त्यांचेवर कार्यवाही करावी. एकाच भागात एकच साईजच्या दोन घरांना सारखीच कर आकरणी होत नाही. त्यामुळे लोक कर भरीत नाही.

श्री. किशोर तुळशीबागवाले : सन १९९२ पासून सिडको हडकोच्या मालमत्तेला कर आकरणी करावी. मनपाचे उत्पन्न वाएले. हस्तांतरण होईल तेव्हा होईल.

डॉ. भागवत कराड : सिडको हडकोचे मनपाकडे हस्तांतरण झाल्या शिवाय मालमत्ता कर लावता येणार नाही. जेव्हा हस्तांतरण होईल तेव्हा पासूनच मालमत्ता कर लावणे योग्य होईल. अगोदरच तेथे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही चालू असून तेथील जनतेला मनस्ताप झालेला आहे. मालमत्ता कराचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने शहरतील होत असलेली बांधकामे व नव्याने झालेल्या इमारती शोधुन काढाव्या अशा इमारतींना कर लावावा तसेच नळ कनेक्शन शोध मोहीम राबवावी रेग्युलर कावी, जेणे करुन उत्पन्न वाढण्यास मदत होईल. सर्वसामान्यांना पुस्तव तयार करुन द्यावे. पुस्तक दिले तर, डिमांड नोटीसची गरज पडणार नाही. जे जे अनाधिकृत असतील, त्यांना नळ, लाईल कनेक्शन देवून नयेत.

श्री. स. अली मिरा सलामी : सिडकोचे मनपाकडे हस्तांतरण होईल तेव्हा पासून मालमत्ता कर लावणे योग्य होईल. सिडकोने लोकांना घरे देतानांच मालमत्ता कराचा विचार करुन दिलेली आहे. त्यामुळे हस्तांतरण न होता मागील कर लावता येणार नाही हे सिडको प्रशासना कडून घ्यावे. सिडको हस्तांतरणापुर्वी हे सोडवावे.

(याच वेळी सिडको हडको भागातील नगर सेवक मा. महापौर यांचे डायस समोर उभे राहून मोठमोठयाने बोलतात. हस्तांतरणा नंतरच कर लावता येईल अशी मागणी करतात.)

श्रीमती जयश्री किवळेकर : हस्तांतरण होत नाही तो पर्यंत सिडकोतील नागरिकांकाडून मालमत्ता कर मागण्याचा अधिकार नाही. हस्तांतरणा नंतर त्यापुढील कर लावता येईल. सभागृहात एक ज्येष्ठ सदस्य विषयांतर करुन सभागृहाची दिशभूल करुन चर्चेला संधी देत आहे.

मा. महापौर : विषयांतर झालेले नाही. सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे या शहरात जे लोक बांधकाम परवानगी घेतात ते इमारत बांधकाम पुर्ण झाल्या नंतर सुध्दा प्रमाणपत्र घेत नाही. त्यामुळे मालमत्ता कर लावण्यात नोंद होत नाही. अशा मालमत्ता कर धारकांवर योग्य ती नियमाने कार्यवाही करणे गरजेचे आहे. या वर्षी मा. आयुक्त यांनी १३ हजार नविन मालमत्ता शोधुन कर वाढविण्याचे प्रयत्न केलेले आहे. त्यामुळे उत्पन्न वाढण्यास आणखी मदत होईल. मालमत्तेची २३ कोटीची थकबाकी असून प्रशासनाने योग्य त्या उपाय योजना करुन जास्तीत जास्त वसुली करण्याचे प्रयत्न करावे. शहरात

अनाधिकृत बांधकामे रोज होतात. त्यांना ५,०००/- रुपया पर्यंत दंड आकारला तरी लाखो वसुल होईल. बांधकाम करतात त्यांचा शोध घेऊन दंडात्मक कार्यवाही करावी. अनाधिकृत बांधकामास दंड आकारुन नियमित करावे.

सौ. शाहिन जफर महेमुद जफर : माझ्या वार्ड क्र. ६२ मध्ये अनेक पत्र देवूनही सुनावणी होत नाही. २-४ पत्र दिलेले आहे. त्याचा खुलासा करावा.

उप आयुक्त (म.) : बांधकामा संबंधीची तक्रार प्रशासकीय अधिकारी यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात येते. त्यांनी कार्यवाही केली नाही तर, दंडनिय कार्यवाही करण्यात येईल.

मा. महापौर : मालमत्ता कराचे १५ कोटींचे उद्दीष्ट ठेवलेले होते. त्यात २ कोटी स्थायी समितीने वाढविलेले आहे. त्यानुसार प्रशासनाने उद्दीष्ट पुर्ण करावे. थकबाकीची वसुलीचे सुध्दा प्रयत्न करावे. उद्दीष्ट निश्चित केल्या नुसार ज्या त्या कालावधीत ते प्रमाणका नुसार पुर्ण केले किंवा काय? या बाबतीत दर तीन महिन्याला एक विशेष सभा आयोजित करण्यात येईल. या बैठकीत सर्व वसुली बाबतचा आढावा प्रशासनातर्फे ठेवण्यात यावा.

मा. आयुक्त : जे कर्मचारी / अधिकारी वसुली करणार नाही. त्यांचेवर कार्य कार्यवाही करणार असा प्रश्न उपस्थित झाला, परंतु मागील २-३ वर्षाचा विचार केल्यास मालमत्ता कराची वसुली ८ कोटी होत असे यावर्षी जास्त होणार आहे. तसेच पाणी पट्टीची वसुली सुध्दा गेल्या वर्षी ६.५० कोटीच यावर्षी ९ कोटी पर्यंत होणार आहे. पाणीपट्टी व मालमत्ता कर वसुली मिळून यावर्षी ६.५० कोटी जास्त वसुली झालेली आहे असे चित्र आहे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : तत्कालीन आयुक्त, श्री. भोगे साहेब असतांना जकातीची दररोजची वसुली १६ ते १७ लक्ष येत असे. वर्षापुर्वीचा आज विचार केल्यास २० ते २२ दररोज जकातीची वसुली होणे आवश्यक आहे.

डॉ. भागवत कराड : जे वसुली करीत नाही. अशा कर्मचारी / अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करणार आहे. याचा निर्णय घेण्यात यावा.

मा. आयुक्त : जे वसुली चांगली करतात. अशा कर्मचाऱ्यांचा सन्मान करणार, परंतु जे कर्मचारी नियमाने असे करणार नाही त्यांचेवर कार्यवाही करता येईल. तसेच काही कर्मचाऱ्यांना वसुलीच्या वेळी काही नागरिक हेतु पुरस्कार त्रास देतात. यापुर्वी कर्मचाऱ्यांना शिविगाळ व मारहाणीचे प्रकार झालेले त्या सर्व गोष्टींचा विचार करुन वसुलीचे नियमा नुसार काम करावे लागते. जे प्रयत्न करणार पण वसुली पुर्ण झाली नाही. अश्यांवर कार्यवाही करता येणार नाही. काही प्रभागात थोडया प्रयत्नात तर काही प्रभागात खूप प्रयत्न करावे लागते.

मा. महापौर : यावर्षी मालमत्तांच्या संख्येत वाढ झालेली आहे. मालमत्ता कराचे चांगले उत्पन्न होईल. अशा खात्री आहे. त्यानुसार प्रशासनाने उद्दीष्ट पुर्ण करावे व थकबाकी वसुलीवर सुध्दा भर दयावा.

**३) पाणीपट्टी वसुली :**

डॉ. आशा बिनवडे : सन २०००-२००१ मध्ये १२ कोटींचे उद्दीष्टे ठेवलेले हाते. सुधारित मध्ये ८ कोटी केले. सन २००१-२००२ मध्ये १५ कोटी ठेवले. वसुली २ कोटी पर्यंत जात आहे. सन २००२-२००३ साठी सुध्दा १३ कोटी म्हणजेच दर वर्षी

मालमत्ता सारखेच उद्दीष्ट पाणीपट्टीचे कशी होत गेलेले दिसून येते. याचे कारण काय खुलासा दयावा. कार्यक्षमता कमी होत चालली का?

श्री. जयवंत ओक : आताच मालमत्ता विषयावर चर्चा झाली त्याप्रमाणे मालमत्तेस नंबर दिल्यास कोणत्या घरांना नळ कनेक्शन दिले. कोणत्या घरांना दिले नाही. हे दिसून येईल व अनाधिकृत होत असलेले नळांची संख्या कमी होईल. नंबर नसल्याने कुठे अनाधिकृत नळ दिले गेले काहींनी स्वतःहून करुन घेतले त्यांची नोंद मनपाकडे नाही. त्यामुळे पाणी वापरणारांची संख्या जास्त तर त्याप्रमाणात उत्पन्न कमी येते म्हणून वसुली सुध्दा कमी होते. अनाधिकृत नळ कनेक्शनचा सर्वे करावा, घरांना नंबर द्यावे. त्याच बरोबर जनतेला वेळेवर पाणी सुध्दा दयावे.

मा. उप आयुक्त (म.) : मालमत्तेच्या बाबतीत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिलेला आहे. पाणीपट्टी वसुलीच्या बाबतीत सुध्दा सक्त सूचना देण्यात येतील. वसुली कमी का झाली याबाबत काही कर्मचाऱ्यांना पत्राने विचारणा करण्यात आलेली आहे.

मा. महापौर : मालमत्ता कराचे उद्दीष्ट पुर्ण करण्याच्या दृष्टीने जशी प्रशासनास सूचना केल्या त्याप्रमाणे पाणीपट्टी वसुलीच्या बाबतीत सुध्दा प्रशासनाने कार्यवाही करावी व उद्दीष्ट पुर्ण करण्याचे प्रयत्न व्हावे.

उप आयुक्त (म.) : या वर्षी रु. १०.८८ कोटीचें उद्दीष्ट ठेवलेले आहे. मागील उद्दीष्टाचा विचार केलयास सन ९८-९९ मध्ये ९.११ कोटीचें उद्दीष्ट होते. वसुली ५.२८ कोटीची झालेली होती. सन ९९-२००० मध्ये १० कोटींचे निश्चित केले सुधारित मध्ये ६.५ कोटी दिलेले होते. सन २०००-२००१ मध्ये १२ कोटीचे ठेवण्यात आले होते. ८ कोटी केले वसुली ६.५८ कोटी पर्यंत झालेली आहे.

श्री. भाऊसाहेब ताठे : १.१० लक्ष मालमत्तेत सिडको हडकोचा समावेश नाही. २७,००० हजार मालमत्ता सिडकोच्या आहेत व २७ हजारच नळ कनेक्शनची संख्या आहे. सिडकोचे नळ संख्या वजा केल्या ५५ हजारच नळ कनेक्शन १.१० मालमत्तेसाठी आहेत असे या आकडेवारी नुसार दिसते तर, ५५ हजार मालमत्ता धारक पाणी कोठून भरतात. असा प्रश्न निर्माण होतो.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : मिटर पध्दतीचा अवलंब करावा मिटर मागवून जोडणी करुन मिटर पध्दतीने पाणी दिले जावे. अशी विनंती आहे जेणे करुन पाण्याची बचत होईल व तेच पाणी इतरांना देता येईल.

सौ. साधना सुरडकर : घरगुती वापरातील नळांची संख्या ८०९० दाखविली ती अत्यांत चुकीची असून, तसेच व्यावसायिक नळ कनेक्शनची संख्या ७११ दाखविली ही सुध्दा चुकीची आहे. या शहरात अनेक हॉटेल्स, दवाखाने, बिअरबार, सरकारी ऑफीसेस, मंगल कार्यालये, गॅरेज आहेत. जवळपास १० हजारांचे वर व्यावसायिकत नळ कनेक्शन असतील असे असतांना सुध्दा ७११ संख्या दिली आहे. ५०% पाणी अनाधिकृत पणे वापरल्या जाते. त्यासाठी सर्व्हेक्षण करण्याची आवश्यकता आहे व सर्व्हे करुन तात्काळ कार्यवाही करावी. लोक स्वतःहून नळ कनेक्शन घेण्यास कुणी इच्छुक नाही. वारंवार सभागृहात चर्चा होते. कार्यवाही होत नाही, तसेच जे उद्दीष्ट ठेवले ते सुध्दा पुर्ण होत नाही.

मा. महापौर : कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभि (पा. पु.) : शहरातील अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्या संदर्भात मागील बैठकीत प्रस्ताव पारित केलेला आहे. जाहीर प्रगटन दिल्या पासून

३० दिवसांच्या आंत ठराविक रक्कम भरुन नळ अधिकृत न केल्यास त्यानंतर आणखी ३० दिवसांची मुदत देण्यात येईल व त्यानंतरही कार्यवाही न केल्यास व अनाधिकृत नळ कनेक्शन आढळून आल्यास त्यांचेवर गुन्हा दाखल करुन पुढील कार्यवाही होईल. १ एप्रिल पासून योजना राबवणार शहरात २ महिन्यापासून सर्वे चालू आहे. सर्वच दुकानाकडे कनेक्शन आहे असे नाही.

श्रीमती पार्वती मानकापे : वार्डात अनाधिकृत नळ कनेक्शन घेऊन त्या ठिकाणी दोनचाकी (मोटारसायकल) गाडया धुतल्या जातात. रस्त्यावर पाणी वाहते. रस्ते खराब होत आहे.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी ताबडतोब दखल घ्यावी.

सौ. संगिता मैंद : जे लोक विद्युत मोटारी लावतात. त्यांचेवर कार्यवाही करावी, त्यामुळे इतर लोकांना पाणी मिळत नाही. तसेच अनाधिकृत नळ कनेक्शन शोधण्याची गजर आहे.

श्री. साहेबराव कावडे : पाणी पुरेपुर मिळू शकते. परंतु नियोजन नसल्याने ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. काही लोकांनी मुख्य जलवाहिनी वरुन नळ कनेक्शन घेतलेले २४ तास पाणी असते. ते पाणीपट्टी भरीत नाही व मनपाकडे तशी नोंद सुध्दा नाही. काही ठिकाणी १५ मिनिटे पाणी येते तर काही ठिकाणी ३-३ तास पाणी दिले जाते. त्यासाठी नियोजन करावे. अनाधिकृत नळ शोधून काढावे अशी माझी विनंती असून, अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत आहे. प्रत्येक वेळी सभागृहात नुसती चर्चा होते याची दखल घेतली गेली पाहजे.

सौ. चंद्रात्रे सुवर्णा : मायको प्लॅनिंग नुसार कोणत्या भागात किती नळ कनेक्शनची संख्या असावी. या बाबतीत सर्वेक्षण करणार होते. अधिकाऱ्यांनी त्यासंबंधी कार्यवाही केलेली दिसत नाही.

श्रीमती लिलावती घायतिलक : माझ्या वार्डात १५-२० नळांना पाणीच येत नाही. सदर लोक इतर नळांहून पाणी भरतात तरी सुध्दा नळपट्टीची आकरणी होते. या संदर्भात मी प्रत्यक्ष अधिकाऱ्यांचा माहिती दिली. तसेच वार्डात पुरेपुर पाणी येत नाही. किमान स्लम भागातील जनतेचा तरी विचार व्हावा. १/२ तास सुध्दा पाणी येत नाही.

श्री. सुरजितसिंग खुंगर : नळ कनेक्शन अधिकृत करायचे असेल तरी कर्मचारी पैसे घेतल्या शिवाय नळ कनेक्शन अधिकृत केले जात नाही अशी परिस्थिती आहे, ९ टेबलवर फाईल जाते. १/२ महिने लागतात. याला सोपे करावे अनाधिकृत कनेक्शन १० मिनिटात होतात.

श्री. अंबादास दानवे : ८२९१२ घरगुती नळ कनेक्शन दाखविण्यास आले. १.१० लक्ष मालमत्तेची नोंद असून, नविन १३ हजार मालमत्ता आहेत. एकुण १.२३ लक्षची नोंद आहे. यात सिडकोच्या एकुण मालमत्ता २८ हजार असून, २८ हजारच नळ संख्या आहे. ८२९१२ मधून २८ हजार नळ संख्या वगळल्यास जुन्या शहरात ५० ते ५५ हजारच नळ कनेक्शन आहेत का? तसेच व्यावसायिक नळ कनेक्शन सुध्दा अत्यंत कमी दाखविण्यात आले सर्वे करुन कार्यवाही करणार असे सांगण्यात आले. सर्व्हे करण्याची आवश्यकता नाही. किती हॉटेल्स आहेत. याची माहिती मनपाच्याच आरोग्य विभागात उपलब्ध आहे. आरोग्य विभागाने एकुण १३१० हॉटेल्स रजिष्ट्रेशनची नोंद आहे. आता

नुकताच अग्निशमन विभागामार्फत ना हरकत प्रमाणपत्र दिले जात आहे. त्या विभागाकडून सुध्दा माहिती उपलब्ध होईल १३१० हॉटेलाची नोंद असतांना व्यावसयिक फक्त ७११ नळ संख्या दाखविली अधिकारी सभागृहाची दिशाभूल करतात. तसेच कामगार उप आयुक्त यांचे मार्फत २७ हजार दुकान व्यावसायिक म्हणून नोंद आहे. यात ३% लोकांकडे नळ आहे. असे गृहीत धरल्यास ३ हजार नळ कनेक्शनची संख्या वाढवू शकते, तसेच औद्योगिक व्यावसायासाठी सुध्दा १२ कनेक्शन दिलेले असून, त्यांची नोंद बजेटमध्ये दिलेले नाही. १२ ऐवजी जास्त नळ संख्या असू शकते. १.२३ लक्ष मालमत्ता कर असेल तर, जुन्या शहरात तेव्हढीच नळ संख्या असावयास पाहिजे.

सौ. साधना सुरडकर : शहरातील सर्वसामान्य लोकांच्या अशा भावना झालेल्या आहेत की, सभागृहात नगरसेवक नुसती चर्चा घडवून आणतात. परंतु अधिकारी काहीही कार्यवाही करीत नाही. त्यासाठी अशा अधिकाऱ्यांवर का कार्यवाही करण्यात येऊ नये.

श्री. साहेबराव कावडे : पाणी पुरवठयाचे योग्य प्रकारे १ महिन्याच्या आत नियोजन केले नाही तर, जनतेला प्रमाणकानुसार पाणी दिले गेले नाही तर, अनाधिकृतपणे नळ कनेक्शन घेतले जातील व यास प्रशासनच जबाबदार राहील.

मा. महापौर : शहरात किती हॉटेल्स, दवाखाने, गॅरेज, शासकीय कार्यालये, मंगल कार्यालय, बिअरबार तसेच इतरही लहान मोठे व्यावसायिक व घरगुती नळ कनेक्शनचा सर्व्हे करावा. २ महिन्यात सर्व्हे करुन अनाधिकृतपणे घेतलेल्या नळ कनेक्शनचा सर्व्हे करावा. ते नियमित करण्याबाबत कार्यवाही करावी.

डॉ. भागवत कराड : अभय योजनेचे काय झाले खुलासा दयावा ही, योजना आता पर्यंत का राबविली गेली नाही.

सौ. संगिता मैंद : काही घरांना २-३ नळ कनेक्शन घेतलेले आहे. असे लोक २-३ नळांची पाणी पट्टी भरतात का?

कार्यकारी अभि (पा. पु.) : एका एजन्सीजचे नळाचे सर्व्हेक्षणासाठी टेंडर भरुन आलेले होते. ही कार्यवाही चालू असतांनाच वन टाईम प्रिमियम भरुन नळ अधिकृत करण्याचा प्रस्ताव पारीत झालेला आहे. तसेच दुसरा एक प्रश्न विचारण्यात आल्या नुसार औद्योगिक नळ कनेक्शन दिलेले आहे ते १२ असून, जवळपास त्यापासून २.७५ ते ३.०० कोटी वसुल होतात.

मा. महापौर : मालमत्ता वाढलेल्या असून, त्याचप्रमाणे नळांची सुध्दा संख्या वाढणार आहे. जास्तीत जास्त नळ पट्टीची वसुली करावी. दर तीन महिन्याला वसुलीच्या बाबतीत बैठक आयोजित करुन आढावा घेण्यात येईल.

श्री. स. अली मिरा सलामी : वृत्तपत्रात जाहिरात देऊन नळ कनेक्शन कायम करण्याची कार्यवाही सफल होईल असे वाटत नाही. त्यासाठी प्रत्येक भागात मनपाचे कर्मचारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन नळ कनेक्शन जागेवरच नियमित करण्याची कार्यवाही करावी. स्वतःहून कुणील लोक नळ कनेक्शन घेण्यास येणार नाही.

कार्यकारी अभि (पा. पु.) : वन टाईम प्रिमियम योजना राबवितांना ३० दिवसाच्या विहीत मुदतीनंतरही ३० दिवसांची आणखी मुदत देऊनही नळ कनेक्शन कायम केले नाही तर, पुढील कार्यवाही करावी लागणार आहे. यासाठी ज्या हॉटेल्सला लायसेन्स दिले. त्या संदर्भात आरोगय विभागात तसेच

अग्निशमन विभागांशी समन्वय साधून नळ कनेक्शन शोध मोहीम सुरु करुन कार्यवाही करता येईल.

श्री. भगवान रगडे : अनाधिकृत नळ कनेक्शन बाबत तसेच पाणी पुरवठा न होण्या संदर्भात सभागृहात प्रत्येक बैठकीत जवळपास चर्चा होते पाण्याचे नियोजन नाही. प्रत्येक वेळेस चचौ होऊन प्रशासन काहीही कार्यवाही करीत नाही, जवळपास एकूण १३ टँकरद्वारे काही वस्त्यांना पाणी पुरवठा केला जाते. मनपास या माध्मातून खूप खर्च सहन करावा लागतो. हे बरोबर असेल तरी नियोजन नसल्याने ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. नुकताच पाण्यासाठी गेलेल्या एका लहान मुलाचा टँकर खाली येऊन मृत्यु झालेले आहे. यास कोण जबाबदार १ एका टँकरसाठी किमान १,०००/- हजार रुपये खर्च मनपास येत असून, दररोज १२-१३ हजार रुपये खर्च होत आहे. हा खर्च टकाण्यासाठी ज्या विहीरी वार्डात असतील त्या दुरुस्त व स्वच्छ करुन घ्याव्यात. तसेच हातपंप दुरुस्त करावे. जेणेकरुन पिण्यासाठी नाही तरी, घर वापरासाठी या पाण्याचा उपयोग होईल. अशी कार्यवाही केल्यास पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होईल व पिण्याचे पाणी कसे देता येईल. यासाठी प्रयत्न व्हावे.

श्री. सुदाम सोनवणे : शहरातील नळ कनेक्शनला मिटर योजना आणखी ही योजना अंमलात आणल्यास पाण्याची टंचाई येणार नाही. योग्य प्रकारे पाण्याचा वापर होईल. नाशिक शहरामध्ये ही योजना राबविली जाते. त्याप्रमाणे या शहरासाठी सुध्दा राबवावी.

मनपाच्या अग्निशमन विभागा मार्फत मोठमोठया व्यावसागिक ईमारतींना ना हरकत प्रमाण पत्र देण्यात येत आहे ही कार्यवाही होत असतांनाच या विभागाच्या असे निदर्शनास आले की, राजाबाजावर झांबड इस्टेट मध्ये २१ प्लॉटस आहेत. १ नळ कनेक्शन असल्याचे दिसून आले. त्यांची नोंद मनपाकडे नाही व किती पाणी घेतले जाते याची सुध्दा अंदाज येत नाही. त्यासाठी मिटर योजना राबवावी. पाण्याची बचत होईल.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वार्डात जे लोक पाणीपट्टी भरतात त्यांना पाणी मिळत नाही. जे बिल भरत नाही. त्यांचेकडे २" इंच नळ कनेक्शन घेतलेले आहे. अधिकाऱ्यांना बाबत सूचना देखील दिलेल्या आहेत.

मा. महापौर : आपण केलेल्या प्रश्नाशिच हा प्रश्न निगडीत आहे. अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्या संदर्भात जाहीर नोटीस काढण्यात येणार आहे. त्यानंतर विहीत मुदतीत कार्यवाही करुन घेतली नाही तर, त्या त्या अनाधिकृत नळ धारकांवर कायदेशीर कार्यवाही होणार आहे.

सौ. बबीता कागडा : गांधीनगर भागात २-३ दिवसा आड पाणी दिले जाते, जे पाणी येते. ते सुध्दा १/२ तास येत नाही. हा संदर्भात काहीही कार्यवाही होत नाही.

सौ. साधना सुरडकर : या शहरात १२०-१२५ एमएलडी पाणी पुरवठा होते. असे मत प्रशासनाचे असेल तर, एक हजार नळ कनेक्शनसाठी १ तास ७५० लिटर प्रमाणे ८२,०००/- नळ कनेक्शनला ६२ एमएलडी लागते. शहरात ६२ एमएलडी गेल्यास उर्वरित ४० ते ४५ एलएलडी पाणी कोठे जाते हा प्रश्न निर्माण होतो. यावरुन प्रशासन सभागृहाची दिशभूल करते असे दिसून येते.

श्री. काशीनाथ कोकाटे : शहरात येणारे पाणी किती सिडकोसाठी किती एमएलडी पाणी दिले जाते. शहरासाठी किती त्याची विल्हेवाट प्रमाणकानुसार लागली

पाहिजे अशा प्रकारीची चर्चा होऊन पाण्याचे ऑडीट करावे या संदर्भात या पुर्वीच्या बैठकीत चर्चा करण्यात आलेली होती. परंतु प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. पाणी पुरवठयावर एकूण ३० ते ३२ कोटीचा खर्च दाखविलेला असून, १३ कोटींचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. याचा अर्थ १९ ते २० कोटींची तुट निर्माण होते व ही तुट भरुन काढण्यासाठी पाणीपट्टीत वाढ करणे गरजेचे आहे. असे प्रस्तावा वरुन दिसून येते. ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालली नाही तर, शासन अनुदान बंद करणार असे नमुद केलेले आहे. संस्थेचे जबाबदारी घेतली पाहिजे व त्यानुसारच पाणीपट्टीत वाढ केल्यास सर्व सामान्य जनता जे पाणीपट्टी भरतात. त्यांचेवर अन्याय होईल. असे माझे मत आहे. शहरात एकूण १२० एमएलडी पाणी येते आणि हे पाणी आणण्यावर महापालिकेचा विजेवर मोठया प्रमाणात खर्च होतो. त्यामुळे एकूण खर्चात वाढ होते. त्याचप्रमाणे पाण्याचे नियोजन नाही. १०-१५ एमएलडी पाणी गळती होते. ५० ते ६० एमएलडी पाणी जुन्या शहरासाठी येते. १७ ते १८ एमएलडी सिडको हडको भागासाठी दिले जाते तर, उर्वरित २० ते २५ एमएलडी पाणी कुठे जाते. याचा सुध्दा शोध घेणे गरजेचे आहे व १९ कोटींची तुट भरून काढण्यासाठी काय प्रयत्न करता येईल ते करण्यात यावे व तसे आदेश प्रशासनास दयावे, त्याशिवाय या शहरातील विकास कामे करणे शक्य होणार नाही, ही तुट भरुन काढण्यासाठी प्रशासन काय नियोजनबध्द कार्यक्रम राबविणार याचा अहवाल वेळोवेळी सर्वसाधारण सभेत ठेवावा.

मा. महापौर : पाण्याची मोठया प्रमाणात चोरी होते. अनाधिकृत नळ कनेक्शनचा कशाच्या माध्यमातून शोध घेणार आहे जी तुट येते ती कशी भरुन काढणार पाणी पुरवठा योजना कशी सक्षम करणार या बाबतीत सभागृहाला अहवाल दयावा. स. सदस्य यांनी जो मुद्दा उपस्थित केलेल्यानुसार मा. आयुक्त यांनी दर ३ महिन्याला आयोजित होणाऱ्या आढावा बैठकीत तसा अहवाल सादर करावा.

श्री. नंदकुमार घोडेले : ठरवून दिलेले उद्दीष्ट पुर्ण करावे.

प्र. सहा. संचालक (नगररचना) : उत्पन्नाच्या काही बाबी संदर्भात माहिती देण्यात येते विकास शुल्क ६० लक्ष यावर्षीही ६० लक्ष जमा होते. विकास निधी ७५ लक्ष आहे व मे मध्ये ६० लक्ष होईल. शहर विकास निधी सुमारे ०.९० कोटी होईल. पान क्र. ३९ वरील अ.क्र. १ ते ६ प्रमाणे माहिती सादर केलेली आहे. पुर्वी एक वेळा बेटरमेंट भरलेले असेल तर ते पुन्हा मिळत नाही. ६ लेआऊट झाले बाकी पुर्ततेसाठी नोटीस दिलेल्या आहेत.

मा. महापौर : या वर्षी किती ले आऊट मंजूर केलेले आहे.

प्र. सहा. संचालक नगररचना : एकूण ३९ आले परंतु ते अंतिम झालेले नाहीत. कागदपत्रांची पुर्तता करण्या संदर्भात कार्यवाही चालू आहे.

मा. महापौर : ज्यांचे कागदपत्र पुर्ण आहे अशा बेटरमेंटचार्ज भरणाऱ्या मिळकत धारकांच्या जागेचे लेआऊट करण्यासंदर्भात ताबडतोब निर्णय व्हावयास पाहिजे.

प्र. सहा. संचालक नगररचना : जे ॲफिडेव्हीट दाखल करतात. त्या प्रकरणात सर्व कागदपत्रांची पूर्तता असल्यास ले आऊट मंजूर करण्याची कार्यवाही होऊ शकते. तात्पुरते ले आऊटवर बांधकाम परवानगी देत नाही. ले आऊटचे

अंतर्गत विकास मालकाने स्वत: करावा किंवा १००% बेटरमेंट चार्जेस भरावे. बँक गॅरेंटी ५०% बेटरमेंट चार्जेस भरणे कायदयात नाही. ले आऊट १००% विकास कोणीही देत नाही. तात्पुरत्या लेआऊटवर भूखंड दाखवायचे ते आता बंद केले. रस्ते, ड्रेनेज, जलवाहिनी, खुली जागा इत्यादी दाखविण्यात येतात.

श्री. नंदकुमार घोडेले : उदाहरणार्थ २० प्लॉटचा एक ले आऊट असेल व २० प्लॉट धारकांनी एकत्रित येऊन १००% बेटरमेंट चोर्जेस भरल्या नंतरच लेआऊट करुन दिले जाते, परंतु २० लोक एकत्र येणे शक्य होत नाही. त्यापैकी एखादा प्लॉट धारक बेटरमेंट चार्जस भरण्यास इच्छुक असेल त्याचे प्लॉटचे लेआऊट मंजूर करुन देण्यास हरकत नसावी. कारण त्यामुळे मनपाचे उत्पन्न बुडते, संपूर्ण प्लॉट धारक बेटरमेंट चार्जेस भरणार नाही तो पर्यंत सुविधा दिल्या जाणार नाही. या अटीवर तरी जो बेटरमेंट चार्जेस भरुन ले आऊटची परवानगीची मगणी करीत असेल त्यांना देण्यात यावी. असे माझे मत आहे.

सह. संचालक नगररचना : २० लोकांपैकी दोन व्यक्तींनी ले आऊट मंजूर करुन घेतले तर ताबडतोब सुविधा देण्याची मागणी होते.

श्री. नंदकुमार घोडेले : तसे ॲफिडेव्हीट संबंधित व्यक्ती कडून करुन घ्यावे. प्रशासनाला अडचण येणार नाही व महापालिकेचे सुध्दा उत्पन्न वाढेल.

मा. महापौर : उद्दीष्ट कमी होत गेलेले आहे याचे कारण काय?

प्र. सहा. संचालक नगररचना : ज्या भागातून महसुली उत्पन्न जास्त मिळते अशा काही भागातील हैद्राबाद न्यायालयात केसेस चालू आहे. त्या संदर्भात स्थगिती आदेश असल्याने तेथील परवानगी बंद केलेली आहे जे येणारे उत्पन्न बंद झालेले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : जे मालमत्ता धारक आहे. त्यांचे नावाने पी. आर. कार्ड असेल तर, त्यांना परवानगी देण्यात यावी. असा ठराव या सभागृहाने पारीत केलेला आहे. त्यानुसार ४२.०० पी. आर. कार्ड धारकांना परवानगी देण्यात यावी.

प्र. सहा. संचालक नगररचना : आपण चर्चेला घेतलेला विषय वेगळा आहे. ४२०० हया मालमत्ता वेगळया आहेत. बागशेरजंग या भागातील ज्या केसेस हैद्रबाद न्यायालयात चालू होत्या त्या संदर्भातील आहे. एकूण ५ केसेस चालू होत्या ३ केसेसचा स्थगिती आदेश उठलेला आहे आणखी दोन केसेसला स्टे आहे. त्यामध्ये सुध्दा बऱ्याच मालमत्ता येतात त्यामुळे तेथे बांधकाम परवानगी देत नाही. त्यामुळे उत्पन्न कमी येते.

मा. महापौर : जे उद्दीष्ट नगररचना विभागाचे ठेवले त्यापेक्षा जास्त का वसुल होऊ शकणार नाही. कोणता निकष लावून उद्दीष्ट ठेवले.

प्र. सहा. संचालक नगररचना : कोडवाईज १, २, ३, ४ मध्ये दिलेले आहे किती निधी उपलब्ध होईल हे दिलेले आहे. १२१, १२२ मध्ये दिलेले जमिन शुल्क ६० लक्ष, विकास निधी ७५ लक्ष वसुल होतो.

मा. महापौर : जी २ कोटी ७९ लक्ष रक्कम दाखविली त्यात वाढ होऊ शकते. तात्काळ परवानगी दिल्यास उत्पन्न वाढवू शकते. मनपाचे अधिकारी / कर्मचारी हे सुध्दा बऱ्याच वेळा जिल्हाधिकारी कार्यालयात कामा निमित्त असतात. त्यामुळेही कामे होण्यास वेळ लागतो. या विभागात मनुष्यबळ कमी आहे.

याची जाणिव सभागृहाला आहे, परंतु जे उद्दीष्ट ठेवले त्यात वाढ झाली पाहिजे असे सभागृहाचे मत आहे.

श्री. जयवंत ओक : नगररचना विभागाचे उद्दीष्ट वाढवून द्यावे किती संचिका प्रलंबित आहे याचा सुध्दा खुलासा करावा. जनतेला त्रास होऊ नये नियमाने तात्काळ परवानगी मिळाली पाहिजे. बरेच लोक कार्यालयात येऊन येऊन कंटाळतात. शेवटी अनाधिकृत बांधकाम करुन टाकतात. अशी परिस्थिती आहे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : ज्या बिल्डरांकडून २५% पध्दीतीने विकास केलेल्या मालमत्ता मनपास मिळालेल्या नाही केव्हा ताब्यात घेण्यार उत्पन्न वाढेल त्यासाठी अशा मालमत्ता ताब्यात घेण्यात याव्यात दुसरे असे की, आपण लाखो रुपये येण्याची अपेक्षा ठेवतो परंतु नगररचना विभागात टेबल खुर्च्या व्यवस्थित नाहीत, तेथे बरेच लोक पैसे भरण्यासाठी येतात. पाण्याची सोय नाही. अशा परिस्थितीचा सुध्दा विचार झाला पाहिजे.

प्र. सहा. संचालक नगररचना : अशा मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी संबंधित बिल्डरांना नोटीस दिलेल्या असून, लवकरच जागा ताब्यात घेण्यात येतील.

मा. महापौर : तात्काळ अशा जागा मनपाने ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करावी. या संदर्भात १ तारखेला पुन्हा चर्चा करण्यात येईल.

**४) वाचनालय प्रवेश फी व मासिक वर्गणी दरवाढ**

श्री. अंबादास दानवे : यातील क्र. १ जसेच्या तसेच ठेवावे क्र. ३ मध्ये मासिक वर्गणी २०.०० रुपये करावे तसेच विलंब शुल्क १.०० करावे.

मा. महापौर : मासिक वर्गणी १०.०० ऐवजी २०.०० रुपये करण्यात येते. तसेच विलंब शुल्क ०.५० पैसे ऐवजी १.०० करण्यात येते.

**५) मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकी कर व्याज आकरणी**

डॉ. भागवत कराड : स्थायी समितीत दुसरा प्रस्तावमध्ये थकीत रक्कमेवर १५% ऐवजी १०% मंजूर केलेले त्यास मान्यता दयावी.

श्री. सुदाम सोनवणे : थकित रक्कमेवर १५% व्याज आकरणी करावी, जेणे करुन लोक स्वतःहून थकित व चालू रक्कम भरतील.

श्री. भाऊसाहेब ताठे : पुर्वी २८२ घरांना पाणीपट्टी माफी बद्दल निर्णय झालेला आहे.

मा. महापौर : थकित रक्कमेवर १५% व्याज आकारणी करण्यात यावी, यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**६) व्यापारी वापरात असलेल्या नळ जोडणीचे मिटर पध्दत अवलंबिणे**

श्री. सुदाम सोनवणे : ही मीटर योजना पध्दत सफल झाल्यास शहरासाठी जे निवासी नळ वापरात आहे. त्यांचेसाठी सुध्दा राबविता येईल, जेणेकरुन जास्तीच्या पाण्याचा दुरुपयोग होणार नाही.

डॉ. भागवत कराड : या अगोदर काही ठिकाणी मिटर योजना अवलंबिली होती त्याची सुध्दा स्थिती सध्या कशी आहे याचा खुलासा करावा, तर पुढील कार्यवाही व्हावी.

श्री. सुदाम सोनवणे : १४०० प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे. त्यांना व्याज आकारले जात नाही.

श्री. स. अली मिरा सलामी : थकित रक्कमेवर व्याज आकरणीचा जो निर्णय घेतला तो योग्य नाही. ही मालमत्ता स्वतःची असते याचा विचार व्हावा ज्यांच्याकडे

थकित रक्कम जवळपास १०-१५ वर्षापासूनची आहे. यास जबाबदार प्रशासन सुध्दा आहे. १५% ऐवजी ५% आज पासून व्याज आकरणी करावी.

डॉ भागवत कराड : जे कर भरणार नाही त्यांचेवर कडक कार्यवाही करावी. बँकेच्या दरापेक्षा कमी व्याजदर आहे.

श्री. किशोर तुळशीबागवाले : मालमत्ता कर कोणता निकष लावून आकारला जातो. जुन्या शहरासाठी किती व नविन मालमत्तासाठी किती.

मा. आयुक्त : कोणत्याही वस्ती मध्ये मालमत्ता असेल त्याला मालमत्ता कर लागतोच जे जुन्या शहरात मालमत्ता आहे. तेथील लोक जे मनपा लाईट, ड्रेनेज, रस्ते विकास कामे करते त्याचा फायदा घेतात अशा मालमत्ता धारकांवर मालमत्ता कर बंधनकारक असते. नियमाप्रमाणे कर भरण्याची जबाबदारी मालमत्ता कर धारकाची आहे. तो कर भरीत नसेल तर वसुल करण्याचे काम महापालिकेच आहे. मालमत्ता कर हा ॲडव्हॉन्स मध्ये भरावा लागतो. परंतु महापालिकेमध्ये मर्च पर्यंत वाट पाहावी लागते, त्या नंतरही भरीत नाहीत म्हणून, थकबाकी होते. व्याज आकरणी केल्यास यावर्षी रक्कम भरणा केली नाही तर, पुढील वर्षी जास्त रक्कम द्यावी लागेल या भितीने लोक भरणा कतील, जे वळेवेर म्हणजेच ३० जुन पुर्वी भरतील. अशा करधारकांना ५% ऐवजी ६% स्थायी समितीने सवलत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. एम.एस.ई.बी. महापालिकेकडे असलेल्या रक्कमेवर व्याज आकारते याचे पाठीमागे जी भूमिका आहे ती समजून घेण्याची गरज आहे. व्याज लावून उत्पन्न वाढेल असा मुद्दा नाही, परंतु कर भरण्याची जनतेची प्रवृत्ती कशी वाढेल ही भूमिका यासाठी मागची आहे.

श्री. किशोर तुळशीबागवाले : जुन्या शहरासाठी एन. आर. व्ही. दर ४/- ऐवजी ९ रुपये केले या कर धारकावर अन्याय होत आहे.

मा. महापौर : आजची सभा तहकुब करुन दि. १-४-२००२ रोजी सकाळी ११.३० वाजता कामकाजास सुरुवात होईल.

या बरोबरच " जन गण मन " या गिताने आजच्या सभेचे कामकाज संपले असे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## *दिनांक १-४-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**शनिवार दिनांक ३०-३-२००२ रोजी तहकुब करण्यात आलेली औरंगाबाद महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय विशेष सर्वसाधारण सभा सोमवार दि. १-४-२००२ रोजी दुपारी १.०० वाजता मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षतेखाली मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त यांचेसह संबंधित अधिकारी वर्ग तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष | स. सभासद |
| २) | स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ३) | स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ४) | स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ५) | स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ६) | स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ७) | स. स. श्री शे. ईलीयास किरमानी शेख उमर | -//- |
| ८) | स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ९) | स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| १०) | स. स. श्री कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| ११) | स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १२) | स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १३) | स. स. सौ.कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १४) | स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १५) | स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| १६) | स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| १७) | स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| १८) | स. स. सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| १९) | स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २०) | स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २१) | स. स. श्री अब्दुल रशिद अ. सत्तार | -//- |
| २२) | स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| २३) | स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| २४) | स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| २५) | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | -//- |
| २६) | स. स. श्री. नासेर खान सरदार खान | -//- |
| २७) | स. स. श्री. सोनवणे सुदाम रामदास | -//- |
| २८) | स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत | -//- |
| २९) | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुडंलिक | -//- |
| ३०) | स. स. सौ. नुसरत बानो फिरोजखान | -//- |
| ३१) | स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |

| | | |
|---|---|---|
| ३२) | स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | -//- |
| ३३) | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| ३४) | स. स. सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग | -//- |
| ३५) | स. स. सौ. ताराबाई सुध्दाकर जेजुरकर | -//- |
| ३६) | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | -//- |
| ३७) | स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम | -//- |
| ३८) | स. स. सौ. संगिता बाळू मैंद | -//- |
| ३९) | स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ४०) | स. स. श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरैशी | -//- |
| ४१) | स. स. श्रीमती शाहीन जफर महमुद जफर | -//- |
| ४२) | स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण | -//- |
| ४३) | स. स. श्री ओक जयवंत केशवराव | -//- |
| ४४) | स. स. श्री स. सलीम स. युसूफ | -//- |
| ४५) | स. स. श्री मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ४६) | स. स. श्री अफसर खान यासीन खान | -//- |
| ४७) | स. स. श्री लकडे भरत श्रीपती | -//- |
| ४८) | स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन | -//- |
| ४९) | स. स. श्री सलीम पटेल समशेर पटेल | -//- |
| ५०) | स. स. श्री कैसर यान बद्रोद्यीन खान | -//- |
| ५१) | स. स. सौ. बबीता सुभाष कागडा | -//- |
| ५२) | स. स. श्री. सय्यद अली सलामी स. मीरा सलामी | -//- |
| ५३) | स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज | -//- |
| ५४) | स. स. सौ निखत परविन ईजाज अली | -//- |
| ५५) | स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहुन | -//- |
| ५६) | स. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | -//- |

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२) स. स. श्री. घडामोडे भगवान देवीदास
३) स. स. श्री. तरवेंद्रसिंग महेद्रसिंग धिल्लन

**संवाद :**

श्री. संजय शिरसाठ : गेल्या २२ तारखेला महापौर पदाचे जात पडताळणी समितीने प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आलेले होते. त्यानंतर मा. आयुक्त यांनी गंभीर दखल घेतली १ तासाच्या आत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करुन महापौरांकडे असलेले सुरक्षा रक्षक काढण्यात आले. महापौरांकडील वाहन कशा पध्दतीने तात्काळ प्रशासनाच्या ताब्यात येईल. तसेच प्रयत्न करण्यात आले काहीने पत्र दिले महापौर पदाचा दुरुउपयोग होईल. त्या दालनास कुलूप लावावे या सर्व प्रकरणाचा मा. आयुक्त यांनी दखल घेऊन कार्यवाही केल्या बद्दी मी मा. आयुक्त यांचे अभिनंदन करतो. परंतु स. स. श्री. सुरगोणीवार नारायण यांचे सुध्दा प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने १४-१२-२००१ ला रिजेक्ट केले. तेव्हा पासून कोणतीही कार्यवाही न करता

निवडणूक आयोगाकडे १८-१२-०१ ला कळवून याबाबत काय करायचे अशी विचारणा केली. शासनाकडून काही माहिती अदयाप प्रशासनाकडे त्या संदर्भात आलेली नाही. २२-३-०२ रोजी या शहराचे महापौर यांना अपमानस्पद पध्दतीने काढण्यात आले. परंतू जवळपास ३ महिने श्री. नारायण सुरगोणीवार यांनी या सभागृहाचे कामकाजात भाग घेतलेला आहे. त्यांनी मानधन घेतले त्यांनी स्थायी समिती सदस्य निवडीमध्ये मतदानामध्ये भाग सुध्दा घेतला मा. आयुक्तांना विचारणा करु इच्छितो की, त्यांना कोणत्या आधारे ३ महिन्यापासून कामकाजात भाग घेऊ दिला मानधन का देण्यात आले, मतदानात का भाग घेवू दिला. याचा खुलासा व्हावा. यावरुन मा. आयुक्तांनी पक्षपात केलेला आहे. एका पक्षाची भूमीका घेऊन मा. महापौर यांचेवर त्यांनी कार्यवाही केली हा पक्षपात झाली आहे म्हणून मी. मा. आयुक्तांचा निषेध करतो. त्यांनी जे मानधन घेतले ते मा. आयुक्तांच्या पगारातून कपात करावे.

मा. आयुक्त : सभागृहात वैयक्तिक स्वरुपात टिका होत आहे.

श्री. शिरसाठ संजय : मा. आयुक्त यांचेवर वैयक्तिक टिका केलेली नाही श्री. शैलेश कुमार शर्मा बोलत नाही. आयुक्तांना बोलत आहे. जे प्रशासन चालविते त्यांचेवर आरोप करीत आहे. जेव्हा पेपरला बातमी आली महापौर बंगला, महापौर दालनाला कुलूप लावण्यात आले. श्री. सुरगोणीवार यांचेवर ३ महिन्याची कार्यवाही झाली नाही. याचा सविस्तर खुलासा मा. आयक्तांनीच करावा सचिव हे प्रशासनाचे प्रतिनिधी नाहीत. मा. आयुक्तांनीच खुलासा करावा ही विनंती.

मा. महापौर : प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मा. आयुक्तांनीच द्यावे अशी नियमात तरतुद आहे मी सचिवांना विचारणा केली आहे. मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री. अंबादास दानवे : प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्तांनीच खुलासा दयावा.

मा. आयुक्त : ज्या ज्या स. सदस्यांचे जातीचे दावे अवैध झाल्यचे आदेश मिळाले ते सर्व राज्य निवडणूक आयोगाला पाठविण्यात आले. सदस्यांचे प्रकरण पाठविले, ऑर्डीनन्स झाला नंतर बिल झाले ते ही राज्य निवडणूक आयोगास कळविण्यात आले व अशा प्रकरणात मार्गदर्शन मागविले. सदस्यांचे जात प्रमाणपत्रा संबंधी जेव्हा जेव्हा आदेश प्राप्त झाले त्या त्यावेळी ते पाठविण्यात आले. मा. महापौर यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्या बाबत महापालिकेस जात पडताळणी समितीने कळविले त्यानंतर सर्वसाधारण सभा होती ती सभा पुढे ढकलण्यात आली. काही सदस्यांनी महापौर पद संपुष्टात आल्या बाबत लेखली पत्र दिले त्यानंतर आपण राज्य निवडणूक आयोगाला विचारणा केली की आता या प्रकरणांत काय करावयाचे काही नगरसेवकांनी लेखीपत्र दिले आहे की, असे प्रकरण झाले नंतर त्यांना महापौर पदी राहता येणार नाही. त्यावेळी राज्य निवडणूक आयोगाने असे सांगितले की, कायदयाची तरतुद अशी झालेली आहे की, ज्यावेळी त्यांचे असे आदेश झाले तेव्हापासून ते पद रिकामे झाले असे माणन्यात येईल. तुम्ही फक्त त्यांना लेखी कळवून द्यावे की, अश्या प्रकारचे आदेश झालेले आहे ते माहितीसाठी पाठवा. आपण त्याप्रमाणे जी जी प्रकरणे प्रलंबित होते त्यांना माहितीसाठी पाठविलेले आहे ही कार्यवाही व्यक्तीगत केली असे म्हणणे बरोबर होणार नाही. दुसरा प्रश्न आहे की, वाहन आणि सुरक्षा रक्षक मा. महापौर

साहेबांनी सकाळीच मला फोन करुन सांगितले होते की मी परत केलेले आहे.

मा. महापौर : आपले संबंधित अधिकारी यांनी मला फोनवरुन गाडी मागितली आहे. नगरसेवक या बाबतीत करीत आहे. त्यांना कुणी आदेश दिले.

मा. आयुक्त : सकाळी महापौर यांनी मला स्वतः बोलले आहे गाडी पाठवून दिलेली आहे व आपले सुरक्षा रक्षकही परत केलेले आहे. पेपरमध्ये जी बातमी आली त्याबद्दल मी स्वतः मा. महापौर साहेबांना बोललो, ही बातमी खोटी आहे. आपण याचा खुलासा करावा हे मी दोन वेळा मा. महापौर साहेबांना बोललो.

श्री. संजय शिरसाठ : माझा तो मुद्दा नाही. महापौश्र विषय सोडून द्या. ती कार्यवाही योग्य दि. १४-१२-२००१ रोजी श्री. सुरगोणीवार नारायण यांचे प्रमाणपत्र अवैध ठरविले त्यांचे बाबतीत का कार्यवाही केलेली नाही.

मा. आयुक्त : त्याचा खुलासा मी केलेला आहे. नगरसचित विभागाने प्रत्येक प्रकरणात जेव्हा आदेश प्राप्त झाले ते २-३ दिवसात आपण पाठविलेले आहेत. या बाबतीत मार्गदर्शन मागविलेले आहे. स्पष्ट मार्गदर्शन काही प्राप्त झालेले नाही या प्रकरणांत जेव्हा आदेश आले काही नगरसेवक आले व त्यांनी लेखी दिले की, आपण काय कार्यवाही करणार एक दोन नाही. ८-१० नगरररसवेक आले होते. एक नाही दोन नगरसेवकाचे ग्रुप आले. गनरसचिव यांना बोलावून विचारणा केली. आपण काय कार्यवाही करणार.

श्री. संजय शिरसाठ : आपण नगरसेवकांच्या बोलण्यावरुन कार्यवाही करणार का कायदयाप्रमाणे.

मा. आयुक्त : तेच तर मी बोलतो पुर्वी आपण जे पाठविलेले आहे. आपल्याला मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही. याची सतत मागणी आहे आपण दुरध्वनीवरुन विचारणा केली की काय करायचे त्यांनी सांगितले की, जे ॲक्ट मध्ये दिलेले आहे की, ज्यावेळी निकाल लागले त्यावेळी ते पद आपोआप रद्द होते. (स्टॅण्ड व्हॅकेट) तसे त्यांना फक्त कळवावे.

आपण महापौरांना दिलेले पत्र पाहिले तर फक्त माहितीसाठी दिलेले होते.

श्री. संजय शिरसाठ : आमचे म्हणणे आहे की, गेल्या ३ महिन्यात सुरगोणीवार यांचे वर का कार्यवाही केली नाही.

श्री. स. अली मिरा सलामी : आजची बैठक बजेटवर लावलेली आहे. इतर चर्चा करणे बरोबर होणार नाही. सर्वसाधारण चर्चेत हा विषय घ्यावा.

मा. महापौर : स. सदस्य श्री. सलामी आपण बसावे आपल म्हणंन ऐकले आहे. विषयावर होत आहे. असे आापले म्हणणे आहे विषयांतर नाही. महत्वाचा मुद्दा आहे आपण एकूण घ्यावे. प्रशासन कायदेशिर रित्या चालते का? कोणावर व्यक्तिगत आरोप नाहीत हाही महत्वाचा मुद्दा आहे कृपया आपण बसावे. या शहराचे महापौर यांना मा. आयुक्त यांनी जात पडताळणीच्या अहवालावरुन १ दिवसात पत्र देऊन कार्यवाही केली. मी प्रशासनाकडे गाडी जमा करीत आहे असे मी फोन करुन सांगितले असे उत्तर आयुक्तांनी दिले परंतु त्यानंतर सुध्दा मला फोनवरुन गाडी जमा करण्याबाबत संबंधित विभागाचे अधिकारी फोन करुन गाडी मागवितात याचा अर्थ तरी त्यांना

आदेश दिले होते. दुसरी बाजू बघीतली तर स. स. श्री. सुरगोणीवार नारायण यांचे बाबतीत ३ महिन्याने कार्यवाही केली.

श्री. संजय शिरसाठ : स. सदस्य श्री. सुरगोवार यांना मानधन दिले त्यांनी स्थायी समिती सदस्य निवडीच्या वेळेस मतदानात भाग घेतला उदया या संदर्भात कोणी न्यायालयात गेले तर, स्थायी समितीचे सभपती पदावर निवड करण्यास अडचण निर्माण होईल. दि. १४-१२-२००१ रोजी जात पडताळणी समितीने प्रमाणपत्र अवैध ठरविले त्यानंतर ३ महिने त्यांनी कामकाजमध्ये भाग घेतला दि. २२-३-२००२ रोजी मा. महापौर यांना जेव्हा पत्राने कळविले त्याच दिवशी स. स. श्री. सुरगोणीवार यांना सुध्दा जात प्रमाणपत्र अवैध झाल्याने आपले नगरसेवक पद संपुष्टात आले असे कळविले याची अर्थ मुद्दामधून उशीरा कार्यवाही झालेली आहे. याचा खुलासा झाला पाहिजे.

मा. महापौर : या बाबतीत आपण बेकायदेशीर सल्ला घेतला का?

मा. आयुक्त : काही जाणून बुजून कार्यवाही केली असा मुद्दा नाही. आपलेच लोक नगरसेवक काय कार्यवाही करणार आहे. त्यानंतरच आपण निर्णय घेतला आहे. आपण राज्य निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शन मागविलेले आहे. आपण संपूर्ण अभिलेष पाहू शकतात. प्रत्येक प्रकरण राज्य निवडणूक आयोगास पाठविलेले आहे.

मा. महापौर : यासंबंधी कार्यवाही करतांना कोणचा तरी कायदेशीर सल्ला घेतला असेल.

श्री. संजय शिरसाठ : मा. महापौरांना जी नोटीस देण्यात आलेली आहे. त्याबद्दल निवडणूक आयोगाचे मागदर्शन मागविले असेल, त्यांचे पत्र आपणाकडे असेल ते पत्र सभागृहास दाखवा त्यात काय मार्गदर्शन घेतले. फोनवर मार्गदर्शन घेतलं व ताबडतोब रद्द केले. गेल्या ३ महिने श्री. सुरगोणीवार यांचेवर कार्यवाही केली नाही.

मा. आयुक्त : आपण रद्द केलेले नाही. माझी आपणांस विनंती आहे पत्र आपण सभागृहासमोर ठेवावे जे महापौर साहेबांना दिलेले आहे. त्याची स्थळ प्रत नगरसचिव जवळ आहे. सर्व सदस्यांना कळावयास पाहिजे की, आपण काय पत्र दिले आहे. आम्ही ॲक्शन घेतले नाही, पत्र दिले. त्याचा आपण चुकीचा अर्थ लावतात. गाडी आम्ही मागितलेली नाही. मा. महापौर साहेबांनी स्वत: सकाळी सांगितले की, गाडी पाठवित आहे. मा. महापौर साहेब बसलेले आहेत ते आपणास सांगितले.

श्री. किशनचंद तनवाणी : नगरसेवकांनी पत्र दिल्यानुसार कार्यवाही केली असेल तर, चुकीचे होईल प्रशासनाने त्याचे माध्यमातून कार्यवाही केलेली नाही असे स्पष्ट होते.

श्री. अविनाश कुमावत : ज्या अधिकाऱ्यांनी महापौर याची गाडी मागविली आयुक्तांचे आदेश नसतांना कशी गाडी मागविली त्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी.

मा. महापौर : मा प्रकरणात वैयक्तीक काही प्रश्न चालू नाही. प्रशासनाने काय चुका केल्या या सभागृहासमोर आल्या पाहिजे. असे सभागृहाची भावना आहे. मला पत्र देऊन १ दिवसात कळविले त्याप्रमाणे संबंधित नगरसेवक श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या यांना एक दिवसात दिले का याचा खुलासा व्हावा.

श्री. सुदाम सोनवणे : आज अर्थसंकल्पीय सभा आहे परंतु एक हरकतीचा मुद्दा सभागृह नेते यांनी उपस्थित केला ती सुदा महत्वाचा आहे. कारण जे महापौर आहे ते

शहराचे प्रथम नागरिक आहे. त्यांचा सन्मान राखणे या सभागृहाचे कर्तव्य आहे. वृत्तपत्रात बातम्या कशा आल्या हे मला माहिती नाही. असे आयुक्त सांगातात. गाडी काढली, कॅबीन बंद केली, सुरक्षा रक्षक काढले या बातम्या पेपरला आल्या या गोष्टीचा खुलासा झाला पाहिजे ज्या अधिकारी यांनी गाडी मागितली, आयुक्तांचे आदेश नव्हते तर गाडी कोणाच्या आदेशानुसार मागतिली, असा प्रश्न आहे. संबंधित अधिकारी यांनी स्वतः जाणून बुजून फोन केला का? त्या अधिकाऱ्यावर आजच्या आज कार्यवाही झाली पाहिजे. महापौरांच्या अपमान म्हणजे या सभागृहाचा अपमान आहे. ज्या अधिकाऱ्यांनी गाडी मागविली त्या अधिकाऱ्यांना गाडी मागविण्याचा अधिकार नव्हता. जो पर्यंत कार्यवाही होत नाही तो पर्यंत हे सभागृह चालवू देणार नाही. आपण शिवसेनेचे महापौर आहेत म्हणून किंवा पक्षाचे आहात म्हणून बाजू घेत नाही. आपण शहराचे प्रथम नागरिक आहात. उदया आपल्या जागेवर कोणताही सामान्य व्यक्ती महापौर म्हणून असू शकेल. त्या दृष्टीकोनातून अशा प्रकारचा अन्याय कुणावर होता कामा नये. अशी सभागृहाची भावना आहे. आज आपला अपमान झाला यानंतर दुसऱ्या महापौरांचा अपमान करण्याची हिमत अधिकारी करतील. त्यादृष्टीने ज्या अधिकाऱ्यांनी मा. आयुक्तांचे आदेश नसतांना महापौरांना गाडी देण्याबाबत फोन केला त्या संबंधित अधिकाऱ्यांवर आजच कार्यवाही व्हावी.

श्री. संजय शिासाठ : स. सदस्य श्री. सुरगोणीवार यांचा १४-१२-२००१ ला लागलेला निकाल तीन महिन्यानंतर पत्र देऊन नगरसेवक पद रद्द झाल्याचे कळविण्यात आहे. एवढा उशीर का झाला. यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी. त्यांनी मानधन घेतले, स्थायी समिती सदस्य निगडीत भाग घेतला. महत्वाचा विषय आहे. यास जबाबदार कोण आहे.

मा. महापौर : नगरसचिव यांनी खुलासा करावा.

नगरसचिव : प्रभाग क्र. ५२ चे स. नगरसेवक श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिनांक २१-११-२००१ रोजी अवैध ठरविलेले आहे. सदर आदेश महानगरपालिकेस दिनांक १२-१२-२००१ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अहवाल राज्य निवडणूक आयोग मुंबई यांचेकडे दिनांक १८-१२-२००१ रोजी पाठविण्यात आलेला आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष भागात प्रवर्ग (जात प्रमाणपत्र देण्याचे व त्याचा पडताळणीचे विनिमय) अधिनियम २००० हे महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १८-१०-२००१ नुसार अंमलात आले आहे. सदर तरतुदी नुसार जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर सभासदत्व आपोआप रद्द होते. या संदर्भात राज्य निवडणूक आयोग मुंबई यांना दिनांक १९-१२-२००१ च्या पत्राने मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. या अधिनियमाचे कलम १०(४) प्रमाणे सदस्यत्व आपोआप रद्द होते. ही बाब कुणी कळावावयाचे या बद्दल मा. राज्य निवडणूक आयोगाकडून लेखी माहिती प्राप्त झालेली नाही. दिनांक २२-३-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे जाती प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर महापौर दालन बंद करण्यात यावे. असे पत्र मा. विरोधी पक्ष नेता यांनी दिलेले आहे. या संदर्भात यांचेशी प्रत्यक्ष दुरध्वनी वरुन संपर्क साधला असता अनर्द

होण्याबाबतची माहिती संबंधितांना कळविण्यात यावी, असे मार्गदर्शन प्राप्त झाल्यामुळे मा. आयुक्त यांनी या दोन्ही प्रकरणात कार्यवाही केलेली आहे.

श्री. संजय शिरसाठ : दिनांक २१-११-२००१ ला स. सदस्य श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले त्याची प्रत दिनांक १४-१२-२००१ ला महानगरपालिकेस मिळाली याचा अर्थ २० दिवसानंतर प्रत आली. मा. महापौर यांचे बाबतीत ताबडतोब संध्याकाळीच पत्र आले. २२ तारखेला तात्काळ १ दिवसांत कार्यवाही झाली एक सदस्यांचे प्रमाणपत्र रद्द होऊन ३ महिन्यांचा कालावधी झाला. तरी प्रशासनाने कार्यवाही केली नाही. प्रशासनाने निवडणुक आयोगाला कळविले फक्त रद्द करता येते. परंतु ३ महिने कार्यवाही केली नाही. जबाबदार कोण, जबाबदारी निश्चित करावी.

श्री. स. अली सलामी : आताच प्रशासनाचा व सचिव यांनी खुलासा कोली. या शहराचे प्रथम नागरिक म्हणून महापौर यांचा प्रश्न होता. सन्मान असावा यास सहमत आहे. दुसरीकडे ज्या स. सदस्यांची गोष्ट होते ते सदस्य आहेत, नगरसेवका पेक्षा महापौरांना जास्त सोयी, आर्थिक सवलती देण्यात येतात व कार्यवाही हाच विचार करुन केली गेली की, जी सवलत मिळते असे, गाडी (वाहन) बंगला (निवास स्थान), त्यांना बसण्यात स्वतंत्र दाल, त्यांचेकडे कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षक दिलेले असतात. याचा अर्थ आर्थिक ज्या सवलती आहे, तो महापौर यांचेकडे असतात. नगरसेवकाकडे नसतात. त्या दृष्टीकोनातून प्रशासनाला तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता भासली असेल, दुसऱ्या विषयावर चर्चा न करता अर्थसंकल्पावर चर्चा करावी. सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो कि, माजी स. सदस्या डॉ. माया लाडवाणी यांचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने अवैध केलेले होते. त्यानंतर त्यांनी ३ वर्ष त्यांचेवर कार्यवाही न होता त्यांनी ३ वर्ष या सभागृहाच्या कामकाजात भाग घेतला मानधन घेतले त्यावेळेस का कार्यवाही झाली नाही. विरोधी पक्ष नगरसेवक त्यांचेकडे गेले होते. जातीचे प्रमाणपत्र रद्द झाले. त्यांचेवर कार्यवाही करावी. याप्रमाणे सुरगोणीवार यांचे विरुध्द पत्र आले होते का? आपणाकडून कोणी गेले होते का? एक याचाही खुलासा व्हावा कि, मा. महापौर यांनीच अधिकाऱ्यांना फोन करुन गाडी घेऊन जाण्यास सांगितले. फोन कुणी केला याचा खुलासा व्हावा. आपण अधिकाऱ्यांना केला की, अधिकाऱ्यांनी आपल्याला केला. कोणावर विश्वास ठेवावा.

मा. महापौर : असेल तर, संबंधित अधिकारी खुलासा करतील. अति. शहर अभियंता यांनी आपल्याला दुरध्वनी केला. याची सत्यता पाहिजे. त्यांनी गाडी मागितली की, आपण हे देखील समजले पाहिजे.

श्री. अंबादास दानवे : गाडी जमा करण्या संदर्भात आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले होते का? की आपण स्वतः गाडी जमा केली. याचा सुध्दा खुलासा व्हावा. तसेच स. सदस्य श्री. सुरगोणीवार यांचे जातीचे प्रमाणपत्र रद्द होऊनही त्यांनी ३ महिने या सभागृहात येऊन जो जो लाभ घेतला, मानधन घेतले, एवढेच नव्हे तर, त्यांनी मतदानात सुध्दा भाग घेतला याचे काय कारणार हा महत्वाचा विषय आहे. यास जबाबदार कोण आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी. एक अधिकारी या शहराचे प्रथम नागरिक महापौर यांचे वाहन (गाडी) मागतात, आयुक्तांच्या आदेशाशिवाय मागवू शकत नाही.

श्री. संजय शिरसाठ : जो कुणी या सभागृहाच्या सदस्य नसतांना सभागृहात येतात. याबाबत गुन्हा दाखल होऊ शकतो. महत्वाच्या विषयावर चर्चा चालू असतांना मी जाणीव पुर्वक आरोप करतो की, काही नगरसेवक अधिकाऱ्यांची बाजू सांभाळण्याचा प्रयत्न करीत आहे. या ठिकाणी आथिक बाबींचा प्रश्न नाही. नगरसेवक पदाचा प्रश्न उपस्थित होतो. उदया माझे नगरसेवक पद रद्द झाले तर आपण मला गेट मध्ये येऊ द्याल का? हा प्रश्न आहे.

श्री. किशोर तुळशीबागवाले : महापौर यांचे जात प्रमाणपत्र अवैध झाल्याच्या बातम्या वृत्तपत्रात आल्या त्या दिवशी बैठक होती सभागृह बंद दिसून आले. त्यानंतर आम्ही सर्व विरोधी पक्षाचे सदस्य आमच्या कडे आले व आम्ही सर्व मा. आयुक्ताकडे गेलो व निकाल त्यांच्या विरुध्द लागल्याने त्यांची गाडी, दालन घेण्यात यावे. अशी लेखी तक्रार केली, त्यामध्ये कोणत्याही अधिकाऱ्याला, पदाधिकाऱ्याला दोषी धरण्यात येऊन नये. तो आमचा अधिकार होता, तो आम्ही मा. आयुक्तांना सांगितला, त्यानुसार मा. आयुक्तांनी कार्यवाही केली यात अधिकाऱ्यांचा काही दोष नाही. आमची जी भूमिका होती, तो अधिकार वापरलेला आहे. आपण सभागृहात येऊन सभा तहकुब केली असती तर हा वाद निर्माण झाला नसता.

श्री. संजय शिरसाठ : आयुक्तांनी जी कार्यवाही केली ती योग्य आहे. विरोधी पक्ष नेता यांनी पत्र देऊन त्यांचा अधिकार दाखविला यात आमचा आक्षेप नाही. परंतु ३ महिन्यापुर्वी एका सदस्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर कार्यवाही होते हे बरोबर आहे का? त्यांनी या सभागृहात भाग घेतला मानधन घेतले मतदान करु दिले. यास प्रशासन जबाबदार आहे.

श्री. किशोर तुळशीबागवाले : विरोधी पक्षाची इच्छा होती. त्यादिवशी आपण सभागृहात यावे. आपण कामकाज न पाहता दुसऱ्याला बसवावे. सभा चालवावी.

श्री. काशीनाथ कोकाटे : महापौर व एक सदस्य यांना वेगवेगळा न्याय मिळला अशी चर्चा होत आहे. सदस्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर तसा अहवाल महानगरपालिकेस प्राप्त तो महानगरपालि प्रशासनातर्फे राज्य निवडणूक आयोगाने यांचेकडे पाठविण्यात आला. तसा खुलासा आताच प्रशासनाने केलेला आहे. मार्गदर्शन आयोगाने दिले नाही. म्हणून त्यांचेवर कार्यवाही झालेली नाही. आताही निवडणूक आयोगाकडून पत्र आले नाही तरी, कार्यवाही केली. त्यांनी मार्गदर्शन मागविले. जो पर्यंत मार्गदर्शन मिळाले नाही. तोपर्यंत कार्यवाही झाली नाही.

श्री. अंबादास दानवे : शासनाने दिनांक १८-१०-२००१ ला जी. आर. काढलेला आहे. एकदा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने रद्द केल्या नंतर त्या त्या लोकप्रतिनिधी यांचे पद रद्द होते. आताच सचिव यांनी वाचून दाखविले असे असतांना सुध्दा पुन्हा निवडणूक आयोगास विचारण्याचा प्रश्नच कोठे येतो. याला दोषी कोण कायदा तयार झाल्यानंतर निवडणूक आयोगाला विचारण्याचा प्रश्न कुठे येतो. निवडणूक आयोगाचे उत्तर आले नाही. आता त्यांना नगरसेवक पदावरुन काढून टाकले शासनाने मार्गदर्शल केले नाही तर, का काढले असाही प्रश्न निर्माण होतो. यावरुन प्रशासन दोन्ही बाजू बरोबर आहे असे दाखवित आहे. पहिला मुद्दा कायदा तयार केलेला असतांना मार्गदर्शन का मागविले दुसरा मुद्दा मार्गदर्शन न येताच स. सदस्य यांना पदावरुन का कढण्यात आले.

मा. महापौर : सर्व सभागृहाचे मत ऐकले. विरोधी पक्ष नेतयांनी त्यांची भूमिका मांडली सभागृहाला कुलूप असतांना आम्ही सर्व नगरसेवक एकत्र आलो. आयुक्तांकडे गेलो. त्यांना पत्र दिले मागणी केली दोन्ही बाजूंची चर्चा ऐकून थोडेसे याबाबतीत सभागृहाचे एकमत होत नाही व प्रशासकीय खुलासाही बरोबर होत नाही. पत्रही दिले, राज्य निवडणूक आयोगाला विचारण्यात आले. दुरध्वनीवरुन विचारुन मला पत्र देण्यात आले आणि त्याच स. सदस्यांचे पत्र पाठवून विचारण्यात आले. त्याचे पत्र प्राप्त न होताच त्याला घरी बसविले म्हणजे सभासद रद्द होईल. अशी सूचना दिलेली आहे. हा जो प्रकार आहे, जसा खुलासा पाहिजे तसा खुलासा होत नाही.

श्री. गणेश तांबे : महापौरांचे जात प्रमाणपत्र रद्द झाल्यानंतर त्यांना पदावरुन कमी करण्यात आले स. सदस्यांचे जात प्रमाणपत्र रद्द झाले त्यावेळेस त्यांना देखील अश्या प्रकारे सुचना द्यावयास पाहिजे होती. तसे न होता गेल्या तीन महिन्यापासून स. नगरसेवक सभागृहात उपस्थित होते. त्यांनी विकास कामे करुन घेतले असतील तो भाग वेगळा परंतु स्थायी समितीचे आठ सदस्यांची निवड केली. त्यावेळी जे सदस्य सभागृहाचे सदस्य नाही. त्यांनी सभागृहात येऊन मतदानात भाग घेतला त्यांनी मतदान केले नसते तर, इतर दुसरे सदस्य जे निवडून आलेल्या पैकी आले नसते जे विजयी झाली नाही ते सुध्दा निवडून येऊ शकले असते. या सर्व बाबींचा विचार करुन पुन्हा स्थायी समितीच्या ८ सदस्य पदाची निवडणूक घेणार आहे का हा माझा प्रश्न आहे.

मा. महापौर : कोणाचे तरी नुकसान झाले हक्क डावलला गेला. असे आपले म्हणणे आहे. प्रशासनाने याबाबतीत खुलासा करावा आपण प्रशासनातर्फे खुलासा मागितला आहे. कोणाचा तरी हक्क दुखवला आहे.

श्री. अंबादास दानवे : या ठिकाणी प्रशासनाने खुलासा केला नाही तर आम्ही बहिष्कार टाकू.

मा. महापौर : प्रशासनाला काही अडचण आहे का नगर सचिव माहिती दयावी.

नगरसचिव : मी आपणास कायदयाची तरतुद वाचून दाखवित आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३४ महानगरपालिका इत्यादीच्या सदस्यांच्या अनर्हतेमुळे तिच्या कामकाजास बाध न येणे, पालिका सदस्य म्हणून किंवा महापौर किंवा उपमहापौर म्हणून किंवा महापालिकेच्या अध्यक्ष पदस्थ प्राधिकारी म्हणून किंवा या अधिनियमान्वये नेमलेल्या कोणाच्या ही समितीची किंवा उपसमितीचा सभापती किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या अनर्हतेमुळे किंवा तिच्या निवडणुकीत किंवा नेमणुकीत दोष असल्यामुळे, यथास्थिती महानगरपालिकेच्या किंवा अशा कोणत्याही समितीच्या किंवा उपसमितीच्या ज्या कोणत्याही कृतीत किंवा कामकाजास अशा व्यक्तीने भाग घेतला असेल त्या कृतीस किंवा कामकाजात ज्यांनी भाग घेतला होता अशा व्यक्तीपैकी बहुसंख्य व्यक्तींना काम करण्याचा हक्क असला पाहिजे.

३५. तद्विरुध्द सिध्द करण्यात येईपर्यंत सभांचे कामकाज उचित विधीग्राहय असणे - तद्विरुध्द सिध्द करण्यात येईपर्यंत, महानगरपालिकेच्या किंवा समितीच्या किंवा उपसमितीच्या ज्या ज्या सभेच्या कामकाजच्या बाबतीत या अधिनियमानुसार किंवा नियामानुसार कार्यवृत्त तयार करण्यात येऊन त्यावर सही करण्यात आली असेल ती प्रत्येक सभा रीतसह

बोलाविण्यात व भरण्यात आली आहे. असे मानले जाईल आणि त्या सभेचे सर्व सदस्य यथोचितरीच्या अर्हताप्राप्त आहेत असे मानले जाईल आणि जेथे असे कामकाज एखदया समितीचे किंवा उपसमितीचे कामकाज असेल तेथे अशा समितीच्या किंवा उपसमितीची रचना रीतसर करण्यात आली होती व अशा कार्यवृत्तात उल्लेख केलेल्या बाबींचा विचार करण्याचा तिला अधिकार होता असे मानले जाईल. असे दिले आहे.

श्री. अंबादास दानवे : शासनाचे दि. १८-१०-२००१ रोजी जे राजपत्रात काय दुरुस्ती झाली तो जी. आर. वाचून दाखवावा.

नगरसचिव : महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण गुरुवार दि. १८-१०-२००१ अन्वये महाराष्ट्र अनुसूचीत जाती जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जात प्रमाणपत्र देण्याच व त्याच्या पडताळणीचे विनिमय) अधिनियम २००० क्र. एसटीसी १००१ क्र. २७ अ (१०) महाराष्ट्र अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याचे पडताळणीचे विनमय) अधिनियम २००० सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३ याचे कलम १ च्या पोट कलम २ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त अधिनियम अमलात आणण्याचे दि. १८ ऑक्टोंबर २००१ हा निश्चित करीत आहे.

श्री. संजय शिरसाठ : या शासन राज पत्रानुसार ३ महिने स. नगरसेवक यांचे बाबतीत का कार्यवाही झालेली नाही.

नगरसचिव : या संदर्भात निवडणूक आयोग यांना वेळोवेळी पत्र पाठविण्यात आलेले आहे व दिनांक १९-१२-२००१ ला देखील पत्र पाठविले आहे. या अधिनियमाच्या कलम १०(४) नुसार संबंधितास कुणी कळवायचे याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. या संदर्भात वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे या कायदयानुसार सदस्याच अनर्द झाल्या बाबतचे पत्र निर्गमित करणे किंवा याबाबतची माहिती कोणी कळवावयाची याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. त्यांचेकडून लेखी स्वरुपात मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

श्री. भगवान घडामोडे : महत्वाच्या विषयावर बैठक बोलवलेली आहे. दुसरा प्रश्न या सभागृहात प्रथम नागरिक असलेले महापौर याचा अपमान झालेला असून, त्यांचे बाबतीत उपस्थित झाला हा सुध्दा महत्वाचा प्रश्न आहे. सचिव यांनी केलेला खुलासा मोघम आहे. कलम वाचण्याची आवश्यकता नसून प्रश्न असा निर्माण होतो की, एक सदस्यांचे जात प्रमाणपत्र रद्द झाल्यानंतर त्यांचेवर कार्यवाही करण्यास ३ महिने लागतात. महापौर यांचे जात प्रमाणपत्र रद्द झाले त्याचे बाबतीत १ दिवसात कार्यवाही केली कार्यवाही करण्याच्या कालावधीमध्ये तफावत येत आहे. याबाबत खुलासा दयावा असच महापौर याची गाडी (वाहन) निवासस्थान, कॅबीन कुणाच्या आदेशानुसार हस्तगत केलेले आहे. याचा सुध्दा खुलासा व्हावा. बाकीचे कलम वगैरे याची माहितीची आवश्यकता नाही व त्यानंतर बजेट वर चर्चा करावी.

श्री. सुदाम सोनवणे : स. सदस्य श्री. सुरगोणीवार यांचे जात प्रमाणपत्र अवैध होऊन ३ महिने झाले तसे पत्र महापालिकेस १२-१२-२००१ ला प्राप्त सुध्दा झालेले आहे. तीन महिने कार्यवाही केली नाही. सदस्या बाबत शासनाकडे मार्गदर्शन

मागविले जाते आपण पक्षपाती करता असे आमचे मत नारायण अणाच्या पत्राला येऊन ३ महिने झाले. आयोगाकडून खुलासा मागविला. आम्ही कार्यवाही केली नाही असे म्हणावे, सभागृहाचा वेळ वाया जाणार नाही. शहरांचे महापौर यांना राज्य मंत्र्याचा दर्जा देण्यात अलेला असून, माझ्या माहितीप्रमाणे राज्य मंत्र्यावर कार्यवाही करायची असेल तर, राज्यपालाचे मार्गदर्शन घ्यावे लागते त्यानुसार मा. महापौर यांचेवर कार्यवाही करण्यासाठी आयुक्तांनी राज्यपालाची मार्गदर्शन घेतले का? याचा खुलासा दयावा. परवानगी घेतली नसेल तर प्रशासनाने सभागृहाची दिशाभूल करुन पक्षपातीपणाने निर्णय घेतलेला आहे, केला नसेल त्याचे स्पष्टीकरण दयावे.

श्री. अंबादास दानवे : कलम ११, १२ नुसार यावर न्यायधिशांनी निर्णय घ्यायचा असतो.

श्री. स. सलीम स. युसूफ : एक कमीटी स्थापन करावी चौकशी अहवाल मागवावा आता बजेट वर विषयावर चर्चा सुरु करावाी. नसता वेगळी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करावी.

श्री. सुदाम सोनवणे : महापौर या शहराचे प्रथम नागरिक आहे. त्यांना या बाबतीत प्रशासनाने अपमानीत केलेले आहे. प्रशासनाने योग्य खुलासा करावा. नसता तो पर्यंत बैठकीचे कामकाज होऊ नये सभा तहकुब करावी.

मा. महापौर : प्रशासनाने ०२ मिनीटामध्ये खुलासा करावा महापौरांचा अपमान झालेला आहे. याचा अर्थ सर्व सभागृहाचा अपमान आहे. न्याय मागणी सभागृहाच्या वतीने होत आहे. प्रशासनाने योग्य खुलासा करावा.
(याच वेळी मा. महापौर यांचे डायस जवळ स. सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही बजेट या विषयावर चर्चा करावी असे काही सदस्य मागणी करतात.)

श्री. संजय शिरसाठ : एक सदस्य श्री. सुरगोणीवार नारयण यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर सुध्दा त्यांनी मानधन घेतले स. सदस्य श्री. सुरगोणीवार यांनी मतदानात भाग घेतला यास जबाबदार कोण आहे. याचा खुलासा दयावा या ठिकाणी सभागृहाचे सचिव व आयुक्त हे बसलेले असतात. तसेच विधी सल्लागार यांचे सुध्दा मत घ्यावे.

मा. महापौर : आपण नियमाप्रमाणे केले असे म्हणायचे का निवडणूक आयोगाला पत्र दिले माहिती घेतली हे नियमाप्रमाणे केले आहे का?

श्री. काशीनाथ कोकाटे : बजेटची बैठक बोलविलेली असून, त्यावर चर्चा व्हावी. सभागृहाचा वेळ वाया जात आहे आम्हाला दुसरे काम नाही का प्रशासनाने नियमाने कार्यवाही केलेली आहे. या अगोदर सुध्दा सभा तहकुब केलेली होती. सभागृह चालविण्याची ही पध्द्त नाही.

डॉ. आशा बिनवडे : महापौरांच्या बाबतीत जो प्रश्न उपस्थित झाला तो सुध्दा महत्वाचा असून प्रशासन खुलासा करण्यास वेळ काढूपणा करीत आहे.

मा. आयुक्त : सविस्तर सभागृहात यापुर्वी माहिती दिलेली आहे जे यात जबाबदार असतील त्या बाबतीत चौकशी करुन कार्यवाही करता येईल.

श्री. संजय शिरसाठ : याबाबत कमीटी गठीत करावी कमीटीने ८ दिवसाच्या आत अहवाल सादर करावा तसे आदेश करावे.

मा. महापौर : या संदर्भात कमीटी स्थापन करण्यात येते या कमीटीत प्रशासनातर्फे मुख्य लेखा परिक्षक श्री. सोनार, उपआयुक्त (प्र.) श्री. कांबळे, मुख्य लेखाधिकारी, श्री. खैरनार तसेच सदस्या पैकी मा. उपमहापौर श्री. राजु शिंदे, मा.

विरोधी पक्ष नेते श्री. तुळशीबागवाले किशोर, तसेच मा. सभागृह नेते श्री. संजय शिरसाठ तसेच स. सदस्य श्री. भगवान घडामोडे यांचा समावेश करण्यात येतो. कमीटीने रिपोट ८ दिवसात तयार करुन हा रिपोर्ट येणाऱ्या सर्वसाधारण सभेत मा. आयुक्त सादर करतील.

श्री. अफसरखान : आघाडीच्या सदस्याचा कमीटीत समावेश करावा.

श्री. गणेश तांबे : या विषयावर आपली भूमिका डळमळीत अशी होती तर हा विषय सभागृहात घेण्याची आवश्यकता नव्हती. स्थायी समिती सदस्य पदाची पुन्हा निवडणूक घेणार का याचा सुध्दा खुलासा व्हावा.

श्री. अंबादास दानवे : आयुक्त चौकशी करतील त्यांचेवर जबाबदारी सोपवावी.

श्री. नासीरखान रहेमानखान : सभागृहात सविस्तर चर्चा होत आहे. मतदानाचा सुध्दा प्रश्न उपस्थित झाला मतदानाच्या दिवशी मी फक्त ३ मिनिटे उशीरा आलेलो होतो. तेव्हा मला मतदान करु दिले नाही. यापुर्वी एक सदस्यांचे जात पडताळणी समितीने जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरवूनही ३ वर्ष सभासद होते. स्थायी समितीची निवडणूक रद्द करावी.

मा. महापौर : आपण सभागृहात ३ मिनिटे उशीरा आलेले होते मतदान करण्याची वेळ संपलेली होती. त्यावेळी सर्व नियम पाहण्यात आले. मतदान करता येणार नाही. म्हणून सचिव यांनी खुलासा केला होता. आताही प्रशासनाकडून खुलासा घेण्यात येत आहे. कुणाचा वैयक्तिक खुलासा नाही.

श्री. गणेश तांबे : मा. आयुक्त या बाबतीत चौकशी करुन कार्यवाही करतील.

मा. महापौर : ठिक आहे, सभागृहाच्या भावना लक्षात घेवून मा. आयुक्त यांनी सविस्तर चौकशी करुन अहवाल येत्या सर्वसाधारण सभेत सादर करावा. आता पाणीपट्टी दरवाढ यावर चर्चा करावी.

**७) पाणीपट्टी दरवाढ**

मा. महापौर : प्रशासनातर्फे १२००/- रु. वरुन २१००/- रु. पाणीपट्टी सुचविण्यात आलेली यावर ज्यांना मते मांडावयाची त्यांनी चर्चा करावी. एका वेळेस एकच सदस्यांनी बोलावे.

श्री. पांडूरंग तायडे : जी वाढ पाणीपट्टीत सुचविण्यात आली ती अत्यंत चुकीची असून, सिडको हडको भागात १ दिवसाआड पाणी दिले जाते. पाणीपुरवठा कमी करणे व वाढ सुचविणे बरोबर नसून, वाढ केल्यास मी महानगरपालिका गेट समोर आत्मदहन करीत याची नोंद घ्यावी.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वार्डात पाणी पुरवठा कमी होतो. १०-१५ मिनिटे सुध्दा पाणी येत नाही. त्यामुळे सर्वांनाच पिण्याचे पाणी भरपूर मिळत नाही. त्यामुळे पाणीपट्टी वाढ करु नये.

सौ. निखत परविन ईजाज अली : पिण्याचे पाणी कमी प्रमाणात येत असून पिण्याचे पाणी व ड्रेनेजचे पाणी ड्रेनेजचे एकत्र होते. त्यामुळे दुषित पाणीत येते. ड्रेनेजच्या बाबतीत गेल्यावेळी तक्रारी देऊन कायमस्वरुपी काम केले जात नाही. योग्य प्रकारे वसुली केली तर, तेवढा पैसा मिळतो.

श्री. प्रकाश निकाळजे : पाणीपट्टीत कोणता निकष लाऊन वाढ करण्यात आली. प्रशासनाने खुलासा करावा.

सौ. कुसूमबाई खरात : स्लम भागासाठी पाणीपट्टीत वाढ होऊ नये, सिडको-हडको भागात १२ महिने ऐवजी ६ महिनेच पाणी दिले जाते. १ दिवसा आड पाणी येते

त्यामुळे ६ महिन्याचीच पाणीपट्टी आकरणी व्हावी. तसेच मा. महापौर मा. आयुक्त यांनी सिडको हडको भागात जनता दरबार भरवावा, नागरिकांच्या पाण्याच्या बाबतीत तक्रारी ऐकून घ्याव्यात त्यानंतरच पाणीपट्टी वाढ करण्याचा विचार व्हावा. जनतेला पाणी मिळत नाही. म्हणून नगरसेवकांना त्यांचे अपशब्द ऐकून घ्यावे लागतात. जनता प्रशासनाकडे येत नाही. नगरसेवकाकडे सुविधा देण्याची मागणी करतात.

मा. महापौर : दरवाढ करण्याची आवश्यकता का पडली खुलासा करावा.

कार्यवाही अभियंता (पा. पु.) : सन २००२-२००३ या अर्थसंकल्पात पाणीपट्टी दरवाढ सुचविण्यात आलेली आहे त्याची कारणे अशी की, शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा विभागावर एकूण ३० ते ३२ कोटी रुपये दरवर्षी खर्च होतात. त्यातील जवळपास २४ कोटी रु. खर्च हा विज बिलाचा येतो. हा प्रचंड विज बिलाचा खर्च येण्याचे कारण जायकवाडी पासून शहरापर्यंत पाणी येते. याचे अंतर ५० कि. मी. असून जायकवाडी पेक्षा हे शहर १०७ मीटर उंच असल्याने पाणी पुरवठा करतांना तीन ठिकाणी पंपीग करुन पाणी आणावे लागते व त्यावर विज बिलापोटी २४ कोटीचा खर्च होतो. तसेच दरवर्षी किंवा दोन वर्षाला विज मंडळाची दरवाढ होती. त्यामुळे २४ कोटी वरुन यापुढे आणखी खर्च वाढेल. अंदाजे २४ कोटी वरुन रु. ३० कोटी खर्च विज बिलावर होण्याची शक्याता आहे. पाणीपट्टी पोटी १० ते ११ कोटी मिळतात. यावरुन वर्षाला पाणी पुरवठयासाठी होणारा खर्च याची तुट १९ कोटी येते व इतकी मोठी रक्कम कोणत्याही उत्पन्नाच्या माध्यमातून वसुल होणार नाही. म्हणून ही दरवाढ प्रस्तावित केलेली आहे. तसेच शासनाने एक परिपत्रक काढून ही योजना " ना नफा ना तोटा " या तत्वावर चालवावी नसता शासनाकडून महानगरपालिकेस उपलब्ध होणारे शैक्षणिक अनुदान मिळणार नसून परस्पर वळती वरुन घेणार आहे, या दृष्टीने या दरवाढीच्या प्रस्तावावर सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा. पाणीपट्टी वाढीचा निर्णय घेतल्यास येणारी तुट कमी होईल.

श्री. प्रकाश निकाळजे : एकूण ३२ कोटी खर्च होतो. २४ कोटी विज दराचा येतो तर ८ कोटी इतर देखभाल दुरुस्तीस खर्च येतो. सुचविलेली दरवाढ मंजूर केल्यास किती उत्पन्न प्राप्त होऊ शकेल.

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : या दरवाढीमुळे एकूण उत्पन्न १९ कोटी होईल असे अपेक्षित आहे.

मा. महापौर : चालू मागणी १० ते ११ कोटीची आहे, ९००/- रु. वाढ केल्यास ९ कोटी रुपये आणखी येऊ शकेल. याचा अर्थ २० ते २१ कोटी उत्पन्न येईल, एवढी रक्कम वसुल होईल का?

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : दरवाढ केली तर त्याप्रमाणे वसुली करण्यात येईल.

मा. महापौर : मागील वेळेस १२.८९ कोटीचे उद्दीष्ट होते. यात डिमांड मध्येच रिवाईज करण्यात आले वाढवून घेऊन पुन्हा ते थकबाकीमध्ये येणार का? हा प्रश्न येतो. थकबाकी सोडून जे चालू डिमांड आहे ती वसुली झालीच पाहिजे, ९००/- रु. वाढ केल्यास नक्कीच २० ते २१ कोटी येणार परंतु पुन्हा एवढी वसुली न होता डिसेंबर मध्ये निश्चित केलेले डिमांड प्रशासनातर्फे रिवाईज होते. दरवाढ न होता वसुली सुध्दा होणे आवश्यक आहे. यावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर योग्य निर्णय घेता येईल.

श्री. प्रकाश निकाळजे : नळ कनेक्शनची संख्या किती आहे, खुलासा द्यावा.

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : घरगुती वापरासाठीचे ८३, ४३३ नळ कनेक्शन असून, व्यावसायिक नळ कनेक्शन ७४४ आहे.

श्री. स. अली सलामी : मागील वर्षी पाणीपट्टी किती वसुल झालेली आहे, तसेच यावर्षी किती झालेली आहे. माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : मागील वर्षी रु. ६ कोटी, यावर्षी रु. ८.८२ कोटी झालेली आहे.

श्री. स. अली सलामी : उद्दीष्टाच्या टक्केवारी नुसार किती वसुल झाले. मागील वर्षी व चालू वर्षाची टक्केवारी द्यावी.

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : मागील वेळेस ६०% वसुल झालेली होती, या वर्षी उद्दीष्टाच्या ८०% वसुली झालेली आहे. सुधारित मध्ये ८ कोटीचे उद्दीष्ट ठरविण्यात आलेले होते. त्यापेक्षा ८२ लक्ष जास्त वसुल झाले.

श्री. संजय शिरसाठ : प्रशासनाला वाटेल तेव्हा टारगेट कमी करणार १५ कोटीचे उद्दीष्ट ८ कोटीवर आणले उदया ६ कोटीवर आणणार वसुली ७ कोटी करणार व १२०% वसुली झालेली सांगणार हे धोरण बरोबर वाटत नाही. नळ कनेक्शन किती आहे, त्याचा खुलासा द्यावा.

मा. महापौर : आपले अधिकारी / कर्मचारी वसुलीच्या बाबतीत मागे असून, याचा त्रास सामान्य नागरिकांवर होतो. चालू डिमांड सुध्दा वसुल होत नाही. प्रत्येक वर्षी थकबाकी राहते हे बरोबर नाही.

श्री. स. अली सलामी : एकूण उद्दीष्टावर ६० ते ८०% वसुली झाली असे सांगण्यात येते. चालू डिमांडच्या विचार केल्यास फक्त २८ ते ३०% वसुली झालेली दिसून येते. पुन्हा खुलासा घ्यावा.

सौ. साधना सुरडकर : जी वाढ सुचविण्यात आली त्या संदर्भात प्रशासनाच्या चुकीमुळे नागरिकांवर बोजा टकाण्यात येत आहे, असे म्हणता येईल. मागील आकडेवारी पाहता सन ९८-९९ मध्ये ११ कोटी प्रस्तावित केलेले होते. ८ कोटी वसुल केले ९९-२००० मध्ये १३ कोटी प्रस्तावित केलेले होते. ९ कोटी वसुल झाले २०००-२००१ मध्ये १७ कोटी अपेक्षित केले होते. त्यातील फक्त ९.५० कोटी वसुल झाले. सन २००१-२००२ साठी २१ कोटी प्रस्तावित केले होते. साधारण ९ कोटी वसुल झालेले आहे. ८० ते ८२ हजार नळ कनेक्शन दिसते. मुळात ६० एम. एल. डी. च पाण्याचा वापर आपण करतो ५० एम. एल. डी. पाण्याचा वापर करीत नाही. त्याचा हिशोब नाही व ६० एम. एल. डी. पाण्याचीच जी वसुली होते, त्याचा अभ्यास केला तर, ५०% वसुल होते. वसुली ही प्रशासनाच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या दोषामुळे आज नागरिकांवर बोजा टाकण्याचा प्रस्तावित होते. हे प्रशासनाने धोरण योग्य वाटेल का? महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून, पाणी प्रश्न सर्वांचा जिव्हाळयाचा प्रश्श्न आहे. शहरातील जनतेला पाणी पुरवठा करणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. जे कर्तव्य महानगरपालिकेचे आहे, तिथेच दुर्लक्ष होत असेल तर व प्रशासनाच्या चुकल्यामुळे जे कर भरतात. त्यांचेवर पुन्हा का म्हणून बोजा टाकणार नागरिक यास जबाबदार नाही. नियोजन नाही, वसुली जे करतात ते यास जबाबदार आहे. त्यांना सोडून नागरिकांना जबाबदार धरणे योग्य होणार नाही. जी वाढ सुचवलेली ती बरोबर नाही. काहीच वाढ होऊ नये.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : पाणीपट्टी दरवाढीच्या प्रस्तावावर चर्चा होत आहे. किती वाढवावी या संदर्भात वेगवेगळे प्रश्न उपस्थित होत आहे. गेल्या दोन दिवसापुर्वी मालमत्तेच्या संदर्भात चर्चा केली. शहरात मालमत्ता किती, कर किती मालमत्तेला आहे. याचे नियोजन नसल्याने जो नागरिकांवर बोजा पडतो तो आणि हा विषय सारखाच आहे. पाणी पुरवठयासाठी होणारा खर्च व प्रत्यक्ष वसुली पाहता ही, योजना तोटयात चाललेली आहे, असे प्रशासनाचे म्हणणे आहे, म्हणून दरवाढ करणे आवश्यक आहे, असे दाखविले जाते. शहरात व्यावसायिक नळ कनेक्शन ७३३ दाखविले आहे, परंतु हे शहर झपाटयाने वाढणारे आहे. शासनाचे कार्यालय वाढत आहे. हॉटेलची संख्या वाढत आहे. ही नळ कनेक्शनची संख्या अत्यंत चुकीची असून, घरगुती सुध्दा ८३ हजार नळ कनेक्शनची संख्या सुध्दा चुकीची आहे. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे वसुली झालेली नाही. मालमत्तेची वसुली होत नाही. अनाधिकृत नळ शोधण्याची कार्यवाही होत नाही. तत्कालीन आयुक्त बलदेशसिंग असतांना मी अनाधिकृत नळ कनेक्शानचा मुद्दा उपस्थित केला होता, कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते ते आज येथे नाही परंतु प्रत्येक आयुकत आल्यानंतर अमुक अमुक कार्यवाही करु आश्वासने देतात, परंतु प्रत्यक्षात काहीच होत नाही खऱ्या अर्थाने अनाधिकृत नळ शोधण्याची कार्यवाही केली तर, पाणी पट्टीत वाढ करण्याची आवश्यकता पडणार नाही पाणीपट्टीत वाढ होणार हा सुध्दा सर्वत्र चर्चेचा विषय झालेला व नगरसेवकांचे दुर्लक्ष आहे व नगरसेवकांमुळे पाणीपट्टीत वाढ होणार आहे. अशी सुध्दा चर्चा होत आहे, आज नगरसेवक बदनाम झालेले आहे. परंतु वसुली व्यवस्थित होत नाही. या चुकीमुळे पाणीपट्टीत वाढ करुन सर्वसामान्य नागरिकांवर बोजा टाकणे बरोबर होणार नाही. पाणीपट्टीत काहीही वाढ करु नये नसता नगरसेवक बदनाम होणार आहे. अधिकाऱ्यांना जनता विचारणार नाही. म्हणून एक पैशाची वाढ करु नये.

श्री. भाऊसाहेब ताठे : प्रशासनाने ९००/- रु. ची वाढ करुन तसा प्रस्ताव ठेवलेला आहे. प्रशासनाचे या योजनेसाठी योग्य नियोजन नसल्याने व वसुलीत अपयशी ठरल्याने वाढ सुचविणे योग्य नाही. शहरात एकूण ५५ हजार नळ कनेक्शन तर सिडको भागात २७ हजार नळ कनेक्शन आहे. अधिकृत वस्त्यामध्ये जवळपास १.२० लक्ष नळ कनेक्शन असू शकतात, अनाधिकृत वसाहतीत २७ ते ३० हजार असे एकूण १.५० लक्ष नळ कनेक्शन असतील. पाणीपट्टीत कसल्याही प्रकारची वाढ होऊ नये.

मा. महापौर : ३० मिनिटासाठी आजची सभा तहकुब करण्यात येते. (वेळ दुपारी २.३५ वाजता सभेला सुरुवात ३.२० वाजता.)

सौ. संगिता मैंद : भर उन्हाळयात पाणीप्रश्न निर्माण झालेला असतांना पुन्हा दरवाढीचा प्रस्ताव सादर झालेला आहे. जी तुट येते ती कमी करण्यासाठी गोर गरीब व मध्यम वर्गीयावरच बोजा टकायचा का? गोर गरीब व मध्यम वर्गीय नागरिकांना कमीत कमी पाणी तरी मिळावयास पाहिजे. अशी स्थिती निर्माण केली जाऊ शकते. जे नियमीत कर भरतात त्यांना पुन्हा दरवाढ करुन बोजा सहन करावा लागेल. जे चोरून पाणी घेतात त्यांना पाणीपट्टी वाढीशी काही संबंध नसतो. अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करण्याचे काम अद्याप करण्यात आलेले नाही. जे नियमीत कर भरतात त्यांचेवर अन्याय होतो.

अनाधिकृत नळ शोधणे, थकबाकीदाराचे नळ कापणे व प्रशासनाचे जे अधिकारी / कर्मचारी आहे त्याची काटेकोरपणे वसुली करणे या सर्व बाबी अंमलात आणल्या तर जी तुट येते ती कमी होईल व जी वाढ करण्याची आवश्यकता पडत आहे, ती पडणार नाही, जर पाणी पट्टीच्या दरात वाढ केल्यास चोरीचे प्रमाण वाढेल करीता पाणी पट्टीत वाढ करु नये.

श्री. मोतीलाल जगताप : प्रशासनाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपट्टीत वाढ करण्याची प्रशासनास गरज भासते, परंतु नियोजन नसल्याने सिडको हडको भागात १२ महिने पाणी येण्या ऐवजी ६ महिनेच पाणी दिले जाते व ६ महिन्यासाठी रुपये १२००/- आकारण्यात येते. जर ६ महिने सुध्दा पाणी भरपूर मिळत नसेल तर १२ महिन्याची पाणीपट्टी आकारणे बरोबर नाही. अगोदर दररोज पाणी द्यावे व तरच दरवाढ करण्यावर विचार व्हावा. ६ महिन्यासाठी १२००/- रु. घेतले जाते तर सिडको हडकोतील नागरिकांना २४००/- रु. पाणीपट्टी सध्याच आकरली जाते, असा त्याचा अर्थ निघतो. सर्व सदस्यांच्या भावनेचा विचार करुन पाणी पट्टीत वाढ न होता १२ महिने दररोज पाणी पुरवठा करण्याबाबत प्रशासनाने प्रयत्न करावे तरच दर वाढ करण्याबाबत विचार व्हावा.

श्री. अशरफ मोतीवाला : पाणीपट्टी दरवाढ करणे आजच्या परिस्थितीत योग्य नाही कारण पाणीपुरवठा करण्यामध्ये वारंवार अडचणी येत असून, सामान्य जनतेला त्याचा त्रास सहन करावा लागतो. स्लम भागात सद्य:स्थितील २-३ दिवस पाणी दिले जात नाही व जे पाणी येते ते प्रमाणकानुसार दिले जात नाही. या दृष्टीने विचार करुन पाणी पट्टीत वाढ होऊ नये.

श्री.शे. मुनाफ शे. यासीन : योग्य वेळी व भरपूर पाणी देण्याचे नियोजन होत नाही बऱ्याचशा भागात पाणी दिले जात नाही. २ ते ३ दिवसा आड पाणी दिले जाते. या परिस्थितीत दरवाढ करु नये. १२००/- रु. ठेवावे.

श्री. मीर हिदायत अली : पाणीपट्‌टी दरवाढ न करता अनाधिकृत नळ शोधून काढावे. तसेच वसुलीवर भर द्यावा, जेणे करुन पाणी पुरवठयावर जो खर्च होऊन तुट निर्माण होते ती भरुन निघेल. अनाधिकृत नळ कनेक्शन नियमित करण्याबाबत कार्यवाही करण्याचे आदेश करावे, या शहरात जवळपास २५ ते ३० हजार अनाधिकृत नळ कनेक्शन जुन्या शहरात असतील तसेच सिडको-हडको भागात कमीत कमी ५ हजार अनाधिकृत नळ कनेक्शन असतील असे एकूण ३५ हजार नळ कनेक्शन नियमित केले तर, उत्पन्न वाढेल, पाणीपट्टीत दरवाढ करण्याची आवश्यकता नाही. तसेच वसुलीवर अधिकारी / कर्मचारी यांनी जातीने लक्ष देऊन काम केल्यास तुट कमी होण्यास मदत होईल.

श्री. शे. इलियास किरमानी : प्रशासनातर्फे पाणीपट्टी दरवाढीचा प्रस्ताव सादर झालेला आहे. माझे वैयक्तिक मत असे आहे की, जकात खाजगीकरण करावे. तेथील २०० कर्मचारी मालमत्ता / पाणीपट्टी वसुलीसाठी देऊन वसुलीचे उद्दीष्ट वाढेल या दृष्टीने प्रयत्न व्हावे. जेणे करुन पाणीपट्टी दरवाढ करण्याची गजर पडणार नाही. उलट २०० रुपये कमी करावे.

सौ. कचराबाई लोखंडे : वार्डातील राणानगर येथे काहीच पाणी नाही. आपण प्रत्यक्ष पाहणी केलेली आहेत. तसेच राजनगर, चौदेश्वरी हौसींग सोसायटी, तिरुपती अपार्टमेंट या भागात अजिबात पाणी येत नाही. सदर भागातील ऐरीया हा

अधिकृत असून तेथील लोक महानगरपालिकेत मालमत्ता कर भरतात. आपण स्वतः पुन्हा दुपारी ४.०० वाजता पाहणी करा, सत्य परिस्थिती समजेल. महानगरपालिकेचे कर्मचारी सुध्दा पाहणीसाठी येत नाही. ड्रेनेज लाईन वोकअप होते. ती सुध्दा कार्यवाही तात्काळ केली जात नाही. माझा वार्ड हा ९०% अनाधिकृत वस्ती आहे तर १०% अधिकृत, त्यात गृहनिर्माण संस्थाच्या वसाहती आहे. गृहनिर्माण संस्थेची जी घरे आहे, त्यांना सुध्दा पाणी पुरवठा होत नसून अधिकृत नळ कनेक्शन आहेत तेथे पाणी येत नाही. पाणीपट्टीत वाढ करु नये. अनाधिकृत नळ शोधावे, अधिकृत करण्याची कार्यवाही करावी.

मा. महापौर : आताच स. सदस्य सौ. लोखंडे यांनी त्यांचे वार्डात अनाधिकृत नळ कनेक्शनच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला, त्यानुसार जे संबंधित अधिकारी यांनी त्या वार्डात जे कर्मचारी असतील त्यांना योग्य त्या सूचना करुन अनाधिकृत नळ कनेक्शन नियमीत करता येत असेल तर करावे अन्यथा आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्री. जयवंत ओक : पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करावे. जनतेला मुबलक पाणी द्यावे. तरच दरवाढ करण्याबाबत विचार करता येईल. १२००/- रुपये ऐवजी २१००/- रुपये करण्याचे सुचविले एकदम ९००/- रुपये वाढ करणे बरोबर होणार नाही. तसा प्रशासनाने प्रस्ताव सादर करुन एक प्रकारची धमकीच दिली की, दरवाढ करुन तुट कमी झाली नाही तर शासन महानगरपालिकेस येणारे शैक्षणिक अनुदान वळती करुन घेणार. शासनच जनतेला पाणी मिळावे म्हणून विविध प्रकारच्या उपाययेजना राबवितात आणि अनुदान वळती करणे हे धोरण शासनाचे बरोबर नाही. तसेच जायकवाडी धरणामध्ये सध्या किती पाणीसाठा आहे. पुर्ण उन्हाळयामध्ये पाणी पुरेल का? याचा अभ्यास करावा. आज २ दिवसाआड पाणी येते. काही दिवसांनी ४-६ दिवसाआड पाणी येण्याची वेळ येऊ नये. सिडको-हडको भागात ६ महिने पाणी पुरवठा होतो. पाणीपट्टी पुर्ण वर्षाची घेतली जाते, त्यावर हा विचार व्हावा. त्याच बरोबर पुंडलीकनगर व इतर १८ खेडी व अनाधिकृत वस्त्याचा प्रश्न आहे. अशी परिस्थिती असतांना दरवाढ करणे बरोबर नाही. सिडको-हडको भागातील जनतेला ६ महिन्याची पाणीपट्टी १२००/- रु. आज पडते. पुन्हा वाढ केल्यास अन्याय होईल. २००-३०० रुपये वाढ सुचविली असती समजु शकलो असतो, परंतु एकदम ९००/- रुपये वाढ करुन प्रशासनाने जनतेचा घात केला, जे उद्दीष्ट दिले होते, ते वसुल न करता तुट भरुन काढण्यासाठी दरवाढ प्रस्तावित केली, निषेधार्थ मी झोपी आंदोलन करतो.
(याचवेळी स. सदस्य श्री. आक जयवंत हे मा. महापौर डायस समोर झोपी सत्याग्रह करतात.)

मा. महापौर : स. स. श्री. ओक यांनी डायस समोर झोपु नये, त्यांनी त्यांचे जागेवर जाऊन बोलावे. योग्य तो निर्णय घेता येईल.

श्री. अफसर खान : सभागृहाच्या भावना लक्षात घेता, पाणीपट्टीत वाढ करु नये. १२००/- रु. ठेवावे. व्यावसायिक वापरासाठी जे नळ कनेक्शन आहे, त्याची संख्या फक्त ७०० दाखविण्यात आली, परंतु या शहरामध्ये हॉटेल, दवाखाने, मंगल कार्यालय व इतर व्यावसायिक दुकानदार याची संख्या बघीतली तर ७००० हजार नळ कनेक्शन असु शकतात. जे घरगुती वापरासाठी ८३ हजार नळ

संख्या दाखविली ती सुध्दा अत्यंत चुकीची असून, जवळपास १.५० लक्ष नळ घरगुती वापराचे मिळू शकतील. त्यासाठी शोध मोहीम हाती घेऊन योग्य ती कार्यवाही करावी. उत्पन्न वाढेल पाणीपट्टीत वाढ करण्याची आवश्यकता नाही.

श्री. भगवान रगडे : दरवर्षी पाणीपट्टी दरवाढीचा प्रस्ताव येतो. ७००/- रु. वरुन २ ते ३ वर्षात १२००/- रु. पर्यंत आले यावर्षी रु. १२००/- ऐवजी रु. २१००/- वाढ सुचविलेली आहे. पाण्याचा प्रश्न अत्यंत जिव्हाळयाचा झालेला आहे. नेहमीच म्हणजेच दरवर्षी पाणीपट्टीत वाढ करणे म्हणजे नागरिकांच्या जख्मेवर मीठ टकाल्यासारखे होईल. पाणीपट्टीतच वाढ करुन जादा विकास कामे करणार आहात का? असा प्रश्न निर्माण होतो. इतर उत्पन्नाची भरपूर माध्यमे आहे, त्यात जकात, मालमत्ता, टपरी भाडे, उद्यान, फिस संग्राहालय, व्यापारी संकुल जनावरांचा कोंडवाडा, मत्सालय, प्राणी संग्राहालय इ. माध्मातून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करावा. पाणीपट्टीची तुट यात भरुन काढावी पाणीपट्टीत वाढ होऊ नये. जनतेला अगोदर मुबलक पाणी द्यावे प्रत्येक घरांना पाण्याची गरज आहे. या शहराची लोकसंख्या १० लक्षापेक्षा जास्त असून, लोकसंख्येच्या तुलनते व एका घरात ५ ते ६ व्यक्ती गृहीत धरलयास ८३९१२ नळ कनेक्शनची संख्या अत्यंत चुकीची आहे. ज्यांना नळ अधिकृत करुन घ्यायचे, नवीन घ्यायचे त्या संदर्भात जे डीपॉजीट रक्कम घेतली जाते व इतर कार्यवाहीसाठी ती संचिका ५ ते ६ टेबल जाऊन तात्काळ कार्यवाही होत नाही ही पध्दत चुकीची वाटते व शेवटी ज्यांना नळ घ्यायचा ती व्यक्ती कंटाळून जातो व अनाधिकृत नळ कनेक्शन घेतात. परंतु कार्यालयामार्फत वेळेवर कार्यवाही होत नाही. अशी परिस्थिती आहे. यामुळे जे कर भरतात, त्यांना पाणी नाही तर जे भरीत नाही त्यांना पाणी दिले जाते असाच अर्थ होतो, त्यामुळे पाणी पुरवठयाच्या खर्चात तुट येते व पाणीपट्टीत दरवाढ करण्याची गरज भासते, हे कितपत योग्य आहे. त्यासाठी अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी वेळ लागू नये जेणे करुन उत्पन्नात घट होईल. या संदर्भात सभागृहात बऱ्याच वेळा चर्चा केली. काही भागात कमी प्रमाणात पाणी येते तर काही भागात वेळी अवेळी पाणी सोडण्यात येते. त्यामुळे जे कामगार रोजी, रोटी कमविणारे लोक पती, पत्नी पैकी एकास पाण्यासाठी घरी थांबवावे लागते, त्यांचे नुकसान होते. यास कोण जबाबदार आहे ही परिस्थिती खुद्द माझ्या वार्डातील नागरिकांची आहे. त्यासाठी वेळेवर व भरपूर पाणी द्यावे, लोक पाणीपट्टी भरण्यास तयार आहे. तसेच पाण्याचे नियोजन करावे, बऱ्याच ठिकाणी पाणी वाया जातांना दिसते. पाणीपट्टीत वाढ होऊ नये. नसता जनता पाणीपट्टी सुध्दा भरणार नाही. " वा रे मनपा तेरी बस्ती सस्ती दारु महेंगा पाणी " असे जनता उद्देशून बोलतील.

श्री. स. अली सलामी : आताच स. सदस्य श्री. रगडे यांनी चांगले मुद्दे मांडले. प्रत्येक अर्थ संकल्पात पाणीपट्टी दरवाढीचा प्रश्न येतो. ५० ते ६० किमी दुरवरुन पाणी आणावे लागते. पैठणपेक्षा हे शहर ५०० फुट उंच आहे. प्रत्येक बजेट बैठकीच्या वेळी प्रशासन अशा प्रकारचा खुलासा देते. स्थायी समिती समोर हा अर्थसंकल्प सादर झाला, परंतू दरवाढ बाबत कसल्याही निर्णय घेतला नाही. १००/- ते २००/ रुपये वाढविण्याचा निर्णय स्थायी समितीने घेतला असता तर या सभेत आणखी १०० ते ५० रुपये वाढविण्याचा चर्चा करुन

विचार झाला असता. प्रत्येक वर्षी पाणीपट्टीत दरवाढ होत आहे. आज १२००/- रु. पर्यंत गेलेली आहे. या सभागृहाच्या चर्चे वरुन असे दिसते की, २१००/- रु. ऐवजी १५००/- रु. तरी करावे असा निर्णय घेण्याचा विचार वाटतो. परंतू ही अपेक्षा महापौरांकडून जनतेला नाही. प्रत्येक सदस्य लोकप्रतिनिधी या नात्याने आपआपले मत व्यक्त करतात. दुसऱ्या बाजूने पाणी पुरवठयावर होणारा खर्च या संदर्भात प्रशासन त्यांची सत्य बाजू मांडते परंतू खऱ्या अर्थाने जनतेला महानगरपालिका मुबलक पाणी देऊ शकत नाही तर, पाणीपट्टीत दरवाढ करण्याचा सुध्दा अधिकार पोहचत नाही असे माझे मत आहे. यापूर्वी प्रत्येक वेळेस सभागृहाच्या निर्णयाने वेगवेगळया प्रकारची योजना राबविण्याचा निर्णय होतो. परंतू त्याची अंमलबजावणी केली जात नाही. यापुर्वी अभय योजना राबविण्याबाबत निर्णय घेतला त्या माध्यमातून नळाचा सर्व्हे करणार, अनाधिकृत नळ अधिकृत करणार यातून उत्पन्न वाढेल या दृष्टीने निर्णय घेतला दुसरा एक निर्णय असा घेतला होता की, जायकवाडीच्या पाण्यावर अवलंबुन न राहता शहरातील ज्या विहिरी, हातपंप साफ करुन पिण्यासाठी नव्हे तर वापरासाठी का होईना त्या त्या जवळील भागात पाणी देऊ शकतो का? त्या बाबतीत कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला होता. ती सुध्दा कार्यवाही झालेली नाही. तसेच शहरामध्ये नहरी अंबर असून कायमचे पाणीसाठा असतो. स. स. श्री. ओक यांनी या संदर्भात बऱ्याच वेळा मुद्दा उपस्थित केला. या नहरी अंबरीचे पाणी सध्या शेतीसाठी नहर फोडून १२ ही महिने वापरले जात आहे. त्याबाबतीत सुध्दा कार्यवाही करुन पिण्यासाठी त्या पाण्याचा वापर व्हावा. प्रत्येकवेळी सभागृहात चर्चा होते. सभागृहाच्या वतीने प्रशासनास वेळोवेळी मार्गदर्शन सुचना देऊन ही कार्यवाही होत नाही. त्यामुळे प्रत्येक बैठकीच्या वेळी पाणीपट्टी दरवाढ करतांना ही चर्चा होते आताच खुलासा केल्याप्रमाणे २४ कोटी विज बिलावर खर्च होतात. वसुली फक्त ८ ते ९ कोटी होते. याचा अर्थ फक्त ४०% पर्यंत वसुली होते. थकबाकी सोडून चालू वसुली प्रत्यक्ष बघीतली तर ३० ते ४०% होत आहे. चालू वसुली ही ९० ते ९५% झाल्यास उत्पन्न वाढेल पाणीपट्टी दरवाढ करण्याची गरज नाही व थकीत रक्कम वसुल करण्याबाबत कार्यवाही करावी जकात, मालमत्ता उद्दीष्ट वाढवावे. वसुली वाढवावी. पाणीपुरवठयाची तुट भरुन काढावी. परंतू पाणीपट्टीत दरवाढ करु नये पाण्याचा प्रश्न जिव्हाळयाचा असून जनतेने स्वतः होऊन पाणीपट्टी भरली पाहिजे. अशा प्रमाणात ठेवावी. जास्तीचा बोजा टाकुन लोक पाणीपट्टी भरणार नाही. पूर्ण महाराष्ट्रामध्ये ब, क, वर्गामध्ये येणाऱ्या महानगरपालिकेमध्ये कुठेही १२००/- रु. पाणीपट्टी आकारली जात नाही. ७०० ते ८००/- रु. पेक्षा जास्त नाही. याचा सुध्दा विचार व्हावा. तसेच नियोजन सुध्दा व्यवस्थित नाही. माझ्या वार्डात काही नळांना १ १/२ तास पाणी येते तर काही नळांना १५ ते ३० मिनिटे पाणी येत नाही. याचा अर्थ नियोजन नाही. काही भागात २-३ तास, दिवसभर पाणी येते तर काही भागात पाणी दिले जात नाही, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. तसेच नळांना दुषित पाणी येत आहे. या बाबतीत संबंधित विभागाने लक्ष द्यावे व पाणीपट्टीत काहीच वाढ करु नये.

मा. महापौर : पाण्याचे नियोजन नाही असे मत सदस्यांनी व्यक्त केले. त्यानुसार नियोजन कमीटीची आवश्यकता आहे, असे चित्र आहे. तसेच आताच सांगितल्याप्रमाणे ड्रेनेज लाईनला लागुनच पाण्याची लाईन असेल, दुषित पाणी येते. हा सुध्दा नियोजनाचा भाग आहे. मी स्वत: (महापौर) तसेच स. सदस्य श्री. देसरडा प्रशांत श्री. तुळशीबागवाले किशोर, स. स. श्री. मोतीवाल जगताप, श्री. पंडागळे रतनकुमार ई. ची मिळून नियोजन कमीटी करु.

सौ. साजेदा बेगम : १८ खेडीसाठी ५० लक्ष रु. तरतुद केलेली आहे. त्या भागात पाणीपुरवठा व इतर सुविधा देण्यात आल्या का? पाणी दिले जात नाही तर तरतुद केलेली रक्कम इतर ठिकाणी वापरली जाऊ शकते, पाणीपट्टीत वाढ होऊ नये. तरतुद केलेली रक्कम कुठे वापरली गेली. त्याचा सुध्दा खुलासा द्यावा.

श्री. भगवान घडामोडे : प्रशासनाने आताच खुलासा दिला की, ३० ते ३२ कोटी पाणी पुरवठयावर खर्च होतात, १९ कोटीची तुट येते. ११ कोटीच वसुल होतात, तसेच शासनाने ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालावी म्हणून शासनाने निर्देश दिले. ही सर्व कारणे चुकीची दाखविली जात आहे. ती संयुक्तीक वाटत नाही. मागील वेळेस १३ कोटीचे उद्दीष्ट होते. ८.८५ कोटी वसुल केले. परंतू चालू मागणी जी होती त्याची वसुली पाहिली तर खूपच कमी आहे. ही नेहमीच परिस्थिती आहे. तसेच पाणी वाटपात सुध्दा नियोजन नाही. आताच निवासी व्यासायिकत वापराची नळाची संख्या ८६, ४३३ सांगण्यात आली. शहराची लोकसंख्या १० लक्ष आहे. एका घरात ५ ते ६ व्यक्ती गृहीत धरल्यास ८६, ४३३ नळ कनेक्शन कमी होतात त्यामुळे सुध्दा मोठया प्रमाणात तुट येते. व्यावसायिक नळ कनेक्शनची संख्या ७२१ दाखविली ती सुध्दा चुकीची असून, त्यासाठी नियोजन असणे गरजेचे आहे, यात निवासी, शासकीय, व्यावसायिक नळ किती, तसेच शैक्षणिक किती याची माहिती आपल्या विभागाकडे सविस्तर मिळणार नाही. या शहरात हॉटेल, लॉजिंग बोर्डिंग, बर्फाचे कारखाने, दवाखाने, नर्सिंग होम, तसेच गॅरेज व शहरातील पेट्रोल पंप याची संख्या बघीतली तर खूप आहे, परंतू येथे फक्त ७२१ च व्यावसायिक नळ कनेक्शन दाखविलेले आहेत, ते चुकीचे आहे. तसेच बांधकाम परवानगी किती दिल्या याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे, त्यावरुन नळाची संख्या काढता येईल. सिडको हडकोची आजीच परिस्थिती पाहिली तर, एक दिवसाआड पाणी येते. याचा अर्थ ६ महिनेच पाणी दिले जाते तसा प्रश्न आताच काही स. सदस्यांनी मांडला. आता वाढ केल्यास योगय होणार नाही. रु. २४००/- आजच पाणीपट्टी पडते. पाणीपट्टीत वाढ होऊ नये अशी प्रत्येक नागरिकांची मागणी आहे. पिण्या व्यतिरिक्त वापरांसाठी लागणारे पाणी हे वार्डात जेथे जेथे विहीरी असेल किंवा हातपंप असतील जेथे पाण्याचा साठा असेल, तेथून त्या त्या भागापुरते नियोजन करुन उपयोग करुन घ्यावा जेणे करुन पिण्याच्या पाण्याची बचत होईल, आताच माहिति हाती आली की, अग्निशमन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्राच्या माध्यामातून १.५० कोटी रुपये वसुल झालेले आहे. ही वसुली करतांना काही पेट्रोल पंप मालकाकडून १९८० पासून नळ कनेक्शान असून सुध्दा रक्कम भरणा केलेली नव्हती ती यावेळेस एन. ओ. सी. च्या

माध्यमातून वसुल केली म्हणजे २१ वर्षापासून रक्कमा भरलेल्या नव्हत्या त्यात कोण जबाबदार आहे. अशा मोठमोठया श्रीमंत लोकांडकून वसुली न करता गरीब लोकांवर पाणीपट्टीत वाढ करुन अन्याय झाल्यासारखे होईल व हे धोरण चुकीचे होईल, करीता पाणीपट्टीत वाढ न होता जे अधिकारी / कर्मचारी वसुलीसाठी दिले त्यांनी वसुली केली नाही तर, त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी व जे शुन्य नियोजन करुन कार्यवाही करतात. त्यांचेवर सुध्दा कडक कार्यवाही करावी. तसेच एक्सप्रेस लाईनचा खुलासा व्हावा. ती लाईन झाली तरच सिडको हडको जनतेला आपण मुबलक पाणीपुरवठा करु शकतो " ना हरकत प्रमाणपत्र " देतांना संबंधित अग्निशमन अधिकारी यांना चांगला अनुभव आला ते माझ्यापेक्षा सविस्तर माहिती देतील पाणीपुरवठा हा ना नफा ना तोटा या तत्वावर चालवावा नसता अनुदान बंदची सूचना शासनाने केली. परंतू ३० कोटी मधून २४ कोटी हा खर्च फक्त वीज दरावर येतो हे शासनाच्या निदर्शनास आणून द्यावे व पाणी आणतांना जो विजेचा वापर होतो तो ग्रामीण भागात होतो व त्याचे दर कृषी दराने लावावे अशी या सभागृहाची किती तरी दिवसा पासूनची शासनाकडे मागणी असून, ती कार्यवाही अद्याप शासनाने न करता उलट या महानगरपालिकेच्या शाळेत गरीब दुबळयाची मुले शिक्षण घेतात व अनुदान बंद करण्याची पत्राद्वारे माहिती देत असेल तर, योग्य नाही. म्हणून हे शासन गरीबांचे नसून गरीब मुलांवर अन्याय करणारे आहे म्हणून मी या शासनाचा निषेध करतो व या शासनाचे अशा पध्दतीने धोरण असेल तर, अशा शासनास महानगरपालिकेकडून पत्र द्यावे की, अनुदान बंद केले तरी ही महानगरपालिका शाळा चालविणार असून, गरीब मुलांना शिक्षण देणार आहोत. वसुलीचे माध्यम शोधण्यात येतील. परंतू गरीबांच्या मुलांना शिक्षण देण्यात येईल. या शासनाने उपकार करायच्या ऐवजी अपकार तरी करु नये असे शासनास कळवावे व पाणीपट्टीत वाढ करु नये असे माझे मत आहे.

श्री. काशीनाथ कोकाटे : जवळपास १ ते १ १/२ तासापासून पाणीपट्टी दरवाढ करावी किंवा कसे याबाबत चर्चा होत आहे. जवळपास सर्वच सदस्यांचे पाणीपट्टी दरवाढीला विरोध आहे, पाण्याचे नियोजन अत्यंत चुकीचे आहे. त्यामुळे पुन्हा पुन्हा असे प्रस्ताव येतात. अशा भावना व्यक्त केल्या गेल्या. स. सदस्यांच्या भावनेशी जवळपास मी सहमत आहे. शहराची लोकसंख्या व त्यानुसार नळाची संख्या बघितली तर ६०% पेक्षा जास्त होऊ शकत नाही. सिडको हडकोची नळ संख्या ३० हजार असून, जुन्या शहरात ५६ हजार नळ कनेक्शन आहे. एकूण अधिकृत मालमत्तेचा आताच खुलासा केल्याप्रमाणे ३.१० लक्ष आहे. असे सांगण्यात येते व ४० ते ५० हजार मालमत्तेचा सर्व्हे झ ाालेला असून एकूण जवळपास १.५० ते १.७५ लक्ष मालमत्ता आहे असे सिध्द होते. किमान ८०% धरांना नळ कनेक्शन असेल कारण प्रत्येकांना पाण्याची आवश्यकता असते. त्या दृष्टीने जी ८३ हजार नळ संख्या दिली ती चुकीची असून पाण्याची मोठया प्रमाणात चोरी होत असे मत व्यक्त केले गेले. या शहराला १२० एम. एल. डी. पाणी येते व अधिकृत नळ कनेक्शनला या पाण्यातून प्रमाणे धरल्यास ७० ते ७५ एम. एल. डी. पाणी वापरात येते. उर्वरीत पाण्याचा हिशोब लागत नाही. त्यामुळे तोटा सहन करावा लागत असून त्यासाठी झोनवाईज मीटर बसवून कार्यवाही केल्यास

लोकसंख्या व नळ संख्येच्या प्रमाणात पाणी देण्याचा प्रयत्न होईल. आपण समिती करण्याचा निर्णय घेतला परंतू गेल्या दोन वर्षापासून पाण्याचे ऑडीट व्हावे या संदर्भात सभागृहात चर्चा होते. मागणी होते परंतू अद्याप कार्यवाही होत नाही. खेदाची बाब आहे. यामुळे जे अधिकृत नळ कनेक्शनधारक आहेत. त्यांचेवर पाणीपट्टी दरवाढीचा बोजा पडतो, सिडको हडकोची परिस्थिती बघीतली तर ६ महिने पाणी येते. १२००/- रुपये वसुल होतात, याचा अर्थ आजच २४००/- रु. पाणीपट्टी वसुल होते. प्रशासन २१००/- रु. दरवाढ सुचविले ३००/- परत देणार आहे का? अशी मागणी त्याच भागातील जनता विचारते आहे. आपण महापौर झाल्याच्या नंतर झोन क्र. ७ मध्ये एक बैठक आयोजित केली होती. या बैठकीला सभागृह नेते तसेच प्रभाग समिती सभापती व इतर सिडको हडको भागातील सदस्य उपस्थित होते. त्यावेळी १ दिवसाआड पाणी देण्याचा निर्णय घेऊन भविष्यात पाणी वाढ केली जाऊन दररोज पाणी दिले जाईल असे ठरले होते. त्यानुसार प्रत्येक स. सदस्यांनी त्या त्या भागातील जनतेचे मत परिवर्तन करुन त्यांना समज देऊन १ दिवसा आड पाणी येईल असे सांगण्यात आले व त्या दृष्टीने वाटचाल सुरु केली परंतू ६ महिन्याचा जो कालावधी गेला त्याचा अनुभव लक्षात घेतला तर काही भागात २-२ दिवस पाणी येत नाही. अशा परिस्थितीत एकीकडे पाण्याचे नियोजन नाही अशी चर्चा होत असतांना दुसरीकडे पाणीपट्टी दरवाढीचा प्रस्ताव येतो हे कितपत योग्य वाटते. या सभागृहात प्रत्येक वेळेस सदस्य माठ आणतात, निदर्शन करतात, निषेध करतात तर कुणी निद्रावस्थेत निदर्शने करतात. परंतू आपण सर्व प्रशासनाच्या बरोबर आहोत. सत्तेमध्ये सत्तेचा उपभोग घेत आहोत. सत्तेमध्ये आपला हिस्ता असून प्रशासन चालविण्यास आपला सहभाग आहे. तसेच सर्व जनतेची काळजी घेण्यास सर्व सहमत आहेत, असे असतांना आपणांस आपल्या समोरच निषेध करावा लागतो, त्याबद्दल मला खेद वाटतो, आपण आपले प्रशासन बरोबर चालवावे शासनाचा प्रत्येक वेळा धिक्कार निषेध करणे बरोबर नाही. पाण्याचे नियोजन करावे ऑडीट करावे त्याचा हिशोब द्यावा, तर पाणीपट्टी दरवाढ करावी.

श्री. भगवान घडामोडे : शासनाचे प्रतिनिधीत्व कोणी करु नये. या शहराच्या जनतेसाठी योग्य ते निर्णय व्हावेत. जनतेच्या हिताचे प्रश्न निकाली काढावे, शासन अनुदान बंद करणार म्हणून निषेध केला या महानगरपालिकेच्या शाळेत गरीब लोकांची मुले शिक्षण घेतात, शासनाची बाजू घेण्याचा कुणाचा अधिकार नाही.

श्री. काशीनाथ कोकाटे : जनतेची दिशाभूल करु नये जी जबाबदारी टाकेलेली आहे, तीच पार पाडावी या सभागृहात माठ वगैरे आणून निद्रावस्थेत निषेध करणे बरोबर आहे का?

श्री. जयवंत ओक : आताच स. स. श्री. कोकाटे यांनी संभाषण केले. त्यांनी राजकीय भाषण बाहेर करावे. या सभागृहात लोकशाही मार्गाने जनतेसाठी सर्वांना प्रश्न मांडता येतात. सत्ता कुणाची ही असो त्याचा प्रश्न येत नाही. सभागृह बदनाम होईल असे कोणतेही कृत्य मी केलेले नाही.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : पाणी हे मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे, जीवनावश्यक आहे, एक प्राथमिक गरज आहे. मुलभूत गरज आहे. या

शहरातील जनतेची प्राथमिक गरज पूर्ण करण्याचे कर्तव्य या महानगरपालिकेचे आहे. आजची परिस्थिती बघीतली तर शहरात बऱ्याचशा भागात पाणी पुरवठा अत्यंत कमी दाबाने व अपूरा आहे. आताच चर्चा झाली. पुडंलीकनगर, मिसारवाडी, मसनतपुर अशा व इतर काही भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. त्या ठिकाणी आपण प्रत्यक्ष भेट दिली तर महिला व लहान मुले पाण्यासाठी कशी धडपड करतात जीव घेण्याचा प्रकार होतो, अशी परिस्थिती दिसते. जीव धोक्यात आणण्याची वेळ तेथील जनतेवर येते. आपणांस सर्वांना माहित आहेत. यापुर्वी पासून आज पर्यंत ३-४ लहान मुले टँकरखाली चिरडून मृत्युमूखी झालेले आहे. कुंटुबासाठी महिलांना पाणी मिळविण्यासाठी किती त्रस होतो. ही परिस्थिती पाहिल्यास डोळयात अश्रू येतात. महिला लोकप्रतिनिधी म्हणून मी महिलांच्या भावना मांडत आहे, दिवस भरामध्ये पिण्याचे पाणी कसे मिळावयाचे ही मानसिकता या महिलांच्या मध्ये झालेली असून, ती वेळ त्यांचेवर आलेली आहे, याचा विचार झाला पाहिजे. या शहरातील जनतेला जी प्राथमिक गरज म्हणून पाणी पुरवठा करु शकले नाही तर, पाणीपट्टीत दरवाढ करण्याचा अधिकार सुध्दा या सभागृहाला नाही. या शहरासाठी ६० कि. मी. वरुन पाणी आणावे लागते. ते लिप्ट करावे लागते त्यामुळे विजेचा खर्च जास्त येतो, ही परिस्थिती योग्य आहे व दरवर्षी १९ कोटी रु. खर्चात तुट येते व यात जनतेचा काही दोष नसून दरवाढ करुन जनतेला शिक्षा देण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. इतर शहराच्या तुलनेत या शहराची परिस्थिती ही असाधारण आहे, असे नमुद करावेसे वाटते. इतर शहरांना पाणी लिप्ट करुन व इतक्या दुरवरुन आणावे लागत नाही. म्हणून या शहराची पाणी पुरवठयाची परिस्थिती ही वेगळी असून, खर्च इतर शहरापेक्षा प्रमाणकानुसार जास्त येतो. आताच खुलासा झाला की, ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालवावी नसता शासन शैक्षणिक अनुदान परस्पर वळती करणार असे अर्ध शासकीय पत्र आले खरे तर ही शासनाची अडवट भूमिका का त्यास अनुसरुन प्रशासनाने जी दरवाढ प्रस्तावित केलली ही अजिबात संयुक्तीक वाटत नाही, जर इतर शहरापेक्षा या शहराची परिस्थिती वेगळी असेल. खर्च जास्त येत असेल तर, इतर शहरासारखे ना नफा ना तोटा या तत्वानुसार ही योजना राबविणे लागु होणार नाही कारण या शहराची परिस्थिती वेगळी असून या शहराला १२० एम. एल. डी. पाणी पुरवठयाची आवश्यकता असतांना फक्त ९० ते ९५ एम. एल. डी. पाणी पुरवठा होतो. अशी परिस्थिती आहे. म्हणून शहराची परिस्थिती भिषण होईल पाणी कमी पडणार आहे. एम. एस. ई. बी. चे बील वाढणार असून पाणी पुरवठा अपुरा होणारा त्यावेळी पाणीपट्टीत कोणत्या धरतीवर वाढ करणार जनतेवर अन्याय करु शकत नाही. पाणी लिप्ट करुन पाणी पुरवठयावर खर्च येतो. यात जनतेचा काही दोष नसून शासनाने जी अडवट भूमिकेच्या माध्यमातून पत्र पाठविले त्या बद्दल मी सर्व महिलांच्या वतीने एक लोक प्रतिनिधी या नात्याने शासनाच्या निषेध करते व पाणीपट्टीत कसल्याही प्रकारची वाढ होऊ नये. या शहरातील महिलांच्या भावना दोन ओळीत स्पष्ट करीत आहे. दोन दोन दिवस नळात पाणी नाही, पण प्रस्तावित पाणीपट्टीत वाढ आहे, नगरसेवक तावातावाने बोलतात. प्रशासन झोपेत गाढ आहे.

श्री. सुदाम सोनवणे : प्रथम पाणीपट्टीत दरवाढीस माझा विरोध आहे. पाणीपट्टीत वाढ करणे का गरजेचे आहे. याचा प्रशासनाने खुलासा केला १९ कोटीची प्रत्येक वर्षी तुट येते व प्रत्येक नळा मागे २१००/- रु. तोटा असे दर्शविलेले आहे. पाणी पुरवठा तोटयात आहे, म्हणून पाणीपट्टी दरवाढ करणे योग्य आहे असा अर्थ लागत नाही. दोन वर्षापासून अभय योजना अंमलात आणण्याचे ठरविले अद्याप कार्यवाही नाही यातून जी पाण्याची चोरी होते ती झाली नसती व पाणी पुरवठा योजनेत जी तफावत येते ती भरुन काढण्यासाठी अभय योजनेचा उपयोग झाला असता, ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालवावी नसता शैक्षणिक अनुदान बंद करणार अशा आशयाचे पत्र शासनाकडून आलेले आहे, असे नमुद केलेले असून या पत्राच्या माध्यमातून या शहरातील जनतेवर पाणीपट्टी दरवाढीस या प्रस्तावानुसार शासनाचा मोठा हातभर लागलेला आहे, असे दिसते. एकीकडे शासन सांगते आम्ही लोकभिमुख शासन चालवितो. दुसरीकडे २१००/- रु. दरवाढ करण्याच्या दृष्टीने प्रशासनाशी पत्र देऊन कार्यवाही होते ही गंभीर स्वरुपाची बाब आहे. या शहराला ५२ कि. मीटर अंतरावरुन पाणी आणावे लागते परंतू मुंबई महानगरपालिकेस ११० मि. मीटर वरुन पाणी येते. तफावत अशी की, या शहरासाठी पाणी लिफ्ट करावे लागते, मुंबई महानगरपालिकेस ग्रॅव्हीटीने पाणी पुरवठा होतो. या शहरात पाणी आणण्यासाठी पाणी लिफ्टींगसाठी ज्या विद्युत मोटारी चालतात त्याचे विज दर हे शहरी भागाप्रमाणे आकरले जाते. त्यामुळे विजेचा खर्च जास्त प्रमाणात येत असून, जे पाणी लिफ्टींग होते त्या विद्युत मोटारी हया ग्रामीण भागात येत असल्याने जे विज बिल येते ते कृषी दराने आकरावे या संदर्भात मी महापौर असतांना व त्या अगोदरचे महापौर यांनी शासन दरबारी अनेक वेळा मागणी केली, परंतू शासनाने ती मागणी पुर्ण न करता उलट शैक्षणिक अनुदान बंद करण्याचे पत्र काढले जाते ही शासनाची भूमिका बरोबर नाही. किमान ही अपेक्षा शासनाने दाखवावयास पाहिजे होती की, कृषी दराने वीज बील आकरले जाईल. परंतू पाणीपट्टीत वाढ करु नये. जनतेवर आर्थिक बोजा टाकू नये तसेच गेल्यावर्षी अभय योजना राबविण्याचा निर्णय घेतला त्या माध्यमातून पाण्याची चोरी ही उघडकीस येऊन नळाच्या संख्येत वाढ होऊन जी तुट येते ती कमी प्रमाणात झाली असती एकदम ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालविता येणार नाही. परंतू अभय योजना तसेच पाण्याचे योग्य नियोजन केले तर तुट कमी येईल. जाणून बुजून कुणावर टिका करणार नाही एक सदस्य यांनी झोपी आंदोलन केले. एक सदस्य यांनी काहया रंगाचे झेंडे दाखवून निषेध केला. प्रशासनाने महानगरपालिकेचे उत्पन्न खर्चाचे अर्थसंकल्पीय पुस्तक स्थायी समितीच्या मंजूरी साठी त्यांचे पध्दतीने सादर केले. या महत्वाच्या विषयावर स्थायी समितीच्या बैठकीत या सभागृहातील ८८ सदस्यापेक्षा १६ सदस्य विचारवंत बोलू शकले असते. या सभागृहाच्या माहिीसाठी सांगतोक की, मा. श्री. प्रदीप जैस्वाल सभापती असतांना स्थायी समितीने मंजूर केलेले पुस्तक सर्वसाधारण सभेत ३० मिनिटाच्या आत चर्चा होऊन मंजूर केले होते. त्यावेळी सुध्दा प्रशासनाच्या पाणीपट्टीच्या वाढीच्या प्रस्तावावर विरोध करुन पुस्तक सादर झाले होते. म्हणून पाणीपट्टी दर वाढीवर स्थायी समितीमध्ये विरोध करुन निर्णय घेतला असता तर या

बैठकीस दोन दिवसाचा कालावधी लागला नसता व सभागृहाचा वेळ वाया गेला नसता स्थायी समिती हे सभागृहा आर्थिक सभागृह आहे. या सभागृहात सविस्तर चर्चा करुन अर्थसंकल्प मंजूर करुन सर्वसाधारण सभेत सादर झाला असता तर या बैठकीत जास्त चर्चा करण्याची वेळ आली नसती बोलण्याचा उद्देश असा की, ज्या पक्षाचे सभापती यांनी अर्थसंकल्प मंजूर करुन सादर केला त्याच पक्षाचे सदस्य या सभागृहात काळे झेंडे लावून निषेध करतात ही दुर्दैवाची बाब आहे. यावरुन जनतेसाठी खूप काही करतो असे दाखविण्याचा प्रयत्न येथे होत आहे. त्या सभापतीची पॉलीसी व त्यांचे पक्षाच्या सदस्यांची पॉलीसी काय याबाबतीत निर्णय होऊनच हा अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत यावयास पाहिजे होता. प्रत्यक्ष कुणावर आरोप मी करीत नसून, अशा काही घटनामुळे नगरसेवकांची प्रतिमा मलीन होत आहे, जे की, स्थायी समितीची बैठक झाल्या पासून २१००/- रु. पाणीपट्टी होणार असा जनतेच्या मनात गैरसमज झालेला आहे. नगरसेवक काही करीत नाही सभा घेतात, नुसती चर्चा होते. योग्य निर्णय घेतले जात नाही. अशी भावना जनतेमध्ये झालेली आहे. बऱ्याच नागरिकांना सांगावे लागले की, रु. २१००/- पाणीपट्टी होणार नाही. आमचा यास विरोध असून, पाणीपट्टीत वाढ होऊ नये. पाणी पुरवठयाची तुट भरुन काढण्यासाठी अभय योजना लागू करावी, अकृषी दराने पंपींगच्या मोटारीवर वीज बील आकरले गेले पाहिजे जेणे करुन वीजेचा खर्च कमी येईल. मालमत्ता व नळ कनेक्शनची सुध्दा मोठया प्रमाणात तफावत जाणवते. १.०० लक्ष मालमत्ता या सिडको हडको वगळून आहे. नळ कनेक्शन ८४ हजार आहे. सिडको, हडको भागात नळ कनेकशन २९ हजार आहे. याचा अर्थ फक्त ५६ हजारच नळ कनेक्शन असून उर्वरीत ५० ते ५५ हजार मालमत्ता धारक पाणी भरतात कोठून याचा शोध घेणे गरजेचे आहे. ही चौकशी करुन कार्यवाही केल्यास जी वाढ करण्याची गजर पडते ती पडणार नाही. सर्वसामान्य नागरिकांवर बोजा पडणार नाही. असे माझे मत आहे. पाणीपट्टी दर आकारणी ३ ठिकाणी वेगवेगळया पध्दतीने आहे. छावणीला पाणी पुरवठा होतो, तेथे ४५०/- रु. आकरणी होते. जुन्या शहराला रु. १२००/- तर सिडको हडको भागात ६ महिनेच पाणी दिले जाते, तरी १२००/- रुपये आकारणी होते. याचा अर्थ आजच २४००/- रु. पाणीपट्टी आकारली जाते. ही तफावत जनतेच्या लक्षात आलेली असून आता वाढ केल्यास जनता स. सदस्यांवर रोष धरतील व नगरसेवकांना वेढीस आणतील त्याकरीता पाणीपट्टीत वाढ होऊ नये. बाकीच्या ज्या योजना आहेत त्या राबविण्यात त्यामुळे पाणी पुरवठयाची तुट काही प्रमाणात भरुन निघेल.

श्री. भगवान घडामोडे : आताच स. सदस्य श्री. सोनवणे यांनी चांगल्या प्रकारे मत व्यक्त केले. अर्ध्या तासात सभा संपविली होती असे सुध्दा नमुद केले परंतू कालच्याच सभेत त्यांच्याच पक्षाचे सदस्य श्री. दानवे यांनी सभापती यांनी चांगली अर्थसंकल्प मांडला म्हणून अभिनंदन केले. अर्थसंकल्पात ज्या १ ते ११ पर्यंत प्रस्ताव सुचवले. असे प्रस्ताव आजपर्यंत कोणत्याही सभापतीने सुचविलेले नाही. स. स. श्री. जयवंत ओक सभागृहात माठ आणतात, झोपी आंदोलन करतात. त्याप्रमाणे स. स. श्री. ताठे यांच्या सुध्दा भावना समजून घ्याव्यात. सभागृहात एकमेकांवर टिका करणे योग्य नाही.

श्री. स. सलीम स. युसूफ : प्रत्येक वर्षी पाणी पुरवठयावर मोठया प्रमाणात खर्च होत आहे. ती खर्च कमी करण्यासाठी हर्सुल तलावाची साफसफाई करुन खोली वाढविल्यास पाणीसाठा होईल व कमी दरामध्ये जनतेला पाणीपुरवठा होऊ शकतो. भोगे साहेबांच्या काळात साफाईसाठी बैठक बोलावली होती. पुढे काही कार्यवाही झाली नाही. कमी खर्चात पाण्याची सुविधा देण्याचे महानगरपालिका नियोजन न करता जनतेवर बोजा टाकण्याचा प्रयत्न होतो. प्रत्येक वेळेस असे सांगितले जाते की, १५००/- खर्च येतो, ८००/- रु. पाणीपट्टी वसुल केली जाते. पुढील वर्षी असे सांगितले जाते की, २०००/- खर्च येतो, १२००/- वसुल करतो यावर्षी ३०००/- खर्च येत असल्याचे सांगण्यात येऊन २१००/- केले. प्रशासनाचे धोरण बरोबर नसून गंभीर स्वरुपाची बाब आहे हर्सुल तलाव साफ केल्यास कमी खर्चात पाणी येऊ शकते. तत्कालीन आयुक्त श्री. भोगे साहेबांनी कमीटी केलेली होती. त्यानुसार काहीच अंमलबजावणी झालेली नाही. हर्सुल तलावाची साफसफाई करावी व कमीत कमी खर्चात जनतेला पाणी पुरवठा करण्यात यावा अशी माझी सूचना आहे.

सौ. ॲड. सुवर्णा चंद्रात्रे : बऱ्याच सदस्यांनी पाणीपट्टी दरवाढ करायची किंवा असे याबाबत पोट तिडकीने आपआपले प्रश्न उपस्थित केले. दरवाढ होऊ नये अशी सर्वानींच मत व्यक्त केले. ही परिस्थिती आजची नसून गेल्या दोन वर्षापासून पाणीपट्टी दरवाढीच्या प्रस्तावावर खूप चर्चा होते. पुष्कळ उपाय सुचविले जाते. मत मांडले जातात, कमीटी नियुक्त होते. परंतू अंमलबजावणी प्रशासन करीत नाही म्हणून नुसती सभागृहात चर्चा करणे योग्य आहे काय? या चर्चेला काही अर्थ नाही. असेच म्हणावे लागेल ही मोठया प्रमाणात चर्चा होत असतांना प्रशासन नुसते ऐकण्याचे काम करते. नियोजन शुन्य आहे, असेच म्हणावे लागेल. इतर काही बाबीकडे प्रशासन स्वतंत्र वेळ देऊन कार्यवाही करते, त्याप्रमाणे पाणी पुरवठयासाठी सुध्दा कार्यवाही व्हावयास पाहिजे. व्यवस्थित नियोजन करावे. ज्या काही कमीटी केल्या. त्या कार्यरत करण्यात पाणी पुरवठा सुरळीत करावा, प्रशासनाने जातीने लक्ष दिल्यास १००% वसुली होऊ शकते. परंतू तशी कार्यवाही होत नाही. परवाच्या बैठकीत आपण निर्णय घेतला की, दर तीन महिन्याला वसुलीच्या बाबतीत आढावा बैठक घेणार त्या बद्दल मी महापौर यांचे त्यावेळेस अभिनंदन करेल. त्यामुळे आज पाणीपट्टी वाढीचा निर्णय घेण्यात येऊ नये. शैक्षणिक अनुदान बंद करुन तसा निर्णय शासनाने घेणे बरोबर नाही व शासनाच्या पत्रानुसार पाणीपट्टी वाढविणे बरोबर नसून उलट पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावी. ही विनंती.

श्री. गणेश तांबे : पाणीपट्टीत कसल्याही प्रकारची वाढ होऊ नये, वाढीस माझा विरोध आहे. आर्थिक परिस्थितीत भर पडण्यासाठी महानगरपालिकेकडे वेगवेगळे मार्ग आहे, त्याचा अवलंब करावा. प्रशासनाने याकडे जातीने लक्ष द्यावे. जी तुट येते ती भरुन काढण्यासाठी पाणीपट्टीतस दरवाढ करुन कार्यवाही करणे योग्य होते का? या शहरात ८३ वार्ड आहे, प्रत्येक महिन्याला एका वार्डात किमान १० अनाधिकृत बांधकामे होतात. हे शहर आशिया खंडात झपाटयाने वाढणारे शहर आहे. एका वार्डात महिन्याला १० बांधकामे झाली तर प्रत्येक वार्डाची महिन्याला होणारी बेरीज व त्यानुसार १ वर्षात जवळपास १० हजार

बांधकामे होतात. एका बांधकामापासून १० हजार रु. गृहीत धरल्यास १ कोटी रुपये मिळू शकतात, परंतू ज्या ठिकाणी बांधकामे चालू असतात तेथे असतात तेथे आपले कर्मचारी जाऊन रक्कमेची मागणी करुन रक्कम घेतात, व बांधकामे होऊ देतात. अशी परिस्थिती असून यात महानगरपालिकेचे नुकसान होते यावर गांभीर्याने प्रशासनाने लक्ष घालणे गरजेचे आहे. म्हणून ज्यांनी अनाधिकृत बांधकामे केलेली आहे, अशा घर मालकावर फिक्स दर दंड म्हणून आकरुन वसुल करावे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. पाणीपट्टीत वाढ केल्यास मी निषेध करेल व त्या संदर्भात आंदोलन सुध्दा करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

श्रीमती पार्वती मानकापे : सार्वत्रिक निवडणूक झाल्यापासून सतत बैठकीत अनाधिकृत जागा व बांधकामा बाबत चर्चा होते. त्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा अनाधिकृत जागा अधिकृत करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करवा तसे आदेश प्रशासनास द्यावे. आज पाणीपट्टी दरवाढीचा मुद्दा उपस्थित झाला जनता प्रशासनाला विचारणार नसून लोकप्रतिनिधींना विचारतील म्हणून पाणीपट्टीत वाढ होऊ नये ही विनंती.

श्री. प्रकाश निकाळजे : सविस्तर चर्चा होत असून नागरिकांच्या बाबतीत एक प्रकारची मानसिकता तयार करण्याचे काम होत आहे. दरवाढ केल्यास अमुक होईल असे गृहीत धरले जात आहे. मी दोन्ही बाजूनी समर्थन करणार असून मी या महानगरपालिकेचा सर्वात प्रथम ट्रस्टी आहे, महानगरपालिकेचा आर्थिक व्यवहार बरोबर चालविण्यासाठी काही बाबतीत योग्य ते निर्णय आपल्याला घ्यावे लागणार आहे. पाणीपट्टी दरवाढीला विरोध केला नाही तर जनता काही म्हणेल का? असे प्रत्येक सदस्यांच्या मनात येत असल्याने विरोध होत आहे. सर्वांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, काल एका ठिकाणी मार्च अखेर असल्याने बँका बंद होत्या तरी आयकर खात्याचे रकमा भरण्यासाठी जनतेच्या रांगा लागल्या होत्या. त्याचप्रमाणे वीज मंडळाच्या कार्यालयात हीच परिस्थिती होती. त्याचप्रमाणे टेलीफोन खात्यात सुध्दा जनता पैसा भरण्यासाठी गर्दी करीत आहे. गर्दी होऊ नये म्हणून टेलीफोन खात्याने नविन केंद्र स्थापन केले, अशा प्रकारे योजना राबविल्या जात आहे. परंतू महानगरपालिकेचे सर्व उलट पध्दतीने काम चालते. नुकतीच वीज दरात २०% नी वाढ झाले टेलीफोनचे बील २५०/- येत होते ते कमीत कमी ३५०/- केलेले हे होत असतांना जी वाढ झाली त्यास कुणाही विरोध केलेला नाही जर पाणीपट्टी दरवाढ न करण्याची मानसिकता तयार होत असेल तर का एम. एस. ई. बी. कडे मोर्चे आंदोलने झाली नाही. पाणी सर्वांना आवश्यक असले तरी, महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. जर सकाळी पाणी झाले नाही तर कसा त्रास होतो. याची जाणीव आपल्याला आहे. महानगरपालिकेच्या काही कर्मचाऱ्यांना मारहाण होते. अपमानास्पद वागणूक दिली जाते. त्यावेळेस का तशी मानसिकता तयार करुन प्रश्न उपस्थित होत नाही. जर महानगरपालिकेच्या कामाशी संबंध असेल तर दरवाढ करणे योग्य होईल, कारण जे बजेट सादर केले ते आता नावानिशी सादर झालेला आहे. आकडेवारी सांगत असतांना ३२ कोटी खर्च येतो असे सांगितले जाते. हे शहर ५०० फुट उंच असल्याने पाणी लिफ्ट करुन आणावे लागते त्यामुळे विजेचा खर्च जास्त येतो. इतर शहराचे

उदाहरण दिले, परंतू इतर शहरासाठी येणारे पाणी पंपींग करुन आणले जात नाही. त्यामुळे खर्च नाही. या शहराला पाणी पुरवठा करतांना पंपींगचा खर्च जास्त प्रमाणात होतो. याची कल्पना सर्वांना आहे. म्हणून महानगरपालिकेचा विकास गाडा चालवायचा असेल तर काहींना काही वाढ करणे गरजेचे आहे व तसा निर्णय घ्यावा लागणार आहे. तरच विकास कामे होऊ शकतील याचा सुध्दा विचार व्हावा. यावर्षी फक्त २४ कोटीच रुपये विकास कामावर खर्च होणार आहे. केबलधारक दरमहा २००/- रु. देतात, पाण्यासाठी रु. १६०/- प्रतिमहा देऊ शकत नाही का? १३.५० रुपयामध्ये १००० लिटर पाणी खेडेगांवात दिले जाते. सिल्लोड, कन्नड सारख्या काही भागात २०/- रुपयाला पाण्याचा एक डबा मिळतो. अशी परिस्थिती आहे. त्याचा विचार केल्यास जी वाढ सुचवून पाणीपट्टीचा प्रस्ताव ठेवला तो योग्य आहे असे वाटते. याबाबत सविस्तर, स्वतंत्र सर्वांशी चर्चा करुन निर्णय घ्यावा. तोपर्यंत सभा तहकुब करावी. सर्वांचे मत जाणून घेऊनच निर्णय घेण्यात यावा. दरवाढ केली नाही तर विकास कामे का होत नाही असे मत उदया सदस्यांना मांडता येणार नाही.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : शहरात सर्वाजनिक नळ बंद करावे व पाणीपट्टी वाटवु नये.

श्री. गणेश तांबे : स्लम भागातील सार्वजनिक नळ बंद करु नये या भागात सर्व कामगार, गरीब लोक राहतात याचा विचार व्हावा. बंद केले तर त्यांनी पाणी कोठून भरावे असा प्रश्न आहे.

मा. महापौर : मुख्य लेखाधिकारी यांनी या प्रस्तावाबाबत सविस्तर खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : या प्रस्तावात आर्थिक दृष्टीने गांभीर्य असलयानेच दरवाढीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर केलेला आहे. वसुली कमी आहे, असे मत काही सदस्यांनी व्यक्त केले परंतू काही प्रमाणात वसूली कमी आहे हे मान्य करण्यात येते. चालू मागणी फक्त १०.२२ कोटीची होती आणि जायकवाडी पासून होणाऱ्या पाईप लाईन मधून जे ग्राहक आहे त्यांचे पासून २.४२ कोटी असे १३.५० कोटी पेक्षा जास्त उत्पन्न नाही. या यंत्रणेवर एकूण ३२ कोटी खर्च होतात, खर्चाची टक्केवारी काढली तर जवळपास ५५% सबसीडीइजड रेटने नागरिकांना पाणी देतो. या शहराची भौगोलीक परिस्थिती वेगळी आहे. ५५ किलो मीटर अंतरावरुन पाणी आणावे लागते. याची सर्व जाण नगरसेवकांना आहे. चांगल्या प्रकारे मत मांडण्याचा प्रयत्न झाला परंतू ५५ ते ५६% सबसीडीइजड दराने पाणी पुरवठा करणे आर्थिक दृष्टीकोनातून बरोबर नाही. याचा परिणाम विकास कामावर होतो, १२१ कोटीचा अर्थसंकल्प ठेवला आहे, यातूनच नागरिकांच्या विकास कामासठी रक्कम उपलब्ध होतात. महानगरपालिका जो बांधिल खर्च आहे, त्यात कमी करता येत नाही कर्मचाऱ्यांचे पगार व भत्ते ३८.७० कोटी, एम. एस. ई. बी. १७.७५ कोटी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ३ कोटी, गोदावरी विकास महामंडळास १.३० कोटी, सरकारी कर्ज परतफेट २.१० कोटी, पोलीस दल ५० लक्ष, छावणी हिस्सा ७० लक्ष यात २३.५० लक्ष वाढ होऊन छावणीचा हिस्सा ९३.५० लक्ष द्यायचा आहे. रस्ते विकास महामंडाळास दरवर्षी १.५० कोटी, तसेच वृक्ष निधी, पेन्शन निधी व वेतन निधीसाठी १.५५ कोटी द्यावे लागतात शासन शिक्षण कर व इतर करापोटी २ कोटी रु. द्यावे लागतात. ठेकेदाराच्या अनामत रक्कमा हया २ कोटी पर्यंत असतात, विविध

विभागाच्या १७ कोटी असे एकूण सुमारे ९० कोटी रुपये बांधील खर्च म्हणून करावेच लागेल, उत्पन्न कमी व खर्च जास्त होत आहे, जो बांधील खर्च आहे, तो काहीही झाले तरी द्यावेच लागणार आहे दरवर्षी बांधील खर्च हा वाढत जाणार आहे. दरवर्षी एम. एस. ई. बी. चे बिल, जीवन प्राधिकरणाचे रक्कम वाढत आहे. कर्मचारी यांचे वेतन भत्यामुळे त्याही खर्चात दरवर्षी वाढ होते. उत्पन्न कमी खर्च जास्त होत आहे, जे टारगेट पाण्याचे आहे ते तेव्हढेच आहे. अभय योजने अंतर्गत अनाधिकृत नळ शोधून काढले तरी २० हजार नळ असेल तर २.४० कोटीची वाढ होणार १६ कोटीच वसुलीचे टारगेट होईल. १६ कोटी वसुल केले तरी, १६ कोटीची तुट राहणारच आहे. म्हणजे ५०% सवसीडी द्यावीत लागणार आहे. उद्दीष्ट कमी झाले तर, बजेट कमी होईल व जो बांधील खर्च ९० कोटीचा आहे, तो वगळता फक्त विकास कामासाठी २० ते २५ कोटीच रुपये शिल्लक राहतील. मागील वर्षाचे स्पली ओव्हरची १२ कोटीची कामे आहे, ती रक्कम वगळता यावर्षी १५ कोटीच नविन विकास कामासाठी राहतील व हा निधी कमी पडतो, म्हणून उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे. ९००/- रु. वाढ सुचवून दर महिन्याला उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे. ९००/- रु. वाढ सुचवून दर महिन्याला फक्त ७५/- रु. वाढ सुचविलेली होती. म्हणजेच प्रत्येक दिवसाला २.५० रुपये वाढ सुचविलेली आहे. आज परिस्थिती पाहिली तर प्रत्येक नागरिक तसेच पान सुपारीवर प्रत्येक दिवशी तेव्हढा खर्च करीत आहे. पाणी पुरवठयावर प्रत्येक नळाची टक्केवारी ३३००/- रु. खर्च आहे, तरी सुध्दा एकदम वाढ न करता जास्तीचा बोजा पडू नये म्हणून १२००/- रु. वरुन २१००/- रु. पाणीपट्टी सुचविलेली आहे. यासर्व बाबी लक्षात घेऊन स. सदस्यांनी यावर विचार करुन निर्णय घ्यावा. ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालली नाही तर शालेय अनुदान येणारे शासन परस्पर वळती करुन घेणार आहे, तसे पत्र शासनाचे आलेले आहे व पुढील वर्षापासून अनुदन येणार नाही. प्रशासन जागृत असून, उत्पन्न वाढीचे प्रस्ताव वेळोवेळी सभागृहासमोर मांडीत आहे. पर्यायाने दरवाढ झाली नाही व बांधिल खर्च वाढत जाणार एम. एस. ई. बी. चे बील वाढणार, गोदावरी विकास महामंडळाचे बील वाढणार दर ६ महिन्याला एम. एस. ई. बी. गोदावरी विकास महामंडळ रकमा वाढविते. परंतू महानगरपालिका वेळोवेळी प्रस्ताव देऊन सुध्दा दर वाढीस विरोध होतो व याचा परिणाम विकास कामावर होतो. बजेट मध्ये ७.५० कोटीची अतिरिक्त कामे नमुद केलेली आहे. एकूण ३२ कोटीची कामे होणार आहे. जर पाणीपट्टीत वाढ झाली नाही तर, ७.५० कोटीची अतिरिक्त कामे न होता फक्त २५ कोटी पर्यंतच कामे होतील व यामुळे ज्या सुविधा द्यायच्या त्या पर्यायाने कमी प्रमाणात दिल्या जाणार आहे. जी दरवाढ सुचविली ती अत्यंत योग्य असून, त्यास मंजूरी द्यावी.

मा. महापौर : जे टारगेट ठरवून दिले तेव्हढी वसुली का झालेली नाही.

मुख्यलेखाधिकारी : १००% वसुली झालेली नाही, परंतू ६० ते ८०% पर्यंत वसुली झालेली आहे. थकबाकी वसुल केले तरी, खर्चा एवढी रक्कम होत नाही. ११ कोटी चालू डीमांड, जायकवाडीचे २.५० कोटी असे एकूण १३.५० कोटीच चालू डिमांड होते, परंतू खर्च हा ३२ कोटीचा आहे. अभय योजना अंतर्गत योजना राबवून अनाधिकृत नळ कनेक्शन शोधून काढले तरी २० हजार गृहीत

धरल्यास त्या पासून २.५० कोटी उत्पन्न होईल एकूण १६ कोटी उत्पन्न झाले तरी १६ कोटीची तुट भरुन काढण्यासाठी पाणीपट्टीत वाढ करणे गरजेचे आहे.

मा. महापौर : अर्थसंकल्पात मालमत्तचे ३६ कोटीच थकबाकी पाणीपट्टी २३.५० कोटी असुन चालु वर्षाच्या बजेटमध्ये थकबाकीसह नमुद का म्हणुन केले नाही. पाणीपट्टीचे तेरा कोटी वसुल काम असे दिले. आकडेवारी कथा आधारे नमुद केले आहे.

मुख्यलेखाधिकारी : आकडेवारी घेतांना चालू डिमांड १०.८८ कोटी असून वसुलीचा आढावा घेतला असता मागील वर्षी ६.८८ कोटी तर चालू वर्षी ८ कोटी ऐवजी ८.८० कोटी वसुल झाले. कर्मचाऱ्यांची संख्या, वसुलीचे कॅपीसिटी लक्षता घेता चालू मागणी १०.८८ व थकबाकीतील ३ कोटी असे १४ कोटी उद्दीष्ट ठेवले होते. एकूण थकबाकी २३ कोटी आहे ती एकदम वसूल होणे शक्य नाही.

मा. महापौर : चालू वर्षाचे जे डिमांड होते ते वसुल झालेले नाही यास कोण जबाबदार आहे. या सभागृहातील नगरसेवकांना, नागरिकांना तोंड द्यावे लागते. एखाद्या कामाची संचिका लेखा विभागात गेल्यानंतर बजेट नाही म्हणून सांगण्यात येते. याचा अर्थ वसुली करायची नाही व कामे ही करायचे नाही. यात कुठे तरी प्रशासन कमी पडत आहे, प्रशासनाने मान्य करावयास पाहिजे.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : आताच खुलासा केल्याप्रमाणे १३ कोटीच रुपये विकास कामासाठी राहणार आहे. प्रशासकीय खर्च हा ३९ कोटीपर्यंत होणार असून हा खर्च वैधानिक असून त्यात करता येत नाही. परंतू अधिकाऱ्यांना टारगेट पूर्ण करण्यासाठी कुठेही बंधन नाही आणि आजपर्यंत ते टारगेट ठरवून दिले ते कधीच पूर्ण झालेले दिसत नाही. कर्मचारी / अधिकारी यांचेवरचा खर्च हा १००% करणे बंधनकारक असेल तर वसुलीचे टारगेट सुध्दा १००% झाले पाहिजे असे बंधन घालावे. टारगेट पूर्ण केले नाही तर, कार्यवाही केली पाहिजे. दुसरा मुद्दा उपस्थित केला की, जनता केबलवर १०० ते २००/- रुपये खर्च करतात, तर पाणीपट्टीत झालेली वाढ रक्कम का भरु शकत नाही. परंतू पाणी हे जीवानावश्यकत असून, सर्वसाधारणपणे सर्वच जनतेला पाण्याची गरज असते. मध्यमवर्गीय लोक आहेत. तेच केबलसाठी रक्कम देऊ शकतात, सर्वच लोकांकडे केबल कनेक्शन नाही. सर्वांवरच हा बोजा लावणे बरोबर नाही.

मा. महापौर : जनतेसमोर नगरसेवकांना जावे लागते, अधिकाऱ्यांना नाही. एकूण ६० कोटी रु. थकबाकीसह येणार आहे, त्यापैकी फक्त ३१ कोटीची बजेटमध्ये नमुद केले, उर्वरित २८ कोटी का दाखविण्यात आले नाही. ते माफ करणार काय?

मुख्यलेखाधिकारी : मागील वर्षीच्या वसुलीच्या आकडेवारी पहिली असता पृष्ठ क्र. ५० वर ९८-९९ ची वसुली ५.०६ कोटी तर ९९-२००० ची जमा ५.२८ कोटी तर २०००-२००१ ची प्रत्यक्ष जमा ६.५८ कोटी जमा आहे. मागील तीन वर्षाचा आढावा घेतला असता कर्मचाऱ्यांची वसुलीची क्षमता विचारात घेतली तर चालू वर्षाची ८.८० कोटी वसुल झालेले आहे. एकदम थकबाकी वसुल होणार नाही.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : मागील वसुलीच्या १०% प्रमाणे मुळ अंदाजपत्रकात दिलेले टारगेट नुसार वसुल झाले नाही तर, सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे सुध्दा वसुल झालेले नाही. याचा अर्थ अधिकाऱ्यांच्या बोलण्यामध्ये तफावत येत आहे.

मा. महापौर : चालू टारगेट सुध्दा वसुल होत नाही. आपले कर्मचारी प्रत्यक्ष नागरिकांकडे जातच नाही. अशी शंका येते. यास जबाबदार कोण वसुली का होत नाही, सविस्तर खुलासा द्यावा.

सौ. साधना सुरडकर : ३ वर्षापासून टारगेट पूर्ण होत नाही यास कोण जबाबदार आहे, या पुढेही असेच होत राहील का? विकास कामे होतील किंवा नाही हा सुध्दा प्रश्न आहे.

मा. महापौर : अधिकारी वसुली करीत नाही डिसेंबर मध्ये पुन्हा सुधारित अंदाजपत्रक सादर होते. वेतन भत्ते कमी होत नाही, परंतू विकास कामसाठीच निधी कमी पडतो अशी परिस्थिती येते.

श्री. अंबादास दानवे : पाणीपट्टी दरवाढीवर सविस्तर चर्चा झालेली असून, अनेक वेगवेगळे मुद्दे सदस्यांनी मांडले, दरवाढीला स. सदस्य श्री. प्रकाश निकाळजे वगळता सर्वांनी विरोधच दर्शविला, असे म्हणता येईल. स्थायी समितीने २१००/- रुपये पाणीपट्टी प्रस्तावित केलेली आहे. सर्व परिस्थिती पाहता सर्व आढावा प्रकाश निकाळजे यांनी घेतलेला दिसतो. दरवाढ किती करायची हे बोलणार नाही, परंतू काहींना काही वाढ करणे गरजेचे आहे. पाणीपट्टी वाढविण्या अगोदर काही मुद्दे मी महापौरा मार्फत आयुक्तांपर्यंत पोहचू इच्छितो. दरवर्षी पाणीपट्टीत दरवाढ करावी लागते याला जी कारणे आहे, त्या संदर्भात स.स. श्री. सुदाम सोनवणे यांनी मुद्दे उपस्थित केले, त्यात प्रामुख्याने पाणी पुरवठा करतांना जो वीज पुरवठा होतो, त्याचा वापर ग्रामीण भागात म्हणून कृषी दराने वीज आकरणी झाली पाहिजे. मागील वर्षी शासनाने पाण्याचे ऑडीट करावे असा निर्णय घेतलेला होता. त्याच बरोबर महानगरपालिकेच्या माध्यमातून वीज नियमक मंडळाकडे सुध्दा प्रश्न मांडलेला आहे. त्या संदर्भात काय निर्णय झाला हा वेगळा विषय आहे. पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालवावी असे शासनाचे अर्थशासकीय पत्र प्राप्त झालेले आहे. हा सुध्दा महत्वाचा विषय आहे. वसुली कमी झाल्याची सुध्दा प्रशासनाच्या वतीने मान्य करण्यात आले आहे. मागील वर्षांचे आकडेवारी पाहता भांडवली खर्च हा ४४.८८ कोटी करणेची मान्यता झालेली होती, प्रत्यक्षात सुधारित बजेट मध्ये भांडवली खर्च हा १९.८६ कोटी दाखविण्यात आलेला आहे. हा विकास कामाचा निधी आहे. विचारपूर्वक चर्चा होऊन योग्य तो निर्णय घेणे आवश्यक आहे. याचा अर्थ मागील एका वर्षात २४ कोटी रुपयांची भांडवली खर्चातून होणारी विकास कमी झालेली आहे. त्याचे कारण वसुली उद्दीष्टाप्रमाणे झालेली नाही. म्हणून कामे झालेली नाही आताच सांगण्यात आले की, महसुली खर्च ७०.३५ कोटीचा आहे. १२१ कोटीचे टारगेट असते व जकातीचे टारगेट गेल्या वर्षी जसे ठेवले तेच यावर्षी ठेवले. ६१ ते ६२ कोटी केले. गेल्या वर्षीच्या बजेट मध्ये १५ कोटीचे पाणीपट्टीचे उद्दीष्ट ठेवले ८ कोटीवर आणले हा सुध्दा महत्वाचा विषय आहे. प्रशासनाचा खर्च ७० कोटी होणार असेल तर, पुढील वर्षात भांडवली खर्च किती राहणार हे सुध्दा पाहणी महत्वाचे आहे. अर्थसंकल्पात अनेक कामे

करण्याचे प्रशासनाने सुचविलेले असून, आणखी स्थायी कमीटीच्या मार्फत सुध्दा ६४ कामाचा समावेश केलेला आहे. ही सर्व कामे करायची असेल तर, पाणीपट्टीच्या दरवाढीला मान्यता देण्याची आवश्यकता आहे. सदस्यांनी दुटप्पी भूमिका घेऊन चर्चा करणे योग्य होणार नाही. वार्डात विकासाची कामे झाली पाहिजे ही मागणी पुर्ण होत नाही, व दुसरीकडे दरवाढीला पाठींबा द्यायचा नाही ही भूमिका घेणे बरोबर होणार नाही, वार्डात कामेच करायची नसेल तर १२००/- वरुन १०००/- रु. किंवा ८०० रु. ठेवली तरी चालेल अशीच भूमिका मांडावी लागेल असा त्याचा अर्थ निघतो. वार्डात कामे होऊ नये पाणीपट्टीत वाढ होऊ नये अशी भूमिका सदस्यांची आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. प्रशासन व लोक प्रतिनिधी या दोन्ही बाजू बरोबर घेऊन हे प्रशासनाचा कारभार चालवावा लागेल हे विसरुन चालणार नाही. प्रशासनाच्या यावर्षी चुका झाल्या आता पुढील वर्षी होऊ नये त्यासाठी काहींना काही निर्णय घ्यावा लागणार आहे. वसुली कमी का झाली त्या संदर्भात जे सक्षम अधिकारी आहे, त्यांचेवर आजच याचा बैठकीत कार्यवाही करण्याचा निर्णय घ्यावा लागणार आहे. १५ कोटीचे टारगेट होते. ८ कोटीच का वसुल केले. याचा तपास घेऊन कार्यवाही करावी. महसुली जमा मध्ये वाढ करु शकलो नाही तर, भांडवली खर्च होऊ शकणार नाही. याची सुध्दा जाणीव ठेवावी. म्हणून पाणीपट्टीत वाढ करणे गरजेचे आहे. आताच लेखाधिकारी यांनी खुलासा केला की, ७०.३५ कोटी हा वैधानिक खर्च करावाच लागेल हा खर्च होतच असेल तर १२१ कोटीचे बजेट नुसार तेव्हढी वसुली होईलच हे आज सांगता येणार नाही. मागील वर्षीचे बजेट १३५ कोटीचे ९७ कोटी वर आले. यावर्षी १२१ कोटी बजेट मधून ११० कोटी सुध्दा वसुल झाले तरी, वैधानिक खर्च व इतर कर्ज देता गेल्यावर्षी १९ कोटी विकास कामास शिल्लक होते. परंतू यावर्षी १० ते १५ कोटी सुध्दा विकास कामावर खर्च करण्यास राहतील की नाही अशी शंका येते. त्यामुळे पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पात किती वर्क वाईज बजेट नमुद करा ती कामे करणे अडचणीचे होऊन बसेल. कोणतीच कामे होणार नाही. अशी परिस्थित निर्माण होईल. म्हणून वर्कवाईज बजेट केले तरी उत्पन्नच नाही तर काहीच फरक पडणार नाही. यासाठी कठोर भूमिका या सभागृहाला घ्यावा लगणार आहे. विकास कामे करायची असेल तर ही दरवाढ करतांना मागील वर्षी वसुली का कमी आली यावर सुध्दा चांगल्याप्रमाणे निर्णय घ्यावा लागणार आहे, विजेचे बील कमी यावे, म्हणून टी. ओ. डी. (टाईम ऑफ द डे) यंत्र बसविण्याचा या सभागृहाने निर्णय घेतला होता. परंतू अद्याप कार्यवाही झालेली नाही. रात्री १० वाजेपासून सकाळी ६ वाजेपर्यंत टी. ओ. डी. मशीन लावल्यास (मीटर) विज बिल कमी येते. यास एम. एस. ई. बी. ची मान्यता आहे याची अधिकाऱ्यांना जाणीव असतांना सभागृहाचा निर्णय झ ाालेला असतांना का कार्यवाही केलेली नाही. तत्कालीन आयुक्त यांनी यास मान्यता दिलेली होती. अधिकारी सभागृहात थातुर मातुर उत्तरे देतात. आता पर्यंत का कार्यवाही झाली नाही. याचा खुलासा द्यावा. टी. ओ. डी. मशीनमुळे जवळपास २०-२५% विजेच्या बील कपात होते. तसेच कृषी दराने वीज दर आकारणीसाठी या सभागृहाला शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल. महानगरपालिकेचे वीज खंडीत करणार होते. त्यावेळी सर्व ८८

सदस्य वीज मंडळाच्या कार्यालयासमोर बसलेले होते. त्याप्रमाणे पुन्हा ८८ सदस्यांना पक्ष विसरुन महानगरपालिकेच्या हितासाठी रस्त्यावर उतरावे लागेल. शासन कोणाचे हे याचा विचार करु नये. शासन सुध्दा या अशा परिस्थितीतून जाते त्यामुळे शासनाला तसे निर्णय घ्यावे लागते निवडणुका होतील, निवडणूक लढविणारे कोण असतील, नसतील परंतू या महानगरपालिकेचे आपण सर्व सदस्य आहात, या महानगरपालिकेकडे देणे आहे, या शहराची सदस्यांवर काही तरी जबाबदारी आहे, या भावनेतून नगरसेवकांनी सुध्द विचार करण्याची आवश्कयता आहे. म्हणून काहींना काही दरवाढ करणे निश्चित आवश्यक आहे आणि वसुली का झाली नाही या संदर्भात जे सक्षम अधिकारी असतील, उपआयुक्त, झोन अधिकारी, वसुली निरीक्षक यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे मागील वर्षीच्या बजेटच्या वेळी तत्कालीन आयुक्त यांनी निलंबन करण्याचे आश्वासन दिले, काही कार्यवाही झाली नाही हे सुध्दा आयुक्त आश्वासन देतील. त्यासाठी प्रत्यक्ष कार्यवाही करण्याचा निर्णय घ्यावा लागणार आहे. नसता वसुली झाली नाही तर, विकास कामे होणार नाही. भविष्यात महसुल जमा होईल व तेव्हाढाच खर्च होईल. विकास कामसाठी पैसा राहणार नाही अशी परिस्थिती येते की काय अशी शंका येते.

श्रीमती. पार्वती मानकापे : माझ्या वार्डात अनाधिकृत वसाहती आहेत. कुठेही विकास कामे केली जात नाही. विकास कामे होत नसेल तर त्या भागातील पाणीपट्टीत वाढ करु नये. काही वार्डात विकासाची कामेच केली जात नाही.

श्री. स. सलीम स. युसूफ : पाणीपट्टी दरवाढ संदर्भात सविस्तर चर्चा झालेली, सदस्यांनी आपआपले मत मांडले आता निर्णय घ्यावा एकाच विषयावर एवढा वेळ चर्चा करणे योग्य नसून उर्वरित विषयावर सुध्दा आणखी निर्णय घेण्याचे बाकी आहे. रुलींग द्यावे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : दुटप्पी भूमिका वगैरे बोलले गेले, परंतू सदस्यांचे दुटप्पी भूमिका नाही कारण १९ कोटीची तूट भरुन काढण्यासाठी दरवाढीचा प्रस्ताव झालेला आहे. सुरुवातीला मी म्हटले की, पाणीपुरवठयाचे नियोजन बरोबर नाही. २० हजार अनाधिकृत नळ कनेक्शन असतील त्यापासून २.५० कोटी रुपये मिळू शकतील. असा सुध्दा खुलासा झाला, यावरुन प्रशासनाने नियोजन नाही. ८३ हजार नळ कनेक्शन संख्या दाखविली जाते. त्यात २९ हजार सिडकोचे आहेत. या शहरात फक्त ५५ हजारच नळ कनेक्शन आहे का, हा मुद्दा महत्वाचा आहे. ज्याच्याकडे नळ आहे, त्याला सर्व्हे बरोबर न झाल्यामुळे अधिकारी यांनी वसुली केलेली असल्याने ही तुट निर्माण होत आहे. थकीत रक्कमेसह ६० कोटी येणे आहे, एका घरांना ५०००/- रु. टॅक्स आकारला जातो, तर दुसऱ्या बाजुच्या घराला ५००/- रु. आकारला जातो. हया तफावतीमुळे ज्यांना ५०००/- रु. आकारणी होते ते लोक विचारपूस करण्यासाठी महानगरपालिकेकडे वेळोवेळी येतात, परंतू त्यांना बरोबर उत्तरे दिली जात नाही. त्यामुळे उत्पन्न कमी येते. अशी अनेक कारणे देता येतील. सर्व सामान्य नागरिकांवर पाणीपट्टीत वाढ करुन बोजा टाळु नये. अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी. अधिकारी वसुली करीत नसतील तर, त्यांची एक वर्षासाठी वेतनवाढ थांबवावी असे माझे मत आहे. परंतू पाणीपट्टीत वाढ करु नये.

श्री. काशीनाथ कोकाटे : पाणीपट्टीत वाढ केली तरच विकास कामे होतील अशा भावना प्रगट करण्याचा प्रयत्न येथे होत आहे. परंतू विकास कामे कशी करुन घ्यायची याची सर्व जाणीव स. सदस्यांना आहे. वसुली वाढवावी प्रशासन पाण्याचे नियोजन करणार नाही, जनतेला पाणी देणार नाही, व पाणीपट्टीत वाढ करणे योग्य आहे का? १३७ कोटीचे बजेट १२१ कोटी करण्याची वेळ आली, यात कोणेते निकष लागले गेले. दरवर्षी बजेट मध्ये वाढ होते. परंतू महानगरपालिकेचा अर्थसंकल्प कमी होतो, हा कुठला न्याय आहे. सर्व पाण्याचे ऑडीट करावे, कोणत्या भागात किती पाणी दिले जाते, याची सविस्तर नोंद असावी तरच पाणीपट्टीत वाढ करण्याचा निर्णय घ्यावा. आता वाढ केल्यास सिडको हडकोतील जनता पाणीपट्टी भरणार नाही.

मा. महापौर : वसुली चांगल्याप्रकारे झाली असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

मुख्यलेखाधिकारी : मागील वर्षी मालमत्ता करावी. वसुली ८.८५ कोटी झालेली होती, काल ३१ मार्च अखेर १२.५० लक्ष मालमत्ताची या वर्षांची वसुली झालेली आहे. साधारणतः ३.५० कोटींना वाढ झालेली आहे. मुळ डिमांड मध्ये २४ कोटीचे बजेट होते. त्यातील ४ कोटी सिडको हस्तांतरण होईल हे गृहीत धरुन धरलेले होते. म्हणजेच २० कोटी रुपये मुळ डिमांड होती. सुधारीत बजेटमध्ये ११ कोटी केलेले होते. ३१ मार्च पर्यंत १२.५० कोटी म्हणजेच १.५० कोटी जास्त वसुल झाले.

श्री. संजय शिरसाठ : ज्या १३ हजार मालमत्ता शोधून काढून त्यापासून किती उत्पन्न प्राप्त झाले. वसुली केल्याचे उपआयुक्त यांनी खुलासा केला.

मुख्यलेखाधिकारी : ज्या १३ हजार प्रॉपर्टी आहे त्याचे ॲसीसमेंट यावर्षी होईल, म्हणजेच पुढील वर्षी त्याचे उत्पन्न मिळेल.

श्री. मीर हिदायत अली : ॲसीसमेंट लावल्यानंतर काही लोक कोर्टात जातात, तडजोड झाली तर ठिक आहे, नसता वसुली करणे अडचणीचे होते.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : २० कोटीचे टारगेट ११ कोटी कसे केले. याचा खुलासा द्यावा.

मुख्यलेखाधिकारी : जकातीचे खाजगीकरण होईल, व तेथील कर्मचारी मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीसाठी घेता येईल यादृष्टीने १२.६९ कोटी चालू मागणी व उर्वरित थकबाकी होती. खाजगीकरणाची प्रक्रिया बारगळल्याने तेथील कर्मचारी वसुलीसाठी घेता आले नाही, त्यामुळे वसुलीचे उद्दीष्ट कमी करण्यात आले. थकबाकीसह १२.५० कोटी वसुल केले.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : चालू मागणी जी आहे, ती आपण वसुली केलेली नाही. एकीकडे कर्मचारी नाही असे सांगितले जाते परंतू जे चालू डिमांड आहे, तेव्हढी तरी वसुली होणे आवश्यक होते.

मा. महापौर : १२.५० कोटी वसुल केले, यात थकबाकीसह वसुल केले, परंतू चालू मागणीच १२.८९ कोटीची होती ती वसुल होऊन थकबाकीतील रक्कम वसुल व्हावयास पाहिजे होती. ती झालेली नाही, यास कोण जबाबदार आहे.

श्री. संजय शिरसाठ : पाणीपट्टी तसेच मालमत्ता विषयावर सविस्तर चर्चा झाली ही चर्चा होत असतांना प्रशासनाने दिशाभूल केलेली आहे. मालमत्ता वसुली व पाणीपट्टी वसुली जकात खाजगीकरण न झाल्यामुळे व तेथील कर्मचारी न मिळाल्याने वसुली झाली नाही असे कारण दाखविले जात आहे. केवळ २०० कर्मचारी वसुलीसाठी येणार होते, त्याचा खर्च १.०० कोटी होतो. केवळ १.०० कोटी खर्च वाचविण्यासाठी १० कोटी बुडविले व प्रशासनाने २७ कोटी

थकबाकी व चालू मागणीतील रक्कम वसुली केली नाही, असा अर्थ निघतो. हे कारण दाखविणे प्रशासनाचे बरोबर नाही. खाजगीकरणाला सर्वसाधारण सभेने मान्यता दिली प्रशसनामार्फत टेंडर ही काढण्यात आले. ५८.५० कोटीचे टेंडर आले होते. त्यामध्ये आजची वसुली पाहता ८.५० कोटीचा तोटा झालेला आहे, कर्मचाऱ्यांचे १.०० कोटी व ७.५० कोटी तोटी असे एकूण ८.५० कोटीची वसुली कमी आली असे म्हणता येईल. खाजगीकरण न झाल्यामुळे तेथील कर्मचारी मिळाले नाही, म्हणून मालमत्ता व पाणीपट्टीची २७ कोटीची वसुली व टेंडरनुसार ८.५० कोटी कमी आलेली रक्कम असे एकूण ३४.३५ कोटी वसुल झाले असते. ते झालेले नाही. फक्त २०० कर्मचाऱ्यांमुळे ३४.३५ कोटीची वसुली झालेली नाही, खाजगीकरण करण्याला प्रशासनाला कुणीही केलेला नाही. सभागृहाने मान्यता दिली, दिशा दिली, त्याप्रमाणे कार्यवाही करावयास पाहिजे होती ती झालेली नाही. प्रत्येक बजेटच्या वेळी प्रस्ताव ठेवायचा नगरसेवकामध्ये वाद निर्माण करायचे हे धोरण योग्य नाही. खाजगीकरणाची कार्यवाही करण्यास प्रशासनाला कुणीही थांबविले नाही. विनाकारण व्यापाऱ्यांवर, नागरिकांवर बोजा लावणे बरोबर नाही. त्यासाठी जे अधिकारी / कर्मचारी वसुलीमध्ये कमी पडले असेल, त्यांचे एक वर्षाचे वेतनवाढ थांबवावी अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो. वसुली होत नाही व जे पाणीपट्टी भरतात त्यांचेवर पुन्हा बोजा टाकणे योग्य नाही, म्हणून पाणीपट्टीला विरोध आहे. आताच सांगण्यात आले की, १३ हजार मालमत्ता शोधण्यात आल्या ५०% नळ कनेक्शन गृहीत धरल्यास ६,५०० नळ कनेक्शन अतिरिक्त होतात. त्याची वसुली केली असती तर जी तुट येते कमी प्रमाण झाले असते. १५ कोटीचे उद्दीष्ट ठेवल्यानंतरच पुन्हा ११ कोटीवर आणले जाते व वसुली होत नाही, म्हणून सुध्दारीत मध्ये ८ कोटीवर आणले जाते, ही हास्यास्पद बाब आहे. यावरुन प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी जी वसुलीची जबाबदारी आहे. ती पार पाडीत नाही. पाणीपट्टीचा जेव्हा जेव्हा विषय येतो, त्यावेळी प्रत्येक सदस्य हे त्यांचे त्यांचे पक्षाचे नेतृत्व करुन पाणीपट्टीत विरोध करतात ते त्यांचे पक्षाची भूमिका मांडतात की, पाणीपट्टी वाढवितांना विरोध केला असे दाखविले जाते. जनतेची बाजू घेतली असे दाखविले जाते. परंतू हे होत असतांना सदस्यांच्या अडचणीकडे लक्ष दिले जात नाही. या सभागृहात सर्व सदस्य तळमळीने बोलतात, त्यांचे प्रश्न मांडतात. सिडको हडको भागात १ दिवसाआड पाणी येते. याचा अर्थ आजच ते ६ महिन्याचे १२००/- रुपये भरतात, असे असतांना पुन्हा वाढ करावी, असेच प्रशासनाचे म्हणने आहे, असे या प्रस्तावातून दिसून येते. सिडको हडको भागासाठी पाणी देण्याबाबत एक्सप्रेस लाईनचा चांगला निर्णय आपण घेतलेला आहे. जनतेच्या घरात पाणी द्यावे, नंतरच दरवाढीचा विचार व्हावा. एक्सप्रेस लाईनचा प्रस्ताव मंजूर होऊन अद्याप काम सुरु नाही. याबाबत प्रशासनाने का गांभीर्याने कामाला सुरुवात केली नाही. मला शंका आहे. यावर्षी देखील पाईप लाईनचे काम होते किंवा नाही परंतू पुढील वर्षी सुध्दा होते की नाही अशी शंका येते. जे निर्णय सभागृह घेते. त्याची अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासनाने असून अंमलबजावणी होते की नाही हे सुध्दा पाहण्याचे काम आपले आहे हे विसरुन चालणार नाही. मागच्या वेळेस मोटारी जप्त

करणार, नळ कनेक्शन काढून टाकणार, असा निर्णय घेण्यात आता परंतू प्रत्यक्ष कार्यवाही काहीच नाही. असे असतांना सुध्दा ज्या ज्या वेळी कर्मचारी वसुलीला आल्यानंतर त्यांना एकही सदस्यांनी विरोध केलेला नाही. मालमत्तेची थकबाकी ३.३८ कोटी होती. त्यातील फक्त १.३० कोटी टारगेट ठेवले गेले. यावरुन फक्त ३०% टारगेट ठेवले होते असे सिध्द होते. इतर झोनची तीच परिस्थिती आहे, एका झोनची वसुली ४.४८ कोटी वसुलीचे टारगेट २ कोटी ठेवले गेले. ४.४८ कोटी ऐवजी ४ कोटी का ठेवत नाही. असा माझा प्रश्न आहे. केवळ कर्मचारी नाही म्हणून वसुली होत नाही, असा अर्थ लावणे बरोबर नाही. कर्मचाऱ्यांच्या खर्चावर १ कोटी लागतील, परंतू १ कोटी खर्चामुळे ३६ कोटी महानगरपालिकेचे वसुलीपोटी येणारे आले नाही. जे आले असते तो महानगरपालिकेस नफाच असता दुसरे असे की, शासनाने पत्र देऊन शैक्षणिक अनुदान बंद करण्याचा निर्णय दिला. ते प्रस्तावात नमुद करुन सभागृहापुढे आणण्याचे कारण नाही. परंतू प्रशासन सभागृहाची दिशाभूल करण्याचे काम करते. कोणते ही शासन पाणी प्रश्नावर अत्यंत गंभीरतेने विचार करते. शासन कुणाचेही असते. अधिकाऱ्यांना वसुली करायीच नाही आणि शासनावर ढकलायचे असे वाटते. शासन अनुदान बंद करणार नाही या सभागृहातील सर्व पक्षाचे सदस्य शासनाकडे जाऊन विनंती करुन सांगण्यात येईल की, अधिकारी वसुली करीत नाही. त्याचा बोजा नागरिकांवर पडत आहे. म्हणून वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा निर्णय घेतलेला आहे. असे शासनास सांगावे लागेल व अनुदान बंद करु नये, अशी विनंती करावी लागेल. आजच्या चर्चेत जवळपास ९५% नगरसेवकांनी विरोध केलेला आहे. त्यामुहे पाणीपट्टीत कसल्याही प्रकारची वाढ न करता तसा निर्णय घेण्यात यावा.

श्री. किशोर तुळशीबागवाले : मागच्या पंचवार्षिक योजनेच्या वेळेस युती शासन असतांना महानगरपालिकेने ७००/- रु. पाणीपट्टी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर वाढ आता १२००/- रु. पाणीपट्टी सध्या आहे. पाणीपट्टी वाढीचा निर्णय हा स्थानिक पातळीवरील असून शासनाचा संबंध येत नाही. पाणीपट्टी दर वाढीची चर्चा करीत असतांना शासनावर टिका करणे बरोबर नाही. बऱ्याच सदस्यांची दर वाढीला विरोध केलेला त्यास आहे माझे, तसा आपण निर्णय घ्यावा.

मा. महापौर : गेल्या बजेट मध्ये पाणीपट्टी वसुलीचे उद्दीष्ट १५ कोटीचे होते. वसुली ८.८५ कोटी वसुल केले. प्रशासनाने १३ कोटीचे उद्दीष्ट प्रस्तावित केले होते. या मागील वर्षात १५ कोटीचे व यावेळेस १३ कोटीचे उद्दीष्ट निश्चित केले. स्थायी समितीने १ कोटी वाढवून १४ कोटी केले. मागील वसुलीच्या तुलनेत २ ते २.५० कोटीची वाढ झाली असे सांगितले जाते. यावर्षी ४ ते ४.५० कोटीची वाढ प्रशासनाने ठेवलेली आहे. तेव्हढी वसुली होईल का? झाले नाही तर कोणती कामे होणार आहे. तसेच मालमत्तेच्या बाबतीत सुध्दा आहे, २४ कोटीचे उद्दीष्ट १२ कोटी वसुल केले. या बजेटमध्ये १५ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले. बजेट वाढण्याऐवजी कमी होत आहे, याचा अर्थ प्रशासनाची काम करण्याची वसुलीची क्षमता कमी झाली काय हे दिसून येते. वसुलीसाठी जे कर्मचारी दिले असतात त्यांना इतर कामे दिली जात नाही

तर हे कर्मचारी / अधिकारी एप्रिल ते मार्च पर्यंत काय काम करतात, असा प्रश्न निर्माण होतो. जकातीच्या बाबतीत खाजगीकरण झाले तर ६१ कोटीचे होते. खाजगीकरण न झाल्यामुळे सुधारित मध्ये ५२.५० कोटीचे प्रशासनाने ठेवले. मागील तीन दिवसाचे आकडे बघीतले तर ५०.७५ लक्ष आहे. प्रशासनाने जातीने लक्ष देऊन काम केले तर मोठया प्रमाणात जकात वसुल होऊ शकतो. शेवटच्या दिवसात एवढी वसुली होते तर मागील दिवसात ते २० ते २५ लक्ष वसुली का होत नाही. त्यात चोरी होते का? अशा घटना का घडतात प्रशासनाचे याकडे लक्ष नाही का? बजेट मध्ये ७० कोटी अस्थापनेवरील खर्च दाखविला इतर खर्च २० कोटी एकूण ९० कोटी जाणार उर्वरीत विकास कामासाठी राहणार तेही वसुल झाले तर जे वसुली करीत नाही. त्यांचेवर का कार्यवाही करण्यात येऊ नये असे सभागृहाने मत व्यक्त केलेले आहे. जी तुट निर्माण होते, ती वसुली न केल्यामुळे होते व त्याचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांना सोयी सुविधा देण्यावरच होतो. असे म्हणावे लागेल. ज्या १३ हजार मालमत्ताचा समावेश झाला आहे. ते पुर्वी का झाले नाही. १९८८ पासून मालमत्तेचे रिव्हीजन झालेले नसून रिव्हीजन झाले असते तर मालमत्तेत वाढ झाली असती. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले असते आणि मालमत्ता, पाणीपट्टी तसेच जकात या तीन माध्यमातून खऱ्या अर्थाने महानगरपालिकेस उत्पन्न मिळते. तेच आले नाही. पाणीपट्टीत फक्त एक त दोन सदस्यांना वाढ करावी असे म्हटले आहे. परंतू दरवाढ का करावी लागते. त्याचा अर्थ वसुली होत नाही. म्हणून दरवाढ करावी लागते असा होते. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन १२००/- रुपयेच पाणीपट्टी ठेवण्यात येते. ज्या ज्या अधिकाऱ्यांनी ज्या सुविधा मागविल्या त्या देण्यात आलेल्या आहे. तरी सुध्दा ते अधिकारी यात उपआयुक्त असतील झोन अधिकारी असतील, जकात अधिक्षक असतील वसुलीचे टारगेट पूर्ण करु शकले नाही अशा अधिकाऱ्यांची एक वर्षाची वेतनवाढ थांबविण्यात यावे. आजची सभा तहकुब करण्यात येते व उदया सकाळी ११.३० वाजता सभा होईल कृपया याची नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## *दिनांक २-४-२००२ रोजी संपन्न झालेल्या (अर्थसंकल्पीय) सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**मंगळवार दिनांक २-४-२००२ ( दि. १-४-२००२ ची तहकुब सभा ) रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ११.३० वाजता महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह " येथे " वंदे मातरम् " या गिताने सुरुवात झाली. सभेला अधिकारीवर्ग यांचेसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. देसरडा प्रशांत सुभाष | स. सभासद |
| २) | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ३) | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ४) | स. स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ५) | स. स. श्री. तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ६) | स. स. सौ. साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ७) | स. स. श्री. शे. ईलीयास किरमानी शेख उमर | -//- |
| ८) | स. स. श्री. रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ९) | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| १०) | स. स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| ११) | स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १२) | स. स. श्री. मानकापे पार्वती लहानु | -//- |
| १३) | स. स. सौ. साधना गणेश सुरडकर | -//- |
| १४) | स. स. सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| १५) | स. स. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| १६) | स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| १७) | स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| १८) | स. स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| १९) | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | -//- |
| २०) | स. स. श्री. नासेर खान सरदार खान | -//- |
| २१) | स. स. श्री. थोरात दत्तात्रय रामराव | -//- |
| २२) | स. स. श्री. सोनवणे सुदाम रामदास | -//- |
| २३) | स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत | -//- |
| २४) | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुडंलिक | -//- |
| २५) | स. स. सौ. नुसरत बानो फिरोजखान | -//- |
| २६) | स. स. श्री. तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| २७) | स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | -//- |
| २८) | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| २९) | स. स. सौ. ताराबाई सुध्दाकर जेजुरकर | -//- |
| ३०) | स. स. श्री. अशरफ युनूस मोतीवाला | -//- |
| ३१) | स. स. श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम | -//- |

३२) स. स. सौ. संगिता बाळू मैंद -//-
३३) स. स. श्री. अंबादास एकनाथराव दानवे -//-
३४) स. स. श्री. नासीर खान अ. रहेमान खान -//-
३५) स. स. श्रीमती शाहीन जफर महमुद जफर -//-
३६) स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण -//-
३७) स. स. श्री. ओक जयवंत केशवराव -//-
३८) स. स. श्री. स. सलीम स. युसूफ -//-
३९) स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली -//-
४०) स. स. श्री. अफसर खान यासीन खान -//-
४१) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती -//-
४२) स. स. श्री. शेख मुनाफ शेख यासीन -//-
४३) स. स. श्री. कैसर यान बद्रोद्यीन खान -//-
४४) स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयालाल -//-
४५) स. स. सौ. बबीता सुभाष कागडा -//-
४६) स. स. श्री. सय्यद अली सलामी स. मीरा सलामी -//-
४७) स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज -//-
४८) स. स. सौ. निखत परविन ईजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री. घडामोडे भगवान देवीदास
२) स. स. श्री. तरवेंद्रसिंग महेद्रसिंग धिल्लन

श्री. अफसरखान : आजच्या सभेला मा. आयुक्त उपस्थित नाही. खुलासा देण्यात यावा.

मा. महापौर : उप आयुक्त यांनी प्रशासनाच्या वतीने खुलासा करावा.

उप. आयुक्त (प्र.) : मराठवाडा कालबध्द कार्यक्रमाबाबत राज्याचे मा. अतिरिक्त मुख्य सचिव आलेले आहे. त्यांचे बैठकीला उपस्थित राहण्यासाठी मा. आयुक्त आजच्या सभेला नाही व मला सभेला उपस्थित राहण्याची सूचना त्यांनी केलेली आहे.

मा. महापौर : प्रशसनातर्फे आयुक्त म्हणून उप आयुक्त (प्र.) हे आहेत ते उत्तरे देतील पान क्र. २३ वर प्रशासकीय खर्चाबाबत चर्चा करावी. तत्पूर्वी कालच्या बैठकीत पाणीपट्टीत वाढ न केल्याने तुट निर्माण होऊ शकेल काय? याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : पाणीपट्टी वाढीवर ९ कोटीचे उत्पन्न अपेक्षित धरुनच अंदाजपत्रकात काही वाढीव कामांचा समावेश करण्यात आलेला होता. पृष्ठ क्र. ८७ वरील रक्कमा विचारात घेतल्या तर २००२-२००३ झाला करीता प्रस्तावित अंदाजपत्रकाची रक्कम ही २७.९९ कोटीची आहे. कामे जी होणारी आहे ती ३३ कोटीची दाखविलेली आहे. याशिवाय मा. स्थायी समितीने २.६५ कोटीची कामे सूचविलेली होती. एकंदरीत ६ ते ६.५० कोटीची कामे ही अतिरिक्त आहेत. परंतू पाणीपट्टीत वाढ न झाल्यामुळे सुमारे ७ कोटीची कामे या अंदाजपत्रकातून कमी करावी लागतील हे सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

श्री. किशोर तुळशीबागवाले : पाणीपट्टीत दरवाढ होईल हे अपेक्षित धरुनच कामाचा समावेश केलेला होता का खुलासा दयावा.

मुख्यलेखाधिकारी : २५ कोटी ऐवजी ३३ कोटीची कामे करण्याचे नमुद केलेले होते. ७ कोटीची वेगळी अतिरिक्त कामे नमुद होती, तो कामे पाणीपट्टीत वाढ न झाल्याने कमी करावी लागणार आहे.

श्री. आफसरखान : ७ कोटीची कामे होणार नाही असे उत्तर आताच देण्यात आले, परंतू त्याऐवजी स्थायी समितीने प्रशासनाने सुचविलेली कामे कमी करुन सदस्यांनी सुचविलेली कामांपैकी बरीच कामे पक्षाचे सदस्यांची दिसतात ती २ कोटीच्या वर आहे अशाी सर्व कामे रद्द करावी व प्रशासनाने घेतलेली कामेच करावी. काही वार्डाची कामे करणे आहे ते बजेट बुकमध्ये प्रशासनातर्फे घेण्यात यावे.

सौ. निखत परवीन ईजाज अली : वृत्तपत्रात बातमी आलेली आहे, नगरसेवक फक्त मानधन घेण्यासाठी येतात व कामे कोणतीच करीत नाही असे दिले. माझ्या वार्डातील एकही काम या बुक मध्ये आलेले नाही असे असेल तर, प्रशासनाने खुलासा करावा. रिटेनिंग कॉल संदर्भात २ वर्षा पासून काम करण्याबाबत सूचना दिलेल्या आहे तसे पत्रही आपल्याकडे दिलेले होते. मा. आयुक्तांना दिलेले आहे. अदयाप कार्यवाही करण्यात आलेली नाही. जनता नगरसेवकांना येऊन बोलतात.

मा. महापौर : स. स. निखत अली यांचे वार्डातील काम का आलेले नाही खुलासा दयावा.

श्री. जयवंत ओक : वर्कवाईज बजेट केले योग्य आहे, परंतू सर्वच सदस्यांच्या वार्डात कामे झाली पाहिजे.

सौ. निखत परवीन ईजाज अली : हायमस्ट दिवा बसविण्या बाबतही दोन वर्षापासून कार्यवाही चालू आहे. अदयाप हायमस्ट बसविण्यात आलेला नाही. माझा वार्ड जुना असून लिगल आहे.

मुख्य लेखा अधिकारी : वर्कवाईज बजेट तयार करीत असतांना कालच चर्चा झाल्यानुसार जो ९० कोटी रुपये खर्च होणार आहे तो बांधील खर्च आहे. तो करणे आवश्यक आहे. उर्वरित बजेट मध्ये १२ कोटीची कामे स्पील ओव्हरची आहे व नविन कामासाठी १५ ते १७ कोटी रुपये राहतात. त्यात काही सर्व व्यापक स्वरुपाची कामे असतात त्यात कोणत्याही नगर सेवकांच्या संबंधित ती कामे नसतात. जसे प्रशासकीय ईमारत मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, तसेच झाल्टा ट्रिटमेंट प्लँट अशी भांडवली स्वरुपाची बरीच कामे आहे. यावर खर्च झाल्यानंतर उर्वरित ४ ते ५ कोटीच रुपये शिल्लक राहतात. वर्कवाईज बजेट तयार होत असतांना सर्वच वार्डातील कामे येतील याची शाश्वती देता येणार नाही. विभाग प्रमुखांना टारगेट दिलेले आहे. २ कोटी मधून स्पील ओव्हरची १ ते १.५० कोटीची कामे असतील तर नविन कामे कामे ५० लक्षची तरतुद राहणार व कोणती कामे करणे आवश्यक आहे. ती ती यात समावेश करण्यात येतात, प्रत्येक वर्षी सर्व वार्डातील कामे येतील असे अपेक्षित धरणे चुकीचे होईल. सर्वच वार्डात कामे होण्यासाठी याचे नियोजन प्रत्येक आर्थिक वर्षात करावे लागणार आहे. जसजशा तरतुदी उपलब्ध होतील. तसेच जे जे प्रस्ताव स. सदस्यांचे येतील त्याचा विचार करुन त्या त्या वर्षात कामे कराव्या बाबत निर्णय घेता येईल.

श्री. अफसरखान : जो खुलास केला तो गोलमोल झालेला आहे. सभागृहाचे मत जाणून घ्यावे. स्थायी समिती मध्य जे १६ सदस्य आहे त्यांचेच वार्डातील कामे यात आलेली आहे तीच कामे होत राहिल्यास असे प्रत्येक वर्षी स्थायी समितीचे सदस्य त्यांचे वॉर्डातील कामाचा समावेश करण्यास सांगतील व काही सदस्यांच्या वॉर्डात कामे होणार नाही त्यांचेवर अन्याय झाल्या सारखे होईल त्यासाठी वॉर्डवाईज बजेट ठेवावे त्या तया वॉर्डातील कामे होणार नाही त्यांचेवर अन्याय झाल्या सारखे होईल त्यासाठी वॉर्डवाईज बजेट ठेवावे तया त्या वॉर्डात कोणत्याही कामासाठी खर्च होत राहतील. नमूद केल्याप्रमाणे कामे केल्यास ४ वॉर्डात कामे होतील बाकीचे वॉर्डातील नगर सेवकांसाठी कशासाठी महानगरपालिकेत यायचे असा प्रश्न निर्माण होतो. त्यासाठी वॉर्डवाईज ठेवावे अशी विनंती आहे. डॉ. भागवत कराड महापौर असतांना तत्कालीन आयुक्त बलदेवसिंह यांना प्रत्यक्ष माझ्या वॉर्डातील परिस्थिती दाखविली लोकांच्या घरात पाणी गेले त्या संदर्भात संरक्षित भिंत करण्यासाठी ४ वेळेस पत्र दिले अद्याप कार्यवाही नाही व नमूद केलेल्या यादीमध्ये सुध्दा त्या कामाचा समावेश का झालेला नाही. तसेच दोन वर्ष्र्ज्ञा पूर्वी एक ड्रेनेजचे काम बजेट नाही म्हणून संचिका परत आलेली आलेली होती ते काम यात समाविष्ट का झालेले नाही याचा खुलासा द्यावा.

मा. महापौर : स. सदस्य श्री. अफसरखान यांनी प्रश्न उपस्थित केल्यानुसार कामाचा समावेश का झाला नाही माहिती द्यावी.

मा. मुख्य लेखाधिकारी : जेवढी तरतूद उपलब्ध आहे त्यात १२.५० कोटीची कामे ही स्पील ओव्हरची आहे आणखी ३१ मार्च पर्यंत आढावा घेतल्यास स्पील ओव्हरची कामांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. कार्यकारी अभियंता यांना जे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे त्यांनी स्पील ओव्हरची कामे नमूद करून प्राध्यान्याने नवीन कामे दिलेली आहे. काही वॉर्डात बरीचशी कामे झालेली आहे व करणे तातडीचे नाही व हर्सूल, चिकलठाणा, नक्षत्रवाडी अशा भागाता काम करण्याचा जो स्कोप आहे अशी कामे कार्यकारी अभियंता यांनी नमूद केलेली आहे, तसेच ज्या वॉर्डात १००% बेटरमेंट चार्जेस भरलेले आहे. अशा वॉर्डातील कामांना प्राधान्य देण्यात आलेले आहे.

नासेरखॉन सरदार खॉन : श्री. रशिद खॉन (मामू) व त्यानंतर सुदाम सोनवणे महापौर होते त्या वेळची काही कामे माझ्या वॉर्डातील प्रलंबित होती. प्रशासनाने त्या कामांना मंजुरी दिलेली आहे ती कामे या बुकमध्ये नमूद केलेली नाही या संदर्भात मी प्रशासनाकडे पत्रही दिलेले आहे. जे स्थायी समितीचे १६ सदस्य अहेत त्यांचेच वॉर्डातील कामे यात आलेली दिसतात.( पत्राची प्रत मा. महापौर यांना देतात) माझ्या प्रश्नाचा खुलासा व्हावा.

श्री. प्रशांत देसरडा : काही वार्डातील कामे नमुद झालेली नाही म्हणून प्रश्न उपस्थित केलेले आहे, परंतू वर्कवाईज बजेट तयार करतांना नाशिक, पुणे महानगरपालिकेची माहिती घेऊन व तेथील नगरसेवकाशी विचार विनिमय करुनच वर्कवाईज बजेट तयार करण्याचा प्रयत्न झालेला आहे. हे का करण्याची वेळ आली जे कि प्रत्येक वेळेस नगरसेवकांना कामे होण्यासाठी या विभागातून त्या विभागात संचिका घेऊन ये जा करावे लागते, कामे करण्यास अडचण येत असे. विकास कामे व्हावती म्हणून नगरसेवक विभाग प्रमुखांना पत्र देतात. बजेट नाही म्हणून उत्तर येते तरी सुध्दा अंदाजपत्रका

तयार करा बजेट आहे की, नाही पाहण्याचे काम लेखा विभाग करेल अशी सदस्यांची विभाग प्रमुखांना मागणीं होते व संचिका लेखा विभागात गेल्या नंतर बजेट नाही पुढील वर्षात काम केले जाईल असे शेरे येतात. त्यामुळे केलेले कष्ट सर्व वाचा जाते.

अशी किती संचिका विभाग प्रमुखांकडे पडलेल्या आहे ही सत्य परिस्थिती आहे. हे सभागृहाला माहिती असेलच ही प्रथा बंद व्हावी म्हणून वर्कवाईज बजेट तयार केलेले आहे जी कामे होणार आहे ती दिलेले असून, वार्डातील नागरिकांना तेवढेच आश्वासन देता येईल व अधिकारी नगरसेवक यांचा वाद विवादही टळेल. आताच आरोप केले गेले की, स्थायी समितीच्या सदस्यांची कामे यात आलेली आहे. परंतू जी. ६४ कामाची यादी दिलेली आहेत यात एकूण ३३ वार्डातील कामे आलेली आहे. ज्या वार्डातील कामेच नाही असा एकही वार्ड यात नाही सर्वच वार्डातील कामे आलेली आहे. राहिला प्रश्न जी कामे प्रस्तावित होती ती प्रश्नासना तर्फे का आलेली नाही ज्यांचे पत्र माझ्याकडे आलेले असेल व ज्यांनी सूचना केलेल्या असतील अशा सदस्यांच्या वार्डातील कामांचा समावेश केलेला असून एकूण २.६१ कोटीची ती कामे आहे. म्हणून वर्कवाईज बजेटला मान्यता दयावी.

श्री. अफसरखान : खुलासा करतांना मा. सभापती यांनी दिशाभूल केलेली आहे. ३३ कामे घेतलेली आहे अशी माहिती दिली परंतू माझ्या माहितीनुसार स्थायी समिती मध्ये ८२ कामे प्रस्तावित केलेली होती. त्यातील ४२ कामे भा.ज.पा. नगरसेवकांच्या वार्डातील आहे १८ कामे इतर स्थायी समितीच्या सदस्यांची आहेत १७ कामे इतर नगरसेवकांचे आहे. सदर बजेट स्थायी समितीने कोणते निकष लावून मंजूर केलेले आहे याचा खुलासा व्हावा. गोलमोल उत्तर देवून सभागृहाची दिशाभूल करु नये सर्वांच्या वार्डातील कामे येणे आवश्यक आहे. मी सुध्दा माझ्या वार्डातील दोन कोटीची कामे सुचविल्यास ती प्रशासन करणार आहे का कोणी नगरसेवक काम करण्याचे सूचविणार आहे. त्यासाठी भांडवली स्वरुपाची कामे होऊन उर्वरित बजेट मधून सर्वच वार्डातील लहान मोठी कामे करण्यात यावी. यात जवळपास २५ स. नगरसेवकांच्या वार्डातील कामांच्या समावेशच नाही. या ठिकाणी प्रत्येक सदस्यांना जनतेपुढे जावे लागते. जनतेला काय उत्तरे देणार आहात हा प्रश्न सर्वांना आहे. सर्व काही काढून समान विभागणी करावी.

श्री. जयवंत ओक : ५ ते ६ वर्षा पासून प्रत्येक बजेटच्या बैठकीत वार्डवाईज बजेट करण्याची मी मागणी करीत आहे. याची कल्पना आपल्याला आहे. कारण यापूर्वी पहिल्या बॉडीमध्ये आपणही सदस्य म्हणून होते. वार्डवाईज बजेट केले असते तर सर्व सदस्यांच्या वार्डात विकास कामे झाली असतील ज्या शंका निर्माण होत आहे त्या झाल्या असत्या, ज्या ठिकाणी ज्या पक्षाची सत्ता असेल त्यांची कामे जास्त व्हावीत अशी अपेक्षा असते. हे प्रत्येक ठिकाणी चालू आहे. यात शंका नाही प्रशासन सभागृहाची दिशाभूल करीत आहे यास जबाबदार कोण आहे आज मनपाची परिस्थिती पाहिली तर एमएसईबीचे १३३ कोटी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे देणे आहे नगररचना विभागाचे २ कोटी म्हाडाचे ३ कोटी, हडको कार्यालयाकडून घेतलेले कर्ज १५ कोटी एलआयसीचे घेतलेले कर्ज २०.८० कोटीचे आहे. पोलीस दलाचे ४७ लक्ष दयावे लागतात. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे ४.५० कोटी इ. रक्कमा

महापालिकेला दयाव्या लागणार असून यास जबाबदार कोण असा प्रश्न आहे. प्रशासनाने पाणीपट्टीत वाढ करुन या शहरात चर्चेला वेगळा विषय करुन टाकलेला आहे. जनतेची नाराजी झालेली आहे. पाणीपट्टीत वाढ केल्यास ७ कोटी येणार तरच विकास कामे करणार जास्तीचे होणार असा खुलासा देणे योग्य नसून जे २१८ कोटीचे कर्ज केले त्यास प्रशासनचे जबाबदार आहे. जी कामे करणार आहे किंवा करायची आहे ती यात नमुद केलेली आहे. ती कोणता निकष लावून घेतली यास कोण जबाबदार आहे. वार्डात ड्रेनेज, लाईट, पाणी व इतर सुविधा देणे महापालिकेचे कर्तव्य आहे. जे कर्ज महापालिकेकडे आहे ते प्रशासनाने कोणत्या पध्दतीने घेतलेले आहे. किंवा झालेले आहेत. यास प्रशासन जबाबदार आहे. नगरसेवक नाही त्याची परतफेड कशी करायची हे प्रशासनानेच ठरवावे नगरसेवकांना दोष देऊ नये. हे शहर अनाधिकृत वसाहती असलेले शहर आहे. गुंठेवारी लागू केली असती तर, २०० कोटीचे कर्ज परत करण्यास मदत झाली असती त्याचा उल्लेख यात केलेली नाही म्हणून, या प्रस्तावास शासनाची मंजूरी आली नाही तरी ज्या ज्या भागात मुलभूत गरजा देण्याच्या दृष्टीने विकास कामे केलेली आहे त्या ठिकाणी कामे व्हावीत व शासनाने गुंठेवारीच्या प्रस्तावास मान्यता दिली तर, त्या त्या भागात विकास केला पाहिजे. यासाठी बजेट मध्ये काही तरतुद केलेली नाही. त्यासाठी वार्डवाईज बजेट ठेवल्यारच प्रत्येक वार्डासाठी १०, १५, २० लक्ष जे येतील त्यामधून कामे करता येतील व प्रशासनाच्या माध्यमातून ज्या ज्या मोठमोठया योजना करण्याचे आवश्यक आहे जसे सिमेंट, एकादे सौंदर्यीकरण, बोल्ट पध्दतीने व्यापारी संकुल त्याही कराव्यात. माझी सभागृहाच्या वतीने अशी विनंती आहे की, जी जी मोठ मोठी कामे आहे ती रद्द करावी व वार्डवाईज बजेट करावे. ज्या ज्या वार्डात या पुर्वी एक दोन वर्षा पुर्वी विकास कामे केलेली असेल अशा भागात काम करणे आवश्यक आहे की, हे प्रशासनाने पहावे, परंतू अधिकाऱ्यांनी विकास कामे केली तर, त्यांना सुध्दा धारेवर जाते ही सत्य परिस्थिती आहे. म्हणून डांबरीकरणाची कामे किती दिवसा नंतर झाली पाहिजे याचा खुलासा घ्यावा बऱ्याच ठिकाणी एकच काम दोन वेळेस होत आहे जी कामे होतात त्या बाबत प्रशासनाचे काहीच नियोजन नाही. शहरातील स्लम भागातील अधिकृत ज्या ५२ झोपडयापट्टया आहेत तेथे ड्रेनजे लाईट, पाणी यासारख्या सुविधा उपलब्ध करुन दिल्यास नागरिक नगरसवकांना त्रास देणार नाही, म्हणून वार्डवाईज बजेट करावे, तसचे जी कामे अनावश्यक आहे. दबावाखाली आलेली असतील दुसऱ्यांदा आलेले असेल व जी कामे मोठया स्वरुपाची आहे ती रद्द करावी तसेच गुंठेवारीच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिल्यास त्या त्या भागात रस्ते, ड्रेनेज, लाईट इ. सुविधा देण्यास काय तरतुद करणार आहात त्याचा सुध्दा खुलासा व्हावा.

श्रीमती मानकापे पार्वती : दोन वर्षापासून माझ्या वार्डाती संरक्षित भिंतीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. वार्डात मा. आयुक्त, उप आयुक्त, शहर अभियंता तसेच आपण व इतर पदाधिकारी यांनी भेटी सुध्दा दिलेल्या आहे. अंदाजपत्रक मंजूर झालेले असतांना बजेट नाही म्हणून कारण दाखविले जाते. वार्डात नाल्याच्या कडेला घरे असून तेथील जनतेला दोन वर्षापासून संरक्षित भिंत

करण्याचे आश्वासन दिले जाते, परंतू अद्याप कार्यवाही होत नाही. बजेट मध्ये तशी तरतुद केलेली नाही. कामे केले नाही तर उपोषणास बसेन.

सौ. निखत परवीन ईजाज अली : ९९-२००० मधील रस्त्याचे रुंदीकरणाचे काम करण्या बाबत अदयाप कार्यवाही केलेली नाही. या अगोदरच्या बॉडीने मंजूर केलेले आहे. जास्तीत जासत १० मालमत्ता रस्त्यामध्ये येत असतील. काम होणार आहे किंवा नाही याचा सुध्दा खुलासा आताच व्हावा.

श्री. अंबादास दानवे : दोन दिवसा पासून बैठक चालू आहे. जमा बाजूवर चर्चा झालेली आहे. आता वर्गिकरण निहाय खर्च बाजुवर चर्चा करण्यात यावी त्यात आपोआपच खर्च करता व कोणत्या कामासाठी करायचा ही चर्चा होईल. पान क्र. २३ वर पासून सुरुवात करावी.

मा. महापौर : प्रत्येक सदस्य आपआपल्या वार्डाच्या प्रश्न निकाली लागण्यासाठी मुद्दा उपस्थित करीत आहे. ७ कोटीची कामे कमी होणार प्रशासनाचा खुलासा झाला, अत्यंत वाईट वाटते, परंतू प्रशासनाने वसुली किती वाढविली पाहिजे हा सुध्दा मुद्दा उपस्थित करणे सभागृहाते कर्तव्य आहे, जेणे करुन सर्वच वार्डातील कामे होतील. बुकमध्ये हे टारगेट दिले त्यापेक्षा किती टारगेट वाढवून दयायचे हा पहिला प्रश्न आहे नंतर कोणती कामे करायची हा नंतरचा प्रश्न आहे. किती टारगेट दिले गेले पाहिजे यावर चर्चा करावी. दोन दिवसापासून वसुलीवर चर्चा झालेली आहे. वसुली काहीच नाही यावर सभागृह योग्य तो निर्णय घेऊ शकते, जे अधिकारी / कर्मचारी वसुली करणार नाही त्यांचेवर कार्यवाही काय करायची यावर सुध्दा चर्चा झाली पाहिजे. जे उद्दीष्ट दिलेले आहे ते फार कमी आहे या शहराचा विकास मोठया प्रमाणात होत आहे त्या नुसार टारगेट ठरवून देता येईल.

श्री. काशीनाथ कोकाटे : उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्याबाबत चर्चा होत आहे. परंतू स. सदस्यांनी या अगोदर वार्डवाईज बजेट करण्याचा प्रश्न उपस्थित केला शहरात ८३ वार्डाची स्थापना झालेली असून, त्यात स्लम अनाधिकृत वसाहतीचा समावेश आहे. ज्या कामांसाठी तरतुद केलेली आहे. त्यावरच चर्चा करणे पहिल्यांदा आवश्यक आहे. स्थायी समितीने काही कामे सुचविली आहे तसेच प्रशासनाने सुध्दा काही कामांचा समावेश आहे यापैकी कोणत्या बाबतीत चर्चा करावयाची हे ठरवावे. स्थायी समितीने ज्या काही सूचना केलेल्या होत्या काही नविन कामे प्रस्तावित आहे तसेच प्रशासनाने ठेवलेली काही कामे स्थायी समितीमध्ये विचारविनिमय करुन रद्द करण्यात आलेली त्यात विकास, इमारती, शाळा दवाखाने, वाचनालय, संशोधन केंद्र स्मशानभूमी, कब्रस्थान ही कामे रद्द केलेली आहे, यात जे काम आवश्यक करणे गरजेचे आहे व स्लम भागातील गोरगरीबांची मुले शिक्षणाचा फायदा घेण्याच्या दृष्टीने जी जी कामे शाळेच्या बाबतीत सुचविण्यात आलेली आहे ती घ्यावी. नारेगांव सारख्या शाळेत गरिब गोरगरिबांची मुले येतात. इतर शाळा ५ ते ६ कि. मी. लांब असल्याने जाऊ शकत नाही म्हणून अवाश्यक ती कामे शाळेची मंजूर करावी. सन १९८२ मध्ये मनपाची स्थापना झाली १८ खेडी याचा समावेश करण्यात आलेला आहे त्यात पडेगांव, नक्षत्रवाडी, मुंकूदवाडी, चिकलठाणा, नारेगांव, मिटमिटा व इतर काही गावाचा समावेश केला. ज्या शाळेत विद्यार्थी भरपूर विद्यार्थी आहे त्या शाळेच्या कामांना सुध्दा स्थगिती देण्यात आलेली आहे, तसेच ज्या नविन स्मशानभूमी तयार होत

आहे त्यास संरक्षित भिंत करण्यास स्थायी समितीने मंजूरी दिली नाही, परंतू स्थायी समितीने शिफारस केलेल्या कामामध्ये स्मशान भूमीमध्ये संरक्षित भिंतीची मागणी केलेली आहे. प्रशासनाने दिलेली कामे वगळणे व सदस्यांनी शिफारस करुन दिलेल्या कामाच मंजूर देणे हे कितपत योग्य होऊ शकेल तसेच प्रशासनाने सुध्दा कैलास नगर येथील एक कामाच्या संदर्भत गल्ली नंबर सहित नमुद केलेले आहे हा भाग अधिकृत आहे का सुरेवाडी, पुंडलीक नगर, जाधववाडी येथील काही लोकांनी पाण्यासारखी २५ हजाराच्या कामाची सुविधा देऊ शकले नाही तर, कैलास नगर येथील प्रस्ताव आला कसा याचा सुध्दा प्रशासनाने खुलासा करावा. अनाधिकृत असेल तर, इतर ठिकाणी सुध्दा तशाच प्रकारच्या सुविधा दिल्या पाहिजे, तसेच वार्डवाईज बजेट ठेवण्याचा निर्णय घ्यावयाचा असेल तर आताच स. सदस्य, ओक यांनी मुद्दा उपस्थित केल्यानुसार शासनाने गुंठेवारीच्या प्रस्तावास मंजूर दिल्यास त्या त्या अनाधिकृत वार्डातील सुध्दा कामे करता आली पाहिजे. राखीव बजेट ठेवले पाहिजे. या सर्व बाबींचा विचार होऊन कार्यवाही करावी. ज्या भागाची वसुली १००% जास्त झालेली आहे. त्याचा विचार केलेला आहे असे उत्तर अधिकाऱ्यांनी आताच दिले परंतू ज्या भागात १००% वसुली होणार तीच कामे करणार का? याचा सुध्दा खुलासा व्हावा.

श्री. रतनकुमार पंडागळे : खुलासा करतांना तत्वनिष्ठ, एकनिष्ठ, निप:क्षपाती व अंमलबजावणी होईल असा असावा जी कामे रद्द केली ती कोणत्या निकषाने रद्द केली.

मा. महापौर : आताच स. सदस्य, श्री. कोकाटे यांनी प्रश्न उपस्थित केल्या नुसार ही कामे प्रशासनाकडून रद्द केली की स्थायी समितीने रद्द केलेली आहे. प्रशासनाने खुलासा करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : पुस्तकामध्ये स्पष्ट दिलेले आहे की, प्रशासनाने प्रस्तावित केलेली परंतू स्थायी समितीने रद्द केलेली कामे खर्चाच्या बाबीवर चर्चा करावी. विषयांतर होत आहे.

श्री. सुदाम सोनवणे : उत्पन्न बाजूवर दोन दिवस चर्चा झाली आज खर्च बाजूवर चर्चा करावी, परंतू त्यापुर्वी माझी एक सुचना आहे महत्वाच्या विषयावर सभा आयोजित केलेली असतांना मा. आयुक्त सभेला नाही. अति. सचिव यांचे बैठकीला गेलेले आहे. खुलासा झाला जे उप आयुक्त (प्र.) आयुक्त म्हणून सभागृहात आहे त्यांचेकडे महसुली उत्पन्नाचा दोन वर्षा पासून चार्ज नाही म्हणून ते उत्तर देऊ शकतील का? आयुक्त बैठकीला गेले तर उपआयुक्त (म.) हे आजच्या बैठकीला आयुक्तांच्या जागेवर असणे आवश्यक होते ते का सभेला आलेले नाही पहिल्यांदा त्याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : प्रशसनातर्फे खुलासा करण्यात यावा.

उप आयुक्त (प्र.) : उप आयुक्त (म.) श्री. गुरटे हे रजेवर गेलेले आहे. तसे पत्र त्यांनी मनपा आयुक्त यांना दिलेले आहे.

मा. महापौर : महत्वाच्या विषयावर चर्चा असतांना संबंधित अधिकारी उपस्थित नाही, म्हणून प्र. आयुक्त यांना सूचना करण्यात येत आहे की, मा. आयुक्त यांना सभेला ताबडतोब बोलावून घ्यावे. ३० मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यात येते. (दुपारी १.२० वाजता सभा तहकुब पुन्हा सभा २.४० वाजता सुरु.)

श्री. स. अली मिरा सलामी : मा. आयुक्त सभेला का उपस्थित झाले नाही खुलासा दयावा.

उप आयुक्त (प्र.) : प्रकृती ठिक नाही. सभागृहाची भावना त्यांना कळविण्यात येईल.

श्री. सुदाम सोनवणे : मा. आयुक्त आले नाही तर उपआयुक्त (म.) श्री. गुटटे कोठे गेलेले आहे. खरोखरच त्यांची रजा मंजूर केलेली आहे खुलासा दयावा. तसेच अशी माहिती मिळाली की, उप आयुक्त श्री. गुटटे याचे कडून एक गोपनिय पत्र आले त्यात असे म्हटले की, माझी काल सभागृहात मानहाणी झाली. अधिकाऱ्यांनी व्यवस्थिती काम करीत नाही. सभागृहाने कार्यवाहीचे आदेश दिल्या नंतर यात काहीही मानहाणी नाही.

मा. महापौर : सभागृहाने कोणत्याही अधिकाऱ्यांनी मानहाणी केलेली नाही. अधिकाऱ्यांचे काय कर्तव्य असते हे सभागृहाने दाखवून दिलेले आहे. जे आतापर्यंत अधिकारी कार्यवाही करीत नव्हते त्या संदर्भात त्यांचेवर कार्यवाही करण्याचा निर्णय घेतलेला आहे यात मानहाणी झाली असे म्हणता येणार नाही. जो निर्णय घेतला तो नागरिकांच्या हितासाठी घेतलेले आहे. नागरिकांनी विश्वास टाकून सदस्यांना निवडून दिलेले आहे. त्यांची कामे झाली पाहिजे. वसुली करणार नाही तर, कामे कशी होणार या उद्देशाने सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. कोणीही व्यक्तीगत घेवू नये.

श्री. सुदाम सोनवणे : महसुली उत्पन्न कमी होणे व त्यावर सभागृहाने चर्चा करुन अधिकाऱ्यांना दोषी ठरविणे ही अधिकाऱ्यांची मानहानी होऊ शकत नाही. अशा प्रकारे प्रत्येक अधिकाऱ्याने अर्थ लावून घेतल्यास सभागृहात एकही अधिकारी उपस्थित राहणार नाही. माझ्या माहिती नुसार उप आयुक्त (श्री. गुटटे) व मुख्यलेखापरिक्षक श्री. सोनार यांनी शिक्षक भरती संदर्भात पैशाची मागणी केलेली आहे. तसचे एका संगणक विभागाच्या कर्मचारी यांना त्यांचे घरी जाऊन पैशाची मागणी केलेली आहे. अशी गुप्त माहिती आहे. जनतेच्या हिताचे प्रश्न मांडत असतांना मानहाणी झाली असे म्हणता येणार नाही, म्हणून, सभागृहाच्या वतीने विनंती की, महसूल विभागात त्यांची काम करण्याची इच्छा नसेल तर उप आयुक्त (प्र.) यांचेकडे हा विभाग दयावा व श्री. गुटटे आले तर उप आयुक्त (प्रशासन) त्यांचेकडे द्यावे.

श्री. किशोर तुळशीबागवाले : दोन दिवसा पासून बैठक चालू आहे. काल नगर सेवकांच्या विरोध झाल्याने पाणीपट्टीत वाढ करु शकले नाही. मुख्य लेखाधिकारी यांनी आताच खुलासा केला की, पाणीपट्टीत वाढ न केल्याने ७ कोटीची कमो कमी होणार आहे, परंतू ती ७ कोटीची कामे कमी न करता उद्दीष्ट वाढवून दयावे त्यानुसार वसुलीचे काम करण्यात यावे व स्थायी समितीने सादर केलेले बजेट मंजूर करावे तसेच ज्या ज्या सदस्यांच्या वार्डातील कामे आलेली नसतील त्या कामाचा यात समावेश करावा तसे माहिती संबंधित नगरसेवकांकडून मागवून घ्यावी व या विषया वरील चर्चा संपवावी. अशी विनंती.

श्री. अफसरखान : आताच मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा केला की, पाणीपट्टीत वाढ केली नाही म्हणून ७ कोटींची कामे कमी होणार आहे. महानगरपालिकेचे ८ झोन आहेत. प्रत्येक झोनला ५० लक्ष रुपये जास्तीने टारगेट दयावे. ४ कोटी वसुल होतील व इतर बाबीमध्ये वाढवून दयावे. जेणे करुन त्या वार्डाची कामे बाकी आहेत ते यात समाविष्ट करता येतील.

श्री. रतनकुमार पंडागळे : स्थायी समितीने कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोगाची थकबाकी न देण्याचा निर्णय घेतलेला आहे, परंतू या बाबतीत मागे उपोषण आंदोलन

करण्यात आलेले असून, त्यावेळी करारपत्रकावर सर्व पदाधिकाऱ्यांनी सहया केलेल्या आहेत. शासनाचा जी. आर. ९६ पासून असून, आपण या सभागृहाच्या निर्णयानुसार सन ९९ पासून पाचवा वेतन आयोग लागू करण्यात येवून कर्मचाऱ्यांना थकबाकीची रक्कम देण्याचे आश्वासन दिलेले होते, परंतू या बुक मध्ये न देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तो रद्द करुन कर्मचाऱ्यांना त्यांचे कामाचा मोबदला म्हणून ५ व्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याचे करावे अशी सभागृहाच्या वतीने विनंती करेन.

मा. महापौर : प्रशासनास विचारणा करुन निर्णय घेतला जाईल.

श्री. अफसरखान : कब्रस्थानसाठी पाणी पुरवठा करण्यास हात पंप व संरक्षित भिंत आणि इतर सुविधा देण्यासाठी काहीही तरतुद केलेली नाही.

मा. महापौर : जे ६ कोटी ठेवलेले आहे त्यातून करता येईल का. याबाबत सविस्तर चर्चा करुन नंतर विचार होईल.

श्री. अफसरखान : प्रशासनाने असे मत आहे की, अशा जागेवर सुविधा देण्याची गरज नाही. कब्रस्थान ही वक्फ बोर्डची जागा आहे, परंतू वक्फ बोर्ड एन ओ सी देत आहे. तर सुविधा देण्याबाबत मनपा उपकार करीत नाही या अगोदर कामे झालेली असून, कब्रस्थान व स्मशान भूमीसाठी जमिनी विकत घेण्यासाठी मनपास कोटी रुपये खर्च करावे लागतील. प्रेतांनी विल्हेवाट लावणे ही मनपाचे अत्यावश्यक कर्तव्य आहे, त्यामुळे ज्या सुविधा देता येतील त्या दयाव्यात अशी विनंती आहे. मनपाचा फायदा आहे.

श्री. नासेरखान सरदारखान : मी तीन वेळेस पत्र दिलेले काम यात आलेले नाही. त्या कामास सर्वसाधारण सभेने मंजूर सुध्दा दिलेली आहे. बजेट मध्ये का आले नाही.

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) : पत्र माझ्याकडे प्राप्त झालेले आहे त्यात मुद्दा क्र. ३ आणि ४ माझ्या विभागाशी संबंधित आहे. मा. महापौरांना आदेश केल्या नुसार येत्या ८ दिवसाच्या आत तेथील सर्वेचे काम करुन माहिती महापौर यांना सादर करण्यात येईल.

श्री. नासेरखान सरदारखान : सन ९६ पासून पत्र दिलेले आहे. दोन वेळेस उपोषणही केलेले आहे. त्यावेळी काम करण्याचे प्रशासनाने लेखाी आश्वासन दिलेले आहे. त्यानंतर सर्वसाधारण सभेने त्या कामास मंजूर सुध्दा दिलेली आहे का बजेट मध्ये आलेले नाही.

मा. महापौर : यासाठी तरतुद करणार आहे. सदस्यांनी तसे पत्र दयावे.

श्री. भगवान रगडे : पान क्र. ६ वर क्र. ५ मध्ये नारेगांव मनपा शाळेत खोल्यांची वाढ करणे, ब्रिजवाडी येथे वाचनालय करणे, नारेगांव येथील दशनाम गोसावी हिंदू स्माशान भूमी व मुस्लीम कब्रस्तान विकसित करणे तसे ब्रिजवाडी कब्रस्तान संरक्षित भिंत व तार कुंपन करणे ही कामे प्रशासनाने सादर केलेली होती ती स्थायी समितीने रद्द केलेली आहे, परंतू पान क्र.८ ८८ ते १३० पर्यंत जी कामे दिलेली आहे ती सर्व मंजूर केल्यास सर्वच वार्डातील कामे येतील. कुणाचीही नाराजी राहणार नाही.

मा. महापौर : ज्या ज्या वार्डातील कामे राहून गेलेली असतील तसे पत्र त्या त्या स. सदस्यांनी माझ्याकडे द्यावे त्या कामाचा विचार केला जाईल १५ दिवसाच्या आत यादी सादर करावी त्या कामास प्राधान्य दिले जाईल. मालमत्ता कराचे उद्दीष्ट १७ कोटीचे ठेवलेले होते ते २० कोटीचे करण्यात येत आहे. तसेच

पाणीपट्टीचे १४ कोटी स्थायी समितीने निश्चित केलेले होते ते १७ कोटी करण्यात येत आहे, तसेच नगररचना विभागाचे २.७९ कोटी होते ते ४ कोटीचे उद्दीष्ट देण्यात येत आहे. आता एकूण ७.२१ कोटीची उद्दीष्टात प्रशासनाला वाढ करुन देत आहे. असे एकूण १२८ कोटी ७७ लाख ९० हजार रुपयाचा या वर्षाचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात येत आहे. यात काय दुरुस्त्या करावयाच्या त्या करण्यात येईल.

श्री. अंबादास दानवे : पान क्र. ३९ वर " ब " मध्ये २ क्र. दिले विकास निधी गेल्या वर्षी ६० लक्ष ठेवलेले होते यावर्षी ४० लक्ष काम ठेवण्यात आलेले आहे ते वाढवून दयावे तसेच कर्मचाऱ्यांच्या भाडेपोटी ३.७५ लक्ष रुपये वसुल करण्यात आले. यावर्षी ३.०० लक्ष दाखविण्यात आले कमी करण्यात आलेली आहे. प्रवास भत्ता यासाठी २ लक्षची तरतुद असतांना १२ लक्ष रुपये खर्च केले याची चौकशी झाली पाहिजे तसेच पान क्र. ५३ वर छावणीचा हिस्सा म्हणून ७० लक्ष तरतुद आहे. ती वाढवावी लागणार आहे. तसेच निवडणूकीसाठी ५ लक्ष रुपये खर्च होणार आहे.

मा. महापौर : ठळक वैशिष्टया मध्ये खालील बाबी नमुद करण्यात येत आहे.

१) सिडको हडको वासियांसाठी पाण्याची एक्सप्रेस लाईन टाकणे.
२) बोल्ट पध्दतीने शॉपिंग सेंटर कार्यान्वित करणे.
३) सिमेंट कॉंक्रिट रस्ते जे स्थायी समितीने मंजूर केलेले आहे.
४) आदर्श भाजी मंडई कार्यान्वित करणे.
५) बायो मेडिकल वेस्ट कार्यान्वित करणे.
६) अनाधिकृत नळ शोधून अधिकृत करणे. (अभय योजना).
७) ॲडव्हटाईजमेंट पॉलिसी.
८) मालमत्तेचे सर्व्हेक्षण करणे.
९) एक खिडकी योजना कार्यान्वित करणे.
१०) स्वतंत्र न्यायालय स्थापन करणे.
११) प्रायोगिक तत्वावर एखादया झोनची साफसफाई करणे.
१२) हस्तांतरणीय विकास हक्क (ट्रान्सफर ऑफ डेव्हलपमेंट राईट).

योजना राबविणे बाबत वरील सर्व बाबींची कार्यवाही करण्याचे काम प्रशासनाचे आहे. हा अर्थसंकल्प मंजूर करण्यात सर्वांना सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करतो.

श्री. जयवंत ओक : नगरसेवक स्वेच्छा निधी वाढवावा. विकास कामे होण्यास मदत होईल शासनाच्या जी. आर असेल तर सभागृहात वाचून दाखवावा.

मा. महापौर : मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : शासनाने राज्यातील महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात राखून ठेवल्या जाणाऱ्या नगरसेवक स्वेच्छा निधी मर्यादा बाबत दि. १ जानेवारी, २००२ रोजी शासनाचे परिपत्रक पाठविलेले आहे. या परिपत्रका नुसार राज्यात महानगरवालिकेमध्ये वार्षिक अंदाजपत्रकात राखून ठेवलेला नगरसेवक स्वेच्छा निधी महानगरपालिकेच्या वार्षिक उत्पन्नाच्या २% प्रमाणे त्याचे वार्षिक अंदाजपत्रकात राखून ठेवून तो सन प्रमाणात एकूण नगरसेवकांना विभागून देण्यात शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेचे उत्पन्न १०० कोटीच्या आसपास होईल असे गृहीत धरुन

२ कोटीची स्वेच्छा निधी साठी तरतुद केलेली आहे. तो निधी ८८ नगर सेवकांना विभागून २ ते २.२५ लक्ष निधी एका सदस्यांस येईल.

श्री. जयवंत ओक : याबाबतीत निर्णय सभागृहाच्या संमतीने घ्यावा. निधी वाढवून दयावा तसा प्रस्ताव मंजूर करुन शासनाकडे पाठवावा.

मा. महापौर : ठिक आहे. येणाऱ्या सर्वसाधारण सभेत तसा ठराव घेऊन आपल्या शासनास कळविण्यात येईल.

श्री. अफसरखान : जसे शिवाजी पुराण वस्तु संग्राहालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरचे काम केले त्याप्रमाणेच मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे काम बाकी आहे. अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली असता यावर्षी ९० लक्षची तरतुद केली तर काम पुर्ण होऊ शकेल. ६० लक्षची तरतुद केलेली आहे. ९० लक्षची करावी.

श्री. गणेश तांबे : मा. महापौरांची चांगले अर्थसंकल्प मंजूर केले. मा. महापौरांचे अभिनंदन तसेच अधिकारी व कर्मचारी यांनी चांगली वसुली केली. जकात अधिक्षकांचे देखील अभिनंदन करण्यात येते.

मा. महापौर : आपण केलेल्या सूचना नुसार काहीही दुमत नाही. संबंधित अधिकाऱ्यांकडून तसा अहवाल मागवून कार्यवाही करता येईल.

**ठराव :**

स्थायी समितीने शिफारस करुन सर्वसाधारण सभेपुढे दाखल केलेले सन २००१-२००२ सुधारित व सन २००२-२००३ चे मुळ अंदाजपत्रकावर सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष व काम निहाय काम व रक्कमेत बदल / फेरफार व दुरुस्ती करण्याचे अधिकार मा. महापौर यांना प्रदान करण्यास व त्याप्रमाणे दुरुस्त्या करुन सन २००१-२००२ चे सुधारित अंदाजपत्रक जमा रु. ९७ कोटी ११ लाख ५० हजार व रु. ९६ कोटी ९९ लाख ८० हजार खर्चाच्या वर रु. ११.७० लाख शिल्लकी तसेच सन २००२-२००३ चे मुळ अंदाजपत्रक रुपये १२८ कोटी ७७ लाख ९० हजार जमा व रुपये १२८ कोटी ६१ लाख ५ हजार खर्चाचे व रु. १६.८५ लक्ष शिल्लकी अर्थसंकल्पास सर्वानुमते स्वितकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १८-४-२००२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**गुरुवार दिनांक १८-४-२००२ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली.**

**सभेला मा. आयुक्त यांचेसह संबंधित अधिकारीवर्ग तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. शिंदे राजु रामराव | स. सभासद |
| २) | स. स. श्री. पंडागळे रतनकुार नारायणराव | -//- |
| ३) | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ४) | स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ५) | स. स. श्री. तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ६) | स. स. सौ. साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ७) | स. स. श्री. शे. ईलीयास किरमानी शेख उमर | -//- |
| ८) | स. स. सौ. इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ९) | स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| १०) | स. स. श्री. वाघ साहेबरनाव बाबुराव | -//- |
| ११) | स. स. सौ. पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १२) | स. स. श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १३) | स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १४) | स. स. सौ. शिंदे रुख्मिणी राधाकिसन | -//- |
| १५) | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १६) | स. स. सौ. लोखंडे कचराबाई उत्तमराव | -//- |
| १७) | स. स. श्री. मानकापे पार्वती लहानु | -//- |
| १८) | स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| १९) | स. स. सौ. सुरडकर साधना गणेश | -//- |
| २०) | स. स. सौ. रहाटकर विजया किशोर | -//- |
| २१) | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २२) | स. स. सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २३) | स. स. श्री. जबिंदा दलबिलसिंग रणजितसिंग | -//- |
| २४) | स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २५) | स. स. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २६) | स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २७) | स. स. श्री. अब्दुल रशिद अब्दुल सत्तार | -//- |
| २८) | स. स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| २९) | स. स. श्री. डॉ. कराड भागवत किसनराव | -//- |
| ३०) | स. स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| ३१) | स. स. श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान | -//- |

| | | |
|---|---|---|
| ३२) | स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| ३३) | स. स. श्री. नासेर खान सरदार खान | -//- |
| ३४) | स. स. श्री. थोरात दत्तात्रय रामराव | -//- |
| ३५) | स. स. श्री. सोनवणे सुदाम रामदास | -//- |
| ३६) | स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत | -//- |
| ३७) | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुडंलिक | -//- |
| ३८) | स. स. सौ. नुसरत बानो फिरोजखान | -//- |
| ३९) | स. स. श्री. तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| ४०) | स. स. सौ. मोरे जयश्री कुमारराव | -//- |
| ४१) | स. स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ | -//- |
| ४२) | स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| ४३) | स. स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय | -//- |
| ४४) | स. स. सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग | -//- |
| ४५) | स. स. श्री. देसरडा प्रशांत सुभाष | -//- |
| ४६) | स. स. श्री. अ. कदिर मौलाना सय्यद | -//- |
| ४७) | स. स. सौ. जेजुरकर ताराबाई सुधाकर | -//- |
| ४८) | स. स. श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम | -//- |
| ४९) | स. स. सौ. संगिता बाळू मैंद | -//- |
| ५०) | स. स. श्री. अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ५१) | स. स. श्री. नासेर खान अ. रहेमान खान | -//- |
| ५२) | स. स. श्रीमती शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ५३) | स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण | -//- |
| ५४) | स. स. सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ | -//- |
| ५५) | स. स. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| ५६) | स. स. श्री. स. सलीम स. युसूफ | -//- |
| ५७) | स. स. श्री. तकीहसन खान कासिम हसन खान | -//- |
| ५८) | स. स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली | -//- |
| ५९) | स. स. श्री. अफसर खान यासीन खान | -//- |
| ६०) | स. स. श्रीमती सुलताना बेगम चाँद | -//- |
| ६१) | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६२) | स. स. श्री. सलिम पटेल समशेर पटेल | -//- |
| ६३) | स. स. श्री. कैसर यान बद्रोद्यीन खान | -//- |
| ६४) | स. स. श्री. सिध्द जगदिश कन्हैयालाल | -//- |
| ६५) | स. स. सौ. बबीता सुभाष कागडा | -//- |
| ६६) | स. स. श्री. सय्यद अली सलामी स. मीरा सलामी | -//- |
| ६७) | स. स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज | -//- |
| ६८) | स. स. सौ. निखत परविन ईजाज अली | -//- |
| ६९) | स. स. श्री. वडागळे सुनिल बुथवेल | -//- |

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री. घडामोडे भगवान देवीदास
२) स. स. श्री. तरवेंद्रसिंग महेद्रसिंग धिल्लन

३) स. स. सौ. सलमा बानो मिर मो. अली

श्री. जयवंत ओक : महिला व बाल कल्याण समिती प्रमाणेच इतर विशेष समित्या जसे बांधकाम, शिक्षण, पाणीपुरवठा स्थापन करण्याबाबत कार्यवाही करावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी सूचना केल्या प्रमाणे प्रशासनाने सर्व विशेष समित्या गठीत करण्याबाबत कार्यवाही करावी.

**विषय क्र. ५८२/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व ३० (७) अणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६८, ६९, ७० व ७४ अन्वये महिला व बाल कल्याण समितीच्या नऊ (९) सभासदांची निवड करणे बाबत.

**संवाद :**

पिठासिन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) अन्वये महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी निवड करण्या करिता दिनांक ३-४-२००२ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ६८, ६९ व ७० अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्या नुसार दिनांक ४-४-२००२ ते ११-४-२००२ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असून, दिनांक ११-४-२००२ रोजी सांयकाळी ६.०० वाजे पर्यंत महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदरासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावली नियम क्रमांक ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून, खालील सर्व उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहेत.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवारांचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | ८३ | निखत परविन ईजाज अली | कैसरखान बद्रोद्दीखान | शे. मुनाफ शे. यासिन |
| २ | ०३ | साजेदा बेगम विखार अहेमद | तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | मिर हिदाय अली मिर बसालत अली |
| ३ | ३६ | रशिदा बेगम गफ्फार यारखान | स. सलिम स. युसूफ | नासेरखॉ सरदारखॉ |
| ४ | ४४ | खरात कुसूमबाई दौलत | इंगळे शंकुतला सांडूजी | रगडे भगवान दगडूजी |
| ५ | १४ | शिंदे रुख्मणी राधाकिसन | आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | अंबादास एकनाथराव दानवे |
| ६ | ५६ | ताराबाई सुधाकर जेजुरकर | लकडे भरत श्रीपती | चंद्रशेखर लक्ष्मीनाराण जैस्वाल |
| ७ | १६ | कचराबाई उत्तम लोखंडे | अंबादास एकनाथ दानवे | आनंद विनायकराव तांदुळवाडीकर |
| ८ | ११ | पवार मंदाबाई प्रभाकर | सौ. साधना गणेश सुरडकर | देसरडा प्रशांत सुभाष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | ५९ | संगिता बाळू मैंद | देसरडा प्रशांत सुभाष | मानकापे पार्वती लहानु |
| १० | ६४ | दाणे चंद्रभागाबाई भगिरथ | पडागळे रतनकुमार नारायणराव | साळवे माणिक लक्ष्मण |
| ११ | ८० | बबिता सुभाष कागडा | किवळेकर जयश्री सारंग | चंद्रात्र सुवर्णा उमेश |
| १२ | स्विकृत सदस्य | सलाम बानो मिर मोहमद अली | श्री. काशीनाथ हरीभाऊ कोकाटे | तुळशीबागवाले किशोर बाबुलाल. |
| १३ | ६२ | शाहिन जफर व महेमुद जफर | शिंदे किशोर रावसाहेब | औताडे रावसाहेब ममतु पाटील |
| | | | शिंदे किशोर रावसाहेब | कोकाटे काशिनाथ हरिभाऊ |

पिठासिन अधिकारी : वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सूचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सूचक किंवा अनुमोदक या पैकी एखादा उपस्थित नसेल तर, इच्छुकाला या दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्याच्या संमतीने ३० मिनिटाच्या अवधित म्हणजेच १२.४० वाजे पर्यंत आले नांव परत घेता येईल तरी कृपया ज्यांना महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव १२.४० वाजे पर्यंत परत घेता येईल. मात्र वेळे नंतर महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पिठासिन अधिकारी : महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी १३ उमेदवारांपैकी विहित मुदतीत म्हणजेच १२.४५ वाजे पर्यंत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| **अ. क्र.** | **उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे** |
|---|---|
| १. | स. स. सौ. साजेदा बेगम विखार अहेमद |
| २. | स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉन |
| ३. | स. स. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर |
| ४. | स. स. सौ. पवार मंदबाई प्रभाकर |

आता महिला बाल कल्याण समिती सदस्य पदाचे निवडणूकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहे.

| **अ. क्र.** | **उमेदवारी नांवे** |
|---|---|
| १. | स. स. सौ. निखत परविन ईजाज अली |
| २. | स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत |

३. स. स. सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
४. स. स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
५. स. स. सौ. संगिता बाळू मैंद
६. स. स. सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
७. स. स. सौ. बबीता सुभाष कागडा
८. स. स. सौ. सलमा बानो मिर मोहमद अली
९. स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर

मा. पिठासिन अधिकारी : महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी एकूण ९ सदस्यांची निवड करायची आहे. एकूण १३ उमेदवारी अर्ज दाखल झालेले होते. त्यापैकी विहित मुदतीत चार उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतलेले आहेत.

मा. पिठासिन अधिकारी : सभा कामकाज नियामावलीचे नियम क्र. ४८ अन्वये उमेदवारी परत घेतल्या नंतर योग्य रितीने आलेले आता ९ अर्ज शिल्लक राहिलेले आहेत. महिला व बाल कल्याण समितीचे ९ सदस्यांची निवड करावयाची असल्याने मी असे घोषित करतो की, महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी खालील सदस्यांची बिन विरोध निवड झाली असून मी त्या सर्वांचे अभिनंदन करतो.

| **अ. क्र.** | **विजयी उमेदवारी नांवे** |
|---|---|
| १. | स. स. सौ. निखत परविन ईजाज अली |
| २. | स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत |
| ३. | स. स. सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन |
| ४. | स. स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे |
| ५. | स. स. सौ. संगिता बाळू मैंद |
| ६. | स. स. सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ |
| ७. | स. स. सौ. बबीता सुभाष कागडा |
| ८. | स. स. सौ. सलमा बानो मिर मोहमद अली |
| ९. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर |

मा. पिठासीन अधिकारी : आताच घोषित केल्याप्रमाणे नवीन महिला व बाल कल्याण समिती अस्तित्वात आल्यामुळे मुंबई (७) प्रमाणे सन २००१ मध्ये स्थापन झालेल्या महिला व बाल कल्याण समितीचा कार्यकाळ दिनांक ३०-४-२००२ रोजी संपुष्टात येत असल्याचे जाहिर करतो.

**ठराव क्र. ५८२/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व ३० (७) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४८ अन्वये उमेदवारी परत घेतल्या नंतर योग्य रितीने आलेले नऊ उमेदवारी अर्ज शिल्लक राहिल्याने महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी खालील नऊ सदस्यांची बिन विरोध निवड झाली आहे. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. स. स. सौ. निखत परविन ईजाज अली
२. स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत
३. स. स. सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
४. स. स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
५. स. स. सौ. संगिता बाळू मैंद
६. स. स. सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
७. स. स. सौ. बबीता सुभाष कागडा
८. स. स. सौ. सलमा बानो मिर मोहमद अली
९. स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर

तसेच नविन वरील महिला व बाल कल्याण समिती अस्तित्वात आल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (७) प्रमाणे सन २००१ मध्ये स्थापन झालेली महिला व बाल कल्याण समितीचा कार्यकाळ दि. ३०-४-२००२ पासून संपुष्टात येत आहे. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.